श्रीगुरुश्शरणम्

# सारस्वत रत्नमाला.

( प्रथमगुच्छ. )

जो उत्तमगुणें शोभला । तोचि पुरुष महा भला ॥
कित्येक लोक तयाला । शोधित फिरती ॥
मनापासून भक्ति करणें । उत्तम गुण अगत्य धरणें ॥
तया महापुरुषाकारणें । धुंडित येती ॥

समर्थ-रामदास.


संपादक

मठस्थ गणेश रामचन्द्र शर्मा—खानापूर,

‘ आर्योत्सव प्र[illegible] पुस्तकाचे कर्ते.



[ प्रथमावृत्ति ]

सन १९१० इ०

मुद्रक
दत्तात्रय गोविंद सडेकर ' धनंजय ' प्रेस खानापूर—बेळगाव.

# अनुक्रमणिका

## प्रकरण १ लें.

( वेदशास्त्रज्ञ पुरुष. )



## प्रकरण २ रें.

( साधु, संत, कवी. )

## प्रकरण ३ रें.

( शूर, मुत्सद्दी. )

# प्रस्तावना.

आपल्या भरतखंडाच्या प्रस्तुत स्थितीचें जो कोणी नीट अवलोकन करील, त्यास असें स्पष्ट दिसून येईल कीं, आपला सर्व हिंदीसमाज कित्येक शतकांच्या गाढ झोंपेंतून सांप्रत खडबडून जागा झालेला आहे व त्यानें आपल्या परिस्थितीचें योग्य निरीक्षण चालविलें आहे. परमेश्वरकृपेनें इंग्रजी सत्तेखालीं आपल्यास पाश्चात्य वाङ्मयाचा उत्तरोत्तर जास्त परिचय होत चालला आहे व त्यायोगानें आम्हांस आपली खरी योग्यता कळूं लागली आहे. आपल्या राष्ट्राची पूर्वी कशी स्थिती होती व आतां ती कशी आहे याबद्दलचे विचार आतांशा पुष्कळांच्या मनांत घोळूं लागलेले आहेत. आपल्या धर्माचें प्राचीनकाळचें शुद्ध स्वरूप हल्लीं लुप्तप्राय झालें आहे आणि आमच्या समाजरचनेचा मध्यबिंदु भलत्याचें दिशेकडे कलल्यामुळें, समाजदेहाची नैसर्गिक वाढ खुंटली जाऊन तो आजकाल कृत्रिम नियमांच्या नेटांनीं सावरला गेला आहे, या गोष्टी आतां सर्व बहुश्रुत आणि समंजस लोकांच्या ध्यानांत आलेल्या आहेत. त्याचप्रमाणें ज्ञानप्रकाशाचा लाभ केवळ फक्त निवडक जातींनाच व्हावा अशी व्यवस्था देशभर कित्येक शतकें जोरांत राहिल्यामुळें इतर (तितक्याच) महत्वाच्या जाती अज्ञानांधकारांत चांचपडत राहिल्या आहेत. अशीं एक कीं दोन आमच्या प्रस्तुत स्थितीचीं कारणें? पण त्यांची आतां आपल्यांत जाणीव उत्पन्न झाली आहे, आणि ह्याबद्दल आपल्यास पाश्चात्य वाङ्मयाचे—अर्थात् इंग्रजी सत्तेचे—आभार मानले पाहिजेत. सारांश, हल्लीं आपल्या भरतखंडांत जोराची विचारक्रांति चालली आहे. पण अशाप्रसंगीं त्या विचारक्रांतीला चांगली दिशा लावून देण्याचें काम फार जोखमीचें आहे. आणि तें राष्ट्रांतील साक्षर व जाणत्या लोकांवर येऊन पडलें आहे. कांहीं विवक्षित भागाचाच तेवढा विचार केला तरी तशाप्रकारच्या शिक्षित व समंजस मंडळींत **सारस्वत** ब्राह्मणांची पायरी पुष्कळ वरची आहे. सबंध राष्ट्राच्या धुरीणत्वासंबंधानें येणाऱ्या जबाबदारीचा आपला वांटा उचलण्यास यथाकालीं **सारस्वत समाज** बराच तयार झाला आहे हें कोणीही निष्पक्षपाती मनुष्य नाकबूल करणार नाहीं!

देशाची सुधारणा करण्याच्या कामास हात घालण्यापूर्वी कोणत्याही समाजानें प्रथम आपली सुधारणा करून घेतली पाहिजे हें उघड आहे. घरांतील घाण तशीच कायम ठेवून बाहेरील स्वच्छता राखण्याचा आव घालणें म्हणजे एका अर्थी शब्दच्छल

करणें होय! प्रथम घोड्यांची जोडी घेऊन नंतर त्यांच्यापुढें गाडी ठेवण्याचा—उलटा प्रकार—आरंभिल्यास गाडीस पुरोगति मिळेल कशी? सूर्योदयापूर्वी अरुणोदय होणें हा मुळीं सृष्टिक्रमाचा नियम ठरलेलाच आहे. त्या नियमानुसार **सारस्वतसमाजानें** स्वोन्नत्यर्थ आस्ते आस्ते बरीच खटपट चालविली आहे. गेल्या पंचवीस वर्षांमध्यें त्या समाजानें ज्या अत्यंत महत्वाच्या उपयुक्त संस्था स्थापन केल्या आहेत, त्या पाहिल्या म्हणजे आमच्या म्हणण्याची सत्यता तेव्हांच पटेल. “ **सारस्वत ब्रह्मसमूह**—मुंबई; **सारस्वत ब्राह्मणसमाज**—मुंबई, बेळगांव-शहापूर, म्हापशें, वगैरे; **सारस्वत विद्यार्थी सहायक मंडळी**, **सारस्वत दीनवत्सलसंघ**, **सारस्वत सामाजिक समूह**, **चिकित्सक समूह** ( पोतदारस्कूल )-मुंबई, **कुडाळदेशस्थ गौडब्राह्मण विद्यावृद्धिसमाज**—वसई, अर्नाळा वगैरे; **कॉनरा हायस्कूल**, **गर्लस्कूल**, **भुवनेंद्र सभागृह**—**कॉनरा हिंदुपरमनंट फंड ब्यांक**—मंगळूर; **नेटीव्ह हायस्कूल**—कालिकट, ( मलबार ) **तिरुमलदेवस्व हायस्कूल**, **ति. दे गॅर्लस्कूल**, **ति दे. लायब्ररी**—कोची, ( मलबार ) **न्यू. इंग्लिशस्कूल**-कुमठा. **सरस्वतीमंदीर स्कूल**—उडपी, **सरस्वती विद्यालय**—मंजेश्वर, **सारस्वत विद्यापीठ**—महाशाल, ( गोवा ) ” वगैरे बऱ्याच शिक्षणसंस्था आज परमेश्वरकृपेने सारस्वत समाजांत सुरळीत रीतीनें चालल्या आहेत. यातील कांहीं संस्थांनीं तर सर्वसामान्य लोकांस शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे! हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हा सर्व उपक्रम एकाच जातीकडून चालला आहे हें पाहून कोणास आनंद झाल्याशिवाय राहिल बरें?

या फुटकळ यत्नांचें केंद्रीकरण होऊन सारस्वत समाजांतील सर्व प्रगमनशील संस्थांना व्यवस्थित स्वरूप देणारी एक जंगी प्रातिनिधिक संस्था—म्हणजे **परिषद्**—हवी होती, ती देखील अलीकडे स्थापन झाली. परिषदेची कल्पना काढण्याचें श्रेय आमच्या मंगळूरकर सारस्वतबंधूंनी घेतलें आहे? पण यांत तरी पूर्वपरंपरेस सोडून असें काय झालें? साम्य दाखविण्याच्या उद्देशानें मोठ्यांची लहानांस उपमा देणें केवळ अक्षम्य नसेल तर, सुमारें एक हजार वर्षांपूर्वी व तदनंतर अशेष भरतखंडांतील धार्मिक व सामाजिक अव्यवस्था मोडण्याकरितां ज्या प्रांतांत श्रीमत् आद्य शंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य, व श्रीमध्वाचार्य यांच्यासारख्या पूज्य विभूती अवतीर्ण झाल्या, त्याच प्रांतांत जर एका विशिष्ट—सारस्वतब्राम्हण-समाजांतील स्वोन्नत्यर्थ इतस्ततः चालविल्या जाणाऱ्या संस्थांस व्यवस्थित स्वरूप देणाऱ्या जंगी संस्थेची

—परिषदेची—कल्पना काढणारी मंडळी निघाली तर तें सर्व ठीकच झालें असें कोण म्हणणार नाहीं ? त्यांत विशेष आनंदाची गोष्ट म्हटली म्हणजे आमच्या मंगळूरकर बंधूंनीं बीजारोपण केलेल्या संस्थेस मुंबई इलाख्यांतील मंडळीकडून चांगलें जलसिंचन मिळून त्याचा मोठा वृक्ष लवकरच, बनण्याचीं चिन्हें आतांपासूनच दिसूं लागलीं आहेत इतकेंच केवळ नव्हे तर कांहीं कांहीं कल्पनांस कृतीचें स्वरूप येऊं लागलें आहे. शिवाय या सर्व यत्नांत—विशेषतः शिक्षणविषयक उद्योगास—मदत करण्याच्या हेतूनें लाखोरुपये देणारे उदारधी गृहस्थ आमच्यांमधूनच निघूं लागले आहेत ही सर्वांत अत्यंत समाधानाची व अभिमानाची गोष्ट होय ! यावरून, ' इतक्या अनुकूल आश्रयांखालीं चाललेल्या एका विशिष्ट जातीच्या समाजसंस्थेच्या उदाहरणाचा परिणाम इतर जातींवरही झाल्याशिवाय राहणार नाहीं. ' असें जे पुण्याच्या **ज्ञानप्रकाश** कारांनीं म्हटलें आहे तें अगदीं सत्य आहे. असो.

तर अशाप्रकारच्या सारस्वत समाजाच्या संक्रमणस्थितींत, सारस्वत ब्राम्हण जातींतील थोर व प्रसिद्ध पुरुषांच्या आदर्शभूत चरित्रांची सामान्य जनांस आठवण करून द्यावी आणि त्या मार्गानें ज्ञातीची थोडीतरी हातून सेवा घडावी इतक्याच उद्देशानें हा **सारस्वत रत्नमालेचा प्रथमगुच्छ** सादर केला आहे. वास्तवीक इतक्यानें म्हणजे सारस्वत समाजांतील प्रसिद्ध पुरुषांची नामावली पुरी झाली अशांतला प्रकार नाहीं. कांकीं, तो समाज फार मोठा असून सर्व देशभर पसरलेला आहे. अर्थात् अशा समाजांतील थोर पुरुषांची संख्या मोठी असली पाहिजे हें उघडच आहे. पण इतक्या लांबलांबच्या ठिकाणीं जाऊन तत्रत्य थोर पुरुषांची माहिती मिळविणें व ती प्रसिद्ध करणें म्हणजे फार कठीण व कालावधीचें काम आहे. हें कोणी ही सांगेल. तथापि ज्याप्रमाणें एकाद्या अनभ्यस्त' पण विश्वासू माळ्यानें आपल्या धन्याच्या भल्या मोठ्या विस्तीर्ण अशा बागेंतील दृष्टीस पडतील तेवढीं फुलें गोळा करून मोठ्या भक्तीनें धन्यास अर्पण करावीं, तद्वतच लांबलांबच्या ठिकाणीं सारस्वत समाजांतून पसरून राहिलेलीं पण—एकाकीं जाऊन—शक्य तेवढ्या मेहनतीनें मिळविलेलीं **रत्नें** गोळा करून त्यांची ही छोटीशी माला गुंफिली आहे.

वास्तवीक थोर पुरुषांचीं चरित्रें कित्यासारखीं आहेत तीं मनुष्यांनां मनुष्यपणाचें उत्तम वळण लावितात; मनाची खरी सुधारणा करितात; धर्म, नीति, भक्ति, शांति, सदाचरण इत्यादिकांचा विकास करितात; धार्मिक, सामाजिक, नैतिक, राजकीय व अध्यात्मिक विषयांची त्यांपासून विशेष माहिती होते; आणि मनुष्याच्या

मानसिक शक्तीच्या वृद्धीचीं तीं उत्कृष्ट साधनेंच आहेत. सूर्याचे किरण समुद्रांतील खारें पाणी आकर्षण करून जसे त्याचे गोडे मेघ बनवितात, तशीं हीं **थोर पुरुषांचीं चरित्रें**. अज्ञानीजनांना सज्ञानी, दुराचाऱ्यांना सुशील, अधार्मिकांना धार्मिक, आळशांला उद्योगी बनवितात. थोर माणसांचे उदाहरण योग्यरीतीने लोकांपुढें मांडलें म्हणजे तें दुसऱ्या शंभरजणांच्या मनांत सत्कृत्याविषयीं प्रेरणा उत्पन्न करते; मनुष्याच्या हातून कोणकोणत्या प्रथमदर्शनी असंभवनीय दिसणाऱ्या गोष्टी घडण्याजोग्या आहेत तें दाखविते; मनुष्याच्या मनांत स्वतःच्या कर्तृत्व शक्तीबद्दल भरंवसा उत्पन्न करितें; आशेला पुनर्जीवन देते; उमेदीला ताजीतवानी करते; इतक्या सगळ्या गोष्टी ज्याच्या योगाने होतात तें थोर माणसाचे उदाहरण सदासर्वकाल डोळ्यापुढें राहील असें चिरकालिक स्वरूप त्यास देणें हाच प्रस्तुत **सारस्वत रत्नमालेचा** उद्देश होय. अर्थात तो उद्देश सिद्धीस नेण्याकरिता मोठ्या परिश्रमानें तयार केलेली आपल्या पूर्व पिढींतील थोर पुरुषांची ही चरित्र ( **रत्न** ) **माला**, विशेषतः सारस्वत ज्ञातीतील प्रस्तुत पिढी मोठ्या गौरवानें कंठीं धारण करील अशी आशा आहे.

आतां ही **रत्नमाला** तयार करण्याचे कामी ज्या साधनाची अनुकूलता झाली, त्याबद्दल येथे थोडा उल्लेख करणें जरूर आहे.

वस्तुतः ' चरित्रकाराचा चरित्रनायकाशी स्वतः पूर्ण परिचय किंबहुना सख्य व निकट सहवास असल्यावाचून त्याचे हातून चरित्रलेखनाचें काम धड्पणे व्हावयाचें नाहीं ' ह्या **जॉनसन**च्या म्हणण्याप्रमाणें प्रस्तुत मालेंत गुंफलेल्या सर्व रत्नांपैकी आमच्या परिचयाचीं अशीं फारच थोडीं रत्नें आहेत. इतकेंच नाहीं तर या रत्नांची योग्य पारख करण्याइतकी आम्हांमध्ये कुशलताही नाहीं. यामुळें ज्या रत्नपारख्यांकडून ही रत्नें पैदा करून आम्हीं ही माला तयार केली त्याचें बहुतेक श्रेय त्या रत्नपारख्यासच दिलें पाहिजे. ' विविधज्ञानविस्तार, स्टुडंट्स म्याक्झीन ग्रांट मेडिकल कॉलेज, केरळकोकीळ, सत्संग, बालबोध, लोकमित्र, मधुमक्षिका वगैरे मा० पुस्तकें; इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, चिकित्सक, बेळगांवसमाचार इ० जुनीं पत्रें; तसच आजगांवकरकृत कविचरित्र, पेशव्यांची बखर, सरस्वतीमंडळ, केरकर चरित्र वगैरे पुस्तकें ' या सर्वांचे प्रकाशक हेच खरे रत्नपारखी होत. जर ही रत्नपारखी मंडळी निर्माण झाली नसती तर प्रस्तुत मालेसारखा अलंकारही उत्पन्न होणें अशक्य होतें. अतएव ह्या मंडळीचे आम्हांवर फार उपकार झालेले आहेत यांत शंका नाहीं. असो.

दुसऱ्या प्रकरणांतील **बांदकर** व **अप्पयसमर्थ** ह्या दोन चरित्रांची माहिती अनुक्रमें श्रीयुत ना० वा० गुणाजी वकील बेळगांव, आत्मारामपंत भटकळकर कुमठा यांचेकडून आली आहे.

त्याचप्रमाणें श्रीयुत, काशीनाथ रघुनाथ मित्र व गणपत विश्वनाथ लाड या उभयतांनीं आपल्याकडील ब्लाक देऊन फोटोच्या कामीं बरेंच साह्य केले आहे. याबद्दल त्यांचेही आभार मानले पाहिजेत.

आता पुस्तकाला टाइप जरा बारीक वापरला असल्यामुळे, ऱ्हस्व, दीर्घ, काना मात्रा, अनुस्वार वगैरे बऱ्याच चुका राहण्याचा संभव आहे तरी वेळेच्या अभावामुळें शुद्धिपत्रही देता आले नाहीं म्हणून दिलगिरी वाटते. तथापि अशा क्षुल्लक दोषाकडे दृष्टि न देता " **मधुलिह इव मधुबिन्दून्विरलानपि भजत गुणलेशान्** । " या कव्युक्तीनुसार यातील गुणलेश तितकाच घ्यावा अशी वाचकाकडे प्रार्थना आहे.

तसेच या पुस्तकाच्या अखेरीस ' **गौडसारस्वत ब्रह्मवृन्दास अगत्याची विनंति** ' केली आहे तिकडे सर्वांनी अवश्य लक्ष पुरवावे.

अंदाजाबाहेर पुस्तकाची पृष्ठसंख्या वाढू लागल्यामुळें लिहून तयार असलेले एक चरित्र यांत घालता आले नाहीं त्याचा द्वितीय गुच्छात समावेश होईल.

शेवटीं, स्वतःच्या अंगी कोणत्याही प्रकारची पात्रता नसता ज्याच्या कृपेमुळे हें महत्कार्य निर्विघ्नपणे शेवटास गेलें त्या सच्चिदानंद परमात्म्यास अनन्यभावें शरण जाऊन ही प्रस्तावना पुरी करतो.

**खानापूर** ( बेळगांव. )
मिति मार्गशीर्ष शुद्ध ९ मी.
तारीख १०-१२-१९१०.

**मठस्थ-गणेश रामचंद्र शर्मा.**

॥ श्रीगुरुभ्योनमः ॥

# सारस्वत रत्नमाला.

## प्रकरण १ लें.

### " वेदशास्त्रज्ञपुरुष "

## महर्षि सारस्वत.

**" अहह ! महतां निःसीमानश्चरित्रविभूतयः । "**

प्राचीनकालापासून आजमितीपावेतों या भूतलावर जीं असंख्य माणसें जन्मास आलीं व जी अद्यापि जन्मास येत आहेत, त्या सर्वांमध्यें कर्तृत्ववान् माणसांची योग्यता फार मोठी आहे. जगाची बरीवाईट परिस्थिति बहुतेक ह्या कर्तृत्ववान् माणसांवरच अवलंबून असते असें म्हटलें तरी चालेल. जर अशा योग्यतेचीं माणसें राष्ट्रांत जन्मास आलीं नसतीं तर आज जी आपणांस कांहींशी सुस्थिति दिसते ती दिसली नसती. यच्चयावत् देवऋषींच्या उत्पत्तीपासून तों अर्वाचीन मनुष्याच्या उत्पत्तीपर्यंत एकंदर परिस्थिति पाहिली म्हणजे आमच्या ह्या वरील म्हणण्याची सत्यता पटेल. ज्याकालीं राक्षसादिकांचा असह्य जाच पृथ्वीवर होऊं लागला त्यावेळीं तिला त्या जाचांतून सोडविण्याकरितांच रामकृष्णादिकांचा जन्म झाला; अवर्षणादिकांच्या त्रासांतून लोकांस मुक्त करण्यासाठीं ऋष्यादिक अवतरले; चहूंकडे पसरत चाललेल्या यवनी साम्राज्याचा नायनाट करण्यासाठीं शिवाजीराजाचा जन्म झाला; मानवी जीविताची सारी इतिकर्तव्यता कर्मामध्येंच आहे असें प्रतिपादन करणाऱ्या कर्मठांचा उच्छेद करून साऱ्या दुनियेंत '**ज्ञानादेवतु कैवल्यम्**' असा श्रेष्ठ ज्ञानमार्ग स्थापन करण्याकरितां साक्षात् शंकराचार्यादिकांचा अवतार झाला. सारांश, कर्तृत्ववान् माणसांचा जन्म जगांतील एका विशिष्टप्रकारच्या कारणांनीच प्रेरित होत असतो हें निर्विवाद आहे, आणि अशाच योग्यतेचीं माणसें जगांत खरीं

जन्मास आली असें म्हटलें पाहिजे. तात्पर्य, " परिवर्तिनि संसारे मृतः को वा न जायते " अशारीतीचे भर्तृहरीनें जे उद्गार काढिले आहेत, ते अगदीं यथार्थ होत. असो. अशाच एका महत्वाच्या कारणामुळें ह्या चरित्रनायकाचा जन्म झाला आहे, म्हणून प्रस्तुत रत्नमालेमध्यें ह्या श्रेष्ठ नररत्नाची अग्रस्थानीं योजना करून सर्वांस त्याचा परिचय करून देत आहों.

आतां ह्या चरित्रनायकाचा जन्मकाल जुना किंबहुना अत्यंत प्राचीन असल्यामुळें प्रस्तुत स्थितीशीं त्या व्यक्तीचा कांहीं संबंध नाहीं. असें बहुतेकाना वाटण्याचा संभव आहे; पण विचारपूर्ण दृष्टीनें ह्या चरित्राचें अवलोकन केलें म्हणजे पुष्कळअंशीं ह्याचा उपयुक्तपणाच दिसून येईल वस्तुतः ह्या चरित्रनायकाचा जर जन्मच झाला नसता तर ही सारी पृथ्वी अगदीं निर्वेद झाली असती; पण सुदैवानें तसा प्रसंग आला नाहीं ही परमेश्वराची मोठी कृपाच समजली पाहिजे. तेव्हां याप्रमाणें साक्षात् वेद-प्रवृत्तीस कारण अशा महनीय पुरुषाचें जीवनचरित्र निदान वेदाभिमानी लोकांना समजणें अत्यावश्यक होय. ह्या अपूर्व चरित्राचा उगम महाभारतात वैशंपायन ऋषीं-पासून झालेला आहे. आज सर्व भरतखंडामध्यें प्राचीन व प्रसिद्ध आणि उपयुक्त इतिहासग्रंथ जर कोणता असेल तर तो महाभारतच होय. हे आज नव्याने कोणास सांगावयास नको. लोकाना कोणत्याही प्रकारची विपत्ति प्राप्त झाली असतां चित्त स्थिर होण्याचे साधन हाच ग्रंथ होय असे ह्मणण्यास हरकत नाहीं. अशा ह्या महत्वाच्या ग्रंथात शल्यपर्वाच्या ५२ व्या अध्यायांत महर्षिसारस्वत यांचें चरित्र आलेले आहे.

जनमेजयराजास बळरामाच्या तीर्थयात्रेचें वृत्त कथन करीत असता वैशंपायनऋषी म्हणतात:—" सोमतीर्थात स्नान करून ब्राम्हणाना अनेकप्रकारचीं दानें वगैरे देऊन झाल्यावर तो जितेंद्रिय व धर्मनिष्ठ बलराम, पूर्वी ज्याठिकाणी अनावृष्टीमुळे बारा वर्षें या भूतलावर भयंकर दुष्काळ पडला होता; उपासमारामुळें वेदाध्ययन करणारा ऋषिसमुदाय अगदीं नामशेष होण्याच्या बेतात आला होता; व अशा आणीबाणीच्या वेळीं प्रस्तुत चरित्रनायकांनी स्वतः वेदरक्षण करून ६० हजार ऋषींना शिष्य करून त्यांजकडून वेद पढविला होता; अशा त्या सारस्वतऋषीच्या आश्रमास निघून गेला " हें ऐकून राजास मोठे आश्चर्य वाटलें; तो म्हणाला, " महाराज ! एका सारस्वत-ऋषीनीं इतका मोठा ऋषिसमुदाय वेदविद्येत कसा निष्णात केला ! हें ऐकण्याची माझी फार इच्छा आहे. " तेव्हा वैशंपायन म्हणाले, " राजा—पूर्वी दधीची म्हणून

एक महातपस्वी ऋषि होऊन गेला. त्याच्या उग्र तपश्चर्येमुळें त्याला इंद्रसुद्धां थरकांप भीत असे; अनेकप्रकारच्या कंदमूलफलादिकांनीं अगर इतर कोणत्याही साधनांनीं त्याचें मन आकर्षण करणें शक्य नव्हतें, कारण तो अगदीं निर्लोभ होता.

एकदां तो दधीचिऋषि, "सरस्वती" नदीच्या तीरीं एकाग्रचित्तानें देवतर्पण करीत स्वस्थ बसला असतां, त्याला भुलवून त्याच्या तपामध्यें विघ्न आणण्यासाठीं इंद्रानें अलंबुषा नामक एका अप्सरेला त्याजकडे पाठविलें. ती सर्वांगसुंदरी तेथें प्राप्त होतांच तिचें अलौकिक सौंदर्य पाहून दधीचिऋषीचें एकाएकी रेतस्खलन झालें व तें वीर्य सरस्वतीनदीनें तत्काल आपल्या उदरांत घेतल्यामुळें ती गर्भवती झाली. पुढें योग्यकाळीं तिला उत्कृष्ट असे पुत्ररत्न झालें; तोच या चरित्राचा नायक होय. प्रसूतिसंबंधीं दोषनिवारणार्थ तिनें कांहीं दिवस घालविल्यावर ती मूर्तिमंत '**सरस्वति**' नदीदेवी त्या पुत्राला घेऊन दधीचिऋषींजवळ गेली, आणि त्यांजपुढें आपल्या कुमाराला उभें करून ह्मणाली कीं, "हे महर्षे! कांहीं दिवसांमागें अलंबुषा नामक अप्सरेला पाहून तुझें रेतस्खलन झालें होतें. तें तुझें तेज व्यर्थ जाऊं नये म्हणून भक्तिपूर्वक मीं स्वीकारिलें. त्यापासून हा पुत्र झाला आहे. अर्थात् निःसंशय हा तुझा पुत्र आहे; तर मी दिलेल्या या आपल्या निर्दोषी पुत्राचा स्वीकार कर."

याप्रमाणें त्या नदीदेवीनें केलेलें भाषण ऐकून तो ब्रम्हर्षि दधीचि फार संतुष्ट झाला व त्या पुत्राचा स्वीकार करून साक्षात् पित्याप्रमाणें त्यानें त्या बालकाच्या मस्तकाचें मोठ्या प्रेमानें अवघ्राण केलें; नंतर थोडावेळपर्यंत पुत्राचें आलिंगनसुख

---

१ ही नदी वायव्येकडील प्रांतांत आहे. प्रोफेसर विल्सननें छापलेल्या विष्णुपुराणांत पान १८१ मध्यें हिला 'सगर' असें म्हटलें आहे. हिचा प्रवाह शिवालिक पहाडांतून निघून हांसी व हिसार परगण्यांतून भातनेर शहराजवळून जातो, असें टॉडकृत राजस्थानचा इतिहास भाग २ रा पान २९५ मध्यें म्हटलें आहे. ठाणेश्वर (स्थानेश्वर) नांवाच्या पुराणप्रसिद्ध स्थलानजीक असलेलीच ही नदी असें कित्येक मानतात. (पहा जान् विल्सनकृत जातिविभाग) ऋग्वेदांतही हिच्या नांवाचा उल्लेख आढळतो. त्याचप्रमाणें महाभारतांत देखील ही नदी वालुकामय प्रदेशांत अंतर्धान पावली असल्याविषयीं वर्णन आहे. राजपुतान्याच्या उत्तरेकडे जो वालुकामय प्रदेश आहे त्यांत हिचा प्रवाह मुरला असावा, असें वाटतें.

अनुभवून प्रसन्नांतःकरणानें तो मुनिश्रेष्ठ म्हणाला, "हे सौभाग्यवति, तुझ्या उदकानें तर्पण केलें असतां देव, पितर, गंधर्व, अप्सरा वगैरे सर्व तृप्त होतील " असा तिला वर देऊन त्या ऋषिवर्यानें पुढीलप्रमाणें तिची स्तुति केली:—

दधीचि उवाच । " प्रसूतासि महाभागे सरसो ब्रह्मणः पुरा
जानन्ति त्वां सुरश्रेष्ठे मुनयः संशितव्रताः ॥
मम प्रियकरी चापि सततं प्रियदर्शने
तस्मात्सारस्वतं पुत्रमदधा वरवर्णिनि ॥
तवैव नाम्ना प्रथितः पुत्रस्ते लोकभावनः
" सारस्वत " इतिख्यातो भविष्यति महातपः ॥ "

दधीचि म्हणाला ? हे महाभाग्यशालि, तू ब्रम्हदेवाच्या ' सरसः ' म्हणजे सरोवरापासून उत्पन्न झालीस; हे जाणून पूर्वकालीन ऋषींनी तुला सरस्-वति, असें म्हटले आणि ह्या पुत्राला तू जन्म दिलास म्हणून तू माझी प्रियकरी आहेस. आतां हा तुझा पुत्र तुझ्याच नावानें म्हणजे " सारस्वत " ह्या नावाने लोकांत प्रसिद्ध होईल. तसाच हा लौकिकवान् व महान् तपस्वी होईल. ' याप्रमाणें पुत्रप्राप्तिरूप आनंद व्यक्त करून त्या ऋषीने त्या पुत्राचा भावी वर्तनक्रमही तिला सांगितला.

एष द्वादशवार्षिक्यामनावृष्ट्यां द्विजर्षभान्
सारस्वतो महाभागे वेदानध्यापयिष्यति ॥
पुण्याभ्यश्च सरिद्भ्यस्त्वं सदा पुण्यतमाशुभे
भविष्यसि महाभागे मत्प्रसादात्सरस्वति ॥

हे महाभाग्यवति ! पुढें बारा वर्षांची अनावृष्टि व्हावयाची आहे, ती होऊन गेल्यावर हा ' सारस्वत ' सर्व द्विजाना वेदविद्या शिकवील, आणि हे कल्याणि सरस्वति, तूही माझ्या प्रसादानें सगळ्या पुण्यकारक नद्यामध्ये अतिशय पुण्यकारक अशी होशील.

अशारीतीनें सारस्वतऋषीच्या भविष्यत्कालाची त्रोटक हकीकत त्या दधीचिमुनीनें सांगितलेली ऐकून व त्यांनी केलेल्या स्तुतीनें संतुष्ट होऊन ती सरस्वतीनदीदेवी आपल्या ( सारस्वत ) पुत्राला घेऊन तेथून निघून गेली, आणि तो महात्मा दधीचिऋषीही देवकार्यार्थ आपल्या अस्थी इंद्राला देऊन देवलोकीं गेला.

त्यानंतर बराच काळ लोटल्यावर दुर्दैवानें अत्यंत भयंकर अशी बारा वर्षांची पृथ्वीवर अनावृष्टि झाली. त्याकाली क्षुधेनें व्याकूळ झालेले असे सर्व ऋषि उपजीविकेसाठी दशदिशांनी पळत सुटले. ज्याला त्याला आपल्या प्राण रक्षणाचीच

पंचाईत पडूं लागली. अशी जेव्हां साऱ्या भूतलावर दुर्धर स्थिति उद्भवली तेव्हां आमचा चरित्रनायक सारस्वतऋषीही आपल्या जिवाच्या बचावासाठीं आपलें वसति-स्थान सोडून अन्य ठिकाणीं जाण्यास सिद्ध झाला. त्याबरोबर त्रैलोक्यपावनी व सर्वज्ञ अशी जी त्याची माता सरस्वति ती साक्षात् प्रगट होऊन त्याला म्हणाली—

**" न गंतव्यमितः पुत्र तवाहारमहं सदा**
**दास्यामि मत्स्यप्रवरानुष्यतामिह भारत. "**

हे पुत्रा सारस्वता ? ' तूं येथून जाऊं नकोस. तुझ्या उपजीविकेसाठीं मी तुला दररोजशीं मत्स्य देईन, तर कोणतीही काळजी न करितां येथेंच रहा. ' याप्रमाणें सरस्वतिमातेच्या आश्वासनानें निर्भय झालेला तो सारस्वतमुनी तिच्याच आज्ञेनें नित्य त्याप्रकारचा आहार करीत आपले प्राण आणि वेद सांभाळून सरस्वतिनदीच्या पवित्र जलानें पितर आणि देव यांचें तर्पण करीत तेथेंच राहिला.

पुढें कांहीं कालानें सुभिक्षता येऊन देशांत सर्वत्र स्थीरस्थावर झाल्यावर चोहों-कडे पसरलेला ऋषिसमुदाय एकत्र मिळून वेदाच्या अध्ययनाध्यापनाविषयीं आप-आपसांत विचार करूं लागला.- कारण, दुष्काळस्थितींत रोजचा पठणपाठणक्रम चुकल्यामुळें अधीत ग्रंथांचाही इतका विसर पडला होता कीं, त्यांना वेदाचें एक अक्षरसुद्धा आठवेनासें झालें होतें. खरेंच आहे, " **शरीरमाद्यं खलु धर्म साधनम्** " पण, जेथें शरीरपोषणाचीच मुळीं पंचाईत पडली तेथें धर्मसाधन कोठून होणार ! अशा स्थितींत शरीराच्या जोगवणीपुढें इतर गोष्टींकडे लक्ष्य जाणेंच मुळीं दुरापास्त आहे. तेव्हां अशीच स्थिति ह्या ऋषिलोकांची झाली असली पाहिजे. असो. या स्थितींत वेदाध्ययन सांगण्यास समर्थ असा कोणी तरी ऋषि भूतलावर राहिला आहे किंवा नाहीं हें पहावें म्हणून त्या ऋषींनीं सर्वत्र शोध चालविला. त्यांतील कोणी एक ऋषि फिरत फिरत दैववशात सरस्वती नदीच्या काठीं येऊन पोहोंचला आणि तेथें नित्य वेदाध्ययन करीत असलेल्या सारस्वतऋषीस पाहतांच त्यास मोठा संतोष झाला. लागलींच तेथून परत आपल्या मंडळींत जाऊन त्यानें तें वर्तमान सर्वांस कळविलें. तो म्हणाला, " एका निर्जनवनात वेदपठण करीत असलेला देवासारखा अत्यंत तेजस्वी असा कोणी एक " **सारस्वत** " नावांचा महर्षि मी पाहिला, तेव्हां प्रस्तुत वेदाध्यन सांगण्याला तोच एकटा समर्थ दिसतो. " हें वर्तमान ऐकतांच सर्वांना परमानंद झाला हें सांगणें नकोच ! लागलींच त्यांनीं तेथें जाण्याचा निश्चयही केला. व तो सर्व ऋषिसमुदाय सरस्वतीनदीच्या तीरीं सारस्वत-

ऋषीच्या आश्रमांत येऊन दाखल झाला. महर्षीचें दर्शन होतांच सर्वांनीं मोठ्या नम्रपणानें ( सारस्वत ) ऋषीस म्हटलें की, आम्हांला वेद शिकवा ? तेव्हां सारस्वतमुनि म्हणाला, " शास्त्रसंप्रदायाप्रमाणे तुम्ही माझे शिष्यत्व पत्करा. " हें ऐकून ऋषि म्हणाले; " हे बालमुने ! तू आम्हांपेक्षां वयानें पुष्कळ लहान आहेस, तेव्हां तुझें शिष्यत्व आम्ही कसे पत्करावें ? " तेव्हां सारस्वत म्हणाला. " अहो, मोठेपणा हा वयावर अवलंबून नसतो. कारण,

न हायनैर्न पलितैर्न वित्तेन न बन्धुभिः
ऋषयश्चक्रिरे धर्मं योऽनूचानः स नो महान् ॥

फार वय झाल्यानें, अथवा केश, दाढी, मिशा वगैरे पिकून पांढरे झाल्यानें, किंवा द्रव्यानें, अगर बाप, चुलता, बंधू इत्यादि नात्यानेंही माणसास मोठेपणा येत नाहीं असें खुद्द व्यासवचन आहे. शिवाय " अनूचानः प्रवचने साङ्गेऽधीती गुरोस्तु यः " शिक्षाद्यंगानीं युक्त अशा वेदाच्या अध्ययनानें जो संपन्न तोच खरोखर मोठा, असा पूर्व ऋषींनी धर्मनिर्णय केला आहे. "

यांप्रमाणें त्या सारस्वत मुनीचें सप्रमाण भाषण ऐकून त्या साठहजार ऋषींनीं त्याचें शिष्यत्व पत्करिलें.

" षष्टिर्मुनि सहस्राणि शिष्यत्वं प्रतिपेदिरे
सारस्वतस्य विप्रर्षेवेदस्वाध्यायकारणात् ॥ "

आणि त्यांना आसनाकरितां सर्वांनीं मूठमूठभर दर्भ आणून दिले. तात्पर्य, तो सारस्वतमुनि वयानें जरी लहान होता, तरी गुरु या नात्यानें ते सर्वही ऋषि कांहीं कालपर्यंत त्या सारस्वताचार्याच्या आश्रमांत राहून व त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांनीं त्यांजपासून रहस्यपूर्वक सशास्त्र वेदांचे ज्ञान संपादन केलें व मग ते निघून गेले. पुढे याच ऋषींनी ह्या भूतलावर सर्वत्र वेदविद्येचा प्रसार केला. असो.

याप्रमाणें शिरोभागी निर्दिष्ट केलेल्या ह्या महात्म्याचा जीवनवृत्तांत आहे. स्वाध्यायाविषयीं विलक्षण आवड व मूर्तिमंत दृढनिश्चय हेंच प्रस्तुत चरित्रांतील घेण्यासारखें रहस्य होय. या सारस्वताच्या उदाहरणावरून त्यांच्यांत स्वाध्याय, प्रेम आणि दृढनिश्चय इत्यादि सद्गुणांचा उत्कर्ष झालेला दिसत नाहीं काय ? असा उत्कर्ष ज्यांच्याठिकाणीं झालेला आहे असे महात्मे हल्ली या देशांत किती बरें निघतील ! यांचे व अशांसारख्या दुसऱ्या सद्गुणांचे अनुकरण जेथें होत जाईल तो देश दुर्भाग्यस्थितींतून निघण्यास फार वेळ लागणार नाहीं हें उघड आहे.

वैदीकधर्मानुयायी ब्राम्हणांत "सारस्वत" नांवाने जो समाज प्रसिद्ध आहे त्याचें मूल उगमस्थान या सारस्वत महर्षिपाशी पोहोंचतें म्हणून या चरित्रास एकप्रकारचें या मालेंत विशेष महत्व आहे.

पृथ्वीवरील सर्व धर्मग्रंथांत श्रेष्ठता पावलेला आर्यांचा पूज्य सनातन धर्मग्रंथ जो वेद त्याचे आस्तित्व राहण्यास जो पुरुष कारण झाला, तो कोणास बरे पूज्य वाटणार नाहीं! ज्याला म्हणून सनातनधर्माबद्दल आदर आहे व ज्याला म्हणून तो धर्म पूज्य वाटतो त्यास प्रस्तुत चरित्राचे महत्व कथन करावयास नको, तेव्हां ह्या महात्म्याच्या चरित्राचे परिशीलन वाढून त्यांच्यामधील सद्गुण राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या अंगीं बाणावे आणि "सारस्वता" सारखे नवीन महात्मे निर्माण होऊन देशाला ऊर्जितावस्था यावी इतकीच जगच्चालक प्रभुकडे प्रार्थना आहे. तसेच ज्या सरस्वतीनदीदेवीच्या कृपाप्रसादाने "सारस्वत" ऋषीसारखें नररत्न या भूतलावर निर्माण झालें त्या सकलपूज्य ब्राम्हण गुरुमाता सरस्वतीचे कितीही स्तवन केले तरी तें थोडेंच आहे! यापेक्षां अधिक ते काय म्हणणार? तथापि बलरामाने ज्या छंदोबद्धवाणीने तिचें स्तवन करून निरोप घेतला, त्याच पद्यरूप वाणीनें आम्हीही त्या परमपावनी महानदी सरस्वतीचे स्तवन करून हा चरित्रलेख समाप्त करितो.

**"सरस्वतीवास समाः कुतो रतिः**
**सरस्वतीवास समाः कुतो गुणाः ॥**
**सरस्वतीं प्राप्य दिवंगता जनाः ।**
**सदा स्मरिष्यन्ति नदीं सरस्वतीं ॥**
**सरस्वती सर्व नदीषु पुण्या ।**
**सरस्वती लोक शुभावहा सदा ॥**
**सरस्वतीं प्राप्य जनाः सुदुष्कृतं ।**
**सदा न शोचन्ति परत्र चेहच ॥"**

---

# भट्टोजी दीक्षित.

हे संस्कृत व्याकरणाचे आद्य पुरस्कर्ते श्रीक्षेत्र काशी येथें सुमारें तीनशें वर्षांपूर्वी होऊन गेले. ह्यांचे पूर्वज महाराष्ट्र देशांतले रहिवासी असून तेथें ते एका देवस्थानचे पूजारी होते. ही देवपूजा त्यांचे घराण्यांत वंशपरंपरा चालत आली होती; व तेथ

करून भट्टोजी दीक्षितांनी पत्करिला. त्यांच्या योग्यतेवरून त्याकाळी राजदरबारांतून त्यांना दीक्षित ही पदवी मिळाली होती. अर्थात् ही श्रेष्ठ पदवी केवळ नांवापुरतीच न व्हावी आणि त्याप्रमाणें कांहीतरी योग्यता संपादन करावी असें भट्टोजींना वाटून ते काशीस गेले. तेथें त्यांनी मोठ्या यत्नानें व्याकरण, मीमांसा आदि शास्त्रांमध्यें चांगलें प्रावीण्य संपादिलें. प्रसिद्ध अप्पया दीक्षित व भट्टोजी हे समकालीन होते. असें सांगतात की, भट्टोजीपुढें इतर पंडितांची स्पर्धा चालत नसे; पण अप्पय्या दीक्षितांशीं यांचा चांगला स्नेह असे यामुळे भट्टोजींनी स्वतः रचलेला व्याकरण-शास्त्रावरील ग्रंथ 'सिद्धांतकौमुदी' त्याची उपयुक्तता जाणून अप्पय्या दीक्षितांनीच पूर्वी शिफारस केली. हल्लीं त्या ग्रंथाचें किती महत्व आहे हे निराळें सांगावयास नको.

भट्टोजींनीं आपल्या उत्तरावस्थेमध्यें देखील न्यायशास्त्राचा पूर्ण अभ्यास केला होता. रात्रंदिवस विद्याभ्यासावांचून दुसरें त्यांस कोणतेंही व्यसन नव्हतें. सतत ५६ वर्षांच्या वयापर्यंत त्यांच्या आयुष्यांतील सारा काल विद्याव्यासंगांत जाऊन अखेरीस त्यांतच त्यांचें काशी येथें देहावसान झालें. त्यांच्या पश्चात् त्यांना भानुदीक्षित नांवाचा एक मुलगा होता. अद्याप देखील त्यांचेपासून सातव्या पिढीतील कोणी वंशज काशीमध्यें विद्यमान आहेत म्हणतात. मात्र बंगाली टोल्यामध्यें त्यांचा एक वाडा अझून दृष्टीस पडतो; परंतु त्यांत वस्ति वगैरे कांहीं नाही. यासंबंधानें अशी एक गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, भट्टोजींचा विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर त्यांचे मनांतून तेथें एक विद्यालय स्थापन करून आपण स्वतः तयार केलेल्या पद्धतीप्रमाणें व्याकरण-शास्त्रांत विद्यार्थी तयार करावे असा फार हेतु होता; पण तो त्यांचा सद्धेतु तसाच राहिला आणि अंतकाळीं त्यांची वृत्ति त्यामध्येंच राहिली. शेवटी 'अंते मतिः सा गति' म्हणतात त्याप्रमाणें ते आपला हेतु पूर्ण करण्यासाठी समंध होऊन आपल्या वाड्यांत राहूं लागले. त्यापासून त्यांच्या कुटुंबातील मंडळीस त्रास होऊं लागला म्हणून त्यांनी तो वाडा सोडून दुसरीकडे बिऱ्हाड केलें. पुढे पांच दहा वर्षें गेल्या-नंतर कोणी दोन ब्राम्हण विद्याभ्यासाच्या उद्देशानें काशीस गेले होते. ते सहज दीक्षितांच्या वाड्यांत पोहोंचले आणि तेथे ओटीवर भट्टोजी बसलेले त्यांच्या दृष्टीस पडले. तेव्हां त्यांनीं त्यांच्या जेवणखाणाची वगैरे सोय त्या वाड्यांतच करून देऊन सात आठ वर्षेंपर्यंत त्यांच्याकडून व्याकरणशास्त्राचा अभ्यास करविला त्या ब्राम्ह-णांसही आपला हेतु चांगल्याप्रकारें सफल झाला म्हणून पराकाष्ठेचें समाधान वाटलें. अशारीतीनें त्यांचें अध्ययन पूर्ण झाल्यावर अर्थात् भट्टोजीचा हेतु पूर्ण झाला मग त्यांनीं आपली खरी हकीकत त्या ब्राम्हणांना कळवून आपलें द्रव्य वगैरे जें कांहीं

त्या वाड्यामध्यें होतें ते सर्व त्यांना दिलें. नंतर ब्राम्हणानीही त्यांचे आज्ञेनुसार क्रियाकर्म करून त्यांना सद्गति दिली. असो

भट्टोजीनें व्याकरणशास्त्रावर अनेक उत्तमोत्तम ग्रंथ लिहिले आहेत. त्यांतील पहिला सर्वमान्यग्रंथ म्हणजे '**सिद्धांतकौमुदी**' होय. हा ग्रंथ अत्यंत सरस असून विद्वन्मान्य झाला आहे. संस्कृत भाषेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यास हाच ग्रंथ अत्यंत उपयोगी होय. याच्यापूर्वी भरत पोपालित, माधव, वृत्तिकार वैयाकरण-सर्वस्वकार, काशिकाकार, वामन इत्यादि पंडितांचे संस्कृत व्याकरणावर अनेक ग्रंथ आहेत; परंतु सिद्धांतकौमुदीसारखी सरळ व सुबोध रचना दुसऱ्या कोणत्याही ग्रंथाची नाही. इतकेंच नव्हें तर भट्टोजी दीक्षितांच्या सिद्धांतकौमुदीनंतर संस्कृत व्याकरणाच्या सुधारणेचे कामच समाप्त झाले असें विद्वानांचे मत आहे. या ग्रंथावर '**प्रौढमनोरमा**' नावाची उत्तम टीका आहे त्यामध्यें प्राचीन भाष्यकारांच्या विरुद्धमताचे खंडण करून कौमुदीचा विस्तृत अर्थ दिला आहे. याची १२००० ग्रंथसंख्या आहे. या टीकेवर पुनः 'बृहत् शब्दरत्न' व 'लघुशब्दरत्न' अशा दोन टीका नागोजीभट्टांनी केलेल्या आहेत. त्याशिवाय ज्ञानेंद्रसरस्वतीची 'तत्वबोधिनी' नामक एक विस्तीर्ण टीका आहे.-भट्टोजीचा दुसरा ग्रंथ 'व्याकरणभूषण' होय. हा ग्रंथ न्यायशास्त्राचा थोडा अभ्यास झाल्यानंतर व्याकरण शिकणारांस उपयोगी आहे. याच्या अध्ययनानें व्याकरणामध्यें उत्तम व्युत्पत्ति होते. याचा तिसरा ग्रंथ 'शब्दकौस्तुभ' हाही ग्रंथ भाष्याच्या टीकेप्रमाणे आहे. या ग्रंथासंबंधानें असें सांगतात कीं, मुख्य व्याकरणशास्त्रप्रवर्तक पाणिनीच्या अष्टाध्यायीवर भाष्यरूपानें हा शब्दकौस्तुभ ग्रंथ एक लाख श्लोकांचा होता; परंतु इतका मोठा ग्रंथ कोणाच्या पाहण्यांत सुद्धा येणार नाही म्हणून तो पाण्यामध्ये बुडविला गेला आणि त्यांतील पहिल्या एका अध्यायापैकी लहान लहान नऊ प्रकरणे राहिलीं तेवढीच तीं 'नवा-न्हिकी' या नावानें हल्लीं प्रसिद्ध असून त्यांची ग्रंथसंख्या ९००० आहे.

दीक्षितांचा चौथा ग्रंथ 'भूषणसार' नावांचा आहे. याशिवाय धर्मशास्त्रावरही कांहीं त्यांचे ग्रंथ आहेत. पैकीं 'अशौचनिर्णय' व 'आन्हीक' हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. तात्पर्य. भट्टोजि दीक्षितांनी कौमुदीसारखे व्याकरणशास्त्रावर उत्तम ग्रंथ लिहून संस्कृत वाङ्मयाच्या वाढीस चांगली मदत केली. आज त्यांचा प्रत्यक्ष समागम सुटून जरी तीनशें वर्षे झालीं तरी ग्रंथरूपानें त्यांची अखंड कीर्ति जी आज साऱ्या जगांत दुमदुमून राहिली आहे तिच्या योगाने संस्कृत वाङ्मयाचा आस्थापूर्वक अभ्यास करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचे हृदयांतून भट्टोजीचें स्मरण केव्हांही दूर होणार नाहीं.

# श्रीमन्महेश्वरभट्ट सुखठणकर.



" नम्रत्वेनोन्नमंतः परगुणकथनैः स्वान्गुणान् ख्यापयन्तः
स्वार्थान्संपादयन्तो विततबहुतराऽऽरंभयत्नाः परार्थे ॥
क्षांत्यैवाक्षेपरुक्षाऽक्षरमुखर मुखान्दुर्मुखान्दूषयंतः
संतश्चाश्चर्य चर्या जगति बहुमताः कस्यनाऽभ्यर्चनीयाः ॥ "

---

१ स्वतः नम्रपणाने वागून मोठेपणा मिळविणारे, दुसऱ्याचे गुण वर्णन करण्यामध्येंच स्वतःच्या सद्गुणाचा प्रकाश करणारे, परोपकारार्थ दीर्घ उद्योग करून त्यांतच स्वार्थ साधणारे. निंदारूप वाईट भाषणानें ज्यांची मुखे अपवित्र झाली आहेत अशा वाचाळ दुर्जनाना क्षमाशीलतेनेच दूषण देणारे. असे आश्चर्यकारक कृतीचे जे सज्जन ते कोणत्या पुरुषास बहुमान्य आणि पूजार्ह होणार नाहींत बरें ! !

गूळ किंवा साखर घालून मधूर बनविलेल्या पदार्थांच्या गोडीहून आंब्याफणसा-सारख्या स्वभावसिद्ध गोड पदार्थांची गोडी जशी लोकादरास विशेष पात्र असते, त्याप्रमाणें पाठशाळा, गुरु इत्यादि आवश्यक साधनांच्या जोरावांचूनही विद्वत्व आणि महत्व संपादन करून जे पुरुष आपली लोकमान्यता चिरंजीव करितात, ते परम धन्य आणि अत्यंत पूज्य होत. असे जे अनेक विद्वान् पुरुष आपल्या भाग्यशाली देशांत गेल्या दोन शतकांत उदयास येऊन गेले, त्यांतच श्रुतिशास्त्रपरायण महेश्वरभट्ट हे एक होत. यांच्या जीवनचरित्राची थोडीशी हकीकत येथें नमूद करून ह्या महा-पुरुषाचा सर्वांना परिचय करून देण्याचें योजिलें आहे.

गोमंतक प्रांतात कुंभारजुव्यांनजीक महाशाल म्हणून जो एक लहानसा खेडेगांव आहे तोच ह्या चरित्रनायकाचा मूळ जन्मगांव होय. त्या गावांत ब्राम्हणमंडळींची वस्ति फारशी नव्हती. जीं कांहीं चार सहा घराणीं होतीं त्यांत आश्वलायन शाखें-तील कौशिकगोत्री रामचंद्रभट्टजी सुखठणकर यांचेंही एक प्रसिद्ध घराणें होतें. रामचंद्रभट्ट हे वृत्तिवंत वैदिक असल्यामुळे त्यांची उपजीविका बहुतेक पौरोहित्य वृत्ती-वर अवलंबून असे, तरी त्यांना थोडेंबहुत जमीनजुमल्याचेंही उत्पन्न होतें. त्यांची पत्नी जानकीबाई ही महासाध्वी बायको होती, आणि वस्तुतः देशांत योग्यतेचीं माणसें निपजावयास आयाही तशाच योग्यतेच्या असाव्या लागतात. रामचंद्रभट्टजींस संततिसौख्य म्हणण्यासारखें विशेष नव्हते. तथापि परमेश्वरकृपेनें कांहींसें उतारवयांत शके १६४० म्हणजे इ० स० १७१८ सालीं त्यांना एक मुलगा झाला. त्याचें नांव त्यांनीं महेश्वर असें ठेविलें. तेच प्रस्तुत चरित्राचे नायक होत. त्यांच्या बाल्यदशें-तील चरित्रांत दाखल करण्यासारखी साधार अशी कांहींच माहिती उपलब्ध नाहीं, तरी ते लहानपणीं अतिशय हूडस्वभावाचे असून चौकसबुद्धीचे होते असें परंपरया-श्रुत आहे. अगदीं उतारवयांत हें अपत्यसुख प्राप्त झाल्यामुळें रामचंद्रभट्टजीही आपल्या एकुलत्या एका मुलावर फार प्रेम करीत, आणि म्हणूनच त्याच्या हूड-स्वभावाकडे विशेषसें ते लक्ष्यही देत नसत. तरी स्वतःप्रमाणें आपल्या मुलानेंही विद्वान् वैदीक होऊन चांगला नांवलैकिक मिळवावा व आपल्यामागें पौरोहित्यवृत्ति चांगल्यारीतीनें चालवावी, अशी त्यांची दृढ इच्छा होती. तदनुसार अगदीं लहान वय म्हणून त्याची पर्वा न करितां त्यांनीं महेश्वरभट्टजींकडून चार सहा वर्षांच्या कोंवळ्या वयांत अनेक देवतांचीं संस्कृत स्तोत्रें पाठ करवून तीं रोज संध्याकाळीं हातपाय धुवून देवापुढें म्हणण्याचा परिपाठ ठेविला होता; आणि दिवसांतून शिक्षा,

ज्योतिष, छंद, निघंट इत्यादि वेदांगाचें यथाक्रमें ते त्याकडून पठन करवीत. महेश्वरबावांच्या प्राथमिक शिक्षणास जुन्या पद्धतीप्रमाणें इकडूनच आरंभ झाला म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांची धारणाशक्ती जबर होती त्यामुळे वडिलांनीं नेमून दिलेले विषय तोंडपाठ करण्यास त्यांस फार अवकाश लागत नसे. रामचंद्रभट्टजीकडे अध्ययनांकरितां इतर वैदिकांचीही मुले येत असत; पण हीं मुलें महेश्वरबावापेक्षां वयानें बरींच मोठीं असल्यामुळें त्यांच्या अध्ययनांचा विषय दुसरा होता. अर्थात् त्यांच्याशी बावांची जोडी जमणे शक्य नव्हतें, म्हणून त्यांना एकटेच अध्ययन करणें भाग पडे. अशी वस्तुस्थिति होती तरी तीं दुसरी मुले जो विषय घोकून पाठ करीत तो महेश्वरबावांनीं नुसते लक्षयपूर्वक ऐकून तोंडपाठ म्हणावा असा त्यांच्या पाठशक्तीचा प्रभाव होता. या त्यांच्या विलक्षण पाठशक्तीसंबंधानें अशी गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, रामचंद्रभट्टजीकडे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा अष्टाध्यायीचा पाठ चालला होता. त्यांतील कांहीं सूत्रांचा वर्णोच्चार फार क्लिष्ट असल्यामुळे त्याचा उच्चार करतांना त्यांची गंमत वाटून त्या मुलांची थट्टा करण्याच्या उद्देशानें महेश्वरबावांनीं तीं कठीण सूत्रें अगदीं सहज उच्चारून त्यांना वेडवावे ? असें करितां करितां केवळ गमतीसाठीं म्हणूनच त्यांनीं पुस्तकसहाय्यावाचून बहुतेक अष्टाध्यायीची सूत्रें मुखोद्गत केलीं; आणि तीं ते चालताफिरतांना मौजेखातर म्हणू लागले. वडिलांच्या लक्ष्यांत जेव्हां ही गोष्ट आली तेव्हां आपला महेश्वर अष्टाध्यायींतील अत्यंत कठीण उच्चारांचीं सूत्रें न शिकवितां व न अडखळतां स्पष्ट म्हणतो, याबद्दल त्यांना मुलाचे मोठें कौतुक वाटलें आणि सबंध अष्टाध्यायी त्यांनी महेश्वरबावाकडून पाठ करविली. यावेळीं त्यांना पुरी अक्षरओळख सुद्धां नव्हती; पण त्यांच्या नैसर्गिक पाठशक्तीच्या प्रभावानें वडिलांनीं शिकविलेले कित्येक बारीकसारीक ग्रंथ त्यास बिनचूक तोंडपाठ म्हणतां येत असत.

पुढें महेश्वरबावाना एका गांवठी पंतोजीच्या शाळेंत अक्षरओळख करून घेण्याकरितां पाठविण्यास आरंभ केला. लहान मुलांना शाळा म्हटली म्हणजे एक बंदिखानाच वाटतो; आणि त्यांतही खेळाडू हूडस्वभावाच्या मुलांस तर तो भारीच जाचक वाटत असतो त्याप्रमाणे बावांना शाळेंत जाणें आवडत नव्हते. त्यांनीं भलतींसलतीं निमित्तें सांगून शाळा चुकवावी हा मुलाचा चुकारतट्टूपणा जेव्हां वडिलांना समजला तेव्हां ते स्वतः घरीच त्यांना लिहायाला शिकवू लागले. याप्रमाणें जेमतेम लिहिणें वाचणे महेश्वरभट्ट घरीच शिकले अगदी कोवळ्या वयांत आपल्या मुलाकडून अविश्रांत अभ्यास करून घेऊं नये म्हणून त्यांच्या मातुश्री जानकीबाई

नवऱ्यास पुष्कळ सांगत, पण रामचंद्रभट्टजींनीं तिकडे मुळींच लक्ष्य देऊं नये. त्यांनीं महेश्वरबावांकडून लहान वयांतच आचारार्क, मुहूर्तचिंतामणी, वगैरे अनेक धर्मग्रंथ मुखोद्गत करविले होते. पुढें योग्यकाळीं बावांचा उपनयनसंस्कार होऊन ते वेदाध्ययनास अधिकारी झाले. तेव्हां त्यांच्या वडिलांनीं त्यांजकडून वेदाध्ययन सुरू करविलें. यामुळें त्यांना एक क्षणाची देखील फुरसत मिळत नसे तथापि त्यांतही केव्हां केव्हां सवड साधून त्यांना अमरकोशांतील पदार्थमात्राचीं नावें समजून घेऊन ती टिपून ठेवण्याचा जो नाद लागला होता तो आपला आवडता उद्योग घेऊन बसत असत; आणि त्या अमरकोशांतील संबंधदर्शक, लिंगदर्शक वगैरे शब्दांची भानगड जी त्यांना समजण्यासारखी नसे ती एखाद्या संस्कृतज्ञाकडून समजून घेण्याकरितां ते वडिलांची नजर चुकवून घरांतून बाहेर जात. रामचंद्रभट्टजींचा स्वभाव अमळ तापट होता. अध्ययनाच्या कामीं आळस करणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांस फार राग येई; व त्या आवेशांत तशा विद्यार्थ्यास शिक्षा करण्यासही ते मागेंपुढें पहात नसत. अशाच एका बाबतीत त्यांनी बावास एकदां शिक्षा केली, पण त्याचा मात्र उपयोग कांहीं झाला नाही. उलट महेश्वरबावांची जिज्ञासाबुद्धि दिवसेंदिवस अधिकाधिक वृद्धिंगत होत चालली. उघडच आहे " **क ईप्सितार्थ स्थिर निश्चितं मनः पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत्** " इच्छितार्थसिद्धीच्या मागें निश्चयानें लागलेलें मन, आणि सखलप्रदेशीं जाणारें पाणी, यांना कोण मागें फिरवील! एखाद्या कारंजाच्या तोटीवर कांहींवेळपर्यंत बोट ठेवून उडणाऱ्या पाण्याचा प्रतिरोध केला आणि पुनः ते बोट काढून घेतलें म्हणजे जशी दुप्पट जोरानें ती पाण्याची धार अधीक उंच उसळावी, त्याप्रमाणें महेश्वरबावाच्या बुद्धीचा ओघ त्याच्या स्वाभाविक शोधकतेनें ह्या कामीं अधिकच अभिमुख केला.

त्यांच्या खऱ्या विद्याव्यासंगास एथूनच प्रारंभ झाला ह्मणावयाचा! अमरकोशांतील शब्दसंग्रह अपूर्ता आहे असें जेव्हां बावाच्या लक्ष्यांत आलें, तेव्हां स्वाभाविकपणें कोशांतराध्ययनाची त्यांस विशेष आवश्यकता वाटूं लागली, आणि तदनुसार त्यांनीं दुसऱ्या कित्येक कोशांच्या पठणास आरंभ केला. कोणताही ग्रंथ तोंडपाठ करणें म्हटलें म्हणजे महेश्वरबावास ते आपल्या हातचें काम वाटत असे. त्यांनीं हळूहळू क्रमानें त्रिकांडशेष, धनंजय, विश्वकोश, मेदिनी, शब्दार्णव, अमरमाला, रत्नकोश, हलायुध हे कोश केवळ मुखोद्गत केले. असें सांगतात कीं, हे सर्व कोश अगदी उतारवयापर्यंत त्यांस अगदी तोंडपाठ येत असत. कोणत्या पदार्थाचे वाचक

शब्द किती आहेत, हें त्यांस मूर्तिमंत डोळ्यापुढें दिसत असे. हा प्रश्न झोंपेंतून उठवून जरी त्यांस कोणी विचारला, तरी त्याचें उत्तर चटकन् देण्यास ते समर्थ होते असें म्हणतात. पूर्वोत्तर हिंदुस्थानांत प्रसिद्ध असा त्यांनी रचिलेला "**विश्वप्रकाश**" या नांवाचा एक अनेकार्थ कोश आहे, तो पाहिला म्हणजे बाबांना या विषयांत किती विपुल माहिती होती हे प्रत्यक्ष समजण्यासारखे आहे. द्विरूप कोश, एकाक्षरी कोश हेही ह्यांनीच रचिले आहेत. प्रसिद्ध अमरकोशावर जी '**अमरविवेक**' नांवाची विद्वन्मान्य, बालबोध आणि सरळ अशी टीका आहे व जी आज सर्व भरतखंडातचशी काय ? पण इतरत्रही संस्कृत भाषा शिकणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांस शब्दसंचय करून देण्याच्या बाबतीत अत्यंत उपयोगी झाली आहे, ही टीका बाबानी स्वत: तीस वर्षांच्या वयावर केलेली आहे, असें खुद्द त्यांच्या किंवा त्यांच्या शिष्यप्रशिष्यांच्या हातच्या ज्या जुन्या हस्तलिखित प्रति उपलब्ध आहेत, त्यांवरून सिद्ध होते. तथापि त्या टीकेची बहुतेक साधने त्यानी आपल्या विद्यार्थिदशेतच म्हणजे १०।१२ वर्षांच्या वयांत गोळा केली होती म्हणतात व तिला व्यवस्थित स्वरूप देण्याचे काम मात्र पुढे प्रौढवयांत केलें असावे असे दिसते, आणि ह्मणूनच त्या टीकेत सर्वानुभूत असा जो पदार्थज्ञान प्राप्त करून देण्याचा गुण आहे तो बाबांनी स्वानुभवावरून विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्ष्यांत आणूनच उत्पन्न केला असावा असे स्पष्ट दिसते.

महेश्वरबाबा हे बालपणापासून ईश्वरनिष्ठ आणि मातृभक्त असत. त्यांच्या घराच्या मागे एक अश्वत्थाचा पहार होता. त्या अश्वत्थवृक्षास त्यांच्या मातुश्री म्हणजे जानकीबाई ह्या त्यांच्या जन्माच्या आधीपासून रोज प्रदक्षिणा घालीत असत. आपला सद्गुणी मुलगा महेश्वर हा अश्वत्थनारायणाच्याच कृपाप्रसादाचें फल आहे अशी त्यांची भोळी भावना होती. त्यांनी बाबानाही अश्वत्थवृक्षास त्रिकाळ नमस्कार करण्याची आज्ञा केली होती; व त्या आज्ञेप्रमाणे महेश्वरबाबानी रोज त्या अश्वत्थास वंदन करीत असावे. बाबा अल्पवयी असतांना ह्या अश्वत्थाच्या पाहारावर बसून केलेला अभ्यास चांगला पाठ रहातो अशी त्याची दृढ समजूत होती; व त्यामुळे ते आपल्या स्वाधीन झालेला पठणाचा विषय बहुधा त्या वृक्षराजाच्या सान्निध्यांतच पाठ करीत अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. महेश्वरबाबा हे व्याकरण, न्याय, मीमांसा, वेदांत, अलंकार, ज्योतिष, इत्यादि शास्त्रात पारगत झालेले होते, असे त्या त्या विषयांवरील त्यांचे स्वतंत्र व टीकारूप ग्रंथ आहेत, त्यांवरून सिद्ध

होतें; परंतु त्यांचा अभ्यास अमक्या एका प्रसिद्ध गुरूपाशी झाला, अशाविषयी मात्र कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. हें सर्व अध्ययन त्यांनी स्वदेशींच संपादिलें होते इतकी मात्र त्यांच्या वंशजांकडून माहिती मिळते.

देवता–साक्षात्कारासंबंधानें बाबांच्या वंशजांकडून बऱ्याच आख्यायिका ऐकण्यांत येतात, पण त्यांचा ह्या लहानशा चरित्रात समावेश करणें अशक्य आहे. त्यांची कुलदेवता प्रसिद्ध कैवल्यपुरनिवासिनी श्रीशान्तादुर्गा होय. ते एकनिष्ठ देव्युपासक होते व त्याप्रमाणे देवतासाक्षात्कारही त्यांना होत असे. मार्कंडेयपुराणातर्गत श्रीसप्तशतीच्या मंत्रमय अशा गुप्तवती नावाच्या प्रसिद्ध टीकेचे आणि तदितर शिवनाम कल्पलता इत्यादि मोठमोठ्या विचारणीय ग्रंथाचे कर्ते जे महाशाक्त भास्करराय त्यांचे आणि महेश्वरबाबाचें उपासनामार्गाच्या संबंधानें साहचर्य आणि सख्य होतें. हे महापंडीत जेव्हां नारवे येथे श्रीसप्तकोटीश्वर देवाच्या सान्निध्यात रहात असत तेव्हां कधी कधी बाबांनी त्याच्या भेटीस जावे व भास्कररायानीही याची प्रतिभेट घेण्यास यावे असा क्रम चालू होता. गुप्तवती टीकेत कित्येक गूढप्रकरणावर महेश्वरबाबाचे मत घेऊन ती टीका भास्कररायांनी पूर्ण केली आहे असे समजते.

मंत्रशास्त्रातही त्यांची फार चांगली गती होती. एका देव्युपासनेच्याच संबंधाचा पुस्तकसंग्रह बाबाच्या घरी इतका विपुल होता की, तितका अन्यत्र कोठेंच नसेल. त्यांनी पुष्कळ द्रव्य खर्चून हरएक प्रकारचा शास्त्रविषयक ग्रंथसंग्रह आपल्या घरीं विपुल करून ठेविला होता. त्यावेळच्या मानानें पुस्तकसंग्रह म्हणजे एक प्रकारचें ऐश्वर्यच मानण्यात येत असे. सांप्रतकाली जसे मुद्रणकलेच्या साधनामुळे पुस्तकसंग्रहाचें काम ज्याला त्याला सुलभ झाले आहे, तसा त्यावेळचा प्रकार नव्हता. एखाद्या मान्यग्रंथाचें पुस्तक दुसऱ्याच्या घरी असून ते घटकाभर आपणास पहावयाचे असल्यास त्या गृहस्थाच्या घरीं कितीतरी हेलपाटे घालावे लागत. मग आपल्या घरी आणून चार दिवस ठेवून घेण्याची गोष्ट लांबच राहिली! त्यावेळी महत्वाच्या जाड्या जाड्या ग्रंथांचा संग्रह काय तो विद्वान पुरुषांनी स्वत: श्रमाने किंवा दुसऱ्या लेखकांच्या द्वारे मोठ्या प्रयासाने करून ठेविलेला असेल तोच! अशा पुस्तकास ते पुरुष साक्षात् देवतेप्रमाणे मानीत असत. किंबहुना "**पुस्तकं वनिता वित्तं परहस्तगतं गतम्। यदिचेत्पुनरायाति नष्टं भ्रष्टं च खंडितम्**" ह्या अनुभविक उक्तीवर त्यावेळच्या लोकाचा पूर्ण भरवसा असे. कारण, पुस्तक, स्त्री आणि द्रव्य ह्या वस्तु एकदां परक्याच्या हाती लागल्या की, त्या क्रमेकरून नष्ट, भ्रष्ट आणि

अर्धमर्ध फाटलेल्या अशा हातास लागतील! पुस्तकासारखी दुर्मिळ वस्तु तर त्यावेळी लोक सहसा दुसऱ्याच्या हवालीं करण्यास धजत नसत; आणि त्यांच्या दुर्लभतेमुळे वरील श्लोकांत सांगितलेला परिणाम त्यावेळी बहुधा खरोखर घडून येण्याची भीति असे. ज्यांच्या संग्रहास उत्तम उत्तम ग्रंथ असत त्यांजकडून ते नुसते उतरून घेण्यास देखील दुसऱ्यास मिळण्याची मुष्कील पडे. अशावेळी महेश्वरबाबांना इतका मोठा पुस्तकसंग्रह करण्याच्या कामी किती प्रयास आणि किती पैशाचा व्यय करावा लागला असेल याची कल्पनाच केली पाहिजे! खुद्द महेश्वरभट्ट हे देखील जबरे लेखक होते असें दिसतें. कारण त्यांच्या घरच्या पुस्तकसंग्रहामध्ये खुद्द त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा इतका भरणा दृष्टीस पडतो की, तितका ग्रंथसंग्रह हल्लींच्या विद्याभिलाषी पुरुषांच्या हातून कदाचित सर्व आयुष्यांत नुसता वाचूनही होणार नाही! फार तर काय, पण अगदी वृद्धापकाळापर्यंतो देखील त्यांस लिहिण्याच्या कामाचा बिलकूल आळस नव्हता, असे खालील गोष्टीवरून सिद्ध होते.

श्रीमद्भागवतावरील श्रीधरटीकेची पुरणिका बाबांनी सुमारे आपल्या ऐशीब्याऐशी वर्षाच्या वयांत लिहिली आहे! आधीं भागवतासारख्या ग्रंथावर टीकाग्रंथ लिहिणें म्हणजे केवढें कठीण काम त्यातून स्वतंत्र टीका लिहिण्याचें काम कदाचित् काहींअंशीं सोपे म्हणतां येईल; पण पुरणिका लिहिण्याचे काम तर निःसंशय अधीक कठीण! कारण नुसती टीका लिहिणे म्हणजे टीकाकारांनी मूळ ग्रंथकाराचा हेतु लक्ष्यांत घेऊन जे काय आपणांस त्याच्या स्पष्टीकरणार्थ विवेचन करावयाचे असेल तवढेंच! पण दुसऱ्याच्या टीकेची पुरणिका लिहिणे म्हटले म्हणजे मूळ ग्रंथकारांचा आणि टीकाकारांचा अनुवाद करून ज्याठिकाणीं टीका अपूर्ण दिसेल तेथे उभयतांच्या हेतूस अनुसरून व शक्य तर विस्तृतपणे विशेष विवरण करून ती पूर्ण करावयाची असते; अर्थात् हे काम जास्त जबाबदारीचे होय! अशास्थितीत भागवतासारख्या वेदांतविषयक ग्रंथावर पुरणिका लिहिण्याचे आणि तीही श्रीधरस्वामीसारख्या लोकमान्य टीकाकाराच्या टीकेची म्हणजे किती मानसिकश्रमाचे काम होते याची सहज कल्पना करतां येणार आहे; पण तसलें काम इतक्या उतारवयांत करण्याची उमेद धरून ते तडीस नेणे यांत दिसून येणाऱ्या उद्योगतत्परतेची केवळ तारीफच केली पाहिजे! याप्रमाणे भागवतासारखा प्रचंड ग्रंथ सटीक आणि सपूरणिक लिहिण्याची ताकद म्हातारपणीं बाबांच्या आंगांत होती, हे वाचून आजकालच्या आह्मां अर्वाचीन माणसांना काय वाटेल बरे? पण तें इतक्यानेंच संपले

असें नाहीं. सदहू टीका लिहून झाल्यावर दोन तीन वर्षांनीं वार्धक्यातिशयामुळें बाबांची दृष्टि मंदावली, आणि त्यांस बारीक अक्षरांचा ग्रंथ दिसेनासा झाला! त्यामुळें त्यांचा आजन्म मनोविश्रांतिचा उद्योग जो पुस्तकनिरीक्षण, तो बंद पडला. तेव्हां त्यांस साहजिक कसेसेच वाटूं लागले. आपल्या त्या चरमवयांत भागवतासारख्या हरिलीलाप्रचुर ग्रंथाचे पर्यालोचन व्हावें, अशी त्यांची फार इच्छा होती; पण ती दृष्टिमांद्याच्या अडचणीमुळें त्यांना पूर्ण करून घेतां येईना. तशाच स्थितींत त्यांनीं आपल्या नित्यपाठाकरिता म्हणून सगळा भागवतग्रंथ ( सटीक आणि सपूरणीक ) मोठ्या ठळक अक्षरानं पुनः लिहून काढला हा उद्योगतत्परतेचा कळस झाला नाही काय? आजकालच्या माणसाच्या हातून सबध आयुष्यात असले उद्योग होणे कठीण. मग म्हातारपणची गोष्ट तर एकीकडेच राहिली! असो. या टीकेच्या शेवटी महेश्वर-बाबांनीं म्हटलें आहे—

> " श्रीधरस्वामिरचित-शब्दरत्नावलौ मया ।
> क्षिप्तो महेश्वरेणात्र शब्दः काचमणेः समः ॥ "

किती तरी शालीनता ही!! ' श्रीधरस्वामीच्या शब्दरूप रत्नावलीत म्या महेश्वरानें हा काचमणीच्या योग्यतेचा शब्द कोठे कोठे निक्षिप्त केला आहे. ' यावरून प्रस्तुत चरित्राच्या शिरोभागी दिलेल्या श्लोकात जीं सज्जनाची लक्षणे सांगितली आहेत, तीं बाबाच्या अंगीं पूर्णपणें वसत होतीं हे उघड दिसतें.

वेदातग्रंथापैकीं ' स्वात्मनिरूपण ' नावाच्या ग्रंथावर त्यानीं ' स्वात्मदीपिका ' नांवाची फारच उत्तम टीका लिहिलेली आहे. याशिवाय भगवद्गीता, अद्वैतमकरंद, वाक्यसुधा, सिद्धातचंद्रिका इत्यादि ग्रंथावर उदात्त, गभीर आणि सरस अशा गद्य-पद्यमय अत्युत्तम टीका करून बाबानीं प्राकृतजनावर मोठा अनुग्रह करून ठेविला आहे. ही त्याची वेदातप्रतिपादन मार्मिकता त्याच्या टीकाचें परिशीलन करणाऱ्यांच्या सहज लक्ष्यात येणारी आहे. त्याच्या प्रगल्भ आणि रसभरित वाणीचा थोडा तरी लाभ वाचकवृंदास व्हावा, म्हणून आम्हीं मासल्याकरिता त्यांच्या भगवद्गीतेवरील १२ व्या अध्यायातील २ ऱ्या व ६ व्या श्लोकावरील टीकेचा उतारा येथे सादर करितों.

> " होउनि मजवरि मन जें, परमश्रद्धा धरोनि हें अन्य ।
> मातें उपासिती ते. मजलागीं युक्ततम महामन्य ॥
> माझ्याठायीं सर्वहि कर्में हीं अर्पुनीहि मत्पर ते ।
> ध्याती उपासिती मज, अनन्य त्यांचा न योग तो परते ॥ "

मूळ अर्थानुसंधानास ईषन्मात्र न सोडतां तींत यमक, प्रास, अर्थसौष्ठव आणि पदलालित्य बाबांनी किती खुबीदाररीतीनें साधिलें आहे, हे मूळाशी जे कोणी या आर्या ताडून पहातील त्यांच्या सहज ध्यानांत येईल. त्याचप्रमाणे त्यांच्या वाक्यसुधेवरील ' पानपात्र ' नांवाच्या समश्लोकीचें आणि अर्थाच्या विशेष स्पष्टीकरणाकरितां प्राकृतभाषेंतच विस्तृत केलेल्या व्याख्येचें जे कोणी मनन करतील, त्यांस बाबांच्या कविताशक्तीबरोबर त्यांची अर्थविशदीकरणाची शैलीही सहज कळून येईल. हे तर झालेंच, पण त्याशिवाय या टीकारूपी पानपात्राच्या सहाय्यानें वाक्यसुधेचा घुटका घेणाऱ्यास वेदांतरसास्वादनाचा अलभ्य लाभ अनायासें मिळेल, अशी आमची पक्की खात्री आहे. बहुधा संस्कृतभाषाभिज्ञ पंडित प्राकृतभाषेकडे वळल्याची उदाहरणें फार क्वचित् आढळतात. त्यांतीलच एक उदाहरण महेश्वरबाबा होते, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. गीतगोविंदासारख्या अनुपम प्रासादिक काव्याची पद्यात्मक प्राकृत टीका त्यांनी केली आहे. यावरून त्यांची प्राकृत भाषारसिकताही व्यक्त होते. महाराष्ट्रभाषेविषयींही बाबांची आदरबुद्धि कांहीं कमी नव्हती, असें दुसऱ्याही एका गोष्टीवरून ठरते. त्यांनी मयूरकृत मंत्रभागवताची अर्थात् प्राकृत काव्यग्रंथाची ' संतोषिणी ' नांवाची उत्तम संस्कृत टीका लिहिली आहे. आजपर्यंत संस्कृतग्रंथांच्या प्राकृत टीका लिहिणारे पुष्कळ विद्वान होऊन गेले, पण प्राकृताची संस्कृत टीका लिहून आपली रसज्ञता व्यक्त करणारे आमच्या माहितीप्रमाणे केवळ एक बाबाच होत. खरोखर बाबांनी आपल्या अतर्क्य बुद्धिमत्तेचा हा एक विलक्षण मासलाच दाखविला म्हणावयाचा ! या टीकेच्या शेवटीं ते म्हणतात:—

" नृसुवागर्थाला हा सेवाया योग्य वाटला मजला ।
सुरवाग्विलास काय न सुरसंघ श्री यदूत्तमा भजला ॥ "

' मनुष्यवाणीच्या अर्थात् प्राकृतवाणीच्या सुरस अर्थाच्या सेवनाला, मला हा सुरवाग्विलास म्हणजे गीर्वाणवाणीचा विलास फार योग्य वाटला. ' याविषयीं बाबांनी दृष्टांत तरी किती समर्पक दिला आहे पहा:—श्रीकृष्ण हा जरी प्राकृत मनुष्य होता, तरी ब्रम्हादिक देव त्याला भजले नाहींत काय ? एकंदरींत यांतील तात्पर्यार्थ एवढाच दाखविला कीं, मोरोपंतासारख्या प्रासादिक रसिक कवीच्या कवितेंतील अर्थाच्या सेवनास मी केलेला संस्कृतभाषेचा उपयोग अस्थानीं झाला असें कोणी मानूं नये.

" महेश्वरबाबांच्या ग्रंथांचें व काव्यचातुर्याचें सप्रमाण विवेचन करणें हा एक स्वतंत्र विषय असून तो, त्यांच्या सर्व ग्रंथांच्या लक्ष्यपूर्वक अभ्यासाच्या आधीन आहे."

" यापेक्षांही दशगुणित त्यांच्या कवनकृतीचें चातुर्य, त्यांनीं रचलेल्या अद्वैत-मकरंदाचें व सिद्धांतचंद्रिकेचें जे कोणी लक्ष्यपूर्वक पर्यालोचन करतील, त्यांच्या प्रतीतीस आल्यावांचून राहणार नाहीं. " असें जें त्यांच्या चरित्रलेखकानें म्हटलें आहे, तें अक्षरशः खरें आहे. काव्यग्रंथांपैकीं 'भानुशतक' नांवाच्या गंभीर काव्याची टीका, मुद्गलाचार्यविरचित आर्यांवर असलेली लौकिकार्थ आणि परमार्थपर अशी द्व्यर्थ टीका, आणि स्वतः त्यांनीं रचलेलें 'गद्यसुधांशु' नांवाचें काव्य, हीं अतिशय प्रशंसनीय आहेत. 'गद्यसुधांशु' हें त्यांनीं आपल्या आराध्यदेवतेच्या प्रत्येक अवयवाचें नखशिखांत अलंकारिकरीतीनें एकेका गद्यांत केलेलें स्तुतिपर वर्णन असून, शब्दालंकारांची त्यांत इतकी परिप्लुतता केलेली आहे कीं, जें काव्य वाचून बाबांच्या विशाल बुद्धिवैभवाविषयीं मोठमोठ्या विद्वानांनीं आश्चर्यचकित होऊन तोंडांत बोटेंच घालावीं ! या काव्यावर त्यांचीच स्वतःची टीकाही अत्यंत सरस आहे. त्याचप्रमाणें " मांगिरीशाष्टक " हें सटीक लघुकाव्य त्यांनीं लिहिलेलें फार वाचनीय आहे. याशिवाय शंकराचार्यांच्या 'मनीषापंचक' 'षट्पदी' वगैरे कित्येक स्तोत्रांवर त्यांच्या फार उत्तम टीका उपलब्ध आहेत. बाबांनी स्वतः रचिलेलीं देखील 'पंचरत्न' 'वृत्ताष्टक' वगैरे स्तोत्रें फार मनोहर आहेत. धर्मशास्त्रविषयांत त्यांचे 'त्रिंशच्छ्लोकी, चतुर्दशश्लोकी आणि निर्णयसिंधूंतील सापिंड्यकन्यकानिर्णया-विषयीं अतिशय दुर्बोध अशा पद्यपंचकावर त्यांनीं केलेलें विवरण इत्यादि धर्मशास्त्रज्ञ लोकांस अतिशय उपयुक्त असे अनेक ग्रंथ आहेत. ज्योतिषशास्त्रांत 'मुहूर्तमाला' नांवाच्या ग्रंथावर त्यांची 'सौंदर्यबोधिनी' नांवाची सुरस टीका प्रसिद्ध आहे. या-शिवाय एक 'वृत्तशतक' नांवाचा स्वतंत्र ग्रंथ आणि दुसऱ्या एका सिद्धांतग्रंथावर त्यांची टीका आहे. न्यायशास्त्रांत तर्कभाषा नामक केशवमिश्रकृत न्यायग्रंथाचें त्यांनीं सुंदर व्याख्यान केलेलें आहे. यावांचून त्यांचे आणखीही ग्रंथ असावेत. शिवाय त्यांच्या घरच्या बहुतेक नष्टप्राय झालेल्या पुस्तकसंग्रहांत त्यांनीं केलेले कित्येक ग्रंथ नष्टही झाले असावेत, असा तर्क आहे.

बाबांच्या अंगीं आपल्या अगाध विद्येचा काडीमात्रही गर्व नव्हता. दुसऱ्या पंडितांशीं वादविवाद करून आपल्या विद्येचें महत्व दाखविणें, या गोष्टीचा त्यांस मनापासून तिटकारा असे. अशी गोष्ट सांगतात कीं, बाबांच्या थोर विद्वत्तेचा लौकिक ऐकून एकदां दोघे नैय्यायिक पंडित त्यांच्याशी वाद करण्याच्या हेतूनें मुद्दाम त्यांच्या गांवीं आले होते. सकाळच्या प्रहरीं ते बाबांच्या घरीं पोंचले; त्यावेळीं बाबांचा मुख-

मार्जनविधी चालला होता. हे उभयतां पंडित थेट बाबांच्या पुढें येऊन उभे ठाकले; व उभ्याउभ्यांच त्यांनीं ' महेश्वरभट्टजी कोठें आहेत ? ' असा प्रश्न केला. बाबांनीं त्यांच्या चेहऱ्यावरून हे कोणी तरी वावदूक पंडित असतील, असें तत्काळ ताडिलें; आणि त्यांस उत्तर दिलें कीं, ' महेश्वरभट्टजी घरीच आहेत, पण त्यांची तुमची इतक्यांत गांठ पडण्याचा संभव नाहीं; त्यांच्याशी तुमचे काय काम आहे हे सांगाल तर तसें त्यांस कळवून त्याचा काय जवाब मिळतो तो तुम्हांस पाहिजे तर कळवीन. ' यावर त्या पंडितांनी असें सांगितलें की, ' महेश्वरभट्टजीकडे आमचें जें काम आहे, तें अशा मध्यस्थीनें होणारें नसून प्रत्यक्ष त्यांचीच भेट झाली पाहिजे. आम्हीं सप्तगोदावरीतीरचे विद्वान नैय्यायिक आहोत, व त्यांच्या विद्वत्तेचा मोठा लौकिक ऐकून त्यांच्याशी घटकाभर वादविवाद करावा, अशा हेतूने आलो आहोत. त्याची गांठ पडण्यास घटकाभर अवकाश लागला तरी हरकत नाही. आम्हीं येथे बसतों, असें त्यांस कळवा. ' यावर बाबांनी त्यांस सांगितलें:—' महेश्वरभट्ट हे पराकाष्ठेचे वादभीरू आहेत. जर केवळ वादच करण्याचा तुमचा हेतु असेल, तर ते तुमची गांठ घेण्यास राजी होतील असे मला वाटत नाही; आणि खरें विचाराल, तर तुम्हीं ज्या प्रकारचा त्यांचा लौकिक ऐकता, तितक्या योग्यतेचे ते विद्वान नाहींत. तुमचा हेतु मी त्यांस कळवितों व ते काय उत्तर देतात तेही तुम्हास सांगतों. ' असें म्हणून बाबा नित्यक्रमाप्रमाणें घरांत जाऊन देवास नमस्कार करून लागलेच बाहेर आले; व त्यांनीं महेश्वरबाबांचें उत्तर म्हणून त्यास इतकेंच सांगितलें कीं, ' आपल्यासारख्या विद्वानाशी वादविवाद करून त्यात जय मिळवीन, अशी महेश्वरभट्टजींना मुळींच अशा नाहीं. कांकीं, तितक्या योग्यतेची त्यांची विद्वता नाही. मी आपणास प्रांजळपणें सांगतों की, जो त्यांच्या विद्वत्तेचा लौकिक आपण ऐकिला म्हणतां त्यास ते पात्र नाहीत. आपणांस वादविवाद करणेंच असल तर, दुसरे आपल्या बरोबरीचे पुष्कळ विद्वान सांपडतील. त्याच्या लौकिकावर विश्वास ठेवून आपण येथवर आलां, आणि आतां अकृतार्थ होऊन आपणास परत जावें लागत आहे, याबद्दल माफी असावी ! ' अशाप्रकारचा महेश्वरबाबांचा जवाब ऐकून ते उभयतां विद्वान बाबांच्या विद्वत्तेविषयीं धिक्कारबुद्धि प्रदर्शित करून निघून गेले. गांवातून जातांना बाबांच्या विद्वत्तेबद्दल कित्येकांकडे त्यांनीं तुच्छतादर्शक उद्गार काढलेले, बाबांचे पट्टशिष्य यशवंतभट्ट नांवाचे जे दुसरे विद्वान् ब्राम्हण त्याच गांवी राहत असत, त्यांच्या कानी आले; व या विद्वान नैय्यायिकांच्या औद्धत्याचा साहजिक त्यांस तिरस्कार आला; आणि त्या

उभयतां विद्वानांस रस्त्यांत गांठून आग्रहपूर्वक ते आपल्या घरीं घेऊन आले. त्यांनीं त्यांचा हेतु समजून घेऊन यथायोग्य आदरसत्कार करून त्यांस आपल्या घरीं ठेवून घेतलें; आणि दोनप्रहरीं जेवणखाण झाल्यानंतर बराच वेळ त्यांच्याशीं शास्त्रीय वाद-विवाद करून शेवटीं त्यांस निरुत्तर केलें. याप्रमाणें जेव्हां त्या पंडितांची वादाची घमेंड जिरली, तेव्हां त्यांनीं यशवंतभट्टजींना आपण ही विद्या कोठें संपादन केलीत? इत्यादि माहिती विचारिली असतां, यशवंतभट्टजींनीं "हे सर्व महेश्वरबाबांच्या कृपेचें फळ आहे." असें म्हणून सकाळीं तुम्हांस ज्यांची भेट झाली, तेच स्वतः महेश्वर होते, असेंही जेव्हां यशवंतभट्टजींकडून त्यांस समजलें, तेव्हां तर त्या उभयतांस आपल्या उद्धटपणाचा पश्चात्ताप होऊन आणि महेश्वरभट्टजींच्या समाधानवृत्तीबद्दल फार आश्चर्य वाटून ते यशवंतभट्टजींस बरोबर घेऊन पुनः बाबांच्या घरीं गेले, व त्यांनीं बाबांस साष्टांग नमस्कार घालून आपल्या चुकीबद्दल क्षमा मागितली नंतर महेश्वरबाबांनीं त्यांना विद्येचें फळ वादविवाद करून दुसऱ्याचा पराजय करावा हें नसून ज्ञानसंपादन हेंच होय वगैरे यथोचित बोध केला, आणि आपल्या गृहस्थ-धर्मास उचित अशी त्यांची यथायोग्य संभावना करून मोठ्या संतोषानें त्यांस रवाना केलें.

ऐकदां काशींतील पंडितांस व शास्त्र्यांस दोन संस्कृत श्लोकांचा अर्थ बरोबर लागला नाहीं म्हणून त्यांनीं ते श्लोक पुष्कळ ठिकाणच्या विद्वान् गृहस्थांकडे पाठ-विले; परंतु कोणीच यथायोग्य अर्थाचा उलगडा करीना. शेवटीं हे श्लोक महेश्वर-भट्टजींकडे काशीचे कांहीं शास्त्री स्वतः घेऊन आले. महेश्वरभट्टजींस ते श्लोक पाहून पहिल्यानेंच अर्थ समजला नाहीं म्हणून त्यांनीं त्या शास्त्रिबुवांस असें सांगितलें कीं, जर आपण दोन दिवस माझ्या घरीं रहाल, तर ह्या श्लोकांचा अर्थ लावण्याचा यत्न करीन. त्या शास्त्रिबुवांनीं गोष्ट कबूल केली. इकडे महेश्वरभट्टजींनीं एकांतस्थळीं जाऊन सरस्वतीची स्तुति केली. त्याबरोबर एकाएकीं त्या श्लोकांचा अर्थ त्यांच्या लक्ष्यांत आला. नंतर त्यांनीं ह्या दोन श्लोकांचा अर्थ केला त्यास वीस कागद लागले! म्हणजे एवढी मोठी त्यांवर टीका लिहिली! सांप्रत त्या श्लोकार्थाच्या दोन नकला एक महेश्वरबाबांच्या घरीं व दुसरी श्रीमंत खेमसावंत सरदेसाई संस्थान सावंतवाडी यांच्या दप्तरीं आहे म्हणतात.

महेश्वरबाबांविषयीं 'कविचरित्र' कारांनीं फार चांगलें मत दिलें आहे. ते म्हणतात "न्यायशास्त्र व धर्मशास्त्र या दोन्हींमध्यें तो प्रामाणिकमताचा असून.

---

१ पहा गोमांतकाचा इतिहास भाग १ ला पृष्ठ ८१।८२.

लोकांमध्यें त्यांची मान्यता फार मोठी असे. त्यांच्या विद्वत्तेवरून त्यांस जी प्रतिष्ठा मिळाली होती, ती त्यानें आपलें सर्व आयुष्य सदाचरण व ईश्वरसेवन ह्यांत घालविल्यामुळें अधिक वाढली, आणि हिंदुस्थानांत ग्रंथरूपाने त्यांची कीर्ति चहूंकडे पसरली. तो धर्माविषयीं आपलें मत कधीं खोटें देत नसे; ह्यामुळें कोठे ग्रामण्य किंवा धर्मप्रकरणी वाद उपस्थित झाला असतां लोक त्यांजवळून खऱ्याखोट्याचा निवाडा करून घेत. हा मनुष्य मोठा परोपकारी असून साधा असे. यानें काव्य, अलंकार, न्याय आणि धर्म या शास्त्रांमध्ये कित्येक विद्यार्थी पढवून तयार केले. यांच्या वंशजांनींही याच मार्गाचे अवलंबन केलें. महेश्वरबाबांचें कधी नांव निघाले तर ते त्यांची स्तुति करून नमस्कार करीत इ० ”

महेश्वरबाबांच्या आगच्या सच्छील, सद्वर्तन, सत्याभिमान, ईश्वरनिष्ठा आणि धर्मपरायणता इत्यादि सद्‌गुणावरून हरएक शास्त्रीयविषयांत बाबांचें मत म्हणजे त्यावेळी वेदवाक्य समजण्यात येई. “ **बाबावाक्य प्रमाणम्** ” म्हणजे बाबा ह्मणतील तेंच खरें !, अशी जी एक म्हण लोकप्रचारांत आली आहे ( हल्लीं मात्र तिचा अर्थविपर्यास झाला आहे ) ती या वरील प्रकारच्या बाबांसारख्या लौकिकवान् पुरुषांवरूनच प्रचारांत आली आहे. किंबहुना महेश्वरबाबांची मान्यता व लौकिकही तशाच योग्यतेचा होता, यात संशय नाही. असो. याप्रमाणे हे महाधार्मिक, सदाचरणी, परोपकारी, सद्‌गुणी पुरुष आपल्या हयातींत मोठा लौकिक आणि प्रतिष्ठा मिळवून आपल्या वयाच्या ९८ वदाव्या वर्षी शके १७३८ इ० स० १८१८ साली कैलासवासाच्या सायुज्यपदवीचे अधिकारी झाले.

सुमारें शंभर वर्षांपूर्वी प्राचीन वेदशास्त्रविद्येची किती श्रेष्ठता होती व ती शिकण्याचीं साधनें ( ग्रंथ वगैरे ) सोयीची नसतांनाही तिच्या प्राप्तिसाठी लोकांना किती जीवापाड श्रम करावे लागत असत व तितके श्रम करूनही लोक त्या विद्येंत कसे निष्णात होत होते, आणि सांप्रतकाली सर्वतऱ्हेच्या सोयी असूनही त्या विद्येविषयीं लोकांचे किती दुर्लक्ष्य होत चालले आहे हे ह्या बाबांच्या चरित्रावरून स्पष्ट होत आहे. सध्यांच्या मनूत महेश्वरबाबांसारखे संस्कृतभाषेतील उत्तम ग्रंथकार, मार्मिकटीकाकार, आणि श्रुतिशास्त्रपरायण असे सद्वर्तनी वैदीक ब्राम्हण उत्पन्न होणे फार कठीण आहे असे मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें; पण फिरलेल्या परिस्थितीपुढे कोणाचा इलाज नाही ! ! हेंच खरें मानून समाधानचित्तानें राहिलें पाहिजे.

# विद्वद्वर्य नागेशभट्ट ऊर्फ महाबलभट्ट.

**" अग्निं वै जातं पाप्मा जग्राह ते देवा आहुतिभिः पाप्मान मपाघ्नन्नाहुतीनां यज्ञेन यज्ञस्य दक्षिणाभिर्दक्षिणानां ब्राह्मणेन ब्राह्मणस्य छन्दोभिश्छन्दसां स्वाध्यायेनापहत पाप्मा स्वाध्यायो देवपवित्रं वा एतत्ते योऽनूत्सृजत्य भागो वाचि भवत्य भागो नाके । '**

" अग्नि उत्पन्न होताक्षणीं त्याला पापानें पछाडिलें; तें पाप देवांनीं आहुतीनें नाहींसें केलें; त्यामुळें आहुतींना लागलेला दोष यज्ञाला नाहींसा करावा लागला; यज्ञाचें पातक दक्षिणांच्यायोगानें नाहींसें झालें; दक्षिणांना चिकटलेलें पातक देवांनीं ब्राम्हणांच्याद्वारें नाहींसें केलें; ब्राम्हणाला लागलेलें पातक छंदाच्यायोगानें नाहींसे केलें; छंदाचें पातक वेदाध्ययनानें नाहींसें झालें; आणि वेदाध्ययन मात्र निष्पापच राहिलें; कारण, वेदाध्ययन हें देवपवित्र होय. तस्मात वेदाचा जो त्याग करितो त्याची वाणी व्यर्थ होते व त्याला उत्तम गतिही प्राप्त होत नाहीं. " अशा अर्थाची ही वरील श्रुति आहे. ह्या श्रुतीवरून वेदाध्ययन हें मुख्य आहे आणि ' वेदमेव जपेन्नित्यं यथाकालमतन्द्रितः । तं ह्यस्याहुः परं धर्ममुपधर्मोऽन्य उच्यते ' ह्या मनुवचनावरून वेदाध्ययन हाच ब्राम्हणांचा मुख्य धर्म असून इतर धर्म गौण ठरत आहेत. शिवाय **' अनभ्यासाच्च वेदानामाचारस्य च वर्जनात् । आलस्यादन्नदोषाच्च मृत्युर्विप्राञ्जिघांसति '** वेदाध्ययन न करणें, सदाचारानें न वागणें, आळस व अन्नदोष ह्यामुळें मृत्यु विप्रांचा घात करण्याची इच्छा करितो असेंही मनूनें म्हटलें आहे. तेव्हां आयुष्यच जर वेदाध्ययनाच्या अभावामुळें कमी होण्याचा संभव आहे, तर वेदाध्ययनावांचून दुसरी खटपट करणें ब्राम्हणाला उचितच नाहीं; कारण **' योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम् । स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः '** वेदाध्ययन न करितां इतर विद्येंत परिश्रम करणारा द्विज ह्या जन्मीचे परिवारासह शूद्रतुल्य होतो असें मनु ह्मणतो; आणि **' उत्तमाङ्गोद्भवाज्ज्यैष्ठ्या द्ब्रह्मणश्चैव धारणात् । सर्वस्यैवास्य सर्गस्य धर्मतो ब्रह्मणः प्रभुः '** वेदधारण हें ब्राह्मणाच्या प्रभुत्वाचें कारण असून **' उत्पत्तिरेव विप्रस्य मूर्तिर्धर्मस्य शाश्वती '** साक्षात् ते धर्ममूर्ति होत

असें म्हटलें आहे; तेव्हां धर्माचें मूळ जें वेदाध्ययन तेंच जर ब्राम्हणांनीं केलें नाहीं तर त्यांला धर्ममूर्ति कसें ह्मणता येईल? 'सहि धर्मार्थमुत्पन्नः' असें म्हटलें आहे, आणि वेद हें धर्माचें मूल आहे. साराश वेदाध्ययनच जर ब्राम्हण न करील तर त्याची उत्पत्तिच व्यर्थ होय; असा जो धर्मशास्त्रकाराचा सिद्धांत आहे त्यास प्राचीनकाळचे लोक फार मानीत असत. किंबहुना त्याजवर पूर्ण विश्वास ठेवून त्याप्रमाणें वागतही असत; यामुळें वर्णाश्रमधर्मानुसार प्रत्येक विद्येत लोक चांगले निष्णात होत होते, आणि अशा विद्वानांविषयीं लोकांचीही त्यावेळीं चांगली पूज्य-बुद्धी होती. इतकेंच नाहीं तर 'यद्यदा चरति श्रेष्ठः स्तत्तदेवेतरोजनः' या भगवद्वचनानुसार विद्वानांच्या गोष्टींवर व त्यांच्या आचरणावर पूर्ण श्रद्धा ठेवून आपणही त्याप्रमाणें वागत असत. याविषयीं जीं अनेक प्राचीन उदाहरणें आहेत त्यांचेंपकीं प्रस्तुत चरित्रनायक नागेशभट्ट यांचें एक होय.

उत्तरकानडा व दक्षिणकानडा असे जे कर्नाटकप्रांताचे दोन भाग आहेत, त्यांतील उत्तरकर्नाटकांपैकीं कारवार जिल्हा प्रसिद्ध आहे. या जिल्ह्यांत कुमठा म्हणून जें एक तालुक्याचें ठिकाण आहे तेथून सहा मैलांचे अंतरावर 'हळदीपुर' या नांवाचा एक लहानसाच गांव आहे. त्या गांवीं शके १६६३ सालीं नागेशभट्टजींचें जन्म झालें. त्यांचे वडिलाचें नाव वेंकटेशभट्ट असें होतें. पूर्वीपासून त्यांचे घराण्यात वाड-वडिल ज्या मार्गानें चालत आले त्याच मार्गानें पुढील पिढीनें गेलें पाहिजे अशी वहिवाट आहे.

नागेशभट्टजींचे पूर्वज रामचंद्रभट्टजी हे मारुतीचे तीव्र उपासक होते. त्यांचें सारें आयुष्य बलभीमाच्या उपासनेत गेलें म्हटलें तरी चालेल. इतकेंच नाहीं तर आपली ही उपासना अखंड चालावी म्हणून त्यांनी हळदीपूर येथें एक देवालयही बांधिलें आणि तेथें शके १५३२ च्या सुमारास आपल्या उपास्यदेवतेची ( मारुतीची ) स्थापना केली; व तेंच आपलें राहण्याचें घर करून कांहीं जमीनजुमला वगैरे इष्टेट देवाच्या नांवानें करून त्याची यथासांग पूजाअर्चा करणारांनीच तिचा उपभोग घ्यावा अशी कायमची व्यवस्था केली. ही मारुतीची प्रतिमा फार प्राचीन आहे व त्याच्या पेढी-वर २४११५३२ असे आंकडे आहेत तेव्हां ही मूर्ती रामचंद्रभट्टजींस कोठून व कशी मिळाली याजबद्दल विश्वसनीय माहिती सांपडत नाहीं. सारांश नागेशभट्टजींनाही आपल्या पूर्वजांनीं घालून दिलेल्या मार्गाचेंच अवलंबन करणें भाग पडलें. कारण, 'येनास्य पितरोयाता येनयाताः पितामहाः। तेनयायात्सतां मार्गं

ते न गच्छन्नरिष्यति ' ज्या मार्गानें बाप आजे चालत आले त्या मार्गानें आपण चालावें म्हणजे हानि होत नाहीं, अशा अर्थाच्या स्मृतिवचनांवर त्यांचा पूर्ण भरंवसा होता. सध्यांच्या काळाप्रमाणें विचारस्वातंत्र्याचा हक्क त्यांस नव्हता यामुळें त्यांचे घराण्यांत पिढ्यान्‌पिढ्या एकच मार्ग राहिला, असो.

धर्मशास्त्र, ज्योतिष, याज्ञिक इत्यादि श्रौतस्मार्तविषयेंत नागेशभट्टजी उत्तम निष्णात होते. ही सारी विद्या त्यांनीं आपल्या वडिलांकडेच संपादन केली होती. ते वैष्णव-मतानुयायी असल्यामुळें विष्णूची आराधना करण्याविषयीं त्यांचे मनाचा फार कल होता. वास्तविक त्यांचे घराण्यांत वडिलार्जित चालत आलेली जी मारुतीची आराधना तीहि मध्वमतानुयायांना इष्टच होती, कारण प्रत्यक्ष त्या मताचे प्रवर्तक जे मध्वाचार्य ते जर साक्षात् मारुतीचे अवतार म्हणून प्रसिद्ध आहेत तर त्या मतास कारणीभूत अशा मुख्यप्राणाच्या उपासनेपुढें निदान वैष्णवांना तरी दुसरी कोणतीही उपासना इष्ट वाटूं नये हें साहजिक आहे; पण असा जरी कार्यकारणभाव आहे तरी त्या मतसंप्रदायानुरूप सेव्यसेवक दृष्टीनें हनुमंताकडे सेवकत्व येतें आणि सर्वोत्तमत्वानें विष्णु हा सेव्य ठरतो. अर्थात् सेवकापेक्षां सेव्याचीच उपासना अत्यंत श्रेष्ठ आहे हें उघड आहे. शिवाय ' **पिंडे पिंडे मतिर्भिन्ना** ' किंवा ' **भिन्नरुचिर्हि लोकः** ' इत्यादि वचनानुसार नागेशभट्टजींना सर्वोत्तम विष्णूचीच आराधना इष्ट वाटली असावी आणि त्याप्रमाणें शके १६९७ मध्यें विष्णुवाचक श्रीव्यंकटेशाची लांकडी प्रतिमा त्यांनीं त्याच आपल्या वडिलार्जित देवालयांत स्थापन केली आणि अशारीतीनें पूर्वजांच्या कृतीसही कोणत्याप्रकारें धक्का न लावतां आपल्या आवडीनुरूप नागेशभट्टजींनीं दोन्ही देवांच्या आराधना चालविल्या व दरसाल कांहीं उत्सव करण्याचें ठरविलें. त्यांत माघ महिन्यांत आगमोक्त रथोत्सव फार मोठा होत असतो. पांच सहा दिवस-पर्यंत होमहवन, कथापुराण, ब्राम्हणसंतर्पण वगैरे चालतें. त्याच्या खर्चाप्रीत्यर्थ नागेशभट्टजींनीं आसपास बहुतेक गांवांतील यजमानमंडळीकडून ' **चक्रवर्तिका** ' म्हणजे दरएक घरास चार आणेप्रमाणे घेण्याचें ठरविलें. सरकारांतून दरसाल ६८ रुपयेची नेमणूक मिळविली. हें देवस्थान व त्याचें सारें उत्पन्न जरी नागेशभट्टजींच्या मालकीचें होतें तथापि त्यांनीं तें स्वकीयवर्गाकडे दिलें आणि आपल्या भावी परंपरेनें त्या देवस्थानांत देवाची पूजा अर्चा, वार्षिक उत्साह वगैरे करून आपला कुटुंबचरितार्थ चालवावा अशी व्यवस्था केली. त्याप्रमाणें हल्ली चालत आहे.

नागेशभट्टजी हे नुसते नामधारी दक्षिणा घेण्यापुरते ब्राम्हण नव्हते. त्यांचें सत्व-

शील आचरण व तपस्तेज फार विलक्षण होतें. त्यांचेसंबंधीं अशी एक आख्यायिका त्या प्रांतांत प्रसिद्ध आहे कीं, ' होनावर येथें बसराजदुर्ग म्हणून एक लहानसें संस्थान होतें. तें विजयानगरच्या राज्यांतील पाळेगारींपैकीं एक होय. त्या संस्थानांत नागेशभट्टजींचें चांगलें वजन होते. तेव्हां एकदां असा प्रकार घडला कीं, नागेशभट्टजी घरांत नसतांना त्यांचे बंधूंनी विस्मृतिने अष्टमीस ग्रहण म्हणून संस्थानात कळविलें. नागेशभट्टजींच्या घराण्यावर ह्या संस्थानची इतकी श्रद्धा होती कीं, त्यांच्या घरांतील कोणीही जर काही सांगेल तर त्याजवर त्यांचा पूर्ण विश्वास बसे. त्यांत हे तर प्रत्यक्ष नागेशभट्टजींचे बंधु पडले. हे वर्तमान नागेशभट्टजीस समजतांच त्यांनीं तो प्रसंग आपल्या तपःसामर्थ्याने पार पाडण्याचा निश्चय करून अष्टमीस ज्या समयाला ग्रहण म्हणून सांगितले होते त्याच समयाला संस्थानातील मडळींनां समुद्रावर स्नानास येण्यास सांगितलें. त्याप्रमाणे मडळी जमतांच आपण पूर्वी स्नान आटोपून सूर्याला अर्घ्यप्रदान करण्यासाठी हातात ताम्हण घेऊन उभे राहिले तो त्यावेळीं असा चमत्कार झाला म्हणतात की, त्याचे हातांतील ताम्हण सूर्याच्छादित होऊन कांहीवेळ तेथें जमलेल्या मडळीस ग्रहणभास झाला व मडळींनी स्नान, दान, जप वगैरे प्रकार केला ! ! किति आश्चर्य हे ! तेव्हापासून नागेशभट्टजीला ' अष्टमीस ग्रहण आणलेले ' अशा खुणेने ओळखण्याचा प्रघात पडला तो अद्यापि तसाच आहे. असो.

नागेशभट्टजींच्या अंगी कवित्वशक्ति फार चांगली होती व त्यानी धर्मशास्त्र व ज्योतिष या दोन शास्त्रांवर मोठमोठे पांच सहा ग्रंथ लिहिले आहेत. त्यांत ' स्मृत्यर्थ मुक्तावलि, तांत्रिकमुक्तावलि, आगमग्रथ ' हे तीन धर्मशास्त्रविषयक असून ' आर्यातंत्र, आर्याकौतुक, महाबलसिद्धांत ' असे तीन ग्रथ गणीतसबधी आहेत. यांतील शेवटचे दोन तीन ग्रंथ उपलब्ध नाहीत तरी पूर्ण शोधाती मिळण्यासारखे आहेत. प्रथमचे तीन चार ग्रथ आम्ही स्वतः पाहिले असून हल्ली ते त्याच्या घरी हळदीपुरास आहेत. हे अत्यंत उपयुक्त व महत्वाचे ग्रथ छापून प्रसिद्ध केल्यास समाजास त्यांचा फार उपयोग होणार आहे. आजपर्यंत ते तसेच राहिले ही मोठी खेदाची गोष्ट होय. तसेच ते आणखी कांही दिवस राहतील तर कसरीच्या भक्षस्थानीं पडल्यावांचून राहणार नाहींत; आणि दुर्दैवानें जर अशी स्थिति ओढवली तर नागेशभट्टजींचे श्रम व्यर्थ जाऊन त्या पूज्य व्यक्तीचे नांवही नामशेष होईल. तेव्हां असा प्रसंग सहसा न येईल अशी आम्हांस आशा आहे.

त्यांची संस्कृतवाणी किति सुगम व सुबोध होती हें खालीं दिलेल्या त्यांच्या 'स्मृत्यर्थमुक्तावली' नामक ग्रंथांतील आरंभींच्या दोन श्लोकांवरून चांगलें कळेल.

"श्री शंखावलि वत्सगोत्र तिलकः श्रीरामचन्द्रात्मजो
लक्ष्मी सच्छय लालितः सुमनसां भद्रं सदा चिन्तयन् ॥
पादभ्रष्ट जलैर्मलं परिहरन्ब्रह्मादिभिः सेवितः
श्री धाराहपुरालयो विजयते श्रीवेंकटेशो गुरुः ॥ ४ ॥
नानाशास्त्र कलाकलापचतुरः श्रीवेंकटेशः कविः
सूनुस्तस्य महाबलः पितृकृपा संप्राप्त विद्यः सुधीः ॥
पारंपर्य महादणागुरुतरं निर्मथ्यशास्त्रार्णवं
सम्यक्स्त्रग्धरया करोति रुचिरं स्मृत्यर्थमुक्तावलिं ॥ ५ ॥"

कोणतेही सद्गुण अंगीं असल्यावाचून माणसाची योग्यता वाढत नाही व लोकांकडून त्याचा गौरव होत नाही हें उघड आहे नागेशभट्टजींच्या अंगीं तसे लोकोत्तर गुण होते म्हणून लोकांत त्याचा विशेष मान झाला त्यांस त्या प्रांतांतील लोकांनीं कोणत्याही श्रौतस्मार्त वैदीककर्मांत सादस्यत्वाचे अग्रस्थानाचा बहुमान देऊन खालीलप्रमाणें एक करारपत्र दिलें.

"स्वस्ति श्रीमज्जयाभ्युदय नृप शालीवाहनशक १७०० सलुव विलंबिसंवत्सरद माघशुद्ध १० मी सौम्यवारदलु हळदीपुर श्रीवेंकटरमणदेवर तथा श्रीमुख्यप्राणदेवर भंडारके होनावर, कुमटे, कल्बाग, बाळकूर, माविनकुर्वे, गेरसप्पा, संशे, गुडबाळे, हडगोड, चिकनकोड, होसाड, मोलकोड, इडगुंजी, करीकुर्वे, कासरकोड, मंकी, मुर्डेश्वर, शिरावली, भटकळ, शिरूर, नायकिनकट्टे, मिडजि, अंकोलें, अवुर्से, गोकर्ण, कागल, गुडेअगडी, उपिनपट्टण, देविमने, होसकेरे, देवरमंजगुणी, सोंदे, हुलेकल, शिशी, मळगि, यलापुर, निलकुंद, बाळूर, हेरूर, बिळगि, बेडकिणी, सिद्दापुर, शिरवंते, सागर, मुंताद उरल्लहा कोंकणदेशद सासष्टि अग्रजिग्रामद ब्राम्हण महाजनंगळु बरसिहाकिद धर्म ताहा बिनोत्तळे । नंम वर्गदलु आगुव आगमोक्त पुराणोक्त श्रीदेवर प्रतिष्ठे रथोत्साहमोदलाद अनुष्ठानगळिगे सदस्य तांत्रिकत्वसहा नवग्रहपूजे, पुराणमुहूर्तमर्यादे मोदलाद यावत्तु नंम वर्गके मुख्य वैदिकराद हळदीपुर वेंकटेशभट्टरमग नागेशभट्टर मुकांत्रा ईवरेगु नडद-

यंदुप्रकारा इवर संतान पारंपर्य नडसिकोंडु बरबेकु, अवरकिनहा यात्र-दोंडु माडबारदु यंदु बरसिहाकिद, धर्मताहा, इदके साक्षिगळु भूमिदेवते, अष्टदिक्पालकरु, सूर्यचंद्रमरु, श्री इदे श्रीवेंकटरमणदेवरु, श्री गुरुगळु ॥
"स्वदत्ताद्विगुणं पुण्य परदत्तानु पालनं । परदत्ता-पहारेण स्वदत्तं निष्फलं भवेत् ॥१॥ वर्गदवर गुरुता उंटु ॥"

हा मान अद्यापि नागेशभट्टजींच्या घराण्यास दिला जात आहे. याशिवाय त्यांस त्या प्रांतांतील आसपासच्या गांवांतून भूमिदानपत्रें, नेमणुका वगैरे बरींच मिळालीं आहेत त्यांपैकीं एकाचा येथें उल्लेख करून त्यांचें हें अल्पसें चरित्र संपवितों.

"श्रीवेंकटेश प्रसन्न ॥ श्रीवीरहनुमंतायनमः ॥ नमस्तुंग शिरस्तुंग चंद्रचामर चारवे ॥ त्रैलोक्य नगरारंभ मूल-स्तंभाय शांभवे ॥ १ ॥ स्वस्तिश्रीजयाभ्युदय शालिवाहन शक वरुष १६९९ नेतथा हेमलंबि सं० मार्गशिर शुद्ध ५ मि यलु श्रीमतु कोंकणदेशद शंखावळि ग्रामद हळदीपुरदलु इह वत्सगोत्रोत्पन्नराद राम-चंद्र शर्म प्रपुत्रराद वेंकटेश शर्मर पुत्रराद नागेशभट्टरीगे अदे देशदल्ली-ष्टावळि ग्रामद कुमठेयलिरुव भार्गव च्यवन आप्नुवैार्व जामदग्नि पंच-प्रवरान्वित वत्सगोत्रोत्पन्नराद हनुमत शर्मर प्रपुत्रराद रामचंद्र शर्मर पुत्रराद सौयरुशेनभोवनु दानधारापूर्वक वागि बरकोट्ट धर्मसाधनद क्रमा-क्रमवेतेदरे कुमठे पेठेयलु श्रीवेंकटेश देवस्थानद दक्षिण दिक्किनभागि-नलु कट्टिदगृहवंनु सोपस्करयुक्त वागि सहिरण्यकधारापूर्वक वागि कृष्णा-र्पण वागि कोट्टु मुंदे आचंद्रार्क वागि नडुववगे मुद्राभिद्रे जैनर उत्ता-रद भूमियंनु गवडराळदवुवटन केय्यासाहाक्रयमूल्के माडिकोड साधन प्रकार स्थळहुडगेरे बेरंणन केय्याक्रयमूल्के माडिकोड ८३॥ सिस्तिन-स्थळा साधनप्रकार स्थळंगळुसाहा सहिरण्यकधारापूर्वक वागि कृष्णा-र्पण वागि कोट्टनागि आस्थळंगळु निंम संतान पारंपर्य वागि आळि अनुभविशि कोंडु बाहिरि इस्थळके अरमने सिस्तु आसाधनप्रकारा सिस्तिनहणवंनु निंवे कोटु बहारियंदु बरसिकोट्ट धर्मसाधना । इदके साक्षिगळु सूर्यचंद्रमरु अदे भूमिदेवदे साक्षि । स्वदत्ता द्विगुणं पुण्यं परदत्तानुपालनं ॥ परदत्तापहारेण स्वदत्तं निष्फलं भवेत् ॥ दानपालनयोर्मध्ये दानाच्छ्रेयोनु-

पालनं ॥ दानात्स्वर्ग मवाप्नोति पालनादच्युतंपदं ॥
इधर्मके तोडरुमाडिदवगे काशियलु होगि, गोहत्या मातृमित्रूहत्या माडिद
द्रोहियेंदु इधर्मक्के तोडरुमाडलिक्के यिल्ला येंदु बरसि कोट्ट धर्मसाधन
सोयरु सेनभोवन बरहयेता उंटु ॥ श्री ॥ ”

अशाप्रकारची आपली अढळ कीर्ति या मर्त्यभूतलावर ठेवून नागेशभट्टजी शके १७०४ मध्ये वैकुंठवासी झाले.


नागेशभट्टजींप्रमाणें अपूर्व योग्यता संपादून अशारीतीचीं दानपत्रें मिळविणारे ब्राम्हण सध्यांच्या मनूंत फारच दुर्मिळ आहेत कदाचित् एकादा कोणी निघाला तर त्याची योग्यता जाणून त्यास धर्मसाधनें करून देणारे तर अगदी विरळा. तात्पर्य, ‘ चणे असले तर दांत नाहीत व दांत असले तर चणे नाहीत ’ अशी आजकालची नाजुक स्थिति झाली आहे. हा एक सृष्टिक्रमांतील दोषच आहे असें म्हटलें पाहिजे.

# महामहोपाध्याय पुरोहितकल्पद्रुम
# लक्ष्मण यशवंतभट्टजी कामत.

" सृष्ट्वा पुराणि विविधान्यजयात्मशक्त्या
वृक्षान्सरी सृपपशून्खग दंश मत्स्यान् ॥
तैस्तैरतुष्ट हृदयः पुरुषं विधाय
ब्रह्मावलोकधिषणं मुदमाप देवः ॥ " भागवत.

परमात्म्यानें अनेकप्रकारची सृष्टि निर्माण केली, परंतु जेव्हां मानवसृष्टि निर्माण झाली तेव्हां त्याला आनंद झाला, असें उपनिषदें, पुराणें इत्यादि ग्रंथांतून आहे. त्याप्रमाणें ह्या मानवसृष्टींत अनेकधर्मी प्रजा परमात्म्यानें जरी उत्पन्न केलेली असली तरी त्यांतील वैदीकधर्मी प्रजा त्याला विशेष प्रिय असावी असें दिसतें. कारण, ही प्रजा पृथ्वींतील इतर भागांपेक्षां भरतखंडांत विशेष आहे व हा भाग सर्व पृथ्वींत श्रेष्ठ आहे. परमेश्वराचीं निवासस्थानें जितकीं ह्या भरतखंडांत आहेत तितकीं पृथ्वीच्या इतर सर्व भागांत मिळूनही नाहींत, पुण्य नद्या, पवित्र क्षेत्रें आणि ज्योतिर्लिंगादि स्वयंभू देवस्थानें भरतखंडांतच जिकडे तिकडे भरलेलीं आहेत. तसेंच ईश्वराचे शेंकडो अवतार ह्या भरतखंडांत झालेले आहेत व होणार आहेत; कारण येथील प्रजा त्याच्या निःश्वासरूप वैदिकधर्मानें वागणारी असल्यामुळें आणि पदार्थाशिवाय ज्याप्रमाणें रसाचें अस्तित्व शक्य नाहीं त्याचप्रमाणें वैदिकधर्मनिष्ठ प्रजेशिवाय तो धर्म कायम राहणें संभवनीय नाहीं. तेव्हां त्या धर्माच्या रक्षणाकरितां म्हणजे आपले श्वासोच्छ्वास कायम राहण्याकरितां अर्थात् आपल्या रक्षणासाठीं ईश्वराला अवतार घेणें भागच आहे. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण परमेश्वरानें स्वतः निर्माण केलेले आहेत; आणि '**चातुर्वर्ण्यं मयासृष्टं**' असें गीतेमध्यें ईश्वराचें म्हणणेंही आहे. ह्या चार वर्णाशिवाय इतर जातीचे लोक परमेश्वरानें स्वतः उत्पन्न केले असें कोठेंही सांगितलेलें आढळत नाहीं; आणि भरतखंडाशिवाय चातुर्वर्ण्य दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं.

" चातुर्वर्ण्यव्यवस्थानं यस्मिन्देशे न विद्यते ।
तं म्लेंच्छदेशं जानीयादार्यावर्तमतः परम् ॥ "



महामहोपाध्याय पुरोहित कल्पद्रुम लक्ष्मण यशवंत भट्ट कामत.

असें विष्णुस्मृतीमध्यें वचनही आहे. तेव्हां भरतखंडाशिवाय इतर देशांत राहणारे लोक म्लेंच्छधर्मानें वागणारे असल्याचें प्रत्यक्ष दिसत आहे. सारांश, भरतखंड हाच वैदिकदेश व त्यांतील प्रजा ही वैदिकधर्मी असल्यामुळें लोकांनीं आपले आचार-विचार ईश्वराच्या आज्ञेप्रमाणें म्हणजे श्रुतिस्मृतींत सांगितल्याप्रमाणें ठेवणें भाग आहे आणि अशाच कर्तव्यनिष्ठ माणसांची योग्यता विशेष असून त्यापासून परमेश्वरासही संतोष होणार आहे. तेव्हां अशा कर्तव्यनिष्ठ माणसांत प्रस्तुत चरित्र-नायकाची गणना प्रमुखत्वानें होते अतएव त्यांचें थोडेंसें जीवनचरित्र येथें देतों.

दक्षिणमहाराष्ट्रांत मिरज, जमखंडी, कुरुंदवाड वगैरे जीं लहान लहान ब्राम्हणी संस्थानें आहेत त्यांपैकींच सांगली हें एक होय. याच संस्थानच्या अमलांत शहापुर म्हणून एक चांगला प्रसिद्ध गांव आहे. तेथें चांगल्या नांवालौकिकास पोंचलेलीं अशीं गौडसारस्वत ब्राम्हण ज्ञातीचीं बरींच घराणीं आहेत. मुख्यतः सराफी धंद्यावर चरितार्थ चालविणारा धनिकवर्ग तेथें बराच मोठा आहे. शिवाय शहापुरी लुगडीं, जोडे, उपरण्या इत्यादि रेशमी सणंगाविषयीं ह्या गांवची बरीच प्रसिद्धि आहे बहुधा तेथें गौडसारस्वत ब्राम्हणज्ञातीची वस्ति गोमांतकांतील धर्मक्रांतीच्या सुमारास झाली असावी; आणि ज्यावेळीं हे लोक आपला मूळदेश सोडून आले त्याच-वेळीं त्यांनीं आपल्या उपाध्यायांसही बरोबर आणिलें होतें. तेंच हें चरित्रनायकाचें पिढीजाद उपाध्यायांचें मूळघराणें होय. पूर्वीपासून ह्या घराण्यांत वेद, शास्त्र, ज्योतिष, याज्ञिक इत्यादि श्रौतस्मार्तविषयेंत बरीच मंडळी निष्णात होऊन गेली. धर्मशास्त्र, याज्ञिक व ज्योतिष हें ह्या घराण्यांतील माणसांचें मुख्य विद्याव्रत होय. हें व्रत आजतागायत तरी सुरळीत चाललें आहे. पुढें ईश्वराची मर्जी. तथापि लक्ष्मणभट्टजी व त्यांचे चिरंजीव वेंकटेशभट्टजी यांच्या कारकीर्दीपर्यंत तें व्रत उत्तमरीतीनें पाळण्यास मुळींच कसूर झालेली दिसत नाहीं. इतकेंच नाहीं तर ' बापसे बेटा सवाई ' म्हणतात त्याप्रमाणें एकापेक्षां एकानें उत्तम लौकिक मिळविला. खुद्द लक्ष्मण-भट्टजींच्या वडिलांची अशी कीर्ति आहे कीं, ते एकदां आपल्या अप्पाजी लक्ष्मण नांवाच्या एका श्रीमंत यजमानाबरोबर पुण्यांतील एका थोर सरदारगृहस्थांच्या घरीं मंगलकार्यास गेले होते. रीतीप्रमाणें आमंत्रणाची अक्षता आली तेव्हां साहजिक अप्पाजी लक्ष्मणानीं ' आपले उपाध्याय गुरुजी आलेले आहेत त्यांसही अक्षता द्यावी असें सांगितलें. त्याप्रमाणें यशवंतभट्टजींकडे अक्षता येतांच ' जो मुहूर्तसमय ठरविला होता तो अगदीं चुकला आहे व त्यावर कार्य केल्यास बरें होणार नाहीं '

अस ते म्हणाले. त्याबरोबर अक्षता घेऊन आलेल्या उपाध्यायप्रभृतिमंडळींस मोठें आश्चर्य वाटलें आणि त्यांनीं त्याबद्दल विद्वान् ज्योतिषीमंडळी जमवून चौकशी केली; पण त्यांनाही बरोबर उलगडा होईना. तेव्हां यशवंतभट्टजींनीं सप्रमाण त्याचा खुलासा करून मंडळींची खात्री करून दिली, आणि अखेरीस यशवंतभट्टजींनींच ठरविलेल्या मुहूर्तावर कार्य उरकण्यांत आलें. पुण्यासारख्या राजधानीच्या शहरांत अशारीतीनें यशवंतभट्टजींच्या विद्वत्तेचा उपयोग व्हावा ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं! असो.

अशा ह्या विद्वन्मान्य वैदिक घराण्यांत लौकिक मिळविलेल्या यशवंतभट्टजींच्या उदरीं शके १७५० भाद्रपद कृष्ण १ पदेस चरित्रनायक लक्ष्मणभट्टजींचें जन्म झालें. बहुधा वैदिकांच्या मुलांचें प्राथमिक शिक्षण म्हटलें म्हणजे बालबोध लिहितां वाचतां येणें, साधारण गुणाकार भागाकार, इतकें झालें म्हणजे पुरे. बाकी त्यांचें खरें प्राथमिक शिक्षण म्हणजे अष्टाध्यायी शिक्षा, अमरकोश वगैरे वेदशास्त्रोपयुक्त ग्रंथांच्या अध्ययनासच लहानपणापासून सुरवात व्हावयाची. अशी जुनी वहिवाट होती. त्याप्रमाणें लक्ष्मणभट्टजींस थोडीशी अक्षरओळख होतांच त्यांजकडून त्यांच्या वडिलांनीं बरीचशीं स्तोत्रें, अष्टाध्यायी, रूपावळी, समासचक्र, अमरकोश वगैरे विषयांचा अभ्यास करविला होता. नंतर शके १७५८ मध्यें त्यांचा उपनयनसंस्कार करून वेदाध्ययनास प्रारंभ केला. संहिता, शिक्षा, ज्योतिष, छंद, निघंट, निरुक्त वगैरे षडंगवेदाचें अध्ययन सतत परिश्रमानें नऊ वर्षांत पूर्ण झालें. त्यांचा विवाह अगदीं लहानपणीं झाला. मध्यंतरीं त्यांना त्यांचे चुलते वेंकटेशभट्टजी यांनीं मुहूर्तमार्तंड नामक ज्योतिषग्रंथाची माहिती करून दिली. त्यापासून ते लग्न-मुंजीचे उत्तम मुहूर्त काढूं लागले. त्यावेळीं त्यांचें वय अवघें ११।१२ वर्षांचें होतें. तेव्हां इतक्या लहान वयांत मुहूर्त काढण्यापर्यंत ज्ञान झालें यावरून त्यांचा विद्याव्यासंग किती मोठा होता याची चांगली कल्पना होते. त्यानंतर राजापुराकडील एक शास्त्री शहापुरास पुराण सांगण्याकरितां आले होते. त्यांचेपाशीं लक्ष्मणभट्टजींनीं रघुवंश व नैषध यांमधील दोन दोन सर्ग काव्य म्हटलें. येथपर्यंत त्यांच्या अध्ययनास कोणतीच हरकत पोंचली नाहीं; परंतु शके १७७२ मध्यें त्यांचे पूज्य वडील यशवंतभट्टजी स्वर्गस्थ झाले, यामुळें त्यांच्या पुढील शास्त्राध्ययनास व्यत्यय आला. इतका जरी प्रपंचाचा भार शिरावर पडला तरी तो सहन करून सुब्रम्हण्य नांवाच्या एका शास्त्रीबुवांजवळ कौमुदीपर्यंत अध्ययन केलें; आणि मागाहून त्यांनीं स्वतःच व्यासंग करून संस्कृतभाषेचा अभ्यास वाढविला. त्यांची मुख्य वृत्ति पुरोहितपणाची असल्यामुळें धर्मशास्त्र, याज्ञिक, ज्योतिष,

इत्यादि विषयांत ते बरेच निष्णात होते. कोणताही धर्मशास्त्राचा निर्णय अथवा मुहूर्त वगैरे पाहण्याचा झाल्यास इकडील प्रांतांत लक्ष्मणभट्टजींशिवाय अन्यठिकाणीं क्वचित् होत असे; आणि जरी इतरठिकाणीं मुहूर्त पाहिला तरी त्याची पक्की खात्री करून घेण्यासाठीं यांचेकडेसच यावें लागे.

स्नानसंध्या, पंचमहायज्ञ इत्यादि ब्राम्हणांचीं जीं रोजचीं अवश्य कर्में तीं भट-भिक्षुकांनीच करावीं व त्यांचींच तीं मुख्य कर्में होत अशी आलीकडे बहुतेकांची समज झालेली आहे. परंतु गृहस्थ आणि भट असे जे ब्राम्हणांतील दोन भेद ते फक्त वृत्तिवाचक आहेत. पौरोहित्यवृत्ति पत्करिलेल्या ब्राम्हणाला भट ही संज्ञा आहे. म्हणून ब्राम्हणांचीं जीं श्रुतिस्मृतिप्रतिपादित नित्यकर्में तीं भट आणि गृहस्थ यांजवर अवलंबून नाहींत. तीं प्रत्येक ब्राम्हणानें आचरिलींच पाहिजेत; परंतु हल्लीं गृहस्थी-पेशानें राहणाऱ्या ब्राम्हणांनीं त्याचा मक्ता भटभिक्षुकांकडे देऊन टाकला आहे. तेव्हां या वर्गानें तरी हें आपलें संध्यावंदनादि अवश्य कर्तव्य योग्यरीतीनें पाळिलें पाहिजे. पण तसा प्रकारही ह्या भटभिक्षुक ब्राम्हणांत फारसा आढळून येत नाहीं. आतां ह्या टीकेस सर्वच भटभिक्षुक पात्र असतील असें आम्ही म्हणणें नाहीं. जरी सर्वच नसले तरी ते फार कमी हें अगदीं स्पष्ट आहे, आणि ह्या कमी प्रमाणांतीलच लक्ष्मणभट्टजी हे एक होत. त्रिकाल स्नानसंध्या, पंचमहायज्ञ, प्रत्यहीं एकादशनी रुद्राभिषेकपूर्वक देवपूजा, भागवतपारायण, दानधर्म, पंक्तीला ब्राम्हण, अश्वत्थप्रदक्षिणा, देवदर्शन इत्यादि सदाचरणावांचून अलीकडे या चाळीस वर्षांत त्यांचा एक दिवस देखील खाडा गेला नाहीं असें सांगतात. इतकें स्वतःचें रोजचें आन्हिक संभाळूनही अध्ययन, अध्यापन, पुरोहितवृत्ति हीं चालतच असत. अशारीतीनें सहा तास निद्रेशिवाय बाकी अठरा तास सतत वैदिकमार्गाचें अवलंबन करणारे शुचिर्भूत ब्राम्हण लक्ष्मणभट्टजींप्रमाणें फारच थोडे निघतील. त्यांची योग्यता वाढण्याला व त्यांचेठिकाणीं लोकांची पूज्यबुद्धि बसण्याला केवळ त्यांचें शुद्ध आचरणच मुख्य कारण झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. फारकरून त्यांना त्यांची यजमानमंडळी ‘गुरुजी’ या नांवानें संबोधित असत.

शके १८१८ दुर्मुखनाम संवत्सरामध्यें श्री कैवल्यपुरमठाधीश ब्रम्हीभूत श्री-मद्दात्मानंदसरस्वतिस्वामीमहाराज यांनीं श्रीमत् पूर्णानन्दसरस्वतीस्वामींस संन्यासाश्रम देऊन आपले शिष्य केले तेव्हां योगपट्टाभिषेकाचे प्रसंगीं कांहीं विद्वान्मंडळींना पदव्या देण्यांत आल्या. त्यांत **महामहोपाध्याय** ही पदवी लक्ष्मणभट्टजींस दिली

त्याचप्रमाणें शके १८२२ मध्यें श्रीक्षेत्र काशी येथें श्रुतिशास्त्रपरायण कल्याणशास्त्री प्रभृतिमंडळींना ‘ श्रुतिशिरोभूषण ’ वगैरे ज्या पदव्या मिळाल्या त्यांमध्यें **पुरोहित-कल्पद्रुम** अशी बहुमानाची पदवी लक्ष्मणभट्टजींस मिळाली. हें पदवीपत्र संस्कृत-भाषेंत असून त्याजवर काशींतील पंडित विभोरामशर्मा, महामहोपाध्याय कैलासचंद्र-शर्मा, महामहोपाध्याय गंगाधरशास्त्री तैलंग सी. आय. ई , महामहोपाध्याय राममिश्र-शास्त्री, तात्याशास्त्री पटवर्धन प्रभृति मोठमोठ्या नामांकित तेहतीस विद्वान्मंडळींच्या सह्या आहेत. हें अस्सलपत्र कोल्हापुर येथें श्रुतिशिरोभूषण कल्याणशास्त्री यांजपाशीं आहे. याशिवाय लक्ष्मणभट्टजींच्या घराण्यांत पूर्वींपासून धर्मादाव जमिनी, नेमणुका वगैरे चालत आहेत; त्यांपैकीं कुरुंदवाड संस्थानांतील नेमणुकीचें एक पत्र येथें नमूद करितों.

श्रीगणराज

हुजुरनगदी किर० जावक नंबर २५

“ वे॥ राजश्री नारायणभट्ट बिन बाबूभट्ट व लक्ष्मणभट्ट बिन यशवंतभट्ट राहणार शहापुर स्वामीचे सेवेसी पो॥ विनायकराव केशव सां॥ नमस्कार विनंति ता॥ छ ४ माहे जमादिलाखर सनसितैन मयातैन व अलफ पावेतों जाणोन स्वकीय लिहीत जावें वि. तुम्हीं राजश्री गोपाळ नाईक पेठ शहापुर यांजकडून विनंति करविली कीं, ता॥ येळूर गांवगन्ना गांवखर्चांतून वर्षासन धर्मादाव दरसाल रुपये १३ तेरा सन १२६६ फसलींत श्रीमंत राजश्री आबासाहेब यांणीं नेमणूक करून दिली त्याप्रमाणें पावत आहेत, परंतु दाख-ल्यास पत्र मिळावें म्हणून त्याजवरून हें पत्र लिहिण्यांत आलें आहे. चिरं-जीवांनीं नेमणूक करून दिल्हयान्वयें चालवीत आहेत, त्याप्रमाणें चलाविले जातील. कळावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती. ”

मनुष्य कितीही जरी मोठी विद्या शिकला, चांगला नांवलौकिक मिळविला, तरी प्रारब्धभोग हा आहेच. तो भोगल्यावांचून त्याला गत्यंतर नाहीं. आतां कित्येकांचें प्रारब्ध अनुकूल असलें म्हणजे त्याला चांगले भोग मिळतात आणि तेंच प्रतिकूल झालें म्हणजे वाईटस्थिति भोगण्याचा प्रसंग येतो. तात्पर्य मनुष्यजन्मांत त्याच्या प्रारब्धा-नुसार बरीवाईट स्थिति भोगण्याचा प्रसंग त्याला एकदां तरी येतच असतो; कारण मनुष्यजन्मच हा मुळीं प्रारब्धभोग होय. अर्थात् ‘ प्रारब्धकर्मणां भोगादेव क्षयः ’ या नियमानुसार तो भोग भोगून सारल्यावांचून प्रारब्धकर्माचा क्षय व्हावयाचा नाहीं. त्याठिकाणीं विद्वत्ता किंवा लौकिक याचा कांहीं उपयोग नाहीं; तेव्हां अशा-

रीतीच्या प्रारब्धभोगानें लक्ष्मणभट्टजींस प्रपंचाच्या ऐन भरभराटीच्या प्रसंगींच गांठलें. त्यांचे वडील चिरंजीव बाळकृष्णभट्टजी शके १८१३ मध्यें परलोकवासी झाले. बहुतेक घरचा सगळा प्रपंच बाळकृष्णभट्टजींवरच अवलंबून होता. त्यांच्या कर्तव्यदक्षतेमुळें लक्ष्मणभट्टजींस बिनत्रासावांचून आपला काल सदाचरणानें घालविण्यास आणखी विशेष संधि मिळाली होती; पण '**मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यद्धिचिंतयेत्**' या न्यायानुसार बाळकृष्णभट्टजींच्या आकस्मिक निधनामुळें त्यांजवर मोठें संकट गुदरलें. वस्तुतः प्रपंचामध्यें पुत्रवियोगासारखी हानि दुसरी कोणतीही नाहीं, त्यांत आईबापांच्या वृद्धावस्थेंत कर्त्यासवर्त्या पुत्राचें निधन म्हणजे दुःखाची परमावधीच म्हटली पाहिजे. अशारीतीचा दुर्धरप्रसंग जरी लक्ष्मणभट्टजींवर ओढवला होता तरी त्यांचे दुसरे धाकटे चिरंजीव **वेंकटेशभट्टजी** यांनीं वडिलांच्या नित्यान्हिककर्मांत कोणत्याहीरीतीनें व्यत्यय न यावा म्हणून आपला वाढता अध्ययनव्यवसाय बंद ठेवून प्रपंचकारकीर्द आपल्या हातीं घेतली आणि थोड्याच दिवसांत वडिलांना प्राप्त झालेल्या पुत्रवियोगजन्य दुःखाची विस्मृति पाडिली. इतकेंच नाहीं तर त्यांना परान्न वर्ज्य करण्यास लावून दररोज एक ब्राम्हण पंक्तीला घेण्याविषयीं विनंति केली. त्यांच्याकडून महायात्रा करविली, याप्रमाणें लक्ष्मणभट्टजींच्या सत्कृत्यांत ही एका रीतीची भर पडल्यामुळें दुःखांत सुख मानण्यास त्यांना हें एक साधनच झालें; पण हेंही सुखसाधन लक्ष्मणभट्टजींच्या कमनशिबामुळें अगदीं क्षणिक झालें. त्या साधनांस कारणभूत असलेले त्यांचे अवशिष्ट राहिलेले एकटे चिरंजीव वेंकटेशभट्टजी हेही पुढें सात वर्षांनीं म्हणजे शके १८२० मध्यें स्वर्गस्थ झाले. आतां तर त्यांजवरील दुःखाचा कडेलोट झाला. त्याचें यथार्थ वर्णन लेखणींतून उतरणें शक्य नसल्यामुळें ज्याचें त्यानें कल्पनेनेंच जाणण्याचें काम वाचकांवर सोंपविणें भाग आहे.

वेंकटेशभट्टजी हेही आपल्या वडिलांप्रमाणें वेदशास्त्रविद्येंत चांगले निष्णात झालेले होते. कांहींअंशीं वडिलांपेक्षां कांकणभर ह्यांची विद्या जास्तच होती म्हटलें तरी चालेल. एखाद्या शास्त्राचें पूर्ण अध्ययन करावें असा त्यांचा फार मनोदय होता, पण प्रापंचिक नडीमुळें आणि विशेषतः ते मातृपितृभक्त असल्यानें अगोदरच पुत्रवियोगानें होरपळलेल्या वडिलांच्या अंतःकरणास प्रपंचाची आणखी दगदग नसावी या हेतूनें त्यांना आपला मनोदय सिद्धीस नेतां आला नाहीं तरी त्यांतलेत्यांत त्यांनीं जी विद्या संपादन केली ती फारच वाखाणण्यासारखी होती. त्यांना आळस, म्हणजे

काय हें मुळींच माहित नव्हतें. पहांटे चार घटका रात्र असतांना उठून वडिलांच्या प्रातःस्नानाकरितां उष्णोदकाची तयारी करावयाची, पाणी तापेपर्यंत स्वतःच्या व बंधूच्या मुलांना उठवून कांहीं अध्ययन सांगावयाचें, इतक्यांत पाणी तापलें म्हणजे सहा वाजतां स्नान करून वडिलांना देवपूजेकरितां गंध, फुलें, तुळशी इत्यादि साहित्य तयार करून द्यावयाचें, त्यांच्या एकादशनी रुद्राभिषेकास मदत करावयाची; नंतर स्वतः चार अध्याय भागवत वाचून सुमारें नऊ वाजल्यापासून भोजनकाला-पर्यंत कोठें कांहीं यजमानकृत्य वगैरे असल्यास पहावयाचें, तोंपर्यंत इकडे लक्ष्मण-भट्टजींची पूजा, ब्रह्मयज्ञ, नैवेद्य, वैश्वदेव, बलिहरण, भागवतपारायण, अश्वत्थप्रद-क्षिणा, माध्यान्हसंध्या इत्यादि होऊन भोजनसमय प्राप्त व्हावयाचा, पुनः भोजनोत्तर कांहींवेळ वडिलांच्या देखरेखीखालीं अध्यापनक्रम चालावयाचा, नंतर थोडावेळ प्रपंचसंबंधीं व्यवहार पाहून पुराण सांगावयाचें, तें झाल्यावर सायंसंध्या आटोपून पुनः दोन तास अध्यापन चालावयाचें, रात्रीं नऊ वाजतां भोजन झालें कीं, पुनः अकरा वाजेपर्यंत दोन तास यजमानांच्या घरीं पुराण सांगावयाचें; असा त्यांचा रोजचा वर्तनक्रम होता. ह्या त्यांच्या व्यवस्थित वागणुकीमुळें लक्ष्मणभट्टजींच्याही नित्यक्रमांत अडथळा पोंचला नाहीं. वेंकटेशभट्टजींची पुराण सांगण्याची पद्धति इतकी कांहीं नामी व सरस होती कीं, त्यामुळें त्यांना दरदिवस चार ठिकाणीं पुराण सांगण्याचा प्रसंग पडे. त्यांच्या पुराणश्रवणास लहान मुलें जरी बसलेलीं असलीं तरी त्यांच्या वृत्ति अगदीं चित्राप्रमाणें तटस्थ होत असत. त्यांच्या मुखांतून श्लोक निघाला कीं, त्याचा भावार्थ श्रोत्यांच्या अंतःकरणावर उमटलाच, इतक्या शुद्ध व सरळरीतीनें ते श्लोक वाचीत असत. त्यांच्या नुसत्या पुराणश्रवणानें एखाद्या विद्या-र्थ्यास व्युत्पत्तिज्ञान देखील सहज व्हावयाचें. ह्या त्यांच्या अलौकिक गुणामुळें दक्षिण-कर्नाटकांत व साऱ्या महाराष्ट्रांत त्यांची बरीच वाहवा झाली होती. शके १८१९ मध्यें शहापुर येथें सार्वजनिक गणपतीच्या उत्सवांत पुण्याचे प्रसिद्ध सरदार नातू-साहेब यांना, व बेळगांवांतील कांहीं सभ्य मंडळींना पानसुपारीस आमंत्रण होतें. त्यावेळीं वेंकटेशभट्टजींचें पुराण ऐकून स्वतः सरदार नातूसाहेबांनीं त्यांची फार तारीफ केली. इतकेंच नाहीं तर त्यांनीं आणखी एक दोन ठिकाणीं पुराण सांगण्या-करितां मुद्दाम आपल्याबरोबर पानसुपारीस यांना नेलें होतें! इतकी ह्यांची वक्तृत्व-शैली मोहक होती. त्यांचेपाशीं कालेजांतील व हायस्कुलांतील इंग्रजी शिकणारी बरीच मंडळी संस्कृत शिकण्यासाठीं येत असे. असें हें विद्वान् पुत्ररत्न लक्ष्मण-भट्टजींच्या प्रारब्धभोगामुळें त्यांस फार काळ लाभलें नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट होय. असो.

माणसावर कितीही जरी संकटें आलीं तरी ती भोगण्यापलीकडे त्याच्या हातीं कांहीं नसतें. आलेलें संकट निमूटपणें सोसून त्यांतच कालक्रमणा करणें त्यास अवश्य पडतें. न होऊन संकटांकरितां कोणी आपला प्राण दिला असें उदाहरण केव्हांही घडलेलें नाहीं. तेव्हां लक्ष्मणभट्टजींचीही अशीच स्थिति होती. आणि त्याप्रमाणें ते ' आलिया भोगास सादर होऊन, देवावर भार घालून ' स्वस्थ होते; त्यातल्यात्यांत दुःखांत सुख एवढेंच कीं, बाळकृष्णभट्टजींस दोन पुत्र व वेंकटेश-भट्टजींस दोन पुत्र, अशीं त्यांना चार नातवंडें होतीं. यामुळें त्यांना थोडी विश्रांतीस जागा होती. तरी मानसिक व्यथेपुढें कोणाचाही इलाज नसतो; म्हटलेंच आहे कीं, " सजीवं दहते चिंता निर्जीवं दहते चिता " हीच अवस्था लक्ष्मणभट्टजींची झाली. आणि शेवटीं त्याच व्यथेनें झुरत झुरत शके १८२९ च्या आश्विन शुद्ध एकादशीस त्यांचा अंत झाला. वृद्धावस्थेमुळें अगदीं अखेरीस त्यांचें शरीर जरी परस्वाधीन झालें होतें तरी स्नानसंध्यादि आपल्या आन्हिककर्मात त्यांनीं मुळींच व्यत्यय येऊं दिला नाहीं. तें अखंड चाललेलेंच होतें; व त्याकामीं त्यांच्या बाळंभट्टजीं वगैरे नातवांनीही एकनिष्ठेनें त्यांची फार चांगली सेवा केली. हें त्यांस भूषणास्पद होय.

सारांश या जगामध्यें " **अनन्याश्चिंतयंतोमां येजनाः पर्युपासते** " इत्यादि भगद्वचनानुसार जर माणसांचें वर्तन घडलें तर सर्वतऱ्हेनीं त्याच्या योग-क्षेमाची जुबाबदारी भगवान स्वतः आपल्यावर घेत असतो आणि कितीही जरी दुःखें त्याजवर ओढवलीं तरी तीं सोसण्याची शक्ति देऊन त्याचा रोजचा वर्तनक्रम सुरळीत चालवितो. ही गोष्ट प्रस्तुत चरित्रनायकाच्या उदाहरणांनीं चांगली सिद्ध होते. दिवसेंदिवस अशारीतीचीं कर्तव्यतत्पर धर्मनिष्ठ माणसें आपल्या देशांत अधिका-धिक निपजावीं अशी त्या जगच्चालक प्रभूची प्रार्थना करून हें चरित्र संपवितों.

# वेदमूर्ति दशग्रंथी घनपाठी नारायण अप्पाभट्ट करनाटकी.

" विप्रो वृक्षस्तस्य मूलंच संध्या वेदाशाखा धर्मकर्माणि पत्रे ।
तस्मान्मूलं यत्नतो रक्षणीयः छिन्नेमूले नैव शाखा न पत्रम् ॥ "

जगामध्यें जितके म्हणून प्राणी आहेत त्या सर्वांत मनुष्यप्राण्याची योग्यता मोठी आहे; आणि त्या मनुष्यप्राण्यामध्यें ब्राम्हणाचें विशेष महत्व वर्णिलें आहे; पण हें महत्व ब्राम्हणांस एका विशिष्टप्रकारच्या कर्तव्यानें आलेलें आहे. जर ह्या कर्तव्यानें तो युक्त नसेल तर जगांतील इतर मनुष्यप्राण्यामध्येंच त्याचीही गणना होईल. अर्थात् इतर मनुष्यांपेक्षां आपली विशेष योग्यता राखण्यासाठीं ब्राम्हणांनीं वरील श्लोकांत निर्दिष्ट केल्याप्रमाणें त्यांचें जें मुख्य कर्तव्य तें चांगल्यारीतीनें पाळलें पाहिजे. तें कर्तव्य म्हणजे **" अहरहः संध्यामुपासीत् " " ब्राह्मणेन षडङ्गोवेदोऽध्येतव्यः "** इत्यादि श्रुति प्रतिपादित संध्यावंदन, षडंगवेदाध्ययन वगैरे होय. ब्राम्हणरूप वृक्षाचें संध्या हें **मूळ** होय. वेद हे त्या वृक्षाच्या **शाखा** आणि धर्मकर्में हीं त्याचीं **पानें** होत. अतएव प्रतिदिवशीं आचरणपूर्वक संध्यारूप मूळाचें चांगल्यारीतीनें संरक्षण केलें तरच पुढें ब्राम्हणरूप वृक्ष चांगला ,जोमावेल, आणि जर मूळाचाच उच्छेद केला म्हणजे संध्याच सोडली तर त्या वृक्षाला डाहळ्या, पानें वगैरे तरी कोठून फुटतील ! आणि अशी स्थिति झाली म्हणजे ब्राह्मणाची योग्यता तरी कशी राहील ? अशारीतीची आपली योग्यता कायम राखणारे ब्राम्हण सध्यांच्या मन्वंतरांत कितीसे निघतील हें शोधून पाहण्याचें काम आम्हीं वाचकांवरच सोंपवितों; आणि तशाप्रकारच्या अपूर्व योग्यतेनें विशिष्ट अशा ज्या कांहीं व्यक्ति आपल्या महाराष्ट्रीय सारस्वतब्राम्हणसमाजांत होऊन गेल्या त्यांमध्येंच प्रस्तुत चरित्र-नायकाचीही गणना आहे. अतएव त्यांचें अल्पसें चरित्र येथें देतों.

वस्तुतः नारायणभटजी हे **" परोपदेशे पांडित्य "** करणारांपैकींच नव्हते; तर केवळ आपला धर्म म्हणून व आपलें पवित्र कर्तव्य समजून निरंतर वेदवेदाङ्ग-पठणात त्यांनीं आपला कालक्षेप केलेला होता, मग त्यांचें चरित्र अथवा माहिती लिहिणार तरी काय ? कारण ते कोणी मोठे श्रीमंत किंवा जहागिरदार नव्हते; अथवा इंग्रजी शिकून मोठे कामगार झालेले नव्हते. तसें कांहीं असतें तर त्यांच्या जन्मशकापासून तों तहत निधनकालापर्यंत " त्यांची मुंज अमुक सालीं झाली;



घनपाठी दशग्रंथी नारायण अप्पाभट्ट कर्नाटकी.

अमुक वर्षी अमक्या शाळेंत त्यांची अमुक परीक्षा उतरली ! " वगैरे वगैरे बरेंचसें लिहितां आलें असतें; परंतु नारायणभट्टजींसंबंधानें तसें कांहीं लिहितां येण्यासारखें नाहीं. त्यांच्या चरित्रक्रमांतील रहस्य काय होतें हें सामान्य वाचकांस पुढील हकीकतीवरून सहज कळून येणार आहे.

बेळगांवनजीक शहापूर येथें जेव्हां सारस्वत ब्राम्हणांची वस्ति विशेष वाढली तेव्हां त्यांनां हव्यकव्यादि धार्मिककृत्यें करणाऱ्या स्वकीय भिक्षुक समुदायाचीही जास्त गरज वाटूं लागली व हें अगदीं साहजिक आहे. कारण, त्यावेळीं तेथील बहुतेक लोकांची देव, ब्राम्हणांवर चांगली श्रद्धा असे; आणि बहुधा जुन्याकाळीं तेथील लोकस्थितीचें मान कांहीं निराळेंच होतें म्हटलें तरी चालेल. इतकेंच नाहीं तर देव, ब्राम्हण, दान, धर्म वगैरे धार्मिकबाबतींत शहापुरचा लौकिक बराच दूरवर गेलेला होता. पण त्याकाळच्या स्थितींत व सध्यांच्या स्थितींत आतां जमीनअस्मानाचें अंतर पडलेलें आहे. असें म्हणण्याचा प्रसंग दुर्दैवानें प्राप्त झाला आहे. असो.

तेव्हां अशा त्यावेळच्या प्रशंसनीय स्थितींत नारायणभट्टजींचे " सांतभट्टजी " नामक कोणी पूर्वज कर्नाटकांतून तीर्थयात्रेच्या निमित्तानें शहापुरास पोंचले होते. तेव्हां शहापुरकरांनीं त्यांना आश्रय देऊन तेथेंच ठेऊन घेतलें आणि कांहीं वृत्ति लावून दिली. त्या सांतभट्टजीपासून प्रस्तुत चरित्रनायक हे सहावे पुरुष होत. त्यावरून त्यांचें वास्तव्य शहापुरांत बरेच दिवसांपासून होतें हें उघड आहे. ते मूळ कर्नाटकांतले राहणारे असल्यामुळें पुढें शहापुरास आल्यावर त्यांना " कर्नाटकी " हें उपनांव मिळालें असावें. माणसाचें काय अथवा कुणाचें काय, जिकडे ज्याला सुदैवानें अनुकूलस्थिति प्राप्त होते तिकडेच त्याला समाधान वाटत असतें. मग तो कोणच्याही देशांतला राहणारा असला तरी त्याला आपल्या जन्मभूमीची आठवणसुद्धां होणार नाहीं. या गोष्टीचा प्रत्यक्ष दाखला म्हणजे ह्याच " कर्नाटकी " घराण्यांचा होय. आज त्यांना आपला मूळदेश सोडून जवळ जवळ दोनशें वर्षांवर झालीं असतील. आतां त्यांना शहापुर हाच मूळदेश झाला आहे. असो.

याच प्रसिद्ध " कर्नाटकी " घराण्यांत शके १७५८ सालीं नारायणभट्टजींचें जन्म झालें. त्यांच्या वडिलांचें नांव अप्पाभट्ट, त्यांची मुख्य वृत्ति म्हणजे वैदिकीची होय. पण दिवसेंदिवस ह्या वेदविद्येसंबंधानें लोकांत अधिकाधिक अनास्था माजूं लागल्यामुळें ती विद्या शिकणारे व शिकविणारे बरेच दुर्मीळ होऊं लागले आहेत. यामुळें वैदिकांचीही बरीच कमतरता भासत आहे.

नारायणभट्टजी बालवयांत होते त्या सुमारास शहापुरांत एक देखील वैदीक वेद पढविणारा राहिला नव्हता. अशी अनिष्टस्थिति जेव्हां तेथील कांहीं सुशील, सभ्य व श्रीमंत गृहस्थांच्या लक्ष्यांत आली तेव्हां वेदविद्येंत कांहीं मुलें तयार केल्यावांचून आपला निभाव लागावयाचा नाहीं असें त्यांना वाटलें, आणि कोणीतरी एक वैदीक दुसऱ्या गांवांहून शोध करून आणावा असें ठरलें. हा त्यांचा बेत होतो न होतो इतक्यांत वेंगुर्ल्याकडील वे. रा. लक्ष्मणभट्ट हळबे नामक एक उत्तम दशग्रंथी वैदीक ब्राम्हण देशसंचारार्थ शहापुरास येऊन पोहोंचले. त्यांस मंडळींनीं तेथें ठेवून घेतलें. यामुळें अप्पाभट्टजांचीही आतां आपल्या मुलांचें शिक्षण कोठें व कसें होईल याबद्दलची काळजी दूर झाली व त्यांनीं आपले धाकटे चिरंजीव कृष्णभट्टजी आणि चरित्रनायक नारायणभट्टजी अशा आपल्या दोघां मुलांना योग्यकालीं गायत्रीमंत्राचा उपदेश देऊन वेदाध्ययनाकरितां सदर्हू लक्ष्मणभट्टजींच्या स्वाधीन केलें. तेव्हां गांवांतील इतर वैदिकांचींही मुलें त्यांजकडे शिकण्यास येत असत. त्यांत विठ्ठलभट्टजी कामत, वामनभट्टजी करनाटकी प्रभृतिमंडळीही होती. नारायणभट्टजी जात्या चलाख बुद्धीचे होते. इतरांनीं संहितेचा अध्याय सोळा अगर वीस संथांनीं पाठ ह्मणावा तर हे अवघ्या दहा बारा संथांत तो पाठ म्हणत! यामुळें गुरुजींचीही त्यांजवर बहालमर्जी असे. त्यांचा रोजचा अध्ययनाचा क्रम म्हटला म्हणजे प्रातःकालीं स्नानसंध्योत्तर सूर्यास द्वादशनमस्कार घालून पठणास आरंभ व्हावयाचा तों अकरा वाजेपर्यंत; पुनः माध्यान्हसंध्या, ब्रम्हयज्ञ वगैरे आटोपून भोजन करावयाचें; भोजन झालें कीं, पुनः अध्ययनास आरंभ! नंतर मध्यंतरीं प्रदोषकालाची अडचण संपल्यावर सायंसंध्या झाली कीं, पुनः रात्रीं नऊ वाजेपर्यंत अध्ययन चालावयाचें. मग भोजनोत्तर दहाच्या सुमारास निजले कीं, परत तिहींच्या ठोक्याबरोबर उठावयाचें! असा त्यांचा नित्यक्रम अव्याहत चालला होता. अष्टौप्रहर त्यांच्या मुखांतून सारखें पठण चालत असे; आणि वेदग्रंथांचें अध्ययन म्हणजे जर तें मुखपाठ असेल तरच त्याचा उपयोग होतो; म्हणून अधीतग्रंथांची नेहमीं आवृत्ति ठेवावी लागते. प्राचीनकालीं ब्राम्हणांना चरितार्थाची किंवा कुटुंबपोषणाची दगदग नसे. त्यांचा सर्व भार दुसऱ्यांवर असे. यामुळें फक्त त्यांनीं निरंतर आपला काल अध्ययनाध्यापनांत घालवून आपला प्रतिपाल करणारे जे असतील त्यांचें सदैव कल्याण चिंतीत असावें. यापेक्षां ब्राम्हणांकडे दुसरीं कोणतींहीं जबाबदारीचीं कामें सोंपविण्यांत येत नसत. किंबहुना हीच स्थिति नारायणभट्टजींच्या कालापर्यंत निदान शहापुरापुरती होती

असें म्हणण्यास हरकत नाहीं; आणि म्हणूनच त्यांना आपलें सारें आयुष्य वेदाध्ययनांत घालविण्याची सुसंधि मिळाली. नारायणभट्टजींची शरीरप्रकृति सदृढ व निकोप होती. निरंतर वेदाध्ययनानें बरेचसे कष्ट जरी त्यांना सोसावे लागले तरी त्यांजपासून त्यांच्या प्रकृतींत मुळींच फरक झाला नाहीं. बरोबरच आहे शरीरपोषणार्थ खाल्लेल्या अन्नाचें चांगल्यारीतीनें पचन झालें म्हणजे शारीरिक गुणधर्म उत्तम चालतात व त्याच्याचसाठीं तालीम, व्यायाम वगैरे बाह्यसाधनें कल्पिलेलीं आहेत; पण नारायणभट्टजींना मात्र ह्या बाह्यसाधनांची मुळींच गरज पडली नाहीं. त्यांचा मुख्य व्यायाम अध्ययनाशिवाय दुसरा नव्हता. त्यामुळें त्यांचे शरीरधर्म सुरळीतरीतीनें चालण्यास कोणतीच अडचण पडत नसे. म्हटलेंच आहे कीं, “ **कुक्षौतिष्ठतियस्यान्नं वेदाभ्यासेन जीर्यते** ”. इतकेंच नाहीं तर त्यांची अंगकांति इतकी कांहीं सतेज होती कीं, त्यांना पाहिलें म्हणजे साक्षात् वेदमूर्तीचाच अवतार ह्या मर्त्यभूतलावर अवतीर्ण झाल्याचा भास झाल्याशिवाय रहात नसे व यामध्यें मोठेंसें नवलही नाहीं; कारण, शिवगीतेमध्यें शंकरांनीं “ **यस्यास्त्यध्ययनं नित्यं समेभक्तः समे प्रियः** ” असें स्पष्ट म्हटलें आहे; तेव्हां यापेक्षां आणखी नारायणभट्टजींची विशेष योग्यता ती काय वर्णावयाची ? असो.

त्यांचें वेदवेदाङ्गादि दशग्रंथाचें घनापर्यंत पूर्ण अध्ययन झाल्यावर ते महायात्रेस जाण्यास निघाले. बरोबर कांहीं सहाध्यायी वगैरे मंडळीही होती. त्यावेळीं पुण्यापर्यंत गाडी वगैरे प्रवासाचीं साधनें उपलब्ध नसल्यामुळें एका गांवांहून दुसऱ्या गांवांस, दुसऱ्याहून तिसऱ्यास, अशारीतीनें मजल दरमजल करीत सर्व मंडळीसह ते शके १७९१ मध्यें पुण्यास पोंचले. तेथें विद्वान्मंडळींनीं त्यांचा चांगला आदरसत्कार करून त्यांस खालीं लिहिल्याप्रमाणें संमतिपत्र दिलें:—

## पुणेकर मंडळींचें पत्र.

“ वेदमूर्ति राजश्री नारायणभट्टजी उपनांव करनाटकी राहणार शहापुर बेळगांव हे पुणे मुक्कामीं आले, त्यासमयीं विसोबाअण्णा राजाध्यक्ष यांचे घरीं माडीवर वेदघोष म्हणण्याची जागा आहे. तेथें वेदमूर्ति राजश्री विनायकभट्टजी-रायकरप्रभृतिमंडळीबरोबर सुमारें वीस दिवसपावेतों ४ अष्टक क्रमाचे होत तोंपर्यंत म्हणत होते. असे हे चांगले पट्टीचे विद्वान् आहेत असें समजून आम्ही सर्व मंडळींनी रा. विसोबाअण्णा राजाध्यक्ष व विनायक बापूजी भांडारकर व शंकर पांडुरंग पंडित वगैरे यांस सांगून तुमचे ज्ञातीचे भट्टजी

विद्वान् पद्वीचे आहेत, तर यांची संभावना चांगलेप्रकारें करावी असें सांगि-
तल्यावरून त्यांणीं त्यांस शालजोडी दिली. मित्ति श्रावण शु० १३ दशी
शुक्रवार शके १७९१ शुक्लनाम संवत्सरे."

या पत्रावर पुणेकरशिष्ट व पंडितमंडळींच्या २७ सह्या आहेत. पुण्याहून पुढें श्रीकाशीक्षेत्रास पोहोंचेपर्यंत मध्यंतरीं मुंबई, नाशीक, हरदा वगैरे ठिकाणीं त्यांचा चांगला गौरव झाला. काशीस गेल्यावर तेथें एक चातुर्मास राहून परत शहापुरास आले. घरीं कांहीं दिवस राहिल्यावर पुनः ते रामेश्वरची यात्रा करण्याकरितां शके १७९५ मध्यें निघाले. त्यावेळींही त्यांचेबरोबर धाकटे बंधू कृष्णभटजी वगैरे चार असामी होते. सुखरूपपणें रामेश्वरची यात्रा करून परत येतांना श्रीपद्म-नाभाच्या दर्शनाकरितां ते सर्व मंडळींसह अनंतशयनास राहिले. प्राचीनकालीं वेद-शास्त्र ही श्रेष्ठप्रतीची विद्या गणली जात असे, आणि ती विद्या ज्यांनीं संपादन केली त्यांचा मानमरातबही राजेरजवाड्यांकडून चांगल्यारीतीनें होई हें इतिहासावरून उघड दिसतें. अलीकडे ती प्राचीनस्थिति जरी नामशेष होण्याच्या बेतांत आली आहे तरी कांहीं कांहीं ठिकाणीं राजेरजवाड्यांतून तिचा थोडासा अवशेष भाग राहिला आहे असें उघड दिसतें. आतां ही स्थिति केवळ पूर्वापार चालत आलेली वहिवाट म्हणून टिकलेली असो, किंवा स्वतःच्या मोठेपणासाठीं म्हणून असो; परंतु ती त्या विद्येच्या उन्नतिविषयक उदात्त हेतुनें खास नव्हे असें वस्तुस्थितीवरून म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. या विधानास कांहीं अपवाद असेल. नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं आणि त्यापैकींच अनंतशयनचा राजा हाही एक अपवाद होता; म्हणूनच त्यावेळीं गादीवर असलेल्या रामवर्मा राजानें विद्वत्सभा भरवून त्याठिकाणीं नारायणभटजी वगैरे चौघांही वैदिकांची परीक्षा घेतली आणि त्या परीक्षेंत हे उत्तम-रीतीनें उत्तीर्ण झाल्यामुळें त्यांना सन्मानपूर्वक एकेक सुवर्णालंकार देऊन त्यांच्या विद्वत्तेचा गौरव केला. नंतर ते तिकडून कोचीस आले.

कोची हें एक लहानसें संस्थान असून तेथें गौडसारस्वत ब्राम्हणज्ञातीचा बराच मोठा समुदाय आहे. ही सारी मंडळी सोळाव्या शतकांत गोमांतकांत फिरंगीलोकांनीं जो असह्य धर्मछल मांडला होता त्यास कंटाळून आत्मरक्षणार्थ व विशेषतः धर्म-रक्षणार्थ जी निघाली ती जिकडे सोय मिळाली तेथें आपली कायम वस्ति करून राहिली. ह्याकारणानें मलबारांत कोची, अल्लपी, कालिकट वगैरे ठिकाणीं ह्यांचा बराच मोठा विस्तार झाला आहे. तत्पूर्वी मलबारप्रांतांत नायर वगैरे मल्याळी

लोकांशिवाय इतर जातीचा भरणा कमी होता. हल्लीं जरी तेथें आमच्या इकडील बरीच मंडळी आहे तरी त्यांचे आचारविचार बहुतेक त्या देशास अनुसरून मल्याळी तऱ्हेचे झालेले आहेत. तेथील गौडसारस्वत ब्राम्हणांपैकीं अथवा दुसऱ्या ब्राम्हण-जातींपैकीं कोणी एकादा अपरिचित इसम आपल्याइकडे आल्यास एकंदर पेहेरावा-वरून व आचारावरून त्याच्या ज्ञातीबद्दल आपल्यास शंका आल्यावांचून मुळींच राहणार नाहीं. विशेषतः तिकडे प्रापंचिक गरजा अगदीं सोयीच्या असल्यामुळें संपत्तिमान् असे लोक बरेच आहेत; परंतु शिक्षणाच्या अभावामुळें त्या संपत्तीचा व्हावा तसा योग्य उपयोग त्यांच्या हातून होत नाहीं याबद्दल वाईट वाटतें. तिक-डील लोकांची देवादिकांवर विशेष श्रद्धा असल्यामुळें मोठमोठीं देवालयें बांधणें, व देवाला अनेकप्रकारचे अलंकार करणें व त्याचा उत्सव करणें इत्यादि दैविक बाबीं-कडेच पुष्कळ पैसा खर्च होत असतो. खुद्द कोचीमध्यें व आसमंतात्भागांत आपल्या गौडसारस्वत ब्राह्मणज्ञातींचीं जीं मोठमोठीं देवस्थानें आहेत तीं साधारणतः लहान-लहानशीं संस्थानेंच आहेत असें म्हटलें तरी चालेल. फक्त एका कोची देवस्थानचेंच सालिना एक लक्ष चौतीस हजार रुपये स्थावर उत्पन्न असून कोट्यावधी रुपयांचें जडजवाहीर आहे. नुसती देवालयांत ४००० रुपये किंमतीची एक घंटा आहे. त्या प्रांतांतील बहुतेक स्वकीयलोक वैष्णवसंप्रदायी असल्यामुळें त्यांनीं बांधलेल्या सर्व देवालयांमधून त्यांच्या आराध्यदेवतेची–विष्णूचीच स्थापना केलेली आढळून येते. त्यांपैकीं कोची येथें श्रीबालाजी उर्फ तिरुमल् ( वेंकटेश ) देवस्थान आहे. या देवस्थानांत प्रतिदिवशीं सहस्र ब्राम्हणभोजन चालतें. हल्लीं या देवस्थानांतून एक शिक्षणसंस्था स्थापन करण्यांत आली असून सुमारें सातशें विद्यार्थी शिकत आहेत. एकंदरींत देवस्थानच्या पैशाचा योग्य कार्याकडे उपयोग करण्याची सुबुद्धि देवस्थानच्या अधिकारी मंडळीस झाली ही समाधानाची गोष्ट होय. हीच त्यांची बुद्धि कायम राहो अशी आमची देवापाशीं प्रार्थना आहे. असो.

अशा ह्या प्रसिद्ध देवस्थानांची कीर्ति ऐकून नारायणभट्टजी वगैरे मंडळी कोचीस आली. त्यावेळीं तेथें श्रीकाशीमठाधिपति **श्रीमद्भुवनेंद्रतीर्थ** स्वामींची स्वारी होती. हे पूज्य यतिवर्य फारच मोठ्या योग्यतेचे तपोनिष्ठ होऊन गेले हें प्रसिद्धच आहे.

---

१ ह्या देवस्थानचा अत्यंत मनोहर व वाचनीय इतिहास आम्हीं मुद्दाम तेथपर्यंत जाऊन माहिती मिळवून लिहिला आहे; लौकरच प्रसिद्ध होईल.

दक्षिणकानडा, मलबार वगैरे प्रांतांत गौडसारस्वत ज्ञातींतील वैष्णवसंप्रदायी जी मंडळी आहे तिची याच मठाच्या शिष्यांत गणना असून मंत्रमुद्राधारणादिकांचा सर्व अधिकार या ( काशीमठ ) संस्थानाकडे आहे. असो. नारायणभट्टजींनां या यतिसंदर्शनाचा लाभ होतांच अत्यंत संतोष वाटला तें योग्यच झालें. देवदर्शन व पूज्यपादांची भेट झाल्यावर थोडे दिवस तेथें राहण्याविषयीं श्रींचा आग्रह पडला. त्यामुळें त्यांना तेथून लौकर निघतां आलें नाहीं. पुढें कांहीं दिवस तेथें राहिल्यावर संस्थानांतून नारायणभट्टजींची परीक्षा घेण्यांत आली व स्वामीमहाराजांनीं एक रत्न-हार देऊन त्यांना **घनपाठी दशग्रंथी** अशी पदवी दिली व एक मानपत्रही दिलें:-

श्रीरामचंद्राय नमः

शिक्का.

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य कुलतिलकयमाद्यष्टांगयोगसंपन्न पदवाक्यप्रमाण पारावार पारंगत सर्वतंत्र स्वतंत्र श्रीमद्वैष्णव सिद्धांत प्रतिष्ठापनाचार्य श्रीमद्या-सरघुपतिदेव दिव्य श्रीपादपद्माराधक श्रीमद्विबुधेंद्रतीर्थ श्रीपादकरकमलसंजात श्रीमत्सुमतींद्रतीर्थ श्रीपादवरकुमारक श्रीमद्भुवनेंद्रतीर्थ श्रीपाद यांनीं

अस्मच्छ्रीपाद परमप्रिय शिष्य वत्सगोत्र ऋग्वेदाश्वलायनसूत्र शाकल शाखाध्यायी नारायण अप्पाभट्ट करनाटकी वास्तव्य बेळगांव नजीक शहापूर. श्रीमन्नारायण स्मरणपूर्वक लिहून दिलें परीक्षापत्र शके १७९५ श्रीमुख संवत्सरे आश्विन वद्य ७ मी दिवशीं तुम्हीं श्रीक्षेत्र रामेश्वर सेतू यात्रा करून येथें श्रीसंस्थानांत श्रीव्यासरघुपतीचें संदर्शनास पोंचलें आहां. तुमचे विद्येची परीक्षा घेतली ती चांगली जाहली आहे. तुम्हीं सर्वानुक्रम सहीत ऋग्वेदसंहिता व त्याचीं पदें, क्रम, जटा, घन वगैरे व ब्राम्हणपंचिका, गृह्यसूत्र, परिशिष्ट, वेदाची षडंगे, निघंट वगैरे यांत चांगला श्रमकरून पाठ केला आहे आणि ब्राम्हण संस्कारादुपयुक्त सकल याज्ञिकादि प्रयोगनिर्णय वगैरे या ग्रंथांतही चांगला परिश्रम केला आहे व तुमचें स्मार्ताग्निपंचयज्ञ वगैरे नित्या-

न्हिक चांगलें आहे. याकरितां एतावत्कालपर्यंत आमचे नजरेस पडलेल्या अस्मच्छिष्यवैदिक मंडळीमध्यें तुम्हीं वेदादिविद्येविषयीं श्रेष्ठ आहांत असें आम्हीं निर्णय करून तुम्हांला **घनपाठी दशग्रंथी** नारायणभट्ट असें नाम देऊन श्रीव्यासरघुपतीचें प्रसादरूप माणिक्यरत्नाचें कंठभूषण वगैरे देऊन यथोचित मान्य केलें आहे. याकरितां सकलसूज्ञ ब्रम्हवृंद तुम्हांकडून वेदपारायण करवून यथोचित बहुमान दक्षिणा वगैरे देऊन संतोष करितील असा आम्हीं निश्चय करून हें परीक्षापत्र तुम्हांला दिलें आहे. आतां संस्थानांतून तुम्हांला अशी आज्ञा आहे कीं, तुम्हीं आणखी विशेष अध्ययन करून परीक्षा देऊन यापेक्षां अधिक सन्मानभूषण वगैरे घ्यावें. इति नारायणस्मरणानि "

मोर्तब.

अशारीतीनें काशीमठसंस्थानांत झालेला नारायणभट्टजींचा गौरव सर्वठिकाणीं प्रसिद्ध व्हावा आणि त्यांची योग्यता कळावी म्हणून पूज्यपाद श्रीभुवनेंद्रस्वामीनीं "इंदुप्रकाश व दक्षिणकानडा गव्हर्मेंट ग्याझिट" मध्यें इ० स० १८७३ सप्टेंबर ४ तारखेस आपल्या समस्त शिष्यवर्गाला श्रुत होण्यासाठीं अनुक्रमें मराठी व कानडी भाषेंत एक आज्ञारायस प्रसिद्ध केला. त्यांतील आशय असा कीं, "बेळगांवनजीक शहापूर येथें राहणारे......नारायण अप्पाभट्ट करनाटकी, त्यांचे बंधू कृष्णभट्ट व वामन माधवभट्ट करनाटकी आणि त्यांचे बंधू गोविंदभट्ट असे हे चौघे वैदिक श्रीरामेश्वरसेतुयात्रा करून येथें ( कोची-गोश्रीपुरांत ) संदर्शनास आले. नंतर त्यांणीं प्रकृतिविकृतिसहित दशग्रंथ ऋग्वेद आदिकरून विद्येची परीक्षा दिली. ती उत्तमरीतीनें झाली. त्याकारणानें त्या चौघांसी विद्येच्या योग्यतेनुरूप परीक्षापत्रासहित विशेष नामाभिधान व श्रीव्यासरघुपतीच्या प्रसादरूप माणिक्यरत्नांचीं कंठभूषणें वगैरे देऊन संस्थानांतून सन्मान केला. याचप्रमाणें श्रीअनंतशयन क्षेत्रास श्रीपद्मनाभसंदर्शनार्थ गेले; तेथें रामवर्ममहाराजानें विद्वत्सभा करून या वैदिकांची परीक्षा घेतली तीही उत्तमरीतीची झाली; याकारणानें चौघांचे हातांत सन्मानपूर्वक सुवर्णाचा एक एक तोडा घातला. त्याचप्रमाणें दुसरे राजांनीं देखील सन्मान केला. हें वर्तमान सर्वांनीं समजून हे वैदिक जिकडे जातील तेथें त्यांचा आपापल्या शक्ती-

नुसार सन्मान करावा. याप्रमाणें संस्थानांतून आज्ञा दिली आहे." तदनुसार नारायणभट्टजी प्रभृतिमंडळींचा त्या प्रांतांत चांगला सन्मान झाला. आतां हे स्वज्ञातीचे म्हणून केवळ ज्ञातींकडूनच त्यांचा गौरव झाला असें नाहीं; तर परशाखेंतील उडपीअष्टमठाधिकाऱ्यांपैकीं प्रसिद्ध फलमारमठ, अदमारमठ, बाकूरभांडारकेरीमठ याठिकाणच्या विद्वान् स्वामींनींही यांचा सत्कार करून योग्यतेबद्दल रायसपत्रें दिलीं आहेत. हे तिन्ही रायस कानडीभाषेंत आहेत त्यांपैकीं एकाचाच येथें उल्लेख केला आहे:—

श्रीमदुडपी
फलमारमठद
श्रीरामदेवर
मुद्रा.

"श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यवर्यत्वाद्यनेकगुणसंपन्न पदवाक्यप्रमाण पारावार पारंगत सर्वतंत्र स्वतंत्रयमनियमासन प्राणायाम प्रत्याहारध्यानधारणासमाद्यष्टांङ्गयोगनिरत सकलसुरमुनि निकरमणिमयमुकुटप्रभापुंजरंजित श्रीमद्रजतपीठपुर दिव्यभैष्मिकारंभोरुह संसेवित श्रीकृष्णपादपद्माराधकअष्टमोत्तराशाधिपतिषु प्रथमोत्तराशाधिपातिगळाद श्रीमदानंदतीर्थाचार्यमतधारक श्रीमत्हृषीकेशतीर्थाचार्यरसुखसंप्रदायप्रवर्तक श्रीमदुडुपिन फलमारमठद श्रीमद्रघुवीरतीर्थ श्रीपादंगळवर वरकुमारक श्रीमद्रघुभूषणतीर्थ श्रीपादंगळवर करकमलसंजातराद श्रीमद्रघुरत्न तीर्थ पादंगळवरु.

नमगे परमप्रियराग वत्ससगोत्र ऋग्वेदआश्वलायनसूत्र शाकल शाखाध्यायी बेळगांव शहापूरदल्लिरुव सासष्टि अंत्रोजी कोंकणदेशीय गौडसारस्वत ब्राम्हण करनाटकी अप्पाभट्टर मक्कळु घनपाठी दशग्रंथी वैदिक नारायणभट्टरु, इवरतंम कृष्णभट्टरु; इवरचिक्कतंदे माधवभट्टर मक्कळु वामनभट्टरु, इवर तंम गोविंदभट्टरु; यी नाल्कु जनरीगे नारायण स्मरणपूर्वक बरसिकोट्ट परीक्षापत्र शके १७९५ ने श्रीमुख संवत्सर माघ शुक्र १ चंद्रवार दिवसदवरेमे नांवु श्रीरजतपीठदल्लि ( उडुपी ) श्रीरामकृष्ण देवरसंन्निधियल्लु पर्यायहोंनदिद्दवरागि जपतपस्वाश्रमोपयुक्तानुष्ठान प्रवचनादि माडुता क्षेमदल्ल इद्देवे निंमक्षेयसमाचारके संस्थानद मेले साभिमान इट्ट पदेपदे बरसिकळहिसुता इरुवदु.

सांप्रत नीवु इदे पुष्य बहुळ १३ शुक्रवार दारभ्य ईवरेगे श्रीरामकृष्ण देवरसंनिधि-यल्लि निरंतर ऋग्वेदपदादि पारायण माडिदु श्रीदेवरीगे प्रीतियागि नमगु बहाळ संतोषवादिंदा निमगे ईसंस्थानदिंदा यीपरीक्षापत्रपूर्वकवागि नावू यथोचित सन्मान-माडि श्रीरामकृष्णदेवर श्रीमुडि गंधप्रसाद फलमंत्राक्षते सहित कोट्टु निमंकुल अभि-वृद्धि आगलेंदु इच्छिसि इदेरीति सर्वरु सन्मानपूर्वक वागि नडशारुयंता नावु तिळ-कोळुत्येवे."

(याखालीं तुळुव अक्षरांची श्रीस्वामींची खुद्द सही आहे.)

माणसाची योग्यता त्याच्या जातीवर अवलंबून नसते तर त्याची योग्यता वाढ-ण्यास केवळ विद्वत्त्व कारण आहे. '**विद्वान् सर्वत्र पूज्यते**' अशी प्रसिद्ध म्हणच आहे. तेव्हां नारायणभट्टजींची योग्यता वाढण्यास त्यांच्या आंगची जाडी विद्वत्ताच कारण झाली यांत शंका नाहीं. असो.

पुढें आठ दहा वर्षांनीं श्रीमत्पूज्यपाद भुवनेंद्रतीर्थ स्वामींची स्वारी काशीयात्रेस जाण्यास निघाली. त्यावेळीं श्रीनीं नारायणभट्टजींस बरोबर घेतलें होतें. काशीस पोंचल्या वर श्रीस्वामीनीं तेथील पंडित विद्वान् मंडळींची सभा भरवून त्यांचा नारायणभट्टजीशीं प्रसंग करविला. त्या प्रसंगामध्यें त्यांची अपूर्व विद्वत्ता जाणून त्या सभेंतील मोठ-मोठ्या पंडितमंडळींनीं एक संमतिपत्र दिलें. तें असें:—

"श्रीमत्परमहंस कोंकणदेशिय गौडसारस्वतब्राम्हण यांचे गुरु श्रीमद्भुवनेंद्रतीर्थस्वामी, हे श्री काशीयात्रेस येऊन श्रीकाशीविश्वनाथादि दर्शन करून वैदीक व विद्वान् मंडळींच्या वसंतपूजा जागरण केलें. त्या वसंतपूजेमध्यें श्रीस्वामीचे शिष्य वे० रा० रा० अप्पाभट्टात्मज नारायणभट्ट करनाटकी यांचा व आमचा प्रसंग झाला. या योगानें हे भट्टजी वेदविद्येमध्यें व स्मार्तकर्मादि विद्येमध्यें बहुत चांगले आहेत; तर असें समजून आम्हीं सर्व मंडळींनीं हें पत्र दिलें आहे. मशारनिल्हे भट्टजींचे ज्ञातिबंधु वे० रा० रा० वामनभट्टजी करनाटकी हेही वेदविद्येमध्यें चांगले आहेत. विक्रमसंवत् १९३९ जयसंवत्सर तथा शालिवाहन शके १८०४ चित्रभानुसंवत्सर आश्विन शु॥ २ या."

या पत्रावर काशींतील चांगल्या नामांकित अशा ३० विद्वान् पंडितांच्या सह्या असून अस्सलपत्र हल्लीं नारायणभट्टजींचे चिरंजीवांपाशीं आहे.

यापुढें काशीहून आल्यावर अखेरपर्यंत ते घरींच राहिले. मध्यंतरीं त्यांच्या मनां-तून वेदविद्येचें आपल्या पश्चात् कांहींतरी स्मारक रहावें म्हणून आपल्याप्रमाणेंच

त्या विद्येत कांहीं विद्यार्थी तयार करावे, आणि त्यासाठीं एक वेदपाठशाळा ठेवावी असा फार हेतु होता व त्याप्रमाणें गोकर्णमठामध्यें त्यांनीं कांहीं दिवस शाळेचा उपक्रमही केला होता; पण फिरलेल्या परिस्थितीमुळें त्यांचा तो स्तुत्य हेतु सिद्धीस गेला नाहीं. प्राचीनकालीं ब्राम्हण म्हटले ह्मणजे ते वेदाध्ययन केल्याशिवाय राहत नसत; परंतु कालगतीनें ही पद्धति नष्टप्राय होत आली आहे. आर्यकुलोत्पन्न राजांचें राज्य नष्ट झाल्यानंतर हिंदुस्थानांत जेव्हां मुसलमान लोकांनीं हुतुतु घातला तेव्हां वेदाध्ययनाचा हळूहळू ऱ्हास होऊं लागला; परंतु, मराठ्यांच्या अमदानींत पेशव्यांकडे राज्याचें सुकाणूं आल्यापासून वेदाध्ययनाला विशेष उत्तेजन मिळत गेलें; आणि मुंज झाल्यानंतर संपूर्ण एक शाखा अथवा अल्पस्वल्प तरी वेदाध्ययन करण्याचा प्रघात सुरू झाला; परंतु, भिक्षुक आणि गृहस्थ असे ब्राम्हणांत दोन भेद तेव्हांपासून विशेष व्यक्त होऊं लागले; तथापि गृहस्थ ह्मणविणारा जातीचा ब्राम्हण असल्यास त्रिसुपर्ण, रुद्र, पुरुषसूक्त इत्यादि वेदभागाचें अध्ययन त्यानें केलेलें असावयाचेंच असा नियम होता व ही पद्धति महाराष्ट्रांत इंग्रजी अम्मल सुरू झाल्यावरही कांहीं वर्षे कायम होती. अद्यापि देखील हा प्रकार जुन्या सुशिक्षित मंडळींत दिसून येतो; पण अलीकडच्या पिढीनें ह्या पद्धतीस अजीबात फांटा दिल्यामुळें वेदाध्ययन बंद पडलें. निदान शाखा संपूर्ण झाल्याशिवाय मराठ्यांच्या अमदानींत ब्राम्हणांला कोणी भिक्षुक म्हणत नसत; परंतु अलीकडे या भिक्षुकांतही वैदिक, याज्ञिक इत्यादि भेद झाल्यामुळें याज्ञिक या सदराखाली गणले जाणारे भिक्षुक आपल्या शाखेचें संपूर्ण अध्ययन करण्याची जरूर बाळगीनातसे झाले. तेव्हा भिक्षुक म्हणविणाऱ्यांचीच अशी स्थिति झाल्यामुळें वर लिहिल्याप्रमाणें गृहस्थ म्हणविणाऱ्या लोकाना रुद्र, त्रिसुपर्ण इत्यादिकांची आवश्यकता राहिली नाही हें उघडच आहे. प्रसिद्ध मुत्सद्दी रामचंद्रबाबा, बक्षीबहाद्दर जिवबादादा, नानाफडणवीस वगैरे मंडळी अष्टौप्रहर राजकार्यांत गढलेली होती, परंतु, स्वतः रुद्रावर्तन ह्मणून ते प्रत्यहीं देवपूजा करीत असत. सांप्रत देवपूजा करणाऱ्याला ‘घांटबडव्या’ हें निंदाव्यंजक नांव प्राप्त झालेलें आहे; आणि मोठ्या कष्टानें वेदाध्ययन करून मिळणारी जी भट ही संज्ञा ती तर गृहस्थ म्हणविणाऱ्या बऱ्याच लोकांच्या उपहासास पात्र झाली आहे; आणि ब्राह्मण ही संज्ञा देखील देशांतील कांहीं भागांत अलीकडे पाकसिद्धि वगैरे गृहकार्य करणारा अशा अर्थाची निंदाव्यंजक झालेली आहे. सारांश, ब्राह्मण ही संज्ञाच जर सांप्रत मनुष्याची अब्रू घालविणारी झाली आहे तर ब्राम्हण ह्या संज्ञेस अवश्य अस-

णारें वेदाध्ययन अथवा रुद्र, पूजा इत्यादिकांचें पठण करण्याची अक्कल चालणार कोण !! तेव्हां अशा बिकट परिस्थितींत नारायणभट्टजींचा हेतु सिद्धीस गेला नसला म्हणून त्यांत कांहीं नवल नाहीं ! या दृष्टीने विचार केला तर त्यांनी महत्प्रयासानें संपादन केलेल्या वेदविद्येचा काशीपासून रामेश्वरापर्यंत जो सर्वत्र गौरव झाला, आणि अखेरीस अंकोलेकर स्वकीयमंडळीनी मानपत्र देऊन जो त्यांचा सन्मान केला त्यावरून तशा नाजूक परिस्थितीत देखील वेदांसारख्या श्रेष्ठ प्राचीनविद्येची योग्यता जाणणारी मंडळी होती हीच मोठ्या संतोषाची गोष्ट समजली पाहिजे. असो.

शके १८०९ मध्यें अंकोल्यास नारायणभट्टजींस स्वकीयमंडळीकडून जें मानपत्र मिळालें तें येणेंप्रमाणें:—

"वेदशास्त्रसंपन्न षट्कर्मनिरत वेदमूर्ति राजमान्य राजश्री नारायण अप्पाभट्ट करनाटकी घनपाठी दशग्रंथी यांचे चरणसेवेशी:—

अंकोलापुरस्थ शेटिया महाजन समस्त वैदीक व गृहस्थ यांहीं कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना विशेष. आपण बेळगांवांत राहणारे स्वशाखीय ब्राम्हण असून साग्र ऋग्वेद, पदक्रमादि अष्टौविकृति व षडंगसहित मुखोद्गत अध्ययन केलेचें सुप्रसिद्ध आहेच आपणास श्रीक्षेत्र काशी येथें, पुण्यपत्तनी ( पुणे येथें ) वगैरे प्रसिद्ध ठिकाणीं आपल्या वेदाध्ययनाची परीक्षा होऊन आपणास तेथील शास्त्री व पंडितांनी मानपत्रें दिल्याचीं पाहिल्यावरून आपण पंडितमान्य आहां म्हणण्याचें सिद्ध व श्रीसेतुबंधरामेश्वरयात्रेस आपण जाताना श्री अनंतशयन संस्थानीं आपली विद्वत्ता तत्रस्थ महाराजांच्या ध्यानीं येऊन आपण विद्वद्वंद्य असें समजून आपणास स्वर्णमय व रत्नमणिखचित करभूषण दिलेची सुविश्रुत. खेरीज श्री उडपी येथें फलमार, अदमार वगैरे मठाचे श्रीस्वामींनी आपणास सन्मानपूर्वक दिलेले रायस अवलोकन केल्यानेही आपल्या विद्वत्तेबद्दल पूर्ण खात्री होण्यासारखी आहे व आपले गुरुवर्य श्रीकाशिमठस्वामीकडून आपणास 'घनपाठी दशग्रंथी' असा किताब मिळाल्याचे श्रीस्वामींनी आपणास दिलेल्या रायसावरून स्पष्ट आहे. वर दर्शविल्याप्रमाणें आपण वेदविद्येमध्यें सुप्रतिष्ठित विद्वान् असून आपली स्वारी सद्यः येथें पोंचल्यावर आपणाकरवीं श्रीलक्ष्मीनारायण देवस्थानीं व अस्मदीयवर्गाचे मठीं देखील संहिताभिषेक केल्यावरून वगैरे आपली विद्वत्ता आम्हांस स्पष्ट दिसून आल्याकारणानें आपण वेदविद्याधीत पूज्य विद्वान् आहां असें आम्हीं खात्रीनें समजतों व आपणास येथें आम्हीं यथाशक्त्या सत्कार केल्याप्रमाणें आपणास सर्वत्र ब्रम्हवृंद सत्कार करून

आपणाकडून आशीर्वाद घेतील अशी पूर्ण आशा बाळगतों. विज्ञापना. मिति शके १८०५ सर्वजित् संवत्सर मार्गशीर्ष कृष्ण ३ या स्थिरवार.

१ अंकोले रामचंद्रभट्ट,

१ अंकोलापुरस्थ रामचंद्रात्मज वैकुंठशर्मणावय,

१ नारायण आपप्रभु शेटिया.

१ कृष्णनाईक शेटिया.

१ बाबन शेषगिरी पै.

१ मुकुंद अनंत पै, अंकोला.

१ पांडुरंग पोकेप्रभु, अंकोला.

१ अनंत साबैयाभट पारपत्यगार, अंकोला."

याप्रमाणें चोहोंकडे नावलौकिक मिळवून नारायणभट्टजी शहापुरास आपल्या घरीं येऊन राहिले. फारकरून वर्षांतील चार सहा महिने ते बाहेरगांवीं फिरून येत असत. त्यांनी अखेर अखेर परान्न वर्ज्य केलें होतें. इतकेंच नाही तर ते स्वतः आपल्या पत्नीच्या हातचें मात्र जेवीत असत. बाहेरगांवीं असल्यास स्वतः किंवा कोणी विद्यार्थी बरोबर असल्यास त्याच्याकडून स्वयंपाक करवावयाचा. या त्यांच्या नियमामुळें ते शुचिर्भूत वैदीकब्राम्हण म्हणून पुष्कळ यजमानांस त्यांचा विशेषतः त्याच्या आयुष्क्रमातील शेवटच्या दहा वीस वर्षांत पंक्तिलाभ घेतां आला नाहीं. ते आपल्या माध्वमताचे अभिमानी होते. कोणत्याहि मताचा अभिमान आला म्हणजे त्या मताच्या चांगुलपणाबद्दल अंमळ आग्रहही उत्पन्न होत असतो व आग्रह दिसला म्हणजे उलट मताच्या लोकास तो दुराग्रह वाटत असतो असा मनुष्यस्वभावाचा नियम आहे. ह्या नियमानुसार नारायणभट्टजींच्या माध्वमतासंबंधी अभिमानांत क्वचित्प्रसंगीं कित्येकांस दुराग्रह दिसत असे; पण त्यास सद्हू भट्टजींचा उपाय नव्हता. असो.

नारायणभट्टजींचा बहुतेक काल त्रिकाल स्नानसंध्या, शालिग्रामपूजा, निरंतर वेदाचें पठण यामध्येंच जात असे. विद्वत्तेच्या व शुचिर्भूतपणाच्या दृष्टीनें त्यांची योग्यता फार मोठी होती यांत शंका नाही. सारांश, नारायणभट्टजींसारखे धर्मनिष्ठ वैदीक ब्राम्हण आपल्या देशामध्यें अगदी दुर्मीळ झाले आहेत. ते शके १८२० भाद्रपद कृष्ण १० मीस निवर्तले त्याच्यामागें शहापुरात वेदसूर्य मावळल्यासारखाच झाला आहे; आतां पुनः कधी नारायणभट्टजींप्रमाणे प्रत्यक्ष वेदरवीचा उदय होऊन

चक्र प्रभातकाल प्राप्त होईल तो भाग्याचा दिवस होय; पण तूर्तच्या मन्वंतरांत तरी तशीं भाग्योदयाचीं लक्षणें दिसत नाहींत! 'भवितव्यता बलीयसी' दुसरें काय?

नारायणभट्टजीनी आपल्या मूळच्या गरीब स्थितींतही कशी स्वकष्टानें वेदविद्या संपादन केली व त्या विद्येला अनुरूप असा आपल्या हयातींत कसा लौकिक मिळविला हे आतां वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. सदर्हू गोष्टींचें महत्व खुद्द नारायणभट्टजीच्या चरित्रापेक्षांही महाराष्ट्रीय सारस्वत ब्राम्हणसमाजाच्या दृष्टीनें विशेष आहे असें आम्हांस वाटतें. नारायणभट्टजीच्या तोडीचे बुद्धिवान् किंवा विद्वान् दुसरे ब्राम्हण सारस्वतसमाजांतही कदाचित असूं शकतील व या संबंधांत सदर्हू भट्ट-जीचे बंधु वे. रा. कृष्णभट्टजी कर्नाटकी व वे रा. विठ्ठलभट्टजी कामत यांचा नाम-निर्देश जरूर केला पाहिजे; पण जातिद्वेषामुळे म्हणा अगर गाढ अज्ञानामुळें म्हणा, सारस्वतब्राम्हणासंबंधानें महाराष्ट्रांत कित्येक ठिकाणीं ज्या चमत्कारिक पण क्षुद्रत्व-द्योतक समजुती आहेत, त्यांचा विचार केला म्हणजे नारायणभट्टजीच्या कामगिरीचें खरें महत्व चटकन् दृष्टीसमोर येऊन उभें राहतें. ज्या सारस्वतज्ञातींत संन्यासाश्रम अव्याहत चालू असल्याचा निदान पांच सातशें वर्षांचा सबळ पुरावा मिळतो. ज्या सारस्वतमठांना आजवर होऊन गेलेल्या हिंदुमुसलमान राजांकडून कां? खुद्द पेशव्यां-कडून सुद्धा? सन्मानपूर्वक देणग्या मिळालेल्या आहेत. ज्या जातींत भट्टोजी दीक्षितांसारखे सर्वमान्य वैय्याकरण व महेश्वरभट्टांसारखे (अमरकोशाचे) सुप्रसिद्ध टीकाकार होऊन गेले, त्या जातीसंबंधानें महाराष्ट्रांतील कित्येक ठिकाणी इतकें अज्ञान अगर त्यांच्या ब्राम्हण्यासंबंधानें इतका द्वेष अगर संशय असावा काय? पण जेथें ब्राम्हणांच्या षट्कर्माधिकारांबरोबरच इतर जातीस हलकें मानणें अगर त्यांचा "येन केन प्रकारेण द्वेष करणे" हा एक सातवा अधिकार मानण्यांत येतो, तेथें सार-स्वत ब्राम्हणांसंबंधाने देखील वरीलसारखी वस्तुस्थिति नसावी तर ती असावी कोठे? हल्ली तर स्मृतिप्रणीत षट्कर्माधिकार देखील बहुतेक मागे पडून वर सांगितलेला सातवा अधिकारच तेवढा शिल्लक राहूं पाहत आहे व तेच काय तें खरें ब्राम्हण्याचें लक्षण कित्येक प्रांतांत मानले जात आहे!! ही वस्तुस्थिति कोणत्या दृष्टीनें स्पृह-णीय म्हणतां येईल बरें? असो. अशा स्थितींत स्वतःची मूळ सांपत्तिकस्थिति प्रति-कूल असतांही नारायणभट्टजींनीं स्वपराक्रमानें बहुतेक पहिल्या नंबरची वेदविद्या संपादन केली व देशभर आपल्या (सारस्वत) जातीचें ब्रम्हतेज प्रकट केलें यांतच त्यांच्या खऱ्या कामगिरीचें रहस्य आहे. जुन्या पद्धतीचा झाला तरी शुचिर्भूतपणा अगर

नीतिमत्ता व निर्व्यसनता यांचें तेज कांहीं निराळेंच असतें. सदहू गुण नारायणभट्ट-जीच्या अंगांत इतक्या पूर्णरीतीनें मुरलेले होते कीं, त्यांच्या तेजांत अगर कांतींत अंतकालपर्यंत यत्किंचित्‌ही फरक पडला नाहीं. इतका नंबर एकचा शुचिर्भूतपणा राखून आपल्या विद्वत्तेच्यायोगानें ज्या पुरुषानें आसेतु वाराणशीपर्यंत लौकिक मिळविला व त्या त्या ठिकाणच्या स्वज्ञातीय लोकांत अभिमान व इतर ब्राम्हणजातींत आश्चर्य उत्पन्न केलें त्यांची खरोखर तारीफच केली पाहिजे! जातीसंबंधानें नारायण-भट्टजींनी वस्तुतः केलेली खरी कामगिरी ती हीच; व वेदविद्येचें स्मरण झालें म्हणजे निदान महाराष्ट्रांतील सारस्वत ब्राम्हण तरी त्याचें नांव प्रथम घेतल्याशिवाय राहणार नाहींत अशी आमची खातरी आहे.

---

# प्रकरण २ रें.

## ( साधु, संत, कवि. )

## श्री नाईकस्वामी.

" संसारी पुरुषार्थप्रासादा साधुसंग हा पाया । "

मोरोपंत.

आपणास दिसत असलेलें हें सारे विश्व व त्यांतील यच्चयावत् व्यवहार, हे सर्व नाशिवंत आहेत. याचा प्रत्यक्ष अनुभव असतांनां देखील प्रत्येक प्राणी ह्या क्षणिक विश्वास अक्षय्य समजून आधिभौतिक सुखाच्या इच्छेनें कसा फसत आहे हे आश्चर्य नव्हे काय ? ईश्वरी मायामोहानें व्याप्त होऊन रज्जुसर्पन्यायानें प्राणिमात्र ह्या दुर्धर भवसागरांत रात्रंदिवस गटंकळ्या खात आहेत, आणि बहुतकांची इच्छा आपणास अखंड सुख मिळावें, अशी वस्तुस्थिति आहे; पण सुख मिळविण्याचा त्यांनीं जो मार्ग अंगीकृत केला आहे त्या मार्गांत सुखाचें नांव तर सोडाच उलट ' सुख पाहतां जवापाडे । दुःख पर्वता एवढें ' अशी स्थिति असल्यानें अशा या मोहव्यालग्रस्त लोकांना उत्तम सुख प्राप्त व्हावें, त्यांना प्रपंच साधून परमार्थाचाही लाभ व्हावा, आणि धर्माचें उज्वलस्वरूप नीट कळावें म्हणून जसे भगवंताचे ' संभवामि युगे युगे ' ह्या धार्मिक सनदेप्रमाणें अवतार होतात, तसेंच उपरिनिर्दिष्ट मयुरोक्तिप्रमाणें संसारी-जनांना पुरुषार्थाची प्राप्ति करून देण्याकरितां साधुसंतांच्या विभूति वारंवार उत्पन्न होतात. विशेषतः साधु आणि ईश्वर ह्यांत फारसा भेद नाहीं; उलट,

" भजंति ये यथादेवान् देवाऽपितथैव तान् ।
छायेव कर्म सचिवा साधवो दीनवत्सलाः ॥ "

' म्हणजे जशी आकृति तशी छाया; त्याप्रमाणें जशी देवाची भक्ति करावी तसा त्याला देव प्रसन्न होतो. ' उघडच आहे; **' ये यथामां प्रपद्यंते तान्स्तथैव भजाम्यहं '** असें स्पष्ट भगवद्वचन आहे; पण साधूंचें तसें नाहीं. ते दीनवत्सल अति कनवाळू लाभाची इच्छा न करितां केवळ भक्तांचें शुद्धांतःकरण पाहून त्यांस अखंड सुखाचा ठेवा दाखविणारे असे होत. यामुळें बहुजनसमाजास साधूंचीं चरित्रें ईश्वरी.

चरित्रलीलेप्रमाणें अत्यंत रमणीय वाटतात; कारण त्यांच्या आश्चर्यकारक लीला साक्षात् दृक्प्रतीतीला आलेल्या असतात. हें ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदासादि अनेक साधुपुरुषांच्या चरित्रांवरून स्पष्ट दिसून येईल. प्रस्तुत चरित्रनायकही अशाच दिव्य साधुकोटींतील होत; म्हणून त्यांचें अल्पसें चरित्र येथें सादर करितो.

नाईकस्वामींच्या जन्मशकाची वगैरे माहिती कोठें सांपडत नाहीं; तथापि त्यांच्या एकंदर वृत्तासंबंधीं जी त्रोटक हकीकत उपलब्ध आहे तीवरून असे कळते कीं, त्यांचे पूर्वज कारवार जिल्ह्यांपैकीं कुमठा तालुक्यांतील दिवगीनजीक अंत्रवल्ली गांवीं राहणारे होते. तेथेंच नाईकस्वामींचे जन्म झालें. त्यांचें मूळचें नांव **शंकर मंगेश नाईक करंडे** देसाई असें होतें. ते एकदां सहकुटुंब गोमांतकांत श्रीक्षेत्र मंगेशी येथें आपल्या कुलदेवाच्या दर्शनास येत असतां मध्यंतरीं मार्गामध्यें काणकोणच्या जंगलांत दैववशांत त्यांची व त्यांच्या कुटुंबाची चुकामुक झाली, त्या भयाण अरण्यांत शंकररावजींनी पुष्कळ शोध केला, पण कुटुंबाची गांठ न पडल्यामुळे ते फार कष्टी झाले. अखेरीस सायंकाळच्या सुमारास अगदीं खिन्न अंतःकरणानें ' श्रीमंगेशा, आतां या संकटांतून सोडविणारा तूंच त्राता आहेस ' अशी देवाची करुणा भाकून देहाविषयीं निराश झाले. आणि ' आतां काय होईल ते होवो ' म्हणून स्वस्थ बसले. इतक्यांत तेथें एक अवधूतवेषधारी बैरागी त्यांच्या सन्मुख उभा ठाकला व दुःखाचें कारण विचारूं लागला. तेव्हां शंकररावजींनी घडलेली सर्व हकीकत त्यांस सांगितली. ती ऐकून तो बैरागी ह्मणाला. ' बाबारे ? या एवढ्याशा अरण्यांत वाट चुकून तुझ्या मंडळींस मुकलास याबद्दल तूं इतका कष्टी होतोस; तर या भयंकर भवारण्यांत तूं वाट चुकून आज कित्येक जन्म भटकत फिरतो आहेस व आपण कोण, कोठून आलों आणि कोठें चाललों ? याची शुद्धि देखील तुला नाहीं. तर याबद्दल तुला किती दुःख व्हावें ! याचा कधीं तूं विचार केला आहेस काय ? ' याप्रमाणें त्याचें हे मोहग्रंथिच्छेदक भाषण ऐकतांच शंकररावजींस तत्काळ उपरति झाली व ते त्या अवधूताच्या चरणीं लागले; नंतर त्याच्या कृपेनें रानांत अंतरलेल्या मंडळींचीही लवकरच त्यांस गांठ पडली. पुढें ते आपल्या उद्दिष्ट हेतुप्रमाणें श्रीमंगेशाच्या दर्शनास येऊन पोंचले व त्यांनीं क्षणिक प्रपंचाचा त्याग करून अखेरपर्यंत परमेश्वरभजनांत काळ घालवीत श्रीकुलदेवाच्या सान्निध्यांत मंगेशीसच वास्तव्य करून राहिले. ते मंगेशदेवाचे तीव्र उपासक होते, इतकेंच नव्हे तर पुढें पुढें देवाशीं त्यांचें इतकें तादात्म्य बनलें होतें कीं त्यांनीं शिवस्तुतिपर कित्येक कविता केल्या व श्री मंगेशाच्या शिबिकोत्सा-

हांत जीं सोळा पेणीं—मुक्काम—होतात, त्यावेळीं नृत्यांगनांनीं नृत्यगायन करावयाचें असतें; त्याच्या आरंभीं स्तुतिपर अशीं ' झुलवे ' नांवाचीं जीं गाणीं गावीं लागतात तीं नाईक स्वामींनींच केलीं आहेत, आणि त्यांच्या शेवटीं कविनामनिर्देशाच्या ठिकाणीं त्यांनीं ' मंगेश ' अशाच नांवानें आपला निर्देश केलेला आहे. हे साक्षात्कारी साधुपुरुष होते.

त्यांच्याविषयीं अशी एक गोष्ट सांगतात कीं. एकदां ते काशीयात्रेस जाण्याच्या इरायानें सर्व तयारी करून रात्रौ श्रीमंगेशाचे देवालयांत जाऊन निजले. तेथें त्यांस मध्यरात्रीच्या सुमारास एकाएकीं ' आपण श्रीक्षेत्र काशीस गेलों असून गंगास्नान केले व तीर्थोदकानें भरलेला तांब्या घेऊन घांटावरून चाललों आहे ' असें स्वप्नांत दिसलें, आणि त्याप्रमाणें जागें होऊन पाहिले तों नखशिखांत नुकतेंच स्नान केल्याप्रमाणें सर्वांग भिजलें आहे असें प्रत्ययास आलें ! तेव्हां रीतीप्रमाणें सकाळीं श्रीकडे प्रसादद्वारां या गोष्टीचा विचार केला; तर त्यांत ' काशीस जाण्याचें कारण नाहीं येथेंच तुला गंगास्नान घडलें ' असा निष्कर्ष निघाला. मग त्यांनीं देवाच्या निरापाप्रमाणें काशीस जाण्याचा बेत रहित केला व श्रीमंगेशचरणीं निष्ठा ठेवून समाधिकालापर्यंत ते तेथेंच राहिले होते. त्यांच्या हयातीपर्यंत त्यांचा सर्व खर्च श्रीमंगेश देवस्थानांतून चालत होता. त्यांची समाधीची जागा देवस्थानच्या समोर वनभोजनाची जी अग्रशाळा आहे तिच्यामागें आहे; परंतु त्यांची समाधि केव्हां झाली याची माहिती उपलब्ध नाहीं. ' असें जे त्याच्या एका चरित्रलेखकानें म्हटलें आहे त्यावरून आम्हांस थोडा अचंबा वाटतो; कारण, जर त्यांचा रोजचा खर्च देवस्थानांतून चालत होता हे हिशोबी कागदपत्रांवरून ठरविलें असेल तर तो हिशोब कोणत्या सालांतला व कधीपर्यंत त्यांच्या नावें खर्च पडत गेला आहे हें पाहून निदान त्यांचा साधारण समाधिकाल देतां येणें शक्य होतें, आणि जर वरील गोष्ट परंपरागत चालत आलेल्या दंतकथेवरूनच घेतली असेल तर मात्र आम्हांसही तेंच विधान घेऊन चालणें भाग आहे; पण या बाबतींत आमची मनोदेवता आम्हांस तसें करण्यास पूर्ण अनुमती देत नाहीं. याचें कारण असें कीं, मंगेशीसारख्या प्राचीन व संपन्न देवस्थानांत हिशोबी जमाखर्च लिहून ठेवण्याची पूर्वीपासून पद्धत असली पाहिजे हें उघड आहे किंवा नाईकस्वामीच्या कारकीर्दींत नव्हती, अथवा असली तरी चरित्रलेखकानें त्याविषयीं विशेष शोध केला नसावा असें मानलें तर ज्यांनीं अत्यंत उपयुक्त व दुर्मिळ अशी माहिती महत्प्रयासानें एकत्र करून सबंध देवस्थानचा

इतिहास प्रसिद्ध केला त्यांना हा शोध लागण्यास अशक्य होतें असें आम्हांस वाटत नाहीं. तेव्हां देवस्थानाशीं साक्षात् संबंध असून ज्यानीं ही चरित्रलेखनाची खटपट केली आहे अर्थात् त्यांचिवरच निर्वाह केल्यावांचून आम्हांसही दुसरा इलाज नाहीं. असो.

सांप्रत त्यांच्या पादुका त्यांचे वंशज वे० रा० मंगेश नाईक करंडे यांच्या घरीं असून त्यांची पूजाअर्चा त्यांच्याकडूनच चालते. नंदादिपाचा वगैरे खर्च देवस्थान मार्फत चालत असतो. त्यांची पुण्यतिथी वै० व० १२ दशी रोजीं होत असून तत्संबंधींचा खर्चही देवस्थानांतून चालतो. देवकृत्यांतील बेहड्यांत ' पादुका ' या सदराखालीं जी रक्कम खर्चीं जमेला धरितात तिचा विनियोग या कामीं होत असतो. नाईकस्वामी चांगले कवि होते. त्यांची कविता प्रासादिक असे. शिवगीतेवर त्यांनीं केलेली उत्तम टीका प्रसिद्ध आहे. गोमांतकी भाषेंत रूपांतर होऊन तिला मराठीभाषेचे वळण लावण्याला याचीच कविता कारण झाली. त्यांनी केलेल्या कवितांपैकीं नमुन्याकरितां ' झुलव्यां ' चा मात्र येथें निर्देश करून हे अल्प चरित्र पुरे करितों.

" हरहर मंगेश्वर तनुकुश पुरनाथा । हर विश्वंभर सुखदाता ॥
हरहर तापत्रय भवच्छेत्ता । हरहर गाइन शिबिकोत्सव गुणगाथा १
प्रथमपादांगुष्ठाधार अग्नि । ध्याता तेजोमय स्वप्रभाव नेत्री ॥
दृश्यद्रष्टा दर्शन त्रिपुटि सूत्री । दृष्टी स्थिरता पावे चित्रविचित्री ।२।
तृतीयसाधन मूलाधार सूत्र । विमर्श पृष्ठीं गाडीं पीडन तंत्र ॥
करितां स्वच्छासन होउनियां तंत्र । काळ अग्निसंदीपन वोप विचित्र ३
चतुर्थ मेढ्राधारी लिंगस्थान । संकोचनविद ग्रंथित्रय भेदोन ॥
रुद्रमुखीं बिंदूचें स्थान । होतां भ्रमरित गुंफे समाधान ॥ ४ ॥
पंचम वोढानें वृत्ति निरोध । अपानवुल्लरंगी होउनि निजशब्द ॥
समानयोगी प्राण्यासी समाध । होतां संजीवन लाभे योग्य बोध ५
षष्ठम नाभ्याधारी एक चित्र । प्रणवोच्चारण करितां सद्गुरु उक्त ॥
नादनिनादीं होउनि अत्यद्भुत । सहजीं समाधी लाभे अनाहत ॥ ६॥
सप्तम हृदयाधारीं मुख्य प्राण । निरोध करितां लाभे सुख संपूर्ण ॥
हृदयपंकज होउनि विकाशमान । सहजीं सहज पूर्ण समाधान ७
अष्टमधारी चिबुक निरोध । करितां रविशशि नाडी होउनि स्तब्ध ॥
चंद्रामृतद्रव स्रवे परमानंद । होतां सहजीं लाभे योग्य बोध ॥ ८ ॥

नवम स्थानातें घटिकाधार। तेथें गुरुक्तक्रम अत्यंत सार ॥
विपरीत जीवा परोक्षी एकाग्र। अमृत करितां प्रीत होते शरीर ९
दशमतत्व नत रत्नविकास्थान। तेथें दीर्घकृत दोहन चालेन ॥
विपरित युक्ती रंध्रीं प्रवेशून। करितां निर्विकल्प समाधान ॥ १० ॥
आतां एकादशि तो जीवाधार। गुरुक्त तंत्र धरि जेथें तदाग्र ॥
सर्वही रोगांचा होऊनि संहार। शीतळ चंद्र मग होतें शरीर ११
द्वादशि आधारता भ्रुवो मध्यें। तेथें ध्याता चंद्र मंडळ शुभ्र ॥
नयनी विकासे तुष्टय होउनि शब्द। शांत शीतल लाभे स्वरूप बोध १२
आतां त्रयोदशी तो नाशाधार। रंध्ररक्षी मानसवृत्ति सार ॥
होउनि लाभे रूप साक्षात्कार। जैसा लोपे प्रकाश अंधःकार ॥१३॥
आतां चतुर्दशी तो नाशामूलक वाटे। तेथं लक्षीं धरितां निजात्म भेटे ॥
जलमासादि तेजोमय दृष्टी। होतां सजिवन लाभे निजात्म भेटे १४
आतां पंचदशी तो ललाटाधार। तेथं सलामजांति पूज्याकार ॥
लक्षीं धरितां स्वरूप साक्षात्कार। जैसा लोपे प्रकाश अंधःकार १५
अधस्त्रष्टाते ब्रह्मारंध्र शेष। करुणा चक्रभ गुरुपाद रक्ष ॥
धरितां परशिव तत्वय शेषारक्ष। पूर्ण झाला श्रीमंगेशीं मंगेश १६"

---

## तुकारामबाबा वरदे.

जयांचे असे पुण्य कीं सावकाश।
विशेषें जनीं शोभती ते कवीश ॥
जयांचा यशोदेह आकल्प राहे।
जरामृत्युवार्ता जयांला न साहे ॥ १ ॥

"रसिकपणानें सिद्ध झालेले कवीश्वर सर्वोत्कर्षेकरून राहतात; कारण ज्यांच्या कीर्तिरूप शरीरास जरेचें आणि मरणाचें भयच नाही."

संसारांतील अनेक अडचणीमुळें उद्विग्नचित्त झालेल्या माणसांचें लक्ष परमार्थाकडे वळणें हें शक्य व साहजिक आहे, परंतु ज्यास प्रपंचसुखाची सर्वप्रकारें अनुकूलता

आहे, अशा लोकांनी त्या सुखास विमुख होऊन परमार्थसुखाच्या आशेनें आपला देह कष्टविण्यास प्रवृत्त होणें म्हणजे कारण नसतां होणाऱ्या कार्यासारखें दिसतें व त्यामुळें अशा लोकांचीं चरित्रें सामान्य जनांस मोठीं आश्चर्यकारक होत असतात. अशा असामान्य पुरुषांच्या चरित्रमालिकेंत गोंवण्यास योग्य असें तुकारामबाबा वरदे यांचें चरित्र आहे; त्याचा संक्षेपरूपानें येथे निर्देश करितों.

गोमांतकप्रांतांत जुवें म्हणून जो एक लहानसा गांव आहे, तेथें अमृतराव वरदे या नांवाचे एक गृहस्थ राहत असत. त्यांच्या कुटुंबांत मंडळी बरीच होती. शेतवाडी वगैरे प्रपंचसुखाची त्यांस चांगली अनुकूलता होती. याप्रमाणें अमृतरावजींची स्थिति जरी इतरप्रकारें चांगली होती तरी प्रपंचांतलें जें मुख्य संततिसौख्य त्याचा अभाव असल्यामुळें त्यांस व त्यांच्या इतर कुटुंबांतील मंडळीस एकप्रकारचें औदासिन्य वाटत असे. अशास्थितींत कांहीं काल गेल्यावर त्यांची कुलदेवता श्रीशांतादुर्गा हिच्या कृपेनें शके १४९३ इसवी सन १५७१ या वर्षी त्यांस एक पुत्ररत्न झालें. अमृतरावजींनी पुत्राचें नांव 'तुकाराम' असें ठेविलें असो.

गोवेंप्रांतांतील हिंदुलोकांच्या रिवाजाप्रमाणे थोरपणाचे उपपद जें 'बाबा' ते त्यांच्या नांवापुढें लावून लोक त्यांस 'तुकारामबाबा' या नांवानें संबोधित असत. तुकारामबाबांचा स्वभाव बाळपणापासून सात्विक होता. आईबापांचे सद्गुण पूर्णपणे त्यांच्यांत अवतरले होते. त्या कालाच्या मानानें बाबांचें मराठी व संस्कृत अध्ययन बरेंच होऊन शिवाय थोडेसे वेदाध्ययनही झालें होतें. लहानपणापासून त्यांची चित्तवृत्ति प्रपंचाविषयीं उदासीन असे. अमृतरावजींच्या मनांत आपल्या एकुलत्या एका मुलानें प्रपंचभार शिरीं घेऊन वृद्धपणीं आपणास सुख द्यावें व सरकारदरबारांत चांगला नांवलौकिक मिळवून पूर्वजांनीं संपादिलेल्या कीर्तीत भर घालावी असें होतें. तदनुरूप त्यांनी एका श्रीमंत घराण्यांतील सुस्वरूप मुलीशीं बाबांचे लग्नही करून दिलें; परंतु बाबांचे मन पूर्वसंस्कारामुळे ईश्वरभजनीं रंगून गेलेलें असल्यानें ते ऐहिकविषयासंबंधानें केवळ उदासीन असत. त्यांचे मन प्रपंचांत गुंतवावें या हेतूनें अमृतरावजींनीं बरेच उपाय केले पण त्यांस यश आलें नाहीं.

अखेरीस शके १५१५ इ० स० १५९३ मध्यें म्हणजे तुकारामबाबांच्या वयाच्या बाविसाव्या वर्षी त्यांची वृद्ध मातापितरें थोड्याच दिवसांच्या अंतरानें एकामागून एक अशीं मरण पावलीं. त्यामुळें तर बाबांचें चित्त प्रपंचांतून अगदींच उडालें. अशास्थितींत त्यांची पत्नीही वारली; तेव्हांपासून बाबांस प्रपंचाचा भार अगदीं

असह्य होऊं लागला. पुढें दुसरें लग्न करून घेण्याविषयीं त्यांच्या आप्तइष्टांनीं व गांवांतील शिष्टलोकांनीं त्यांस पुष्कळ आग्रह केला; परंतु त्यांनीं तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं; इतकेंच नाहीं तर बाबांनीं आपली वडिलार्जित वगैरे धनदौलत दीनदुबळ्यांस देऊन टाकिली व आपण श्रीक्षेत्र कवळे येथें जाऊन राहिले. तेथें त्यांनीं आपल्या कुलदेवतेच्या श्रीशांतादुर्गेच्या भजनपूजनांत काळ घालविण्याचा निश्चय केला; आणि त्याप्रमाणें तेथे कांहीं कालपर्यंत वास करून पुढें आपल्या उतारवयांत ते काशीयात्रेस निघून गेले. तेथें आयुष्याचे राहिलेले दिवस सत्समागमांत व श्रीकाशीविश्वेश्वराच्या भजनांत त्यांनीं घालविले. यापुढे त्यांचा वृत्तांत बरोबर समजत नाहीं.

तुकारामबाबा हे उत्तम कवि होते. त्यांची कविता रसाळ व प्रसादपूर्ण अशी आहे. त्यांनी केलेली भक्तिपर पदें वगैरे पुष्कळ कविता गोमांतकांत व बाहेरही कोठे कोठे लोकांच्या तोंडीं आहे; परंतु ती संपूर्ण नाहीं. त्यांच्या कवितांपैकीं समग्र सांपडलेले असें काव्य म्हटलें म्हणजे भर्तृहरीच्या शतकत्रयांवरील समश्लोकी भाषांतर हें होय. ह्या शतकत्रयामध्ये बाबांनीं नीति व वैराग्यशतकाच्या श्लोकदशकाला निरनिराळीं नांवें ठेवून त्यांतील श्लोक त्या त्या सदराखालीं येतील असा श्लोकानुक्रम राखला आहे नीतिशतकांत अशा व्यवस्थेनें १० पद्धति झाल्या आहेत त्या येणेंप्रमाणें:—अज्ञपद्धति, विद्वत्वपद्धति, शौर्यपद्धति, अर्थपद्धति, दुर्जनपद्धति, सज्जनपद्धति, परोपकारपद्धति, शीलपद्धति, दैवपद्धति आणि कर्मपद्धति.

शृंगारशतकांमध्ये पांच विंशति कल्पिलेल्या असून त्यांचीं नांवें अनुक्रमें स्त्रीप्रसंग, कामिनीप्रशंसा, कामिनीगर्हण, कामिविगर्हण व षड्ऋतुवर्णन; अशीं आहेत. वैराग्यशतकांत आशादूषणपद्धति, संसारपरित्यागपद्धति, कालमहिमापद्धति, भोगाऽस्थैर्यपद्धति, नित्यानित्यविचारपद्धति, शिवार्चनपद्धति आणि अवधूतचर्यापद्धति; याप्रमाणें दहा दशकें असून त्या त्या विषयांला अनुसरून त्यांतील श्लोकानुक्रम फारच मार्मिकतेनें साधला आहे, आणि त्याप्रमाणें प्रत्येक शतकांत बरोबर शंभर श्लोकांची भरती होत आहे. वामनपंडितांचीं जीं शतकें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांत अनुक्रमें ९४-८७-९७ अशी श्लोकसंख्या आढळते. कांहींकांनीं अधिक भरती करूनही संख्या शंभरावर नेलेली आढळते. महाबलकृत टीकेच्या शतकत्रयांत देखील प्रक्षिप्त श्लोक आढळतात. एकंदरींत व्यवस्थित अशी एकही प्रत मिळत नाहीं. वस्तुतः शतक म्हटलें म्हणजे त्यांत नियमानें शंभर श्लोकच असले पाहिजेत; कमी अधिक असणें शक्य नाहीं व त्या-

प्रमाणें बाबांच्या प्रतींतही श्लोकसंख्या अगदीं बरोबर आढळते. तसेंच या शतकत्रयास ' सुभाषितरत्नावली ' हें अन्वर्थक नांव अगदीं प्राचीनकाळापासून चालत आलेलें बाबांच्या प्रतींत व श्रीमन्महेश्वरभट्ट यांच्या सटीक प्रतींत आढळतें.

शतकत्रयावर वामनपंडितांनीं जी कविताबद्ध टीका केली आहे ती मूळश्लोकांतील वृत्ताबरहुकूम नाहीं, कोठें स्रग्धरेस मंदाक्रांता, तर आर्येस वंशस्थ, आणि शार्दूलविक्रीडितास हरिणी, असा वृत्तविपर्यास आहे; पण बाबानीं तसें मुळांतील अर्थास ईषन्मात्रही न सोडतां त्या त्या वृत्तांतच आपल्या गंभीर आणि अर्थपूर्णवाणीनें हुबेहूब महाराष्ट्रप्रतिछाया उतरलेली आहे. यांवरून बाबांना कवितावधू कशी प्रसन्न होती हें मार्मिक वाचकांच्या लक्षांत येईल.

हें भषांतर गोवेंप्रांतीं कुंभारजुवें येथें प्रसिद्ध होणाऱ्या ' सत्संग ' नामक मासिकपुस्तकांत छापून प्रसिद्ध झालें आहे. नमुन्यासाठीं त्यांतील दोन चार श्लोक येथें देतों.

मूळ—दिक्कालाद्यनवच्छिन्नानन्तचिन्मात्रमूर्तये ।
स्वानुभूत्येकसाराय नमः शान्ताय तेजसे ॥

टीका—देशकाल नसे रूप ज्ञानदेह अनंत तो ।
शांत श्रीस्वप्रकाशात्मा नमस्कार असो तया ॥

मूळ—प्रसह्यमणिमुद्धरेन्मकरवक्त्रदंष्ट्रांकुरात् ।
समुद्रमपि संतरेत्प्रचलदूर्मिमालाकुलम् ॥
भुजंगमपिकोपितं शिरसिपुष्पवध्दारयेत् ।
नतुप्रतिनिविष्टमूर्खजनचित्तमाराधयेत् ॥

टीका—( पृथ्वी )–निघेल मणि काढितां मकरवक्त्रदाढांतला ।
समुद्रतरं ये सुखें भुजबळेंच हो मातला ॥
सकोप फणि मस्तकीं सुमनसाच ये बांधितां ।
सुसाध्य क्षणही न मूर्खजनचित्त संबोधितां ॥

मूळ—( शा० वि० )

"केयूरा न विभूषयंति पुरुषं हारा न चन्द्रोज्वला
न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालङ्कृता मूर्धजाः ॥
वाण्येका समलङ्करोति पुरुषं या संस्कृता धार्यते
क्षीयन्ते खलुभूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम् ॥

टीका—"—बाहुभूषण भूषवी न पुरुषा ना मुक्त हारावली
न स्नानार्थ न चंदनार्थ न फुलें ना मूर्ध केशावली ॥
वाणी एकच शोभवीत पुरुषा जे संस्कृती रंगली
जाती नासुनि भूषणें सकलही वाग्भूषणा वेगळीं ॥ "

मूळ—( वसंततिलका )—" जाड्यंधियो हरति सिञ्चति वाचि सत्यं
मानोन्नतिं दिशति पापमपाकरोति ॥
चित्तं प्रसादयति दिक्षुतनोति कीर्तिं
सत्संगतिः कथय किं न करोति पुंसाम् ॥

टीका-"—दुर्बुद्धि सर्व हरितो मृदु बोलवीतो
दिग्मंडळीं भरुनि कीर्ति यशास देतो ॥
पापास निस्तरुनियां बहुमान वीतो
सत्संग काय न करी वद, मानवा तो ॥ "

मूळ—द्रुतविलंबित.

" विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा। सदसिवाक्पटुता युधि विक्रमः ॥
यशसि चाभिरुचिर्व्यसनश्रुतौ । प्रकृतिसिद्धमिदंहि महात्मनाम् ॥

टीका—"

अपदिं धैर्य, पदीं बसतां क्षमा । चपळ वाणि बुधी रणिं विक्रमा ॥
अवडि कीर्तियशीं श्रवणीं रती । प्रकृति हे सुजनीं जानिं आयती ॥ '

यांप्रमाणे शतकत्रयांतील बाबांचे सर्वच श्लोक चांगले असून वर दिलेल्या श्लोकांवरून त्यांची योग्यता व यथार्थता ही वाचकास सहज कळून येतील.

---

# सत्पुरूष बापूमहाराज किणी.

मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ ।
यादृशीं भावनां कुर्यात्सिद्धिर्भवति तादृशी ॥

' वेदमंत्र, तीर्थस्थले, देव, ब्राम्हण, गुरु, वैद्य इत्यादिकांवर जशी आपली भावना अथवा श्रद्धा ठेवावी; त्या मानानें इष्टसिद्धि प्राप्त होते. ' असा हा वरील श्लोकाचा

भावार्थ आहे, आणि बहुतेक ह्या भावार्थास अनुसरूनच जगांतील सर्व प्राणिमात्रांचा व्यवहार चालला आहे असें म्हटले पाहिजे. उघडच आहे, जर रोग्यानें वैद्यावर व त्यांनीं दिलेल्या औषधावर विश्वास ठेविला नसला तर त्याला गुण कसा येईल ! उलट त्यानें दिलेल्या औषधावर ' हें विष तर नसेल ना ? ' अशी कुभावना ठेविली तर त्या काळजीनें बिचाऱ्याचा अंत मात्र व्हावयाचा. तसेच गुरूपदिष्ट वाक्यांवर श्रद्धा ठेविली नाहीं तर त्या गुरूकडून विद्येचा लाभ मिळून समाधान असे केव्हांच होणार नाहीं. तात्पर्य कोणत्याही गोष्टीवर पूर्ण विश्वास आणि श्रद्धा असली म्हणजे त्याप्रमाणें फल हें मिळावयाचेंच; परंतु अलीकडे ह्या विश्वासाचे प्राधान्य दृक्प्रतीतीवर अवलंबून राहिलें आहे. कोणताही चमत्कार पाहिला किंवा त्यासंबंधानें एखादी अश्रुतपूर्व गोष्ट ऐकली तर तिजवर एकदम विश्वास बसत नसतो, आणि ' हें असे होणें अगदी अशक्य आहे. ह्या साऱ्या मन्वंतरांतील दंतकथा असून सब् झूट आहे. ' अशारीतीनें अः करून त्या गोष्टीविषयी अनादर उत्पन्न करण्याचा कित्येकांचा कल होतो; पण आमच्यामते हा सारा दोष त्या गोष्टीचा किंवा त्या गोष्टीस विषयभूत झालेल्या व्यक्तीचा नसून फक्त सशयखोर अशा मानवी अंतःकरणाचा समजला पाहिजे. ह्याची उदाहरणें आपल्याला साधुसंतांच्या चरित्रांवरून चांगली प्रत्ययास येतात. प्रस्तुत चरित्रही अशाचप्रकारच्या कांहीं आश्चर्यकृतींनीं व्याप्त असल्यामुळें त्याचा थोडासा परिचय सुज्ञवाचकवर्गास करून देतों.

वाडीसंस्थानांत कुडाळ ह्मणून जो एक प्रसिद्ध प्रांत आहे त्या प्रांतीं आरवली म्हणून एक लहानसाच गाव आहे या गावची लोकस्थिति पूर्वी अगदी रानटी होती. त्यावेळी त्या गावात " भूम्या " नांवाचा कोणी एक पंचाक्षरी आला होता त्यास तेथें काही दृष्टांत होऊन त्याच गावात राहण्याची इच्छा झाली आणि त्यानें त्या गांवची रचना निराळ्या धर्तीवर व्यवस्थित करून त्या गांवच्या पश्चिमबाजूस सात खणाच्या डोंगरींत **श्रीवेताळ** नांवाचा देव होता. त्यास तेथून आणून पूर्वबाजूस स्थापिला व तेथें चोराडे, नाईक वगैरे कोणी दुराचारानें वागणारे शूद्र होते त्यांस तेथून घालवून निराळे गांवकर आणून ठेविले व श्रीवेताळ आणि दुसरी कांहीं देवस्थाने स्थापिली. तथापि श्रीवेतोबाचे हें प्रसिद्ध देवस्थान असून गांवचे सर्व लोक त्या सिद्धपुरुषाच्या मार्फतीनें त्यासच भजूं लागले. कुडाळप्रांती सर्वठिकाणीं ह्या भूम्या नामक सिद्धपुरुषाची प्रसिद्धि होतांच स्वतः राजाही त्याचा शिष्य बनला. पुढे कांहींकालानें त्या भूम्याचें देहावसान झालें.

त्याच्या मागून लौकरच म्हणजे इ० स० १७३० सालचे सुमारास जणुं काय त्या सिद्धपुरुषाचाच अवतार व्हावा त्याप्रमाणें प्रस्तुत चरित्रनायक बापूमहाराज हे कर्नाटक प्रांतांतून आपल्या बहिणीस बरोबर घेऊन त्या गांवीं आले, आणि अव-ळच शिरवडें म्हणून जो गांव आहे तेथें प्रसिद्ध असलेल्या हरबा कामलीचे घरीं उत-रले. त्यावेळीं त्यांचें वय सुमारें ४० वर्षांचें दिसत होते. यावरून शके १६१२ मध्यें त्यांचें जन्म झाले असावें. त्यांच्या जन्मभूमीसंबंधानें व बालपणांतील माहिती विशेषसी उपलब्ध नाहीं. फारकरून गोव्यांतील धर्मक्रांतीच्यावेळीं त्यांचे पूर्वज कर्णा-टकात जाऊन राहिले होते व तेथेच त्यांच्या जीवितक्रमातील अर्धा भाग पुरा झाला आणि नंतर ते अरवलीनजीक शिरवडे येथें येऊन राहिले. तेथें ते भूम्याप्रमाणेंच वेतोबाचे पूर्ण उपासक बनले व तो जशी कृत्यें करी त्याचप्रमाणें बापूमहाराजही करीत; त्यावरून असे वाटे कीं, भूम्यानेंच याना शिकवून पाठविले असावें ! त्यावेळीं आरवली गावावर सावत, भोसले, सरदेसाई, वाडीसरकार याचा अम्मल होता व ते राजेही भूम्याच्या कारकीर्दीपासून वेतोबाचेच भक्त होते तरी बापूमहाराजांपासून त्याच्या भक्तीस विशेष तीव्रता आली. प्रत्येक दिवशीं वेतोबाच्या दर्शनास जाण्याचा त्याचा नित्यनेम होता; इतकेंच नाहीं तर त्या देवाचे ठिकाणी बापूमहाराजांची इतकी नि:सीमभक्ति होती कीं, प्रत्यक्ष वाडीसरकार त्याना कांहीं जमीनजाहागीर देण्यास सिद्ध झालें असतां त्यांनी ती वेतोबास द्यावी असे सांगितले. तेव्हां राजानें सनदा देवाच्या नावानें करून दिल्या !

ज्या जमिनी बापूमहाराजानी देवास देवविल्या आहेत त्याचे उत्पन्नांतून दरसाल मार्गशीर्ष शुद्ध १ पदे दिवशीं सर्व गावातील लोकास व अतीतअभ्यागत जे कोणी येतील त्यांस अन्नप्रसाद मिळण्याची व्यवस्था केली आहे; म्हणून कुणबी वगैरे लोक त्यादिवशी आरवलीच्या देवाची अनसाची जत्रा किंवा अन्नाचा सणच मानितात. कोणी त्यास अन्नसणच किंवा अन्नशांति म्हणतात. ही व्यवस्था बापूमहाराजांनींच केली असल्याचे प्रसिद्ध आहे.

बापूमहाराज हे वैष्णवसांप्रदायी असून त्याचे उपनांव किणी असे होते; पण ते शिव व विष्णू यामध्यें भेद मानीत नसत, आणि याच दृष्टीनें ते शिवगण जो वेताळ त्याची उपासना करीत. त्याच्या हातून घडलेल्या अनेक आश्चर्यकारक कृतीं-वरून ते महान्भगवद्भक्त वरदी पुरुष होते असें नि:संशय वाटते; पण तो सिद्धपणा त्यांनीं कोठून व कसा पैदा केला याजबद्दल कांहींच माहिती कळत नाहीं; तथापि

त्यांच्या ज्या अनेक लीला त्या प्रांतांत प्रसिद्ध आहेत त्यांतील कांहींचा उल्लेख येथें करितों त्यावरून बापूमहाराजांची योग्यता चांगली निदर्शनास येईल. त्यांना कित्येक लोक बापूमामा अथवा शिंकमामा असेंही म्हणत; कारण ते शिंक पाहून हुबेहुब होणाऱ्या गोष्टी सांगत असत. एकदां प्रसिद्ध बक्षीबहादर जिवबादादा केरकर हे कांहीं रोजगारासाठीं जेव्हां पहिल्यानेंच घरांतून बाहेर निघाले तेव्हां त्यांस शिंक आली. त्याबरोबर त्यांनीं पाय मागे घेतला त्यावेळीं तेथें बापूमहाराज होते. त्यांनी तो प्रकार पाहून सांगितलें कीं, ' बाबा पाय मागें घेतलास तेव्हां आतां प्रधान होशील; नाहीं-तर राजा झाला असतास. चल असाच नीघ राहूं नकोस. ' असे म्हणतांच जिवबा-दादा तसेच निघून गेले व पुढें त्यांचा किती लौकिक वाढला आणि ते शौर्यशाली विजयी प्रसिद्ध पुरुष कसे उदयास आले याची कल्पना पुढे दिलेल्या त्यांच्या चरित्रा-वरून सहज होणार आहे. असो.

बापूमहाराज हे दरवर्षी कार्तिकीच्या यात्रेस पंढरपुरास जात असत. त्यावेळीं पंढरीस कोंकणातून आजऱ्यावरून जाण्यास पायरस्ता होता; तेव्हां समुदायाने जाण्याचा प्रचार फार होता. त्याप्रमाणें कांहीं वारकरीमंडळी बरोबर घेऊन ते पायरस्त्यानें आजऱ्यास येऊन तेथील देवालयांत रात्री वस्तीस राहिले होते इतक्यांत तेथें असा प्रकार घडला कीं, त्या गांवांत एक मोठ्या सावकाराचा एकुलता मुलगा दुखण्यानें बेजार झाला होता. पुष्कळ औषधोपचार केले परंतु गुण नाहीं. तेव्हां वैद्यांनी निराश होऊन कांहीतरी दैविक उपाय करून पाहण्याविषयी सावकारास सांगितलें; त्याप्रमाणें त्यांनीं प्रयत्न चालविले व बापूमहाराजांची कीर्ति ऐकून तो आपल्या घरांतील मंड-ळींसह त्या देवालयांत आला आणि अत्यंत विलाप करूं लागला. त्याबरोबर बापूमा-मानीं कारण विचारून घेतलें आणि सांगितलें कीं ' तुमचा मुलगा आजपासून पांचवे दिवशीं मरेल. त्यापूर्वी जर यत्न झाला तर वाचेल; पण तुह्मी तो उपाय कराल असे दिसत नाहीं. ' हे ऐकून तो सावकार फारच खिन्न झाला आणि बापू-महाराजांच्या पायांवर लोळण घेऊन म्हणाला; महाराज माझा एकुलता एकटा मुलगा तेव्हां त्याचेसाठी सर्वस्व जरी हरण झाले तरी चिंता नाहीं करितां कांहीं उपाय असल्यास सांगा ? अशी त्याची दीनस्थिति पाहून बापू ह्मणाले.

' दोन वर्षांपूर्वीं तुम्हीं एक दगडी वाडा बांधिला आहे. तो बांधतेवेळीं संध्या-काळीं गवंडीलोक भिंतीचे दोन्हीबाजूचे दगड लावून घरीं गेले. त्यावेळीं त्या दग-डाच्या फटीमध्यें एक मोठा सर्प येऊन राहिला. सकाळीं गवंडी आल्यावर त्यांत

त्यांनी चुना, चिपा वगैरे भरून भित पुरी केली; त्यामुळे सर्प आंतच राहिला. त्यास आज दोन वर्षें झाली. तो सर्प त्याठिकाणी जसजसा क्षीण होत चाललेला आहे तसतसा मुलगाही सुकत चालला आहे. सर्प आजपासून पाचवे दिवशी मरेल व मुलगाही त्याच दिवशी मरेल, आणि जर सर्प निघेल तर मात्र मुलगा वाचेल ' असे सांगितले. तेव्हा तो सावकार सर्व घर पाडण्यास तयार झाला; पण साधु म्हणाले ' सर्व घर पाडण्याचें कारण नाही. तो अमूक दिशेस अमक्या हातावर आहे, तितकीच भित खणल्यावर मिळेल व तो अतिशय कृश झालेला आहे. तरी बाहेर निघाल्याबरोबर वारा लागताच तो हुशार होईल आणि पधरावे दिवशी त्यास चांगली चालण्याची शक्ति येईल; नंतर त्यास दूध पाजून लांब रानात नेऊन सोडावा. असे झाले म्हणजे तुझा मुलगाही चांगला होईल. त्यास औषध वगैरे दुसरें कांही नको ' असे सांगताच त्या मंडळीस आश्चर्य वाटलें व दुसरे दिवशी त्यांनी बापूमामास रहाण्याविषयी पुष्कळ आग्रह केला पण ते राहीनात, तेव्हा त्यास काहीतरी द्रव्य, चीजवस्त वगैरे देऊं केले तेही त्यांनी नाकारिलें फक्त त्यांना तंबाकूचा हुक्का पिण्याची सवय होती तो मात्र दिला. सकाळी ते तिकडून सर्व मंडळीसह पुढें जाण्यास निघाले. नंतर सावकारानी ती भित खणून काढिली आणि बापूमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे त्यातून एक मृतप्राय झालेला सर्प काढला तो केवळ काष्ठवत् होता, बाहेरील हवा लागताच तो जरा सावध होऊं लागला, आणि पुढे पधरावे दिवशी त्यास चालण्याची शक्ति आली नंतर दूध पाजून त्यास सोडून दिला. इकडे सावकाराचा मुलगाही चांगला सुधारला, मग त्याच्या आनंदास काय पारावार असणार? असो. पुन्हा यात्रा करून साधू बापूमामा त्याच रस्त्याने परत आले. तेव्हा सावकारानें झालेली हकीकत सांगून तो मुलगा त्यांच्या पायावर घातला हल्ली त्या सावकाराचे घराण्यात बापूमामाची पुण्यतिथ होत असते.

गोवेंप्रांतात पणजी येथे एक सुखवस्तु गृहस्थ रहात असत. त्याच्या कुटुंबामध्ये लहानथोर सुमारे ८० माणसें होती. कोंकणची हवा बरीच उष्ण असल्यामुळे त्या प्रांती तांदळाची पेज जेवण्याचा प्रचार आहे. त्याप्रमाणे त्या गृहस्थाचे घरी सकाळच्या प्रहरीं आठ वाजता पेज जेवण्याची तयारी चालली होती. त्या पेजेमध्यें वरून सर्पाचे गरळ पडलें होते. त्याची कोणास माहिती असणे शक्य नव्हतें. नंतर एका बाईनें ती पेज पळीने ढवळून सर्वांस वाढण्याची तयारी केली, इतक्यांत साक्षात् परमेश्वराप्रमाणे तेथें बापूमहाराजांची स्वारी एकदम उभी ठाकली, आणि त्यांनी पेज

वाढणाऱ्या बाईस सांगितलें; " बाई, ह्या पेजेमध्यें सर्पाचें विष पडलें आहे, तस्मात् ती वाढूं नका. " मग त्या बाईस आश्चर्य वाटून तिनें ही गोष्ट घरांतील मुख्य यजमानास कळविली. त्यानें येऊन पेजेच्या भांड्यांत पाहिलें तों त्यांत खरेंच विष दिसलें ! मग ही हकीकत कोणी सांगितली, तो माणूस कोठें आहे ? वगैरे शोध करितात, तों इतक्यांत तेथें बापूमामा नाहींत ! ! आजूबाजूस पुष्कळ शोध केला परंतु पत्ता नाहीं. इकडे शिरवड्यासही तास दोन तास स्वारीचा पत्ता नव्हता. शिरवड्याहून पणजीस बारा कोशाचें अंतर आहे. त्यांनाही पेज घेण्याची संवई होती. तेव्हां ते घरी येऊन म्हणाले, गोव्यांस पणजी येथे एका गृहस्थाचे घरी पेजेमध्यें सर्पाचे विष पडले होतें. त्यांस पेज घेऊं नका, घ्याल तर मराल; म्हणून सांगण्यासाठी गेलों होतो. पुढे दुसऱ्या दिवशी बातमी आली कीं, बापूमामानें पेजेंत विष म्हणून सांगितलें आणि कोठें नाहींसे झाले त्याचा पत्ता नाही. ' तेव्हां सर्वांची खात्री पटली. याप्रमाणे हे चाळीस माणसांचें कुटुंब त्यांनीं राखिले. नाहींपेक्षां किती अनर्थ झाला असता !

पांडुरंगराव दळवी नांवाचे एक गृहस्थ आरवली येथें रहात असत. ते त्या गांवचे मुख्य पाटील होते; परंतु दुर्दैवाने पुढे त्यांचा वंश चालण्यास मुलगा वगैरे कोणी आधार नव्हता. अशास्थितीत पांडुरंगरावांचा अंत झाला; यामुळे घरांतील व गांवांतील मंडळींचा एकच आक्रांत झाला. पांडुरंगराव हे आरवलीच्या वेतोबाचे तीव्र उपासक असून तेथील देवकृत्यांत याचा पहिला मान असे; तेव्हां अशा श्रेष्ठ माणसाचा निर्वंश होणें इष्ट नाही असें बापूमहाराजांच्या लक्षांत आलें, आणि सदर दळवी यांचे प्रेत अग्निसंस्कारार्थ स्मशानात घेऊन जात असतां मार्गांतच गांठून म्हणाले, " अरे याला कोठे नेतां; यास अद्याप चार मुलगे व्हावयाचे आहेत, निघा मागें. " याप्रमाणे सागून ते प्रेत परत घरीं आणविलें व त्याचे दोर वगैरे सोडून मोकळे केले; नंतर त्यानीं ' त्याच्या मस्तकास थोडें तांबड्या नारळाचें तेल चोळण्यास सांगितलें ' त्याप्रमाणें तेल चोळतांच पांडुरंगराव प्रेतत्वदशेंतून मुक्त होऊन सजीवस्थितीत उठून बसले ! ! याप्रमाणें बापूमामांनी आरवलीचे प्रसिद्ध दळवी घराण्याचा वंश कायम राखला ! हल्लीं त्यांची घराणीं त्या प्रांतीं व ग्वाल्हेर, बागणी, हलकर्णी वगैरे ठिकाणीं सुखानें नांदत आहेत. या घराण्यांतील पुरुष अद्याप बापूमामाची पुण्यतीथ पाळतात.

बापूमहाराज शिरवडे येथें ज्या कामतीच्या घरांत राहत असत त्या घरचा कोणीएक

पुरुष बाहेरछंदी विषयी होता. त्याचेच शेजारीं एका वेश्येचें घर होते; त्याठिकाणीं आण्याचा त्याचा क्रम होता. हें त्याचे बायकोस वाईट वाटे पण इलाज नव्हता. एकेदिवशीं नित्यक्रमाप्रमाणे पोषाख करून तो वेश्यागृहीं जाऊन मंचकावर बसला होता. इतक्यांत त्याची बायको आपला पती कोठें गेला, काय प्रकार चालला आहे हें गुप्तरीतीनें पहावे म्हणून तेथे गेली, आणि ज्या खोलींत मंचक होता त्याचे बाहेरील खिडकीतून बारकाईनें आंत पाहूं लागली. तों ती वेश्या त्या खिडकी-पाशींच होती; तिनें तिला पाहून तोंड मुरगळिले व तिला पाहिली न पाहिली असें करून एका पेल्यांत पाणी होते ते तिच आंगावर फेकले; तेव्हां ती बाई फार दुःखी होऊन घरी आली आणि बापूमामा घरी होते त्यांस झालेली सर्व हकीकत कळविली. तेव्हां बापूमामा तिचे सांत्वन करून म्हणाले; 'तूं दुःखी होऊं नकोस. तिनें तुझ्या-वर ते पाणी टाकले नाहीं तर आपल्याच आंगावर टाकून घेतले आहे.' असें म्हण-तांच ती शांत होऊन घरांत गेली. सांप्रत त्या वेश्येचें घर कामत यांचे घराशेजारीं असून त्या घराण्यांत ज्या वेश्या उत्पन्न होतात त्यास बायकांनां अंगावर होण्याचा जो रोग तो उत्पन्न होतो व त्या पूर्ववयांतच अंतरतात. हा प्रकार हल्लीं चालूं आहे व त्यांना देखील हा साधूचा प्रकोप म्हणून माहित आहे. त्याचे निरसनार्थ त्यांनीं पुष्कळ उपाय केले पण त्याचा कांहीही उपयोग झाला नाहीं.

याप्रमाणे ह्या साधुमहाराजांची लीला त्या प्रांतीं चालली असतां सावंतवाडीस श्रीमंत राजे रामचंद्रराव सावंत, जयराम सावंत, सोमसावंत व नंतर खेमसावंत ऊर्फ राजेश्री[1] यांच्या कारकीर्दी झाल्या. त्या कारकीर्दींमध्ये कांहीं महत्वाच्या गोष्टी घड-ण्याचा प्रसंग आल्यास ते बापूमामास विचारल्याशिवाय करीत नसत. वाडीसरकार रेडी येथे यशवंतगड किल्ल्यानजीक आरमार ठेवून समुद्रांत चांचेपणा करीत असत. त्या प्रत्येक मोहिमेचेवेळीं ते बापूमामाची परवानगी विचारीत; पण त्या कामाविषयीं त्यांची कबुली नव्हती, आणि अखेरीस हेच वाडीसरकारच्या राज्यास अपायास कारण झाले. या समुद्रातील मोहिमेस एकवेळ अत्याग्रहानें बापूमामानें निरोप दिला व जातेवेळीं राजे खेमसावंत यांस सांगितले कीं, "या हल्ल्यांत तुम्हांस एक मोठें तिरकटी तारूं मिळेल. त्यांत काळा व पांढरा असे दोन घोडे मिळतील. तारवावरून उतरतेवेळीं काळा घोडा मरेल, तो तुम्हास लाभणार नाहीं. तो घोडा अति उत्तम

---

१ खेमसावंत यांचे कारकीर्दीत दिल्लीपति बादशहाकडून यांस राजेबहादराचा किताब मिळाला म्हणून यांस 'राजेश्री' असें म्हणत.

आहे; याशिवाय आणखीही फायदे होतील. " त्याप्रमाणें घोडे, धान्य, द्रव्याने भरलेलें असें एक मोठें युरोपियन व्यापाराचे तिरकटी तारूं सापडले. साधूंनीं सांगितल्याप्रमाणे काळा घोडा तर मेलाच व पांढरा घोडा आणि द्रव्य वगैरे मिळाले. त्या तारवावर जीं माणसें मडमा वगैरे मंडळी होती त्यास उतरून सावंतवाडीस नेऊन त्यांचा चांगला सन्मान केला. त्या लोकांना आपण शत्रूच्या हाती सांपडल्याची मोठी भीति होती; परंतु राजाच्या इतमामावरून ते मोठे खुष झाले. यावेळीं त्या प्रांती मोठें दुर्भिक्ष होतें तरी हें गलबत मिळाल्यामुळे हजारों माणसांचे प्राण वांचले. त्या गलबतावर धान्य विपुल होतें, पण अजाण लोकांनी एकीकडूनच धान्य उसपण्याचा तडाखा चालविल्यामुळें अर्धे अधिक धान्य गलबतासह उलटून पाण्यात पडलें त्यामुळें मोठी खराबी झाली; त्याकाळीं वाडीसरकार राजे खेमसावंत हे लहान असल्यामुळें सर्व राज्यकारभार त्याचे चुलते सोमसावंत ऊर्फ आबासाहेब हे पाहत असत; तेव्हा त्यांनी एकदा अशी मसलत केली कीं, 'हा साधु बहुतेक देवाप्रमाणें अद्भुत कृत्यें करितो, तेव्हा कदाचित् हे राज्य सुद्धा तो आपण घेईल किंवा दुसरा कोणीतरी राजा करील, अशी त्यास भलतीच कांक्षा उत्पन्न होऊन भीति पडली व बापूमामास प्रतिबंधात ठेवण्याच्या इरादाने त्यांस बांधून आणण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणे सरकारच्या शिपायांनीं येऊन ती हकीकत बापूमामास कळविली, आणि त्या शिपायासही त्याची योग्यता माहीत असल्यामुळे ते थरकांप भिऊ लागले; पण निरुपायास्तव त्यांनी सरकारचें वारंटसमन्स साधूच्या पुढें ठेविले. त्यात शिपायांस खर्चास वराय व जेवण द्यावें असें लिहिले होते; नंतर हुकुमाप्रमाणें बापूमामांनीं घरातून एक पसाभर मोहरा आणून त्या शिपायास दिल्या, त्याबरोबर ते फार खुष झाले. मग ते शिपायाबरोबर येण्यास निघाले; परंतु त्याचे हात बांधण्यास शिपायास धैर्य होईना; मामा तर हुकुमाप्रमाणें बांधण्यास आग्रह करूं लागले. असें करतां करतां ते वाडीनजीक मळगावचे रानांत गेल्यानंतर केवळ राजास दाखविण्यासाठीं त्याचे हात बांधण्याचें कबूल केलें. विश्रांतिसाठीं कांहीवेळ तिकडे थांबण्याचा सर्वांनीं बेत केला; इतक्यात त्या रानात कांही पारधीलोक शिकारीसाठी हिंडत होते; त्यांना बराचवेळपावेतों शिकार सांपडली नव्हती; तेव्हां बापूमामा त्या लोकांस म्हणाले, बाबांनो, तुम्ही विनाकारण कां फिरता? ही पहा दोन श्वापदें तुमच्यासाठीं वेलींत अडकून ठेविलीं आहेत, त्यांतील एक तुम्ही घ्या व एक तेथेंच ठेवा. " असें म्हणून त्यास दोन मृग दाखविले. हें पाहून बरोबरच्या सरकारी शिपा-

यांस फार आश्चर्य वाटलें, आणि त्यांचे हात वगैरे न बांधतां ते तसेच पुढें निघाले. सरकारवाला अगदीं जवळ येत चालला तेव्हां उगाच जरासे हात अडकविल्याप्रमाणें करून राजासमोर नेलें. इतक्यांत तेथें असा चमत्कार घडला कीं, बापूमामास बांधलेलें पाहतांच राजाच्या अंगाचा एकदम भडका होऊन त्यास असह्य वेदना होऊं लागल्या. सर्व लोक व राजा अगदी भयाभीत झाले व हा सारा परिणाम कशामुळें झाला असेल हे राजाच्या तेव्हांच लक्षांत येऊन तत्काळ त्याने बापूमामास बंधनांतून मुक्त केलें व त्यांना मोठ्या मानानें आसनावर बसविलें. त्याबरोबर राजाच्याही शरीराच्या वेदना कमी झाल्या; परंतु "विनाशकाले विपरीत बुद्धि" म्हणतात त्याप्रमाणें राजास असे वाटूं लागलें की, 'या साधूस आम्ही छळिलें आहे, अतएव ते त्याचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाहीत. तेव्हा यास मारून टाकणें बरें,' म्हणून त्या राजानें अविचारपणाने बापूमामास हुक्का पिण्याची सवई होती. त्या तंबाकूमध्यें वाघाच्या मिशा घालून ओढण्यास दिल्यावर हा मरेल अशा समजुतीनें वाघाच्या मिशा घालून तयार केलेली चिलीम त्यांना ओढण्याकरितां दिली! पण 'ज्याचा सखा हरी त्यास कोण मारी' त्यांनीं निःशंकपणे ती चिलीम ओढून फस्त केली; परंतु त्यापासून मरणे तर राहुद्याच पण त्यांच्या एका रोमास देखील धक्का पोंचला नाही!! उलट वाघाच्या मिशा घालून चिलीम ओढावयास दिली म्हणून राजास त्यांनीं विचारिलें व तसेच दरबारातून उठून चालते झाले

नंतर राजानें त्यांचा तपास करण्यासाठीं शेंकडो लोक, घोडेस्वार वगैरे लागोपाठ दवडिले, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाही. अखेरीस 'भांडवल जाऊन बुद्धि येते' म्हणतात तशी राजाची अवस्था झाली त्याच सुमारास शिरवडे येथें बापूमामाची बहीणही वारली होती. ही हकीकत समजताच सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें. पुढें हे साधु त्या राज्यांतून नाहींसे झाल्यावर एकामागून एक अशी भयकर संकटे येऊं लागलीं; तेव्हां मग मात्र राजास साधूची आठवण वारंवार होऊं लागली; पण उपयोग काय?

वर सांगितल्याप्रमाणे बापूमामा हे इ० स० १७७५ म्हणजे शके १६९३ चे सुमारास नाहींसे झाले, ते पुनः कोठेंच दिसले नाहीत व त्याचे प्रेतही कोठेंच सांपडलें नाही. हे जेव्हां नाहींसे झाले त्या दिवशीं ज्येष्ठ शु॥ १ प्रतिपदा होती म्हणून त्या तिथीस बापूमामाचा पाडवा असे त्या प्रांतीं म्हणण्याचा रिवाज आहे. ही पुण्यतिथि शिरवडे येथें दरसाल रा. रा. आत्माराम पांडुरंग कामत यांचे घरीं होत

असते. याचेळीं सर्व आजूबाजूकडील लोक मोठ्या प्रीतिनें भक्तिपूर्वक प्रसादास जमतात व त्यादिवशीं आरवलीतील वेताळदेवस्थानांतून पुराण, कीर्तन वगैरे उत्साह चालत असतो.

याप्रमाणें ह्या सत्पुरुषाची लीला प्रसिद्ध आहे; पण ते कवि असल्याबद्दल मात्र कांहीं माहिती नाहीं एकंदरींत असे साधुपुरुष दिवसेंदिवस अगदीं दुर्मिळ होत चालले आहेत हें उघड आहे. असो.

वाचकहो! येथपर्यंत जी ह्या थोर विभूतीची चरित्ररूपानें आपणांस ओळख करून दिली, त्यांवरून बहुधा आपल्या मनांत अनेकप्रकारच्या संशयाचें काहूर उठलें असेल; पण आम्हीं शिरोभागीं निर्दिष्ट केलेलें विधान आपल्या मनांत जर दृढ असेल तर कोणत्याहीरीतीच्या संशयास मुळींच जागा राहणार नाहीं; शिवाय ज्या कोणास प्रस्तुत चरित्राची साक्ष पटवून घेण्याची इच्छा असेल त्यांनी आरवलीस जाऊन प्रत्यक्ष अनुभव घ्यावा? तात्पर्य, अशारीतीचे अद्भुत दाखले घडविण्यांत परमेश्वराचा असा हेतु दिसतो कीं, 'प्रेमळ भक्तांची वृद्धि व्हावी, आणि त्यांना अखंड अशा प्रेमानंदाचा अनुभव मिळावा;' कारण, प्रेम हें साक्षात् आनंदाचा अनुभव घेण्याचें एक मोठें साधनच आहे या दृश्यसृष्टीत आनंदाचा अनुभव प्रेमामुळेच मिळतो; तेव्हां ज्यांच्या अंतःकरणांत भगवत्प्रेमच विशेषरीतीनें सांचलें आहे त्या विभूति खरोखर धन्य होत; आणि म्हणूनच आह्मी त्या वंदनीय मानल्या पाहिजेत.

---

# योगिराज सोहिरोबानाथ आंबिये.

"आपल्याबरोबर जगांतील इतर भागास ओढल्यावांचून एकही परमाणू रतिभर हालणें शक्य नाहीं. असा सप्रचीत शास्त्रीयसिद्धांत आहे. त्याचप्रमाणें एखादा मनुष्य साधु होऊन मानसिक व अध्यात्मिक उन्नतिप्रत पोहोंचला तर तो इतर सर्व जगाची उन्नतिही आपल्याबरोबर केल्यावांचून राहतच नाहीं.

महात्मे साधुसंतांचा अवतार जेव्हां पृथ्वीवर होतो तेव्हां त्यांचेबरोबरच इतर देशभक्त, राजकारणपटु विद्वान्, तत्ववेत्ते, कवि भक्त वगैरे निपजून भराभर पुढें येतात. कारण, हे सर्व त्या साधुसंतांचे नोकराप्रमाणेंच आहेत फक्त महात्म्यांचे व साधुसंतांचे विचार कृतीत उतरविणें एवढेंच यांचें काम असतें."

हे वर प्रथित केलेले स्वामी विवेकानंद महाराजांचे विचार किती अनुभवशीर आहेत हें प्रस्तुत चरित्रावरून सहज कळण्यासारखे आहे; कारण साखरेला जशा मुंग्या मिठाळतात त्याप्रमाणें आपण ज्या मायामय प्रपंचाला तद्रूपपणें बिलगलों आहोंत त्याच संसारांत शाश्वत सार आहे आणि तें सार किंवा आदितत्व संतसंगानेंच साध्य होणारें आहे; तेव्हां असें सामान्यजनतेचा कल पाहून आपल्या उपदेशाचें धोरण ठेवणारे व जगाचा उद्धार करणारे साधुसंत किती श्रेष्ठ असतील बरें! पौराणिककालीं जसा नारदमुनींनीं वाटमाऱ्या वाल्याकोळ्याला, त्याच्याच इच्छेनुरूप " मारा, मारा, " असा उलटा मंत्र सांगूनच त्याचा उद्धार केला. अशा जगाच्या कल्याणासाठीं अवतरलेल्या संतांच्या विभूति अत्यंत पवित्र होत. प्रपंचरूप विषांतून शुद्ध अमृत काढून त्याचा लाभ करून देणारे जर कोणी दलाल असतील तर हे साधुसंतच होत. त्यांना दलालीही फारशी द्यावी लागत नाहीं. नुसता खरा भाव दिला कीं, काम झालें! पण त्यांची गांठ पडण्याला मात्र पूर्वसंचितच पाहिजे. सुकृतलाभ जोडल्यावरही परमात्म्याची ओळख पटवून देणारे तेथले द्वारपाल हेच संत! फार काय, पण संतांच्या हृदयांत जसा ईश्वर, तसे ईश्वराच्या हृदयांतच जे संत, त्यांची योग्यता ईश्वराहून उणी कशी म्हणावी? तेव्हां अशांपैकींच एक थोर व परमपूज्य सोहिरोबानाथ आंबिये नांवाचे साधु या आपल्या भाग्यशाली देशांत अवतीर्ण झाले. त्यांचें थोडेसें चरित्र येथें देतों.

सोहिरोबानाथांचें कुळवृत्त फारसें मिळत नाहीं. हल्लीं त्यांचे जे वंशज आहेत त्यांनांही पूर्वीची फारशी माहिती नाहीं; तथापि त्यांच्या एकंदर वृत्तासंबंधीं जी त्रोटक हकीकत उपलब्ध आहे तीवरून असें कळतें कीं, त्यांचे पूर्वज मूळ गोमांतकप्रांतीं कुशस्थळ केळोशी ह्याठिकाणीं राहत असत पुढें पोर्तुगीजलोकांच्या राज्यक्रांतींत केवळ स्वधर्मरक्षणार्थ तेथून निघून ते वाडीसरकारचे राज्यांत पेडणें महालीं, " पालिये " म्हणून गांव आहे त्याठिकाणीं येऊन राहिले. तेथेंही म्हणण्यासारखी समाजशांतता नव्हती; तरी ' दगडापेक्षां वीट मऊ ' अशी स्थिति होती. तेथें गेल्यावर त्यांनीं उदरनिर्वाहार्थ त्यागांवची कुलकर्णपणाची वृत्ति सरकारांतून पत्करली, आणि त्या वेतनावर ते आपला कुटुंबनिर्वाह चालवूं लागले. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर शके १६३६ म्हणजे इ० स० १७१४ मध्यें वरील महापुरुषाचें जन्म झालें त्यांच्या बालपणासंबंधानें विशेषशी माहिती नाहीं तरी तात्पुर्तो मराठी अभ्यास करून त्यांनीं वडिलार्जित कुलकर्णपणाचीच वृत्ति स्वीकारिली होती; नंतर त्यांच्या कुटुंबांत

विभक्तपणा येऊन कांहीं माणसें सावंतवाडीनजीक बांदें म्हणून गांव आहे त्याठिकाणीं जाऊन राहिलीं. त्यांत चरित्रनायक सोहिरोबाही होते; पण सुदैवानें तेथेंही त्यांना वाडीसरकारांतून कुलकर्णपणाचीच वृत्ति मिळाली. ते जन्मापासून सात्विकवृत्तीचे असल्यामुळें द्रव्यार्जनास लागणारें असें व्यवहारपटुत्व त्यांचे अंगीं नव्हतें यामुळें त्यांस आपले दिवस फार विपन्नावस्थेंत काढावे लागत; तथापि त्यांचा ओढा प्रपंचापेक्षां परमार्थाकडे विशेष असल्यामुळें जुन्या संस्कृत व प्राकृतकवींचे ग्रंथ वाचून त्यांची विद्वत्ता बरीच वाढली होती. त्यांनीं कुलकर्णपणाचें काम बरीच वर्षें सचोटीनें केलें; परंतु अखेरीस त्यांना त्या कामाचा वीट आला; कारण ज्यांच्या हाताखालीं त्यांना काम करावें लागत असे ते त्यांचे मालक सुस्वभावी नव्हते; यामुळे 'चांगल्या व मधुर फळाला पक्षी फार टोंचतात' या जोनाथानस्विफ्ट'च्या उक्तीप्रमाणें चांगल्या माणसाचा छल दुष्टजनांकडून नेहमीं व्हावयाचाच. हा अनुभव, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास वगैरे सत्पुरुषांच्या चरित्रावरून उघड दिसून येतो; त्याप्रमाणें सोहिरोबांचाही त्यावेळच्या दुर्जनांकडून छल झाल्याशिवाय राहिला नाहीं, आणि हेंच त्यांच्या वैराग्यस्थितीस कारण झालें. त्यावेळीं वाडीसंस्थानचा सर्व कारभार मुख्य राजे खेमसावंत हे अल्पवयी असल्यानें त्यांचे चुलते सोमसावंत उर्फ आबासाहेब पहात असत. यांच्या दुष्टस्वभावाची थोडीशी दिशा सत्पुरुष बापूमहाराजांच्या चरित्रांत मागें दाखविलीच आहे; तेव्हां पुनः त्याचें दिग्दर्शन करणें अप्रस्तुत होय; तरी ते स्वतः अत्यंत दुष्ट, कपटी व पहिल्याप्रतीचे मद्यपी होते प्रजाजनांकडून कराचे पैसे वेळेवर वसूल न झाल्यास 'सराफकट्टा' म्हणून एक जागा होती, तेथें त्या गांवच्या कुलकर्ण्यास नेऊन त्याचा नानातऱ्हेनीं छल करावा, त्याच्या पोटावर धोंडे ठेवावे, प्रसंगीं त्याचा प्राण गेला म्हणूनही पाहू नये! अशी बेबंदशाही चालू होती. अशातऱ्हेने एकदां सोहिरोबांच्या पोटावरही दगड ठेवण्यास तो नराधम यत्किंचितही मनांत दचकला नाहीं! एकेदिवशीं तर आबासाहेबांनीं कांहीं निमित्तानें सोहिरोबांस वाड्यांत बोलावून नेऊन एका खोलींत कोंडून ठेविलें; आणि 'देव दाखव नाहीं तर ठार मारतों' अशी त्यांस धमकी दिली; तेव्हां सोहिरोबांनीं भक्तिपूर्ण अंतःकरणानें दयाघनाचा सारखा धांवा सुरू केला. त्याबरोबर तेथें असा चमत्कार झाला कीं, त्या खोलीच्या भिंतीतून एकाएकीं ज्वाला उत्पन्न होऊन तिच्या

---

१ या गांवीं पूर्वीं विजापूरबादशहाचा सुभा होता. त्यावेळीं या गांवास मुर्दिलाबाद असें म्हणत. त्यावेळच्या इमारती अद्याप तेथें दिसतात.

तेजानें आबासाहेबांचे डोळे दिपून गेले! असा हा अद्भुत प्रकार पाहतांच त्यास आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊन सोहिरोबांच्या साधुत्वासंबंधानें त्याची खात्री झाली; नंतर सोहिरोबा त्यास ह्मणाले. आबासाहेब! 'तुमच्या या कृत्यामुळें परमेश्वरास मोठा राग आला आहे व ही ज्वाला हें त्याचें चिन्ह होय; तेव्हां आम्हां उभयतांतून कोणातरी एकाचा बळी घेतल्यावांचून ही ज्वाला शांत होणार नाहीं.' असें ऐकतांच आबासाहेब ताबडतोब खोलींतून बाहेर पडले व सोहिरोबाही तेथून निघून आपल्या गांवीं गेले. पुढें थोड्याच दिवसांनी सोहिरोबांचें वरील भविष्य अक्षरशः खरें झालें. कांहीं कारणपरत्वें उदास होऊन कुडाळ येथें तोफेच्या दारूच्या पिंपावर बसून त्यास स्वतःच आग लाविली व अशा भयंकररीतीनें आबासाहेबांनीं आत्महत्त्या करून इहलोकांतली आपली निंद्य कारकीर्द पूर्ण केली! +

इकडे सोहिरोबा बांद्यास गेल्यावर सरकारी नोकरी सोडण्याचा निश्चय करून आपल्या घरीं स्तब्ध राहिले हे वर्तमान राजा खेमसावंत यांस कळतांच त्यांनीं सोहिरोबास बोलावून आणिले दरबारांत येतांना त्यांची जी पहिली चर्या होती ती न दिसतां त्यांच्या मुखावर अप्रतिम तेज दिसूं लागलें व खुद्द राजासह सर्व मंडळीस मोठा वचक वाटून राजानें झालेल्या छळाबद्दल क्षमा मागितली आणि 'महाराज, आमच्यावर राग नसावा' म्हणून प्रार्थना केली; तेव्हां सोहिरोबा म्हणाले, 'राग कशाचा? आपले राज्यांत यापुढें दारूचे मक्ते देऊन लोकांस मद्यपी बनवूं नये व यापुढें आमचेकडून राजसेवा होणार नाहीं; याकरितां ही लेखणी सरकारच्या चरणापुढें ठेविली आहे.' असें म्हणून सोहिरोबा तेथून निघाले. पुष्कळ लोक त्यांस पोंचविण्यासाठीं कांहीं अंतरावर जाऊन परतले. यावेळीं वाटेंतून जातांना त्यांचें अंतःकरण ऐहिकसुखाविषयीं उदास होऊन अगदीं पश्चात्ताप पावलें होतें. वाडी आणि बांदें याचे दरम्यान मध्यंतरीं ३ कोसांचे अंतर होतें; तेव्हा मार्गामध्यें क्षुधा निवारणार्थ त्यांनीं एक रसाळा फणस विकत घेतला आणि वाटेंत 'इनसुली' म्हणून गांव आहे तेथें जवळच डोंगरांतून स्वच्छ झऱ्याचें पाणी वाहत होतें त्याठिकाणीं ते फणस फोडून खाण्याकरितां बसले त्यावेळची तेथील आजूबाजूची हिरवीगार वनशोभा, चित्रविचित्र पक्षांचे मंजुळ शब्द आणि त्यांची ती स्वच्छंद चाललेली क्रीडा, अशा तऱ्हेची ती निवांत सृष्टिप्रतिमा अगोदरच पश्चात्तापानें तावून सुलाखून शुद्ध झालेल्या सोहिरोबांच्या अंतःकरणावर उमटतांच ईश्वराचें अगाध कर्तृत्व ध्यानीं

+ सावंतवाडीचा इतिहास–भूगोल पहा.

येऊन त्यांचा कंठ दाटून आला व नेत्रांतून टपटप अश्रुधारा वाहूं लागल्या; आणि ईश्वरप्राप्तीविषयीं त्यांचे मनांत तीव्र जिज्ञासा उत्पन्न झाली अशास्थितींत फणस पुढें ठेवून त्या शुभ्र निर्झर प्रवाहासंनिध जाऊन हातपाय धुऊन ईश्वरस्मरणपूर्वक आतां गरे खाणार इतक्यांत तेथें असा चमत्कार झाला कीं, "बाबू हमकूं कुछ देताहै!" असा गंभीरध्वनी अकस्मात् त्यांच्या कानीं पडला. त्याबरोबर चकित होऊन ते त्या गर्दझाडीकडे आश्चर्ययुक्त पाहूं लागले. आसपास कोणी मनुष्य दिसत नसतां हा ध्वनी कोठून आला याचें सोहिरोबांस आश्चर्य वाटलें; अथवा आश्चर्य कसलें? सोहिरोबा मूळचेच ईश्वरभक्त आणि त्यांत हल्लीं तर प्रापंचिक अनेक व्यथांनीं पश्चात्तापपूर्वक त्यांचें अंतःकरण शुद्ध गंगोदकाप्रमाणें निर्मल होऊन ईश्वरप्राप्तिविषयीं उत्कंठित झालें होतें! मग अशास्थितींत भक्ताचा पाठिराखा जो ईश्वर, तो त्यांचेवर अनुग्रह करण्यासाठीं त्या गर्दझाडींत प्रत्यक्ष अवतरून त्यानेंच हा शब्द केला म्हणण्यास कांहीं हरकत नाही! इतक्यांत शरीरानें धिप्पाड, दिगंबर, सर्वांग भस्मचर्चित, अत्यंत तेजस्वी अशी अवधूतवेषानें कोणीएक सत्पुरुषाची मूर्ति अलखनाम पुकारीत सोहिरोबांच्या सन्मुख उभी ठाकली. हा कोणीतरी महापुरुष आहे असी त्यांची खात्री होऊन त्यांनीं त्यांस साष्टांग नमस्कार घातला; तेव्हां तो सत्पुरुष म्हणाला, 'बाबू हमकूं कुछ देताहै?' त्याबरोबर सोहिरोबांनी तत्काळ आपल्या पुढ्यांतील फणसाचे गरे त्यांचेपुढें ठेविले; पण तो साक्षात् ईश्वर भक्तोद्धारार्थ प्रकट झालेला त्यास क्षुधा कोठली? त्यानें त्यांतील कांहीं गरे खाल्ले आणि बाकीचे प्रसाद म्हणून सोहिरोबांस दिले व त्यांच्या मस्तकीं आपला वरदहस्त ठेवून उपदेशद्वारां त्यांस कृतार्थ केलें आणि तत्काळ तेथून अदृश्य झाला! त्याबरोबर सोहिरोबांची वृत्ति तत्क्षणींच ब्रम्हरूप होऊन त्यांना सर्व विश्व ब्रम्हमय दिसू लागलें. ही गोष्ट त्यांच्या वयाच्या ३५ साव्या वर्षी घडली.

सोहिरोबांनीं दिलेले गरे भक्षण करून त्यांस ब्रम्होपदेश करणारे दिव्यदेही सत्पुरुष कोण होते, यासंबंधानें त्यांनी स्वतः आपल्या कवितेंत 'गैबीप्रसादें गैबीच झालों' वगैरे गहिनीनाथ किंवा गैबनाथ या नांवाचा उल्लेख केलेला आहे. हा नाथमेळा

+ सोहिरोबा आंबियेकृत पदसंग्रह पृष्ठ २।८।१३५.

१ हे गहिनीनाथ किंवा गैबीनाथ नाथसांप्रदायी होते हे त्यांच्या नांवावरून सिद्ध होतें त्यांचें चरित्र 'नवनाथभक्तिसार' ग्रंथांत दिलें आहे. तें असें—'प्रसिद्ध नऊ नाथांपैकीं मच्छिंद्रनाथ यांनीं आपले शिष्य गोरखनाथ यांस एकेदिवशीं 'संजीवनी'

बराच मोठा असून मच्छिंद्र, गोरख, जालंधर, गैबनाथ, मल्लीनाथ, पूर्णनाथ, गोपाळ-नाथ, कानिफ वगैरे महान् सत्पुरुष त्यांत फारच प्रसिद्ध आहेत. हा नाथसांप्रदाय मूळ श्रीशंकरापासून उत्पन्न झाला असून गोरखनाथ तर प्रत्यक्ष श्रीमहादेवाचे अव-तार अशी कथा आहे. हा मेळा श्रीदत्तनामोच्चार करितो. या मेळ्यांपैकीं कांहीं

---

मंत्राची संथा देऊन 'हा मंत्र एकांती पठण करीत जा' अशी त्यांस आज्ञा केली. त्याप्रमाणें गोरखनाथ मंत्रपठण करीत बसले असतां त्याठिकाणीं गांवांतलीं कांहीं मुलें जमलीं व त्यांनीं आपणांस एक मातीचें चित्र करून देण्याविषयीं त्यांस विनंति केली; त्याप्रमाणें गोरखनाथानें मातीचें चित्र करण्यास आरंभ केला. तें चित्र तयार करीत असतांना त्यांचें संजीवनीमंत्राचें पठण चालूच होतें; त्यामुळें तें चित्र तयार होतांच त्यांत चैतन्य उत्पन्न होऊन ते माणसासारख्या चेष्टा करूं लागलें. हा विलक्षण प्रकार पाहतांच तीं सर्व मुले "भूत भूत" म्हणून ओरडत वाट फुटेल तिकडे पळत सुटलीं व गोरखनाथही घाबरले; तेव्हां ही काय गडबड आहे म्हणून मच्छिंद्रनाथानी चौकशी केली तों झालेला प्रकार त्यांच्या ध्यानांत आला. नंतर त्यांनीं हा सारा परिणाम संजीवनीमंत्राचा आहे, भूत वगैरे कांहीं नाहीं; असें सांगून त्या मुलांची व गोरखनाथांची समजूत केली व ते उत्पन्न झालेलें बालक घेऊन आपल्या मठांत आले. तेथे त्या बालकास नाथांनीं दूध वगैरे पाजून त्याची योग्य व्यवस्था ठेविली. ही हकीकत गांवांतील सर्व लोकांस कळतांच ते मच्छिंद्रनाथांच्या मठांत आले आणि 'बालक कोणाचे?' म्हणून विचारिलें, तेव्हां मच्छिंद्रनाथांनीं झालेली इत्थंभूत हकीकत कळविली; तेव्हां नाथांच्या सामर्थ्याबद्दल लोकांस फार आश्चर्य वाटलें. मग त्यांतील कांहीं लोक नाथास म्हणाले कीं, हें बालक 'गैबीनंदन आहे' (गैबीनंदन म्हणजे ज्यास आईबाप नाहीं तो. गैबी—गहाळ झालेला) याचें योग्य संगोपन आपल्यासारख्या विरक्त माणसाकडून होणें अशक्य आहे; याकरितां जिला कांहीं मूलबाळ नाही अशा एखाद्या स्त्रीस हें मूल दिल्यास ती त्याचा चांगला प्रतिपाळ करील. ही सूचना नाथांस पसंत पडली आणि त्यांनीं तें बालक त्या गांवांत मधु नांवाचा एक ब्राम्हण रहात होता. त्याच्या स्त्रीस अर्पण केलें. तिनें तो मुलगा चांगल्यारीतीनें लहानाचा थोर केल्यावर त्यास मच्छिंद्र-नाथांनीं मंत्रोपदेश केला. तेच हे सोहिरोबांचे गुरु "गहिनीनाथ किंवा गैबनाथ" होत. यांची समाधी गर्भागिरी नामक पर्वतावर असून हिंदुलोक यांना 'गैबिनाथ' व मुसलमान 'गैबीपीर' असें म्हणतात. "कविचरित्र."

अधिकारीलोक तीर्थयात्रा करीत जे ईश्वरभक्त, सभाग्य, मुमुक्षु आढळतील त्यांवर कृपामृत सिंचन करीत जगाचा उद्धार करितात; अशी याजबद्दल प्रसिद्धि असून हा मेळा चिरंजीव मानला गेला आहे. महीपतीनेही आपल्या भक्तिविजयग्रंथांत ह्या नाथसांप्रदायाबद्दल वर्णन केलें आहे. असो.

सोहिरोबांस सद्गुरुप्राप्ति झाल्यावर त्यांचा लौकिक फार वाढला, आणि ते स्वतःचा काळ ईश्वरार्चन व काव्यरचना करण्यांत घालवूं लागले. योग्य गुरू मिळून त्यांची प्रपंचावरील इच्छा एकदम उडाली, यावरून त्यांची पूर्वीपासूनच परमार्थविषयांत चांगली तयारी झाली होती असें वाटते. ते योगी असूनही त्यांच्या हातून लोकांस चकित करून सोडणारे असे कांहींच चमत्कार झाले नाहींत. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' म्हणतात त्याप्रमाणे त्यांनीं अनेकांचें पारमार्थिक हित करण्यांत आपलें सारें आयुष्य वेंचिलें. "**ह्मणे सोहिरा गुरुनाथ हा माझे हृदयीं घुसून; । जनासि उद्धरावयाकारणें वचन सांगतो कसून ॥**"[1] अशा सदुपदेशांनीं अज्ञजनांना ताळ्यावर आणीत बरेच दिवस ते त्या प्रांतीं राहिले. कधीं कधीं त्यांना त्यांच्या बालमित्रानीं बोलाविल्यास ते त्यांचे येथें जात येत असत व त्यांस सदुपदेशाच्या गोष्टी सांगत. त्यांची वागणूक फार साधी होती. ते प्रत्यक्ष हयात असतां त्यांची योग्यता विशेषसी कोणास समजली नाहीं; परतु तुकारामाप्रमाणें मागाहून त्यांचा फार लौकिक वाढला

सोहिरोबांचे ब्रम्हतेज फारच विलक्षण होते, यासंबंधानें अशी गोष्ट सांगतात कीं, दादा रंगे ह्मणून त्यांचे कोणी आप्त आरवली गांवीं राहत असत. त्यांचे येथें केव्हां तरी जाण्याचा सोहिरोबांचा क्रम होता व दादांचीही त्यांजवर प्रीति होती. ते अतिपरिचयानें सोहिरोबास वारवार म्हणत 'सोहिरोबा, आतां तूं देवभक्त साधु झालास. आम्हांस तरी थोडे ब्रह्म दाखीव' हें ऐकून सोहिरोबांनीं स्तब्ध रहावें असें बरेच दिवस चाललें. एकदां ते दादाच्या घरीं आले असतां नित्याप्रमाणें दादांनीं ब्रम्हाविषयीं विनोद करितांच, सोहिरोबा 'बरें तर पुढील खेपेस ब्रम्ह पाहण्यास तयार असावें.' असें सांगून बांद्यास निघून गेले. पुढें नेहमीप्रमाणें दादाच्या घरीं येत असतां ब्रम्ह पाहण्यास उत्सुक झालेले दादा तेथें बाहेर ओट्यावरच होते. त्यानीं सोहिरोबांस येतांना दुरून पाहिले. तें त्यांचें अपूर्व ईश्वरीतेज पाहून दादासाहेब घाबरले, आणि

---

१ पदसंग्रह पृ० ५१.

एखाद्या लहान मुलाप्रमाणें पळून जाऊन घरांत दडून बसले. इकडे सोहिरोबा ब्रह्म पाहण्याविषयीं दादास हांका मारूं लागले; पण त्यांच्यापुढें जाण्यास दादांची छाति होईना. पुष्कळांनीं त्यांना सांगितलें पण व्यर्थ. अखेरीस सोहिरोबा तसेच तिकडून परत निघाले व पुनः कधींही ते त्यांच्या घरीं गेले नाहींत; तेव्हां या [1]एका गोष्टी-वरून सोहिरोबाचें वास्तविक सामर्थ्य केवढें होते हें सहज दिसून येईल.

याप्रमाणें वाडीप्रांतीं बरेंच दिवस वास्तव्य केल्यावर, उत्तरहिंदुस्थानांतील पुण्य-क्षेत्रे पहावी व तिकडील साधुसंतांच्या भेटीचा लाभ घ्यावा या उद्देशानें ते आपल्या वयाच्या ६० व्या वर्षी म्हणजे शके १६९६ च्या सुमारास बरोबर आपल्या दोघां मुलांस घेऊन निघाले. जातांना घरामध्यें वडील मुलाची बायको व तिचा एकुलता एक मुलगा ( नातू ) इतकींच कायती दोन माणसे होतीं, आणि तो मुलगाही दुखण्याने बेजार होता. अशास्थितींत त्यांच्या मोहपाशांत बद्ध न होतां सोहिरोबा, ' आह्मीं आतां येतो ' असें सूनबाईस सांगून निघाले. त्यांचें हे भाषण ऐकतांच तिला एकदम रडूं कोसळलें; कारण यापूर्वी सोहिरोबा कधीं बाहेर जावयाचे असले म्हणजे घरांत कोणास न सागतां मनास येईल तेव्हां उठत आणि चालते होत. असे असतां आजच यांनी ' आम्ही येतों ' असें जेव्हां म्हटलें त्याअर्थी फारकरून यांचे येणें पुनः होणार नाहीं असे तिला वाटून मोठ्यानें विलाप करीत ती त्यांना म्हणाली, ' माझा एकुलता एक मुलगा, आणि तोही आसन्नमरणास्थितींत आहे व आपण तर सगळे जाण्यास निघालां ! तेव्हां माझी वाट काय ! ' असे हें करुणरस-परिप्लुत भाषण ऐकून सोहिरोबा जरी परमज्ञानी असून त्यांनीं मायाजालाचा त्याग केला होता तरी यावेळी त्यांचा कंठ भरून आल्यावांचून राहिला नाहीं. हावेळपर्यंत त्यांना आपल्या नातवाची अवस्था माहीत नव्हती; परंतु त्यांनीं आपला जाण्याचा बेत थाबवून ते आपल्या नातवापाशीं जाऊन बसले, आणि परमेश्वराचा धांवा करून ह्मणाले कीं, ' देवा, आजपर्यंत तुझ्याशीं कांहीं मागितले नव्हतें; पण आज तुझ्या-वर संकट घालण्याचा प्रसंग आला आहे; तर या मुलास तूं आरोग्य दे ! ' असें म्हणून सोहिरोबांनीं आपला वरदहस्त मुलाच्या पाठीवरून फिरवितांच तो अगदीं चांगला झाला; नंतर सुनेची गोड शब्दांनी समजूत करून व तिचा निरोप घेऊन सोहिरोबा पुढें जाण्यास निघाले. त्यावेळीं प्रवासाचीं साधनें पायावांचून दुसरीं फारशीं नव्हतीं; यामुळें पादचारीच होऊन प्रयाग, काशी, गया वगैरे तीर्थें व पुण्यस्थळें

---

१ पदसंग्रह पृ० ५ व अक्षयबोध पुस्तक पृ० ५-६.

पहात पहात सोहिरोबा शके १७०१ म्हणजे इसवी सन १७७९ च्या सुमारास ग्वाल्हेरीस पोहोंचले; त्यावेळीं प्रसिद्ध राजकारणी व शूर सरदार महादजी शिंदे हे गादीवर होते. त्यांचे पदरीं जिवाजी बल्लाळ ऊर्फ जिवबादादा बक्षी हे प्रतापी व इतिहासप्रसिद्ध मुत्सद्दी सेनापति होते. शिंद्यांचे दरबारीं त्यांचें फार वजन असे. तेव्हां आपल्या प्रांतांतील कोणी साधुपुरुष ग्वाल्हेरीस आले आहेत असें ऐकतांच जिवबादादानीं मोठा सरंजाम पाठवून सोहिरोबास मोठ्या प्रेमानें आपल्या वाड्यांत आणिलें व त्यांची उत्तमप्रकारची बरदास्त ठेविली. सोहिरोबांची साधुवृत्ति पाहून जिवबादादांच्या मनांत मोठी पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. त्यांना असें वाटलें कीं, सोहिरोबांस शिंदेसरकारच्या भेटीस न्यावें म्हणजे त्यांचें साधुत्व व कवित्व पाहून ते खूष होतील आणि सोहिरोबास कांहींतरी द्रव्यलाभ होईल; परंतु द्रव्य-दारादि क्षणिक विषयासंबंधानें ते किती विरक्त होते याची कल्पना जिवबादादांस नव्हती; यामुळें त्यांनीं आपल्या गृहस्थरीतीस अनुसरून सोहिरोबांस म्हटलें, मी आज आपणांस शिंदेसरकारच्या दरबारीं घेऊन जाण्याचें ठरविलें आहे; तेथें आपला चांगला मानमरातब होईल आणि कदाचित् महादजी शिंदे यांनीं स्वतः कांहीं कविता रचिली आहे ती ते आपणास दाखवितील; तेव्हां 'कविता चांगली आहे' इतकें आपण म्हणा म्हणजे झालें.' हें जिवबादादांचें भाषण ऐकून सोहिरोबांस थोडें आश्चर्य वाटून ते म्हणाले, 'दादा, शिंद्यांची कविता चांगली असली तरच मी ती चांगली म्हणेन; परंतु ती वाईट असल्यास तसें स्पष्ट सांगेन. हें आपणांस कबूल असेल तर दरबारीं जाऊन शिंद्यांची भेट घेण्यास मी तयार आहे.' अशारीतीनें दोघांचें भाषण चाललें आहे इतक्यांत महादजीकडून जिवबास निरोप आला कीं, आपले इकडे आलेल्या सत्पुरुषांस बरोबर घेऊन आज दरबारास यावें. मग भोजनोत्तर जिवबादादा सोहिरोबास घेऊन दरबारीं गेले. तेथें महादजीनीं सोहिरोबांचा चांगला आदरसत्कार करून त्यांस सिंहासनावर बसण्यास विनंति केली; पण राजासनावर आपणासारख्यांनीं बसणें योग्य नाहीं असें दाटून ते दरबारांतच इतर मंडळींबरोबर बसले; नंतर थोडा-वेळ महादजीबरोबर भाषण झाल्यावर त्यांनीं आपल्या कवितांची वही आणवून सोहिरोबांपाशीं दिली व 'एवढ्या कविता वाचून पाहून कशा काय साधल्या आहेत तें सांगावें' म्हणून विनंति केली. त्याप्रमाणें सोहिरोबांनीं त्यांतील कांहीं कविता वाचून पाहिल्या, आणि 'कविता झाल्या आहेत, पण त्या प्रासादिक नाहींत. ईश्वराच्या गुणानुवादाशिवाय जी कविता ती आम्हांस नीरस व कंटाळवाणी वाटते.' असें हें

भरदरबारांतील स्पष्ट भाषण शिंद्यांस मुळींच रुचलें नाहीं, असें त्यांच्या मुद्रेवरून वाटलें; पण त्याबद्दल सोहिरोबाही मनामध्यें यत्किंचित् दचकले नाहींत, उलट आपल्या स्पष्ट उक्तीनें त्यांस वाईट वाटलें. हें लक्षांत आणून खालीलप्रमाणें पद्यरूपानें उपदेश केला.—

पद-( चाल लावणी. )

"अशाचखालीं गेला प्राण्या जन्म तुझा व्यर्थ। कवण मी हा कोठिल तुजला नकळे परमार्थ ॥ धृ० ॥ अरूप आत्मा ब्रह्मस्वरूपीं नलगे लक्षांश। अनेक शास्त्राधारें तुजला प्रियकर वाचांश ॥ जितुकी विद्या तितुका वृत्तीचा आढळतसे अंश। परंतु न दृष्टि न पाहे नाथसंकेती चिदंश ॥ अशाच० ॥ १ ॥ ह्मणे सोहिरा कणासि टाकुनि उपणीसी कोंडा। आत्मज्ञानीं अनावडी जशी अवरुचि तोंडा ॥ प्रायनदीचा हा तुजवरि आलासे लोंढा। वाहत जासील प्राप्त नव्हे धोंडा ॥ २॥ अशाचखालीं० ॥"

अशारीतीचीं सोहिरोबाच्या मुखांतून-एक दोन पदें ऐकतांच शिंदेसरकारचें मन चकित होऊन सर्व दरबारीमंडळींनीं माना डोलविल्या. त्याबरोबर महादजींचा क्रोध शांत होऊन पश्चात्तापानें त्यांचें अंतःकरण सद्गदित झाले व लागलींच त्यानें आपले कारभारी बाळोबातात्या पिंगे यांस या साधुवर्यांच्या मठासाठीं जमिनीची सनद, द्रव्य व पोषाख आणून देण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें एका सुंदर चांदीच्या तबकांतून भरजरी पोषाख, काहीं द्रव्य, जवाहिरांचे दागिने वगैरे आणून सोहिरोबापुढें ठेविलें; पण 'सोनें रुपें आम्हां मृत्तिकेसमान' अशी त्यांची पूर्ण चित्तवृत्ति असल्यामुळें त्यांनी त्या आसुरीसंपत्तिचा धिक्कार केला व महादजीस उद्देशून तेव्हांच एक हिंदुस्थानी पद रचून म्हटलें:—

पद-( प्राण्या राम भजावा रे-ही चाल. )

अवधूत! नहीं गरज तेरी। हम् बेपर्वा फकीरी ॥ धृ० ॥
तूं है राजा मैं है जोगी। पृथक पंथका न्यारा ॥
छत्रपती सब तेरेसरिखे। पांव नपरे हमारा ॥ १ ॥
तैं ढालीबन् हम झोलीबन्। चार कोट जहागीरी ॥
तीन तालमो दुवाय फिरती। घरघर अलख पुकारी ॥ २ ॥

सोना चांदी हमे नहिं चहिये । अलख भुवनके वासी ॥
महाल मुलुख सब ......बराबर । हम गुरुनाम उपासी ॥३॥
तैषी दुख हमे दुखावे । तेरा हम क्या लीया ॥
कहे सोहिरा सुनो महादजी । प्रकाश जोग कमाया ॥ ४ ॥

सोहिरोबानीं ग्रथित केलेले हे वरील पदांतील विचार अगदी योग्य व त्यांच्या वृत्तीस साजेसेच आहेत, कारण, आमच्या ह्या आसुरीसंपत्तीची साधुसंतांस कितीसी पर्वा असणार? वीतभर पोटाची खळी कशीतरी व केव्हांही भरली म्हणजे झालें. मग निजानंदीं गुंग असणें हाच त्यांचा व्यवसाय होय! त्यांच्या स्थितीची व राजाच्या स्थितीची साम्यता राजा भर्तृहरीनें फार चांगल्यारीतीनें दाखविली आहे. ती अशी:—

महीं रम्या शय्या विपुलमुपधानं भुजलता
वितानं चाकाशं व्यजनमनुकूलोऽयमनिलः ।
स्फुरद्दीपश्चन्द्रो विरतिवनितासंगमुदितः
सुखं शान्तः शेते मुनिरतनुभूतिर्नृप इव ॥

याप्रमाणें क्षणिक संपत्तिपेक्षां आपली परमार्थसंपत्ति मोठी अमूल्य आणि अचल होय असें नाथांनीं दाखविलें व आपल्या खऱ्या अखंड दैवीसंपत्तीचें खालीलप्रमाणें वर्णन करून सांगितलें.

## पद

दौलत देख दिवाना मेरी । अपना मौज न करना फेरी ॥ ध्रु० ॥
कोई दिन बनियांके दुकान । कोई दिन पर्वतके ठिकान ॥ १ ॥
तनके करत कारभार । हमारे छत्तिस खिजमतगार ॥ २ ॥
मन पवनकी पागा । सोहं पिलखानेकी जागा ॥ ३ ॥
करम कारखाना । हमारा नशिब जामदारखाना ॥ ४ ॥
जब सोहिरा तख्तपर बैठे । तब सब दुनियां ...पर बैठे ॥ ५ ॥

या वर दिलेल्या दोन पदांवरून व महादजीपाशीं त्यांनीं केलेल्या वर्तनावरून सोहिरोबा प्रपंचासंबंधानें किती पराङ्मुख होते याची चांगलीच कल्पना होते. राज-

---

शय्या मही भुज उशी नभ चांदवा रे । शीतांशु दीप विंजणे अनुकूल वारें ॥
शांत्यंगनेस शयनीं सुखरूप भोगी । राजापरी निजतसे यति तो विरागी ॥ वामन.

दरबारांत इतक्या स्पष्टरीतीनें बोलण्यास मनुष्य केवळ पूर्णावस्थेस पोंचलेला असला पाहिजे. त्याशिवाय सामान्य माणसांचें तें काम नाहीं !

शिंदेसरकारही साधनसंपन्न अधिकारी होते. त्यांनीं सोहिरोबांचें सर्व बोलणें ऐकून घेऊन त्याप्रमाणे वागण्याचा निश्चय ठरविला व 'राज्यांतील सर्व कारभार जिवबा-दादांवर सोपवून आपण सर्व काल नाथांच्या उपदेशश्रवणांत घालवूं लागले' आणि बहुधा तेव्हांपासून ते उज्जेयनीस त्यांच्या समागमें राहत असत. त्यांनीं त्या ठिकाणीं सोहिरोबानाथांस मठही बांधून दिला. असा हा अपूर्व साधुसमागमाचा लाभ सेनापति जिवबादादा बक्षी यांच्या मार्फतीनें झाला अर्थात् त्यांचें महात्म्य त्या राज्यांत फार होते.

सोहिरोबांनीं प्रथमतः शिंदेसरकारास आपल्या रसाळ प्रासादिकवाणीनें सुलभ अर्थाची पदें म्हणून दाखवावीं आणि या उपदेशानें जसा त्यांचा अधिकार वाढत चालला तसें निर्गुणस्वरूपाची ओळख करून देण्यासाठीं नामस्मरणाचा उपदेश केला. तदनुरूप ते हातांत स्मरणी घेऊन कृष्णनामाचा जप करूं लागले आणि अशारीतीनें त्यांस स्वस्वरूपसाक्षात्काराची खूण पटवून कृतार्थ केलें. जसे सोहिरोबा हे नाथ-सांप्रदायी होते. त्याचप्रमाणें शिंद्यांनींही तोच सांप्रदाय स्वीकारला आणि आपल्या दरबारांत जे कागदपत्र, सनदा वगैरे तयार होतील त्यांवर श्रीकारापुढें 'नाथप्रसन्न' असें लिहिण्याचा त्यानी प्रघात ठेविला. असो.

पुढें कांहीं कालपर्यंत ग्वाल्हेर व त्या प्रांतांतील बदरीकेदार, पुष्कर, सोमनाथ, ओंकारेश्वर, द्वारका, काशी, प्रयाग, गया, अयोध्या वगैरे बहुतेक तीर्थयात्रा करून सोहिरोबा उज्जयनीस येऊन शिंद्यानीं बांधून दिलेल्या आपल्या मठांत अखेर पर्यंत राहिले होते. तेथें मठ होण्यापूर्वी पहिल्यानेच जेव्हां ते उज्जयनीस गेले त्यावेळीं तेथील एका धर्मशाळेंत त्यांनी आपला मुक्काम ठेविला होता. परंतु त्याठिकाणीं उज्जन शहरां-तील विठ्ठलाचार्य म्हणून कोणीएक प्रतिष्ठीत शास्त्री मनुष्यपणास अनुचित अशा एका कार्यास म्हणजे चंपा नामक एका गृहिणी स्त्रीशी व्यभिचारास प्रवृत्त होत असे; तेव्हां सोहिरोबा धर्मशाळेत एका बाजूस निवांतस्थान पाहून ध्यानस्थ बसले असतां आपली दुष्ट वासना पूर्ण करून घेण्याच्या इराद्यानें हें व्यभिचारी जोडपे त्या ठिकाणीं प्राप्त झालें; पण मदांध झालेल्या ह्या उभयतांना तेथे असलेल्या नाथांचा यत्किंचित

१ होळकराची कैफियत पहा. २ नातूकृत शिंद्यांचें चरित्र पहा. ३ भाविकृत महाराष्ट्र सारस्वत पु० पृ० ७०. ४ नातूकृत शिंद्यांचे चरित्र.

देखील सुगावा लागला नाही. उघडच आहे कीं, ज्याच्या ठिकाणीं मनुष्यपणाच उरला नाहीं अशा माणसाला त्याच्या स्वेच्छाचारी वृत्तीस इतरांची कदर कोठून असणार? तो एक हात पाय नाक तोंड असलेला मनुष्यरूपी पशूच होय. अशापैकींच हे एक पशू होते म्हटले तरी चालेल. पुढे त्या उभयतांचे जारकर्म आटपून स्वस्थचित्त झाल्यावर सहज तेथे बसलेले सोहिरोबा त्यांच्या दृष्टीस पडले. त्यावेळी हा कोणी तरी प्रवासी असेल अशा समजुतीने त्यांनी त्याची फारशी परवा केली नाहीं. परंतु तो निंद्य प्रकार सोहिरोबांच्या लक्षांत आला, व त्यांस त्या पापाचरणापासून परावृत्त करण्याकरितां त्यांनी तत्काळ पांच पदे म्हणून विठ्ठलाचार्यास उपदेश केला. ह्या पांची पदांस ‘ विठ्ठलपदपंचक ’ असें नांव आहे. ह्या पदांच्या शेवटच्या चरणांत ‘ विठ्ठलाचार्य ’ ‘ व श्रीविठ्ठल ’ या दोघांसही सारखे लागू पडेल अशारीतीने ‘ विठ्ठल ’ हे पद श्लेषार्थी योजिले आहे.

## पद १ लें.

**विषवत् या विषया । त्यजाना जाल तरीच लया ॥ ध्रु० ॥ आत्म-सुखातें हरण कराया । विरचित यासि विरंची ॥ स्त्रीधन तेजें खड्**

---

१ येथें विषयांस विषवत् म्हटले आहे. त्यांतील रहस्य हेंच कीं, इंद्रियें व विषय यांच्या संयोगापासून होणारे जे सुख ते प्रथम अमृतासारखें गोड वाटते, परंतु तें अंतीं विषासारखे कडू आहे म्हणून गीतेमध्ये भगवंतांनी ( अ० १८ श्लोक० ३८) त्या सुखास राजस असे म्हटले आहे. आचार्यांनींही ‘ विषय हे आपल्या आंगच्या दोषानीं कृष्णसर्पाच्या विषापेक्षांही तीव्र आहेत, कारण, कृष्णसर्पाचे विष दंश झालेल्याच्याच प्राणाची हानि करितें, पण विषय त्याच्याकडे नुसती दृष्टी फेकली की तो लगेंच पछाडतो असें म्हटलें आहे. ’ ( विवेकचू० श्लो० ७९ ते ८४. )

२ आत्मसुखाचे तुह्मांपासून हरण करावे म्हणून, विरंची म्हणजे ब्रम्हदेवानें हे स्त्रीधनादि विषय निर्माण केले आहेत. कारण द्वैतसृष्टीचा उत्पन्नकर्ता असा ह्याच महदहंकार होय आणि याच अहंकार त्यागाविषयीं या पदांत गर्भितभाव दर्शविला आहे. ( सोहिरोबा कृ० पद्यसंग्रह भा० २ रा. परिशिष्ट. )

३ ‘ ब्रम्हदेव आपला स्रष्टा कोण ! म्हणून शोध करीत असतां १०० वर्षें काल निघून गेला. असा जो काल तो ईश्वराचे खड्ग असून प्राणिमात्रांस मरणरूप भय उत्पन्न करील आयुष्याचा नाश करितो.

**विराजे । अवचित तोडिल काया ॥ एकेकातें सेवुनि गेले । पांचही रमणी ठाया ॥ तद्रतिसंगास्तव या अंगा । काळाचि दगा करिल भया ॥ विषवत्० ॥ १ ॥ माझें माझें ह्मणूनी जन हे । लंपट गेले पाहात तयां ॥ कटकट करिसी कटकट धरिसी । झटपट भुलसी लुट घ्याया ॥ विषवत्० ॥ २ ॥ ह्मणे सोहिरा विठ्ठल वदनी ।**

---

४ शब्दस्पर्शादि पांच विषयामधून नुसता एकेकच विषय सेवन करणारे जे मृग, गज, मत्स्य, पतंग, भृंग, वगैरे ते नाश पावले; तर मग=पांचही रमणी ठाया=ते पांचही विषय एका स्त्रीच्याठायी वास करितात अर्थात्=तद्रतिसंगा=अशा स्त्रीच्या रतिसंगास प्रवृत्त झाल्यामुळे काल दगा करून मरणाचे भय उत्पन्न करील तर त्यात नवल तें काय?

५ " धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे भार्या गृहद्वारि जन स्मशाने ॥ देहश्चितायां परलोक मार्गे कर्मानुगो गच्छति जीव एकः ॥ " याप्रमाणे स्त्रीधनादि विषयांना माझें माझें म्हणून अंतकालपर्यंत चिकटून राहून अखेरीस ते सोडून जातात. हे आपण पाहातो, आणि ' मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ' या समर्थोक्तीप्रमाणे कटकट करिसी म्हणजे कटाकटा ? अरेरे ! गेला बिचारा, वाईट झाले, असें ह्मणतो; पण पुनः तशाचप्रकारच्या कटकटीचा अर्थात् क्लेशकारक विषयाचा स्वतः स्वीकार करितो अशारीतीनें क्षणमात्र झालेले स्मशानवैराग्य नष्ट झालें की पुनः झटपट विषयाची लूट प्राप्त करून घ्यायाला भुलतो. तात्पर्य, देहात चैतन्यरूप जीवात्मा स्थित असेपर्यंतच काय तो देहगृहाचा मोठा अभिमान वागवितो आणि त्याजवर ममत्व ठेवून असतो. पण तोच जेव्हां देह सोडून जातो तेव्हा तो अभिमान केवळ वृथा होय असें वाटूं लागतें. पण ते डळमळीतच ?

६ यासाठी, नामसंकीर्तन हे पहिलें आणि सोपे साधन आहे, म्हणून मुखामध्यें निरंतर ' विठ्ठल विठ्ठल असें नाम धरा हे सुचविले. याठिकाणी ' सोहिरा विठ्ठल ' हे शब्द गुह्यार्थाने योजिले असावेत. म्ह० सोहिरा=सः+हिरा, सोहिरा; अज्ञानतिमिरांधःकाराचा नाशकर्ता जो चिद्रूप प्रत्यगात्मा+सः=तो=सोहिरा आणि विठ्ठल=परमात्मा मिळून ऐक्य दर्शविले.

धराविसर जाणुनि माया[७]॥ या निरसंगा[८] करि भवभंगा। तरिच सुरंगा[९] पावसि या ॥ विषवत्० ॥ ३ ॥

विठ्ठलाचार्य हा वेदशास्त्र शिकलेला होता, परंतु त्यास उपरति झालेली नव्हती म्हणून त्याच्या मनबुध्यादिकांवर ' स्त्रीधनादि विषयांचा पूर्ण पगडा बसला होता. ' मग त्याच्या विद्वतेचा काय उपयोग! याविषयीं भागवतकारांनीही असेंच म्हटलें आहे.

" किं विद्यया किं तपसा किं त्यागेन श्रुतेन वा।
किं विविक्तेन मौनेन स्त्रीभिर्यस्यमनोहृतं ॥ "

म्हणजे ज्याचें मन स्त्रियांनी हरण केलें, त्याच्या विद्येचा काय उपयोग? त्याचें तपही निरर्थक; त्याच्या संन्यासाचें किंवा शास्त्राध्ययनाचें फळ काय? त्याचा एकांतवास आणि मौन सर्व कांहीं व्यर्थ समजावें. अशीच स्थिति विठ्ठलाचार्यांची होती. म्हणून ' विषवत् विषयांचा त्याग करून वैराग्य संपादन करण्याविषयीं म्हणजे पर्यायानें अपराविद्येचे ज्ञान करून घेण्याविषयीं अर्थात् पहिला विकार जो अहंकार त्याच्या वृत्तीला लयास नेऊन आत्मसुखाच्या अनुभवानें निर्विकल्पस्थितींत सत्य-सुखाचा लाभ करून घेण्याविषयीं उपदेश केला; तरी विठ्ठलाचार्याचा पूर्वक्रम चाललाच होता. मग पुन: खालीलप्रमाणें दुसरें पद म्हटलें:—

---

७ अविद्ये ( माये ) च्या योगानें आत्म्याचा विसर पडला आहे म्हणून तो प्रत्यास येत नाहीं. ही त्याची माया त्याच्या भक्तीनेच उमगली जाते. भगवंतांनीही उद्धवाला असेंच सांगितलें आहे, कीं, " गुणमय्या जीवयोन्या विमुक्तो ज्ञान निष्ठया ॥ गुणेषु माया मात्रेषु दृश्य मानेष्व वस्तुत: ॥ वर्तमानोऽपि न पुमानुज्यतेऽवस्तुभिर्गुणै: ॥ " म्हणजे भगवद्भक्तास विषयासक्ति म्हणून कधीही होत नाहीं. कारण ज्ञाननिष्ठेच्या योगानें गुणमय अशा जीवोपाधीपासून तो मुक्त होतो, आणि हे मायारूपी गुण अर्थात् त्रिगुणात्मक विषय मिथ्या आहेत असें तो पाहातो, यामुळें सर्व विषयांचे ठिकाणीं व्यवहार करीत असतांही, त्या मिथ्या गुणांच्याठिकाणी संग—आसक्ति—पावत नाहीं.

८ नि+रस+अंग=रसरहित जड अग म्हणजे रसरहित जो आत्मा त्याविरहित जडप्रकृतिरूप अंग शुष्ककाष्ठवत् हाडामांसांचा बनलेला स्थूलदेह, तदंगभूत भव म्हणजे संसार भग करून टाका हा भाव.

९ सु+रंग=शुद्ध रंग; निजरंग. सुवर्णोपमेय आत्मा जो हिरण्यगर्भ विठ्ठल त्याप्रत पोहोंचशील. उज्जनी येथें सोहिरोबांच्या मठाजवळच श्रीविठ्ठलदेवस्थान असून तेथें वीरविठ्ठलाची मूर्ति आहे.

## पद २ रें.

तुह्मी भोगा पररमणी । निजसुखवर्धक जी धमनी ॥ धृ० ॥
धरि सत्संगा वरि निःसंगा । कामचि भंगा हा असत्ता ॥
रमतां रमतां हरत अहंता । मायबाप ते पळत क्षणी ॥ तुह्मी० ॥ १ ॥

---

१ भोगा–असें म्हणण्याचें रहस्य, निद्रेच्या पूर्वक्षणी जी वृत्ति बाहेरचें जग सोडून स्वरूपाकडे वळल्यानें स्वरूपसुखांत निमग्न होऊन लीन होते, त्या अवस्थेच्या कोशाला आनंदमय असें म्हणतात. असा हा अंतर्मुखवृत्तीचा परिणामरूप आनंदमय कोश त्या कोशांत ब्रम्हसुखाचा उपभोग घेतो. त्याकाळीं त्या सुखानें बिंबित अशा अज्ञानवृत्ति असतात. त्यामुळें भोग घडतो. " सुषुप्तिस्थान एकीभूतः प्रज्ञान घन एवानंदमयो ह्यानंदभुक् + + + मांडुक्य उ० " म्हणजे विज्ञानमयवाच्य जीव सुषुप्तीमध्यें स्वरूपाशीं ऐक्य पावून आनंदमयस्थितींत चैतन्य प्रतिबिंबित वृत्तीच्यायोगानें तेथील ब्रम्हानंदाचा भोग घेतो. २ रमणी–स्त्री, प्रकृति, पररमणी–पराविद्या. ३ निजसुख–इंद्रियें आणि त्यांचे विषय, यांच्या संयोगजन्य सुखाव्यतिरिक्त जें अंतःकरणातील सुख तें. योगाभ्यासानें मन शांत म्हणजे त्यांमधील रजतमादि किल्मिष नाहींसें होऊन हें सर्व ब्रम्हच आहे, असें ज्ञान होऊन निरतिशय सुखाची प्राप्ति होते, आणि तो आपल्या मध्येंच आपण सुख पावतो. तें सुख अतींद्रिय असून केवळ बुद्धीस ग्राह्य असतें. असें जें सुख तें वर्धक वृद्धिंगत करणारी म्हणजे साक्षात्काराला साधनीभूत असा शुद्धधर्म अधिकाधिक वाढविणारी धमनी–सुषुम्ना नावाची शरीरांतील मुख्य नाडी. ४ योगाभ्यास करणाऱ्या पुरुषांना परब्रम्ह प्राप्ती होण्यास सर्वात्मरूप भगवंताचे ठिकाणी केलेल्या निष्कामभक्तीसारखा दुसरा सोपामार्ग नाहीं. पण ह्या सर्वांनांही ' सत्संग ' मूळ कारण आहे; दुर्जन संग हाच जीवात्म्याला बंधन करणारा दृढपाश आहे, आणि तोच जर सत्पुरुष समागम घडला तर मोक्षाचें द्वार उघडें आहे. वरिं निःसंगा म्हणजे संगरहित असा जो कूटस्थ आत्मा त्याला वर. आणि ' हा असत्ता कामचि भंगा ' म्हणजे आत्मप्राप्तीकरितां हा असत्ता कामच–विषयेंद्रिय संयोगजन्य काम–पहिल्यानें भंगा=नाहींसा करून टाका. अर्थात् विषयवैराग्य धारण करा. हा भाव. सत्ता म्हणजे माया आणि असत्ता म्हणजे अविद्या असे मायेचे दोन भेद होतात. ५ माय=अविद्या, कल्पना व बाप=अहंकार; हीं दोन्हीं त्वरित पलायन करितात म्हणजे लीन होतात.

कन्यासुतद्वय पोरें व्याली । जामातातें धरि पदरीं ॥
सासू सदरी देखुनि नदरी । त्रिवेणि भदरी जी तरणी ॥ तुह्मी० ॥ २ ॥
गीतेमांजी दुजीं आठवा । साहसष्टींत ह्मणे किरीटी ॥
यांविण सृष्टि सुख ना दृष्टि । रतें तत्कंठीं प्रियकरणी ॥ तुह्मी० ॥ ३ ॥
ह्मणे सोहिरा विठ्ठलवदनी । वेदही हाची धर्म वदे ॥
गुरुकृपेविण धर्मांचि नकळे । यास्तव लागा तच्चरणीं ॥ तुह्मीं० ॥ ४ ॥

---

६ ही पररमणी ' त्रिपदाख्य गायत्री ही जगाच्या मूर्त आणि अमूर्त अशा द्विविध स्थितीची सूचक असल्यामुळे दोन पोरें व्याली=म्हणजे निष्काम भक्ति ही कन्या; आणि आत्मबोध हा सुत म्हणजे पुत्र होय. आत्मबोध व ईशभक्ति अशी दोन आपत्ये प्रसवणारी जी शांतिरूप पररमणी तिच्याशी जे रममाण झाले तेच मात्र मनुष्य; इतर मनुष्यत्वाने आरोपित केलेले पशूच होत. ७ सासू=स्फूर्ति आदिमाया: ही पररमणीची सासू होय. कारण ईश्वर हा त्या स्फूर्तिरूप दर्पणात प्रतिबिंबित झालेला आहे, म्हणून पररमणी महामाया ही त्या पुरुषईश्वराची शक्ति असल्यामुळे आदिमायेची सून झाली सदरी=सत्+अरी=सद्रूपाच्या विरुद्ध असणारी; असद्रूपा. ८ देखुनि=पाहुनि; नदरी=डोळ्यांनी; त्या सासूला प्रज्ञारूप दिव्यदृष्टीच्यायोगाने पाहून ९ त्रिवेणी=इडानाडी–गंगा, सुषुम्ना–सरस्वती, पिंगला–यमुना, ह्या नद्या एकत्र मिळतात असें स्थान; भदरी=तडागीं ( नदीच्या एका बाजूस भदर असे वाडीप्रांतीं म्हणतात. ) १० जी=ही पररमणी केवळ ज्ञाननौकाच आहे. ११ भगवद्गीतेच्या दुजी=दुसऱ्या अध्यायामध्ये, आठवा अवतार जो श्रीकृष्ण तो साहसष्टाव्या श्लोकांत म्हणतो, हे किरीटी ! म्हणजे पार्था:–" नास्ति बुद्धिरयुक्तस्य नचायुक्तस्य भावना । न चाभावयतः शांति रशांतस्य कुतःसुखम् ॥ " १२ या नामरूपात्मक दुःखमय विश्वसृष्टीमध्ये या शांतिरूप पररमणीविना अन्य सुख ह्मणून दृष्टीस पडावयाचें नाहीं म्हणून तुकोबांनी म्हटलें आहे की, ' शांतिपरते नाहीं सुख। येर अवघेंचि दुःख॥ इ. ' १३ यासाठी त्या शांतिप्रियकरणीच्याच कंठीं रममाण हो कंठीं असें म्हणण्याचें रहस्य हेंच की, कंठामध्यें विशुद्ध चक्र असून त्यांत जीवशिवात्मक षोडशग्रंथीच्या म्हणजे असन्मनाचा लय व्हावयाचा असतो व शांति हा मनाचा अभ्यास आहे. १४ [ विठ्ठल वदनीं वेदही हाचि धर्म वदे ]=विठ्ठलपरमात्म्याच्या मुखापासून निघालेला जो वेद. तोही हाच सनातनधर्म सांगतो आहे, हाच म्हणण्याचा हेतु असा कीं, ऋग्वेदादि चारी वेदामध्यें दोन विद्या सांगितल्या आहेत परा व अपरा; किंवा प्रस्तुत विठ्ठलाचार्यशास्त्री हाच वेदप्रतिपादित धर्म सांगतो आहे, म्हणजे 'तोंडानें वरवर बडबड मात्र करितो: परंतु सद्गुरुकृपेवांचून ह्या गुह्यज्ञानाचे अपरोक्ष विद्येचें वर्म काय आहे हें कधींही कळणार नाहीं.

या पदांत मुख्यतः बुद्धियोगाचें रहस्य आहे, म्हणजे स्थितप्रज्ञ पुरुषाचें लक्षण दर्शविलें आहे. सोहिरोबा म्हणतात, 'चर्मानें वेष्टित अशा मांसमयी परस्त्रीचा तूं कितीही जरी संग केलास तरी त्यापासून तुला असंगता कधींच प्राप्त होणार नाहीं; कारण, अशा स्त्रीशीं संग केल्यानें तृप्ति कधींच होत नाहीं; पुनः पुनः प्रतिदिवशीं संगाची इच्छा होणारच; तेव्हां अशा भ्रमोत्पादक इच्छेच्या तृप्तीसाठीं संचितानुक्रमानें जरी तूं अनेक जन्म घेतलेस तरी ह्या महाभयंकर विषयवासनेच्या सेवनानें तुला खरी शांति कधींच मिळणार नाहीं; करितां जर तुला खरोखर शांति मिळविण्याची इच्छा असेल तर चालू पदांत वर्णिलेली पररमणी अशी जी पराविद्या तिचा उपभोग घे. एकवेळ जर तुला ह्या पररमणीचा संग घडला तर पुनः संगाची म्हणून इच्छाच उरणार नाहीं, आणि खोटा असा जो काम तो नाहींसाच होऊन जाईल. या स्थितीलाच सर्वसंगपरित्याग किंवा संन्यास असें म्हणतात. सारांश, जाणावयाच्या विद्या दोन, एक परा व दुसरी अपरा; तेव्हां या पदांत पराविद्येचें तत्त्व सांगितलें आहे; परंतु, विठ्ठलाचार्यांच्या अतन्मनावर त्याचा लवमात्र परिणाम झाला नाहीं; उलट तो क्रोधाविष्ट होऊन सोहिरोबांच्या अगदीं लगत आला, आणि अतिशय निंदा करून त्यानें त्यांचा छळ करण्यास आरंभ केला; तथापि सोहिरोबांनीं तो सर्व निमुटपणें सहन करून पुनः पद्यरूपानें त्यास उपदेश करण्यासच आरंभ केला. ठीकच आहे, साधुपुरुषांची मूढांनीं कितीही निंदा केली तरी ते त्याची उलट निंदा किंवा स्तुति न करितां जेणेंकरून त्यांस ज्ञान होईल असेंच वर्तन करितात. ज्यायोगानें अज्ञान्याला बोध होईल असेंच आचरण ज्ञान्याचें असलें पाहिजे; कारण ज्ञान झाल्यावर अज्ञजनांस उपदेश करण्यावांचून त्याला दुसरें कर्तव्यच उरलें नाहीं; तेव्हां याच कर्तव्यास अनुसरून सोहिरोबा म्हणतातः—

## + पद ३ रें.

**तूं निंदूं नको सुजना । कुजना यम दंडिल रसना ॥ ध्रु० ॥**

---

+ या पदपंचकांत पहिल्या व दुसऱ्या पदामध्यें चार चरण आहेत आणि या तिसऱ्या पदांत मात्र पांच आहेत. याचें कारण असें असावें कीं, पहिल्यांत पर्यायानें 'स्थूलसूक्ष्मादि चार देहांवरील अहंबुद्धीचें निरसन सांगितलें. दुसऱ्यांत 'परादि चार वाचांचें लयसाक्षित्व दर्शविलें आणि या पदांत मुख्यतः अद्वैतस्थिति बिंबण्यास मनोलय=उन्मनि अवस्था प्राप्त झाली पाहिजे. अर्थात् जागृतादि पूर्वीच्या चार अवस्थांचा त्याग झाला पाहिजे.

स्वगृहधंदा टाकुनि मंदा । टळटळ फिरसी अनुवादा ॥
शक्तीहरकीं येइल गिरकी । पडसिल नरकीं कीं जीवना ॥ १ ॥
परऐश्वर्या पाहुनि जळसी । तोषसि ऐकुनि पररंध्रा ॥
दुष्टीपापी लोकां तापी । त्रास कदापी साहावेना ॥ २ ॥
खद्योतासम तेजहि नसतां । भास्कर ह्मणवुनि मिरविसि भा ॥
सज्जनसदसीं निजयश वदसी । लाज न घेसी केंवि मना ॥ ३ ॥
सतच्छल श्री संतति नाशन । कां न मानिसी या वचना ॥
जन्मापासुनि काय मिळविलें । अघविरहित या कर मनना ॥४॥
ह्मणे सोहिरा विठ्ठलवदनीं । पाहतां निंदक स्नान करा ॥
दुर्जनसंगति देत अधोगति । भीष्मगुरूंप्रति फलनिधना ॥ ५ ॥

---

१ नऊ द्वारें ( इद्रियें ) यानीं युक्त असें आपलें देहरूप गृह ते सत्य असून त्याचा चालक जीवात्मा ब्रम्हच आहे, संसारी नव्हे; असें जाणणें हा या घरचा वास्तविक धंदा होय. २ व्यर्थ बडबड, पाखंडवाद करीत फिरणें. ३ कालात्मशक्तीमुळे प्राणोत्क्रमणकाळीं येणारी गिरकी, भोंवळ. ४ नरक हेंच आहे जीवन ज्याचें अशा कृमिकीटकादि योनीप्रत जाशील. ५ येथें दोन अर्थ निष्पन्न होतात; पहिला शापानुग्रहसमर्थ अशाप्रकारचें ज्या साधूचें शुद्ध यश सत्+असी=हीच कोणीएक उत्तम तलवार तिजपुढे स्वतःच्या विद्वत्तेची प्रौढी सागतोस. दुसरा अर्थ—सज्ज+न+स+दशी=दशइंद्रियें आणि अकरावें मन, यांसह सज्ज—अलक्षभुवनामध्यें गमन करण्यास तयार—झाला नाहींस आणि तशा शुद्ध यशाची प्रौढी मात्र सागतोस, म्हणून. ६ ज्याला आपण काम, संकल्प, श्रद्धा, अश्रद्धा, धृति, अधृति, लज्जा, बुद्धि, भय असें म्हणतों तें सारे केवळ मन होय; यासाठीं 'लाज न घेसी केंवि मना' असें म्हटलें आहे. ७ जन्म घेतल्यापासून पातकाचा मात्र संचय करीत आलास, त्याव्यतिरिक्त दुसरें कांहीं मिळविलेंस काय ? कांही नाहीं; यासाठी अघविरहित असे आत्मज्ञान मिळीव ८ निंदक असा जो विठ्ठलाचार्य त्याला पाहताच सचैलस्नान करा; कारण दुर्जनाची संगति अधोगति देणारी आहे. ९ दुर्जनशिरोमणि जो दुर्योधन त्याची संगति केल्यामुळें म्हणजे त्याचा कैवार घेतल्यामुळें भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य यांना, फळ निधना—मरण प्राप्त झालें. एवढे मोठे धनुर्धर आणि इच्छामरणी असतांनाही केवळ दुर्जनसंगतीमुळेंच हा प्रसंग गुदरला हा भाव.

जसा पहिल्या पदांत अहंकारत्याग, दुसऱ्यांत बुद्धियोग, तसाच या पदांत मनोनिग्रह किंवा मनोलय, हा मुख्य गर्भितार्थ असून पर्यायानें असें दर्शविलें आहे कीं, बाबारे, तात्त्विकदृष्ट्या पाहिलें तर जगामध्यें आत्मव्यतिरिक्त कोणतीही वस्तु सत्य नाहीं. हे सर्व दृष्ट व श्रुत पदार्थ नश्वर होत; म्हणून तूं इच्छारहित होऊन सर्वसंगपरित्याग कर आणि आत्मज्ञान मिळव; कारण, मनुष्यांनीं नानाप्रकारचीं शास्त्रें पठण केलीं किंवा अनेकप्रकारच्या यज्ञयागादिकांनीं भगवंताचें अर्चन केलें, तरी आत्मज्ञानावांचून त्या सर्व खटपटी व्यर्थ आहेत. प्रवृत्तिमार्गामध्यें अनेक दुःखें आहेत व त्यामुळें आपला नाश आहे, हे नाश दोन तऱ्हांनीं होत असतात. एक कालगतीमुळें व दुसरा मनुष्यांच्या कृतीनें; यांतून दुसरा मनुष्यांच्या कृतीनें होणारा नाश सर्वांत भयंकर आहे. कामक्रोधादि दुष्ट शत्रु मनुष्याच्याच हृदयांत वास करितात. "**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः**" ह्या गीतोक्तीप्रमाणे आपले हित किंवा अहित करून घेणें आपल्याच स्वाधीन आहे. पुष्कळ माणसें दुसऱ्यास दुःख देण्याचा यत्न करितात आणि अशाप्रकारचीं घोरकर्मे करितात कीं, त्यांपासून दुसऱ्यास त्रासच होतो; पण तारुण्याच्या व अहंपणाच्या धुंदींत मनुष्याच्या हातून जीं अनन्वित कर्मे घडतात त्याच्यायोगानें अंतकाळीं त्यास पस्तावा होऊन तो प्राण सोडतो. एखादी नीतिविरुद्ध गोष्ट करण्यास उद्युक्त होतेवेळीं ती गोष्ट आपल्याकडून घडूं नये म्हणून आपली सद्बुद्धि नेहमीं आपणास सांगत असते. असें असूनही जाणूनबुजून दुष्कर्माविषयीं मनुष्य प्रवृत्त होतो हे केवढें आश्चर्य आहे? तशांत विठ्ठलाचार्यांसारख्या कर्मठ व वेदशास्त्रपारंगत मनुष्यानें सोहिरोबांसारख्या समर्थ योग्यांचा छळ करावा व त्यांनी केलेला उपदेश त्याला आवडूं नये हे मोठेंच आश्चर्य होय! अशा मनुष्यांबद्दल भगवद्भक्त तुकारामालाही मोठा तिटकाराच होता. ते आपल्या एका अभंगांत म्हणतातः—"**अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड। काय त्यासी रांड प्रसवली॥ वैष्णव चांभार धन्य त्याची माता। शुद्ध उभयतां कुळ याती॥ ऐसा हा निवाड झालासे पुराणीं। नव्हे माझी वाणी पदरची॥ तुका ह्मणे आगी लागो थोरपणा। दृष्टि त्या दुर्जना न पडो माझी॥**" असो.

पुढें सोहिरोबांचा हा अमृततुल्य उपदेश ऐकून विठ्ठलाचार्यांच्या तळव्याची आग मस्तकास पोहोंचली आणि समर्थांनी म्हटल्याप्रमाणें "**कामक्रोध खवळला, तेणें सन्निपात झाला॥**' अशी त्याची स्थिति होऊन तो समूळ विवेकभ्रष्ट झाला. त्याच्याचप्रमाणें त्याला अनुरक्त झालेल्या चंपा नांवाच्या जारिणी स्त्रीची स्थिति झाली आणि तीही सोहिरोबांची मन मानेल तशी निंदा करूं लागली. तिला वाटलें

सोहिरोबांच्या मुखानें आपली गुप्त कृति उघडकीस येऊन चारचौघांत फटफजिती होईल; म्हणून ती साशंक झाली. शेवटीं त्या उभयतांनीं सोहिरोबांस देहांतप्रायश्चित्त देण्याचा निश्चय केला, आणि लगेच रात्रीच्यासमयीं सर्वत्र सामसूम झाल्यावर सोहिरोबा समाधिस्थितींत असतां त्यांच्या देहास एक फातर-मोठा दगड-बळकटरीतीनें बांधून त्यांस जवळच्याच एका भयंकर खोल विहिरींत ढकलून दिले!! एकदां मनुष्य क्रोधवश झाला म्हणजे तो काय करील याचा नेम नसतो. हें प्रस्तुत उदाहरणावरून चांगलें सिद्ध होतें.

अशारीतीनें घोरकृत्य करून तीं उभयतां तिकडून निघून गेल्यावर त्या विहिरींत नऊप्रकारच्या जलदेवतारूप स्त्रिया प्रकट होऊन त्यांनीं सोहिरोबांस बंधनांतून मुक्त केलें, आणि ज्या दगडावर त्यांना बांधले होतें तो दगड त्या विहिरींतील पाण्यावर तरंगूं लागला. त्यावर सोहिरोबांस बसवून दिव्य पुष्पांनीं त्यांची त्या जलदेवतांनीं पूजा केली व त्यांस पूर्वस्थळीं आणून पोंचविलें, आणि आपण अदृश्य झाल्या. एकारीतीने सोहिरोबांना त्यांच्या इच्छेप्रमाणे हे अनायासें स्नानच घडलें म्हणावयाचें; कारण 'पाहतां निंदक स्नान करा' अशी त्यांची आज्ञा आहे, आणि स्वतः त्यांनी विठ्ठलाचार्य जो निंदक त्याशीं उघडपणे भाषण केले होतें. त्यावेळच्या विहिरींतील स्थितीचे पुढील पदांत सोहिरोबांनी फार चांगलें वर्णन केलें आहे:—

+ पद ४ थें.

**स्थान[1] बरें जलवास। जेथें[2] स्वप्निं नसे खलत्रास॥ ध्रु०॥**
**वर वर पाथर[3] आसन विराजे। स्वार सजे महाराज॥**
**जलदेवता नवविध[4] कांता। दिव्य[5] सुमनता दे हातास॥ १॥**

---

+ या पदाचेही पूर्वीप्रमाणें चारच चरण आहेत. कारण अव्यक्तचित्त ज्याच्या योगानें 'विश्व, तैजस, प्राज्ञ, प्रत्यगात्मा' ह्या चार आत्म्याचे लयसाक्षित्व अनुक्रमें दर्शविलें आहे.

१ या जलवासासारखें आनंददायक असे दुसरे स्थानच नाही. २ ज्याठिकाणी विठ्ठलाचार्यासारख्या खल (दुष्ट) लोकांचा त्रास स्वप्नांतही असूं शकणार नाहीं. कारण, रजतमादि गुणापासून उद्भवणारे कामक्रोधादि दोष, जेथें स्वप्नदेहाचाच म्हणजे लिंगदेहाचा अभाव असतो तेथे त्यांचा उपद्रव कसा असेल? ३ अष्टधा प्रकृतिरूप पाथर तिजवर स्वार झालेला. ४ नवविधाभक्ति किंवा नवविधी हात. योगशास्त्रोक्त अमृतबिंदु नामक तीर्थामध्यें स्नान घडलें असतां दिव्य शांति प्राप्त होते व नवविधी प्राप्त होतात. ५ त्या नवविध स्त्रियांनी दिव्य या प्रकारचीं सुमने (पुष्पें) घालून सोहिरोबाची केलेली पूजा. दुसरें दिव्य म्हणजे तेजोमय सन्मनाची नवविधाभक्तीच्यायोगाने हातास सांपडलेली आनंदता.

ज्ञानतोय हे तरणिच पाहे । इतरचि नोहे जें बुडवी ॥
गंगा गंगेति यो ब्रूयात्‌चें । दे फल साचें हरत भवास ॥ २ ॥
चंपा माताऽऽचार्यचि भ्राता । होतां संगविलास ॥
संचित व्यालें निमित्त ठेलें । सहज घडे संन्यास ॥ ३ ॥
ह्मणे सोहिरा शेषशायि हा । झाला विठ्ठलदास ॥
खलैंमित्रासम मानुनि केला । क्षीरसागर हा वास ॥ ४ ॥

आपण केलेल्या कृत्याचा परिणाम काय झाला हें पाहण्याकरितां विठ्ठलाचार्य दुसऱ्या दिवशीं पुनः त्याठिकाणीं आला. तेव्हां 'पूर्वीपेक्षां सोहिरोबा महदानंदांत बसले आहेत' असें पाहून तो मोठ्या विचारांत पडला. ही त्याची स्थिति पाहून पुनः सोहिरोबांनीं त्यास उद्देशून म्हटलें:—

---

६ या विहिरीतील पाणी हें ज्ञानतोय—ज्ञानस्वरूप उदक—होतें, ह्मणून आपण त्यांत बुडालों नाहीं इतर डोहांतले जल जड पदार्थ बुडवून रसातळास पोहोंचवीत असतें. तशाप्रकारचें हें जल नव्हे, इतकेंच नाहीं तर हें तोयही केवळ तारून नेणारी नौकाच आहे. त्या नौकेनेंच योगी तरून जातात. ७ गंगेमध्यें प्रत्यक्ष स्नान न करितां नुसतें गंगा गंगा असें मुखानें त्रिवार म्हटलें असतां मनुष्य मुक्त होतो. तर मग मीतर! प्रत्यक्ष गंगेंतच होतो. त्याअर्थी सत्यरूप फलाच्या प्राप्तीनें जन्ममरणरूप भव म्हणजे संसार हरण केलेला आहे. ८ विठ्ठलाचार्याची प्रियपात्र स्त्री जी चंपा, ती आपली माता होय आणि विठ्ठलाचार्य हा भवसमुद्रांतून तारून नेणारा पिता होय या उभयतांचा जो संगविलास झाला, त्यामध्यें आपले पूर्वसंचित व्यालें म्हणजे प्रकृतिपुरुषांचा संबंध 'अज+अजा' या प्रकारचा आहे. ९ येथें सोहिरोबांनीं आपलें व आपल्या पित्याचें नांव मोठ्या खुबीनें दर्शविलें आहे. सोहिरा शेषशायी या शब्दानें अनंतशयन आत्म्याशीं आपलें ऐक्य दाखवून पुढें आपल्या पित्याचें नांव 'अनंत' हें गुह्यार्थानें दर्शविलें आहे. ( शेषोऽनंतो वासुकिस्तु सर्पराजोऽथ गोनसे. इत्यमरः ) अनंतशयन नारायणस्वरूपाप्रत पोहोंचलेला हा सोहिरा परमात्मस्वरूप जो परब्रह्म जो विठ्ठल त्याचा दास झाला, असा भाव १० दीक्षित विठ्ठलाचार्य खल खरा, परंतु समदृष्टी झालेल्या सोहिरोबांनीं त्याला मित्र असें मानिलें; कारण त्याच्याच कृतीमुळें सोहिरोबांस हा प्रत्यक्ष क्षीरसागरवास घडला. किंवा खल विठ्ठल म्हणजे अनीशत्वाच्या योगानें मोहांत पडलेला असा पुरुष व दुसरा ईश, हे परस्परांस कधीं न सोडून जाणारे मित्र आहेत ( पहा—श्वेताश्वतर उप० अ० ४ मं. ६।७ )

## पद ५ वें.

तोचि पहा तूं देव । सत् चित् आनंदाची ठेव ॥ धृ० ॥
निराकार निर्विकार ज्यासी । वेदही वदती अतिहर्षें ॥
नसता स-करी आकर्षण करी । सूत्र प्रचारी शव ॥
शक्तीची निज अंतरशक्ति । भक्तीचो निज भक्ति तरी ॥
मुक्तीची निज मुक्ति विराजे । जगदंबर भरपेंव ॥ २ ॥ तोचि० ॥
ह्मणे सोहिरा विठ्ठल वदनीं । शुन्य ह्मणों तरि जग भरलें ॥
कर्महि हरलें ज्ञानहि सरलें । एकचि उरलें तेंचि अचेव ॥ ३ ॥

अशारीतीचा सोहिरोबांचा अधिकार त्या मूढाला काय माहित असणार ? परंतु ह्या अद्भुत कृत्यावरून त्याला वाटलें कीं, हा कांहीं विलक्षण अधिकाराचा मनुष्य आहे ! पण ज्यांच्याशीं आपण एवढा कृतघ्नपणा केला, त्यांच्याजवळ आतां कोणत्या तोंडानें जावें ! म्हणून तो खजील होत्साता खालीं मान घालून स्वस्थ राहिला. हें त्याचें हृद्गत सोहिरोबांच्या तेव्हांच लक्षांत आलें, आणि ते त्यास म्हणाले, "अरे तूं विनाकारण ओशाळा कां होतोस ? कारण, तूं केलेल्या कृत्याचा दोष तुझ्याकडे नाहीं; तर 'प्रकृतीचे जे गुण, त्यांजकडून सर्व कर्मांची उत्पत्ति घडते; पण अहंपणानें ज्याची बुद्धि मूढ झाली आहे तो आपणालाच कर्ता समजतो' यासाठीं तूं मनांत कांहीं शंका आणूं नको; काय विचारावयाचें असेल ते खुशाल विचार." त्यावर विठ्ठलाचार्य म्हणाला—महाराज, असा तत्त्वज्ञानी पुरुष ओळखावा कसा ? तेव्हां सोहिरोबा म्हणतात. अरे तूं विद्वान् असून हें तुला कसें कळत नाहीं ? याविषयीं प्रत्यक्ष भगवंतांनींच अर्जुनास सांगितलें आहे कीं, "बाहेरून स्पर्श करणारे जे पदार्थ त्यांच्याठायीं चित्ताला आसक्त होऊं न देतां अंतःकरणांतील जे सुख त्याचा जो अनुभव घेतो, तो ब्रम्हाच्याठायीं अंतःकरणाची सांगड घालून अक्षय्यसुख प्राप्त करून घेतो. ज्याला आंतूनच सुख आहे, आंतूनच आनंद आहे, आणि आंतूनच प्रकाश आहे, तो योगी ब्रम्हस्वरूप होऊन ब्रम्हाच्याठायीं निर्वाण पावतो." तेव्हां याप्रमाणें जो असेल तोच तत्त्वज्ञ समजावा. इतकेंच नव्हे, तर ज्याच्या चित्ताला कधींच विक्षेप होत नाहीं त्याला तत्त्ववेत्ता म्हणणें सुद्धां औपचारिकच तर तो स्वतः ब्रम्हच होय. असा जो असेल "तोचि पहा तूं देव." तो प्रत्यगात्मा आणि सर्वसाक्षिभूत स्वयमेव असा जो प्रत्यक्ष 'बौद्धावतारस्वरूप हृदयपुंडरीकाच्याठायीं स्थित

असणारा विठ्ठल परमात्मा' हे एकच आहेत असें जाण! जसा पहिल्या पदांत अहंकार, दुसऱ्यांत बुद्धियोग, तिसऱ्यांत मनोलय, चवथ्यांत चित्तशुद्धि, तसाच या पदांत अंतःकरणशुद्धि, हा गुप्तभाव आहे; म्हणून ह्या पदाचे चरण तीनच आहेत; कारण निर्विकार ब्रम्हाचेठायीं 'स्वगत, स्वजातीय आणि विजातीय, असे तीन-प्रकारचे भेद उत्पन्न होण्यास हें अंतःकरणच कारण आहे. यावरून शुद्धांतःकरण सच्चिदानंदरूप आहे असें सिद्ध होतें; म्हणून या पदाचे तीन चरण योजून तें सिद्ध केलेलें आहे. असो.

याप्रमाणें अत्यंत नित्यकर्मास प्रवृत्त झालेल्या विठ्ठलाचार्यास योग्य उपदेश करून कृतार्थ केल्यावर ते उज्जनी येथें शिंदेसरकारांनीं बांधून दिलेल्या आपल्या मठामध्येंच राहिले. त्यांचे दोन मुलगे त्यांजबरोबरच होते; शिवाय त्यांजपाशी शिष्यसमुदायही बराच जमला होता. उज्जनींत सोहिरोबा सुमारें १० वर्षें होते. पुढें शके १७१४ म्हणजे इसवी सन १७८९ या वर्षाच्या सुमारास मिथ्याच उत्पन्न झालेल्या या नाम-रूपात्मक जगताचा त्याग करावा असें ज्यावेळीं त्यांना वाटलें तेव्हां ते रात्रीच्या-वेळीं मठांतून एकटेच बाहेर पडले ते फिरून कोणाच्या दृष्टीस पडले नाहींत. दुसऱ्या दिवशीं बराचवेळ झाला तरी नित्यक्रमाप्रमाणें ते अजून कां उठले नाहींत! म्हणून मुलांनीं व शिष्यमंडळींनीं तपास केला तर ते शय्यास्थानीं नाहींत व त्याठिकाणीं खालीं लिहिलेलें पद मात्र त्यांस आढळलें; नंतर पुष्कळ तपास केला पण त्यांचा कांहींच पत्ता लागला नाहीं, आणि याचसाठीं सोहिरोबांनीं स्वतः आपल्या निर्वाणा-संबंधीं कोणासही शंका न यावी म्हणून पद्यरूपानें जाणवून ठेविलें.

## पद.

**दिसणें हें सरलें । अवघें प्राक्तन हें मुरलें ॥ धृ० ॥**
**आलों नाहीं गेलों नाहीं । मध्यें दिसणें हे भ्रांति ॥**
**जागृत होतां स्वप्नचि हरपे । कर्पुरन्यायें जग हरलें ॥ १ ॥**
**दिसणें हाचि जन्म योगियां । ना दिसणें हा मृत्यु ह्मणा ॥**
**गैबिप्रसादें गैबचि झालें । आपआपणामध्यें लपलें ॥ २ ॥**
**मच्छिंद्र गोरख जालंधर हे । न्याया आले स्वस्वरुपीं ॥**
**जातां जातां गमन ग्राम तें । समूळ कोठें ना गमलें ॥ ३ ॥**
**ह्मणे सोहिरा सतरा चवदा । मधुमासाच्या नवमदिनीं ॥**
**सगुण स्वरूपीं निर्गुण ठेलें । अनुभव हरले स्वरुप कळे ॥४॥**

यावरून सोहिरोबांनी शके १७१४ चैत्र शुद्ध ९ मी ( दशमी असाही पाठ आहे ) यादिवशीं आपली काया ब्रम्हरूप केली असें मानण्यास हरकत नाहीं. साधुशिरोमणि तुकारामबुवांच्या निधनासंबंधाने जसे गूढ आहे, ( की सतनुमुक्त झाला, योगाची सिद्धि हे तुकारामीं ) तसाच प्रकार सोहिरोबांच्या प्रयाणकालासंबंधाने आहे. सोहिरोबा मठांतून शेवटीं बाहेर पडले त्यावेळी त्यांचें वय सुमारे ८० वर्षांचें होतें पुढे त्यांचे दोन्ही मुलगेही उज्जनी येथेंच निवर्तले. असो. याप्रमाणें बहुतेक सोहिरोबांचे जीवनचरित्र येथें संपल्यासारखेच आहे; तरी त्यांच्या कवित्वासंबंधानें वगैरे थोडासा उल्लेख करणें जरूर आहे.

'सोहिरोबा हे केवळ नामधारी साधु नव्हते. त्यांचे ज्ञान शुद्ध व वैराग्य कडकडीत होते. त्यांची वृत्ति उदासीन, निस्पृही, निरिच्छ, निरभिमानी व नेहमीं ब्रम्हानंदांत निमग्न अशी असे. हे एकदां समाधि लावून बसले म्हणजे तीन तीन चार चार दिवस तसेच सारखे बसत असत असे म्हणतात ते केवळ निर्गुणउपासक होते व त्यांचे उद्गारही सर्वत्र त्याच मासल्याचे आहेत; तथापि त्यांनी शिव, राम, कृष्ण, विठ्ठल वगैरे अवतारपुरुषांविषयींही आपला भक्तिभाव पुष्कळ ठिकाणी प्रकट केला आहे; परंतु सगुणभक्तिपेक्षा निर्गुणभक्तिकडे त्यांचा विशेष ओढा होता. ते योगी व पूर्ण वेदांती असून खऱ्या साधूची सर्व लक्षणे त्यांच्या आंगीं होतीं. अक्कलकोट, सुरत व उज्जनी याठिकाणी सोहिरोबाचे मठ असून त्याची स्थितिहि चांगली आहे.

सोहिरोबा हे उत्तम शीघ्रकवी होते. त्यांनी केलेली कविता भारतभागवतादि पुराणग्रंथांच्या आधाराने लिहिलेली नाही. ती केवळ स्वानुभवयुक्त व स्वतंत्र अशी असून योग, भक्ति, ज्ञान, वैराग्य इत्यादि पारमार्थिक विषयांनी परिपूर्ण आहे. केवळ काव्यदृष्टीने पाहणारास ती विशेष मनोल्हादक होणार नाहीं तरी अध्यात्मविषयाची आवड असणाऱ्यास त्यांच्या वाचनापासून चागला आनद होईल. त्यांनी केलेल्या कवितेवरून त्यांना हिंदुस्थानी, संस्कृत व मराठी या भाषांचे उत्तम ज्ञान होते असें दिसते. त्यांच्या कवितेसंबंधाने अर्वाचीन भगवद्भक्त व कवी विठोबाअण्णा दफ्तरदार यांणीं असे उद्गार काढले आहेत की,—

" कवि संत सोहिरोबा, बांदें गांवीं वसे महा द्विज हा ॥
ज्याचे ग्रंथ विलोकुनि हरि स्वजनां भूवरी म्हणे द्विज व्हा ॥ "

वैराग्य प्राप्त होण्यापूर्वीचे सोहिरोबांच्या हातचे सरकारी लेख बरेच आढळतात.

परंतु त्यानंतर त्यांनीं स्वतः लिहिलेला असा एकही ग्रंथ मिळत नाहीं. याचें कारण असें दिसतें कीं, त्यांनीं आपली लेखणी जी एक वेळ सावंतवाडीच्या राजेसाहेबांसमक्ष खालीं ठेविली ती फिरून कधींही उचलली नसावी. त्यांची बहुतेक कविता दुसऱ्या लोकांनीं लिहिलेली आहे व कांहीं भाग त्यांच्या बहिणीनी लिहिलेला आहे. त्या बाईस चांगलें लिहितां वाचतां येत असून तिला कविता वाचण्याची विशेष आवड असे. सोहिरोबा ब्रम्हानंदांत असता ज्या कविता रचीत त्या ही बाई लिहून ठेवी. विशेषतः सोहिरोबांची आज जी कविता उपलब्ध आहे ती या बाईच्या काव्यवाचन-लालसेचेंच फळ होय. एकंदरींत या बाईचे महाराष्ट्रजनांवर मोठे उपकार झाले आहेत. असें जरी होतें तरी सोहिरोबांची बरीच कविता नष्टही झाली आहे. याचें कारण असें कीं, त्यावेळीं कागद फार महाग असल्यामुळें सोहिरोबांस ते विकत घेण्यास सामर्थ्य नव्हतें. यामुळे त्यांच्या बहिणीनें कांहीं कविता झाडांच्या पानांवर लिहून तीं पानें एका खोलींत व्यवस्थेनें रचून ठेविली असतां त्यांच्या वृद्ध मातोश्रीनें तीं सर्व पानें कचरा समजून जाळून टाकिली ! तिच्या कृत्यानें सोहिरोबांची किती कविता नष्ट झाली असेल समजत नाहीं. त्यांच्या कवितेसंबंधाने प्रसिद्ध विद्वान् कै. वामन दाजी ओक असें म्हणतातः—" सोहिरोबांच्या कवितेंत जी अशुद्धें आढळ-तात त्यांबद्दल कवि दोषास पात्र नाहीं, कारण सोहिरोबानें केलेले ग्रंथ, पदें इत्यादि वाङ्मय अन्य लोकांकडून लिहविलेले आहे; लेखकांस भाषेचें अज्ञान असल्यामुळें त्यांनीं कानांवर शब्द आले ते कसे तरी लिहून ठेविले आहेत; बरें कवीनें तरी आपण सांगितल्याप्रमाणें लेखकानें ठसा उमटविला आहे किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे होते, परंतु सोहिरोबांची वृत्ति यासंबंधानें उदासीन होती. त्यांना हटयोगाची पूर्ण सिद्धि झालेली होती; ब्रम्हानंदाचेवेळीं जे उद्गार आले ते त्यांनीं बोलून सारले; पुनः त्या-संबंधाच्या नीटनेटकेपणाकडे लक्ष्य पुरविण्याची त्यांस गरज नव्हती. सोहिरोबांची कविता ही त्यांनीं केलेली कविता नव्हे; ही त्यांचेकडून स्फूर्तिप्रभावानें झालेली कविता होय. " भाषेच्यासंबंधानें कवीलाच अज्ञान होते असें म्हणावें तर जी या कवीची कृती उपलब्ध झाली आहे, तीवरून पाहतां सोहिरोबास भाषापरिज्ञान चांगलेंच होतें असें वाचकांस वाटल्याविना राहणार नाहीं. तसें नसतें तर त्यांच्या उक्तीचा एवढा ठसा उमटलाच नसता असें आम्हांस वाटतें. सोहिरोबांची कविताकृति इतर कविकृतीहून अगदीं भिन्नप्रकारची असून केवळ स्वानुभवयुक्त अशी स्वतंत्र आहे. तींत भारतभागवतादिक कथानकसंबंध मुळींच नसून केवळ भक्ति, ज्ञान,

वैराग्य, नीति इत्यादिकांचा समावेश आहे; म्हणून यासंबधानें इतकी सूचना देणें अवश्य आहे कीं, ही कविता केवळ शब्दालंकार, वाक्यालंकार, अर्थालंकार तसेंच छंदशास्त्र, व्याकरण इत्यादि नियमानुरूप ताडून पाहणाऱ्या जनास आनंददायिनी वाटणार नाहीं; परंतु भक्ति, ज्ञान, वैराग्य इत्यादि प्रकारानुरूप ही कविता अवलोकन करणाऱ्या जनास आनंददायिनी वाटल्याविना राहणार नाहीं, अशी आमची समजूत आहे. अर्वाचीन सुप्रसिद्ध भगवद्भक्त विठोबाअण्णा दफ्तरदार यांनी सोहिरोबांची बहुतेक कविता लक्ष्यपूर्वक पाहिली होती व ते तिला फार मान देत असत, तो या कवितेंत ज्ञानमार्ग विशेष याच गुणामुळें होय अण्णासारख्या भक्तिशील आणि विद्वान् पुरुषानें ज्या कवितेविषयीं इतका गौरव केला आहे त्या कवितेंत कांहीतरी सत्यत्वांश आहे यांत संशय नाही. "

सोहिरोबाचे मोठमोठे ओंवीबद्ध ग्रंथ पांच आहेत. त्यांतील पहिला ' अक्षयबोध ' हा ग्रंथ सावंतवाडी येथें शके १६७१ यावर्षी रचिला. त्या ग्रंथाच्या शेवटीं सोहिरोबा म्हणतातः—

" अज्ञानाचिये वाचे करवी । बोलविलें पूर्ण ज्ञान अनुभवी ।
एकी एक सोहिरा नांवीं । लेखन केलें ॥
अभिधानें स्थळ वाडी । ग्रंथ लिहिला आवडी ।
निजसुखाची वाडी । वाढिली पुढें ॥
शके सोळाशें एकाहत्तरी । शुक्लनाम संवत्सरी ॥
तद्दिनीं ग्रंथ निर्धारीं । संपला जाण ॥ "

या ग्रंथांत सोहिरोबांनीं केवळ स्वानुभवयुक्त असा उत्तम परमार्थबोध केलेला आहे यांची आठ प्रकरणें असून ओंवी संख्या सुमारें ५०० आहे. दुसरा ग्रंथ ' महदनुभवेश्वरी ' हा प्रचंड वेदांतपर ग्रंथ शके १६७२ यावर्षी रचिला. हा ज्ञानेश्वरीच्या धर्तीवर लिहिलेला असून त्यांत कवीनें केवळ स्वानुभवाची गोष्ट मात्र सांगितली आहे. त्याचे अध्याय १८ व ग्रंथसंख्या सुमारें ९०२२ आहे. तिसरा ग्रंथ ' पूर्णाक्षरी ' हा शके १६७३ मध्यें रचिला. यांत साधूची सर्व लक्षणें विस्तारपूर्वक सांगितलेलीं असून ओंवी संख्या ५०० आहे. चवथा ग्रंथ ' अद्वयानंद ' हा शके १६७५ मध्यें रचिला आहे. हा ग्रंथ वेदांतपर असून यांचीं प्रकरणें १० व ग्रंथसंख्या १००० आहे. पांचवा ग्रंथ ' सिद्धांतसंहिता ' हा शके १६७८ मध्यें

लिहिला. याचे १८ अध्याय असून ओवीसंख्या ४९४१ आहे. यांत मूळ संहितेच्या संस्कृत श्लोकांवर मराठी ओवीबद्ध टीका आहे. हा ग्रंथ रचण्यांत कवीनें आपल्या ज्ञानाची पूर्ण सीमा दाखविली आहे. याशिवाय सोहिरोबानीं पदें, अभंग, सवाया, श्लोक, आरत्या, कटिबंध वगैरे पुष्कळ कविता केलेली आहे. नुसत्या महाराष्ट्रभाषेत व हिंदुस्थानीभाषेत केलेल्या पदांचीच संख्या जवळ जवळ ४००० होईल. सोहिरोबांस गाण्याचें अंग असल्यामुळें त्यांचीं सर्व पदें उत्तम रागरागिणींवर साधलेलीं असून तीं गायकजनांच्या म्हणण्यांत वरचेवर येतात. सोहिरोबानीं एक बखर उत्कृष्टरीतीनें लिहिली आहे, ती 'सोहिरोबाची बखर' या नावानें प्रसिद्ध असून तींत देहाचे रचनेसंबंधानें उत्तम विवेचन केलें आहे. यावरून सोहिरोबानीं मराठी वाङ्मयांत केवढी भर घातली आहे याची सहज कल्पना होईल. आतां ह्या सर्व ग्रंथांतील याठिकाणीं वेंचे देऊन चरित्रविस्तार करण्यापेक्षां ते सर्व ग्रंथ श्रीयुत भगवंत बाळकृष्ण पै रायकर मुक्काम—होडावडे, संस्थान सावंतवाडी, या सद्गृहस्थानें महत्प्रयासानें नुकतेच छापून प्रसिद्ध केले आहेत व त्या सर्व ग्रंथावर मुंबईतील प्रसिद्ध विद्वान् डॉक्टर अनंत नारायण सांबारे एल्. एम्. एस्. यांच्या साह्यानें दुर्बोधस्थळीं भरपूर टीपाही देण्यांत आल्या आहेत; तरी प्रत्येक प्रापंचिक कुटुंबवत्सल गृहस्थानें ते सर्व ग्रंथ आपल्या संग्रहास ठेवून सवडीसवडीनें वाचण्याचा उपक्रम ठेवावा अशी आमची आग्रहपूर्वक नम्र विनंति आहे; शिवाय सोहिरोबासारख्या महान् साधूच्या काव्यामृतमहोदधींत बुडी मारून त्यांतील साररूप वेंचे काढण्याइतकें सामर्थ्य प्रस्तुत लेखकास नाहीं हे येथें त्यास प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. सोहिरोबाचे सर्व ग्रंथ एकत्र मिळवून ते लोकांपुढें आणण्यास रा. पै यांस किती श्रम करावे लागले आहेत याची कल्पना अनुभवावांचून होणें कठीण आहे. अद्यापि देखील रा. पै यांचे घरीं सोहिरोबाची कविता पानावर लिहिलेली पाहण्यास सांपडते. यावरून रा. पै यांचे आम्हां महाराष्ट्रजनांवर हे अवर्णनीय उपकारच समजले पाहिजेत असो.

शके १८३१ मध्यें चैत्र शुद्ध ९ मीस सोहिरोबाच्या निर्वाणतिथीचा पुण्यदिवस साजरा करण्यासाठीं मुंबई येथील सारस्वत ब्राम्हणसमाजाच्या विद्यमानें डॉ. अनंत नारायण साबारे यांचें सोहिरोबानाथाच्या चरित्रावर तेथील आर्यन् एज्युकेशन सोसायटीच्या सरस्वती हॉलांत जें सर्वोत्कृष्ट प्रवचन झालें; त्यांतील एका महत्वाच्या आशयाचा उल्लेख येथें केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. सोहिरोबांचा चरित्रक्रम सांगून झाल्यावर डॉक्टरसाहेब म्हणतातः—" शके १७१४ चैत्र शुद्ध ९ मी

दिवशीं सोहिरोबांनीं प्रयाण केलें, ज्यादिवशीं जगदुद्धारासाठीं रामाचा अवतार झाला, त्याच दिवशीं सोहिरोबा आपलें काम आटपून या नश्वर जगांतून निघून गेले. सव्वाशे वर्षानंतर त्यांचें ऋण फेडण्यासाठीं आज आम्हांला अडचण पडली. सोहिरोबा आमचे संत नाहींत, सर्व जगाचे आहेत; ते अमक्यांचे आहेत, अगर तमक्यांचे आहेत, असा भेदभाव नाहीं. संतांवर सर्वांची मालकी आहे; कारण, त्यांच्या विभूति जगाच्या कल्याणाकरितां आहेत. आपण अज्ञानपणें अमुक एक संत आमचे असें म्हणतों आणि ह्याचप्रमाणें सोहिरोबांना आपण आपले म्हणत आहों. त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठी आपण काय केलें पाहिजे! सरस्वतीचा पुत्र ज्ञानसंपन्न असेल, तोच खरा सारस्वत आणि 'यज्ज्ञात्वा नेह भूयोन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ।' तेंच खरें ज्ञान होय. असें ज्ञान प्राप्त करून घेईल तो खरा सारस्वत होय. तसेंच जगाच्या अभ्युदयासाठीं ज्याने स्वार्थत्याग केला तोच ईश्वराचा भक्त आणि तोच ब्राम्हण. ब्राम्हणांनीं जगाची सेवा करावयाची. एकाच विशिष्ट धन्याची सेवा करून ज्ञान कमविण्याचा प्रयत्न करितो तो शूद्र होय. 'अयं निजःपरोवेत्ति' अशी गणना करणारा तो शूद्र; 'वसुधैव कुटुंबकं' असें मानणारा जो उदारचरित तोच ब्राम्हण. अशाप्रकारचें सारस्वत व ब्राम्हण या पदद्वयाचें यथार्थज्ञान सोहिरोबांनीं दिलें. '**उदारचरितानांतु वसुधैव कुटुंबकम्**' असें आपल्याला एकदम होतां येणार नाही. ते ध्येय ठेवून आपण प्रयत्न करूंया. आधी आपण आपल्या घरांतील तंटेबखेडे नाहींसे करून प्रेममय होऊं. भगवंत प्रेमानेंच बांधला जाईल, अर्थात् भगवंताने ज्यांना उत्पन्न केलें आहे, त्याच्यावर आधी प्रेम केलें पाहिजे. घरांत प्रेम वाढलें म्हणजे ज्ञातींतील तंटे नाहींसे करून टाका, मग महाराष्ट्र, मग आर्यावर्त, मग जग, असें तुमच्या कार्याचें क्षेत्र विस्तृत होऊंद्या. सूर्य होतां येत नाहीं म्हणून काजवा देखील होण्याचा प्रयत्न करूं नये, हा शुद्ध वेडेपणा होय. जो ज्ञानभांडाराचा मालक होईल तो सारस्वत, व जगाच्या कल्याणाकरितां झटेल तो ब्राम्हण. अशारीतीनें सारस्वत व ब्राम्हण होण्याचा प्रयत्न केला तरच आपण सोहिरोबाचें ऋण फेडण्याच्या मार्गाला लागलो, असे म्हणतां येईल."

**धन्य सोहिरोबा साधु समर्थ । श्री गहिनीचा अवतार सत्य ।**
**तारावया जडजीवांते । जन्मले नाथ भूठायीं ॥ १०८ ॥**
**नानातऱ्हेचीं करूनि पदें । पूजिलीं जेणें भगवत्पदें ।**
**उद्धरोनि जग विविधें । स्वात्मपद सेविलें पैं ॥ ११८ ॥**

शेवटीं तो संत सोहिरा । पांडुरंग मुकुटीं अडला हिरा ।
तेणें किरिट दिसे साजिरा । लाजवी दिनकरा स्वप्रकाशें ॥११९॥
[ राजाराम प्रासादिकृत भक्तमंजरी अ० ५४. ]

# गोपाळनाथ गोसांवी मळगांवकर.

" पृथ्वीच्या पाठीवर आजवर पुष्कळ राज्यें उदयास आलीं व लयास गेलीं. कित्येकांचा मागमूसही उरला नाहीं व तीं पुन: ऊर्जितस्थितीला येतील अशी आशाही नाहीं ! याचें कारण काय ? तर, अध्यात्मिक सामर्थ्य, स्फूर्ति किंवा उमेद आणणारी पूर्वपरंपरा व अत्यंत उदात्त अशा अध्यात्मिक आकांक्षा यांचा त्या राज्यांतून पूर्ण अभाव ! वस्तुत: राष्ट्रांत एकादा महात्मा असणें हें त्या राष्ट्रांतील जीवकलेचें अगर जोमाचें पहिलें लक्षण आहे. एकादें राष्ट्र केवळ झोंपेंत घोरत असलेलें मृतप्राय असेंही दिसेल; पण जोंपर्यंत निदान एक तरी पूर्णतेस पोंचलेला असा महात्मा राष्ट्रांत जिवंत आहे तोंपर्यंत त्या राष्ट्राकडे वांकड्या दृष्टीनें पाहण्याची प्रत्यक्ष यमाजीभास्कराचीही प्राज्ञा नाहीं ! असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं अनेक बाबतींत फार जर्जर करतील परंतु केव्हांही मारावयाचा नाहीं "

तात्पर्य, भगवद्भक्त संतसाधूंची योग्यता फार मोठी आहे, आणि ती केवळ परमार्थांतच नव्हे तर व्यवहारांतही आहे. कारण, अधोगतीच्या विपत्तिमय कर्दमांतून, राष्ट्राला वर काढण्यास धर्मजागृतीवांचून अन्य साधन नाहीं व हेंच महत्कार्य दयाळू परमेश्वर संतांकरवीं घडवून आणतो. अर्थात् साधुसंतांचे अवतार म्हणजे राष्ट्रोदयाचा प्रभातकाल होय. याच उत्साहजनक काळांत धार्मिक साधूंच्या ईश्वरीप्रेरणेनें समाजांत चित्तशुद्धि, धर्मश्रद्धा, ईश्वरनिष्ठा, कर्तव्यतत्परता, राष्ट्रबंधुत्व, दृढनिश्चय इत्यादि स्पृहणीय गुणांचें हळूं हळूं बीजारोपण होत असतें. अशी ही स्थिति इतर देशापेक्षां हिंदुस्थानांत पुष्कळपटीनें जास्त अनुभवास येते. यावरून इतर कोणत्याही देशापेक्षां आपल्या देशांत साधुसंतांच्या विभूति बऱ्याच अवतीर्ण झाल्या आहेत असें म्हटलें पाहिजे व ही एक परमेश्वराची मोठी कृपाच होय; तेव्हां या कृपेस अनुसरून आपल्या मायदेशांत जे वेळोवेळीं अनेक भगवद्भक्त साधु निर्माण झाले त्यांपैकींच गोपाळनाथ गोसांवी हे एक होत. त्यांचा मोठा चरित्रभाग यथामति येथें थोडक्यांत सादर करितों.

सावंतवाडी संस्थानांत कुडाळ म्हणून जो एक प्रसिद्ध प्रांत आहे त्या प्रांतांत परुळें नांवाचा एक बराच मोठा गांव आहे. हा गांव मालवणापासून तीन कोसाचे अंतरावर आहे. त्या कुडाळप्रांतीं मुख्यत: गौडसारस्वतब्राम्हणज्ञातीची विशेष वस्ती असून वाडीसरकारचें राज्य होण्यापूर्वी त्या प्रांताचे मुख्य आधिपत्यही त्याच ज्ञातीकडे होते. त्या ज्ञातीतील सामंत ( देसाई ) उपनांवाचे कोणी पुरुष मुख्य राजपदावर होते. ते आपणास विजापूर बादशहाचे मांडलीक म्हणवीत असत. पुढें पुढें कालपरत्वें त्यांना कुडाळदेशकर देसाई अशा नांवानें संबोधिण्याचा प्रघात पडला. अर्थात् हाच प्रघात सबंध ज्ञातीवरही लागू झाला. मूळ राजघराण्यापैकीं पुरुष मालवण व कुंभवडे येथें राहतात. हीं देसायांची घराणीं प्रसिद्ध आहेत; परंतु कालपरत्वे राज्याधिकार मात्र नामशेष झाला. असो.

त्याच प्रसिद्ध कुडाळदेशकर कुलांत परुळे गांवी गोपाळनाथांचें जन्म झालें. त्यांच्या जन्मकालाविषयीं नक्की माहिती नाहीं तरी त्यांनीं आपल्या काव्याच्या शेवटी बोधलेबुवांचा उल्लेख केला आहे, त्यावरून बोधलेबुवा हे गोपाळनाथांचे गुरु असले पाहिजेत व ते सोळाव्या-सतराव्या शतकांत झाले; तेव्हां गोपाळनाथांचा जन्मही त्याच सुमारास असावा. त्यांच्या कुटुंबांत मंडळी फारशी नव्हती. पुढें दैववशात् त्यांच्या कुटुंबावर महामारीदेवीचें कालचक्र फिरल्यामुळें कुटुंबातील बहुतेक माणसे मरण पावलीं, आणि एक लहान मुलगा म्हणजे चरित्रनायक गोपाळनाथ व त्याची आई अशी दोनच मनुष्यें राहिली होतीं; पण तीही भीतीनें आपला राहता गांव सोडून सावंतवाडीनजीक मळगाव म्हणून एक गाव आहे. तेथे त्यांचे कोणी नातेवाईक आप्त होते त्यांच्या आश्रयास जाऊन राहिलीं तेथे काहीकाल गेल्यानंतर कार्तिक महिन्यात एकादशीच्या उत्सवास पंढरपुरास जाणारे शेंकडो वारकरीलोक रात्रीच्यावेळीं भजन करीत, वरील गांवातून जाऊं लागले असतां त्याचा तो मधुर भजनध्वनि त्या बाईच्या कर्णरंध्रात दुमदुमला आणि तिला असें वाटूं लागले कीं, आपणही मुलास घेऊन या लोकांबरोबर पंढरीस जावें. त्याप्रमाणे मुलासही तो बेत पसंत पडताच ती दोघेंही वारकरीलोकांमागून चालूं लागली; तेव्हा त्या वारकरी मंडळीतील लोकास अशी चिंता पडली कीं, ही एकटी बायको, मुलगा पडला लहान, तशात जवळ पैसाअडका कांही नाहीं. मग अशास्थितीत मार्गामध्ये त्यांची काळजी कोणी घ्यावी? परंतु ज्या भगवत्प्रेरणेनें त्यांना स्वाभाविक इच्छा उत्पन्न झाली तोच दयाघन भगवान् त्यांची काळजी घेण्यास समर्थ असणारच! आणि

त्याप्रमाणें त्या वारकरी मंडळीपैकीं कांहीं मंडळींच्या अंतःकरणास द्रव येऊन त्यांनीं आपल्या बरोबरच त्या पांथस्थ मायलेकराचीही व्यवस्था करण्याचें ठरविलें. शिवाय त्यावेळीं आतांच्यासारखीं प्रवासाची साधनें सुखकर नसल्यामुळें लांबचा प्रवास म्हणजे बहुधा पायींच व्हावयाचा. तशांत देशस्थिति स्थिर नसल्यामुळें पेंढारी, ठग वगैरे लोकांपासून वाटसरू लोकांस फार उपद्रव होत असे. अशा लोकांपासून त्रास न व्हावा म्हणून वारकरी, यात्रेकरू वगैरे लांबलांबचा प्रवास करणारे लोक मोठमोठे जमाव करून जात असत. असो.

अशारीतीनें ही वारकरीमंडळी मजल दरमजल करीत पंढरपुरास पोंहोचली. वस्तुतः पंढरपूर म्हणजे भूलोकींचें केवळ साक्षात् वैकुंठ होय ? **तुकाराम, बोधलेबुवा, वामन** अशांसारख्या महान् भगवद्भक्त साधूंचा तेथें नेहमीं वास होत असे; त्यामुळें पंढरीस येणाऱ्या वारकरीमंडळीस पांडुरंगाच्या दर्शनानंतर या साधूंच्याही दर्शनाचा लाभ मिळे त्याप्रमाणें धामणगांवी वारकऱ्यांबरोबरच गोपाळनाथही आपल्या मातुश्रीबरोबर गेले. अगोदरच त्यांच्या कोवळ्या अंतःकरणावर भगवन्नामामृत सेचन झाल्यामुळें तीव्र मुमुक्षुत्व बाणलें होतेंच; फक्त सद्गुरूंची त्यांस अपेक्षा होती, आणि तदनुरूप साधुंच्या दर्शनास गेल्यावर त्यांचे मनाची प्रवृत्ति तेथेंच साधुसेवेस राहावें अशी झाली व बरोबरच्या वारकरीमंडळीस सोडून ते आपल्या मातुश्रीसह साधुंच्या सेवेस राहिले. त्यांच्या सान्निध्यांत असतांनाच गोपाळास लिहितां वाचतां येऊं लागलें व हरएक कामात त्याची चलाख बुद्धि आणि परमार्थाकडे ओढा हीं पाहून बोधलेबुवांचीही त्याजवर पूर्ण कृपा झाली होती. दरदिवस प्रथम गुरूसाठीं भिक्षा मागून आणून नंतर माध्यान्हकालीं आपण भिक्षा आणून मातुश्रीसह उदरनिर्वाह करावा; मध्यरात्रीपर्यंत गुरूंचे पाय चुरीत बसावें; मागतील

---

१ पंढरपुरापासून १० कोसांवर धामणगांव म्हणून एक गांव आहे, तेथें बोधलेबुवा राहात असत. ते संसारी होते तरी केवळ विदेहवृत्तिनें राहून निरंतर हरिभजनांत व इतर सत्कर्मांत आपला कालक्षेप करीत असत. त्यांना पांडुरंगाचा साक्षात्कार होत असे व त्यांनीं चमत्कारही पुष्कळ केले. त्यांपैकीं "ओंधळ्याच्या थोड्या ताटांना कणसे आणिल्याचा चमत्कार" तर आबालवृद्धांस माहित आहे. खुद्द तुकाराममहाराजांनीं एकेठिकाणीं म्हटलें आहे कीं, "भक्तांमध्यें भक्ति पहा त्या बोधल्यानें केली । थोड्या ताटांनां कणसे आलीं ॥" एकंदरींत त्यावेळच्या साधूमंडळींत बोधलेबुवा चांगले मान्य होते.

तो भिक्षा आणून खावा; सान्निध्य सोडून कोठेंही बाहेर जाऊं नये; इत्यादि प्रकारांनीं सतत एक तप म्हणजे १२ वर्षे होईपर्यंत गोपाळानें एकनिष्ठेनें सेवा केली; परंतु एवढ्या अवधींत गुरूंनीं त्यास 'तूं जेवतोस कोठें? जेवलास किंवा नाहीं?' वगैरे कांहींच विचारपूस केली नाहीं. फक्त त्यांनीं केलेली सेवा घ्यावी एवढेंच चाललें होतें. मध्यरात्रीनंतर गोपाळानें पाय चुरून खोलींतून बाहेर जावें, आणि पुनः कदाचित् हांक मारतील म्हणून जवळच कोठेंतरी पडून रहावें. इतक्यांत त्या खोलीमध्यें बोधलेबावापाशीं कोणी गुजगुज गोष्टी केलेल्या त्यास बाहेर पडल्याठिकाणीं ऐकूं येत असत; पण त्या गोष्टी गूढ ब्रम्हज्ञानसंबंधीं असल्यामुळें त्यांत त्याची मति चालत नसे; तथापि कित्येक वर्षें असाच प्रकार चालल्यानंतर सद्गुरुकृपेनें गोपाळासही त्या गोष्टीचा बोध होऊन चांगलें ज्ञान झालें; तरी त्याच्या अंतःकरणास समाधानी नव्हती. उघडच आहे, मनुष्य कितीही जरी ज्ञानी झालेला असला तरी ब्रम्हस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यावांचून त्या ज्ञानाचा कांहीं उपयोग नाहीं आणि तसा साक्षात्कार होण्यास सद्गुरूचीच पूर्ण कृपा पाहिजे. असो.

एखादे दिवशीं रात्रीं पाय चुरतां चुरतां गोपाळास तेथेंच निद्रा यावी परंतु त्या खोलींत देवाची येण्याची वेळ झाली म्हणजे स्वतः गुरुमहाराज 'गोपाळा बाहेर जा' असें म्हणत; मग त्यानें बाहेर येऊन बसावें आणि काय बोलतात तें नीट लक्ष देऊन ऐकत रहावें; पण प्रतिदिवशीं त्या खोलींत कोण येतो व काय "गोष्टी चालतात, असा सद्गुरूच्या अखंड प्रीतींतला दैववान् पुतळा कोण असावा, याचा स्पष्ट उलगडा करून घेण्याविषयीं त्यास अतिशय उत्कंठा होती पण गुर्वाज्ञा अनुल्लंघनीय जाणून त्यानें बाहेर जा म्हणतांच निमूटपणें कांहीं न बोलतां बाहेर जाऊन बसावें. अशारीतीनें १२ वर्षे निघून गेल्यावर एकेदिवशीं गुरुजी बोधलेबावा प्रसन्न होऊन गोपाळास म्हणाले, "गोपाळा तुला काय इच्छा असेल तें माग." तेव्हां त्यानें पुढें होऊन मोठ्या नम्रतेनें म्हटलें 'महाराज! आपण मध्यरात्रीच्यावेळीं कोणाशीं बोलत असतां त्यावेळीं खोलींतून बाहेर जाण्याविषयीं मला आज्ञा होऊं नये एवढेंच माझें मागणें आहे.' हें ऐकतांच गुरूस मोठें समाधान वाटलें, आणि 'हा प्रपंचसंबंधीं द्रव्य, संतति वगैरे कांहीं न मागतां केवळ भगवद्दर्शन मागतो यावरून हा चांगला साधु बनेल अशी बोधलेबावांची खात्री होऊन त्यांनीं त्यास जवळ बोलावून म्हटलें; "बाबा ठीक आहे, तुझ्या इच्छेप्रमाणेंच होईल." असें सांगून त्याच रात्रीं त्यास साक्षात् पांडुरंगाची भेट करविली आणि मस्तकावर वरदहस्त ठेवून त्यास नाथ-

सांप्रदायाप्रमाणें उपदेश केला व सबंध बारा वर्षांमध्यें कधींच त्याचे जेवणाची चौकशी केली नव्हती ती त्यादिवशीं मात्र बोधलेबावांनीं 'बाळ जेवलास काय' म्हणून विचारलें; त्याबरोबर आत्मज्ञानामृतप्राशनानें अखंडतृप्ति झालेल्या गोपाळानेंही 'होय जेवलों' असें सांगितलें. याप्रमाणे बोधलेबोवा साधूची गोपाळ गोसावी याज-वर पूर्ण कृपा होऊन ते त्या दिवसापासून पूर्ण भगवद्भक्त बनले आणि गोपाळनाथ या नांवानें विशेष प्रसिद्धीस आले.

नंतर कांहीं दिवसांनीं बोधलेबावांनीं गोपाळनाथास आज्ञा केली कीं, आतां तुम्ही आपल्या गांवी जाऊन लग्न करून प्रपंच करा व जडमूढांचा उद्धार होण्यासाठीं भक्तिमार्गाचा महिमा प्रकट करा. ही गुरूची आज्ञा शिरसामान्य करून गोपाळनाथ आपल्या मातेसह कोंकणप्रांतीं यावयास निघाले. निघतांना बोधलेबावांनीं नाथास विठ्ठलाच्या पादुका व पालखी देऊन सांगितलें कीं, दरवर्षी आषाढी एकादशीस पंढरीस येत असावें. तेथें तुमची, माझी व इतर संतांच्याही भेटी होतील. याप्रमाणें सद्गदित अंतःकरणानें बावांचा निरोप घेऊन नाथ निघाले ते पहिल्यानें पंढरीस आले. त्यावेळी त्यांस प्रत्यक्ष पंढरीनाथानें दर्शन देऊन विठ्ठलरखुमाईच्या मूर्ति दिल्या आणि या नेऊन तुझ्या गांवीं स्थापन कर असें सांगितलें इकडे सावंतवाडीसही त्याचवेळीं खेमसावंत राजास स्वप्न झालें की, 'गोपाळ गोसावी यांस मूर्ति दिल्या आहेत त्या तुम्हीं मळगांवीं स्थापन करा' असें स्वप्न होतांच राजाचे शिपाई गोपाळनाथाचा शोध करण्यास निघाले; पण ते पंढरीहून अद्याप आलेच नव्हते पुढें मजल दरमजल करीत त्यांची मातुश्री व पालखीचे दोन भोई इतकी मंडळी सावंतवाडीस येऊन पोंचली आणि तेथे शहरांत एक मोठा तलाव आहे त्याच्या कांठीं मुक्काम केला. ते दिवस ऐन पावसाळ्याचे होते. आर्द्रानक्षत्र गेले तरी पाऊस पडावा तसा न पडल्यामुळें पिकें वाळत चालली होती व कोंकणांतील लोकांस दुष्काळ येतो कीं काय अशी भीति पडली होती. राजेसाहेब खेमसावंत यांनीं पर्जन्य पडावा म्हणून शहरांत तलावाचे कांठीं शेकडो ब्राम्हण अनुष्ठानास बसविले होते व शिवमंदिरांतून शंकरावर अभिषेक सुरू केला होता. हा प्रकार पाहून गोपाळनाथांनीं, त्या कामा-वर नेमलेल्या अधिकाऱ्यास विचारिलें, 'हें अनुष्ठान कशासाठी चालविलें आहे?' अधिकाऱ्यानें नाथांस सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून नाथ म्हणाले, 'अहो, या अनुष्ठानानें काय व्हावयाचें आहे? सर्व विश्वाचें नियमन करणारा जो परमेश्वर, ज्याच्या आज्ञेनें सूर्य-चंद्र उगवतात, तो जर संतुष्ट होईल तर आतांच पर्जन्यवृष्टि

होईल; तेव्हां भक्तिपुरःसर त्याच्या नामाचा घोष करा.' असें ऐकतांच हे कोणीतरी साधुपुरुष असावे असा तर्क करून अधिकाऱ्यानें हें नाथांचे भाषण राजेसाहेबांस कळविलें. राजेसाहेबही सत्पुरुषाचे भुकेलेले असत. त्यांस ती हकीकत ऐकतांच पूर्वस्वप्नाची स्मृति झाली, आणि ते आपल्या सर्व अधिकाऱ्यांसह त्याठिकाणीं येऊन दाखल झाले व नाथांस त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला. नाथांनीं राजास आशीर्वाद देऊन 'या अनुष्ठानेंकरून पर्जन्य पडणें शक्य नाहीं. जर शहरांतील सर्व लोक येथें येऊन श्रीपांडुरंगनामाचा घोष करितील तर आतांच पर्जन्य पडेल.' असें सांगितलें. या नाथाज्ञेप्रमाणें राजेसाहेबांनीं तात्काल अनुष्ठान बंद ठेवण्याचा हुकूम केला व सर्व लोक जमवून नाथांबरोबर हरिभजनाचा मोठा कडाका चालविला. इतक्यांत नाथांनीं म्हटल्याप्रमाणें बरीच पर्जन्यवृष्टि होऊन सर्व तलाव पाण्यानें अगदीं भरून गेला व सर्वत्र पाणीच पाणी होऊन दुष्काळाची भीति अगदीं नाहींशी झाली.

हा चमत्कार पाहतांच राजाच्या मनांत नाथांसंबंधानें फारच पूज्यबुद्धि उत्पन्न झाली व त्यांनीं त्यांस पालखींतून मोठ्या थाटानें आपल्या वाड्यांत आणिलें. राजेसाहेबांनीं नाथांच्या पायीं मस्तक ठेवून विनंति केली कीं, आपला सविस्तर वृत्तांत ऐकावा अशी आमची इच्छा आहे; त्याप्रमाणें राजाची ही भक्ति पाहून नाथांस फार समाधान वाटलें व आशीर्वादपूर्वक त्यांनीं आपला सर्व वृत्तांत त्यांस निवेदन केला. नंतर सावंतवाडीपासून तीन मैलांवर मळगांव म्हणून जो गांव आहे; तेथें राजेसाहेबांनीं देवालय बांधून देऊन त्यांत नाथांकडील पांडुरंगाची मूर्ति स्थापन केली व तेथील निम्मे उत्पन्नाची तळीगणधर्णा, आणि ठिकाण कोंडास, या नांवाच्या जमिनी वंशपरंपरेनें उपभोगून, राज्यास क्षेम चिंतून हरिभक्ति वाढवावी, अशा अर्थाची सनद नाथांस लिहून दिली व बरोबर मंडळी देऊन त्यांस मळगांव मुक्कामीं रवाना करून दिलें. तेथें गेल्यावर नाथांनीं आपलें लग्न केलें आणि अशारीतीनें प्रपंचामध्येंच राहून त्यांनीं पांडुरंगाच्या भक्तींत सुखानें आपला काल घालविला. अद्याप मळगांवीं नाथांच्या वंशजांपैकीं माणसें आहेत व त्यांचाही पंथ हरीभजनाचाच आहे. राजेसाहेबांनीं दिलेल्या इनामजमिनी हल्लींही चालत आहेत.

बोधलेबावांच्या उपदेशाप्रमाणें गोपाळनाथांनीं कीर्तन, कविता वगैरेच्याद्वारें कोंकणप्रांतांतील लोकांचें लक्ष्य हरिभक्तिकडे वळविण्याचा प्रयत्न सुरू केला. आपल्या राज्यांत एक अशारीतीचे महासाधु असतात म्हणून सावंतवाडीच्या राजेसाहेबांस मोठा अभिमान वाटत असे. पुढें पुढें गोपाळनाथांच्या हातून बऱ्याच

आश्चर्यकारक लीला घडून आल्या, यामुळें तर त्यांच्या साधुत्वाची अधिकच प्रसिद्धी झाली. त्यांच्या प्रसिद्ध लीलांपैकीं काहींचा येथें उल्लेख केला आहे.

वाडीसंस्थानांत बावगांव म्हणून गांव आहे. त्या गांवच्या हक्कदार पाटलास पुढें वंशास पुत्र नव्हता. पुष्कळ देवकृत्यें, नवस वगैरे केले पण त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं त्या घराण्यांत संततीची निराशा होऊन तें कुटुंब अगदीं निरुत्साही झालेलें होतें व कुटुंबांतील माणसेंही वृद्ध झालेलीं होतीं; यामुळें पुढें देखील मुलगा होण्याची कांहींच आशा राहिली नव्हती. तेव्हां एकदां कांहीं कारणानें गोपाळनाथ त्या गांवीं पोंचले असतां त्यांची धवलकीर्ति ऐकून त्या पाटलाच्या घराण्यांतील मुख्य एका ऐंशी नव्वद वर्षांच्या म्हातारीनें येऊन त्यांस नमस्कार केला व आपली मुलासंबंधाची हकीकत निवेदन केली. तेव्हां नाथांनीं तिला ' बाई तुला मुलगा होईल हां ! ' असा आशीर्वाद दिला. हें ऐकून जवळच्या मंडळीस मोठें आश्चर्य वाटलें; कारण ती बाई खरोखरच नव्वद वर्षांची असून घरांत वडील म्हणून साधूच्या दर्शनास आली होती व तिच्यापेक्षां कमी वयाच्या बायकाही घरामध्यें होत्या; पण ज्यांची वाणी म्हणजे साक्षात् कामधेनूप्रमाणें, अर्थात् त्या वाणींतून निघालेले शब्द खोटे कसे होतील ! तेव्हां नाथांनीं म्हटल्याप्रमाणें पुढें एक वर्षाच्या आंत त्याच म्हाताऱ्या बाईस मुलगा झाला ! त्याच मुलाच्या कुटुंबांमध्यें आज शेदोनशें माणसें बावगांवीं सुखानें नांदत आहेत व ही सर्व साधूंची कृपा समजून त्या कुटुंबांतील माणसांनीं गोपाळनाथांच्या मठाकडे जमीन इनाम करून दिलेली अद्याप चालत आहे.

एकदा नाथांचें कीर्तन करवावें असें वाडीसरकारच्या मनांत येऊन त्यांनीं नाथांस निरोप पाठविला. तो मान्य करून ठरविलेल्या दिवशीं सर्व तयारी करून साथीदारमंडळीस अगोदर पुढें रवाना करून दिलें. इकडे सावंतवाडीस नाथांचें कीर्तन होणार म्हणून राजवाड्यांत शेंकडो लोक जमले होते. फक्त नाथांच्याच आगमनाची सर्वजण मार्गप्रतिक्षा करीत होते. दरबारही मोठ्या थाटाचा जमला होता. इतक्यांत साथीदारमंडळी येऊन दाखल झाली. त्याबरोबर मंडळीसही बराचवेळ तिष्ठत बसण्याचे त्रास चुकले म्हणून समाधान वाटलें; पण हें त्यांचे समाधान फारवेळ टिकलें नाहीं; कारण साथीदारमंडळी पुढें निघून गेल्यानंतर लगेच कांहींवेळानें गोपाळनाथही जाण्यास निघाले; परंतु मध्यंतरी स्वानंदसुखाच्या भ्रमांत कीर्तनास जावयाचें विसरून मार्गांतच एका झाडाखालीं भजन करीत स्वस्थ बसले. इकडे राजवाड्यांत

तर नाथ आतां येतील, अमळशानें येतील, म्हणून मंडळीस सांगतां सांगतां त्या साथीदारांची पुरेवाट झाली; पण " अज्ञानंदीं लागली टाळी । कोण देहातें सांभाळी ॥ " अशी ज्यांची स्थिति झाली होती ते नाथ कसचे येतात ! उलट नाथ जर आले नाहींत तर आतां राजेसाहेबांचा खात्रीनें रोष होतो म्हणून त्यांस आणखी जास्त काळजी उत्पन्न झाली होती इतक्यांत नाथांची स्वारी येऊन उभी ठाकली, आणि कीर्तनास प्रारंभ झाला व तें इतकें रसभरित झालें कीं, सर्व श्रोते-मंडळी देहभानविरहित होऊन राहिली होती. अखेरीस कीर्तन संपल्यावर मंडळी आपआपल्या घरीं जाण्यास निघाली व नाथही तेथल्यांतथेंच अंतर्धान पावले. सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली. नाथ इतक्यांत कोठें गेले याचा त्यांस कांहींच उमज पडेना. आसपास पुष्कळ शोध केला पण नाथांचा पत्ता लागला नाहीं; यामुळें त्यांच्या साथीदारमंडळींनीं मळगांवची वाट धरली. तों मार्गामध्यें एका झाडाखालीं नाथांची स्वारी भजनानंदांत निमग्न होऊन बसलेली दृष्टीस पडली. हे इतक्यांत येथें कसे आले याचें त्यांस मोठें कोडें पडलें. त्यांनीं नाथांस विचारिलें कीं, आपणास कीर्तनास यावयास फारच वेळ लागला यावरून आम्हांस वाटलें की, आपण आतां येत नाहीं, पण ईशकृपेनें आपण लौकरच येऊन कीर्तन केलें यामुळें सर्व मंडळीस पराकाष्ठेचें समाधान झालें. असो. परंतु इतक्या वेळांत आपण याठिकाणीं येऊन कसे पोहोंचलांत याचें आम्हांस भारी आश्चर्य वाटतें. अशारीतीचें साथीदारमंडळीचें भाषण ऐकतांच नाथ एकदम देहभानावर आले व ' काय, कीर्तन झालें म्हणतां ? कोणी केलें ? ' असें त्यांनीं मंडळीसच उलट विचारिलें; तेव्हां मंडळी म्हणाली कीं, महा-राज, आपणावांचून दुसरें कोण करणार ? ' यावर नाथ म्हणाले; ' छेहो ! तुम्हीं खोटेंच कांहींतरी सांगतां. मी पंढरीनाथाची शपथ वाहून सांगतों कीं, मी कीर्तनास येण्याकरितां म्हणून घरून निघालों होतों, परंतु बुद्धिभ्रंश होऊन येथेंच बसलों तों हा अद्याप तसाच बसलों आहे. ' हें नाथांचें भाषण ऐकतांच मंडळी मोठ्या विचा-रांत पडली. झालेला प्रकार काय होता तें कोणाच्या ध्यानांत येईना; परंतु आपला भक्त वेळेवर न आल्यास राजेसाहेबांचा कदाचित् त्याजवर रोष होईल या भीतिनें त्याची लाज राखण्याकरितां साक्षात् पंढरीनाथ पांडुरंगानें नाथांच्या रूपानें राजवाड्यांत कीर्तन करून आलेला प्रसंग टाळला व आपण अदृश्य झाले.

हा प्रकार कांहींवेळानें नाथांच्या ध्यानांत आल्यावर ' पंढरीनाथा ! माझ्याकरितां तुला श्रम सोसावे लागले ना ? शिव ! शिव ! ' असें म्हणून ते ढळढळां रडूं

लागले. इकडे कीर्तन करणारे गोपाळनाथ नसून पंढरीनाथ होते ही बातमी हां हां म्हणतां सर्वत्र पसरून नाथांच्या साधुत्वाची फार प्रख्याति झाली व ही गोष्ट राजालाही समजतांच त्याची पहिल्यापेक्षां बुवांवरील भक्ति अधिक वाढली.

एकेदिवशीं गोपाळनाथ बाहेरगांवीं कीर्तनासाठीं गेले होते; परंतु त्यांच्या साथीदारांपैकीं मृदंग वाजविणारा नव्हता. गांवांत तपास केला तरी कोणी मिळाला नाहीं. यामुळें ऐनवेळीं फजित पावण्याचा प्रसंग आला. इतक्यांत कोणीएक लहान मुलगा येऊन आपण मृदंग वाजवितों असें म्हणूं लागला; तेव्हां हिरवें मागणाऱ्यास भाजलेलें मिळाल्यावर आणखी काय पाहिजे. सर्वांस आनंद झाला व गोपाळनाथांनीं त्या आलेल्या मुलास-मृदंग्यास—नमस्कार करून कीर्तनास सुरवात केली. तो मुलगा इतका लहान ठेंगु होता कीं, मृदंग ठेवण्याच्या घोडीमध्यें पाय अडकविण्यासाठीं जो आडवा दांडा असतो, त्याजवर तो उभा राहून मृदंग वाजवीत असे. इतका जरी तो लहान मुलगा दिसत होता तरी अभंग, पदें वगैरे गायनाचे बोल जसे बोलावे तसे अगदीं हुबेहुब मृदंगांतून उठवी. तेव्हां कीर्तनास बसलेल्या सर्व मंडळींचें लक्ष्य त्या वाजविणाऱ्या मुलाकडेसच लागलें; नंतर कीर्तन आटोपल्यावर बुवा जाऊन जाग्यावर बसले आणि त्या मृदंग्याच्या ठावठिकाणाची चौकशी करणार इतक्यांत तो मृदंगी तेथें दिसेनासा झाला. लोक इकडे तिकडे शोधूं लागले तेव्हां नाथ म्हणाले ' अहो तुम्हीं वेडे आहां, पाहता कोणास ? जो परमात्मा वाणी, मन, देह यांना अगोचर, तो तुमच्या या शोधण्यानें कसा सांपडेल ? ' असें म्हणतांच सर्वांचीं मनें स्थितीवर आलीं व तो प्रत्यक्ष पंढरीनाथच भक्तांच्या पडत्यावेळीं साह्य करण्याकरितां आला अशी सर्वांची खात्री झाली. हल्लीं गोपाळनाथांचे जे वंशज आहेत ते कीर्तनास उभे राहिले म्हणजे प्रथम मागें नमस्कार करितात. ही वहिवाट तेव्हांपासूनच अमलांत आलेली चालत आहे.

वाडीपासून पांच कोसांवर समुद्रतीरीं आजगांव म्हणून एक गांव आहे. त्याठिकाणीं एका श्रीमंत सोनारजातीच्या गृहस्थाचे घरीं दरवर्षी नवरात्रांत ललितापंचमीचा उत्सव होत असे. नित्य कीर्तन, पुराण, मंत्रपुष्प, नृत्य वगैरे समारंभानें व्हावयाचें, आणि त्यासाठीं मुद्दाम हरिदास, पुराणिकांना आमंत्रण करवून आणण्याचा परिपाठ होता. त्याप्रमाणें गोपाळनाथांच्या कीर्तनाची प्रसिद्धि ऐकून त्या गृहस्थानें एक वर्षी मुद्दाम नाथांस आमंत्रण केलें होतें. नित्यक्रमाप्रमाणें पूजा, आरती, मंत्रपुष्प, पुराण इत्यादि आटोपल्यावर सुमारें मध्यरात्रीनंतर नाथ कीर्तनास उभे राहिले.

त्यावेळच्या नाथांसारख्या भगवद्भक्त महात्म्याच्या कीर्तनाचें वर्णन करण्यास आमच्यासारखे भक्तिज्ञानशून्य प्राणी काय समर्थ होणार? मुख्यतः त्यांच्या कीर्तनाचा विषय "**अवघें पोटासाठीं सोंग। येथें कैंचा पांडुरंग॥**" हा प्रसिद्ध तुकोबाचा अभंग होता. मंगलाचरण झाल्यावर नाथांनीं एकदम भागवताच्या एकादशस्कंधांतील:—

"**सएषजीवो विवर प्रसूतिः। प्राणेन घोषेण गुहांप्रविष्टः।**
**मनोमयं सूक्ष्ममुपेत्य रूपं। मात्रा स्वरोवर्ण इतिस्थविष्ठः॥**"

या श्लोकाच्या आधारानें अध्यात्म सांगावयास आरंभ केला; पण तें श्रोतेमंडळीस काय होय? वास्तवीक जुन्याकालची कीर्तनपद्धति म्हटली म्हणजे सांप्रतच्या कीर्तनपद्धतीहून फार निराळी होती. पूर्वीच्या सत्पुरुष हरिदासांत व आतांच्या नामधारी कथेकऱ्यांत पुष्कळ तफावत आहे हें निर्विवाद होय. असो.

तेव्हां श्रोत्यांच्या रुचीप्रमाणे घटका दोन घटका त्यांचे मनरंजन करून पैसे मिळविणार वृत्तिवंत हरिदासांपैकीं गोपाळनाथ नव्हते. त्यांच्या अमोघ वाणीतून निघालेलें ज्ञानामृत प्राशन केले म्हणजे अखंड सुखाची प्राप्ति होऊन कृतार्थ झाल्यावांचून कोणीही राहणार नाहीं. ऐकणाऱ्यास मात्र तशी तीव्र इच्छा असली पाहिजे; पण गोपाळनाथांचे कीर्तनास बसलेली श्रोतेमंडळी घरच्या यजमानासुद्धां क्षणिकसुखाची इच्छा करणारी असल्यामुळे त्यांस करमणुकीवांचून दुसरा कोणताही भाग कीर्तनामध्यें नको होता. दुर्दैवानें त्यांचा असा समज होता कीं, नाथ हे कांहीं हास्यरसोत्पादक चुटके सांगतील व एखादे मनोरंजक आख्यान लावतील! परंतु त्यांची अगदीच निराशा झाली; तथापि नाथांचें लक्ष्य श्रोत्यांकडे मुळींच नव्हतें त्यांचा अध्यात्मप्रतिपादनाचा ओघ जो एकदां सुरू झाला तो तसाच चालला होता. कांहीं म्हातारीं माणसें तेव्हढीं त्यांचा तो विषय चित्त देऊन ऐकत होती. बाकी बहुतेक मंडळीस अगदीं कंटाळा आला होता; इतकेंच नाहीं तर दुसरा एकादा हरिदास बोलाविण्याचा त्यांचा विचार होता, पण तसें करणें कित्येकांस अप्रशस्त वाटल्यामुळें तितका प्रसंग आला नाहीं. नंतर सर्व मंडळींनीं मात्र जेथल्यातेथें पेंगण्यास प्रारंभ केला. घरचा मुख्य यजमान तर स्वस्थ एकीकडे जाऊन घोरत पडला. कांहीं बाहेर जाऊन गप्पा छाटीत बसले.

इकडे नाथांनीं रीतीप्रमाणें कीर्तन संपविण्याच्या बेतांत आणिलें होतें. सध्यांच्या हरिदासांप्रमाणें यजमानाच्या मर्जीवर कीर्तन संपविण्याचा त्यांचा परिपाठ नव्हता.

पहाटें चार घटका रात्र असतांना नाथांनीं कीर्तन संपवून काकडेआरती म्हणण्यास आरंभ केला; तरी मंडळी कोणी उठेनात व मुख्य यजमानही आरती करण्यास येईना, तेव्हां नाथांनींही त्याबद्दल विशेष चौकशी केली नाहीं. असा प्रकार झाल्यावर कांही मंडळी नाथांची टर उडविण्याकरितां मुद्दाम तेथें येऊन बसली. इतक्यांत तेथें असा चमत्कार घडला कीं, देवीच्या समोर ज्या दोन समई पेटत होत्या त्यांतील एक समई आपोआप आपली जागा सोडून हळूहळू सरकत नाथांपर्यंत आली व तेथें नाथांची आरती म्हणून संपेपर्यंत थोडावेळ उभी राहून पुन: तशीच स्वस्थानीं जाऊन दाखल झाली !! त्यावेळीं नाथांचें अंतःकरण सद्गदित होऊन त्यांनी पद्यरूपानें पंढरीरायाचा स्तव केला.

पद. ( चालत काशीस नृपवर, या चा० )

**" पंढरीरायें समई चालविली ॥ धृ० ॥ क्रोधीनाम संवत्सरीं ।**
**रत्नाकर सिंधूतीरीं । आश्विनमासीं शुक्रवारीं । उपांगललितेपुढें १**
**आजग्रामा माझारीं । अग्निशिखियाचे घरीं ॥**
**कथेमाजीं चौथे प्रहरीं । कौतुक डोळां दाविलें ॥ २ ॥**
**नवल पाहती सर्व लोक । डोळयां पडलें अवघ्यां ठक ॥**
**भविष्य करिती अनेक । ह्मणती कौतुक देवाचें ॥ ३ ॥**
**टवळें फिरे वरचेवर । गमन करी स्थिर स्थिर ॥**
**पाहोनियां नारीनर । जयजयकार हो ॥ ४ ॥**
**आकळे नकळे हें कोणा । करितो पंढरीचा राणा ॥**
**गोपाळबोध लागे चरणा । विठ्ठल ह्मणा स्वानंदें ॥ ५ ॥**

हा चमत्कार पाहतांच तेथें जे वृद्ध व भाविकलोक होते त्यांचीं अंतःकरणें प्रेमानें उचंबळून जाऊन नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहूं लागल्या आणि नाथांबरोबर त्यांनींही भगवन्नामाचा मोठा गजर चालविला. यावेळीं बाकी कुचाळमंडळींची स्थिति कशी काय झाली असेल याची कल्पनाच होणें अशक्य आहे. त्यांस आपल्या कुटिलपणाचा इतका पश्चात्ताप झाला कीं, ते नाथांच्या पायीं लोळण घेऊन त्यांची क्षमा मागूं लागले; परंतु त्यांना नाथ म्हणाले, यांत माझा कांहींच संबंध नाहीं; करताकरविता श्रीपांडुरंग समर्थ आहे, याकरितां तुह्मी त्याची क्षमा मागा. मी पामर तुम्हांस कशाची क्षमा करूं ' असें सांगून व देवीचा प्रसाद घेऊन नाथ आपल्या गांवीं निघून गेले.

पुढें साधूच्या अपमानामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कोणत्यातरी कारणानें म्हणा त्या सोनाराच्या घराण्याचा निर्वंश झाला इतकेंच नाहीं तर त्या गांवीं तेव्हांपासून हा काल-पर्यंत एक देखील सोनारजातीचें घराणें सुखानें नांदूं शकत नाहीं; यामुळें तिकडील लोकांचा असा समज आहे कीं, सत्पुरुषास छळल्यामुळें ईश्वरीकोप होऊन हा प्रकार घडला असावा. सारांश, कोणत्याहीरीतीनें साधूंचा छल होऊं नये म्हणून ईश्वर सदा त्यांचा पाठिराखा आहे असें म्हटलें पाहिजे

भूतदयेविषयीं या गोपाळनाथांची इतकी प्रसिद्धी आहे कीं, यांचें बोलणें व मनांतील हेतु पशुपक्षी सुद्धां जाणत असत. हातांत दाणे घेऊन पक्ष्यांस बोलाविलें म्हणजे ते येऊन त्यांच्या हातावर बसत आणि निःशंकपणें दाणे खात !! तसेंच जनावरांस हांक मारिली कीं, तींही येऊन पुढें उभीं राहत असत.

गोपाळनाथ हे कोणत्या सालीं समाधिस्थ झाले याविषयीही नक्की माहिती नाहीं. समाधिस्थ झाले तेव्हां त्यांचें वय ८० वर्षांचे होतें म्हणतात. त्यांची समाधी मळगांवीं आहे. तेथें दरवर्षी उत्साह चालतो, आणि ज्याप्रमाणें आळंदी, देहू, गाणगापूर वगैरे ठिकाणच्या पालख्या दरवर्षी पंढरपुरास जातात, त्याचप्रमाणें कोकणांतून मळगांवांहून गोपाळनाथांची पंढरीरायाची पालखी जात असते. पालखीबरोबर दरवर्षी शेंकडो लोक जातात. गोपाळनाथांस चार मुलगे होते. त्यांचा वंश बराच वाढला व त्यामुळे हल्लीं मळगांवांत त्यांची पांच सहा घरें झालीं आहेत. हे सर्व लोक पंढरीची वारी करितात, आणि आपलें उपनांव बोधलेबुवा गुरुपरंपरेप्रमाणें गोसांवी असे चालवितात. हल्लीं यांच्या घराण्यांत काशीपर्यंत नांव मिळविलेलीं एक दोन विद्वान् माणसें आहेत व ते आपल्या सांप्रदायिक पद्धतीप्रमाणें देवाचें भजन, पूजन, कीर्तन वगैरे करितात व त्यासंबंधानें त्यांना वाडी, पेडणें वगैरे प्रांतांतून वर्षासन नेमणुकाही आहेत. त्यांच्यांतील एखादा १५ वर्षांचा मुलगा जरी कीर्तन करूं लागला तरी रंगदेवता अशी उभी राहते कीं, श्रोतेमंडळी कितीही विद्वान् असली तरी जागच्याजागीं माना डोलवूं लागतात ! असो.

येथपर्यंत गोपाळनाथांच्या चरित्राचें विवेचन झालें. आतां त्यांनीं कवी या नात्यानें मराठीभाषेची जी सेवा केली आहे तिचें थोडेसें दिग्दर्शन करणें जरूर आहे.

गोपाळनाथांनीं लिहिलेलीं अशीं स्कंदपुराणांतर्गत पांडुरंगमहात्म्य, अध्याय ५ ओवीसंख्या सुमारें ६००, प्रकाशबोध या नांवाचा एक वेदांतपर ग्रंथ ओवीसंख्या २०२; बाळक्रीडा ओवीसंख्या २५० व इतर पदें, अभंग, भूपाळ्या वगैरे फुटकळ

कविता बरीच आहे. नाथांची कविता पूर्ण प्रासादिक असून तींत कठीण शब्द फारसे नाहींत. ज्याप्रमाणें एकनाथांनीं आपल्या कवितेंत आपला व आपल्या गुरूचा 'एकाजनार्दन' या नांवानें उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें गोपाळनाथांनीं "गोपाळ-बोध" किंवा "बोधगोपाळ" या नांवानें आपला व आपल्या गुरूचा उल्लेख केला आहे. 'बोध' हें पद बोधलेबावांचें निदर्शक होय हें वाचकांच्या ध्यानांत येईलच. आतां नमुन्यासाठीं त्यांच्या कवितांतील कांहीं वेंचे येथें दिले आहेत.

आईबापांची सेवा सोडून तीर्थयात्रेस जाणाऱ्या पुंडलिकासंबंधानें नाथ आपल्या पांडुरंगमहात्म्यांत लिहितात—

"थुंकुनी सांडी अमृत । मृगजलापाठीं धांवत ॥
नवनिधी असतां घरांत । भिक्षा इच्छित अभागी ॥ ५४ ॥
माता पिता गंगा काशी । ज्येष्ठ बंधु तीर्थराशी ॥
गुरुस्वामी प्रयागासी । पूर्वजांसी उद्धरणें ॥ ५५ ॥
सत्य बोलावें, शुद्ध स्नान । आतित अभ्यागत देवतार्चन ॥
पूजितां गोब्राह्मण । तीर्थें आण घरिंच्या घरीं ॥ ५६ ॥
सर्वाभूतीं समदया । अन्नदान घडे जया ॥
घरीं तीर्थें त्याचीया । विसाविया येतील ॥ ५७ ॥
भावार्थे धरुनी अंतरीं । रामनाम जपे वैखरी ॥
मातेसमान परस्त्री । तो एक संसारीं तीर्थराज ॥ ५८ ॥"

पांडुरंगमहात्म्य, अ० ३.

खऱ्या तीर्थयात्रेची किती उदात्त व्याख्या ही ! तसेच सत्पुरुषासंबंधानें नाथांचे उद्गार किती योग्यतेचे आहेत पहाः—

"साधुआश्रम तो पुण्यपावन । साधुआश्रम तो वैकुंठभुवन ॥
साधुआश्रमीं होय समाधान । जोडे निधान परत्रीचें ॥ ६१ ॥
अनंतजन्मीचें जोडे पुण्य । तरी होय साधूचें दर्शन ॥
साधुदर्शनें होय उद्धरण । पूर्वजांसी जाण स्वर्गवास ॥ ६२ ॥
विनवितसे गोपाळबोधु । धन्य तो सद्गुरुराज साधु ॥
पूर्ण करी मनासि बोधु । तोडी भवबंधु जन्मांतरींचा ॥ ६३ ॥

पां० म० अ० ३.

स्त्रियांना पतीवांचून अन्य दैवत नाहीं. याविषयीं नाथ सांगतातः—

"स्त्रियांचा पतिव्रताधर्म । भ्रतार तोची परब्रह्म ॥
देवतीर्थ दुजें कर्म । न घेती नाम वैखरी ॥ ९ ॥
भ्रताराविणें तयांसी । दुजा देव तीर्थ नाहीं परियेसीं ॥
ते पतिव्रता उद्धरी जगासी । तिचे भेटीसी तीर्थें येती ॥१०॥"

पां० मा० अ० ४.

जोंपर्यंत आपलें मन स्वाधीन झालें नाहीं तोंपर्यंत जपतपादि सर्व कर्में केवळ निरर्थक होत. यासंबंधानें नाथांनीं स्पष्ट म्हटलें आहे कीं,—

"नाहीं स्वरूपाची ओळखण । आणि डोळे झांकुनी करिती ध्यान ॥
तें ध्यानचि झालें नागवण । रोकडी हानी आयुष्यासी ॥ २९ ॥
हाता आलें नाहीं निजमन । वरपांग करिती ध्यान ॥
तें ध्यानचि झालें विघ्न । होय नागवण स्वहितासी ॥ ३० ॥"

नाथांनीं प्रथित केलेलें खालील भगवद्भाषण फारच मनन करण्यासारखें आहेः—

"एक चंद्र पुरे सृष्टी । काय कीजे उडुगणें कोटी ॥
एक सुपुत्र उद्धरी सृष्टी । इतर गोष्टी काय काज ॥ ३७ ॥
एक पुरे पतिव्रता । काय कीजे इतर लक्ष वनिता ॥
एक साधु जगाच्या हिता । इतर वार्ता काय काज ॥ ३८ ॥
काय कीजे चोराची नगरी । आत्मघातकी दुराचारी ॥
भक्तांविणें संसारीं । कीर्ति चराचरीं माझी नव्हे ॥ ३९ ॥
भक्त माझें निधान । भक्त माझें पावन ॥
भक्त माझे जीवप्राण । करी निंबलोण मी त्यांसी ॥ ४० ॥
भक्त माझ्या जीवाचे जीव । भक्त माझ्या देवाचे देव ॥
भक्तांविणें वस्तीसि ठाव । सर्वदा पहाहो मज नाहीं ॥४१॥"

पंढरीच्या महात्म्यासंबंधानें नाथ म्हणतातः—

"हे मुक्तिची नगरी । अनुपम महिवरी ॥
निर्माण केली साजिरी । तारक पंढरी तिहींलोकीं ॥ ५४ ॥
हें संतांचें जीवन । पतितांचें पावन ।
मोक्षाचें हें निधान । हें जगज्जीवन पंढरपुर ॥ ५५ ॥

जन्मासि आलिया मेदिनी । एकवेळ पहावी नयनीं ॥
सायुज्याची निशाणी । लाविली होय त्याणें ॥ ५६ ॥ ''

पां० म० अ० ५.

ज्याप्रमाणें वामनपंडितांनी वगैरे आपण लिहिलेली कविता ही आपली स्वतःची नसून परमेश्वराने ती आपल्याकडून लिहविली, असें म्हटलें आहे. त्याप्रमाणेंच नाथही म्हणतातः—

" गोपाळ बोध विनवी संता । मी अज्ञान नव्हे कर्ता ॥
पुरातन हे आदिकथा । लिहिता सांगता पांडुरंग ॥ ६० ॥ "

पां० म० अ० ५.

ज्यावेळीं बोधलेबावांनीं नाथांस उपदेश दिला त्यावेळीं आपली कशी स्थिति झाली याबद्दल एका पदांत वर्णन केलें आहे:—

पद.

" नवल अद्भुत मोठें वाटे विस्मय ।
निजात्मकळा जोतिप्रभा सांगतां नये ॥ ध्रु० ॥
देहबुद्धि विराली ज्ञानेंद्रियें दचकलीं ।
उदयो ना अस्तु पूर्ण कळा फांकली ॥ १ ॥
नव्हे चांदचांदणे उष्णातीत शीतळ ।
तेजाचें निजतेज कोटीरवी कल्लोळ ॥ २ ॥
सद्गुरुकृपेनें हें सुख प्राप्त जाणा ।
गोपाळबोध शरण सद्गुरुचरणा ॥ ३ ॥

गोपाळनाथ हे पूर्ण अद्वैतमतवादी होते. त्यांनीं आपल्या प्रकाशबोध ग्रंथांत ब्रम्हा, विष्णू, शंकर यांच्याही पलीकडे परमात्मा आहे, असें स्पष्ट म्हटलें आहे. मुमुक्षूंनीं नाथांच्या ग्रंथांचें अवश्य मनन करावें.

सांप्रतच्या सुधारलेल्या काळांत कित्येक लोकांनां प्रस्तुत चरित्रांत वर्णिलेल्या गोष्टी सर्वथैव खोट्या वाटण्याचा संभव आहे; परंतु चांगदेव वाघावर बसून आला असतां ज्ञानेश्वरमहाराज भिंतीवर बसून भिंत चालवून त्याला सामोरे गेले; त्याच-प्रमाणें समर्थ रामदास प्रभृति अनेक सत्पुरुषांनीं ज्या अलौकिक लीला दाखविल्या, त्या जर साऱ्या गोष्टी खऱ्या आहेत व त्या साऱ्या मन्वंतरांतीलही नाहींत. दोन

अडीचशें वर्षांपूर्वींच्या साऱ्या कथा आहेत. इतकेंच नाहीं तर त्यास बळकट इतिहासाचा पुरावा आहे. त्याचप्रमाणे नाथांचाही प्रस्तुत चरित्रभाग फार प्राचीन नसून अगदीं अलीकडचा साठ सत्तर वर्षांतला आहे; अर्थात् सत्प्रचीत अनुभव घेण्यास कांहींच हरकत नाहीं. गोपाळनाथांचा लौकिक वाडीप्रांतांत फार आहे. तेथें त्यांच्या अद्भुत लीलांची चांगली साक्ष पटते.

---

# लक्ष्मण रामराव ऊर्फ समर्थ अप्पया.

" परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥ "

गीता.

सात्विक वृत्तीनें आपलें व इतराचे खरें कल्याण करणाऱ्या सत्पुरुषाचें संरक्षण करण्या साठीं, व दुसऱ्यांचें तसेंच आपलें अहित करण्यास तयार असणाऱ्या दुष्ट लोकांचा निःपात करण्यासाठीं, साराश प्राणिमात्रास नीट व्यवस्थेत ठेवून व्यवहार आणि परमार्थसिद्धि करणाऱ्या धर्माचा जीर्णोद्धार करण्यासाठीं मी प्रत्येक युगामध्ये अवतार घेतों. असें परमेश्वराचें आश्वासन आहे. याचा प्रत्यय आपणास बरेचवेळां आला आहे. मच्छ, कच्छ, वराहादि अवतार धारणकरून परमेश्वरानें दुष्टाचा संहार केला व आपल्या सद्भक्तांचें संरक्षण केलें देवादिकांस अजिंक्य झालेला असा जो हिरण्यकशिपु त्याला परमेश्वरानें नरसिंहाचें रूप धारण करून आपल्या नखांनीं विदारिलें. त्याचप्रमाणें राम, कृष्ण इत्यादि अवतार घेऊन उन्मत्त झालेल्या रावण, कुंभकर्ण, कंस, चाणूर इत्यादि राक्षसांचा संहार केला. अशारीतीनें आपल्या भक्तांवरील संकटें निवारण केलीं. परमेश्वराला ह्या अखिल सृष्टीची अतोनात काळजी आहे. किडा मुंगीपासून तों गजव्याघ्रापर्यंत सर्वांचें लालन पालन तो करितो. कलियुगांतसुद्धां त्यानें आपलें वचन पाळिलें आहे प्रत्येक मनुष्यास सुमार्गास लावून स्वधर्म व स्वभाषा इत्यादिकांचें संरक्षण करण्यास तुकाराम, रामदास, मुकुंदराज, नामदेव, ज्ञानदेव, कबीर इत्यादि महान् महान् साधूंच्या रूपानें प्रकट होऊन महाराष्ट्रांत किंबहुना साऱ्या जगांत आपल्या सामर्थ्यानें अज्ञजनांचा उद्धार केला. त्याचप्रमाणें प्रस्तुत

चरित्रनायकही ह्या साधुमालिकेंतील मुकुटमणी होत. त्यांचे जीवनचरित्र थोडक्यांत येथें सादर करितों

अप्पया समर्थ हे अमुकच सालीं जन्मले असें सांगण्यास निश्चयात्मक माहिती उपलब्ध नाहीं. परंतु अप्पयाचे गुरु विमलानंद मठ बेलूर. यांनी ' श्रीकृष्णार्जुनयुद्ध ' नांवाचा एक वेदांतपर ग्रंथ कानडी भाषेंत रचिलेला असून त्याचे शेवटीं ' शालिवाहन शक १६०६ क्रोधन संवत्सर श्रावण शु॥ २ ' असा समाप्तीचा श्लोक आहे. हा ग्रंथ विमलानंदानी आपले गुरु चिदानंदस्वामी यांचे चरणी अर्पण केला आहे. दुसरा आणखी एक असा पुरावा आहे कीं चिदानंदस्वामींचे दोन शिष्य. एक विमलानंद व दुसरे ' कायकिणी शिवय्य '[1] हे दुसरे शिष्य मुक्त झाल्यावेळीं विमलानंदानी आपल्या गुरुबंधूच्या गुणवर्णनार्थ ' कैवल्यपंचक ' नांवाचे पांच श्लोक तयार केले आहेत. त्या श्लोकाच्या प्रथम चरणात ' शालिवाहन शक १६१३ अंगिरस संवत्सर अधिक आषाढ वद्य ५ मी शनिवारी प्रातःकालीं सिंहराशी उदय पावत असतां कैवल्य योगीश्वर कायकिणी शिवय्य यांनी देह ठेविला ' असे म्हटले आहे. यावरून इ. स. १६९१ मध्यें व त्याच्या पूर्वी कांहीं दिवस विमलानंद होते हें अगदीं उघड आहे. आतां हे विमलानंद अप्पयाचे गुरु होते हे अप्पयानीं स्वतः केलेल्या पदाचे शेवटी जो ह्या नांवाचा उल्लेख आहे त्यावरून स्पष्ट दिसते.

नगरसंस्थानचा राजा ' बसवनृपति ' याला उद्देशून अप्पयासमर्थानीं कांहीं पदें केलेलीं आहेत पूर्वी नगर हे राजधानीचें शहर होतें. याला ' विद्यानगर ' असेही म्हणत. त्यावेळीं तेथें बसप्प सोमशेखरादि राजांनीं राज्य केले असून इ. स. १६८९ पासून १७१५ पर्यंत ' थोरला बसप्प नाईक ' नांवाचा राजा राज्य करीत होता. हल्ली नगर हे म्हैसूर संस्थानात मोडतें, अशी ऐतिहासिक माहिती सांपडते. तेव्हां याच बसवनृपतीस उद्देशून अप्पयानीं पदें केलीं असलीं पाहिजेत. या एकंदर पुराव्यावरून इसवीसनाच्या १७ व्या शतकाच्या अखेरीस म्हणजे अजमासें २०० वर्षांपूर्वी अप्पयासमर्थांचा जीवनकाल ठरविण्यास कांहीं हरकत नाहीं.

उत्तर कर्नाटकप्रांतात भटकळ म्हणून जो एक पेठा आहे तोच अप्पयांचा मूळ

---

१ हल्ली याची समाधी भटकळापासून सुमार तीन कोसावर उत्तरेस मुर्डेश्वर क्षेत्राच्या पूर्वभागीं ' कायकिणी ' येथे असून तेथे नवरात्रांत मोठा उत्सव होतो. यांच्या मठाला शिवानंदमठ किंवा ' कायकिणीमठ असें म्हणतात.

गांव होय. त्यांचे वडील वंशपरंपरा त्या गांवचे वतनदार कुलकर्णी होते. त्यांची मातृभाषा कोंकणी व देशभाषा कानडी होती. ल्हानपणापासून अप्पय्यांना विद्या-विषयीं बरीच अभिरुची होती यामुळें ते थोड्याच अवधींत कानडी लिहावाचावयाला शिकले. उद्योगतत्परता, प्रसंगावधान वगैरे सद्गुणांचा त्यांचे ठिकाणीं पूर्ण विकास झालेला होता. रामायण, भारत, भागवत इत्यादि पुराणग्रंथांची त्यांना फार आवड होती. मृदंग, तबला, सारंगी, विणा, रुद्रविणा, इत्यादि वाद्यें वाजविण्यांतही ते कुशल होते. बालपणापासूनच त्यांना स्वतः गाण्याचा नाद होता. धनुर्विद्येतही ते चांगले प्रवीण होते. याविषयीं अशी गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, कोणी एक मनुष्य प्रवाहीपदार्थानें भरलेली घागर डोकीवर घेऊन चालला असतां त्याला नकळत अप्पय्यानीं बाण मारून घागरीला छिद्र पाडिलें व तत्क्षणी पुनः दुसरा बाण मारून मेणाची गोळी बसवून तें छिद्र बंद केले. केवढी ही कुशलता! यावरून अप्पया समर्थांच्या धनुर्विद्येची उत्तम साक्ष पटते.

याप्रमाणे विद्याव्यासंगांत बालपणाचीं कांहीं वर्षें निघून गेल्यावर वयाच्या १५।१६ व्या वर्षी त्यांच्या स्थितीत बराच पालट झाला. इतर प्रापंचिक व्यवसाय सोडून दरदिवस स्नान संध्या, जप तप, अनुष्ठान पूजा, पंचमहायज्ञ इत्यादि नित्यनैमित्तिक धर्मकर्में करण्यांत, व परमार्थ विषयक ग्रंथ वाचण्यांत ते आपला सारा काळ घालवूं लागले. इष्टमित्रांबरोबर बोलणें फिरणें सुद्धा त्यांना आवडेनासें झालें. साधु, संत, बैरागी कोणी आल्यास त्यांना दानधर्म करून त्यांच्याबरोबर परमार्थाची चर्चा करावयाची. अशारीतीनें कांहीं दिवस गेल्यावर त्यांची बुद्धि अगदीं चंचल झाली. अनेक तऱ्हेचे प्रश्न त्यांच्या मनामध्यें घोळूं लागले. हे जग कसें उत्पन्न झालें? संसारबंधनांतून मी कसा मुक्त होईन? मला हें बंधन कां प्राप्त झाले, परमात्मा सत्+चित्+आनंदात्मक आहे मग माझ्या बुद्धीला त्याचें स्वरूप कां गोचर होऊं नये? याविषयी माझें अज्ञान कसें नष्ट होईल? देव जर एकच आहे तर हरी, हर, गणपती, दुर्गा, हे कोण? इत्यादि हजारों प्रश्नांचा विचार आपल्या मनाशींच करीत सदोदित ते आपला काळ एकांतवासांत कंठूं लागले. अशी ही त्यांची विरक्तस्थिति वडिलांच्या लक्षांत येतांच त्यांना मोठी काळजी पडली. मुलगा चांगला जाणता झाला असून प्रपंचांत मुळींच लक्ष घालीत नाहीं. आणि सदोदित बावांबैराग्यांत मिसळून असतो. कदाचित त्यांच्या बरोबर असाच कोठे तरी भटकतही जाईल याचा कांहीं नेम नाहीं. तेव्हां एकदां त्याचें लग्न करून दिलें म्हणजे आपोआप

प्रपंचाकडे मन लागून स्वस्थ चित्त राहिल या आशेनें भागीरथी नांवाच्या एका कुलीन घराण्यांतील मुलीबरोबर अप्पयाचें लग्न केलें.

परंतु अप्पयाच्या स्थितींत त्यापासून कांहींच फरक पडला नाहीं. उलट आपणास ब्रम्हज्ञान कोणापासून प्राप्त होईल हाच रात्रंदिवस त्यांना ध्यास लागून राहिला. गाईपासून चुकलेला वत्स जसा आईच्या शोधार्थ इकडे तिकडे धांवत सुटतो. त्याप्रमाणेंच अप्पयासमर्थांची स्थिति झाली. संसारी माणसांबरोबर बोलण्याचा देखील त्यांना कंटाळा वाटूं लागला. अशी ही त्यांची स्थिति पाहून कित्येक लोक याला भुतानें पछाडलें असें ह्मणूं लागले. कित्येकांनी ग्रहाचारामुळे असा प्रकार घडला म्हणून तर्क केला. घरांतील मंडळींकडून तर प्रपंचाकडे त्यांचें मुळींच लक्ष नसल्यामुळे मर्यादा किंवा आदर जेवढ्यास तेवढास होऊं लागला. बुद्धिशून्य असलेले कित्येक तरुण वेडेपीर त्यांना मूर्खांतच गणूं लागले असे होतां होतां अखेरीस सर्वांनी त्यांची विचारपुसच सोडली. खरोखर अप्पयांची त्यावेळची स्थिति " या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः " या भगवद्वचनाप्रमाणें झाली होती.

भटकळ येथे मारुतीचीं देवस्थानें तीन चार असून तेथील ग्रामदेवताही मारुतीच आहे. चेनपट्टण हनुमंत नांवाचें एक देवस्थान गांवच्या मध्यभागीं असून प्राचीनकालापासून हे जागृतस्थान ह्मणून प्रसिद्ध आहे. देवस्थानच्या चारीबाजूला मोठमोठ्या अग्रशाळा बांधलेल्या असून यात्रस्थ बावाबैरागी लोक तेथें उतरतात. याच देवालयांत अप्पयासमर्थ दरदिवस प्रातःकाळीं फुलें तुळशी घेऊन देवदर्शनाकरितां नेमानें जात असत, आणि देवदर्शन घेतल्यावर प्रदक्षिणा करून कोणी पांथस्थ बावाबैरागी दिसल्यास त्याचेबरोबर संभाषण करीत. एकेदिवशीं रोजच्याप्रमाणें प्रदक्षिणा घालून येतेवेळीं त्यांनी अग्रशाळेंत ध्यानस्थ बसलेल्या एका महानुभाव धिप्पाड मनुष्यास पाहिले. हा मनुष्य यतिवेषधारी असून अजानुबाहू व सुकुमार असा होता. त्याच्या मुखावर ब्रम्हचर्यतेज पूर्णपणें झळकत होतें. हेंच जन्मजन्मांतराच्या पुण्यबलानें अप्पयासमर्थांना प्रथम गुरुदर्शन घडलें. त्या यतीला पाहिल्याबरोबर अप्पयासमर्थांचे देहांत अनेकतऱ्हेचे विकार आपोआप उत्पन्न झाले. सहस्ररश्मी सूर्यनारायण उदयाचलावर येतांच कमलपुष्पें जशीं फुलून संतोष प्रदर्शित करितात त्याचप्रमाणें अप्पयाचें हृत्कमल विकसित होऊन आनंदभरित झालें. चंद्रोदयाबरोबर समुद्राला जशी भरती येते त्याप्रमाणें त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले. आईपासून चुकलेलें

वाघिणीनें पोर आई दृष्टी पडतांच आनंदानें जसें सर्वांग फुलवितें त्याप्रमाणें अप्पयाच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले व किंचित्काल देहभान देखील विसरले. पुढें कांहींवेळानें त्या तपोनिधीजवळ जाऊन नमस्कार केला व त्यांच्या सन्मुख हात जोडून स्वस्थ बसले. इतक्यांत ते स्वामी आपण होऊनच अप्पयाना म्हणाले, ' मी फार दिवसांचा उपवासी आहे मला थोडें अन्न घाल काय ? ' हे त्याच्या अमृतमय मुखातून निघालेले शब्द ऐकताच अप्पयानी त्यांना आपल्या घरीं बोलावून आणिले; परंतु उपयोग काय ? मनुष्य योजितो एक आणि दैव भलतेंच घडवितें; तसें अप्पयांनी त्या स्वामीला ज्या दिवशीं घरीं आणिले तो दिवस गणेशचतुर्थीच्या सणाचा होता. अर्थात् घरातील सर्व बायका पुरुषमंडळी आपआपल्या कामाच्या गडबडींत होती अशावेळी अगोदरच घरात कोणी न विचारणाऱ्या अप्पयासमर्थाच्या गोष्टीवरून घरातील मंडळी जेवण्याच्या पूर्वी तशातही गणपतीला नैवेद्य दाखविण्याच्या अगोदर त्या गोसावड्याला कोण जेवू घालणार ?

तथापि मागच्या दरवाज्याने त्या स्वामीला आत घेऊन एका ओसरीवर बसविले आणि आपल्या बायकोला काही पदार्थ वाढता येण्याजोगे असल्यास आणून वाढ असें फार नम्रतेने सांगितले अप्पयासमर्थाची बायको भागीरथीबाई ही जरी सासवेच्या मागे घरची वडील होती तरी तिच्या नवऱ्याच्या स्थितीवरून त्या बिचारीला घरांत कोणीही विचारीत नसे; तरी ती मोठी साध्वी होती. पती म्हणजे केवळ प्राण अशा भावनेने ती घरात वागत असल्यामुळे त्या पतिव्रतेने कोणाचें दूषण आल्यास येवो असे म्हणून घरात गजाननाच्या नैवेद्यासाठी तयार केलेले लाडू, मोदक वगैरे त्या स्वामीच्या पानावर आणून घातले सुमारे १०।२० लोकाना पुरेल इतकें अन्न आणून वाढले तरी त्या स्वामीमहाराजाची तृप्ति होईना घातलेले सर्व अन्न निमिषमात्रात फस्त करून पुन. अन्नाची इच्छा करीत होते. ही स्थिति त्या साध्वी स्त्रीच्या लक्षात येताच विस्मयाने हा कोणी बक, भीम किंवा भूतपिशाच्च तरी नसेल ना ! अशी ती भ्रांतचित्त झाली इतक्यात ही सर्व हकीगत घरच्या मंडळींना समजली. मग काय विचारावयाचें आहे ! नवऱ्याची गोष्ट ऐकून देवाला नैवेद्य होण्यापूर्वी सर्व पदार्थ त्या भिकाऱ्याला घालून टाकलेस ? असें म्हणून घरातील सर्व मंडळी त्या गरीब बिचाऱ्या भागीरथीबाईला मनमानेल त्याप्रमाणे बोलूं लागली. लांडग्याच्या हातात सापडलेल्या गरीब बकऱ्याप्रमाणे त्या अबलेची स्थिति झाली. अप्पया तर बायकोची ही अवस्था पाहून जागच्याजागींच स्तब्ध

झाले. अशारीतीनें त्या साध्वीची निर्भर्त्सना करून मंडळी स्वयंपाकघरांत गेली आणि पहातात तों सर्व जिन्नस पात्रामध्यें जशाच्या तसेच आहेत. कांहीं कमी झाले नाहींत ! हा प्रकार पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें असेल यांत मोठेंसें नवल नाहीं. अप्पयासमर्थांना तर फारच आनंद झाला व ही आनंदाची आश्चर्यकारक बातमी स्वामींना कळवावी म्हणून बाहेर येऊन पाहिलें तों त्याठिकाणीं स्वामी नाहीं कोणी नाहीं ! पुष्कळ शोध केला तरी स्वामीचा पत्ता नाहीं !

अशावेळीं अप्पयासमर्थांची स्थिति कशी झाली असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. गगनचुंबित वृक्ष जसा सोसाट्याच्या वाऱ्यानें समूळ उलथून पडतो तद्वत डोळ्याला अंधारी येऊन धाडकन ते भूमीवर पडले आणि 'देवा ! हा महात्मा जेवून तृप्त न होता पान सोडून निघून गेला, त्याला पोटभर अन्न देऊन तृप्त करणें देखील माझ्या हातानें झालें नाहीं; तेव्हां हा देह जळून भस्म झालेला तरी काय वाईट ! वास्तवीक ते स्वामी अन्नार्थी होऊन माझ्या घरीं आलेले नव्हते कारण त्यांनीं जेवलेलें अन्न सर्व जशाचें तसेंच आहे यावरून ते माझे सत्वपरीक्षणार्थच आले होते असें वाटतें अरेरे ! मी किती पापी मनुष्य ! हातीं लागलेलें माणिक म्या मूर्खानें गमावून घेतलें ना ! आतां काय करावें, तो महात्मा मला कसा भेटेल. त्याची भेट झाल्यावांचून माझें समाधान होणार नाहीं ' असें मनांत आणून त्यांनीं स्वामीच्या शोधार्थ जाण्याचा निश्चय केला आणि दिसेल तें घर, मिळेल तो रस्ता, कोनाकोपरा वगैरे शोधीत निघाले तों वाटेंत मिळालेल्या माणसांस स्वामीची माहिती विचारीत गांवोगांव हिंडत सुमारें दहा घटिका रात्रीस ते भटकळाहून तीन कोशावर असलेल्या मुर्डेश्वर क्षेत्रीं येऊन पोहोंचले. तेथेंही स्वामीचा पुष्कळ शोध केला पण त्यांना पाहिल्याचें कोणीही सांगेना. इतकी निराशा झाली तरी अप्पयांनीं आपला निश्चय यत्किंचितही ढळूं दिला नाहीं तेथून ते पुढें समुद्रकांठ धरून स्वामीच्या शोधार्थ चालते झाले. ऐन मध्यरात्रीचा समय चंद्र अस्त पावत आहे, दशदिशा अंधकारानें व्याप्त झाल्या आहेत, आकाश ढगानें व्यापलें आहे, प्रचंड वादळ होऊन मुसळधारा पाऊस पडत आहे अशा बिकटप्रसंगीं स्वामींचें दर्शन न झाल्यामुळें व्यथितांतःकरणानें भूक तहान, मार्ग चालण्याचे श्रम वगैरे सर्व कांहीं सहन करून देहभान विसरून एखाद्या वेड लागलेल्या मनुष्याप्रमाणें केवळ गुरुदर्शनाकरितां भटकत सुटलेल्या अप्पयाची त्यावेळची स्थिति वर्णन करणें अशक्य आहे. तरी ह्या प्राप्तस्थितीबद्दल यत्किंचितही दुःख न करितां समाधानवृत्तीनें ते गाढ अंधकारांतून

समुद्राच्या कांठाकांठानें चालले होते. इतक्यांत पाय चुकून ते समुद्रांत पडले तरी 'देहं वा पातयेत् अर्थं वा साधयेत्' असा त्यांनी मनाचा निर्धार केला असल्यामुळे समुद्राच्या लाटेबरोबर आकंठ पाण्यांत गेले तरी पुढें जाण्याचे ते थांबले नाहीत! नाकातोंडांत पाणी शिरून श्वासोच्छ्वास बंद होऊन जलसमाधी मिळण्याचा समय प्राप्त झाला. अशावेळी त्यांना त्या संकटांतून एका परमेश्वरावांचून सोडविणारा दुसरा कोणीही त्राता नव्हता इतके जरी अनिवार्य संकट त्यांजवर गुदरले तरी त्यांना स्वामीची भेट झाली काय? मुळींच नाहीं. निश्चलभक्ति, दृढवैराग्य, भवबंधातून मुक्त होण्याची अपेक्षा, इत्यादि गुणाची व योग्यतेची परीक्षा केल्याशिवाय ब्रम्हज्ञानाचे गांठोडे शिष्याच्या स्वाधीन करण्यास गुरुला तरी धैर्य कसें व्हावे! आत्मज्ञान हे ज्ञानी लोकांना देवाने दिलेली ठेव होय ती चांगल्या रीतीनें राखून ठेवणें फार कठीण आहे. आपली सार्थकता करून घेतल्यावर ती योग्य शिष्याच्या स्वाधीन केली पाहिजे. असो.

पुढें थोड्याच वेळानें ढगानीं व्यापिलेले आकाश स्वच्छ होऊन प्रभातकालचा प्रकाश पडला, जिकडे तिकडे स्थिर स्थावर झाले, अशा त्या शांतसमयीं पाण्याच्या लाटेबरोबर वर येतांच अप्पयांनी डोळे उघडून आसपास पाहिले. त्याबरोबर तो उषःकालचा रमणीय देखावा दृष्टीस पडतांच किंचित् त्यांच्या चित्तास आराम वाटलें. इतक्यांत पूर्वी जेवूं घातलेले स्वामी आपणास बोलावीत असल्याचा ध्वनी त्यांच्या कानीं पडला. मग काय विचारावें अप्पयाचा आनंद गगनात मावेनासारखा झाला. लगेच हातपाय हालवीत ते पाण्यातून तीरावर आले तो श्रीस्वामीमहाराजांची स्वारी सन्मुख उभी असलेली त्यांना दिसली. आणि पिता जसा आपल्या मुलाला मांडीवर घेऊन कुरवाळितो त्याप्रमाणे स्वामींनी अप्पयासमर्थाला आपल्या मांडीवर घेऊन शिवपचाक्षरी नामाचा उपदेश दिला व आणखी कांहीं उपदेशाच्या गोष्टी सांगून इकडून जवळच वेलूरग्रामी विमलानंद नावाचे महान्भगवद्भक्त आहेत तेच तुझे सद्गुरु आहेत. त्यांना शरण जाऊन त्यांच्यापासून आत्मज्ञानाची प्राप्ति करून घेऊन सुखी हो. उगाच मूर्खासारखा देहत्याग करूं नको. देहाशिवाय मुक्ति मिळत नाहीं. असा बोध केला. आणि ते स्वामी तेथेच अतर्धान झाले. पुढे अप्पयासमर्थांना कांहींवेळपर्यंत हें काय मी स्वप्न पाहिलें की खरोखरच त्या महानुभाव स्वामीचें दर्शन घडलें! याचा कांहीच उमज पडला नाही. खरें म्हणावें तर मी याठिकाणीं एकटाच आहे, बरें स्वप्न म्हणावे तर त्या स्वामींनी दिलेला मंत्रोपदेश

जिव्हेवर आहे. अशारीतीनें बराच वेळ विचार करून संशयाची निवृत्ति झाल्यावर इतके कष्ट जरी झाले तरी अखेरीस सार्थक झालें याजबद्दल त्यांना फार समाधान वाटलें, आणि त्या स्वामीमहाराजांनीं दिलेल्या मंत्रजपानें अंतर्यामि ज्ञानाग्नि प्रज्वलित होऊन आत्मज्ञानाची स्फूर्तिही त्यांच्या अनुभवास येऊं लागली. नंतर थोडावेळ त्याठिकाणीं विश्रांति घेऊन ते बेलूरास जाण्यास निघाले.

आतां विमलानंद हे कोण? कोठें होते, त्यांची योग्यता काय? वगैरे त्यांच्यासंबंधानें थोडीशी माहिती येथें देणें जरूर आहे. अप्पयांचेवेळीं बेलूर हे चांगले नावाजलेलें शहर होतें; परंतु हल्लीं ते लहान खेडें बनलेले आहे. तेथे मार्कंडेय देवस्थान असून प्राचीनकाळीं मार्कंडेय महर्षि आपल्या आयुर्वृद्धिकरितां ज्या मृत्युंजय परमेश्वरलिंगाला शरण गेले तेंच हे स्थान म्हणून प्रसिद्ध आहे. त्या गांवची कुलकर्णपणाची वृत्ति कोप्पी नारायणअप्पा नांवाच्या एका स्वकीय गृहस्थाकडे होती. त्यावेळची कुलकर्णिकी म्हणजे आतांच्या मामलतीच्या हुद्यापेक्षांही जास्त महत्वाची होती. यामुळें नारायणअप्पा हे अधिकारानें व संपत्तीनें चांगले मोठे गृहस्थ गणले जात होते. एकदां दुर्दैवानें नारायणअप्पाच्या एकुलत्या मुलास सर्पदंश झाला, त्याबरोबर पुष्कळ मंत्र, तंत्र, औषधें वगैरे उपचार केले; पण सर्व प्रयत्न व्यर्थ होऊन मुलगा अगदीं आसन्नमरण झाला. ही मुलाची अवस्था पाहून नारायणअप्पानां अनावर दुःख झालें ते त्या मुलाला घेऊन त्याच बेलूर गांवात त्यांच्या वाडवडिलांनीं बांधिलेल्या श्रीलक्ष्मीनारायणाच्या देवालयात गेले आणि या संकटांतून सोडविण्यासाठीं देवाची अनेकप्रकारें करुणा भाकीत मोठमोठ्यानें आक्रोश करीत जमिनीवर लोळूं लागले. इतक्यांत कोणीएकानें असें सांगितलें कीं, मार्कंडेय देवस्थानांत एक महंत आला आहे, तेव्हां त्याला तरी विचारून पहावें असें सुचविलें त्याप्रमाणें नारायणअप्पा त्या मृतप्राय मुलाला घेऊन सर्व मंडळीसह मार्कंडेय देवस्थानांत आले. त्याठिकाणीं विमलानंदाचे गुरु श्रीमत्परमहंस चिदानंदस्वामीचा मुक्काम होता. त्या स्वामीच्या पूर्वाश्रमातील जन्मभूमि वगैरेसंबंधानें माहिती उपलब्ध नाहीं; परंतु ते द्रवीड ब्राम्हण असून त्यांची भाषा कानडी होती. विष्णु व शिव या दोन्ही देवतांचे ते उपासक होते. असो.

नारायणअप्पानी शवाप्रमाणें पडलेल्या त्या आपल्या मुलाला उचलून घेऊन स्वामीपाशीं आणिलें, आणि सर्पदंश झाल्याचें वर्तमान कळवून त्याला प्राणदान देण्याविषयी स्वामींची प्रार्थना केली; तेव्हां त्यांच्या अंतःकरणांत दया येऊन तात्काळ

त्यांनीं एक सर्प धरून आणविला व एक दर्भाची काडी मंत्रून त्या सर्पाच्या तोंडांत देऊन त्याजकडून दंश केलेल्या सर्पास बोलावून आणिले, आणि त्याच्याकडून त्या मुलाच्या अंगांतील सर्व विष प्राशन करविलें. त्याबरोबर तो मुलगा चांगला सावध झाला आणि सर्प मात्र त्याचठिकाणीं गतप्राण होऊन पडला. मग त्याची उत्तर-क्रिया स्वामींनी ब्राम्हणांकडून करविली. हा स्वामींनीं केलेला चमत्कार पाहून सर्व मंडळीस फार आश्चर्य वाटलें! यायोगानें स्वामींची त्या प्रांतांत सर्वत्र कीर्ति पसरली. इतकेंच नाहीं तर खुद्द नारायणअप्पांनी आपल्या गांवीच कायम वास करून राहण्या-विषयीं आग्रहपूर्वक स्वामींची प्रार्थना केली, आणि त्याप्रमाणें त्यांची कबुली मिळ-तांच त्यांना राहण्याकरितां मार्कंडेय देवळानजीकच एक मठ बांधून दिला. नंतर त्या मठांत याचा वास झाल्यावर काहींजण त्याचें शिष्यत्व पत्करून त्यांच्या सेवेंत राहिले. त्याच शिष्यांपैकीं कायकिणी शिवय्य, विमलानंद वगैरे होते यांनीं आपल्या मठानजीक शिवगंगा नांवाचें एक तीर्थकुंड बांधविलेलें असून प्रतिदिवशीं त्यांत भागीरथी येत होती असें सांगतात. अद्यापि देखील त्या तीर्थकुंडांत प्रती बारा वर्षाला एकवेळ भागीरथी येते असें ह्मणतात. श्रीचिदानंद मुक्त झाल्यावर मठाचें आधिपत्य विमलानंदाकडे आलें. त्यांच्या नंतर एक दोन शिष्यपरंपरा चाल-ल्याचें दिसून येतें. हल्लीं त्या मठांत चार समाधि आहेत. त्यावरून एकंदर चारच परंपरा झाल्या असाव्या असें वाटतें. आजमितीसही तेथें समाधिची दररोज पूजा-अर्चा, नंदादीप वगैरे सर्व व्यवस्था चालत आहे. असो.

स्वामींनी सांगितल्याप्रमाणें अप्पय्यासमर्थ त्याच मठामध्यें आले व त्यांनी विमलानंद-स्वामींचें दर्शन घेऊन त्यांना साष्टांग प्रणिपात केला. तेव्हां एखाद्या ओळखीच्या माणसाप्रमाणेंच स्वामींनी ' आलास, ये बैस, तुझें कल्याण असो. ' असा आशीर्वाद दिला. तेव्हांपासून अप्पय्यासमर्थांना आपल्या जन्माचें सार्थक झाल्यासारखें वाटलें, आणि तेथेंच गुरुसेवेस राहण्याचा त्यांनी निर्धार केला. त्याप्रमाणें गुरुसेवेत सुखानें कांहीं दिवस गेल्यावर अप्पय्याची अधिकारयुक्त स्थिति लक्षांत आणून विमलानंद-स्वामींनीं त्यांना आत्मज्ञानाचा उपदेश दिला. मग काय विचारावयाचें! ज्ञानरवीचा उदय होतांच अप्पय्याचा अज्ञानतिमीर समूळ नष्ट झाला. आनंदाब्धीला भरतें आलें. त्यावेळीं उत्पन्न झालेली संतोषवृत्ति अप्पय्यासमर्थांनी एका पदांत फार सुरसरीतीनें वर्णिली आहे.

इकडे भटकळ येथें अप्पय्याचे वडीलांनी, वैराग्याच्या पाठीस लागून मुलगा कोठें

गेला म्हणून काळजीनें त्याच्या शोधार्थ चहूंकडे मनुष्य पाठवून तपास केला; परंतु कोठेंही मुलाचा पत्ता लागला नाहीं. अखेरीस बैलूरमठांत मुलगा असल्याचें वर्तमान समजलें. अगोदरच मुलगा प्रपंचाविषयीं विरक्त झालेला, तशांत बैलूर संन्याशाचा सहवास मिळाला! मग तो काय घराला येतो! कोठेंही सुखानें राहिला म्हणजे झालें. जेव्हां त्याच्या मनास वाटेल तेव्हां येवो असा विचार करून रामराव स्वस्थ राहिले; परंतु अप्पयासमर्थांच्या आईला ही बातमी समजतांच ती स्वतः मुलाला आणण्याकरितां बैलूर मठांत गेली अप्पयासमर्थ हे आईबापांचें वचन मोडणारे नव्हेते, म्हणून लगेंच ते स्वामींच्या आज्ञेने मातुश्रीबरोबर घरीं येण्यास निघाले; परंतु भटकळपासून बैलूरमठ फार लांब नसल्यामुळे मध्यंतरीं कांहीं दिवस ते मठांत येऊन राहत असत. असा क्रम चालला असतां रामरावाच्या वृद्धापकाळामुळें ते सरकारी कामकाज पहाण्यास असमर्थ झाले. यामुळें आपलें कुलकर्णपणाचें काम त्यांनीं मुलाची स्थिति विरक्त असल्यामुळें धाकटे बंधु मंगेशराव यांचे नांवें करून दिलें. यामुळें अनायासें ही एक मागची रुपेरी बेडी चुकल्यामुळें त्यांना संतोष वाटला. यानंतर पुढें कांहीं दिवसांनीं त्यांची बायकोही निवर्तली; यावेळीं तर ते अगदीं निश्चिंत झाले व सदोदित बैलूरमठांत राहून गुरुसेवेंतच कालक्रमणा करूं लागले. त्यांना गुरुचरणसेवेवांचून आप्त, इष्ट, धन, दौलत सर्व कांहीं तुच्छ वाटूं लागलें. असा आपला आशय त्यांनीं एका पदांत दर्शविला आहे. नंतर थोड्याच दिवसांनीं त्यांचे गुरु विमलानंद हे समाधिस्थ झाले. यामुळें अप्पयासमर्थांना मनःपूत संचार करण्यास दाहीदिशा मोकळ्या झाल्या. त्यांच्यामागे कोणत्याहीरीतीचें लचांड राहिलें नाहीं. तेव्हां अप्पयासारख्या जीवन्मुक्तांनां प्रारब्धवशात् प्राप्त झालेला देह पतन होईपर्यंत परोपकाराशिवाय दुसरें कर्तव्य उरत नसल्यामुळें मुमुक्षुजीवांस ज्ञानोपदेश करीत व पुण्यक्षेत्रांतून पर्यटन करीत ते आपला काळ घालवूं लागले.

श्रीमत्परमहंस चिदानंदस्वामी आणि त्यांचा अखिल शिष्यवर्ग श्रेष्ठ कवींत मोडत होता. अप्पयासमर्थांना गुरूपदेश झाल्यादिवसापासून भक्ति, ज्ञान आणि वैराग्य या विषयांवर त्यांनीं हजारों पदें रचिलीं आहेत प्रसंगोपात् घडलेल्या गोष्टींवर आणि पाहिलेल्या वस्तूंवर त्यांनीं बरींच पदें केलीं आहेत. त्यांची सौभाग्यवति भागीरथीबाई निवर्तल्यावेळीं स्त्रीवियोगानें पश्चात्ताप न पावतां त्या प्रसंगावर विनोदात्मक पद करून त्यांनीं आपल्या मनाचें शांतवन केलेलें आहे. हीं सर्व पदें व चिदानंदस्वामींनीं आणि त्यांच्या शिष्यांनीं केलले शेंकडो ग्रंथ बैलूर मठांत होते. त्या सर्व

ग्रंथांत वेदांतग्रंथाची संख्या फार असून अनंतव्रतादि पुराणोक्त कथा व भागवतादि पुराणग्रंथांवर वेदांतप्रचुर टीका लिहिलेले ग्रंथही होते. या पुस्तकालयांत ' चिदानंद कोरडे ' या नांवाचा भक्ति-ज्ञान-वैराग्यपर असलेला ग्रंथ फार प्रसिद्ध होता. हे सारे हस्तलिखित ग्रंथ बेलूर मठांतील व्यवस्थापकांनी त्याच्या प्रति वगैरे करण्याकरितां दुसऱ्याच्या हातांत न दिल्यामुळें आलीकडे या १०।१५ वर्षांपूर्वी सदर मठास आग लागून ते अपूर्व ग्रंथ अग्न्यर्पण झाले असे म्हणतात !! यामुळें अप्पयासमर्थांची कांहीं लोकमुखांत राहिलेलीं पदें मात्र अवशिष्ट राहिलीं, हें तरी एक महद्भाग्यच समजावयाचें. हे सर्व ग्रंथ व अप्पयांचीं पदें कानडी भाषेमध्यें असल्यामुळें त्यांतील वेंचे येथें दिले नाहींत; तथापि त्यांतील सौष्टव आणि मार्मिकता हीं अपूर्व आहेत. कानडीभाषा जाणणारांनीं त्या भाषेंत अप्पयासमर्थांचें विस्तृत चरित्र प्रसिद्ध झाले आहे तें पहावें. अप्पयासमर्थांकडून लोककल्याणार्थ बऱ्याच आश्चर्यकारक कृति घडलेल्या आहेत त्यांपैकीं कांहींचा येथें उल्लेख करून हें चरित्र संपवितों.

कर्नाटकांत धर्मस्थळ म्हणून एक चांगलें नामांकित पुण्यक्षेत्र आहे. तेथें मंजुनाथ नांवाचें फार प्राचीन शंकराचे देवस्थान असून त्याठिकाणीं हजारों लोक यात्रेच्या उद्देशानें प्रतिवर्षी जात असतात. या सर्व यात्रेकरू लोकांना व कोणी अतीतअभ्यागत, पांथस्थ ब्राम्हण वगैरे गेल्यास त्याचा मुक्काम असेतोंपर्यंत त्याच्या जेवणखाणाची सर्वप्रकारची सोय देवस्थानांतून होत असते. इतकेंच नाहीं तर त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें मानमरातबही उत्तम होतो, अशी त्या स्थळाची प्रसिद्धी आहे. यामुळें ' धर्मस्थळ ' हें नांवही त्या गांवाला चांगलें शोभतें. ही सारी व्यवस्था व तेथील देवस्थानची पूजा वगैरे सर्व अधिकार ' हेगडे ' उपनांवाच्या जैन अधिकाऱ्याकडे आहे. एकदां वरदय्य हेगडे नांवाच्या इसमाकडे देवस्थानची पूजा वगैरे व्यवस्था असतां कोणीएक चांगला मांत्रीक शूद्र देवाच्या दर्शनाकरितां तेथें गेला होता. देवस्थानच्या पैशावर यथेष्ट चैन चालत असल्यामुळें वरदय्य हेगडे हे साधारण मनुष्याची पर्वा करीत नसत. तसाच कोणी श्रीमान् शेटसावकार आल्यास त्याची तेव्हांच वासपूस करावयाची; परंतु ही लहानथोर भेदबुद्धि परमेश्वराच्या ठिकाणीं कोठून असणार ? त्याला सर्व सारखेच त्याप्रमाणें देवदर्शनार्थ गेलेला तो मांत्रीक शूद्र हातांत श्रीफल ( नारळ ) घेऊन देवाच्या द्वारांत बराचवेळ उभा राहिला, पण कोणीही त्याची वासपूस करीना कीं त्याला देवदर्शनही करूं देईनात. त्याच्या पश्चात् आलेल्या मंडळींची तेव्हांच दाद लागली; यामुळें तो शूद्र अतिशय

संतापला आणि या सर्वांना आपला प्रताप दाखवावा म्हणून त्यानें बरोबर आणिलेल्या नारळावर मंत्रसामर्थ्यानें देवकळा व देवाचे क्षेत्रपालादि भूतगणांचें आवाहन करून तो तिकडून निघून गेला. इतक्यांत त्याच दिवशीं रात्रीं वरदय्य हेगडे यांना 'ऐश्वर्यानें मदोन्मत्त होऊन माझ्या दर्शनाकरितां आलेल्या माणसाची कोणीच वास- पूस करीत नाहीं आणि भेदबुद्धि बाळगितात, यायोगानें मला मोठें संकट प्राप्त झालें आहे.' असा स्वप्नद्वारां दृष्टांत झाला. त्याबरोबर स्वारी गडबडली, आणि दुसरेच दिवशीं सकाळीं अंथरुणांतून उठण्याबरोबर एकाएकीं त्यांची दृष्टी बंद झाली. डोळे असून नाहींसारखे झाले. मग काय विचारावें? देवदर्शन न होतां तसेंच राहिलेल्या यात्रेकरू लोकांना बोलावून आणून त्यांना देवदर्शन करवून अनेकप्रकारें त्यांचा मोठा सत्कार केला. या लोकांमध्यें तो मांत्रीक शूद्रही होता. त्याच्याच- पासून हा इतका अनर्थ गुदरला असें जेव्हां वरदय्यास समजलें तेव्हां त्यांनीं त्याचा फार चांगल्यारीतीनें आदरसत्कार करून आणि त्याला नेववेल तितकें द्रव्य देऊन त्याचें समाधान केलें. त्याबरोबर त्या शूद्रानेंही आपल्या मंत्रसामर्थ्याच्यायोगानें पूर्ववत् देवकळा चढविली, आणि भूतगणांनांही आपापल्या स्थानांवर पाठविलें. इतकें झालें तरी वरदय्य हेगड्यांची दृष्टी मात्र आली नाहीं. पुष्कळ ठिकाणीं विचारून पाहिलें. देवांना नवस केले, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें कांहीं दिवस गेल्यावर अप्पया- समर्थांची स्वारी यात्रेनिमित्त तेथें पोहोंचली. त्यांना योग्यप्रकारें आदरसत्कारपूर्वक देवदर्शन झाल्यावर हेगड्यांना प्राप्त झालेल्या संकटाचा प्रस्ताप निघाला व आपल्यावर अनुग्रह व्हावा म्हणून हेगड्यांनीं आणि त्यांच्या आप्तइष्टांनीं अप्पयासमर्थांची नम्रपणें प्रार्थना केली; तेव्हां अप्पयांनी देवाची महापूजा झाल्यावर अंध झालेल्या त्या वरदय्य हेगड्याला हातात धरून "**रक्षिसो वरदय्यन कंणिगे। सुक्षेमदि- द्रष्टियप्पंते॥ दक्षिण काशियंदेनिपकुडुमपुराध्यक्षनाद श्रीमंजुनाथ देवा॥** इ०" हे पद म्हणत देवाला तीन प्रदक्षिणा घातल्या आणि देवासमोर येऊन उभे राहिले. त्याबरोबर गाढ अंधःकाराचा नाश होऊन जसा सूर्याचा उदय होतो त्याप्रमाणें वरदय्य हेगड्याला तत्काळ संपूर्ण दृष्टि प्राप्त झाली! केवढें आश्चर्य हें! याला योगबल म्हणावें, सिद्धि म्हणावी किंवा भक्तिसामर्थ्य म्हणावें? याचा वाचकांनींच निर्णय ठरवावा. त्या दिवसापासून धर्मस्थळ येथें कोणीही मनुष्य गेल्यास लहानथोरपणाची भेदबुद्धि न ठेवितां त्याचा योग्य आदरसत्कार करण्यांत तेथील व्यवस्थापक पुजाऱ्याकडून यत्किंचितही कसूर होत नाहीं असें म्हणतात.

पूर्वी नगरसंस्थानात मोठमोठ्या सरकारी अधिकारावर सारस्वत ब्राम्हण पुष्कळ होते. तेव्हा त्यांनीं अप्पया समर्थांना नगरास येण्याविषयीं विनंति केली होती व अप्पयाची कीर्ति नगरसंस्थानाधिपती बसव्वनृपती यांनीं ऐकलेली होती; यामुळें राजानींही आपल्या संस्थानात येण्याविषयीं आग्रह केला होता. तेव्हां सर्वांच्या इच्छेप्रमाणें अप्पयासमर्थ नगरास गेले; आणि वीणा हातात घेऊन त्यांनी राजवाड्यात प्रवेश केला. त्यावेळीं अनेक शास्त्री, पंडित, विद्वान, कवी वगैरे गुणीजन राजाच्या आश्रयास होते. त्यांनी अप्पयासमर्थांस पाहून त्याच्या विद्वत्तेबद्दल वगैरे विचारपूस केली; आणि राजदर्शनाकरिता रिक्तहस्तानी येणें हें शास्त्रविरुद्ध आहे असे म्हणून त्यांनी त्याची चेष्टा केली हे सर्व अप्पयाच्या लक्षात येताच याला काय उपाय करावा म्हणून इकडे तिकडे पाहू लागले. तो त्याना एका कोंपऱ्यामध्ये नारळावरची कवची पडलेली दिसली. ती घेऊन त्याजवर संक्षिप्तरामायण एका पद्यात लिहून ती कवची बरोबर घतली व राजदर्शनाकरिता दरबारात प्रवेश केला. महाराजाची स्वारी सिंहासनारूढ होताच त्याच्या सन्मुख ती कवची ठेविली. तेव्हा सर्वांना परम आश्चर्य वाटले; आणि राजाने एका विद्वान कवीकडून त्या कवचीवरील पद्य वाचविलें ते नवरसपरिप्लुत पद ऐकून राजा फारच खुष झाला; आणि तत्काळ अप्पया समर्थांना "अप्पयवरकवी" अशी पदवी व बहुमानाचा पोषाख दिला. पुढे राजाच्या आग्रहामुळे कांही दिवस ते नगरासच राहिले व आणखी कांही कविता करून त्यांनी त्या राजाला परमार्थज्ञानाचा लाभ करून दिला

अप्पयासमर्थांनी दक्षिणप्रांतीं तंजावरापर्यंत फिरून तेथील संगीतकलेत व रुद्रवीणा इत्यादि वाद्ये वाजविण्यात बरेंच प्रावीण्य संपादिलें होते तेथील तेलंग भाषा शिकून त्या भाषेत तेथील लोकांना उपदेशपर व वीणा वाजविण्यास उमेद येण्याजोगी अनेक पदें रचिली आहेत. अद्यापि देखील तिकडील संगीतकलाप्रवीण लोक वीणा वगैरे वाद्ये वाजविण्यांत अप्पयाच्या पदांचाच उपयोग करितात. त्याची रुद्रवीणा वाजविण्याबद्दलची कीर्ति ऐकून त्या विषयंत प्रवीण असलेला कोणी एक मनुष्य अप्पयासमर्थाचा पाडाव करावा या बुद्धीने भटकळास आला होता समर्थांनी त्याचा चांगल्यारीतीने आदरसत्कार करून जेवण वगैरे झाल्यावर येण्याचें कारण विचारून घेतलें, आणि त्याप्रमाणे सर्व सिद्धता करून अप्पयानी आपणास अवगत असलेल्या सर्व चिजा वाजवून दाखविल्या, परंतु तो आलेला इसमही मोठा हुशार होता. त्याने बरोबर अप्पय्याप्रमाणेंच सर्व चिजा वाजविल्या. यामुळे त्याला मोठा अभिमान

उत्पन्न झाला. हें समर्थांच्या लक्षांत येतांच त्यांनीं एक पद वीण्यामध्यें वाजवून त्याच्या द्वारानें आपल्या नंद नांवाच्या सेवकास एक वस्तु घेऊन येण्याविषयी सुचविलें. त्याबरोबर नंदानें जाऊन तत्काळ अलगोजा ( पोवा ) आणून त्यांच्यापुढें ठेविला; परंतु त्या वीण्यांतून त्यांनी कोणत्या रागावरील कोणतें पद वाजविलें, त्याचा अर्थ काय होता, हें त्या घमेंडखोर माणसाला मुळींच समजलें नाहीं. तो मोठ्या अचंब्यांत पडला, आणि अप्पयांच्या अपूर्व बुद्धिमत्तेची तारीफ करून त्यांना शिरसावंदन करून मुकाट्यानें आपल्या देशीं निघून गेला.

याप्रमाणें अप्पयासमर्थांनी विस्मय वाटण्याजोगीं अनेक कलाकौशल्याचीं व कांहीं अमानुष कार्यें केलेलीं आहेत पण तीं सारीं खरी म्हणण्याबद्दल योग्य आधार नसल्यामुळें येथें त्यांचा उल्लेख केला नाहीं. असो.

अशारीतीनें आत्महितपूर्वक लोककल्याणार्थ साऱ्या आयुष्याचा विनियोगकरून अप्पयासमर्थ स्वग्रामीं भटकळ येथें असतां देहांतसमय जवळ येऊन ठेपला असें त्यांस समजलें तेव्हां त्यांनी तत्काळ संन्यासदीक्षा घेऊन गुरुस्मरण करीत कार्तीक वद्य ८ थीस या मर्त्यभूतलावर आपला क्षणिक पांचभौतिक देह ठेऊन ते ब्रम्हस्वरूपीं लीन झाले यावेळीं त्यांनीं एक पद रचिलेलें आहे तेंच त्यांचें अखेरचें पद होय.

अप्पयासमर्थ निवर्तल्यावर त्यांच्या वंशजांनीं व भक्तमंडळींनीं त्यांच्या कलेवराला समाधि देऊन *त्याठिकाणीं उमामहेश्वरलिंगाची स्थापना करून देवस्थान बांधिलें आहे. याला उमामहेश्वरदेवस्थान किंवा नाडिगरदेवस्थान असें म्हणतात. हें देवस्थान भटकळ येथें ब्राम्हणांची विशेष वस्ति असलेल्या मध्यभागीं आहे. कारवार जिल्ह्यापैकीं हलियाळ येथें श्रीयुत वेंकटराव नाडिगर म्हणून जे सद्गृहस्थ राहतात ते अप्पयाच्या वंशजांपैकींच होत. गेल्या दहा वर्षापूर्वी १९०० इसवीमध्यें वेंकटराव व त्यांची भावजयी शांताबाई या उभयतांनीं मिळून सुमारें पांच हजार रुपये खर्चून ह्या देवस्थानचा जीर्णोद्धार केला आहे; आणि तेथें अप्पयांच्या समाधिपीठाच्या मागें पांढऱ्या संगमरवरी शिलेची श्रीदत्तात्रेयाची प्रेक्षणीय मूर्ती स्थापिली आहे व देवाला पूजेसाठीं चांदीचीं उपकरणें, दागदागिनें वगैरे बरेच दिले आहेत त्रिकालपूजा, नैवेद्य, नंदादीप वगैरेची सर्व व्यवस्था फार उत्तमतऱ्हेची चालत आहे. कांहीं उद्योगधंद्यानिमित्त वेंकटराव जरी हलियाळ येथें असतात तरी त्यांचें लक्ष या देवस्थानाकडे विशेष आहे. वर्षांतून एक दोनवेळ भटकळपर्यंत जाऊन देवस्थानची व्यवस्था पाहून येतात. या देवस्थानावर नाडगरघराण्याचें जरी स्वामित्व आहे तरी

पूर्वीपासून ते सार्वजनिक म्हणून प्रसिद्ध आहे व सार्वजनिकरीतीने गोळा झालेला पैसाही बराच आहे. त्याच्या व्याजामध्ये श्रीरामनवमी, अनंतव्रत वगैरे उत्साह प्रतिवर्षी होत असतात. अप्पयांच्या पुण्यतिथी रोजी कार्तिक व॥ ८ थीस प्रतिवर्षी ब्राम्हणसंतर्पण होत असतें. याशिवाय वेंकटरावाच्या कुटुंबातील मंडळींनी आणखी कांहीं नवीन उत्सव ठेविले आहेत असें म्हणतात.

वेंकटरावजींची भावजयी शांताबाई ही पती, पुत्र व जामात याच्या अकालिक निधनामुळें प्रापंचिकस्थितीस वैतागून घरदार वगैरे सर्व सोडून गतभर्तृका कन्या सरस्वतीबाई इच्यासह भटकळ येथे त्या देवस्थानात जाऊन राहिली व नित्य श्रीदत्ताच्या भजनपूजनात आपला सारा काळ घालवू लागली. हल्ली तिच्या स्मरणार्थ पुष्कळ द्रव्य जमवून त्याच्या व्याजात प्रतिवर्षी श्रीदत्तजयंतीचा उत्सव चालत आहे व तिच्या निधनतिथीदिवशी त्या देवस्थानात भजनपूजन होऊन ब्राम्हणसंतर्पण होत असते.

सारांश, एका सत्पुरुषाच्यायोगाने आज शेकडो लोक सन्मार्गाला लागले ही काहीं सामान्य गोष्ट नाही. समर्थ हे विशेषण अप्पयाला अगदी यथार्थत्वाने लागूं पडते. असे सत्पुरुष या भरतभूमीत अधिकाधिक निपजून जडजीवाचा उद्धार होवो! एवढीच त्या प्रभूपाशी प्रार्थना आहे.

---

# पूर्णदास ऊर्फ बाबा उसपकर.

**औ नर नहि बारं नहि बारे । सब दुनियांसा न्यारे ॥**
**राजा रंक बराबर लेखे । हरदम साहेब देखे ॥**

मानपुरी.

जगात, माणसाच्या अंगीं साधुत्व येण्याचे जेवढे म्हणून उपाय आहेत, तेवढे केवळ सिद्धांतरूप असून, योग्य परिस्थितीत त्याचें अवलंबन केले असता ते फलद्रूप व्हावयास उशीर लागत नाहीं; परंतु खडकावर पेरिलेलें धान्य जसें नष्टप्राय होतें तसेंच या सिद्धांतांचें अवलंबन अपात्र माणसानें केलें असता ते केवळ निष्फळ होतें; तथापि या स्वतःसिद्ध उपायाचा नाश करणे मात्र मनुष्यमात्रास बिलकुल शक्य नाही. जेथें मनुष्याची गति नाहीं अशा एखाद्या अटव्य अरण्यांत किंवा

गिरिगव्हरांत एखादा स्वच्छ पाण्याचा झरा वहात असतो. त्या झऱ्याची जरी कोणास माहिती नसली तरी त्याचें नैसर्गिक कार्य त्याच्या कांठच्या प्रदेशावर घडतच असतें. त्याच्या ओलाव्यानें आसपासच्या वनस्पती आपला निर्वाह करीत असतात व त्याचें पाणी पिऊन वन्यपशू आपली तहान भागवितात. हाच झरा एखाद्या उद्योगी व कल्पक माणसाच्या दृष्टीस पडला तर तो त्या झऱ्याचा पाट काढून, त्याच्या पाण्यानें जमीनींत पुष्कळ धान्य उत्पन्न करील व देशाची संपत्ति वाढवील. तर याचप्रमाणें कित्येक महान् सत्पुरुषांच्या व प्रासादिक कवींच्या चरित्रांचा लोप झाला आहे, असें जरी सकृद्दर्शनीं वाटतें, तरी तो कवि अथवा साधु ज्या प्रांतांत होऊन गेला असेल त्या प्रांतावर त्याच्या काव्यांचा व कृत्यांचा थोडाबहुत तरी परिणाम झालेला असल्याशिवाय राहणार नाहीं व कोणी शोधक मनुष्यानें त्या प्रांतीं जाऊन शोध केल्यास त्या सत्पुरुषाचें चरित्र व काव्यें त्यास उपलब्ध होणें अशक्य आहे, असें नाहीं. अशाप्रकारचे एक सत्पुरुष वेंगुर्लेंप्रांतीं सुमारें ५० वर्षांपूर्वीं होऊन गेले, त्यांचें त्रोटक चरित्र येथें देतों.

इसवी सन १८३८ च्या सुमारास सावंतवाडी संस्थानांतील उसप तर्फेंत कांहीं बंडवाल्या लोकांनीं बंडाची मोठी धामधूम चालविली होती त्यामुळें कित्येक लोक त्या बंडवाल्यांच्या छळानें त्रस्त होऊन, तो प्रांत सोडून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन राहिले. त्यावेळीं तिकडे असे बंडावे सुरू झाले म्हणजे रयतलोक स्वसंरक्षणार्थ एखाद्या बलिष्ठ सरदाराच्या आश्रयास जाऊन रहात असत. प्रसिद्ध जिवबादादा बक्षी यांचे वंशज सगुणराव बक्षी व नरोबादादा ऊर्फ बाबासाहेब बक्षी हे यावेळीं, गोवेंप्रांतांत पेडणें महालीं 'नरोबाची केरी' या नांवाचें त्यांचें इनाम गांव आहे, तेथें रहात असत. बंडखोरांच्या छळास भिऊन, जे लोक त्यांचा आश्रय करीत, त्यांची बक्षी यांजकडून चांगली संभावना होत असे व याबद्दलची साक्ष बक्षी यांचे घरीं असलेलीं अनेक जुनीं पत्रें आज देत आहेत. यावेळीं भाऊ उपसकर या नांवाचे एक गृहस्थ, आपले धाकटे बंधु व चरित्रनायक बाबा उसपकर यांसह बक्षींच्या आश्रयास केरी येथें येऊन राहिले होते. यावेळीं बाबांचें वय सुमारें ५० वर्षांचें होतें. यावरून त्यांचा जन्म सन १७८८ सालीं किंवा त्या सुमारास झाला असावा, असें म्हणतां येईल. आलेल्या लोकांची केरकर बक्षी यांजकडून चांगली संभावना होत असे म्हणून वर लिहिलेंच आहे. त्याप्रमाणें या दोन्ही बंधूंचा केरकरांनीं उत्तमप्रकारें परामर्ष घेतला. पुढें हे दोन्ही

बंधू केरी येथें कायमचेच राहिले त्यांची स्थिति फार गरीबीची असल्यामुळें केरकर यांनीं त्यांस घर बांधून दिलें व त्यांचा चरितार्थ तेच चालवूं लागले. बाबा उसपकर यांचा स्वभाव फार सात्विक व मनमिळाऊ होता. त्यांचा ओढा प्रपंचापेक्षां परमार्थाकडेच अधिक असल्यामुळें, देवपूजा व भजन यांतच त्यांचा बहुतेक वेळ जात असे. यांचा मूळचा गांव उसप हा सावंतवाडी संस्थानांत असून, याच गांवावरून बाबांस उसपकर असें उपनांव प्राप्त झालें. हे कौण्डिण्यगोत्री सारस्वतब्राम्हण, यांचें उपनांव राजाध्यक्ष. संसारांत वरचेवर फार त्रास होऊं लागल्यामुळें बाबांची देवभक्ति अधिकच वाढत चालली. ते नित्य मोठ्या पहांटेस उठून, स्नानसंध्या व भजनपूजन आटपून नंतर भगवद्गीता वाचीत असत व संध्याकाळी ज्ञानेश्वरी व भागवत या ग्रंथांचे परिशीलन करीत असत. पुनः रात्रीं जेवण झाल्यावर भजन करून नंतर निजावयाचें, असा बाबांचा नित्यक्रम होता. एकदां कपिलाषष्ठीचा योग आला होता. त्यावेळी सर्व लोक केरी गांवीं समुद्रतीरावर स्नानास गेले, त्यांत बाबा उसपकरही होते. गेलेले लोक आपापला स्नानविधि उरकून घरीं आले तरी बाबांचा पत्ता नाहीं यामुळे त्यांच्या घरच्या माणसांनीं पुष्कळ ठिकाणी जाऊन चौकशी केली व केरकरांच्या शिपायांनीही तीन दिवस समुद्रकांठी व नजीकच्या गांवी जाऊन शोध केला परंतु बाबांचा मुळीच पत्ता लागेना, तिसरे दिवशीं. समुद्रकांठी एक मोठें केतकीचे वन होतें, त्यांत बाबा प्रेतवत् पडलेले एका गृहस्थाच्या दृष्टीस पडले. लोकांनीं त्यांस घरीं आणून सावध करण्याचे बहुत उपाय केले परंतु बाबांस समाधि लागली होती, त्यामुळें त्यांचा कांहीच उपयोग झाला नाहीं. अशास्थितींत आणखी तीन दिवस गेल्यावर बाबा चांगले शुद्धीवर आले व तेव्हांपासून त्यांच्या चित्तवृत्तींत विलक्षण पालट झालेला दृष्टीस पडूं लागला. बाबांस, त्या केतकीवनांत गुरूपदेश झाला व त्यामुळें समाधि लागून त्यांची अशी स्थिति झाली !

बाबा अगोदरच मोठे सत्वस्थ व देवभक्त होते, त्यांत आतां त्यांस गुरूपदेश झाला, मग काय विचारावें ? त्यांचे साधुत्व फारच वाढले व तेव्हांपासून त्यांच्या अंगीं कवित्वशक्तीही वास करूं लागली. जे तोंडांतून येईल तें देवाचें पद, अभंग, याप्रमाणें त्यांची वाणी केवळ देवरूप होऊन गेली !

बाबा उसपकर यांस गोपाळदास नामक एका दत्तसाप्रदायांतील सत्पुरुषांचा उपदेश झाला होता, असें बाबांनीं पुढें जो 'ज्ञानघन' नांवाचा अध्यात्मपर

ग्रंथ लिहिला त्यांत सांगितलें आहे. ' गुरुदत्तात्रय अवधूता । स्वामी गोपाळ पूर्णनाथा हो ॥ ' अशी बाबांनीं आपली गुरुपरंपरा दिलेली आहे. गोपाळदास हे श्रीदत्तमहाराजांचे प्रसिद्ध शिष्य असून ते चिरंजीव आहेत असे म्हणतात. केतकीवनांत ज्या दिवशी बाबांची व या गोपाळदासांची गांठ पडली त्या दिवशीं दासांनी बाबांस वेदांतोपदेश करून त्यांचें नांव ' पूर्णदास ' असे ठेविले व त्यांस समाधि लावून ते अदृश्य झाले. यानंतर पूर्णदास व गोपाळदास यांची अनेक वर्षे गांठ न पडल्यामुळें, पूर्णदास हे अनेक क्षेत्रांच्या व तीर्थांच्या जागी त्यांचा शोध करीत फिरत होते, परंतु गोपाळदासांचा मुळींच पत्ता लागला नाहीं. नंतर पूर्णदास यांनीं प्रतिवर्षी पंढरपुरास जाण्याचा क्रम ठेविला, तेव्हां एकवेळ गोपाळदासांची तेथे भेट होऊन पूर्णदासांच्या मनांतील संदेह फिटला व त्यांचें समाधान झाले.

त्याच वेळेच्या सुमारास, मालवण तालुक्यांतील ' आचरें ' गावीं श्रीरामाचें सुप्रसिद्ध देवस्थान आहे तेथे ' शिवराम मुनीश्वर ' नांवाचे एक प्रसिद्ध योगी रहात असत. त्यांनी केलेले अनेक चमत्कार त्या प्रांतीं प्रसिद्ध असून, त्यांचा ' निःसंदेह दिवाकर ' या नांवाचा एक वेदांतपर लहानसा ग्रंथ, काव्यसंग्रहांत छापून प्रसिद्ध झालेला आहे. ज्या मूळप्रतीवरून हा ग्रंथ छापला आहे ती प्रत बाबांच्या हातची असून ग्रंथाच्या शेवटी बाबांनी ४ ओव्यांत आपली संक्षिप्त हकीकत निवेदन केली आहे. शिवराम मुनीश्वरांचा व बाबाचा मोठा स्नेह होता. हे मुनीश्वर सुमारें ५० वर्षांपूर्वी आचरें येथे समाधिस्थ झाले.

बाबा उसपकर व सोहिरोबा आंबिये या दोन सत्पुरुषांच्या चरित्रांवरून एका महत्वाच्या सिद्धातास पुष्टीकरण मिळतें; तो सिद्धांत हा कीं, जर मनुष्य खरोखर मनापासून परमेश्वरप्राप्तीसाठीं प्रयत्न करीत असेल व परमार्थविषयांत तो व्हावा तेवढा पारंगत झाला असेल तर त्यास गुरुपदेश होऊन परब्रम्हस्वरूपाचें दर्शन व्हावयास उशीर लागत नाहीं. बाबा लहानपणापासूनच विरक्त होते व पुढें तारुण्यकाळीं त्यांजवर संसाराचा बोजा पडल्यामुळें तर ते अधिकच विरक्त झाले. शेवटीं परमार्थात त्यांची पूर्ण तयारी होऊन ते खरे साधक होतांच गोपाळदासानीं स्वतः त्यांस शोधीत येऊन, उपदेश दिला. तर ' आपणास गुरु कसा मिळेल ' अशी विवंचना ज्यांच्यामागें लागलेली असेल त्यांनीं आपल्या आचारांत व विचारांत पहिल्यानें योग्य ती सुधारणा करून साधकत्वाचे खरें तेज आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसें तेज अंगीं आल्यावर गुरुच्या शोधार्थ हिंडत फिरण्याची

मुळींच आवश्यकता नाहीं. फूल फुललें कीं भ्रमर आपोआप यावयाचे हें ठरलेले आहे. असो.

पूर्णदास केरी येथें असताना ते नित्य भागवत वाचीत असत, त्यावेळीं बरीच भाविक मंडळी तेथें जमत असे. याच गांवीं 'पडते' उपनांवाचे वाणी गृहस्थ आहेत, त्यांच्या घरांतील एक गृहस्थ नित्य भागवतश्रवण करावयास येत असे. या गृहस्थाच्या वडील बंधूकडून बावांनीं भागवत लिहिण्याकरितां पांच रुपये किमतीचे कागद उधार आणिले होते. पुढे बरेच दिवस गेले तरी त्याचे रुपये त्यास द्यावयास बावा समर्थ झाले नाहीत. यामुळें, त्याचा धाकटा भाऊ जेव्हां बावाचे घरीं भागवत ऐकण्याकरितां जाई तेव्हां 'बाबांकडून कागदाचे पैसे मागून आणावयास विसरूं नकोस' असे तो त्यास नित्य सांगत असे; परतु तो बावाच्या घरीं आला व भागवताकडे त्याचें चित्त वेधून गेलें म्हणजे त्यास आपल्या भावाच्या सागण्याची बिलकुल आठवण रहात नसे. अशाप्रकारें सुमारें दोन महिने गेल्यावर, एकेदिवशीं वडील भावानें त्यास दरडाऊन सांगितले की, जर तूं आज बावांकडून पैसे मागून आणिले नाहींस तर आज मी तुला उपाशी ठेवीन. आपला भाऊ खरोखरच बोलल्याप्रमाणें करण्यास चुकणार नाही, या भीतीनें तो बिचारा बावाकडे गेला व 'माझा भाऊ कागदांचे पैसे मागतो' असें त्यानें त्यांस मोठ्या नम्रतेने कळविलें. 'ठीक आहे. तुमचे पैसे परवा देतो.' असें बावा ह्मणाले व त्याप्रमाणे, घरीं येऊन त्यानें आपल्या वडील बधूस सांगितले. इकडे देवभक्तीच्या नित्यकर्मात गढून गेल्यामुळे बावांस पैशांचा आठवण राहिली नाही व शेवटीं मुदतीचा तिसरा दिवस येऊन ठेपला. आता जर सावकारांचे पैसे दिले नाहीत तर बावांची खचीत अब्रू जाते असे सर्वांस वाटूं लागलें. पण आंधळ्याच्या गायी राखणारा देव आहे हें कोणाच्याही लक्षात आलें नाहीं. तिसरा दिवस गेला, चौथे दिवशीं सकाळीं प्रत्यक्ष परमेश्वरानें एका कुणब्याच्या वेषानें जाऊन, सावकाराचे पैसे देऊन टाकिले! तो सावकारास म्हणाला 'शेटजी! बावाचा हिशोब काय झाला आहे तो काढा, मी त्याजकडून तुमचे पैसे घेऊन आलों आहे.' सावकारानें बावाचे खाते काढून पाहिले व सांगितले की, बावांनी मजकडून पांच रुपये किंमतीचे कागद उधार नेले होते, तेवढे पाच रुपये त्यांजकडून आम्हांस मिळावयाचे आहेत. तेव्हां त्याने तात्काळ पाच रुपये देऊन सावकाराची पावती घेतली व ती गुप्तरूपाने बावाच्या भगवद्गीतेच्या पोथींत घालून ठेविली.

इकडे बावा आपली स्नानसंध्या आटोपून नित्यकर्मानुसार गीता वाचण्याच्या

उद्देशानें भगवद्गीतेची पोथी सोडून पाहतात तों त्या दिवशीं त्यांस जो अध्याय वाचा-वयाचा होता त्यांत ही पावती त्यांच्या दृष्टीस पडली! ती वाचून पाहतांच बाबास मोठें आश्चर्य वाटलें! ते म्हणाले ' मी रुपये तर अद्याप दिलेले नाहींत, असें असतां ही पावती या पोथींत कशी आली? ' नंतर त्यांनीं घरांतील माणसांस विचारिलें, परंतु त्यांस यासंबंधानें कांहींच माहित नसल्यामुळें त्या सर्वांनी आपल्या कानावर हात ठेविले. पुढें सावकारास विचारिल्यावर तो म्हणाला ' आज सकाळीं कोणीएक अनोळखी कुणबी मजकडे येऊन म्हणाला कीं, बाबांनीं तुमचे पांच रुपये पाठविले आहेत हे घ्या व त्याबद्दल मला तुमच्या सहीची पावती द्या. त्याप्रमाणें मी ते रुपये घेऊन तुमच्या खातीं जमा केले व त्याबद्दलची पावती लिहून दिली. ती पावती घेऊन तो कुणबी निघून गेला. तो कोण होता किंवा कोठें गेला वगैरे चौकशी मी मुळींच केली नाहीं. ' हें सावकाराचें भाषण ऐकल्यावर सर्वांची खातरी होऊन चुकली कीं, हें कृत्य माणसाचें नसून प्रत्यक्ष पंढरीनाथानें कुणब्याचा वेष धारण करून बाबांवरचें संकट टाळिलें. सर्व लोकांस बाबांच्या हरिभक्तिपरायणतेचें मोठें आश्चर्य व कौतुक वाटलें व ते प्रेमानें हरिनामाचा घोष करीत व ईश्वरीलीलेचे गुणानुवाद गात आपल्या घरीं गेले. यानंतर, पूर्णदास हे आपल्या नांवाप्रमाणें साधुत्वाच्या अगदीं पूर्णावस्थेप्रत पोहोंचले.

पूर्णदास जरी एवढे सात्विकवृत्तीचे सत्पुरुष होते तरी गांवांतील लोकांस त्यांचा एकप्रकारचा दरारा होता. याचें कारण असें कीं, कोणी एकाद्यानें चोरी, चहाडी किंवा तत्सदृश दुसरें एकादें वाईट कृत्य दुसऱ्या कोणास न समजूं देतां केलेलें असलें व पुढें तो मनुष्य बाबांच्या दर्शनास आला म्हणजे बाबांनीं चारचौघांत ती त्याची गुप्त गोष्ट उघड करून सांगावी. अशाप्रकारें फजिती झाल्यावर, त्यास आपल्या दुष्कृत्यांचा साहजिकच पश्चात्ताप व्हावा व त्यानें अतःपर असली गोष्ट कधींही करणार नाहीं अशी आपल्या मनांत प्रतिज्ञा करून तदनुसार वागण्याचा प्रयत्न ठेवावा. अशारीतीनें, काळोखांत केलेलीं गुप्तकृत्यें चवाठ्यावर येऊं लागल्यामुळें, सर्व लोकांस बाबांची मोठी दहशत उत्पन्न झाली होती व त्यामुळें अनेक लोकांनीं वाईट कृत्यें करण्याचें सोडून देऊन ते परमार्थाकडे वळले. शेकडो पोलिसांकडून जें काम होणें अशक्य तें काम सत्पुरुषाच्या एका शब्दानें कसें सहज घडून येतें पहा. कायद्यानें सुधारणा घडवून आणण्यापेक्षां स्वतःच्या आचरणानें लोकांस कित्ता घालून दिल्यानें होणारी सुधारणा अधिक महत्वाची होय. कारण कायद्यानें घडलेली सुधा-

रणा, कायद्याचें बंधन नष्ट झालें कीं, नष्टप्राय होऊन जाईल, तशी दुसरी सुधारणा कधींही नाश न पावतां जनतेवर आपला कायमचा पगडा बसवील. असो.

यानंतर कांहीं वर्षे गेल्यावर, पूर्णदास केरी गांव सोडून वेंगुर्ले येथें येऊन कायमचे राहिले. पंढरपुराहून श्रीविठ्ठलरुक्मिणीच्या मूर्ति आणून, एक देवालय बांधून त्यांत त्यांनी त्या स्थापन केल्या. याच ठिकाणीं कैवल्यमठाधिपती ब्रम्हीभूत श्रीरामानंद सरस्वती स्वामींनीं शंकरपार्वतीच्या काश्मिरी दगडाच्या मूर्ति स्थापन केलेल्या आहेत. जगद्गुरु श्रीशंकराचार्य हे वेंगुर्लेंप्रांतीं आले म्हणजे पूर्णदास यांस ते मुद्दाम येऊन भेटत असत व त्यांस ते मोठा मान देत असत.

नारायण ऊर्फ नारगौडा या नांवाच्या मनुष्यास पंढरपुरास श्रीपांडुरंगाने दृष्टांत दिला कीं, तूं कोंकणांत जाऊन, वेंगुर्लें येथें पूर्णदास नांवाचे एक साधु वास करीत आहेत, त्यांस भेट. नारायण, या दृष्टांताप्रमाणें वेंगुर्लें येथें आला व पूर्णदासांपुढें हात जोडून उभा राहिला. त्यास पाहतांच पूर्णदासांनीं, त्यास पंढरपुरास दृष्टांत झाल्याची हकीकत सांगितली; त्यामुळे त्यांच्या अंतर्साक्षीपणाचें त्यास व इतर लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. पुढें, पूर्णदास यांनी त्यांस उपदेश दिला व कांहीं साक्षात्कार वगैरे होऊन ब्रम्हस्वरूपाची ओळख मिळाल्यावर तो आपल्या देशीं निघून गेला.

पूर्णदास हे केवळ टाळकुटे भजनीबुवा नसून त्यांचे वैराग्य व साधुत्व हीं फार कडकडीत होतीं ते गोमांतकांतून एकदां आपल्या गांवीं येत असतां वाटेंत हरमल नांवाचा एक गांव आहे, तेथील केणी आडनांवाच्या एका सारस्वत ब्राम्हणाच्या घरांत एक माणूस मेलें होतें व त्याचें प्रेत बाहेर आणून तें स्मशानांत नेण्याची लोकांनीं तयारी चालविली होती; इतक्यांत, पूर्णदासांबरोबर असलेला त्यांचा नोकर बाबणनाईक हा, तेथें कांहीं फुलझाडें होतीं त्यांचीं फुले तोडण्यास गेला. तेथें गेल्यावर तो प्रेतयात्रेचा भीषण देखावा अवलोकन करितांच त्यास फार वाईट वाटलें व तो त्या मृतमनुष्याच्या आप्तांस म्हणाला ' बाबांनों, तुमच्या दारीं आज कामधेनु चालून आली आहे, तर आतांच जाऊन तिचे पाय धरा. ' हें त्याचें भाषण ऐकतांच त्या लोकांनीं पूर्णदासांच्या पुढें साष्टांग नमस्कार घालून, रडून ओरडून एकच आकांत केला. आधींच विष्णूदासांचें मन नवनीतापेक्षांही कोमल, त्यांत असला करुणास्पद प्रसंग आल्यावर तें अगदीं विरघळून गेलें तर त्यांत काय आश्चर्य आहे ? पूर्णदासांनीं आपल्या गुरुदेवतेचें स्मरण करून त्या मृतमनुष्याकडे कृपादृष्टीनें पाहतांच, तो

तात्काळ उठून बसला व हा अलौकिक चमत्कार पाहतांच तेथें जमलेल्या सर्व लोकांनीं पांडुरंगनामाचा एकच जयजयकार केला. याचप्रमाणें उपदेशानें अगदीं मरणोन्मुख झालेल्या एका मनुष्यास बाबांनीं देवाचें तीर्थ देऊन बरें केलें.

पूर्णदासांचे गुरु गोपाळदास हे एकेदिवशीं दोनप्रहरीं अवधूत वेषानें त्यांजपाशीं आले. पूर्णदासांनीं, आपला पुतण्या यशवंत उसपकर यास त्यांच्या जेवणाची तयारी करावयास सांगितलें. हा यशवंतराव थोडासा कृपण होता. अतित-अभ्यागतांचा परामर्ष घेण्यांत व गोसावी वगैरे लोकांस जेवूं घालण्यांत पैसा खर्च करणें त्यांस बिलकुल आवडत नसे; परंतु पूर्णदासापुढें त्याचें कांहीं चालत नसल्यामुळें, निरुपायास्तव, त्यांच्या आज्ञेप्रमाणें त्यानें थोडेसे तांदूळ एका भांड्यांत घालून ते शिजत ठेविले. पूर्णदासांस, आपल्या गुरूंची क्षुधा इतक्या थोड्या भातानें शांत होणार नाहीं हें पक्कें ठाऊक असल्यामुळें त्यांनीं, आणखी तीन शेर तांदूळ दुसऱ्या एका भांड्यांत घालून त्याचा भात कर, असें यशवंतास सांगितलें. यावेळीं तर यशवंतास त्या वैराग्याचा व पूर्णदासांचा मोठा राग आला, परंतु उपाय नाहीं म्हणून पुन: त्यानें आणखी तीन शेर तांदळांचा भात करून वैराग्यास जेवावयास बोलाविलें. हे वैरागीबुवा एक राक्षसच होते, त्यांनीं तो सर्व भात चट्ट करून वर आणखी कांहीं आंबे व केळीं खाऊन पाण्याचे एक दोन तांबे रिकामे केले व ढेंकर देत स्वारी आपल्या मार्गास लागली ! हे वैरागीबुवा पूर्णदासांचे गुरु होते हें त्यांनीं सांगितल्यावरून लोकांस समजलें.

याप्रमाणें अनेक जडमूढांचा उद्धार करून व शेंकडो लोक भक्तिमार्गास लावून पूर्णदासांनीं, आपल्या वयाचे ९२ वे वर्षी, म्हणजे इ० स० १८७० शके १७९२ ज्येष्ठ शुद्ध २ ये दिवशीं देह ठेविला. ते आपल्या वयाचे मानानें वृद्ध दिसत नसत व त्यांची अंगकांति फार दिव्य होती. ज्याठिकाणीं त्यांच्या शवाचें दहन केलें त्याठिकाणीं तुळशीचा एक रोप उगवला होता, त्यावरच त्यांची समाधि बांधलेली आहे. ही समाधि व पूर्णदासांनीं बांधिलेलें श्रीपांडुरंगाचें देवालय हीं ज्या जमीनींत आहेत ती जमीन रा. नारायण केरकर यांनीं पूर्णदासांस अर्पण केली आहे. पूर्णदासांचे शिष्य रा. रा. घन:शाम सूर्याजीराव देसाई डिचोलकर यांजकडून देवास नैवेद्य व नंदादीप हीं चालू आहेत. तसेंच देवाच्या व समाधीच्या वार्षिकखर्चा-साठीं मुंगीवाणी यांनीं मळगांव गांवीं व पांडू लाडू प्रभू यांनीं तुळस गांवीं जमिनी दिलेल्या आहेत. शिवाय सरदार केरकर बक्षी यांजकडूनही कांहीं रकम वर्षासना-

दाखल देण्यांत येते. पूर्णदासांची समाधि व त्यांनीं बांधिलेलें देवालय हीं वेंगुर्लें येथें 'उभा दांडा' या नांवाची एक वाडी आहे तेथें असून, पूर्णदासांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं तेथें त्यांच्या शिष्य व भक्तमंडळीची मोठी जत्रा भरते. शिवाय आषाढमासीं गोपाळकाल्याचा व मार्गशीर्षमासीं दत्तजयंतीचा उत्सव होतो. पूर्णदासांच्या वंशजांकडून हे उत्सव करण्यांत येतात. येथपर्यंत, एक सत्पुरुष या दृष्टीनें बाबा उसपकर ऊर्फ पूर्णदास यांच्या चरित्राचें साधारण निरूपण केलें. आतां कवि या नात्यानें त्यांनीं जी मराठी भाषेची स्वशक्त्यनुसार सेवा केली आहे, तिच्यासंबंधानें थोडासा विचार करून हा चरित्रलेख पुरा करितों.

बाबा उसपकर हे मोठे विद्वान् होते असें नाहीं, तथापि खरें साधुत्व त्यांच्या अंगीं मुरून गेलेलें असल्यामुळें त्यांच्या तोंडांतून प्रसंगविशेषीं जी परमेश्वराची स्तुति बाहेर पडली ती सर्व काव्यरूपानें आज उपलब्ध आहे. त्यांस वेदांतविषयाची फार आवड असल्यामुळें त्याच एका विषयावर त्यांचे, 'ज्ञानघन' व 'स्वात्मानुभव' या नांवाचे दोन मोठाले ओंवीबद्ध ग्रंथ आहेत. यांपैकीं पहिल्या ग्रंथाच्या ओंव्या सुमारें ६,००० आहेत. या दोन ग्रंथांशिवाय त्यांचीं निरनिराळ्या देवतांच्या स्तुतिपर व भक्ति, ज्ञान, वैराग्य इत्यादि विषयांवर अनेक पदें व अभंग आहेत. ही सर्व कविता प्रसादपूर्ण, सुलभ व वाचकांस परमार्थविषयाचें ज्ञान प्राप्त करून देणारी असून तिची संख्या जवळ जवळ १०,००० होईल. यावरून बाबांनीं आपल्या प्रासादिक व रसाळ वाणीचा आपल्या मायभाषेची सेवा करण्याकडे किती उपयोग केला, हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. रा. रा. विष्णु रंगाजी शेलडेकर यांनीं १८९६ सालीं, बाबांचा 'पूर्णसार' या नांवाचा एक लहानसा ग्रंथ, गोवें येथें छापून प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या कवितेंतील कांहीं वेंचे येथें देतों.

### अभंग १.

**'निर्गुण निधर्म निर्विकार रूप। केवळ अरूप परब्रह्म ॥ १ ॥**
**ऐशिया स्वरूपीं मूळ माया झाली। गुणमाया आली तिच्या पोटीं ॥२॥**
**गुणमायेपोटीं होय सत्वगुण। सत्वें रजोगुण उद्भवला ॥ ३ ॥**
**रजापासोनियां तमोगुण होय। ह्मणे पूर्ण सोय ऐका पुढें ॥ ४ ॥'**

## अभंग २.

तमोगुणीं व्योम जाहलें उत्पन्न । व्योमीं प्रभंजन प्रसवला ॥ १ ॥
प्रभंजनापोटीं तेज प्रसवलें । तेज तेंही व्यालें आपालागीं ॥ २ ॥
आपाचिये पोटीं भूमि उपजली । ऐशीं विस्तारलीं पंचभूतें ॥ ३ ॥
अष्टधा प्रकृति झाली ऐशापरी । पूर्ण ह्मणे थोरी ऐका पुढें ॥ ४ ॥

## अभंग ३.

विराट हिरण्यगर्भ अव्याकृति । चौथें मूळाकृति देह जाण ॥ १ ॥
उत्पत्ति पालन संहार साक्षता । चारी या अवस्था ब्रह्मांडींच्या ॥२॥
अकार उकार मकार ह्मकार । औटमात्रापर निरंजन ॥ ३ ॥
ब्रह्मा विष्णु शिव चौथा तो सर्वात्मा । पूर्ण तो महिमा न वर्णवे ॥४॥

## पद. ( हरिभजनावीण काळ० ) या चालीवर.

धांव पाव दीनबंधु श्रीदत्तदेवा ॥ धृ० ॥
कमंडलु माळ करीं । डमरु त्रिशूलासि धरी ॥
शंख चक्र, भवा हरीं । घालि पायसेवा ॥ १ ॥
त्रयमूर्ति विराजिता । रसिक भाव भक्तहिता ॥
अहंगजा विदारिता । वारिं जन्म भेवा ॥ २ ॥
कलियुगीं भक्तपति । होउनि श्रीपाद क्षितीं ॥
नरसिंह सरस्वती । अर्पि प्रेममेवा ॥ ३ ॥
धुसुरकांति दिव्यराज । विभुति अंगिं भव्य साज ॥
भक्तजना पूर्ण काज । तूंचि गुप्त ठेवा ॥ ४ ॥

## पद. ( निजवदनीं हरिनाम वसावें० ) ही चाल.

तारक तो सये विठ्ठल गावा । साधन हेंचि अनन्य भजावा ॥ धृ०॥
मुनिजन हृदयीं ज्याला जपती । अर्पुनि मानस प्रेमसुभावा ॥ १ ॥
तारक सर्वांतरिं प्रभु हरि हा । चरणीं त्या रहिवास घडावा ॥ २ ॥
कटिकर वरदायक भक्तांसी । कोमलमूर्ति जीवात्मविसावा ॥ ३ ॥
पूर्णपरात्पर प्रियकर साचा । पदाब्जीं जिवभाव कसावा ॥ ४ ॥

## श्री दत्ताष्टक.

( वसंततिलक वृत्त. )

माला कमंडलु करांबुज पुण्यशीला ।
ज्या मध्य हस्त धरितो डमरू त्रिशूला ॥
पाणि स्वऊर्ध्व धरि शंखहि चक्र यांतें ।
भावें नमो नमन दत्तदिगंबरातें ॥ १ ॥

माथां जटा विभुति चर्चित भव्य साजे ।
आंगीं स्वयें धुसुर कांतिहि ते विराजे ॥
आकर्ण नेत्रयुगुलीं हरितो भयातें ।
भावें नमो नमन दत्त दिगंबरातें ॥ २ ॥

रुद्राक्ष ते रुळति दिव्यहि देहधारी ।
जो भक्तवत्सल कृपाघन दीन तारी ॥
नामामृतें स्वसुख दे निजमोक्षदातें ।
भावें नमो नमन दत्त दिगंबरातें ॥ ३ ॥

ब्रह्मा हरी हर तनुत्रय ऐक्यकारी ।
पूर्णेंदु इंदु ह्मणजे निजसौख्यकारी ॥
ज्याचा सुवेग अति दुस्तर त्या मनातें ।
भावें नमो नमन दत्त दिगंबरातें ॥ ४ ॥

कृष्णातटीं निकट वास असे जयाला ।
स्वेच्छा निरिच्छ फिरणें भुवनत्रयाला ॥
औदुंबरासुताळिं आसन स्वस्थ ज्यातें ।
भावें नमो नमन दत्त दिगंबरातें ॥ ५ ॥

मी दीन केवळ असें मतिमंद साचा ।
वाचा नसे मधुर अप्रिय हो असाचा ॥
जाणोनियां करि कृपा मज बाळकातें ।
भावें नमो नमन दत्त दिगंबरातें ॥ ६ ॥

जो जाणता सकल अंतर इष्टतातें ।
तैसाचि तारक जना पद इच्छिता तें ॥
देखोनि भाव प्रगटे प्रिय दे वरातें ।
भावें नमो नमन दत्त दिगंबरातें ॥ ७ ॥

ब्रह्मादि देव तुज इच्छिति लोक सारे ।
तो मी तुतें सुखघना विसरूं कसा रे ॥
द्यावें सदैव निज प्रेमहि पूर्ण मातें ।
भावें नमो नमन दत्त दिगंबरातें ॥ ८ ॥

पूर्णनाथांच्या ' ज्ञानघन ' ग्रंथांतील कांहीं ओंव्या येथे देतों. मुमुक्षूनें मनोनिग्रह कसा करावा, हें नाथ सांगतात:—

' ऐसें न करवे साधन । तरी मैत्रता करावी आपण ॥
मनासारिखा मित्र पूर्ण । दुसरा नसेची ॥ ३५ ॥

जन्मार्जित दुःख जाण । मनासि निवेदावें आपण ॥
जें जें मागां भोगिलें दारुण । गर्भवासींचें ॥ ३६ ॥

तूं जरी मित्र होसी । तरी हरील भवदुःखासी ॥
शोधोनि काढीं मुळासी । आपुल्या आतां ॥ ३७ ॥

ऐसें ऐकतांचि मन । वैराग्यें खवळे दारुण ॥
आपुलें आपण बंधन । तोडी विषयांचें ॥ ३८ ॥

आपणही परोपकारीं । मरोनि जाय निर्धारीं ॥
जीवासी ब्रह्मसाक्षात्कारीं । ठाव पाववी ॥ ३९ ॥

ऐसा मनाचा उपकार । नेणोनि जे कां पामर ॥
प्राकृत मित्राचार । करूं धांवती ॥ ४० ॥

हें न टके तरी तत्त्वता । तिसरें साधन ऐक आतां ॥
निरंतर उदासीनता । असावी ते ॥ ४१ ॥

मन जें जें कां योजीतसे । आपण न उठावें त्यासरिसें ॥
तरी मनिंचा मनीं अर्थ निरसे । निष्कारणत्वें ॥ ४२ ॥

जो जो पदार्थ मन धरी । आपण उदासत्वें अव्हेरी ॥
तरी मानिचा मर्मी परस्परीं । निमोनि जाय ॥ ४३ ॥

अथवा मनासी प्रबळ । द्यावी विवेकाची मोकळ ॥
तो हालूं नेदी चंचळ । मनाकारणें ॥ ४४ ॥

मन जेथ धांवोनि जातसे । विवेक तेथ आधींच पैसे ।
मुरडुनी स्वरूपीं लावीतसे । निजानंदीं ॥ ४५ ॥

अथवा मनाचे मुळीं । आपण बैसावें निश्चळीं ।
तरी कार्यकारण होळी । सहजें होय ॥ ४६ ॥

मग मन जें जें कां पाहों बैसे । स्वरूपावीण आन न दिसे ।
अंतर्बाह्य स्वप्रकाशें । आत्माचि असे ॥ ४७ ॥

द्रष्टासी दृश्य पाहतां । आत्माचि भासे तत्वता ।
दृश्य द्रष्टा दर्शनता । निमोनि नेली ॥ ४८ ॥

जेथ जेथ चरण चालती । तेथ सहज प्रदक्षणा होती ॥
चराचरीं निजात्मा निश्चितीं । जाणतांचि ॥ ४९ ॥

श्रवणीं हरिगुणश्रवण । वाचे करावें हरिकीर्तन ॥
सदां सर्वदा नामस्मरण । करीत जावें ॥ ५० ॥

हस्तें करावें देवतार्चन । पायीं तीर्थयात्रा प्रदक्षिणा ॥
घ्राणीं अमोल्य निर्माल्य जाण । करणें सेवन ॥ ५१ ॥

भक्ति ह्मणिजे सर्व भूतीं । आत्माचि जाणावा निश्चिती ॥
मग समविषमतेची भक्ति । निमोनि गेली ॥ ५२ ॥

विषम पाहतां भूताकृति । आत्मा देखे सम निश्चिती ॥
पिपीलिका श्रेष्ठासमान मति । पाहणें जयाचें ॥ ५३ ॥

देहाभिमान त्यागुनी । नामरूपातें गाळोनी ॥
आत्मा देहीं जाणुनी । असावें बा रे ॥ ५४ ॥

दया असावी सर्व भूतीं । आत्मा ओळखोनी भूतव्यक्तीं ।
तैसीच ते निर्मळ शांती । असावी आधीं ॥ ५५ ॥

कोणी निंदा स्तुति करितां । क्रोध न यावा सर्वथा ॥
मीचि व्यापक आत्मा तत्वता । जाणोनियां ॥ ५६ ॥
जैसें गगन व्यापूनि असे । संगीं असोनी निःसंग जैसें ॥
आत्मस्वरूप तैसें । संगातीत ॥ ५७ ॥
क्षण क्षणा विचार करावा । वायां श्वासोच्छ्वास जाऊं न द्यावा ॥
आपुला आपण उगावा । करणें बापा ॥ ५८ ॥
मायामय सकळ सृष्टि । आणि अविद्यातक तुझी दृष्टी ॥
नामरूपें भरली सृष्टी । साच नसे ॥ ५९ ॥
विश्व नाहीं आत्माचि असे । जैसा रज्जूवरी सर्प विलसे ॥
तैसा जगभास भासतसे । भ्रांतिमय ॥ ६० ॥

'ज्ञानघन, रेषा ३'

वरील ओव्यांवरून, या कवीची वेदांतवाणी किती अस्खलित आहे, हें स्पष्ट दिसून येते. पूर्णनाथांची संस्कृत भाषेवर फारशी सत्ता होती असे दिसत नाहीं. तथापि मराठी भाषेत ते चांगले प्रवीण होते, असे वाटतें. त्यांची कविता अत्यंत अर्वाचीन आहे, परंतु तींत जुने मराठी शब्द व शब्दांची जुनी रूपें बरींच आढळतात.

# सिद्धपुरुष भाऊमहाराज दळवी.

" Utility is the guardian angel of the society, The tutelary goddess at its gate, and even truth has to bend her knees before her and beg for admission. This surely is not a good feature.

Even according to the utilitarian standard however the idle sage is of greater value to the society than many a active reformer. "

जगाच्या राहटीचा सूक्ष्मरीतीने जर आपण विचार केला तर ' उपयोग किंवा फायदा ' यावांचून समाजास दुसरे डोळ्यापुढें काहीच दिसेनासें झालें आहे. कोणतीही वस्तु असो जर तिच्यापासून चागला उपयोग होऊन फायदा होण्याचा संभव असेल तरच तिच्याबद्दल आपणास पूज्यबुद्धि व अभिमान वाटत असतो. तात्पर्य किफायत किंवा उपयोग ही जणूं समाजाची एक कुलदेवताच झालेली आहे असे म्हटले तरी चालेल. इतकेंच नाहीं तर ह्या किफायतरूप कुलदेवतेपुढें सत्यदेवतेलादेखील हात जोडून पुढें उभे राहण्याची वेळ आली आहे. प्रपचामध्यें एकाद्या गोष्टीचा अथवा व्यक्तीचा काही उपयोग नाही म्हणून ती गोष्ट किंवा ती व्यक्ति अगदी निरर्थक होय, अशा रीतीची भावना फार माजली आहे. पण हे चिन्ह कांहीं बरोबर नव्हे. एखादा साधुपुरुष असला आणि त्याच्यापासून आपला ऐहिक विषयसबधी कोणताही फायदा झाला नसला तर तो पुरुष साधू नव्हे असें म्हणता येईल काय? असें जर म्हणावे तर एकदर मनुष्यजातच निरुपयोगी ठरेल. तेव्हां सूक्ष्मविचार करून पाहता शेकडो चळवळ्या समाज सुधारकापेक्षा सुस्त पडून राहिलेला एकच साधु राष्ट्रास अधिक उपयोगाचा आहे असे म्हटले पाहिजे. तरी अशा सिद्ध कोटींतील एका साधुपुरुषाचें त्रोटक जीवनचरित्र येथे देतो.

भाऊमहाराजांचे मूळ पूर्वज गोमांतकांत राहणारे असून ते विजयानगरच्या राजाचे आश्रित होते. तेथेंच त्यांनां सेनानायकत्वाचे द्योतक असे ' दळवी ' हें बहुमानसूचक उपपद मिळालें असें म्हणतात. पुढें कांहीं कालानें विजयानगरचें राज्य

नामशेष होऊन तेथें पोर्तुगिज सरकारचा अंमल सुरू झाला. त्यावेळीं म्हणजे इ० स० १५१० च्या सुमारास पोर्तुगिज लोकांच्या असह्य अशा धर्मछलासभासून कितीएक अब्रूदार लोक राज्य सोडून अन्यठिकाणी गेले. त्यांत वरील दळवी घराण्यांतील एक पुरुष वाडीसंस्थानांत रेडी ( रायरिद्वीप ) येथे जाऊन राहिला आणि दुसरा एक त्यांच्यापैकींच पुरुष मुंबईस गला. तेव्हां मुंबईबेटावर पोर्तुगीज सरकारचा अंमल होता आणि तेथे त्याच सरकारानें कांहीं गौडसारस्वत ज्ञातींतील मुत्सद्दि मंडळी नेली त्यांतच वरील दळवी घराण्यांतील पुरुषाची योजना होती. त्यांचे वंशज अद्याप तेथें आहेत. रेडीस येऊन राहिलेल्या दळव्यांनी त्या गांवचा कुळकर्णपणाचा हक्क संपादन केला; व नजीकच्या आरवलीगांवी राहून तेथील हक्कदार पाटीलकीचाही हक्क मिळविला. याप्रमाणें हें दळवी घराणें गेलेल्या ठिकाणी बरेंच पूज्यतेस पावलें. पुढें प्रसिद्ध मुत्सद्दी रामचंद्र मल्हार उर्फ रामचंद्रबाबा सुखठणकर यांनीं शिंद्यास माळवाप्रांताचे गादीवर बसविलें होते पण त्याचें वय अगदी लहान असल्यामुळें सर्व कारभार बाबाच पाहत होते. त्यावेळी रामचंद्रबाबांनी आपल्या मूळ आरवली गावांत राहणारे खात्रीचे व विश्वासू लोक आपल्या मदतीस आणिले. त्यांत भाऊमहाराजांच्या एका पूर्वजास शिंद्याची पहिली राजधानी जे ' उज्जनी ' शहर तेथें नेलें.

पानपतच्या रणसंग्रामांत मराठ्यांची जी अत्यंत मोठी हानि झाली, तींत शिंदेशाहीलाही बराच धक्का बसला राणोजीच्या मागून त्यांच्या गादीवर बसून व सरदार लोकांच्या वंशजांस जवळ करून धिम्मेपणानें राज्य चालविणारा शिंद्यांचा बलवान वंशज कोणी राहिला नाही यामुळें कांही काळपर्यंत गादीची अव्यवस्था झाली. महादजी शिंद्यांस गादी देण्याचे पेशव्यांच्या मनांत नव्हतें. अर्थात् शिंदेसरकारच्या सर्व सरदारलोकांचें मोठें दुर्दैव ओढवलें ! परंतु शिंदेशाईचे पुरे अभिमानी रांगणेकर राघोराम राजाध्यक्ष ऊर्फ राघोराम पागे व खंबीर रणशूर जिवबादादा बक्षी या उभयतांनी तीं राज्यसूत्रें आपल्या हातीं घेऊन हरप्रयत्नानें राणोजीचा मुलगा महादजी यासच गादीवर बसविलें. आणि ग्वाल्हेर ही शिंदेशाईची राजधानी करून व आपण तिचे मुकत्यार बनून पूर्वीपेक्षां शेंकडोपटीनें शिंद्यांचें वैभव वाढविलें. आणि साऱ्या हिंदुस्थानांत मराठ्यांचें सार्वभौमत्व गाजवून विजयीपणाचा मोठा झेंडा लाविला. ( पहा—पेशव्यांची बखर व म्यालेसन साहेबाचा इतिहास. )

तेव्हां इतर सर्व सरदारांबरोबर दळवी सरदाराचाही उदय झाला. त्यांना त्यांच्या कर्तबगारीबद्दल शिंदेसरकारांतून माळवाप्रांतीं दहा हजारांची आहागिरी मिळाली

होती. पुढे माळव्यांत इंग्रज लोकांस त्या इनाम गांवच्या जमिनींत फौज ठेवण्याची जरूर पडली तेव्हां इंग्रजांनीं ती सर्व इनामी जमीन दळवी सरदारांकडे विकत मागीतली. पण ही वडिलोपार्जित जाहागिरी विकणे म्हणजे मोठे अपमानास्पद होय असे समजून त्यांनीं इंग्रजांची मागणी कबूल केली नाहीं. तेव्हां एकदम सक्तीने आठ हजार रुपयांचे उत्पन्नाचे गांवावर इंग्रजांनीं आपल्या लष्करचा गोटा लावून सारी जमीन स्वाधीन करून घेतली. पुढें जसजशी शिंदेशाईचीं सूत्रे ढिली पडत जाऊन इंग्रजी साम्राज्य झाले तेव्हां या दळवीसरदारांनीं आपल्या जाहागिरी गांवाबद्दल इंग्रज सरकाराकडे दाद मागीतली; पण एकदा घेतलेली जमीन पुन: परत देण्यास इंग्रज सरकार थोडेंच तयार होते ! तात्पर्य त्यास दाद मिळाली नाहीं. हल्ली सदरहू जाहागिरीपैकीं दोन हजार रुपये उत्पन्नाचा एक गांव या घराण्याकडे चालत आहे.

या दळवी घराण्यात बळवंत रघुनाथराव दळवी; तसेंच आरवली येथें त्यांचा मुलगा रघुनाथ उर्फ राघोबा बळवंत दळवी; बागणी येथे दलपतराव दळवी; इत्यादी बेरच प्रसिद्ध, शहाणे व कर्ते पुरुष होऊन गेले. अगदी आलीकडे देखील आरवलीगांवी मागजी काशीबा उर्फ त्रिंबक नाना दळवी हे शहाणे पुरुष होऊन गेले. असो.

याप्रमाणें ह्या दळवी घराण्याचा पूर्वेतिहास आहे. प्रस्तुत चरित्रनायक भाऊमहाराज हे ह्याच सुप्रसिद्ध दळवी कुळातील होत. त्यांच्या वडिलांचे नांव लालासाहेब दळवी असें होतें. त्यांस भाऊमहाराजासुद्धा एकंदर चार मुलगे झाले. त्यांतून भाऊमहाराज हे दुसरे होत. दौलतराव शिंदे वारल्यानंतर दुसऱ्या वर्षी म्हणजे इ० स० १८२८ साली त्यांचे जन्म झाले. त्यांच्या बालपणातल्या गोष्टींसंबधानें विशेषशी काही माहिती उपलब्ध नाहीं तरी लहानपणापासूनच त्यांची वृत्ति अगदी विरक्त अशी होती. यामुळे त्यांचें विद्याभ्यासादि गोष्टींकडे मुळीच लक्ष्य नव्हते. इतकेंच नाहीं तर आपल्या बरोबरीच्या मुलांशी खेळावे, नाचावे, इ० गोष्टी देखील त्यांना मुळीच आवडत नसत. एखाद्या चिंताक्रांत माणसाप्रमाणे कोठें तरी एकलकोंड्यासारखें बसून राहावें " शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते " या भगवदुक्तीप्रमाणें चांगल्या सुखवस्तु घराण्यांत यांचें जन्म झालें होतें; परंतु त्यांच्यापासून घरातील मंडळींस काही उपयोग होण्याची आशा नव्हती. लालासाहेबासही आपल्या मुलाच्या विलक्षण स्वभावाविषयीं मोठेच कोडे पडलें व ते त्याला शाळेंत वगैरे पाठवून चांगले शहाणें करण्याची खटपट करूं लागले; पण हे जर

जन्मत:च शहाणे आहेत तर लालासाहेबांच्या खटपटीस यश कोठून येणार! आतां वडिलांच्या धाकासाठीं भाऊ शाळेंत जात, परंतु शाळेंत जाण्यापासून एकांतस्थितीची खोळंबलेली वेळ रात्रीच्या प्रहरीं तासाचेतास कोठें तरी एकटेच बसून भरून काढीत. विद्याभ्यासाकडे भाऊंचें लक्ष्य मुळींच नसे. शाळेंत पाठवितात तर जाऊन बसावें. या पलीकडे शाळेंत जाण्यापासून तादृश उपयोग नव्हता. शाळेंतून सुटले कीं थेट घरास यावें अथवा लहर लागली तर वाटेतच कोठेंतरी एकांत जागा पाहून तेथेंच बसावें. लालासाहेबांच्या घरीं वरचेवर चांगल्या विद्वान माणसांचे येणेंजाणें असे. कधीं कधीं त्यांनीं आपल्या या मुलाच्या स्थितिसंबंधानें त्यांच्याशीं विचार करावा. कोणी वैद्य भेटल्यास त्याला प्रकृति दाखवावी. त्याप्रमाणें त्यांनीं भाऊंचे तें वर्तन आणि ती मुद्रा पाहून हा कोणी तरी जन्मांतरींचा योगभ्रष्ट असावा, असा आपला अभिप्राय व्यक्त करावा.

पुढें जसजसे भाऊमहाराज मोठे होऊं लागले तसतसा त्यांचा हा क्रमही वाढूं लागला. ते हळूहळू जास्तच स्वच्छंद बनत चालले. कधीं कधीं कोणास नकळत रात्रीच्यावेळीं घरांतून बाहेर पडून आसपासच्या पहाडावर जात आणि तेथें स्वस्थ बसत. ऐन दुपारचेवेळीं भर उन्हांत किंवा मध्यरात्रीच्यावेळीं कडाक्याची थंडी पडली असतां तिची पर्वा न करितां ते पहाडावर जाऊन ध्यानस्थ बसत असत. जेवणखाण, वस्त्रप्रावरण वगैरेचें त्यांस मुळींच भान नसे. दोन दोन तीन तीन दिवस पर्यंत उपाशींच रहावें; कधीं कोणी कांहीं खायाला दिलें तर आनंदानें खावें. बरें नाहीं मिळालें म्हणून त्याबद्दल ते दु:खीही होत नसत; अशी त्यांची ही परमहंसवृत्ति पाहून लोकांसही मोठा आचंबा वाटूं लागला, आणि त्यांची ती यदृच्छालाभ संतुष्टतेची वृत्ति जाणून लोकही त्यांना खाण्याचे जिनस देऊं लागले. पुढें पुढें गांवांत फिरून भैक्ष्यवृत्तीवर चरितार्थ चालवूं लागले. यामुळें त्यांना घराचाही विसर पडत चालला. महिन्याचे महिने त्यांचे घरास पाऊल लागेनासें झालें, आणि ग्वाल्हेर शहराच्या आसपास असलेले पहाड हेंच त्यांचें अखंडसुखाचें वसतिस्थान होऊन राहिलें. कदाचित् चार पांच दिवसांत कांहींच खाण्यास वगैरे न मिळालें तर मात्र भाऊंची दृष्टी शहराकडे वळावयाची व एकदां पोटाची खळगी भरली कीं, पुन: पहाडाचा रस्ता सुधरावयाचा, अशी स्थिति चालली होती. घरच्या मंडळीनें त्यांना ताळ्यावर आणण्याची पुष्कळ खटपट केली परंतु आपपरभावच ज्याठिकाणीं मुरला व ब्रम्हज्ञानाविषयीं तीव्र मुमुक्षुत्व आंगीं बाणलें तेथें हे त्यांचें प्रयत्न कितीसे सफल

होणार! अर्थात् घरच्या मंडळीचा त्यांच्याविषयींचा आपलेपणाचा अभिमानही सुटत गेला, आणि यानंतर भाऊमहाराज स्वैरवृत्तीनें निवळ अरण्यवासी बनले. आतां तर पहाडावरील त्यांचा मुक्काम पंधरा पंधरा दिवसपर्यंत अगदीं ढळेनासा झाला. या त्यांच्या वृत्तीवरून पहाडांत राहणाऱ्या कोणातरी साधूची त्यांचेवर कृपा झाली असावी आणि त्यामुळेंच त्यांचेठिकाणीं ही औदासिन्यवृत्ति आली, असा बहुतेक लोकांचा समज झाला व तो अगदीं यथार्थ होता; कारण ग्वाल्हेर शहराच्या आसपास जे अनेक मोठमोठे पहाड आहेत त्यांमध्ये साधुसंतांची वस्ति असते अशी प्रसिद्धी आहे; तेव्हां कोणातरी साधुपुरुषाच्या कृपेवांचून अगदीं बालपणापासून तों ऐन तारुण्यदशेंत देखील प्रापंचिक सुखाविषयीं त्यांच्या वृत्तिमध्यें इतका भयंकर पालट होणें अशक्य आहे. असो.

तात्पर्य भाऊमहाराजाची वृत्ति यानंतर पूर्णपणे विदेहस्थितीची बनली. खाणेंपिणें कांहीं नसले तरी त्यांच्या सतेज चेहऱ्यात आणि भव्य आकृतींत पाहणाऱ्यास कांहीच अंतर दिसेनासे झाले. ते लाजभीड सोडून देऊन नग्नदिगंबर हिंडूं लागले! गांवांतील खोडकर आणि चावट मुलांनीं त्यांची नानाप्रकारें विटंबना केली, धोंडे मारले, धूळ फेकली किंवा त्याहूनही दुष्टपणाची कमाल करणाऱ्या खोडसाळ पोरांनी तर त्यांच्या अंगावर भलतेसलते घाणेरडे पदार्थ फेंकले अथवा थुंकले तरी देखील त्यांच्या चित्तवृत्तींत उद्वेग किंवा तिरस्कार मुळींच शिरेनासा झाला. मग कांहीं काळानें त्यांच्या मागचे हे द्वाड लोकांचे त्रास चुकले; कारण हें एकप्रकारचें बोलतेचालते खडक किंवा झाडच आहे तेव्हां त्यावर आपण कितीही धोंडे अथवा धूळ फेंकली तरी त्याला चीड किंवा संताप येणे शक्य नाहीं अशी त्यांची खात्री झाली. देहाभिमानच नष्ट झाल्यावर धोंडे काय, नरक काय, आणि पुष्पवृष्टि काय, सगळेंच सारखे! याप्रमाणें त्यांची ही वृत्ति लोकांच्या कसोटीस उतरल्यावर त्यांची भाऊमहाराजांच्या साधुपणावर निष्ठा बसत चालली. ती इतकी कीं, भाऊमहाराज निजानंदांत तल्लीन होऊन बसले किंवा उघडेबोडके हिंडूं लागले तरी त्यांच्या स्वच्छंदवृत्तीस लोकांकडून कोणत्याही रीतीची हरकत न येईल अशारीतीनें नम्रभावानें लोक त्यांशी वागूं लागले.

कधीं कधीं रस्त्यावरून जातांना हलवायाच्या दुकानांतून मालकास न विचारतां ते मिठाई उचलून खात असत; परंतु दुकानदार जर समंजस असला तर तो त्यांना प्रतिबंध करीत नसे; पण सगळेच असे सुविचारी कोठून असणार? कित्येक हलवाई

त्यांना दुकानांत हात घालण्याविषयीं प्रतिबंध करीत व आपणच एखादां बरफीचा तुकडा वगैरे देत असत. कांहीं तर त्यांना दुकानावरून हांकूनही लावीत. असा क्रम चालला असता कांहीं मिठाईवाल्याना असा अनुभव आला कीं, ज्यांच्या दुकानातून भाऊमहाराजांनीं स्वतः हातानीं वाटेल तितकी मिठाई उचलून खाल्ली तर त्याला रोजच्यापेक्षां फार चांगला फायदा व्हावा. पहिल्या पहिल्यानें ही गोष्ट कोणाच्याही लक्ष्यात आली नाहीं; पण पूर्ण अनुभवांतीं भाऊमहाराजाच्याच कृपेचें हे फळ होय असे जेव्हा त्याना कळलें तेव्हा 'समर्थ रामदासाच्या हातचा दगड सोनें बनतो!' म्हणून भिक्षुकलोक जसे सज्जनगडावर मोठमोठ धोंडे डोक्यावर घेऊन गेल्याची गोष्ट प्रसिद्ध आहे; त्याप्रमाणेच जो तो हलवाई भाऊमहाराजांनीं आपल्या दुकानात यावें, आपल्या मिठाईस शिवावें म्हणून त्यांची वाट पहात बसत असे! कितीएक तर 'आवो महाराज' म्हणून त्यास मुद्दाम बोलावीतही असत; परंतु अखेरीस तशा स्वहिततत्पर लोकाच्या मिठाईची हे साधुपुरुष इच्छाही करीतनासे झाले. त्याच्या समजुतीप्रमाणें त्यांनीं हातावर घातली, तर ती मनास आल्यास पटकन तोंडात टाकावी किंवा एकादवेळ जशीच्यातशीच त्याच्या दुकानात फेकून पुढे चालतें व्हावें. हलवायाना वाटे कीं, भाऊमहाराजाचा हस्तस्पर्श झाला म्हणजे मिठाईचा खप जास्त होतो; पण वास्तवीक प्रकार तसा नाहीं; कारण भाऊमहाराजांचा हात म्हणजे कामधेनु किंवा चिंतामणि नव्हता, तर शुद्ध अंतःकरणानें 'या साधुपुरुषानें खाल्लेली मिठाई परमेश्वरार्पण झाली' असे मानून जे हलवाई ती त्यास यथेच्छ खाऊ देत, अर्थात त्याच्या मनोवृत्तिनुसार परमेश्वरही '**ये यथा मां प्रपद्यन्ते तां स्तथैव भजाम्यहं**' या स्वतःच्या उक्तीच्या समर्थनार्थ त्यांचा फायदा करून देई. बाकी स्नानसंकल्प सांगणाऱ्या श्रद्धाळू ब्राम्हणांला समर्थांनी आपल्या हातानें उचलून दिलेला पाषाणाचा तुकडा सुवर्ण बनला म्हणून बाकीच्या भिक्षकानीं समर्थांचा हस्तस्पर्श करून घरात आणून ठेवलेले मोठमोठे धोंडे जेंव्ह दगडच राहिले, तसे भाऊमहाराजाच्या हातावर दोन बर्फीचे तुकडे ठेवून त्यातील एक त्यांनीं तोंडात टाकल्यावर दुसरा त्याच्या हातातून घेऊन आपल्या दुकानात ठेवणाऱ्या हलवायास त्यापासून कांहीं फायदा झाला नसला, तर त्यात कांहीं नवल नाहीं. असो.

पुढे ही भाऊमहाराजांची कीर्ता श्रीमन्महाराज जयाजीराव शिंदे याच्या कानापर्यंत गेली आणि त्यांची या सिद्ध पुरुषावर बरीच भक्ति जडली. एकदां असा प्रकार

झाला की, श्रीमंत जयाजीराव महाराजसरकारची स्वारी मोठ्या पहांटेस उठून फौजेची परेड घेण्यासाठीं लष्करांत जात होती. ते ऐन हिंवाळ्यांचे दिवस असल्यामुळे थंडी मी म्हणत होती तशांत उत्तर हिंदुस्थानच्या थंडीचा ज्यांना अनुभव असेल त्यांना ग्वाल्हेरच्या थंडीचें मान निराळें सांगावयास नको. रूदार अंगरखे, दुलया, बनाती, शाली, घोंगड्या वगैरे थंडीच्या निवारणार्थ भरपूर कपडे असले तरी कडाक्याची थंडी पडली म्हणजे म्हातारेकोतारे व अशक्त लोक त्या थंडीस बळी देखील पडतात. बहुतेक घरें पाषाणमय असल्यामुळें शेगडी पेटवून उबारा आणावा लागतो. ज्यास केवळ थंडीचे आगरही म्हटल्यास चालेल. तेव्हां अशा त्या भयंकर थंडीत भाऊमहाराजांची स्वारी निजानंदीं तल्लीन होऊन रस्त्याच्या एका बाजूला पाषाणी फरसबंदीवर हुडहुडत पडली होती. त्यांचा तो थंडीमुळे आंकडून निघणारा हूं हूं ध्वनी शेंकडो घोडेस्वारांच्या टापांच्या दणक्यांतून देखील स्पष्ट ऐकू येत होता. सरकारस्वारीच्या कानी हा शब्द पडतांच ‘ हा कोणाचा शब्द असावा ’ याची चौकशी करण्याकरितां स्वारी खडी झाली. आणि शिपायामार्फत शोध करितां अजगरवृत्ति धारण करून पडलेले भाऊमहाराज थंडीनें कांकडत असल्याचे कळलें. अगोदरच भाऊमहाराजांच्या लीला महाराज सरकारच्या कानी गेल्या होत्या. त्यांचें नांव कळतांच महाराजांनीं गाडी जवळ नेववून भाऊमहाराजांची ती स्थिति स्वतः पाहिली. जयाजीरावमहाराज हे जात्याच साधुसंतांच्या सेवेबद्दल, सस्पृह आणि औदार्यसंपन्न मनुष्यपारखी होते. त्यांनी भाऊमहाराजांची ऐकूं येणारी कीर्ति कसास लावून पाहण्याची आयती आलेली संधी फुकट जाऊं दिली नाहीं. आणि त्यांनीं आपल्या सरदारास एक उत्तम शालजोडी साधुमहाराजांच्या अंगावर घालण्यास हुकूम केला. त्याप्रमाणे एका सरदारानें एक चागली शाल भाऊमहाराजांच्या अंगावर घातली. प्रत्यक्ष शिंदेसरकारची स्वारी मोठ्या परिवारासह समोर उभी होती तरी ब्रम्हानंदीं निमग्न झालेल्या भाऊमहाराजांच्या वृत्तींत थोडासुद्धा फरक पडला नाहीं. पण जेव्हां शालजोडी अंगावर पडली त्याबरोबर डोकें वर करून पाहिले आणि हे सगळें दृश्य जगच ज्यांना तुच्छ वाटले. त्यांना त्यांतील क्षणिक मायारूपी थंडीची मातब्बरी तरी कोठून वाटणार ? लगेच त्यांनीं ती आपल्या अंगावरील शाल तेथें जवळच थंडीनें कुडकुडत असलेल्या एका भिकाऱ्याच्या अंगावर फेकून दिली ! साधुमहाराजांची ही कृति पाहून जयाजीरावमहाराज किंचित वरमल्यासारखे झाले. त्यांना वाटलें कीं, सत्पुरुषाचा आपल्या हातून उपमर्द झाला. कारण, स्वतःच्या अंगावरची बहुमोल

शालजोडी न देतां दुसऱ्याच्या अंगावरची अल्पमोलाची शाल अंगावर घालविली यामुळें त्यांना कदाचित् विषाद वाटला असेल; किंवा माझी क्षुद्र दृष्टि त्यांच्या लक्ष्यांत आली असेल; म्हणून महाराजसरकारांनीं तत्काळ आपल्या अंगावरील भरजरी बहुमोल शालजोडी पुन: भाऊमहाराजांच्या अंगावर घालविली! तरी देखील सगळ्या जगांत एक ईश्वरी चैतन्यावांचून दुसरी बहुमोल वस्तूच ज्यांना लक्ष्य नाहीं त्यांना त्या शालजोडीची कितीशी किंमत वाटणार! तेव्हां भाऊमहाराजांनीं त्याही शालीची कथा वरीलप्रमाणेंच केली. मग मात्र जयाजीरावमहाराजांचा संदेह फिटला; आणि ते त्यांच्या निःस्सीम वैराग्यवृत्तीविषयीं निःसंदेह होऊन लोकोपचारापुरतें त्यांच्या विक्षिप्तपणाबद्दल किंचित् हंसून पुढें चालते झाले.

त्या दिवसापासून शिंदे सरकारची निष्ठा या साधुपुरुषावर विशेष जडली; व ते इतके दिवसपर्यंत त्यांच्या ज्या लीला ऐकत, त्याविषयीं त्यांची पूर्णपणें खात्री झाली; शिंदे सरकारची राणी सौभाग्यवती चिमणाबाईसाहेब यांची तर भक्ति यापूर्वीच भाऊमहाराजांवर जडली होती प्रतिदिवशीं त्यांचेकडून पंचपक्वान्नांनीं भरलेलें ताट साधुमहाराजाकडे जात असे. परंतु त्यांतील जिन्नस एक दिवस तरी त्यांनी स्वसंतोषानें सेवन केले, असें त्यांना ऐकावयास मिळालें नाहीं. ते सुग्रास अन्न कुत्र्या-कावळ्याकडून खावबून त्यांच्याबरोबरच तें विसकटलेलें अन्न भाऊमहाराज मोठ्या संतोषानें हंसत हंसत खात असत. एखाद्या दिवशीं ते उठून चालते झाल्यावर भिकाऱ्यांनीं तें अन्न घेऊन जावें; असा क्रम चालला होता तरी त्या सुशील साध्वी महाराणीनें ताट पाठविण्याचें सोडलें नाहीं. पण कर्मधर्म संयोगानें असा एक सुदीन उगवला कीं, त्यादिवशीं साधुमहाराजांनीं ताटांतील तें सुग्रास अन्न मोठ्या संतुष्ट चित्तवृत्तीनें निःशेष भक्षण केल्याचें चिमणाबाईसाहेबांस नोकरांकडून समजलें. त्याबरोबर बाईंना मोठा संतोष झाला; व त्यांनीं तीच शकून गांठ बांधून ठेविली.

हिंदु मुसलमानांतील भाविक स्त्रीपुरुष आपआपल्या समजुतीप्रमाणें त्यांस नवसही करीत असत; व त्यांचे इच्छित मनोरथ पूर्ण झाले म्हणजे ते नवस फेडण्याकरितां भाऊमहाराज असतील त्याठिकाणीं भक्तिभावानें जात असत. याप्रमाणें दिवसेंदिवस भाऊमहाराजांपाशीं बरीच गर्दी होऊं लागली. परंतु रात्रंदिवस एकांतवास आवडणाऱ्यांस हा मनुष्यसहवास कसा रुचणार! तेव्हां कधीं कधीं त्यांनीं बसलेल्या ठिकाणीच अचानक नाहींसें व्हावें, आणि भलत्याच ठिकाणीं अकस्मात् दृग्गोचर व्हावें. 'गांव तेथें म्हारवाडा' अशी एक ग्राम्य म्हण व्यवहारांत नेहमी आढळते,

तदनुसार कांहीं सुष्ट लोक ज्याप्रमाणें भाऊमहाराजांच्या भजनी लागले होते त्याप्रमाणें क्वचित् दुष्टलोकही त्याच्या साधुत्वाची परीक्षा पाहण्यास चुकत नव्हते. कोणी मिरचीची पूड त्यास चारवीत, तर कोणी गोमूत्र; आणि कोणी तर नुसतें त्यास मिठाचें पाणीही पाजीत. कोणी त्याच्या अंगास कांटे बोचावे तर कोणी खडेच मारावें. पण महाराजास त्यापासून काय होणार! सर्वच सारखे!! यामुळे ती मिरचीची पूड अथवा मिठाचे पाणी, पिण्यास ते यत्किंचितही कचरत नसत. तथापि तें देणाऱ्याच्या अंगाची मात्र अगदी आग होत असे यांप्रकारचे भाऊमहाराजांच्या साधुत्वाचे प्रत्यय शहरांतील लोक गाऊ लागले कित्येक लोक अगदी नियमानें भाऊमहाराज असतील तेथें आठवड्यातून एकदा किंवा दोनदा दर्शनाकरिता जात असत आणि कित्येक तर हमेश त्यांचे दर्शन घेत असत. थंडीच्या दिवसांत भाऊमहाराजास उघडे पाहून त्यांच्या अंगावर धोत्रें, रजया, सकलादी वगैरे घालाव्या. खुद्द राणीसरकारांनी तर अनेकवेळा त्यांच्या अंगावर शालजोड्या घातल्या. पण भाऊमहाराज त्या मायापाशांत बद्ध न होता जागच्याजागींच त्या सोडून देऊन पुढे चालते होत असत. शेवटी तर ते लोकांच्या रहदारीस कंटाळून शहरापासून बऱ्याच अंतरावर निंबाजीच्या बागाजवळ असलेल्या एका पहाडावर निवांत जाऊन बसले. त्यानंतर ते फारकरून शहरांत मुळीच येईनासे झाले; व त्यामुळे त्यांच्यामागची लोकांची कटकटही बरीच कमी झाली.

त्यावेळीं जयाजीमहाराजास पुत्रसंतान नव्हतें. चिमणाबाईस त्या गोष्टीची अतिशय चिंता लागून राहिली होती साधारण स्थितींतील माणसें देखील संततीसाठीं एखाद्या नवसास पावणाऱ्या कोणत्याही सेंदूर माखलेल्या दगडाधोंड्याला नवस करितात तर एवढ्या मोठ्या राजघराण्यात संततीलाभासाठीं किती देवाला नवस झाले असतील हें निराळे सांगावयास नको; तेव्हां भाऊमहाराजही नवसास पावतात अशाविषयीं गावांतील त्यांच्या लीला ऐकून राणीसाहेबांनीं या साधुपुरुषास कधींच नवस करून ठेविला होता. वर सांगितल्याप्रमाणें भाऊमहाराजांनीं प्रसन्नचित्तानें अन्न खाल्ल्याचें ऐकल्यावर चिमणाबाईनी सरकारस्वारीस भाऊमहाराजांच्या दर्शनास जाण्याविषयी प्रार्थना केली. जयाजीरावमहाराजही साधुमताच्या दर्शनाविषयी अत्यंत उत्सुक असत. ते कधीं कधीं सड्या स्वारीनें या साधूच्या दर्शनास जात होतेच; तथापि राणीसाहेबांच्या आग्रहावरून त्या दिवशीं सरकारस्वारी भाऊमहाराज होते त्याठिकाणीं पायींच गेली आणि दर्शन घेऊन मोठ्या नम्रतेने आपणास पुत्रप्राप्ति

व्हावी म्हणून त्यांनी त्यांची प्रार्थना केली; परंतु त्यांच्या प्रार्थनेप्रमाणें भाऊमहाराजांनीं आशीर्वाद वगैरे कांहींच दिला नाहीं. मात्र राजाच्या प्रार्थनेनें प्राप्त झालेला संतोष त्यांनीं हास्यरूपानें व्यक्त केला. तेव्हां सरकारस्वारीही साधुसंतोष हेंच आपल्या भावीमनोरथपूर्णतेचें दृश्य फल होय असें समजून तेथून निघून गेली. पुढें लवकरच जयाजीमहाराजांस त्यांच्या इच्छेप्रमाणें पुत्रप्राप्ति झाली. तेच हे हल्लीं गादीवर विद्यमान असलेले **श्रीमन्माधवरावमहाराज** होत. हें पुत्ररत्न भाऊमहाराजांच्या कृपेचें फळ होय अशी जयाजीरावमहाराजांची खात्री झाली आणि त्यांची या साधूंच्या चरणीं अत्यंत तीव्र भक्ति जडली व नित्य साधुमहाराजांस पूजेचें साहित्य, तीन रुपये किंमतीचें पंचपक्वान्नांनीं भरलेलें ताट, पाणी वगैरे सरकारांतून पहाडावर पोंचविण्याची व्यवस्था केली आणि त्याबद्दल दरमहा शंभर रुपयांची नेमणूक ठरवून दिली.

या निंबाजीचे पहाडावर भाऊमहाराज सतत ३५ वर्षे होते; तोंपर्यंत सरकारांतून नेमणुकीप्रमाणें व्यवस्था चालली होती. पहाडावर शेकडो स्त्रीपुरुषांची दिवसभर गर्दी असे. विधर्मी मुसलमानलोक देखील साधूंच्या दर्शनास जात व नवसही करीत. तदनुरूप त्यांच्या त्यांच्या निष्ठेप्रमाणें त्यांचे मनोरथही पूर्ण होत असत. मोठमोठे कामदार, सरदार, नोकरलोक यांच्या दर्शनास जात. फार तर काय पण अलीकडील इंग्रजी शिक्षणापासून देवधर्म सर्व झूट समजणारे विचारवान् लोक देखील त्यांच्या दर्शनास जात, आणि त्यांच्या साधुत्वाची ओळख पटल्यावर समाधान पावत. रात्रीच्यावेळीं मात्र त्या पहाडावर कोणी रहात नसे. कदाचित् निग्रहानें कोणी राहिल्यास त्यांच्या अंगावर दगडांची वृष्टि होई असें सांगतात. दिवसभर लोकांच्या वरदळीमुळें त्यांच्या समाधिसुखास व्यत्यय येत असे, यासाठीं ते रात्रीच्यावेळीं समाधी लावून बसत असत. अर्थात् त्यावेळीं तेथें कोणी गेल्यास त्यांच्या तपःसिद्धीमुळें हा प्रकार घडून येत असावा, असा बहुतेकांचा तर्क आहे. कोणी म्हणतात त्या पहाडावर अदृश्यत्वानें वास करणाऱ्या साधुसंतांचा रात्रीच्यावेळीं त्यांच्याशीं एकांत होत असे; तेव्हां त्यास हरकत येईल म्हणून त्या सज्जनवृंदाच्या तपःसामर्थ्यानें हा चमत्कार दाखवून लोकांस दूर करावें. तें कांहींही असो; परंतु वरील गोष्टीचा पूर्ण पिच्छा पुरविण्याकरितां कांहीं दुराग्रही मंडळींनीं साधुमहाराजच आपली प्रसिद्धी होण्याकरितां हीं ढोंगें करितात, असा अंदेशा घेऊन प्रत्यय पाहण्यासाठीं त्यांच्या अगदीं सन्निध बसण्याचा दृढ निश्चय केला, आणि तेथें गेल्यावर वरील-

प्रमाणें अनुभव येतांच सुरक्षितपणें पळून येतांना त्यांची पुरेवाट झाली. असा कांहीं मंडळींवर प्रसंग आल्याचा अनुभविक पुरावा आहे.

याप्रमाणें भाऊमहाराजांची शिंद्यांच्या राज्यांत ग्वाल्हेर येथें ७० वर्षें पावेतों अखंड लीला चालली होती. नंतर तारीख ४ मे सन १८९८; वैशाखशुद्ध १३ दशी बुधवार रोजीं ते नित्यक्रमाप्रमाणें सरकारांतून आलेल्या ताटाचें सेवन करून बसले होते. इतक्यांत सुमारें पांचदहा मिनिटांनीं त्यांस वांति झाली. त्याबरोबर आपल्या देहावसानाची वेळा जवळ आली असें जाणून मोठ्या समाधानवृत्तीनें ते पद्मासन घालून एकाग्र चित्तानें समाधी लावून बसले आणि अशारीतीनें निजानंदरत झालेली ही साधुमूर्ति दोनप्रहरीं बारावर एक वाजण्याचे सुमारास या अशाश्वत मर्त्यलोकाची यात्रा पूर्ण करून शाश्वत अशा ब्रम्हस्वरूपांत लीन झाली ! पुढें हा हा म्हणतां भाऊमहाराजांच्या अखेर समाधिस्थितीची बातमी शहरांत प्रसृत झाली. जो तो भाऊमहाराजांच्या मर्त्यतनूचें शेवटचें दर्शन घेण्याकरिता पहाडाकडे धांवत सुटला. सरकारांत ही बातमी समजतांच विद्यमान राजे **अलिजाबहादर श्रीमन्माधवराव महाराज** यांनीं रोख १०० रुपये, महावस्त्रें इत्यादि साहित्य देऊन कारकून, हुजरे, शिपाई वगैरे मंडळी पहाडावर रवाना करून दिली. त्याचप्रमाणें सरकारचे मानकरी व सरदार, श्रीमंत, देशमुख, शितोळे, जाधव, पाटणकर, घोरपडे, आंग्रे इत्यादिकांनींहीं शालजोड्या पाठवून दिल्या. महाराज सरकारच्या मातुश्रींनीं पीतांबर, शालजोडी वगैरे साहित्य पाठवून समाधीची तयारी करविली, आणि समाधी होईतोंच स्वार पाठवून वर्दी देण्याचा हुकूम केला.

भाऊमहाराजांची ही शेवटची सेवा संपादन करण्याकरितां त्याठिकाणीं जमलेल्या शेकडो मंडळींनीं महाराजांच्या त्या पांचभौतिक देहाची षोडशोपचार पूजा करून सुगंध द्रव्यानुलिप्त अशा त्या सत्पुरुषाच्या भव्य मूर्तिस यथाविधी समाधी दिली. मंडळी इतकी जमली होती कीं, ' श्रीभाऊमहाराजकी जय ' असा ध्वनि त्याठिकाणीं सारखा एक तासभर निघत होता, त्यायोगानें सारा पहाड दुमदुमत होता. सर्व कृत्य रात्रीं तीन वाजेपर्यंत आटपून मंडळी आपआपल्या घरीं गेली.

तात्पर्य, प्रस्तुत चरित्रापासून आपण इतकाच बोध घेतला पाहिजे कीं, कोणत्याही गोष्टीपासून स्वतःचा फायदा झाला नाहीं म्हणून ती गोष्ट निरुपयोगी होत नाहीं. व फायदा झाला म्हणून ती उपयोगीही म्हणतां येणार नाहीं. भाऊमहाराजांनीं मिठाई खाल्ली म्हणजे चांगला नफा होतो अशी ज्या ज्या हलवायांची समजूत होऊन ते

त्यांना मुद्दाम मिठाई खाऊ घालीत, परंतु त्यापासून त्यांची इष्टसिद्धि होत नव्हती आणि आपल्यास फायदा व्हावा अशी इच्छा न करितांही भाऊमहाराजांनीं स्वइच्छेनुरूप ज्या ज्या हलवायांकडील मिठाई हात घालून खाल्ली त्यांना अचूक फायदा व्हावा. यामुळें उभयतांच्या दृष्टीनें भाऊमहाराज कोणत्या कोटींत गणल जातील याचा वाचकांनींच विचार करावा! एकंदरीत उपयोग किंवा फायदा यांचा संबंध कोणत्याही गोष्टीकडे नसून स्वतःच्या वृत्तीकडे आहे आणि हाच धडा भाऊमहाराजांच्या चरित्रापासून आपण घेतला पाहिजे.

# कृष्ण जगन्नाथभट्टजी बांदकर.

" जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत ।
जो शाश्वत आणि अशांश्वत । निवाडा करी ॥
चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतर्भाव ।
तोचि जाणिजे महानुभाव । संत साधु ॥ "

समर्थ रामदास.

भक्ति, ज्ञान व कर्म किंवा आचार यांपैकीं कोणत्यातरी एका मार्गाकडे सामान्य-जनाची प्रवृत्ति निरनिराळ्या काळीं शिथिल होत जाते; असा सृष्टिनियम आहे. आणि ज्याकाळीं जेथें ज्या मार्गाचें संशोधन व उत्कर्ष होण्याची आवश्यकता अधिक दिसून येते त्याकाळीं तो दयाघन भगवान तेथें त्या मार्गाचें अवलंबन स्वतः करून आपल्या प्रबोधशक्तीनें व आचरणानें इतरांकरवींही करविण्याजोगें पूर्वार्जित तपः-सामर्थ्य ज्याचें अंगीं असते अशीच लोकोत्तर विभूति निर्माण करितो. हा अनादि-कालीन सिद्धांत सर्वांच्या परिचयांतला आहे. यास अनुसरूनच साधुसंतांचा अवतार वेळोवेळीं या भूतलावर झालेला आहे. व होत आहे. त्याचपैकीं प्रस्तुतचरित्रनायक कृष्णभट्टजीमहाराज हे एक होत. त्यांचें जीवनवृत्त थोडक्यांत आम्हीं येथें सादर करितो. " **यद्यद्विभूति मत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छत्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥** " या भगवदुक्तीप्रमाणें पुरुषाच्या अंगीं कांहींतरी तशाच प्रकारचा ईश्वरी तेजांश असल्यावांचून त्याचीं चरित्ररूपानें अक्षय्य स्मारकें होणार नाहींत हें उघड आहे.

गोवें प्रांताची राजधानी जें पणजी शहर तेथून आग्नेयदिशेस सुमारें तीन चार कोसांचे अंतरावर डोंगरी नांवाचा एक लहानसा गांव आहे मध्यभागीं डोंगर असून सभोंवतीं सर्व घरें असल्यामुळें त्यास 'डोंगरी' असें अभिधान प्राप्त झालें आहे. ह्या डोंगरी गावांत जगन्नाथभट्टजी नामक एक वैष्णव संप्रदायी कर्मनिष्ठ सत्वशील वैदीक ब्राम्हण राहत असत. तत्कालीन इतर वैदिकांप्रमाणें ते केवळ बहिरग पूजेअर्चेंतच इतिकर्तव्यता मानणारे नव्हते. ते श्रीपांडुरंगाचे तीव्र उपासक होते. त्यांस अल्पस्वल्प साक्षात्कारही असल्याचें कांहींजणास माहीत होतें. त्यांच्या सौभाग्यवतीचें नांव नर-साई असें होतें. तिच्या उदरीं शके १७६६ क्रोधी संवत्सर आषाढशुद्ध ११ दशीच्या महापर्वणीस कृष्णंभट्टजीचें जन्म झालें. त्यांच्या घरची स्थिति फार गरिबीची होती.



कवी कृष्णंभट्ट बांदकर.

तरी अतीतअभ्यागताचा आदरसत्कार त्यांच्या घरीं मोठ्या प्रेमानें होत असे. इतकेंच नाहीं तर आपल्या घरीं भजन, पूजन, कीर्तन, संतर्पण वगैरे नेहमी होत असावें अशी जगन्नाथभटजींची फार प्रबळ वासना होती. त्याप्रमाणें ती पूर्ण करण्यासाठींच कीं काय हा महाभाग पुत्र त्यांचे उदरी श्रीकृष्ण नांवानें जन्मास आला! जगन्नाथभट्टजी सहकुटुंब त्रिपतीच्या यात्रेस गेले असतां तेथेंच त्यांचा अंत झाला. त्यावेळीं कृष्णंभट्टजीचें वय अवघें सवा वर्षाचें होतें. अशा कुमारावस्थेंत त्यांस पित्याबरोबर अनायासें त्रिपतीची यात्रा घडली यावरून त्यांचें पुण्यतर देहप्रारब्ध दिसून येते. पित्याचे मागें त्यांचें लालनपालन मुकुंदभट्टजी नामक त्यांच्या चुलत्यानें केलें. "प्रसाद चिन्हानि पुर: फलानि" म्हणजे 'मुलाचे पाय पाळण्यातच दिसूं लागतात' या म्हणीप्रमाणें कुमारावस्थेंत सुद्धां कृष्णंभट्टजीस इतर मुलांप्रमाणें सामान्य खेळ आवडत नसत. त्यांचा मुख्य आवडता खेळ म्हटला म्हणजे नारळीच्या पिड्यास लहान काड्यांच्या खुंट्या करून व काथ्याच्या दोऱ्या (तारा) लावून तो लहानसा त्रिणा कल्पून खांद्यावर टाकावा, आणि लाकडाचे अगर दगडाचे तुकडे कधीं कधीं खरोखरीचेच टाळ घेऊन ते इतर सोबत्यांकडे वाजविण्यास द्यावे आणि अशारीतीनें त्यांनी भजन-कीर्तनाची मौज करीत असावें. केव्हां केव्हां चौरंगावर फाटके तुटके कागद ठेवून बोबड्या भाषेनें पुराण सांगण्याचीही ते नक्कल करीत असत. त्यांचें स्वरूप फार मोहक असल्यामुळें गावांतील लोक कांहीं खाऊ वगैरे देण्याची लालूच दाखवून त्यांस आपल्या घरीं घेऊन जात, आणि चुलत्यानें शिकविलेले श्लोक, अभंग, पदें वगैरे म्हणवून घेत. त्यांचा आवाज इतका गोड होता कीं, ते एखादें पद प्रेमळ अंतःकरणानें म्हणूं लागले म्हणजे श्रोते मंडळी तल्लीन होत. आतां हयात असलेले त्यावेळचे लोक असें सांगतात कीं, एखादेवेळीं घरांतील मंडळी जेवण्याच्यावेळीं शेजारच्या घरांतून दहीं ताक वगैरे मागून आणण्यास त्यांना पाठवीत व ते गेलेसें पाहून मंडळी जेवायास बसे. इकडे यांचे जेवण संपत आलें तरी त्यांच्या दहींताकास ठिकाण नाहीं! मग मंडळींनीं जेवण सारून त्यांचा तपास करावा तर त्यांची स्वारी एका हातांत दह्यांचें भांडे घेऊन व दुसऱ्या हातानें हावभाव करीत पदें म्हणण्यांत दंग झालेली आढळे!! अमुक कामासाठीं आपण आलों याची त्यांस स्वतः कधींच स्मृति होत नसे. इतकी त्यांची लहानपणापासून भगवद्भजनीं एकतानता होती. अशा या त्यांच्या भगवद्भजनीं रंगलेल्या वृत्तींत पद्धतशीर विद्याभ्यासाचा योग मात्र त्यांस कधींच जमून आला नाहीं व तो येणेंही शक्य नव्हतें. कारण बालबोध चारदोन

पुस्तकेंही शिकण्याची तेथें सोय नव्हती. योग्यकाळीं विधीयुक्त मौंजीबंधन झाल्यावर वैदिकीवृत्तीस अनुकूल असे संहिता, प्रयोग वगैरे मात्र त्यांस पढविण्यांत आले होते. बाकी संस्कृत भाषेचा अभ्यासही साधारणच होता. म्हणजे रघुवंश काव्यापैकीं दुसऱ्या सर्गांतील अवघे चौदा श्लोक म्हटलेले!! पण त्यांची इतकी तैलबुद्धि होती कीं, पुढें पुढें जरा वयांत येतांच गीता, अध्यात्मरामायण, भागवत इत्यादि ग्रंथांशीं त्यांनीं स्वतः फार चांगला परिचय करून घेतला. संस्कृत भाषेची त्यांना मनापासून आवड होती म्हणून वरील ग्रंथांचीं पारायणें ते मोठ्या प्रेमानें करीत असत. थोड्याच दिवसांत त्या ग्रंथांतील केवळ शब्दार्थच नव्हे तर महत्वाचें निरूपणही ते इतर पृच्छकांस सांगूं लागले. शब्दार्थ असो किंवा भावार्थ असो, त्याच्या दृढाभ्यासानें तो लवकर कळूं लागतो. " Read desiring to know and you will understand. " असें एका अमेरिकन विदुषीचें म्हणणे आहे. त्यांतील आशयही हाच होय.

कृष्णंभटजी चांगले वयांत येईपर्यंत त्यांना प्रपंचांतील दगदग अशी मुळींच जाणवली नाहीं; परंतु जेव्हां त्यांचे चुलते मुकुंदभटजी कालाधीन झाले तेव्हां मात्र त्यांना भिक्षुकीवृत्तीनें आणि लोकांची मनधरणी करून चरितार्थ चालविणें फार कंटाळवाणें व जड वाटूं लागलें. त्यांची पत्नीही सुस्वभावी, शांत, प्रेमळ, विचारशील इत्यादि गुणांनीं मंडीत अशी साध्वी होती; यामुळें त्यांना प्रपंचांतील उद्वेगजनक स्थितीचा कडू अनुभव केव्हांही येण्यास मार्ग नव्हता. पुढें कृष्णंभटजींनीं आपला आवडता भगवद्भजनाचा व्यवसाय अव्याहत चालण्याकरितां कांहीं पाठांतर करून स्वतःच्या बुद्धिबलावर प्रसिद्धपणें ते देवस्थानांत कीर्तनें करूं लागले; पण द्रव्यार्जनाकरितां त्यांनीं केव्हांही कीर्तन केलें नाहीं व त्या कामासाठीं त्यांनीं कोणापाशीं याचनाही केली नाहीं. एकदां पुणेकर उपनांवाचे कोणी हरिदास गोवेंप्रांतीं आले होते. पुष्कळ ठिकाणीं देवस्थानांत वगैरे त्यांचीं कीर्तनें झालीं. कृष्णंभटजी स्वभावतः नक्कल करण्यांत फार प्रवीण होते, कोणतेंही भाषण, गायन वगैरे हुबेहुब वठविण्यांत त्यांचा हातखंडा असे. पुणेकरांचीं दोनचार कीर्तनें ऐकतांच अगदीं त्यांचेचप्रमाणें हावभाव करून इतर कांहीं ठिकाणीं हे कथा करूं लागले आणि त्याबद्दल रसीकलोकांनीं त्यांची वाहवा केली; पण कांहीं परोत्कर्षासहिष्णुमंडळींनीं पुणेकरबुवांना चिथवून 'तुमची थट्टा अमुक अमुक भटूरडा करितो, यासाठीं त्याचा यथेष्ट समाचार घ्यावा' म्हणून अनेकदां सुचविलें. या कुटिल दुर्ज-

नांस असें वाटलें होतें कीं, बोवा आतां कांहीं तरी गरल भट्टजीमहाराजांवर घालतील व आम्हांसही आयती मौज पाहण्यास मिळेल; परंतु तें सर्व त्यांचें मनांतलें मनांत राहिलें. आपलें अनुकरण भट्टजीमहाराज करितात असें ऐकल्याबरोबर पुणेकरांस फार आनंद झाला व ते म्हणाले शाबास! धन्य आहे त्याची. असें जर तो माझें अनुकरण करितो तर तो माझा आवडता शिष्यच आहे असें मी समजतों. हे पुणेकरबुवांचे शब्द ऐकून ते कुटीललोक ओशाळे होऊन घरीं गेले. त्यानंतर पुणेकरबुवा भट्टजीमहाराजांस स्वतः भेटून ते त्यांचें कीर्तन ऐकून परम आनंद पावले आणि 'माझ्या अनुकरणांत तुझा शुद्ध हेतु ओळखून या तुझ्या अनुपम चातुर्याबद्दल मला फार आनंद झाला आहे. कोणाच्याही कुचेष्टेस न जुमानतां निर्भयपणें तूं अशीच कथा करीत जा! कीर्तनांत तुझी बरोबरी कोणीही करूं शकणार नाहीं.' असें ते म्हणाले. हें बुवांचें भाषण ऐकून भट्टजींसही मोठें कौतुक वाटलें असेल यांत नवल नाहीं? यावेळीं त्यांचें वय सतरा अठरा वर्षांचें होतें. सारांश, **"ज्याचा सखा हरी त्यावरी विश्व कृपा करी"** हेंच खरें.

अशारीतीनें कृष्णंभट्टजी आनंदानें कालक्रमणा करीत असतां घरचा प्रपंच वाढूं लागला आणि दिवसेंदिवस मुलाबाळांची व येणाऱ्या जाणाऱ्या अतीतअभ्यागतांची जोपासना त्यांच्या मनाप्रमाणें होईनाशी झाली; कारण मिळकत थोडी खर्च फार. अशा स्थितींत **"संसारदुःखें दुखावला। त्रिविधतापें पोळला। तोचि एक अधिकारी झाला। परमार्थासी॥"** या समर्थांच्या अनुभवसिद्ध उक्तीप्रमाणें त्यांचें चित्त संसारसुखास विटलें व परमार्थलाभाविषयीं त्यांस इच्छा उत्पन्न झाली; पण गुरूवांचून परमार्थाचा लाभ कसा मिळणार ही विवंचना त्यांस पडली, आणि तदनुरूप ते गुरूच्या शोधांत राहिले. एकदां ते बांदिवडें गांवांत मणपे नामक एक गृहस्थ त्यांचे स्नेही होते, त्यांकडे कांहीं कामानिमित्त गेले होते. त्यावेळीं मणपे हे पंडितांचा 'यथार्थदीपिका' ग्रंथ वाचीत बसले होते. **"तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः"** या श्लोकाच्या टीकेवर त्यांचें प्रवचन चाललें असतांना मध्यंतरीं **"जरी व्हावा तुज देव। तरी हा सुलभ उपाव॥ करी मस्तक ठेंगणा। लागे संतांच्या चरणा॥"** अशी साधूक्ती त्यांच्या मुखांतून निघालेली भट्टजींच्या कर्णरंध्रांत दुमदुमली व लगेंच त्यांतला भाव जाणून 'असे संत हल्लीं कोठें असतील काय?' म्हणून त्यांनीं मणपेस प्रश्न केला; तेव्हां 'शोधणाऱ्यास पुष्कळ आहेत'

असें ते म्हणाले. त्याबरोबर भट्टजींनीं त्यांचेच पाय धरिले व अनुग्रहार्थ करुणा भाकिली; पण त्यांची बुद्धिमत्ता व तीव्र मुमुक्षुत्व ओळखून हें धेंड आपणाकडे उपयोगीं नाहीं असा विचार करून त्यांनीं विष्णुबोवा सोमण नामक वेंगुर्ल्यांत राहणाऱ्या एका थोर साधुपुरुषाकडे जाण्यास त्यांस सांगितलें; तेव्हां 'हिरवें शोधणाऱ्यास भाजलेलें मिळावें' त्याप्रमाणें कृष्णंभट्टजी लगेंच घरीं आले, आणि पत्नी प्रसूत होऊन नुकतेच दोन तीन दिवस झाले होते, घरांत मूठभर दाणे किंवा एक छदामही नव्हता; पण त्याची यत्किंचित्‌ही काळजी न करितां त्यांनीं एकदम वेंगुर्ल्यास जाण्याचा निश्चय केला व शके १७९१ शुक्लसंवत्सर आषाढ वद्य ७ मी शुक्रवारीं पहांटेस मुसळधार पाऊस पडत असतांही कोणास न कळवितां ते घरांतून बाहेर पडले. मध्यंतरीं मार्गांत प्रवाससंबंधीं अनेकप्रकारचे कष्ट सोशीत अन्नोदकाचा संपर्कही न करितां दोन दिवसांनीं ते वेंगुर्ल्यास पोहोंचले. इकडे घरांतील मंडळींचे काय हाल झाले असतील व त्यांना किती चिंतेंत काळ काढावा लागला असेल याची कल्पना सहृदय वाचकांनींच करावी! वास्तवीक "**देवाच्या सख्यत्वासाठीं। पडाव्या जिवलगासी तुटी। सर्व अर्पावें शेवटीं। प्राण तोही वेंचावा॥**" किंवा "**देव जोडे तरी करावा अधर्म**" इत्यादि निवृत्तिपर अशा साधुसंतांच्या अनुशासनावरून पाहतां भट्टजींचें आचरण अगदीं योग्यच झालें असें म्हटलें पाहिजे. 'देव हृदयांत आहे त्याच्या प्राप्त्यर्थ कोणासही गुरु करण्याची आवश्यकता नाहीं. दृढ उपासना चालविली म्हणजे गुरु व संत घरीं चालत येऊन कृपा करितात' इत्यादि सत्य पण शरीरकष्टाच्या भयानें लांब लांब गप्पा मारणाऱ्या जिज्ञासूंनीं भट्टजींच्या या वृत्तीचा व धैर्याचा चांगला विचार करावा आणि तीव्र मुमुक्षुत्व कसें असतें याची थोडी अटकळ आपल्या मनाशीं बांधावी अशी आमची नम्र सूचना आहे. असो.

वेंगुर्ल्यास पोंचल्यावर लगेंच विष्णुबोवांची गांठ पडली. मोठ्या सद्‌गदित अंतःकरणानें त्यांनीं त्यांस साष्टांग प्रणिपात केला. बराच वेळ झाला तरी स्वारी उठेना, तेव्हां विष्णुबोवांनीं स्वतः जवळ जाऊन त्यांना उठविलें. उघडच आहे; कारण "**तो टोणपा ढकलितां पडो जाणे। परि पडला तो उठों नेणें॥ कीं मस्तकीं पद्महस्त बाणे। उठे प्रभावें तयाच्या॥ अचेतन दंड पडला। तो टोणपा सचेतनें उचलिला। तैसा जडात्मत्व जाणणार याला। उचली कोण चिदात्मत्वें त्यावांचुनी॥**" नंतर सर्व आगत-

स्वागतादि कुशल प्रश्न झाल्यावर आत्मज्ञानाची अत्युत्कट जिज्ञासा व पूर्ण अधिकार दिसून आल्यामुळें विष्णुबोवांनीं दुसऱ्याच दिवशीं सांप्रदायिक पद्धतीनें महावाक्याचा उपदेश देऊन त्यांना कृतार्थ केलें. हा गुरुकडून मिळालेला अगम्यज्ञानाचा ठेवा भट्टजींनीं आपल्या " **स्वात्मतत्त्वामृतशतक** " नामक ग्रंथांत फार चांगल्या तऱ्हेनें उघड केला आहे. जिज्ञासूंनीं एकवार तो ग्रंथ अवश्य मनन पूर्वक वाचावा.

पुढें कांहीं दिवस सद्गुरुसेवेंत काळ घालवावा व हीच सेवारूप गुरुदक्षिणा अर्पण करावी असा त्यांचा फार हेतु होता; पण बोवा म्हणाले—" **नारायण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।** " म्हणजे झालें. तीच आमची सेवा समजून वर्णाश्रमधर्माप्रमाणें सर्व प्रपंच चालवावा. कारण " **उपासनेचें उत्तीर्ण व्हावें । भक्तजनें वाढवावें । अंतरीं विवेकें उमजावें । सकळ कांहीं** " यासाठीं घरीं श्रीरामरायाची मूर्ति स्थापन करून भजन–पूजन–कीर्तनादिकांनीं जड-जनोद्धारार्थ भक्तिमार्गाचा विस्तार होईल तेवढा करीत जावा; म्हणजे त्यांतच आमची गुरुदक्षिणा वगैरे आली. विशेषतः भट्टजींच्या मनांतून तेथून निघावयाचेंच नव्हतें; पण गुर्वाज्ञा अनुल्लंघनीय जाणून स्वेच्छेविरुद्ध मोठ्या कष्टानें ते गुरुमहाराजांचा निरोप घेऊन परत आपल्या गांवीं आले व लौकरच त्यांनीं आपल्या पर्णकुटींत श्रीरामस्थापना करण्याचा विचार ठरविला आणि त्याप्रमाणें फोंडे महालापैकीं बोरी गांवांत राहणाऱ्या ' सांवळ्या ' नामक एका प्रसिद्ध व प्रेमळ कारागिरास लांकडाची पट्टाभिषिक्त श्रीसीतारामाची मूर्ति करून आणण्यास सांगितलें. नंतर तो एकदां आपल्या गांवांजवळील ' सिद्धनाथाचा ' डोंगर चढून जात असतां मध्येंच त्याचा पाय कुणी धरल्याप्रमाणें एकदम जड झाला. मोठ्या कष्टानें त्यानें आपला पल्ला गांठला. पण तिकडून परत येतांना पूर्वीच्याच जागेवर पुनः पायाला असह्य वेदना होऊं लागल्या. तेव्हां हा काय चमत्कार! म्हणून त्यानें आजुबाजूंस पाहिलें तों तेथें एक काळी कुळकुळीत अशी शिळा त्यांच्या दृष्टीस पडली व लगेच त्याच्या मनांत असा विचार आला कीं, ' डोंगरीकर भट्टमामाना जर या शिळेची मूर्ति करून दिली तर त्यांस लांकडी प्रतिमेपेक्षां अधिक संतोष होईल. ' म्हणून त्यानें हात टेकत टेकत मोठ्या कष्टानें ती शिळा उचलली. तोंच त्याचा पाय अगदीं वेदनारहित झाला. त्याबरोबर सर्वांतर्यामि प्रभू जो राम त्याचीचही सर्व लीला आहे. अशी त्यानें खुण गांठ बांधिली व ती शिळा घेऊन तो आपल्या घरीं आला. आणि तिच्यावर त्यानें श्रीरामाची मूर्ति कोरण्यास आरंभ केला. तो इतक्यांत तेथें असा चम-

त्कार झाला कीं, त्या शिळेवर त्यानें जेव्हां पहिली टांकी मारिली त्याबरोबर पणजी-तील दोनप्रहरची बारा वाजण्याची तोफ उडालेली सर्वांच्या कानीं पडली !! यावरून श्रीरामजन्माच्या वेळेसच त्या पाषाणावर शस्त्र बसलें अर्थात् ही मूर्ति भजकास चांगली अभ्युदयकारक होणार ! अशी बहुतेकांची खात्री होऊन चुकली.

कांहीं दिवसांनीं मूर्ति चांगली तयार झाल्यावर त्यानें ती डोंगरीस आणून भट्ट-जीस अर्पण केली आणि तत्संबंधानें घडलेली सर्व हकिकतही निवेदन केली. ती ऐकून भट्टजींचा कंठ प्रेमानें दाटून आला व त्यांनी ती मूर्ति घट्ट उराशीं धरून घटकाभर तिला आनंदाश्रुनीं अभिषेक केला व उत्तम मुहूर्तावर त्यांनी आपल्या घरांतच तिची स्थापना केली. सांप्रत ही मूर्ति डोंगरी गांवांत भट्टजींच्या मंदिरांत आहे व तेथे नेहमी भजन, पूजन, कीर्तन, पुराण, अन्नसंतर्पण वगैरे उत्साह होत असतात. ह्या मंदिराच्या डागडुजीस प्रत्यक्ष भट्टजींच्या गुरुमहाराजांनी ( विष्णुबावांनी ) देखील शारीरिक कष्टसहाय केले आहेत. तेथे भाविक लोकांस अनेक तऱ्हेचे साक्षात्कार अनुभवास येतात. भट्टजींच्या प्रेमळ भक्तिरूपि तपोबलानें " **दैवतानांतु सान्निध्यमर्चकस्य तपोबलात्** " या न्यायानुसार तेथें उत्तम तऱ्हेचा जागृतपणा प्राप्त झाला आहे. त्यासंबंधानें बऱ्याच अनुभवीक गोष्टी प्रसिद्ध आहेत; पण या लहानशा चरित्रात त्याचा समावेश होणें अशक्य आहे.

एकदा त्याना मारुतिरायाने ब्राम्हणरूपानें स्वप्नांत दर्शन दिले आणि सांगितलें की, ' तुझ्या मुखातून नित्य रामायण श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. माझे नांव हनुमंत, मी लवकरच इकडे येणार ! ' त्याप्रमाणें त्याचदिवशीं लक्ष्मण नांवाचा एक सत्वशील कुंभार भट्टजींचा अनुग्रही झाला होता त्यास ' सांग मुक्कामी माझी प्रतिमा अमुक ठिकाणी भूमीत आहे ती काढून डोंगरीवर पोंचीव. ' असा दृष्टांत झाला. मग लगेच त्यानी ती मूर्ति तेथून काढून डोंगरीवर आणून स्थापन केली. असो.

पुढे कोणत्याना कोणत्यातरी निमित्तानें गोव्यांत येणारे अनेक विद्वान, धनिक, व्यापारी, कामदार, कारकून, सुशिक्षीत वगैरे लोक भटजी महाराजांच्या कृपा प्रसादास मुद्दाम डोंगरीवर येऊं लागले. कुणि अभक्त होते ते भक्त झाले, भक्त होते ते मुमुक्षु झाले, व मुमुक्षुलोक साधक बनून आत्मसिद्धिद्वारां आपल्या जन्माचें सार्थक करूं लागले. याविषयीं बरींच उदाहरणे प्रसिद्ध आहेत त्यांतील एकाचाच येथें निर्देश करितो.

प्रसिद्ध संगीत कलाभिज्ञ कै० अण्णासाहेब किर्लोस्कर हे ज्यावेळीं गोवेसरकाराकडून इंग्रजानीं मिठाचा मक्ता घेतला त्यावेळीं क्राफर्डसाहेबांबरोबर पणजीस आले होते; तेव्हां भट्टजीमहाराज रामनवमीच्या उत्सवाप्रीत्यर्थ रंभाशुकसंवादासारखे पौराणिक कथानकाचे नाटकप्रयोग करवीत असत. त्या नाटकाची रचना ते स्वतःच करीत व तत्संबंधीं गायन, नर्तन, अभिनय वगैरेची लहान लहान मुलांना माहिती देऊन त्याजकडून ते प्रयोग करवीत. भट्टजींचीं तीं नाटकें साधींच पण फार प्रेमळ होतीं. नृत्यवाद्यनादिकांनीं युक्त असे हे नवीनच संगीतप्रयोग पाहण्याकरितां गोव्यातील दूरदूरच्या गावाहून मंडळी मुद्दाम डोंगरावर येत असे. हल्लींच्या नाटकाप्रमाणें पडद्याची वगैरे सीनसिनेरी मात्र त्यांत नसे. बाकीं सर्व कामें, भाषणें आणि पदें इतकीं कांहीं सरस होतीं कीं, त्यांचें वर्णन करणें शक्य नाहीं. अगोदरच भट्टजींची प्रासादिक वाणी, त्यांत संगीताची उत्तम जोड, अनुपम असें नृत्य इत्यादि कारणांनीं त्यांच्या नाटकास फारच रमणीयता आली होती; त्यामुळें गोव्यांत सर्वत्र त्यांची कीर्ति पसरली; तेव्हां ती त्यांचीं प्रेमळ व श्रुतिमनोहर नाटकें प्रत्यक्ष जाऊन पहावीं अशी किर्लोसकरांनाही इच्छा उत्पन्न झाली आणि त्याप्रमाणें ते पणजींतील कांहीं स्नेहीमंडळीसह डोंगरीस आले, तेथील सर्व व्यवस्था, आल्यागेल्याचा उत्तम आदर-सत्कार वगैरे प्रकार पाहून त्यांना मोठें कौतुक वाटलें. नंतर त्यादिवशींचा नाटक-प्रयोग पाहून अण्णासाहेब अगदीं चित्राप्रमाणें तटस्थ झाले! गोव्यासारख्या महाराष्ट्रभाषानभिज्ञ प्रदेशांत व त्यांतही अगदीं खेडेगावांतील सामान्य प्राकृत लोकांनीं केलेल्या नाटकास असा बहारीचा रंग येईल ही कल्पनाही त्यांना नव्हती! एक एक भाग पहावा तो त्यांना आनंदानें अधिकच गहिंवर येऊं लागला. उघडच आहे, भट्टजीमहाराजांसारखे प्रासादिक वाणीचे साधु नाटककार, आणि किर्लोसकरांसारखे त्या कलेंतील मार्मिक विद्वान् प्रेक्षक, मग काय विचारावें? "**कवित्व केलें कविनायकानें। चाखोनि घ्यावा रस पंडितानें॥**" असें झालें म्हणून यांत मोठेंसें नवल नाहीं!!

अखेरपर्यंत प्रयोग पाहिल्यावर अण्णासाहेब भट्टजींस नमस्कार करून म्हणाले 'आपण ही नाटक कंपनी घेऊन पुण्या मुंबईकडे एकदां फेरा मारा. म्हणजे आपल्या श्रमाचें चांगलें बीज होऊन चार पैसेही मिळतील.' हें ऐकून भट्टजीमहाराजांना ती एक मौजच वाटली! पण अण्णासाहेबांची रसिकता व प्रेम हीं अंतरीं जाणून त्यांच्या भाषणाचा निषेध न करितां ते म्हणाले 'या नाटकाचा हेतु पैसे मिळविण्याचा

नसून फक्त अज्ञलोकांत भक्ति व ज्ञान, याची आवड उत्पन्न होईल अशा भगवद्गुणानु-वादात्मक लीला दाखवून त्यांच्या सत्वशुद्धीस साह्य करावें. असा आहे. इतक्या-साठीं आपली विनंति मान्य करवत नाही.' याप्रमाणे भट्टजींनीं आपल्या शीलास व योग्यतेस साजेसेंच उत्तर दिलें. पण त्यामुळे अण्णासाहेब मात्र निराश झाले. या मन्वंतरांत अशारीतीनें घरीं चालत आलेल्या लक्ष्मीशीं इतका उदासीन पुरुष त्यांनी क्वचितच पाहिला होता. त्यातही प्रपंचाविषयी अगदीं विरक्त झालेल्या साधुपुरुषाची गोष्ट निराळी पण भट्टजींसारखे कुटुंबवत्सल आणि गद्यपद्य कविताशक्ति व तालसुरांद संगीत विद्या अंगीं असणारे हरिभक्तिपरायण पुरुष धनप्राप्तीविषयीं इतके निरिच्छ असलेले पाहून त्याना फार आश्चर्य वाटलें आणि अखेरीस 'तीं नाटकें तरी आपणास द्या म्हणजे आपण मंडळी तयार करून होईल त्या प्राप्तीमधून येथें श्रीरामचरणाची सेवा करूं' असें त्यानी भट्टजीस सागितलें. पण त्यावेळीं तीं नाटकें एकत्र चोपडींत लिहिलेलीं नसल्यामुळें अण्णाची तीही इच्छापूर्ण झाली नाहीं. व त्या नाटकांवर मिळालेल्या द्रव्यांनें श्रीरामरायाची सेवा करून घेण्याविषयी त्याची मनोदेवता त्यास सांगेना. अशा स्थितीत शेवटी अण्णानीं 'निदान आपल्या हातचा काहीतरी मला प्रसाद द्या म्हणजे श्रीरामकृपेनें व आपल्या कृपादृष्टीनें जी येथें मला स्फूर्ति झाली आहे तिच्या योगानें मी अशाच धर्तीवर काहीं नाटकें लिहून मायभाषेची आणि देशबांधवाची सेवा करीन.' म्हणून भट्टजीची विनंति केली. त्याप्रमाणे भटजीमहाराजांनीं त्याना श्रीराममंदिरातील चौकावर नेऊन व श्रीचरणीं मन:पूर्वक प्रार्थना करून श्रीफलासह पुष्पप्रसाद आपल्या हस्तानीं अण्णाच्या पदरात घातला. आणि श्रीरामकृपेनें तुमचे सर्व हेतु सिद्धीस जातील असा अंत:करणपूर्वक आशीर्वाद दिला. तदनुरूप पुढे अण्णाचा नाट्यकलेत जो लौकिक झाला तो जगविख्यात आहेच. साराश, किर्लोस्कराची कल्पनावधू, नाटकें व आख्यानें कुठेंही प्रसवलेली असो. पण तिचें पाणिग्रहण व गर्भाधान विधि गोमांतकप्रांतीं डोंगरी येथील श्रीराममंदिरातच झालें होते ही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे. जगात असामान्य यश:श्री किंवा नावलौकिक मिळविण्यास व सर्व लोकाचा अतुल प्रेमभाव संपादण्यास केवळ बौद्धिक सामर्थ्याहून निराळे असें भगवंताच्या अधिष्ठानाचें किंवा साधुसंताच्या अमोघ कृपाशीर्वादाचें पाठबळच मुख्यत: असावें लागतें. या सर्वमान्य सिद्धांताचे सत्यत्व ह्या उपरिनिर्दिष्ट किर्लोस्करांच्या गोष्टींत पूर्णपणे दिसून येते.

भट्टजीमहाराजांनीं पंढरपुर, नाशिकपंचवटी, अयोध्या, काशी, त्रिपती, हंपिकिष्-

पाक्ष, वगैरे बऱ्याच तीर्थयात्रा केल्या. ते पंढरपुरास सतत चातुर्मास राहिले होते. तेथून घरीं आल्यावर त्यांनीं श्रीरामासंन्निध भजनी सप्ताह सुरू केला. त्यावेळीं बोरी येथील प्रसिद्ध महंत जगन्नाथबोवा हे भट्टजीमहाराजांच्या अत्यंत स्नेहामुळें वरचेवर डोंगरीवर येत असत. त्यांस ती भट्टजीमहाराजांची अपूर्व भजन पद्धति व तो अनिर्वचनीय सात्विक प्रेमरंग पाहून पराकाष्ठेचा आनंद होई. जगन्नाथबोवा भट्टजीमहाराजांस गुरुस्थानी मानीत असत व आपणांस कांहींतरी सेवा सांगावी म्हणून ते सदोदित भट्टजींस विनंति करीत. पण त्यांस भट्टजींनीं भजनीसप्ताहाचा सर्वत्र प्रसार करावा. म्हणजे हीच आपली सेवा असे सांगितलें. तेव्हांपासून जगन्नाथबोवांनीं सर्व गोमांतकभर फिरून जिकडे तिकडे भजनीसप्ताह सुरू केले ते अजूनही सर्वत्र अव्याहत चालू आहेत. त्यांनीं देवमामलेदार, सिद्धारूढस्वामीप्रभृति अनेक साधुसंतांची दर्शनें घेतलीं होतीं. जगन्नाथबोवांवर भट्टजीमहाराजांचे खालील पद प्रसिद्ध आहे.

" धन्य धन्य अवतारचि केवळ जगन्नाथ दासाचा ।
ज्ञानभक्ति वैराग्यविराजित जगदोद्धारक साचा ॥ धृ० ॥
पतीतपावन व्हाया देशोदेशीं वास जयांचा ।
जिकडे तिकडे थाट चालविति कीर्तन सप्ताहांचा ॥ १ ॥
निरहंकारी प्रेमळभारी स्वभाव शांत मनाचा ।
इंद्रियनिग्रह बळकट जैसा परिसों योगि शुकाचा ॥ २ ॥
नरनारी आबाल वृद्ध यां जिवलग होय जिवाचा ॥
निंदास्तुतिसम अद्वयभावें भोक्ता भजन-सुखाचा ॥ ३ ॥
कोणी कांहीं म्हणो आवडता कृष्ण जगन्नाथाचा ॥
भला भला सत्पुरुष लाभला पुतळा भक्ति-रसाचा ॥ ४ ॥ "

या वरील पद्यांतील विवेचनावरून भट्टजींनीं भजनाचा गोव्यांत केवढा विस्तार केला हे सहज कळण्यासारखें आहे. केवळ कांहीं छिद्रान्वेषण दृष्टीच्या मंडळींनीं त्यांचा पुष्कळ छळ व दुर्लौकिक करण्याचा प्रयत्न केला! परंतु " मणिःशाणोल्लीढः " या न्यायानें भट्टजीमहाराजांचें त्यापासून कांहींच नुकसान न होतां उलट त्यांच्या निर्मल कीर्तीचा दूरवर विस्तार मात्र बराच झाला! त्यांच्या दर्शनास दूरदूरच्या प्रांतांतून अनेक सद्भक्त येऊन त्यांच्या अमोघ वाणींतून निघालेला उपदेश श्रवण करीत असत. त्यांचें भक्तिप्रचुर भजन ऐकलें म्हणजे कोणाही पाषाणहृदयी

मनुष्याचें अंतःकरण प्रेमानें सद्गदित झाल्यावांचून राहत नसे. एकदां भट्टजीमहाराजांचा कट्टा निंदक असा एक श्रीमंत गृहस्थ सहज त्याच्या भजनास पोंचला असतां भट्टजींनी त्याच्या डोळ्यातून प्रेमाश्रू लोटविले व त्यानेंही निराभिमानपणे भट्टजीचे पायीं लोटांगण घालून क्षमा मागितली !

ते शुद्ध ज्ञानमार्गोपदेशक व प्रेमळ भजनरंगाची केवळ प्रतिभाच होते. त्यांचे भजन म्हणजे " घोंटवीन लाळ ब्रम्हज्ञान्या हाती " अशापैकींच होतें. श्रीमंतापासून तों अगदीं अकिंचनापर्यंत, ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत त्यांनीं उच्चनीच भेदभाव सोडून सर्वत्र ज्ञानमार्गाचा सारखा प्रसार केला व बहुतेकांचे अज्ञान दूर करून त्याच्या हृदयांत ज्ञानाचा पूर्ण प्रकाश पाडिला. त्यांचे कोंकण्या भाषेत नेहमी असे सांगणे असे की, ( १ ) जें जाय तें मिळना, ( २ ) नाका ते सुट्ना, ( ३ ) करचें ते करूक् जाय, ( ४ ) घडुक् जाय ते घडलें ( ५ ) जाणचें ते जाणुक जाय. अशीं हीं पंचमहावाक्यें त्यांच्या तोंडून कांहीं निमित्तानें वेळोवेळीं बाहेर पडत. त्याचा अर्थ अनुक्रमें असा कीं, ( १ ) जीवास जेव्हां जें पाहिजे असतें तेव्हां तें मिळतेंच असें नाहीं. ( २ ) किंवा जें नको असतें तें टळतेंच असेंही नाहीं ( पण यामुळें हर्षविषाद न मानितां वर्णाश्रम धर्मोचित असें ) ( ३ ) कर्तव्य म्हणून जें ठरेल तें केलेंच पाहिजे. परिणामाकडे लक्ष्य देऊन व्यग्रचित्त न होतां भगवदर्पणबुद्धीनें प्रत्येक उपस्थित कर्म बजवावें, मग भगवंताच्या इच्छेनें ( ४ ) जें घडावयाचें तें घडणारच आणि जें कांहीं घडणार तें आपणास क्वचित्काळीं मनाविरुद्ध दिसतें तरी तें आपल्या भावी हितासाठीं असतें असें समजावें कारण आमच्या मूळ शुद्ध कामनारहित हेतुप्रमाणें त्या कर्मफळाची योजना सर्वज्ञ व कृपाळू अशा भगवंताकडून झालेली असते. ती योजना आमच्या अकल्याणाविषयीं केव्हांच असणार नाहीं हे मुख्य तात्पर्य सर्व गोष्टींवरून ( ५ ) जाणावयाचें तें जाणलें पाहिजे. मुख्य ज्ञेय जें आत्मतत्व किंवा भगवत्स्वरूप तेंच प्रत्येक कर्मांत व कर्मांतीं जाणलें पाहिजे. प्राप्तव्य, ज्ञातव्य, गंतव्य, जें आहे त्यांचें मुख्य अधिष्ठान आत्मस्वरूप होय. त्यांत स्थिर राहून सर्व कर्मे निरहंकारबुद्धीनें आचरलीं पाहिजेत. हाच खरा कर्मयोग, व पुरा भक्तियोग, आणि हाच शुद्ध ज्ञानयोग होय. व्यावहारिक किंवा पारमार्थिक भाग्योदय झाला पाहिजे तर प्रत्येकानें आपली तपःसंपत्ती वाढविण्याविषयीं व असलेली कमी न होऊं देण्याविषयीं फार जपलें पाहिजे. चांगलें नशीब अथवा प्रारब्ध म्हणून जें ह्मणतात तें अदृश्य असें तपःसंपत्तिचें कार्य होय. असें भट्टजी ह्मणत. आणि परमेश्वर हा सर्व सुखाचें उगम-

स्थान असल्यामुळें त्याच्या भक्तिरूप तपाकडेंच सर्वांनीं लक्ष्य द्यावें. स्ववर्णाश्रम धर्मोचित कर्मसुमनानीं सर्वांतर्यामी परमात्म्याची पूजा करावी असें ते सांगत. " निद्रेमाजि जसा निवृत्त असशी जागेपणी होतसा " अशी त्यांची सूचना असे. " समजान् आसतकुच् झाले " असेंही ते आपल्या घरगुति कोंकणी भाषेनें प्रत्येक पृच्छकास सांगत. म्हणजे ' समजून असावें, कर्म निराळें, इंद्रियें निराळीं, व मी आत्मा म्हणजे या सर्वांचा द्रष्टा होय. असें समजून अलिप्त साक्षिस्वरूपानें जागृत असावें व कर्मे करावी. कर्मास भिणें म्हणजे आपली आपण योग्यता विसरणें होय. कर्तव्यरत असून असंग असणें हीच खरी विश्रांति असे ते सांगत. प्रसिद्ध स्वामी रामतीर्थही याविषयीं असेंच म्हणतात.—

" What is work? Intense work, according to Vedant, is rest. All true work is rest, that is what Vedant preaches. Vedant wants you to rise above the little self, the small age through intense work.

सुख व निर्विषय आनंद हेंच भगवंताचें खरें स्वरूप आहे अशाबद्दल व त्या आनंदघन भगवंताच्या अवतारकृत्यांबद्दल भट्टजीमहाराज फार खुबिदार व्याख्यानें देत असत. आप्तइष्ट, सोयरेधायरे, कुत्रीमांजरें, कीडमुंगी इत्यादि सर्व भूतमात्रांचे ठिकाणीं आपणास सुख व्हावें अशी स्वभावसिद्ध वसत असणारी इच्छा, त्यांतच ईश्वराचें खरें वास्तव्य आहे अतएव तीच खरी अयोध्या, काशी व पंढरी समजून सर्वांवर उत्कट प्रेम करणें हीच खरी ईश्वरोपासना होय, असें ते बोलत. उघडच आहे, अर्जुनानें देखील भगवंतास त्याच्या मुख्य मुख्य विभूति विचारल्या तेव्हां आपली पहिली विभूति देवानें त्यास वरीलप्रमाणेच सांगितली आहे व " **अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः** " ही भगवदुक्ति प्रसिद्धच आहे. सर्वभूतहितेरत होण्याबद्दल देवानें भक्तांस बजावून सांगितलें आहे.

वस्तुतः परोपकार हीच खरी ईश्वरभक्ति होय. प्रपंचांत कारणपरत्वें लहानमोठ्या माणसांचा आशय म्हणजे हेतु आपणास यथाशक्ति पूर्ण करितां येतो आणि यामुळे परस्पर आनंद व प्रेम उत्पन्न करणें हीच भगवंताची आराधना आहे. कारण तो तत्स्वरूप आहे; म्हणून भूतमात्रांची सेवा करण्याबद्दल संतांचा आग्रह असतो. ' जें जें देखे भूत तें तें मानी भगवंत ' या एकनाथी वचनांत परोपकाराचें

सकारण रहस्य आहे. 'पर' ह्मणजे मन बुध्यातीत जो परमात्मा त्यास 'उप' म्हणजे जवळ करण्याचा जो उद्योग तो ( पर+उप+कार ) परोपकार होय. तात्पर्य संसारांत राहूनच भगवदाराधनेचें अनुसंधान न तुटूं देतां हा भवार्णव उल्लंघितां येतो असें भटजी ह्मणत, आणि याच दृष्टीनें ते भूतमात्रांच्या ठिकाणीं अत्यंत प्रेमदृष्टि ठेवीत. लोकांवर प्रेम वाढतां वाढतां अहंभाव आपोआप लुप्त होतो, आणि प्रेमस्वरूप भगवंताशीं भेट होऊन अकृत्रिम प्रेमपूर्वक लोकसेवेच्या छंदानें इतर साधनांनीं कष्टसाध्य असा याचा आत्मविकास होतो; कारण—

1 God is love in essence.
2 Love is God in solution.
3 Service is love in action.

"देव म्हणजे प्रेमाचें घनीभूत स्वरूप अथवा अर्क होय.
प्रेम म्हणजे देवाचे द्रवीभूत स्वरूप होय, आणि परोपकार म्हणजे
प्रेमाचें कार्य किंवा आचरणात आलेलें प्रेम होय."

या वरील तीन वचनांत ईश्वरस्वरूपाचे व त्याच्या भक्तीचें आणि प्राप्तीचें फारच थोड्या शब्दांत उत्तम विवेचन एका लेखकानें केलें आहे; आणि सुदैवाची गोष्ट ही कीं, पुष्कळ अमेरिकन समंजस तत्ववेत्ते लोकही हें तत्त्व आतां फारच आस्थेनें जाणावयास लागले असून ज्याला त्याला "EXCHANGE LOVE and SERVICE" याच वाक्याची म्हणजे भूतमात्रीं प्रेम करून एकमेकांची सेवा करण्याची आठवण देत आहेत. वास्तवीक भूतमात्रीं भगवद्भाव धरणे हाच 'निश्चित भक्तियोग' होय. अशाबद्दल साधुसंतांचेही अनेक पुरावे मिळतील; पण अशा या भक्तियोगावांचून योगयागादि कोणताही उपाय अगर तत्त्वज्ञान धार्मिक म्हणतां येणार नाहीं व त्याव्यतिरिक्त कोणतेंही कर्म हरिप्राप्ति करून देण्यास समर्थ होणार नाहीं, अशी भटजीमहाराजांची विवेचनपद्धति असे; आणि—

If religion means the art of acquiring God a phiosophy, which is not based upon Bhakti, can never be to be religious.

असेंच त्याचेंही म्हणणें असे. कोणत्याही परिस्थितीनें आपली आनंदवृत्ति भंगूं न देतां नित्यसुखस्वरूप जो रामराय त्याचे चरणीं रत असा म्हणजे झालें; असें त्यांचें

सांगणें असे. अशारीतीनें त्यांनीं भगवंताच्या यथार्थ ज्ञानाचा विस्तार करून शके १८२४ शुभकृत् संवत्सरांतील आश्विन महिन्यांत या नश्वर भूतलावर आपला पुण्यदेह ठेवून परलोकीं गमन केलें !

देह ठेवण्यापूर्वी त्यांनीं सर्व गांवांतील सद्भक्तांस आपणाजवळ बोलावून आणून दोन तीन तास त्यांस सदुपदेश केला व रामभजनाचें माहात्म्य मोठ्या कळकळीनें समजावून दिलें. आणि आपणावर जसें प्रेम ठेविलें तसेंच आतां माझा मुलगा मुकुंदराज यावरही ठेवा असें सांगितलें. आपण अमुक दिवशीं निर्याण करणार असें त्यांनीं पूर्वींच सांगितलें होतें. कोजागरी पौर्णिमेचा उत्सव निर्विघ्नपणे पार पडल्यानंतर ते म्हणाले ' आतां अवधी नाही; कारण पुढें दीपवाळीच्या उत्सवास अवघे तेरा दिवस राहिले. आमचें और्ध्वदेहिक वगैरे होऊन दीपवाळीतील श्रीरामरायाचा मिरवणुकीचा उत्सवही तसाच निर्विघ्नपणे झाला पाहिजे. " भगवद्भक्त महानुभाव देह ठेवण्याचेवेळीं मृत्यूकडे शेवटचें म्हणून अत्यंत संस्मरणीय भाषण करितात त्याप्रमाणे भट्टजींचेही अखेरचे भाषण त्यावेळीं हजर असलेल्या मंडळींस ऐकण्यास मिळाले.

या भगवद्भक्ताच्या निधनानंतर बहुतेकांस अनावर दुःख झालें. विशेषतः त्यांच्या भक्तमंडळींस त्यांच्या परिणामकारक सदुपदेशाचें स्मरण होऊन फारच दुःख झालें. अशारीतीनें भक्तिज्ञान वैराग्यरूप तेजोमय किरणाचा सर्वत्र विस्तार व प्रकाश करून अज्ञानांधकारास देशोधडीस लावणाऱ्या या सत्पुरुषरूप सूर्याचा अकल्पित अस्त झाला. निर्याणकाळीं त्यांचे वय ५८ वर्षांचें होतें.

येथपर्यंत भट्टजीमहाराजांच्या जीवनक्रमांतील ठळक ठळक गोष्टि सांगितल्या. आतां त्यांच्या कवितेकडे वळूं.

भट्टजीमहाराज हे स्वतः उत्तम कवि होते. त्यांची कविता सरळ, सुबोध व सद्यः परिणामकारक अशी आहे. त्यांनीं केलेला ' स्वात्मतत्वामृतशतक ' नामक ग्रंथ म्हणजे वेदांताचा केवळ गर्भ असें म्हटलें तरी चालेल. यांतील विषयविवेचनपद्धती इतकी सोपी आहे कीं, तो एखाद्या लहान मुलास देखील सहज समजेल. वेदांत ग्रंथांत वारंवार आढळणाऱ्या पारिभाषिक शब्दांची भानगड यांत मुळींच नसल्यामुळें कोणाही मुमुक्षूस या ग्रंथाच्या अभ्यासानें दुर्निवार अशा मोहाचा निरास करितां येईल. हें खालीं दिलेल्या वेच्यांवरून चांगलें व्यक्त होईल. आपण वस्तुतः आनंदस्वरूप असून आपणास एकदम कसा भ्रम होतो त्याविषयीं भट्टजी म्हणतात;

श्लोक.

“ आनंद आपण असें नकळे मनातें ।
घेऊनि विस्मृति धरी विषयासि नातें ॥
कीं होय सौख्य तुज तें विषयांत आहे ।
वाटे उगा भ्रम तुझा तुज बाधताहे ॥ १२ ॥
विषय कल्पुनि जें सुख भोगिसी ।
स्वरूप तेंचि तुझें परि नेणसी ॥
ह्मणुनि दुःख अनावर वाटलें ।
तुजवरीच तुझें तम दाटलें ॥ १३ ॥ ”

या वरील दोनच श्लोकांवरून भट्टजींची कविता किती सुबोध व सोपी आहे याची वाचकांस सहज कल्पना होईल. आपलें खरें स्वरूप कोणतें तें सांगतात.

“ न दृश्य तूं साक्षि असे तयाचा । मागेंपुढें भास दिसे मनाचा ॥
सर्वांसि या आपण मूळ साचा । अलक्ष सच्चित्सुख लक्षणाचा ३२ ”

अशा अलक्ष परब्रम्हाचा अभ्यास करतेवेळीं तुला हें दृश्य आडवें येईल तेव्हां, त्रासून जावून तूं या दृश्याचा त्याग करण्याची खटपट करूं नकोस; तर:—

“ दिसे तें तूं पाहे परि वळख द्रष्ट्यासि वळुनी ।
असे जो सत्यत्वें सुखमय सदा वृत्ति त्यजुनी ॥
दिसे भासे सारें तुजवरिच हें तूं न दिससी ।
तुला तूं लक्षाया सहज समजानेंचि असली ॥ ३३ ॥ ”

वेदांतासारखा गहन विषय बोलतांना भट्टजींच्या भाषणांत एक देखील कठीण शब्द येत नसे. ‘ आत्मा ’ हा शब्द संस्कृत आहे; पण अज्ञलोक त्याचा विपरीत अर्थ कल्पितील म्हणून ‘ आत्मा ’ म्हणण्याऐवजीं ते ‘ आपण ’ असेंच म्हणत असत. यावरून त्यांची वेदांतविवेचनपद्धति किती सुगम होती हें सहज समजण्यासारखें आहे व याचा प्रत्यय पाहणें असेल तर त्यांचे वरील उद्गार किती सोपे व सरळ आहेत तें पहावे.

अनेक उपायांनीं जर चित्त स्थिर होऊन स्वसुखानुभव येत नाहीं तर त्यास काय करावें त्याविषयीं सांगतात:—

" सुखाची जे इच्छा त्यजुनि वळ मागें परतुनी ।
स्थिरत्वानें राहीं सुखमय निजात्मा समजुनी ॥
उठों नेदीं वृत्ती सहज सुख येईल उदया ।
तदाकारें घोंटीं स्फुरत सुख जें आपण तया ॥ "

अहाहा ? किती सहज व गोड उद्गार हे ! संसाररोगग्रस्त मुमुक्षुजीवास वरील श्लोक ही दिव्य मात्राच होय.

" When shall I be free ?
When I shall cease to be."

असें स्वामी रामतीर्थांनींही म्हटलें आहे. आतां विषयांपासूनच खरें सुख प्राप्त होतें असें जर कोणास वाटत असेल तर त्यांनीं खालील श्लोक पहावा.

" पदार्थ सुखसा तुला जरि दिसे सुषुप्ता पहा ।
अपार सुख निद्रिता, न विषयीं जिवाची स्पृहा ॥
प्रपंचसुख हा जरी तरि निजेंत कैचें सुख ।
न तें विषयवृत्ति, जागृतिंत जें दिसे सन्मुख ॥ ७६ ॥ "

याप्रमाणे ' स्वात्मतत्वामृतांतील " प्रत्येक श्लोक वाचनीय असल्यामुळे त्यांतील वेंचे ह्मणून निराळे देतां येत नाहीत. आतां त्यांतील आणखी एकच श्लोक देऊन भट्टजीमहाराजांच्या इतर कवितेकडे वळूं.

विषयांपासून चित्ताची निवृत्ति करून आत्मस्वरूपांत स्थिर केल्यावर आपली स्थिति कशी होते ते सांगतात:—

" जें वासना वळविसी स्वसुखैक ठाया ।
वाटेल त्यां कठिण तेथुनियां उठाया ॥
जें तें स्फुरेल सुख आपण विश्व सारें ।
दुःखें न राहतिल या निज सद्विचारें ॥ ७८ ॥"

भट्टजीमहाराज स्वत: चांगले गायक असल्यामुळे त्यांनीं अनेक रागरागिणीवर सुंदर पदें केलीं आहेत. भगवद्भक्तिविरहित जें गाणें तें त्यांस अगदीं आवडत नसे. ते कीर्तनांत देखिल विश्रांतिसाठीं ह्मणून अप्रासंगिक हिंदुस्थानी पदें, ठुमऱ्या वगैरे म्हणत नसत. कोणतीही कविता भगवद्गुणवर्णनपर किंवा ज्ञानवैराग्यपर असावी असें

त्यांचें मत होतें. त्यांचे चिरंजीव मुकुंदराज हे अगदीं लहान असतांना त्यांची मातोश्री त्यांस खेळविण्याकरितां म्हणून कसलें तरी गीत म्हणत असे. तें भट्टजी-महाराजांना न आवडून मुद्दाम त्यांनीं खालील रसभरीत पद तयार करून त्यांस म्हणावयास दिलें.

पद--( गुरुकृपांजन पायो मेरे भाई० या चालीवर. )

" मुकुंद राजा ! तूं प्रिय माझा, लावी देह तूझा रामभक्तिकाजा ॥ धृ० ॥ नवविधा भक्ति करि राघवाची । रामासन्मुख नित्य दासबोध वाची ॥ १ ॥ विवरुनि अर्था साधी परमार्था । निशिदिनीं भज तूं रामसमर्था ॥ २ ॥ तुझा आईबाप रामसीतापती । ओळखि घे त्याची साधूंचे संगती ॥ ३ ॥ तरीच वंशाचा होईल उद्धार । विष्णु कृष्ण जगन्नाथा आवडसि फार ॥ ४ ॥ "

अशारीतीनें परमेश्वरभक्त मुलगा निपजावा म्हणून इच्छा करणारे आईबाप आमच्या या भरतभूमीवर कितीसे निघतील याचा वाचकांनींच विचार करावा. फार तर आपला मुलगा चांगला सुशिक्षित पदवीधर व्हावा, डॉक्टर व्हावा, वकील व्हावा, सरकारी मोठी नोकरी त्यास मिळावी, किंवा मोठा व्यापारी व्हावा अशीच इच्छा बहुतेकांची असते; तेव्हां भट्टजीमहाराजांच्या वरील गोड शब्दांची तारीफ करावी, कीं त्यांच्या या बहुमोल सद्धेतूची शिफारस करावी हेंच आम्हांस समजत नाहीं. विशेषतः आम्हांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं, त्यांच्या पवित्र वासनेप्रमाणेच त्यांचे चिरंजीव मुकुंदराजही श्रीरामरायाची एकनिष्ठ भक्ति करून त्यासन्मुख दासबोध वाचणारे व त्याच्या अर्थाचें विवरण करून आपल्या वंशाचाच काय पण जगाचाही उद्धार करणारे निपजले आहेत. असो.

भट्टजीमहाराजांची रामदास, तुकाराम, वामनपंडीत वगैरे साधुसंतांच्या ग्रंथांवर फार भक्ति होती. त्यांनीं केलेल्या बहुतेक पदांची चाल अमुक अशी मुळींच देतां येत नाहीं. त्यांची खरी धाटी ठाऊक नसलेल्यांकडून तीं पदें ऐकलीं म्हणजे अगदीं गचाळ वाटतात; पण तींच तज्ज्ञांच्या मुखांतून ऐकलीं म्हणजे वृत्ति अगदीं तन्मय करून सोडतात. त्यांपैकीं एक दोन निवडक पदें येथें देतों:—

पद–( कितना श्रमालले, श्रमाल आपुल्या गाई. या चा० )

"रामा ! दयाघना ! क्षमा करुनि मज पाहीं ।
जरि बहु अपराधी खराच मी अन्यायी ॥
तुजविण पाहतांरे ! संसारीं सुख नाही, निमिषभर कांहीं ॥ धृ० ॥
कोठिल कोण मी न जाणिला हा पत्ता ।
आजवरि अज्ञानें मिरविली विद्वत्ता ॥
देहात्मत्वाची स्थिति झाली उन्मत्ता ।
येउनि जन्मारे ! व्यर्थ श्रमविली आई, हेंचि मनिं खाई ॥ रामा० ॥१॥
नाथ अनाथ तूं मायबाप ही तैसा ।
परी मी उद्धवलों पतीत पापी ऐसा ॥
तरि निजनामाचें महत्व सांडिसि कैसा
पावन नामारे ! जाच देति रिपुसाही, साचवपुदाही ॥ रामा० ॥ २ ॥
करुणासागरा ! राघवा ! रघुराजा ।
विषयीं पांगला नका करू जीव माझा ॥
भजनीं चांगला मिळवीं साधुसमाजा ।
भुलुनि प्रपंचारे ! भ्रमुनि भ्रमुनि ठायीं ठायीं हरुनि वय जाई ॥ रामा० ३
सच्चित्सुख जो तूं परब्रह्म केवळ ।
विश्वीं व्यापला तरंगीं जैसें जळ ॥
अवतरतोसि हें उपासकांचें बळ ।
भक्त जनालारे ! चित्रविचित्र उपायीं सतत सुखदायी ॥ रामा० ॥४॥
विष्णु ! कृष्ण ! जगन्नाथ ! तुझा मी लेक ।
चरणीं शरण; दे स्मरण आपुलें एक ॥
हातीं संताची सेवा घडवी अनेक ।
जगदभिरामारे ! मानस हें तव पायीं, जडविं लवलाहीं ॥ रामा० ॥५"

भट्टजीमहाराजांचें खालील वैराग्योत्पादक पद किती सरस आहे पहा:—

पद–( अखंड हरि हरि वदारे बापानो. या चा० )

"सदैव राम राम ह्मणारे बापानो । सदैव राम राम ह्मणा ॥
नरतनु हे दुर्लभ गणारे बापानों । सदैव राम० ॥ धृ० ॥

तुम्हिं प्रपंच केला जरि निका ।
तरि शेवटिं होइल हा फिका ॥
यम काढिल शोधुनि बहु चुका ।
मारमारिल कठिण आइकारे बापानो । सदैव राम० ॥ १ ॥
काय घालवितां वय फुका ।
ध्यानि आठवा रघुनायका ॥
ब्रह्मत्वें आपणा तुका ।
जन्ममरणाला मग मुकारे बापानो । सदैव राम० ॥ २ ॥
देह पडेल कधिं न भरंवसा ।
निज आत्मा आपुला कसा ॥
हें जाणत एकांतीं वसा ।
न कळे तरि गुरुला पुसारे बापानो । सदैव राम० ॥ ३ ॥"
मोठेपणिचा अभिमान सोडा ।
छी ! छी ! देहमीपणा खोडा ॥
दृढ असंगशस्त्रें तोडा ।
आहे अखंड सुख तें जोडारे बापानो । सदैव राम० ॥ ४ ॥
जगिं तारक वैष्णव गुरू ।
त्यांचे चरण जाउनि दृढ धरूं ॥
कृष्ण जगन्नाथ सांगे उद्धरूं ।
आपआपणा सावध करूंरे बापानो । सदैव राम० ॥ ५ ॥

गोमांतकांत बहुतेकठिकाणीं देवाचा उत्सव झाला म्हणजे त्याच्या सांगतेच्यावेळीं गौळणकाला म्हणून करीत असतात. गौळणकाला म्हणजे भगवान श्रीकृष्णानीं गोकुळांत केलेल्या लीलाविहाराचें दृश्य वर्णन होय. हे गौळणकाले अनेक कविंनीं नाटकरूपानें तयार केले असून त्यांनीं आपल्या स्वभावास अनुसरून ते शृंगार-शास्त्राची मूर्तिमंत प्रतिमाच बनविले आहेत ज्या श्रीहरीच्या चरित्रश्रवणानें तत्काल भवबंध तुटून परमपदाची प्राप्ति होते त्या मंगलकारक चरित्राचा असा हेतुविपर्यास झालेला पाहून भट्टजीमहाराजांस फार वाईट वाटलें व त्यांनीं उत्तम असे दोन गौळणकाले तयार केले. त्यांतील पदें पाहिलीं म्हणजे कर्त्याच्या विलक्षण चातुर्या-

बद्दल तारिफ करावी तेवढी थोडीच वाटते. कारण त्या काल्यांनीं विषयासक्तांची व विरक्तसज्जनांची सारखीच करमणूक होते. कल्पनेचा साक्षी जो चैतन्यघन **आत्मा** तो **श्रीकृष्ण,** विवेक वैराग्यरूप आत्मसखे ते **गोपाळ,** सकल इंद्रियवृत्ति ह्या **गोपिका,** व शुद्धसत्वात्मक ज्ञानमायारूप जी तुर्या किंवा निवृत्ति ती **यशोदा,** शुद्ध निर्विकल्प असे जे आत्मसुख तें **दहीं. दूध, लोणी,** वगैरे होय. अशी योजना त्यांत केलेली आहे. त्यांपैकीं थोडासा मासला:—

" गोकुळांत तूं अशा नानाप्रकारच्या खोड्या करून गोपिकांस व्यर्थ कां त्रास देतोस ? " असें यशोदेनें विचारल्यावरून भगवान तिला सांगतातः—

**पद. ( मलय गव्हरीं अद्भुत शोभा पाहुनियां शबरी० या चा. )**

**निर्विकल्प सच्चिदानंद मी नेणती या मातें ।**
**केवळ जडतनु शाश्वत मानुनि कल्पिति कामातें ॥ ध्रु० ॥**

**मन्मूर्तिवरि बळकट प्रेमें लंपट मन करिती ।**
**विषयदृष्टिनें दिननिशि हा आकार हृदयिं धरिती ॥**
**दृश्य चराचर चिन्मय ऐसी वृत्ति न तिळभरि ती ।**
**आत्मसुखास्तव आळविती बहु मज निष्कामातें ॥ निर्वि०॥१॥**

**यद्यपि चिद्धन तो मी या अबलांसि नसे ठावा ।**
**केवळ सगुणीं पूर्ण जयांहीं धरिलें सद्भावा ॥**
**जाणुनि मी अवतारि हांय मद्भक्तांच्या गांवा ।**
**माया ब्रह्मीं सहज घडे हा स्फुरण धर्म मातें ॥ निर्वि० ॥ २ ॥**
**अवस्था त्रयातीत हरिन नवनीत कसा यांचें ।**
**जसा तसा असतांचि स्फूर्तिरुप जग नटलों साचें ॥**
**तंतूपट मृदूघट दृष्टांतें कारण कार्याचें ।**
**कर्ता कृष्ण जगन्नाथ नसुनि घे मी नामातें ॥ निर्वि० ॥ ३ ॥**

या एकाच पदावरून भट्टजींची कवित्वशक्ति, चातुर्य, अनुप्रास व अर्थगौरव वगैरे गोष्टींची वाचकांस सहज कल्पना होणार आहे !

याप्रमाणें भट्टजीमहाराजांनीं केलेली एकंदर पदें सुमारे आठशेवर होतील. त्याशिवाय ' स्वात्मतत्वामृत, मानसपूजा ' हे दोन लहानसे वेदांताचे ग्रंथ आणि

'शुकरंभासंवाद, लोपामुद्रासंवाद. नटसुभद्राविलास व अहिल्योद्धार' अशीं चार संगीत नाटकें तयार केली आहेत. त्यांतील एकच 'अहिल्योद्धार' तूर्त उपलब्ध असून बाकीची नामशेष झाली ? त्यांनीं आनंदरामायणांतील कांहीं भागावर कीर्तनाकरितां सुरस आख्यानें करून ठेविलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—

"व्यासवरदान, शतजीर्णावरदान, तुलसीपत्रसधान, हास्यमुक्ति, यागकांड, यात्राकांड, चंपिकासुमतिस्वयंवर, यूपकेतूस्वयंवर, पिंगलाख्यान, दुर्वासभोजन, नागरिकोपदेश, सगुणाख्यान, गुणवत्याख्यान."

याशिवाय त्यांनीं केलेले अभंग व कोंकणीभाषेतील काही स्फुटश्लोक वगैरे बरेच आहेत. त्यांना मोरोपंताप्रमाणें चित्र काव्याचाही फार नाद होता. नमुन्यासाठीं एक अष्टक येथे देऊन या चरित्राची समाप्ति करूं.

"प रात्परश्रीपति रामभू प । प दीं रमे त्या सुख दे अमू प ॥
प रावर व्यापक चित्स्वरू प । प रेश भक्तांस्तव जो सरू प ॥१॥

ती रं वधीं शोधुनियां अरा ती । तीत्रें गुणें सज्जन पक्षपा ती ॥
ती नीं गुणीं लिप्तनयत्प्रभा ती । ती र्थास्पदें यद्गुण साधु गा ती ॥२॥

त द्रूप ये नाम जरी मुखां त । त ल्लीन होतो जीव यत्सुखां त ॥
त रावया यत्न असा भवां त । त थापि जाती जन रौरवां त ॥ ३॥

पा वे स्मरू त्या जरि मायबा पा । पा हे प्रयत्नें हरुनी त्रितापा ॥
पा ळी कृपें ओढुनि आत्मचा पा । पा पां न ठेवी भजु त्या रमा पा ॥४॥

व रिष्ठ जो एकचि रामदे व । व रीन मी त्या हृदयीं सदे व ॥
व दें न तन्नाम अवश्यमे व । व सन देऊनि तयासि खे व ॥ ५ ॥

न रेश्वरा रामासदया समा न । न रां सुरांमाजि जगन्निधा न ॥
न सांवळें रूप न होय मा न । न मूनि ज्या देति समस्त मा न ॥६॥

रा त्रिंचरा देउनि तीव्र मा रा । राजेश्वरें आणियली स्वदा रा ॥
रा ज्यासनीं बैसुनि कारभा रा । रा ष्ट्रींय जो चालवि भक्तथा रा ॥७॥

म नीं मुखीं ज्या प्रिय आत्मना म । म वाळ त्या रुप्यावरि पूर्णका म ॥
म रासती बादवि सौख्यधा म । म दोद्धतांचा करुनी विरा म ॥८॥"

पतीतपावना रामा श्लोकाष्टक तुझें तुम्हां ॥
विष्णू कृष्ण जगन्नाथा रचिलें स्फूर्तिनें तुझ्या ॥ ९ ॥

भाषाशास्त्राचें कांहींच ज्ञान नसतां उत्तम कविवर्यांच्या पंक्तीस बसण्याजोगी कवित्व भट्टजीमहाराजांनी केली, यावरून त्यांची योग्यता सामान्य नव्हती हें सहज लक्षांत येतें. ईश्वरी अनुग्रहांवांचून असें घडणे फार कठीण आहे. अस्तु.

यापेक्षां भट्टजीमहाराजांचें विस्तृत चरित्र त्यांच्या काव्यांसह लौकरच प्रसिद्ध होईल अशी आम्हांस मिळालेल्या खात्रीपूर्वक माहितीवरून मोठी उमेद वाटते.

---

# प्रकरण ३ रें.

## " शूर मुत्सद्दी. "

# दिवाण रामचंद्र म्हाले.

" दैवं फलति सर्वत्र न विद्या नच पौरुषम् "

दैव श्रेष्ठ कीं उद्योग श्रेष्ठ हा वाद करीत बसणे अगदीं निरर्थक होय. ' आधीं बीज कीं आधीं वृक्ष ' किंवा ' आधीं पक्षी कीं आधीं अंडे ' यांचा निर्णय करणें जितकें अशक्य आहे तितकेंच वरील प्रमेय सोडविणें अशक्य आहे. नशीब श्रेष्ठ म्हणावें तर त्याच्या विरुद्धही कांहीं उदाहरणे सांपडतात; बरें उद्योग श्रेष्ठ म्हणावा तर त्या म्हणण्यालाही हरताळ लावण्याची पाळी येते. पुण्यपापात्मक कर्म मिथ्या नव्हे, ते भोगल्यावांचून सुटकाच नाहीं. याविषयीं प्रत्यक्ष प्रमाण आपल्या डोळ्यांपुढें सार्वकाल आहे पण त्याचा आपण विचारच करीत नाहीं. आपण नेहमीं पाहतों कीं कोणी मनुष्य अल्पायु होतो तर कोणी निजाम उत्मुल्कासारखा शंभर वर्षांवरही वाचूं शकतो ! सर्वसंग परित्याग करणारे रंगनाथ स्वामीसारखे महात्मे राजभोग भोगतात तर त्याच कोटींतल्या श्रीसमर्थांसारख्यांना झोळी फिरवावी लागते ! कोणी एकपाठी तर कोणी तपेंची तपें विद्यार्जनांत घालवून अखेरीस कोरडेचे कोरडे राहतात ! कोणी अलोट विद्या संपादन करूनही काळजींत दिवस कंठितो तर कोणी सही पुरतेंच लिहिता येणारा लाखो रुपयांचा ढीग पाडतो ! कोणी बाळदरिद्री दत्तक होऊन राजा बनतो तर कोणी राजपदावरून घसरून बंदिवासांत पडतो ! कोणी आयत्या बिळांत नागोबा होतो तर कोणा एखाद्या लाखोपतीच्या घरीं दरोडा पडून त्या बिचाऱ्याचें सर्वस्व जातें ! निर्जीव वस्तूंस देखील हा दैवयोग सोडीत नाहीं. एका दगडाची मूर्ति तयार होऊन राजापासून रंकापर्यंत सर्व लोक तिच्या पायावर लोटांगणें घालितात व कांहीं दगड त्याच देवळाच्या फर्शीस लागून त्यांस आबालवृद्धाच्या लाथा खाव्या लागतात. दुसऱ्या कांहीं दगडांची योजना देहधर्म करावयाचे खोलींत होते. तेव्हां याजवर कोणी अशी शंका घेतील कीं, निर्जीव वस्तूंस ज्ञान नसतें अर्थात् त्यांस न्यूनाधिक स्थितीचें महत्व कोठून असणार ! पण हा निव्वळ भ्रम आहे. तरी कदाचित यांत कशाचें दैव असें म्हणतां येईल; परंतु अश्ववृषभादि श्वापदांस किंवा शुकसारिकादि

विहंगमास तर सुखदुःख भोगावे लागतें. तेव्हां ते गरीबांच्या घरी पडले तर त्यांस दिवसभर काबाडकष्ट करून प्रसंगानुसार उपाशीही राहावें लागतें. आणि राजाच्या पदरी पडले तर सामान्य माणसांपेक्षांही जास्त बडेजाव राहून कामही अगदीं बेताचेंच करावें लागतें तर हे फळ कसलें? एकंदरींत शिरोभागीं निर्दिष्ट केलेल्या कव्युक्तीप्रमाणें दैव आहे असेंच मानावें लागतें. व ह्या विधानाची प्रतीति खालील चरित्रांत चांगल्यारीतीनें पाहावयास मिळेल.

कारवार जिल्ह्यांपैकीं कुमठा येथे गौडसारस्वत ब्राम्हण ज्ञातीची बरीच वस्ती आहे. विशेषतः ही सारी मंडळी वैष्णवसंप्रदायी असून व्यापारी आहे. अलीकडे पांच दहा वर्षांत मात्र त्या लोकांना विद्येचें महत्व कळूं लागल्यामुळें तिच्याकडे त्यांची प्रवृत्ति होऊं लागली आहे इतकेंच नाहीं तर स्वतःच्या कष्टाजित द्रव्यामधून ' न्यू इंग्लिश स्कूल ' सारख्या उत्तम शिक्षण संस्था तेथील मंडळींनी चालविल्या आहेत. ही अभिनंदनीय गोष्ट होय. असो. ह्याच गावांत एका कुलीन घराण्यांत प्रस्तुत चरित्रनायक रामचंद्र म्हाले यांचें जन्म झालें. याच्या जन्मकालाची तारीख नक्की माहित नाहीं; तथापि त्याच्या कारकीर्दीवरून ते शालिवाहन शक १५४५ अथवा त्या सुमारास जन्मले असावे. ह्यांचें मूळ उपनांव निराळें असून कांहीं महालाचा अधिकार यांजकडे चालून नतर ' म्हाले ' हेंच अभिधान पुढें व्यवहारांत रूढ झालें असावें. त्यावेळी यांचे घरची अत्यंत गरीबी आणि प्रपंच तर वाढता असल्यामुळे रामचंद्र म्हाल्याचे आजे विनायक म्हाले ( यांस गणेश म्हालेही ह्मणत. ) कांहीतरी रोजगार पहाण्याच्या हेतूनें देशसंचारास निघाले. त्यावेळीं म्हैसूरजवळ शिमोग्यापासून ५० मैलांचे अंतरावर ' नगर ' ह्मणून जो एक हल्लीं प्रसिद्ध गाव आहे तेथें पूर्वी एक लहानसें संस्थान होतें. फारकरून विजयनगरच्या पाळेगारींपैकीं हें एक असावें असें वाटतें. त्यावेळीं हे नगर संस्थान ' बिदरूर ' ह्या नावानें प्रसिद्ध होतें. ज्यास विजयनगरच्या प्राचीन हिंदुसाम्राज्याची व तेथील अनंत वैभवाची कल्पना असेल त्यास पुनः ह्या बिदरूरनगर संस्थानचें निराळें वर्णन सांगावयास नको. ह्या गांवची रचना जुन्या तऱ्हेची होती. पूर्वपश्चिम ३ मैल व दक्षिणोत्तर ३ मैल अशी ह्याची लांबीरुंदी असून सभोंवार दगडी कोट बांधलेला होता. त्याच्या बाहेर सुमारें दोनचार पुरुष उंचीचा खोल खंदक असे. बाहेरून आत येण्यास आठी दिशांवर मोठमोठाले आठ दरवाजे असून तितक्याहि ठिकाणी सक्त पाहारे असत इतक्या पाहऱ्यांतून जेव्हां आंत जावें तेव्हां नगरात प्रवेश व्हावयाचा. ह्या एकंदर दरवाजांवर परक्या

ठिकाणांतून येणाऱ्या मालावर जकात घेण्यांत येत असे; परंतु कोणत्या मालास किती जकात घ्यावी याचा कांहीं नियम बांधलेला नव्हता. जकात वसूल करणारा नोकर जें सांगेल तें प्रमाण, आणि वसूलवसलातीसंबंधानेंही तेथें बरीच अव्यवस्था होती; पण येथील व्यापारासंबंधीं व कारखान्यासंबंधीं बराच लौकीक होता. विजापुरांतील प्रसिद्ध मुल्कमैदान तोफ ह्याच नगरांत इ० स० १५४९ मध्यें तयार केली होती व अद्याप तिचा साचा तेथें आहे म्हणतात. यावरून तेथील कारागिरीचें चांगलें अनुमान होतें. विनायक म्हाले फिरत फिरत ह्या नगरसंस्थानांत आले. त्यांनीं कुमठ्याहून निघतांना बरोबर वाटखर्चाकरितां पैसाअडका कांहींच घेतला नव्हता, नाहींच तर घेणार कोठून! फक्त स्वतःच्या बागांतील कांहीं नारळ मात्र घेतले होते; तेव्हां प्रवासांत त्यांचा उपयोग झाल्यामुळें अवघे १८ नारळ त्यांचेकडे शिल्लक राहिले, तेवढेच घेऊन ते नगरास पोहोंचले.

रीतीप्रमाणें दरवाजावर जकात दिल्याशिवाय आंत जाण्यास त्यांना प्रतिबंध झाला; बरोबर तरी विष खाईन म्हटल्यास पैसा नाहीं. अशास्थितींत त्यांनीं आपल्याकडील नारळ जकातीबद्दल घेऊन आपणांस सोडावें अशी जकात वसूल करणाऱ्या कामदाराकडे विनंति केली. अशाप्रकारची त्यांची दीनस्थिति पाहून त्या नोकरांसही करुणा आली व जकातीबद्दल एक आणि नाक्याच्या मर्यादेकरितां एक, याप्रमाणें २ नारळ घेऊन त्यांस आंत सोडण्याचें ठरविलें. प्रत्येक नाक्यावर दोन असे आठ नाक्यावर १६ नारळ आणि गांवच्या वेशींत २ याप्रमाणें १८ ही नारळ देऊन एकदांचे ते गांवांत शिरले; नंतर त्या अवाढव्य शहरांत कोणीकडे जावें, काय उद्योग करावा, कसें वागावें याबद्दल त्यांना मोठी पंचाईत पडली; पण ते जात्या लहानपणापासून चतुर व धैर्यवान असल्यामुळे त्याचें त्यांस कांहींच वाटलें नाहीं, आणि तेथील अंदाधुंदी व अव्यवस्था जाणून त्यांनीं अशी कांहीं नामी युक्ति काढली कीं, तिच्यायोगानें त्यांना संस्थानांतील दिवाणगिरी मिळाली! प्रत्येक नाक्यावर जकात देऊन गांवांत गेल्यावर विनायकरावजींनीं गांवच्या वेशींतच एक दोन अंकणाची खोली भाड्यानें घेतली व एक नोकर ठेवून घेतला. बाहेरून गांवांत येणाऱ्या इसमास त्यांचेकडे आणावें, ही त्याची कामगिरी होती. त्याप्रमाणें प्रत्येक इसमाकडून विनायकरावजींनीं कांहीं पैसे वसूल करावे, त्यांचें नांव, गांव, जात, धंदा वगैरे टिपून घ्यावा आणि त्यांस ' अठरा काइनवासुंका कुमठे गणेशैय्यनरजू ' याप्रमाणें स्वदस्तुरची पावती देऊन गांवांत सोडावें. असा प्रकार सतत दीड वर्षपर्यंत

घालला होता तरी ते कोण, त्यांचा अधिकार काय, वगैरे त्याजबद्दल कांहींच चौकशी झाली नाहीं! लोकांनाही आठ जकातीबरोबर ही एक नववी जकात वाटली होती; म्हणून त्यांनाही वासपूस करण्याचें कारण नव्हतें. असें होतां होतां अखेरीस यांच्या स्वदस्तुरची एक चिठ्ठी त्यावेळचा संस्थानाधिकारी शिवप्प नाईक यांचे हातांत गेली. ती चिठ्ठी पाहतांच त्यांस फार आश्चर्य वाटलें आणि असा नवीन इसम आपल्या गांवांत कोण आला आहे त्याचा तपास करून त्यास आपल्याकडे आणण्या-विषयीं हुकूम केला. त्याप्रमाणें हे राजाच्या भेटीस गेले असतां असें करण्याचें कारण विचारिलें; तेव्हां आपल्या कृत्याबद्दल अगोदर राजाकडून अभयवचन घेऊन केवळ राजाची भेट होऊन आपणांस कांहीं तरी उद्योग मिळावा म्हणून ही शक्कल काढली. याशिवाय दुसरा कांहीं हेतु नव्हता असें त्यानें सांगितलें. हें ऐकून राजास त्याच्या चतुर-त्वपणाची मोठी तारीफ वाटली, आणि असा बुद्धिवान् पुरुष आपल्या पदरीं असावा असें त्यास वाटून त्यांनीं विनायकरावजींस एक चांगली अधिकाराची जागा दिली.

त्यावेळीं नगरसंस्थानांत नेळगी शिवरामैय्या म्हणून एक हवीक जातीचे प्रधान होते. वस्तुतः सुख किंवा दुःख हें ज्याच्या त्याच्या कर्मावर अवलंबून असतें. अमका एक माणूस आपणास सुख देतो, किंवा दुःख देतो असी भावना करणें व्यर्थ होय. कारण,

" सुखस्य दुःखस्य न कोपि दाता परो ददातीति कुबुद्धिरेषा ॥
अहंकरोमीति वृथाऽभिमानः स्वकर्मसूत्रग्रथितोहि लोकः ॥ "

असें वसिष्ठ महामुनींचें वचन आहे; परंतु सामान्य व्यवहारामध्यें याचा अनुभव अगदीं उलट येतो. वृथा अभिमानाचें आणि कुबुद्धीचें प्राबल्य मात्र जास्त दिसतें व त्यायोगानें एकमेकांचा एकमेक मत्सर करण्यासही मागचा पुढचा विचार करीत नाहींत, ही स्थिति मानवी समाजांत पूर्वीपासून आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

त्याचप्रमाणें नगरसंस्थानांतही त्यावेळीं लोकांनीं विनायकरावजींशीं वरीलप्रमाणें हेवा करण्यास कमी केलें नाहीं. त्यांना आपल्या सुखास विनायकरावजींची अडचण आहे असें वाटूं लागलें; आणि हरएक तऱ्हेनें त्यांनी त्यांचा छल करण्यास आरंभ केला; पण अखेरीस वरील वसिष्ठमहामुनींच्या वचनाप्रमाणें यशाचा वांटा विनायकरावजीं-सच मिळाला आणि तदनुरूप त्या संस्थानांत त्यांना कायम प्रधानकीची वस्त्रें मिळालीं ? याचें नांव प्रारब्ध !!

अशारीतीनें विनायकरावजी नगरसंस्थानांत प्रधान झाल्यावर त्यांनी कुमठ्याहून

आपलें सर्व बिऱ्हाड नगरास आणिलें. तेव्हां त्यांचे नातू म्हणजे प्रस्तुत चरित्रनायक रामचंद्र म्हाले हे सरासरी पंधरा सोळा वर्षांच्या वयाचे होते. त्यांचे वडीलांचें नांव विठ्ठल म्हाले असें होतें. पण रामचंद्ररावजींस वडिलांपेक्षां आजोबाचें वळण जास्त होतें. त्यामुळें पुढें थोड्याच दिवसांनीं त्यांनीही आपल्या आजोबाची जागा पटकावली. आणि स्वतःच्या सद्गुणसदाचरणादिकांनीं ते सर्वांस विशेषतः आपल्या धन्यास परम आदरणीय झाले. ' बापासारखा पुत्र होतो. ' हे जरी सत्य आहे, तरी कधीं कधीं पूर्वसंचितानुसार बापापेक्षांही मुलगा सवाई सद्गुणी व महापराक्रमी निपजतो. तसेच दिवाण रामचंद्र म्हाले होते. त्यांच्या अंगीं स्वामिनिष्ठा इतकी कांहीं जाज्वल्य होती कीं तिच्यायोगानें त्यांनीं आठ घटकापर्यंत राजपदाचा देखील उपभोग घेतला. त्याविषयीं अशी हकीकत आहे कीं, एकदां रामचंद्र म्हाले सरकारस्वारीबरोबर कांहीं राजकारणासंबंधानें गोष्टी बोलत बसले होते फार करून प्रत्येक माणसास स्वाभाविक कसलें तरी रिकामपणचें खोड ह्मणून असते, कोणास मिशा चावण्याची तर कोणास काडी मोडण्याची, कोणी मांडीच हालवितो तर कोणी बसल्या बसल्या बोटें मोडतो, कोणास तर तोंडानें नखें काढण्याची सवय असते, तेव्हां अशाच प्रकारांपैकीं मिशा पिरगळण्याची एक उपजत खोड रामचंद्र म्हाल्याच्या धन्यास म्हणजे भद्रपनाईक यास होती. हे त्यावेळीं नगरसंस्थानचे गादीवर होते. तेव्हां गोष्टी चालल्या असतां त्यांचा मिशा पिरगळण्याचाही क्रम चाललाच होता. इतक्यांत, कर्मधर्मसंयोगानें मिशींतील एक केस तुटून त्यांच्या हातांत आला. जवळ रामचंद्र म्हाल्यावांचून दुसरे कोणी नव्हते. म्हणून साहजीक त्यांनीं आपल्या हातांतील केस टाकण्याकरितां म्हणून म्हाल्याकडे दिला. पण म्हाल्याचा अधिकार मोठा होता हें लक्षांत आणून त्यांनीं स्पष्टपणें त्यांस केस टाकण्याविषयीं आज्ञा केली नव्हती. फक्त ' इत्तगोळगि ' म्हणजे ' हें घ्या. ' असें मोघम सांगितलें. परंतु राजाज्ञा शिरसावंद्य समजून लागेच त्यांनीं मोठ्या अदबीनें तो केस आपल्या हातांत घेतला. पुढें तो प्रसंग गुदरून रामचंद्ररावजी आपल्या बिऱ्हाडीं आले आणि एक सुवर्णाची चांगली डबी तयार करविली, तिला सभोंवतीं उत्तमोत्तम रत्नें लाविलीं. व त्या बहुमोल जडावाच्या डबींत तो आपल्या धन्यानें दिलेला केस ठेवला. आणि ती डबी ते नेहमीं आपल्या कंबरपटीस ठेवूं लागले.

या गोष्टीस कांहीं दिवस गेल्यावर पुनः एकदा राजाशीं एकांतीं बोलण्याचा प्रसंग आला. त्या प्रसंगांत साहजीक बोलतां बोलतां राजानीं ' मुंद येन माडिद्रि ' ह्मणजे

'पुढें काय केलें' असें म्हटलें. त्याबरोबर म्हाल्यांनीं आपल्या कनवटीची ती सुंदर रत्नजडित डबी काढून त्यांच्या हातांत दिली. त्याबरोबर राजास फार आश्चर्य वाटून त्यानें त्याचें कारण विचारिलें. तेव्हां म्हाल्यांनीं अमुक दिवशीं आपण माझेजवळ केस दिला होता तो अशारीतीनें काळजीपूर्वक जपून ठेविला आहे म्हणून सांगितलें. हें ऐकतांच राजास फार संतोष वाटला कारण नुसत्या माझ्या एका केसाला हे इतके जपतात तर मग माझ्या सबंध देहाविषयीं व एकंदर राज्याविषयीं हे किती काळजी बाळगत असतील बरें! असें राजाला दिसलें. आणि लगेच प्रसन्न अंतःकरणानें त्यांनीं रामचंद्ररावजीस वाटेल ते मागण्याविषयीं आग्रह केला. तेव्हां म्हाल्यांनीं नम्रपणानें सांगितलें, महाराज! जर आपली देण्याची मर्जी असेल तर साडेतीन घटिकापर्यंत आपली राजमोहोर माझ्या ताब्यांत द्यावी हें ऐकताच राजास मोठी चिंता पडली. कारण आठ घटकापर्यंत राज्यपदाचा अधिकार यांनीं मागितला तेव्हां न जाणो यांच्या हातून काय प्रकार घडेल याचें अनुमान करतां येत नाहीं तथापि त्यांच्या चतुरतेमुळें सहसा त्यांच्याकडून कांहीं वावगें कृत्य घडणार नाहीं, व वचनभंगाचें पातक आपल्या शिरास लागू देणें हेंही योग्य नाहीं, असा पोक्त विचार करून राजानें मोहोर देण्याचें कबूल केलें. परंतु रामचंद्ररावजींनीं त्याच घटकेस ती न घेतां कांहीं मुदत मागून घेतली आणि त्या मुदतींत ठिकठिकाणीं अनेक देवस्थानें बांधिलीं व त्याठिकाणीं पूजा, नंदादीप, नैवेद्य वगैरे अखंड चालण्याकरितां जमिनीची योजना करून त्याबद्दल शिलालेख ताम्रपट्ट लिहून तयार केले, गोकर्णासारख्या क्षेत्राचे ठिकाणीं अन्नसत्र चालण्याबद्दल व्यवस्था केली. अशारीतीनें बहुतेक धर्मार्थ व राज्यास श्रेयस्कर अशा कृत्यांची तयारी करून एके दिवशीं राजाचें प्रसन्नचित्त आहे असें पाहून मोहोर मागून घेतली आणि तेवढ्या साडेतीन घटकेच्या अवकाशांत त्या ताम्रपट्टांवर व शिलालेखांवर ती राजमोहोर मारण्यास प्रारंभ केला कांहीं मोहोरा मारून झाल्यावर साडेतीन घटका भरल्या तेव्हां ती मोहोर राजाच्या स्वाधीन केली इतक्या साडेतीन घटकेमध्यें राजमोहोरेचा म्हाल्यांनीं कोणता उपयोग केला म्हणून राजानें प्रश्न केला. तेव्हां त्यांनीं ते सर्व शिलालेख ताम्रपट्ट आणून राजाच्या पुढ्यांत ठेविले. तो सर्व प्रकार पाहून राजा फारच खूष झाला आणि रामचंद्ररावजींच्या बुद्धिमत्तेची व त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या राजनिष्ठा, निर्लोभता इत्यादि अनेक बहुमोल गुणाची तारीफ करून असा गुणी माणूस सुदैवानें आपल्या पदरीं आहे याबद्दल

त्यांनी स्वतःस धन्यता मानून घेतली. व आपली एकदोन लेख शिल्लक राहिले होते त्यावर स्वतः राजांनी मोहोर मारून रामचंद्ररावजींच्या कृत्याची पूर्णता केली.

हीं म्हाल्यांनीं बांधलेलीं सर्व देवस्थानें कर्नाटक प्रांतांत वेंकटापुर, कासरकोड, होन्नावर, गंगोळी, वगैरे ठिकठिकाणीं असून त्यांच्या नेमणुकाही अद्याप चालत आहेत. प्रत्येक देवस्थानांत शिलालेख आहेत. त्यांपैकीं होन्नावर येथील देवस्थानांतील एकच शिलालेख नमुन्यासाठीं येथें देतों:—

श्री

निर्विघ्नमस्तु शुभमस्तु होंनावरद श्रीवेंकटेशदेवरिगे बिट्टस्वास्थे दयागिलमकि स्थळद शिलालेखद पट्टेप्रति ॥

नमस्तुंग शिरश्चुंबि चंद्र चामर चारवे । त्रैलोक्य नगरारंभ मूलस्तंभाय शांभवे ॥ १ ॥ स्वस्तिश्री जयाभ्युदय शालिवाहनशक वरुष १५८५ नेय शुभकृत संवत्सरद ज्येष्ठ शु॥ १५ लु श्रीमतु होन्नावरदलि रामचंद्र म्हल्येतु प्रतिष्ठे माडिद वेंकटेशदेवर देवताकट्ळेगे—श्रीदेडव मुरारि कोटिकोळागळ विशुद्ध वैदिक द्वैतसिद्धांत प्रतिष्ठापक परायणराद केळदे संकण नाईकर प्रपौत्ररु सिद्धपनाईकर पौत्ररु शिवपनाईकर पुत्ररु आद भद्रपनाईकरु कोट्ट धर्मशासनद क्रमवेंतेंदरे—प्राकुद्रिपुर वागिनडदु बरुतिद्द स्वास्थे चंदावरद शीमे करीकेरेगरणे ग्रामदिंदा बडगेरे स्थळदयालिद मुडनदिन मक्कि बीज मुडे १२ के ग० ८२ क्रम २८४ हुट्टवळि विकारि संवत्सरदलु बरिसिद प्रमाण अकिमुडे ३० इदक्के बंद हकलिगे सहाचतुर्गडिविवरामूडलु गुड्ड नीरेर कलुगडितें कलुगुंडी बेलस्थळद गुड्डे नीरेर कलगडि पडवलुर यालिहित्तलिन तोत्तिनलु नट्ट वामनमुद्रेकलु बडगलुगुडे नीरेर कलुगडि इंति चतुर्गडिसीमेयोळगाद भूमियलि तेंगु अडके गद्दे हकलसहा लागामे माडिकोंडु आद उत्पत्तियंनु रामचंद्र म्हाल्यर मुखांतर देवता कट्ळे कंदाचार मुंताद धर्मके धीवार्पित वागि बिट्ट धर्मशासन ॥

**आदित्य चंद्रावनिलो नलश्च द्यौर्भूमिरापो हृदयंयमश्च ।**
**अहश्चरात्रिश्च उभेचसंध्ये धर्मस्यजानाति नरस्यवृत्ति ॥ १ ॥**

**दानपालनयोर्मध्ये दानाच्छ्रेयोनु पालनं ।**
**दानात्स्वर्ग मवाप्नोति पालनादच्युतं पदम् ॥ २ ॥**

स्वदत्ताद्विगुणं पुण्यं परदत्तानुपालनं ।
परदत्तापहारेण स्वदत्तं निष्फलं भवेत् ॥ ३ ॥

श्रीसदाशिव

मोहोर

हा अस्सल शिलालेख होनावर येथें म्हाल्यांनी बांधिलेल्या वेंकटेश देवस्थानांत पाहण्यास मिळेल.

याप्रमाणें रामचंद्र म्हाल्यांच्या चरित्रासंबंधीं जेवढी माहिती आम्हांस उपलब्ध झाली तेवढी येथें नमूद केली आहे. त्यांच्या निधनाची तारीखही कोठें उपलब्ध नाहीं. त्यांचे वंशजांपैकीं एक घराणें मात्र हल्लीं होनावर येथें आहे व त्या घराण्यांतील मुख्य पुरुष चरडप म्हाले या नावानें प्रसिद्ध असून ते सुखवस्तु आहेत. त्यांचेपाशीं रामचंद्र म्हाल्यांचे तीन ताम्रपट्ट असून ते आम्हीं स्वतः पाहिले आहेत. विस्तार भयास्तव त्यांचा उतारा येथें दिला नाहीं. यांच्या दिवाणगिरीच्या कारकीर्दीसंबंधानें खुद्द नगर येथील श्रीमान सावकार चंद्रैय्यन वामनराव यांचे घरीं त्यावेळचा एक कानडी लेख आहे व नगरसंस्थानच्या राजपुरुषांची वंशावळ असून अमूक वर्षापासून अमुक वर्षापर्यंत अमक्यांनी राज्य केलें असा मितीवार त्यांत उल्लेख आहे. तेव्हां ह्या साधनांवरून हें लहानसें चरित्र लिहून रामचंद्र म्हाल्यांचा परिचय करून देण्याची सुसंधी आम्हांस मिळाली याबद्दल नगरसावकार वामनराव आणि चरडप म्हाले मोख्त्यार वकील होनावर या उभयतांचे आम्ही फार आभारी आहों. असो.

एकंदरीत स्वामिनिष्ठा, सत्यप्रीति, निर्लोभता, परोपकारबुद्धि इत्यादि उच्चतम गुणांचा म्हाल्यांचे ठिकाणीं पूर्ण विकास झालेला होता म्हणून थोड्याशा विद्येनें ते मोठ्या योग्यतेस चढले. जो महापुरुष मनःपूर्वक शहाणपणाचीं कामें उत्पन्न करून शेवटास नेतो, तो प्रथमारंभीं कितीही लहान असला तरी तो आपल्या शहाणपणाच्या जोरावर प्रबल होतो, आणि हा कार्यकर्ता पुरुष लहानाचा मोठा झाला असें पाहून इतर लोक त्याचा द्वेष करूं लागतात ! पण अखेरीस त्या कार्यकर्त्या चतुर पुरुषाचाच जय होतो. ही गोष्ट प्रस्तुत चरित्रावरून चांगली निदर्शनास येते. तेव्हां अशा लोकोत्तर गुणांनीयुक्त असलेलीं माणसें राजदरबारांत, समाजांत, कुटुंबांत किंबहुना राष्ट्रांत जरी उत्पन्न झालीं तरी तीं राष्ट्रोन्नतिरूप इमारतीचीं मुख्य आधारस्तंभच समजलीं पाहिजेत. त्यांवांचून ती इमारत सदृढ होण्याची आशा नको.

# दिवाण रामचंद्र मल्हार सुखठणकर.

" नरपति हितकर्ता द्वेष्यतां याति लोके ।
जनपद हितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ॥
इतिमहति विरोधे विद्यमाने समाने ।
नृपति जनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥ "

राजा कितीही हुशार व दक्ष असला तरी त्याला मंत्रीही तशाच योग्यतेचा लागतो; कारण राज्याचीं बहुतेक सूत्रे मंत्र्याच्याच हातांत असतात. मंत्री हा राजा व प्रजा यांजमधील वकील आहे तेव्हा प्रजेचे सुखदुःख या वकीलावरच बहुतेक अवलंबून असतें. मंत्र्याची स्थिति कांहीशी मृदंगासारखी असते. मृदंगाला जसा दोन्हीकडून मार खावा लागतो, तसा केवळ राजाचेंच हित पाहणारा मंत्री असला तर त्याला प्रजेचा निरर्गल वाक्प्रवाह सोसावा लागतो; व केवळ प्रजेचेच हित पाहणाऱ्याला राजाचा अवकृपाखड्ग मानेवर कधीं बसेल याची रात्रंदिवस काळजी बाळगावी लागते. तात्पर्य एका संस्कृत कवीने वरील उक्तीत म्हटल्याप्रमाणे उभयतांचे हिताकडे लक्ष्य पुरविणारा मुत्सद्दी पुरुष दुर्लभ असतो. त्याला अनेक धोरणें संभाळावीं लागतात. राजा, प्रजा व आपला देश या त्रयीच्या संरक्षणाकरितां त्याला परराज्याशी अनेक मसलती कराव्या लागतात. कोणत्यावेळी काय गोष्ट घडून येईल याचा कांहीं नेम नसल्यामुळे त्याला प्रत्येकाच्या हालचालीवर डोळ्यांत तेल घालून नजर ठेवावी लागते. मुत्सद्याचे अंगीं प्राधान्ये करून कोणकोणते गुण अवश्य लागतात त्याचें कविवर्य श्रीमुक्तेश्वराने फारच मार्मिक वर्णन केले आहे. ते म्हणतातः—

" युगांति अपाय लागे जेणे । त्याची चिंता आधींच करणें ।
उपेक्षा केलिया आपणें । घात केला आपुला ॥
कृत्रिमें दाऊनि मित्रधर्म । शोधोनि ठायीं पाडावें वर्म ।
आपुलें अंग लपवी कूर्म । तेंवी स्वदोष झांकावे ॥
शोधिजे परबुद्धिचा ठाव । कळों नेदिजे आपुला भाव ।
स्वार्थ साधे तो उपाव । नाना यत्नीं साधावा ॥ "

या दर्जाचे मुत्सद्दी आपल्या देशांत पूर्वी पुष्कळच होऊन गेले. त्यांतल्या त्यांत विशेष

प्रख्यात होत. एक अमात्य राक्षस व दुसरा आर्यचाणक्य. अर्वाचीनकालांत त्यांच्या तोडीचे रामचंद्र मल्हार सुखठणकर उर्फ रामचंद्रबाबा-हे बाजीराव बल्लाळ पेशवे आणि नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीत इ० स० १७२० पासून १७६१ पर्यंत मोठे राजकार्यधुरंधर व प्रमुख मुत्सद्दी होते. यांस नानासाहेब हे 'बाबा' म्हणत, आणि सर्वप्रकारें पित्याप्रमाणेंच त्यांची मान्यता ठेवीत. सर्व राज्याची मांडणी आणि व्यवस्था, जमाबंदीकडील धारे वगैरेंचा उत्तम बंदोबस्त, हें सर्व रामचंद्रबाबांनीं मोठ्या चतुराईनें करून, पुढील कारभाऱ्यांना उत्तम पाया घालून दिला. नानासाहेब आणि त्यांचे चुलतबंधु सदाशिवरावभाऊसाहेब यांना राजनीतीमध्यें रामचंद्रबाबांनींच उत्तम शिक्षण दिले होते. हिंदुस्थानामध्यें शिंदेशाही उभी करण्यास मूळ कारण रामचंद्रबाबा. त्यांनीं पुष्कळ संपत्ति मिळविली होती; पण आपल्या अंतकाळीं आपला पुत्र आणि पेशवे यांस ती सारखी वांटून दिली. रामचंद्रबाबांच्या मरणानंतर नानासाहेबांनीं दहा दिवस सूतक पाळलें होतें, अशी गोष्ट जुन्या लोकांत प्रसिद्ध* आहे. तेव्हां अशा माननीय पुरुषाची माहिती चरित्ररूपानें येथें देण्याचें योजिलें आहे.

वस्तुतः रामचंद्रबाबांची माहिती आबालवृद्धांस आहे, मग असें असतां आम्हीं त्यांची आणखी नवीन ती माहिती काय देणार? असा सहजच प्रश्न उद्भवतो; पण त्याचें उत्तर एवढेंच कीं, याठिकाणीं त्यांच्या समग्र चरित्राचें पर्यालोचन करावयाचें नसून त्यांच्या आयुःक्रमांतील चमत्कारिक प्रसंग सांगून त्यांच्याबद्दलची आपल्यास असलेली स्मृति जागृत करावयाची आहे; इतकेंच.

कोंकणांत आरवली म्हणून जो गांव आहे त्याच गांवीं रामचंद्रबाबांचें जन्म झालें. त्यांच्या जन्माची नक्की तारीख व सन कळत नाहीं तरी ते शाहू छत्रपतीच्या कारकीर्दीत साताऱ्यास आले तेव्हां ते चांगले प्रौढ असले पाहिजेत, सरासरी त्यावेळीं त्यांचे वयास पंचवीस वर्षें तरी होतीं असावीं. त्यावरून इ० स० १६९२ अगर त्या सुमारास त्यांचे जन्म झालें असावें. असो.

रामचंद्रबाबांच्या घराण्यांत पूर्वीपासून आरवली गांवची कुळकर्णपणाची वृत्ति होती. त्यावर त्यांचा कुटुंबनिर्वाह चाले. पुढें कांहीं कारणानें रामचंद्रबाबांचें त्यांच्या भाऊबंदाशीं पटेनासें झालें. त्यामुळें त्यांनीं वाडीसरकारचा आश्रय संपादून यांस

---

* सरस्वतिमंडळ पृष्ठ ३७.

त्या गांवांतून घालवून दिलें. यावरून बाबांचे वडील त्यांच्या अज्ञान स्थितींतच निवर्तले असले पाहिजेत. पुढें तें मालवणप्रांतीं आचरें म्हणून गांव आहे त्याठिकाणीं कानविंदे उपनांवाचे कोणी त्यांचे आप्त राहत असत. त्यांच्या आश्रयास राहिले. आणि तेथील कुळकर्णपणाचें कामही त्यांनी कांहीं दिवस पाहिलें. पण ते जात्या चांगले हुशार व चलाखबुद्धीचे असल्यामुळें त्यांना आपल्या बुद्धीचा प्रभाव दाखवावयास स्थल किंवा प्रसंग पाहिजे तसा मिळत नव्हता. म्हणून ते आपल्या स्थितीस कंटाळून रोजगाराच्या हेतूनें आपला गांव सोडून निघाले. ते प्रथमतः आपल्या शांतादुर्गानामक कुलदेवीच्या दर्शनास गोमांतकांत कवळें येथें गेले. त्यावेळीं जवळ सारे चार आण्याचे पैसे होते, तेवढ्यांत देवीस अभिषेक नैवेद्य करावा म्हणून त्यांनी पुजाऱ्यांस सांगितलें; परंतु तितक्या पैशामध्यें हें काम होणार नाहीं, म्हणून त्यांनीं साफ सांगितलें. मग काय करणार ! नाइलाजानें त्यांनीं देवीची षोडशोपचार मानसिकपूजा करून, तिच्या पूजेनिमित्त आणलेले ते पैसे देवालयासमोर दीपमाळेखालीं जमिनींत कोणास न कळत पुरून ठेविले आणि देवीस नमन करून तेथून ते पुढें चालते झाले*.

---

* पुढें सुखाचे दिवस आल्यावर रामचंद्र बाबा पुनः देवीच्या दर्शनाकरितां जेव्हां गोमांतकी गेले आणि पूजेस जाऊन बसले त्यावेळेस करा विषयीं वगैरे कोणीच शब्दही काढला नाहीं आणि पुजाऱ्यांनीं संकल्पादिकांची तयारी चालविली. रामचंद्र बाबांनीं त्यांस सांगितलें कीं, " हें काम आरंभण्याच्या पूर्वी दुसरें कांहीं काम व्हावयाचें आहे, याकरितां तुह्मीं उठून मजबरोबर बाहेर यावें. " तेव्हां ते आश्चर्यानें उठून यांचेबरोबर बाहेर आले. रामचंद्रबाबांनीं दीपमाळेजवळ खणण्यास सांगितलें. तेव्हां ते विस्मित होऊन खणून पाहतात तों चार आण्याचा खुर्दा मिळाला. तो घेऊन देवळांत येऊन म्हणाले कीं, " हे चार आणे आज कितीक वर्षें अभिषेक नैवेद्य होण्याच्या हेतूनें येथें पडून राहिले आहेत. यांचा आधीं मनोरथ सफळ झाला पाहिजे. मग जें कांहीं करणें तें करूं. " पुजारी गोंधळून म्हणाले कीं, " हें काय आहे हें आम्हांस माहीत नाहीं. तें कृपा करून सांगावें. " तेव्हां बाबांनीं मागील सर्व हकीकत सांगतांच ते स्तब्ध राहिले आणि त्यांना मोठी अडचण उत्पन्न झाली. हें पाहतांच तेथील सर्व कारभारीलोकांना बोलावून त्यांच्याकडून देवीच्या पूजेचे एकंदर सर्व नियम बांधून घेतले. सामान्य रुद्राभिषेकनैवेद्याला चार आणे कर

बहुतेक लोकांस आतां जशी मुंबई, त्याचप्रमाणें त्याकाळीं छत्रपतिची मुख्य राजधानी जें सातारा शहर, तें उदरनिर्वाहासाठीं जाण्याचें स्थान होतें. अर्थात् फिरत फिरत रामचंद्रबावा इ. स. १७१४ च्या सुमारास साताऱ्यास आले. तेथें पोहोंचल्यानंतर कचेश्वरबावा ह्या थोर पुरुषानें त्यांस आपल्या घरीं आश्रय दिला. दिवसेंदिवस बावांच्या अंगचीं नैसर्गिक योग्यता जाणून कचेश्वरबावांनीं तेव्हांच भाकीत करून ठेविलें कीं, ' रामचंद्र मल्हार हे लवकरच वैभवास चढतील. ' त्याप्रमाणें घडून येण्यास पुढें थोड्याच दिवसांनीं विलक्षण योग जमून आला. तो असा कीं, बाळाजी विश्वनाथ यांस पेशवाईचा अधिकार मिळाल्यानंतर रामचंद्रबावा हे त्यांजकडे जाऊं येऊं लागले. सहज कामकाज पाहतां पाहतां बावा हे चांगले कारकून असून पाणिदार पुरुष आहेत, असें त्यांच्या लक्षांत आलें. पुढें एके दिवशीं बाळाजी विश्वनाथ आणि पुरंदरे बुदबळांचा डाव खेळत असतां, त्यात कांहीं अडचणीचा प्रसंग आल्यामुळें खेळ नडून राहिला. उभयतांही खेळण्यामध्यें हुशार, परंतु दोनचार दिवस त्या डावाचा विचार करीत असतां त्यांना कांहीं तोड सुचेना. एके दिवशीं रामचंद्रबावा पेशव्यांच्या मागें ओणव्यानें राहून डाव पाहत होते. तो अडचणीचा निकाल कसा करावा हें त्यांच्या तेव्हांच लक्षांत आलें, त्याबरोबर त्यांनीं पेशव्यास अमुक तऱ्हेनें मोहरें ठेवून अमक्या रीतीनें डाव खेळल्यास सारी अडचण मोडेल ह्मणून सल्ला दिली. रामचंद्रबावांच्या त्या मसलतीनें सर्व गूढ उकललें आणि पेशव्यांस फारच आनंद वाटला. एवढी लहानशी गोष्ट, ते पेशव्यांचे आवडते होण्यास कारण झाली. पुढें जसजसा त्यांच्या बुद्धीचा प्रकाश पडूं लागला, तसतशीं त्यांजकडे पेशव्यांकडून कामें सोंपविण्यांत येऊं लागलीं. बाळाजी विश्वनाथाच्या मागून बाजीराव बल्लाळ पेशवे पदारूढ झाले. त्यांसही रामचंद्रबावांची योग्यता माहीत होती. यास्तव

---

घ्यावा, अधीक देणाराची खुषी, परंतु जबरी नसावी. याप्रमाणेंच एकादशनी, लघुरुद्र, महारुद्र इत्यादिकांचे बेहडे ( नियम ) ठरविले. ते अद्यापि निर्वेध चालत आहेत आणि त्या बेहड्याप्रमाणें चार आण्याची पूजा प्रथमतः रामचंद्रबावांनींच केली. कोणी पूजाऱ्यानें जास्त पैसा मागितल्यास रामचंद्रबावाचें ठरावाप्रमाणें आम्ही देत आहों, असें म्हटल्याबरोबर ते गप्प राहतात. हें आजवर चाललें आहे. नंतर मग त्यांनीं पुष्कळ अलंकारादिक देवीस अर्पण केलें तें वेगळें.

[ वि. ज्ञा. वि. पु. ११ पृष्ठ ९२. ].

त्यांनीं राज्यव्यवस्थेच्या कामीं चांगली शिस्त बसविण्यासाठीं बाबांची नेमणूक केली. त्यांनीं प्रथमतः एकंदर राज्याची प्रांतवार नीट व्यवस्था लावून दिली. जमाबंदी नियमित केली. वसूलबाकीसंबंधी नियम ठरविले, खर्चाचे तनखे निरनिराळे तोडून दिले, हिशोबीकामाचा व इतर लेखीकामांचा जो गोंधळ होता, तो नवीन नियम करून साफ मोडून टाकला; आणि ठरविलेल्या नियमाप्रमाणें पुढील कामें शिस्तवार चालू ठेविलीं. तेणेंकरून रामचंद्रबाबांचें नांव महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं झालें. तोडरमल्ल, मलिकंबर, अकण्णा, मादण्णा, या प्रसिद्ध पुरुषांप्रमाणेच पेशव्यांच्या राज्यांत रामचंद्रबाबा होऊन गेले.

"रामचंद्रबाबा कर्ते पुरुष * * * माळव्याचे महालाचा आकार पाहून वांटण्या केल्या. निमे शिंदे निमे होळकर. ऐशी वहिवाट चालली; परंतु वांटणीचा तपसील येणेंप्रमाणें:—श्रीमंत ४५ लक्ष, शिंदे २२॥, होळकर २२॥, पवार १० याप्रमाणें आकार पाहून माळवा वांटून दिल्हा." ह्याप्रमाणें महत्वाचीं कामें रामचंद्रबाबांच्याच शहाणपणानें पार पडत 'हिंदुस्थानांत शिंदे, होळकर वगैरे पेशव्यांचे सरदार होते; तरी दिल्ली, काशी, अयोध्या, माळवा वगैरे प्रांतांतील महत्त्वाचीं राजकीय कामें ते रामचंद्रबाबांकडून करून घेत असत.' शिवाय नानासाहेब व मुख्यत्वें सदाशिवरावभाऊ यास राजकार्यशिक्षण देण्याचें महत्वाचें कामही याच थोर पुरुषाकडे होतें. हीं सर्व कामें त्यांनीं चांगल्यारीतीनें पार पाडिलीं 'पेशव्यांच्या दरबारांत रामचंद्रबाबांची योग्यता एवढी मोठी होती की, गैरजवाब्यांकडून पेशव्यांप्रमाणेच त्यांना मोठमोठ्या नजरा मिळत असत.' प्रसिद्ध शिंदेसरकारचें राज्य स्थापन करण्यास रामचंद्रबाबाच कारण झाले.

साताऱ्यापासून सहा कोशांवर कोरगांव तालुक्यांत कण्हेरखेड म्हणून एक गांव आहे, ते शिंद्यांचे मूळठिकाण होय. हे शिंदे तेथील पाटील असत. त्यापैकीं राणोजी शिंदा या नांवाचा एक हुशार पाटील शिलेदारीच्या बाण्यानें राहत असे त्यानें शाहुमहाराजांचे कारकीर्दीत बाळाजी विश्वनाथाची चाकरी धरिली राणोजी शूर असल्यामुळे त्याजवर पेशव्यांची मर्जी असे. या त्याच्या गुणांवरून त्यास योग्यतेस

१ होळकराची कैफीयत, पृष्ठ १०।११ पहा. २ काव्येतिहाससंग्रहांतील पत्रे व यादी, पृष्ठ ३२।६८।७५।८१.

३ भारतवर्ष मासिक पुस्तक २, अं० ४ जुलै १८९५ पृ० ३४.

चढवावें म्हणून रामचंद्रबाबांनीं त्याची बाजीरावांकडे हुजरेगिरीवर मुद्दाम नेमणूक करविली. पुढें एकेदिवशीं बाजीरावसाहेब व रामचंद्रबाबा हे कांहीं राजकारणासंबंधानें गोष्टी बोलत बसले होते, तेथें त्यांना बराचवेळ लागला. तिकडून उठल्यावर रामचंद्रबाबा बाहेर आले तो तेथें राणोजी श्रीमंतांचे जोडे घेऊन बसला होता, तेथेंच त्यास पेंग येऊन तो लोटला होता अशास्थितीत त्याच्या हातापायांवर राजचिन्हाच्या रेषा असलेल्या बाबांनीं पाहिल्या व ते तसेच पुनः श्रीमंतांकडे गेले आणि त्यांना बाहेर आणून ती गोष्ट प्रत्यक्ष दाखवून म्हणाले; ' हा पुरुष भाग्यशाली होणार आहे. यास चांगलें काम देऊन वाढविल्यास हा नांव मिळवील. ' ते ऐकून बाजीरावसाहेब म्हणाले, याला मोठें काम दिल्यास तें चांगल्यारीतीनें पार पडेल, अशी तुम्ही हमी घेत असल्यास तसें काम देऊं. ' मग ती गोष्ट रामचंद्रबाबांनीं मान्य करितांच राणोजीस पेशव्यानीं माळवेप्रांताच्या सुभ्याचीं वस्त्रें देऊन, त्याची दिवाणगिरी रामचंद्रबाबास सांगितली.

" बाळाजी बाजीरावांचेवेळेस प्रजेला काय काय सुख होते, तो शोध केला असतां असें दिसतें कीं, मक्त्याच्या मामलतीची चाल मोडली व कोणी लुटारू आला असतां गांवकरी यानींच मारावा असें ठरविलें; तेणेंकरून प्रजा सुख पावली. मग पेशव्यानीं प्रांतात जागोजाग सुभेदार व मामलतदार ठेऊन त्यांचे चवकशीवर सरसुभेदारही केले, आणि वसूल जमा करणाराची पहाणी व्हावी असाही त्यानें बेत ठरविला होता याशिवाय जो हिशोब देईना, त्याचें पारिपत्य करून हिशोब घेत असत. पुण्यात बाळकृष्ण गाडगीळ मोठा कुलीन शास्त्री तो न्यायाधीश केला त्यायोगें शहरचे लोक फार सुख पावले या सर्व उत्तमरीतींचें मूळ रामचंद्रबाबा शेणवी. "[1]

पुढें इ० स० १७४० त बाजिरावसाहेब पेशवे मरण पावले. तेव्हां रामचंद्रबाबांस दक्षिणेंत यावें लागलें. बाजीरावाच्या मागून नानासाहेब पेशवाईचें काम पाहूं लागल्यावर, कांहीं दिवसांनीं गृहकलह उत्पन्न झाला. त्याचें कारण असें कीं, सातान्यास चिमाजीआप्पा कैलासवासी झाल्यानंतर छत्रपतीच्या आग्रहावरून नानासाहेबांनीं सदोबाभाऊस पुण्यास आणिलें होतें; पण त्यांची स्त्री गोपिकाबाई, त्यांस तें आवडलें नाहीं. त्यांचें म्हणणें " असे भाऊसद जवळ आणून आपले पोरांस ठिकाण नाहीं असें करतील " असें होतें; म्हणून गोपिकाबाईनें पेशव्यांचे अनेकतऱ्हेनें कान भरून भाऊशीं विरोध मांडिला. नानासाहेबांनींही सारासार विचार न करितां त्यांस

१ ग्रांटडफचे बखरीचें क्याप्टन डेविड केप्टनकृत मराठी भाषांतर पृष्ठ १९३.

दरबारचे कामांत प्रतिबंध करून तुलत्या खर्डेघाशीच्या कामावर नेमिलें, आणि त्यास कदाचित् कोणी वर येण्याची सल्लामसलत देईल म्हणून त्यांच्याशीं कोणी संभाषणच करूंनये, असा सक्त बंदोबस्त केला. असो.

याप्रमाणें सदाशिवरावभाऊ हे केवळ परतंत्रतेंत दिवस काढीत होते. चिमाजी-अप्पासारख्या वाघाचा बचडा व आपला प्रियशिष्य, याची ती शोचनीय स्थिति पाहून रामचंद्रबावांस फार वाईट वाटत असे, व त्याबद्दल श्रीमंतांकडे त्यांनीं पुष्कळ रदबदली केली. पण तिचा कांहींच उपयोग न होतां उलटी 'त्यांजवर श्रीमंतांची मर्जी क्रुद्ध होऊन त्यांस आज्ञा झाली कीं, तुह्मीं कारभारांत एकंदर बोलूं नये.' असें होतांच बावांनी या गोष्टींत मन घालण्याचें अगदींच सोडून दिलें. तथापि पेशव्यांच्या घराण्याचा त्यांना पूर्ण अभिमान असल्यामुळें त्यांच्याने स्वस्थ बसवलें नाहीं. दुसरी काळजीची गोष्ट अशी होती कीं, नानासाहेबांची स्त्री गोपिकाबाई, ही भाऊस अगदीं पाण्यांत पाहात होती, व तेणेंकरून आपल्या भाऊच्या जीवास केव्हांना केव्हांतरी दगा पोंचण्याचा संभव आहे, असा त्यांस पुरा वहीम आला होता, त्यावेळीं सदाशिव-रावाचा अभीष्टचिंतक पेशव्याच्या दरबारांत रामचंद्रबावांवांचून कोणीच राहिला नव्हता, इतकेंच नव्हे तर गोपिकाबाईच्या कौटिल्यामुळें नानासाहेब इतके भारून गेले होते कीं, दरबारांतील यःकश्चित् लोकांप्रमाणेंही भाऊशीं कधींकाळीं देखील संभाषण करण्यास ते तयार नसत. या कलहाग्नीचा पुढें किती भयंकर परिणाम होईल, याची नानासाहेबांस कल्पनाही नव्हती! "एकेदिवशीं एक मारेकरी भाऊवर तो कचेरीत काम करीत बसला असतां पक्का वार करीत होता, पण पाठीमागें असणाऱ्या मनुष्यानें त्याचा हात धरिल्यामुळें त्यापासून फारशी इजा झाली नाहीं."[1]

येथपर्यंत मजल पोंचल्यावर आतां उपेक्षा करण्यास मुळींच अवकाश राहिला नाहीं, असें जाणून भाऊंचा एकदां कसातरी येथून पाय काढविण्यासाठीं काय उपाय योजावा, याची बावांस एकसारखी चिंता लागून राहिली होती. एकेदिवशीं भाऊ दरबारांत लिहीत बसले आहेत असें पाहून त्याजबरोबर कोणीही संभाषण करितांनये अशी सक्त ताकीद असल्यामुळें जातां जातां भाऊच्या कानावर जाईल अशारीतीनें आपल्याशींच बावा म्हणाले कीं, "कांहीं पाणी असेल असें आम्हीं म्हणत होतों, परंतु तें कांहीं दिसत नाहीं. यांनीं खर्डेंच लिहावे." बावांचा हा आशय जाणून

---

१ पेशव्यांची बखर स० १८९० ची आवृत्ति पृ० ५१ वरील टीप.

भाऊंनी लगेच उत्तर दिलें, " पाणी बहुत आहे. सोन्याचें ताट झालें, तरी त्यास कुडाचें उठिंगण पाहिजे. " ह्मणजे ' कर्तबगार पुरुष असला, तरी त्याला चांगल्या मदतगाराचा पाठिंबा पाहिजे. ' हें उत्तर ऐकून बाबांस समाधान वाटलें. मग एके-दिवशीं एकांती गांठ घेण्याची संधि आणून बाबांनीं त्यांस बराच हितोपदेश केला. " श्रीमंत कारभारास बसतात तेथेंच तुम्हीं बसत जावें, तुम्ही कारभारामध्यें बोलूं नये, पण त्यांनीं कांहीं विचारिलें असतां त्याचा मात्र जाब द्यावा. " असें सांगितल्यावर भाऊंनी तसाच क्रम ठेविला व पुढें चारसहा महिनें लोटल्यावर भाऊंची त्या नजरकैदेंतून सुटका होण्याचा योग आला.

नानासाहेब जसे सातारकर छत्रपतींचे पंतप्रधान होते, तसेंच भाऊस कोल्हापूरकर छत्रपतींचे पंतप्रधान करावें, असें नवीनच कारस्थान योजून, तें नानासाहेबास खरें दिसण्याकरितां कोल्हापुर दरबारांत सधान बांधून, त्यांजकडून ' सदाशिवरावभाऊंस आम्हीं आपले पेशवे करितो, ' असें रामचंद्रबाबांनी पत्र आणून ठेविलें होतें. नंतर एकेदिवशीं कर्नाटकप्रांतीं बंडें उद्भवल्याबद्दल तिकडील अधिकाऱ्यांची पत्रें आलीं होतीं; त्यावेळीं कचेरींत रामचंद्रबाबा, भाऊ आदिकरून मंडळी होतीच. तीं पत्रें वाचून पाहिल्यावर बंडाचे बंदोबस्ताचे कामी कोणाची योजना करावी, हा पेशव्यांस विचार पडला. ही संधि पाहून बाबांनीं भाऊंस खूण केली; त्याबरोबर भाऊंनीं लगेच उठून नानासाहेबांस विनंति केली कीं, " मला आज्ञा झाली असतां मी जाऊन बंडांचा बंदोबस्त करून येईन. करणार स्वामीचा प्रताप." हें भाऊंचें उमेदीचे व वीरश्रीचें भाषण ऐकून नानासाहेबांस कांहींसें बरें वाटलें; पण भाऊ अझून कोठें स्वाऱ्या शिकाऱ्यांत गेलेला नसल्यामुळें अशा आणीबाणीच्यावेळीं त्यास पाठविण्याचा नानास धीर होईना. शेवटीं भाऊंनी फारच आग्रह धरिल्यामुळें त्यास कर्नाटकांतल्या बंदोबस्तासाठीं जाण्याची परवानगी मिळाली व ती पडत्या फळाची आज्ञा मानून बाबांच्या सांगण्याप्रमाणें तोच सुमुहूर्त समजून भाऊंनीं श्रीमंताच्या पायांवर डोकें ठेवून निरोप घेतला; पण ही गोष्ट गोपिकाबाईसाहेबांच्या कानावर गेली नव्हती व तिला कळल्यावर पेशव्यांचे मनांत अनेक तऱ्हांनीं विपर्यास आणून ती भाऊंस माघारा बोलाविल्याशिवाय कदापि राहणार नाहीं, हें बाबांस पुरतें माहित होतें; म्हणून भाऊ जाण्यास निघाल्यावर त्यांस एकांतीं गांठून बाबानीं सांगितलें कीं, " तुम्हांस जावयाची आज्ञा झाली; परंतु तुम्हांस पाठीमागें यावें म्हणून सरकारचा सांडणीस्वार जाईल, यासाठीं येथून कूच करून वीस कोसांचा मुक्काम करावा. तेथेंही माघारीं येण्याची चिठ्ठी तुम्हांस पोंचेल; तरी

तुम्हीं माघारीं येऊं नये. त्या चिठ्ठीचें उत्तर पाठवावें कीं, स्वामी राज्यावर आहेत, मी बेरोजगारी ! तेव्हां मला पोटाचा उद्योग पाहिला पाहिजे. ह्यासाठीं मला कोल्हापूरचे राजमंडळाचें बोलावणें आलें आहे, तिकडे मी जातों. हें खटलें संभाळण्यास पाठवावयाचा असेल तो पाठवावा." असें सांगून कोल्हापुराहून आलेलीं पत्रें भाऊंच्या हवालीं केलीं. त्या पत्रांत सदाशिवरावभाऊ आपल्याकडे येतील, तर त्यांस "पारगड, कलानिधि व चंदगडी, हे तीन किल्ले आणि वर्षास पांच हजार रुपये उत्पन्न होत, अशी जहागीर दिली होती.+" याप्रमाणें धोरणानें पुढें येणाऱ्या संकटाबद्दल अगाऊ तजवीज रामचंद्रबाबांनीं करून भाऊंस निरोप दिला.

शहाण्याची बलाय दूर ! महत्वाच्या राजकीयकारस्थानास जी बुद्धिमत्ता लागते, ती साधारण कारकुनांत कधींही आढळावयाची नाहीं. एवढेंच केवळ नव्हे, तर तेथें हुशार कारकुनाची सुद्धां बुद्धिमत्ता पुरी पडत नाहीं. शेवटीं बाबांनीं भविष्य केलें होतें, तेंच खरें झालें. एकातीं गांठ पडतांच 'श्रीमंताचे बुद्धीस बाईनें भ्रंश केला' व तिच्या आज्ञेप्रमाणें लगेच एक सांडणीस्वार भाऊंस परत बोलावण्याकरितां पाठविण्यांत आला. तो स्वार भाऊंस भेटल्यावर पूर्वी ठरल्याप्रमाणें त्यांनीं श्रीमंतास सांगून पाठविलें. तेव्हां नानासाहेब कांहींसे शुद्धीवर आले ! व रामचंद्रबाबांस बरोबर घेऊन भाऊस परत आणण्यासाठीं ते निघून गेले; आणि इतःपर "सारा राज्यकारभार आजपासून तुझ्यावर ठेविला. तुझ्या इतल्याशिवाय मी चालावयाचा नाहीं." असें शपथपूर्वक भाऊंस सांगून त्यांची समजूत केली. १ त्यांस पुण्यास आणिलें. याप्रमाणें सदाशिवरावभाऊंस राज्यकारभारांत मुळींच हात घालूं द्यावयाचा नाहीं, असा आग्रह धरून नानासाहेबांनीं आपल्या हितार्थ जो जो यत्न केला, तो तो रामचंद्रबाबांनीं आपल्या शहाणपणानें शेवटास जाऊं दिला नाहीं. मनाप्रमाणें भाऊंस महत्पद मिळवून देऊन पेशव्याचें "राजद्वारचा कारभार आपल्या इतल्याशिवाय होऊं नये येविशीं कारस्थान करून * * * रामचंद्रबाबा कारभार करूं लागले." यावरून त्यांचे मुत्सद्दीपणाबद्दलचें वाचकांस अनुमान होईल. परंतु अशारीतीनें या थोर पुरुषानें चतुर मुत्सद्दीपणानें व खऱ्या राजहित दृष्टीनें एवढें समाधानकारक काम बजाविलें असतांही कित्येक अनुदार इतिहास लेखकांनीं

---

\+ ग्रांटडफची बखर पृ० १९३. १ पेशव्यांची बखर पृ० ४३-५१

१ धाकटे रामराजे व शाहूमहाराज यांचें चरित्र पृ० १०.

त्यानें पेशव्यांच्या घरांत कलह लाविला इत्यादि त्याजवर दोषारोप केलेले आहेत! यावरून विचारपूर्वक कोणाहीविषयीं अभिप्राय देणारांची व दुसऱ्यांच्या योग्य गुणांचें गौरव करणारांची जगांत केवढी कमतरता आहे, याचें चांगलें ज्ञान होतें. वास्तविक रामचंद्रबाबांनीं खरा पक्ष घेऊन चांगली तोड लाविली. अन्यायानें कोणीं दुसऱ्याचें अहित केलेलें, अगर विनाकारण कोणी द्वेष केलेला त्यांस बिलकूल खपत नव्हता.

रामचंद्रबाबा जसे चतुर मुत्सद्दी, तसे ते मोठे शूर योद्धे होते. वाडीसरकारचा मुलुख आंग्र्यांनीं लढून घेतला होता. तो त्यांनीं आंग्र्यांचा पराभव करून वाडकरांस परत दिला; शिवाय उत्तर हिंदुस्थानांत शिंद्यांस पुष्कळ लढायांत आणि पेशव्यांस इंदूर, कलबुर्गे, खेड, सांगोलें, घोडनदी, भालकी, श्रीरंगपट्टण, होळीहुन्नूर वगैरे ठिकाणीं झालेल्या लढायांत मोठ्या शौर्यानें लढून विजय संपादून दिला. याजबद्दल बाबांना खुद्द पेशवेसरकाराकडून पुढील प्रमाणें पत्र व जाहागीर मिळाली आहे:—

श्री.

"राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्र मल्हार उपनाम सुखठणकर गोत्र कौशिक सूत्र आश्वलायन सारस्वत गौड स्वामी गोसांवि यांसि.

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ सल्लास खमसैन मया व अलफ तुम्ही हिंदुस्थानांतून हुजूर येऊन उपयोगीं फार पडलां व तिकडेही कामें दुरुस्त केलीं, कुटुंबवत्सल आहां, तुमचें चालविणें आवश्यक जाणोन मौजे इसबावी ता॥ कासेगांव एथें इनाम जमीन बिघे ३० पाव चावर हालीपटी व पेस्तरपटी स्वराज्य व मोगलाई दुतर्फा अंमल देखील सरदेशमुखी साहोत्रा बाबती मोकासा जल तरु तृण काष्टपाषाण निधिनिक्षेप इत्यादि उपसर्ग न लागे असी तुम्हांस करार करून दिली असे तरी सदरहू जमीन तुम्ही आपले दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें भोगवटा सुखरूप घेणें. चंद्र ९ रबिलावल बहुत काय लिहिणें हे विनंति."[1]

एकदां रामचंद्रबाबा गोमांतकीं असतां एका ब्राम्हणाला तेथील 'इन्किझिसांव' नामक

---

१ सरस्वतीमंडल परिशिष्ट १ पृ० ९

फिरंगी धर्माच्या सभेनें पकडून त्यावर कांहीं मोठा गुन्हा शाबीत करून देहांत शिक्षा ठरविली होती. तो निरपराध आहे, ह्मणून त्यास सोडावा अशाविषयीं पुष्कळ मोठमोठ्या लोकांनी मध्यस्थि घातल्या. परंतु त्यांचे ते जुईज–न्यायाधीश–आणि भीस्म–धर्माधिकारी–यांचे तडाक्यांत सांपडलेल्या माणसाची सुटका कशाची होते? परंतु त्याचा प्रारब्धयोग बळकट, यामुळें त्या ब्राह्मणाच्या स्त्रीला कोणी सुचविले कीं, "तूं जाऊन रामचंद्र मल्हार यांचे पाय धर ह्मणजे सर्व काम होईल." त्याप्रमाणें तिने बाबांची गांठ घेऊन मोठ्या काकळुतीने सांगितले कीं, "उद्यां सकाळीं त्यांना फांशी देण्याचा ठराव झाला आहे. त्यांना राखून मला चुडेदान दिलें पाहिजे, आणि तुम्हीं मोठे पेशव्याचे दरबारी मनुष्य आणि तुमच्या हातून जर एवढें काम होत नाही. तर तुमचें इतकें वैभव घेऊन काय करावें?" तें भाषण ऐकून रामचंद्रबाबांनी लागलीच चौकशी केली. त्याबरोबर खात्री झाली कीं, ब्राम्हण फुकट मरतो. तेव्हां त्यांनी गोमांतकाच्या मुख्य अधिकाऱ्याला चिठी लिहिली की, "अमुक अमुक मनुष्य तुमच्या ताब्यांत आहे तो आतांच्या आतां आम्हांकडेस जरूर पाठवून द्यावा. त्याची फार गरज आहे." तेव्हां अधिकारीही शहाणा होता. त्यानें पाहिलें की, "रामचंद्रबाबाचा शब्द मोडून ब्राम्हण फाशी दिल्याने नफा तर कांहीं नाहींच. पण कदाचित आपणास गाशा मात्र गुंडाळावा लागेल. त्यांपक्षा त्यांचें म्हणणे मान्य केल्याने त्यालाही संतोष होईल; व आपलाही मोठा तोटा होईल असे नाहीं." असा दूरवर विचार करून थोरपणाच्या रीतीने त्यानें त्या ब्राम्हणास मुक्त करून रामचंद्रबाबांच्या स्वाधीन केला. धर्माधिकाऱ्यांनीं वगैरे पुष्कळ हरकत केली परंतु जबरदस्तीपुढे त्यांचें काय चालणार? पुढे रामचंद्रबाबांनी त्या ब्राम्हणास आपल्या घरीं कांहीं दिवस ठेवून घेऊन अन्नवस्त्राची सोई करून लागलाच त्याला घांटावर पाठवून दिला. या गोष्टीवरून रामचंद्रबाबाना किंवा हिंदुराजाच्या कारभाऱ्यांना फिरंगी लोक कसे भीत होते, आणि कसा मान देत होते. हे चांगलें कळते. असो.

---

१ या धर्मवेडेपणाची हकीकत गोव्याचे इतिहासांत सविस्तर दिली आहे. लाखो लोकांस जिवंत भाजून मारिलें व लाखो लोकास बाटविले. याप्रमाणे सांतफ्रांसीस वगैरे पाद्र्यांनीं पूर्वी उपद्रव मांडिला होता तो सन १८१२ पर्यंत चालून शेवटीं इंग्रजसरकारचे सांगण्यावरून ही अन्यायाची व जुलमी 'इन्क्विझिसांव' नामक सभा पोर्टुगीज सरकारानें बंद केली. गो. इ. पृ. ७१.

रामचंद्रबावा मोठे दानशूर होते. त्यांचा पुण्यांत वाडा होता. त्यांनीं संपत्तिही पुष्कळ मिळविली होती. तिचा त्यांनीं सत्कार्यी विनियोग करून दानशूरांच्या कोटींत आपलें नांव चिरस्थायी करून ठेविलें. काशी, गया, प्रयाग, पुष्कर इत्यादि पुण्यक्षेत्रीं यात्रेकरू व बैरागी लोकांसाठीं त्यांनी मोठमोठ्या धर्मशाळा बांधून ठेविल्या आहेत. शिंद्याची पहिली राजधानी जें उज्जनी शहर तेथें रामचंद्रबावांनीं देवळें वगैरे बांधिलीं आहेत व तेथें त्यांचा वाडा होता व त्याठिकाणीं त्यांचे चिरंजीव सदाशिव रामचंद्र राहत असत. स० १७६७ मध्यें रघुनाथराव दादा पेशवे तिकडे गेले होते, तेव्हां ते त्यांचे वाड्यांत राहिले होते. उज्जनी नगरींतील प्रसिद्ध द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं प्रसिद्ध महांकाळेश्वराचें देवालय, तेथील क्षिप्रानदीवरील मोठा घाट व त्यावरील देवालयें, तसेंच त्या पंचक्रोशींतील ११० देवालयें रामचंद्रबावांनीं बांधिलीं. श्रीगोकर्ण महाबळेश्वरास प्रति महाशिवरात्रीच्या पूजेस बावांची गंगोत्री कावड येत असते व प्रत्यहीं रामेश्वरास गंगोत्रीची कावड व रामेश्वरची काशीस, अशी त्यांनीं व्यवस्था करून ठेविली असून ती अद्याप चालत आहे.

गोमांतकांत कवळें येथें श्रीशांतादुर्गा देवीच्या व्यवस्थेकरितां फिरंगी सरकारामध्यें एकदम द्रव्य भरून तें सर्व क्षेत्र सोडवून घेतलें आणि देवीस बाराशें रुपयांचें उत्पन्न करून दिलें तें अद्याप चालत आहे. तसेंच श्रीमंगेशीसही उत्पन्न आहे. ह्या उत्पनाच्या इनामी सनदा बावांनीं आपल्या नांवानीं न देतां पेशव्यांच्या नांवच्या दिलेल्या आहेत. त्यांपैकीं नमुन्यासाठीं एका सनदेचा उतारा येथें देतों:—

"राजश्री रामचंद्र मल्हार यांचे कुलदेवाचीं देवालयें अंत्रुजप्रांति आहेत. तेथील उर्जेस तेल, फुलें आणि द्रव्यें पाहिजेत त्यास खर्चाबद्दल, रफायत पन्हां सदाशिव नाईक, इमडीराजे सैदे यांजकडून कवळें ग्राम श्रीशांतादुर्गा देवीस व मौजे प्रियोळ येथील श्रीआळसा देवीस एक वाडा, व श्रीमंगेश देवास एक वाडा व नगदीं महालमजकुरीं अडीजशें रुपये इनाम संपादून घेऊन सनदी हांसल केल्या आहेत. त्याप्रमाणें आम्हीं तीं इनामें करार करून सरकारचीं पत्रें दिलीं आहेत. अशास गांव व वाडा मजकूरची कमाविशी करूंस कमाविसदार जातील अशास, इजलाल पन्हांसीं आमचा संकल्पकीं सदरहू गांव,

---

१ ऐतिहासिक लें० मा. सन १९०० अं० ३२ पृ० १२२९ पहा.

२ विविधज्ञानविस्तार मा० पु० ११ पृ० ७२ पहा.

वाडे, देवालयें व कमाविसदार यांस इजलाल पन्हांकडून कांहींच तसोसी होऊं नये. सौदे संस्थानीं व इजलाल पन्हांमध्यें विभक्तता पडली आहे, तेव्हां इजलाल पन्हांकडील इसम यांस आज्ञा केली पाहिजे कीं, सदरहू गांव, वाडे, देवालयें व कमाविसदार यांस कांहींच उपसर्ग करूं नये. सौदे संस्थान याशीं पाहिजे तसे वर्तावें परंतु यांत दिक्कत असूं नये. श्रीसप्तकोटेश्वर क्षेत्र नारवें हें पुरातनपासून संरक्षिलें आहे. इजलाल पन्हां अगोदरचा विसरे यांनीं डिचोली महाल व किल्ला काबीज केला. तेसमयी गांव फरारी झाल्यामुळें देवालय खालीं आलें. तेव्हां गांवांहून श्रीस्थळ काढिलें अशास गांवमजकूर श्रीक्षेत्रास पूर्वीच इनाम देऊन आम्हांकडून सरकारांत पत्र सादर झालेंच आहे. प्रस्तुत श्रीक्षेत्राची चालणेच्या खर्चाबद्दल सदरहू गांवचे इनामपत्र इजलाल पन्हांनीं रवाना केलें पाहिजे. रवाना छ० १८ मांहे शाबान [ ११ माहे जून ] जादा काय लिहावें हे कितावत."

राजा
शाहू नरपति
हर्षनिधान बाळाजी
बाजीराव
प्रधान.

अस्सल सनदा देवस्थानच्या दप्तरांत पहण्यास मिळतील. या एका गोष्टीवरून बाबांच्या अंगची स्वामिनिष्ठा व धन्याच्या नांवलौकिकाविषयीं पूर्ण महत्वाकांक्षा हीं चांगलीं निदर्शनास येतात. असो.

याप्रमाणें आपल्या हयातींत पुष्कळ संपत्ति अनेकप्रकारें धर्मकृत्यांत खर्च करून शेवटीं अंतकाळीं शिल्लक राहिलेल्या संपत्तीचे त्यांनीं तीन भाग केले. त्यांतील एक भाग धर्मादायाकडे काढिला. एक भाग आपल्या पुत्रास दिला व राहिलेला तिसरा भाग त्यांनीं मुलाप्रमाणे मानिलेल्या सदाशिवरावभाऊंस दिला. वास्तवीक भाऊला कांहीं कमी नव्हतें; पण ती बाबांची देणगी त्यांस स्वताच्या ऐश्वर्यापेक्षां महत्वाची वाटली. अशाप्रकारें त्यांनीं आपल्या जिंदगीची सुव्यवस्था केली.

रामचंद्रबाबांस गारदोंडी, कासेगांव वगैरे ठिकाणी जहागीर होती. त्यांनीं देवालयें

बांधून त्यांस इनामें करून दिलेलीं अजून चालत आहेत. त्यांचा पुत्र सदाशिव रामचंद्र, तोही पेशव्यांकडे महत्वाच्या कामगिरीवर होता. त्यासंबंधाच्या गोष्टी इतिहासांत प्रसिद्ध आहेत. बाबांच्या निधनकालाबद्दल फारशी माहिती कोठेंच उपलब्ध नाहीं. मात्र आचरें येथें व देवगड तालुक्यांत माईन म्हणून गांव आहे तेथेंही, हल्ली बाबांच्या वंशजांपैकीं कांहीं मंडळी असल्याचें समजतें.

---

## बक्षीबहाद्दर मुजाफरदौल
# जिवाजी बल्लाळ ऊर्फ जिवबादादा केरकर.

" शूरबाहुषु लोकोऽयं लंबते पुत्रवत् सदा ।
तस्मात् सर्वास्ववस्थासु शूरः संमानमर्हति ॥
न हि शौर्यात्परं किंचित् त्रिषु लोकेषु विद्यते ।
शूरः सर्वं पालयति सर्वं शूरे प्रतिष्ठितम् ॥ १ ॥ "

मुलांना जसा वडिलांचा आधार तसा सर्व लोकांना शूर लोकांचा आधार होय. म्हणून सर्व अवस्थेमध्यें शूर सन्मानास योग्य होय. तिन्ही लोकांमध्यें शौर्याच्या बरोबरीचें कांहींएक नाहीं. सर्वांचें पालन शूर करितो. सर्व कांहीं शूराचेठायीं अवलंबून आहे. कारकुनी व शिपाइगिरी ह्यांत पुष्कळ अंतर आहे. कारकुनी पेशांत प्रावीण्य संपादन केल्यास व त्यांत दैवानें हात दिल्यास मोठी योग्यता मिळते. तसेंच शिपाइगिरींत झाल्यास महत्पद प्राप्त होतें; परंतु कारकुनींतील नांव शांततेवर अवलंबून आहे आणि ही शांतता राखण्याचें काम पहिल्यानें तरवारीसच करावें लागतें. तरवारीच्या जोरावर चोहोंकडील गडबड मोडून जिकडे तिकडे स्थिरस्थावर करून ठेविल्यावर मग लेखणीला आपलें कसब चालवितां येऊन व्यवस्थितपणा व सुधारणा हीं करितां येतात. मर्दुमकीच्या कामीं नांव मिळविणें आणि त्या मर्दुमकीचा राष्ट्रहिताच्या कामीं उत्तमप्रकारें उपयोग होणें ही गोष्ट फार अगत्याची आहे; पण अशा विचाराचीं माणसें अलीकडच्या काळांत फार विरळा निपजतात, त्यांपैकीं जिवबादादा हे एक होत. ह्या शूर प्रतापी पुरुषाचें साग्र विस्तृत चरित्र बऱ्याच ऐतिहासीक माहितीनें परिपूर्ण असें गेल्या दोन वर्षांपूर्वी मुंबईत छापून प्रसिद्ध झालें

आहे. त्यावरून त्यांचा जीवनवृत्तांत साद्यंत कळून त्यांची अपूर्व योग्यता व अवर्णनीय पराक्रम हीं चांगलीं लक्षांत येतात. सदरहू पुस्तकाची एक प्रत आमचे सन्माननीय स्नेही श्रीयुत नागेशराव सदाशिवराव वाघ बी. ए. वास्तव्य सदाशिवगड व मुंबई यांनीं आह्मांस प्रेमपूर्वक दिली आहे. त्यावरूनच जिवबांचा संक्षिप्त चरित्र-भाग येथें देण्याचा प्रयत्न केला आहे. असो.

इ० स० १५१० चे सुमारास गोव्यांत फिरंगीलोकांनीं जो धर्मछलाचा प्रळय मांडिला त्यास त्रासून विठ्ठलपंत संजगिरे नांवाचे जिवबाचे कोणी पूर्वज आपला जमीन-जुमला, घरदार इत्यादिकांवरील ममत्व सोडून गोव्यांशेजारी सरदेसाई यांच्या मुलुखांत पेडणें महालांतील मोरज नांवाच्या गांवीं त्यांच्या ओळखीच्या एका गृहस्थाचे घरीं जाऊन राहिले होते. त्याकाळीं एतद्देशीय संस्थानांत दंगेधोपे, लुटालूट, पळापळ इत्यादि प्रकार मुळींच नव्हते असे नाहीं. तथापि इतर प्रांतांपेक्षां सरदेसाई यांच्या प्रांतात या बाबतींत पुष्कळ अंशी स्थिति चांगली होती. सरदेसाई यांनीं आपल्या रयतेस त्रास पोहोंचूं नये, म्हणून चांगला बंदोबस्त ठेविला होता कारण, शेजारच्या फिरंगी लोकांचा उपद्रव आपल्या मुलखांत होऊं नये, हें एक; आणि आपले यजमान छत्रपति यांचे सारें लक्ष आपल्या प्रजेच्या हिताकडे असल्याचें ते पाहत असत, हें दुसरें. अशा दुहेरी कारणांमुळे ते आपल्या मुलखाच्या बंदोबस्ताकरितां फार जपत असत व तेणेंकरून त्याकाळीं त्यांच्या राज्यांत बरीच शांतता राहिली. अशी गोष्ट सांगतात कीं, सरदेसाई यांनीं थोड्या खर्चात पुष्कळसे लढाऊलोक आपल्या पदरीं राखण्याची एक युक्ती केली होती ती अशी:—प्रत्येक इसमास वर्षास थोडा मुशाहिरा देण्याचा ठरविला होता; पण त्यांत त्यानें सबंध वर्षभरांत एक महिनाभरच नोकरी करावी, आणि बाकी अकरा महिनें आपला खासगी धंदा करावा असें ठरवून प्रसंग पडेल तेव्हां सर्वांनीं एकत्र जमावें असें केलें होतें. अशा रीतीनें कायमच्या फौजेशिवाय एक हजार लोकांसाठी जो खर्च व्हावयाचा, त्यांतच बारा हजार लढाऊ लोक त्यांनीं आपल्या ताब्यात ठेविले होते. यामुळें गोव्यांतील धर्मछलास त्रासून देशांतराकरितां निघालेलीं गोमांतकांतील पुष्कळ ब्राम्हणांचीं घराणीं या प्रांतीं येऊन स्थायिक वतनदार होऊन राहिलीं, असो.

विठ्ठलपंत यांचे उपनांव संजगिरे असें होतें. कारण, त्यांचे पूर्वज विजयानगरच्या राजाचें निलगिरीवर जें सैन्य होतें, त्यावर सेनापती होते; ह्मणून त्यांस संजगिरे हें उपनांव पडलें. विठ्ठलपंतांची कालक्रमणा मोरगांवीं कशी काय चालली होती, या-

विषयींची बरोबर माहिती उपलब्ध नाहीं; पण त्यांच्या दोन तीन पिढ्या तेथें गेल्या; आणि पुढें जेव्हां प्रपंच वाढून तेथें दिवस घालविण्याची सोय राहिली नाहीं तेव्हां त्यांच्या घराण्यांतील एक पुरुष, मोरजगांवापासून जवळच म्हणजे आठ दहा मैलांवर हरमल व केरी असे एकास एक लागून दोन गांव आहेत त्यांपैकीं केरीगांवीं येऊन राहिला; आणि तेथें त्यांना कांहीं जमीन-जुमला संपादिला. केरी हा गांव नदीतीरीं असल्यामुळें खाडीच्या खाऱ्या पाण्याच्या संसर्गानें त्या गांवाचा बराच भाग नापीक झाला होता पण सर्जागरे यांचें वास्तव्य त्या गांवीं झाल्यापासून त्यांनीं आपल्या मालकीची जमीन बरीच नांवारूपास आणिली. तेव्हांपासून त्यांचें सर्जागरे हें उपनांव लुप्त होऊन केरकर हेंच नाव विशेष प्रचारांत आलें.

जिवबाच्या वडिलांचें नांव गणपतराव असें होतें. त्यांना नरोबा, जिवबा, व शिवबा असे तिघे मुलगे झाले. त्यांपैकीं जिवबाचा जन्म इ० स० १७४० त झाला. बळवंतराव, व रामकृष्णराव असे जिवबाना आणखी दोन चुलते होते. त्यांमध्यें धाकटे रामकृष्णराव, यांना जगन्नाथ, बाळाजी, व साबाजी असे तीन पुत्र झाले. हीं सर्व मुलें निरोगी, धीट, चलाख व गुणी असून एकत्रच राहात होतीं. जिवबाचे मधले चुलते बळवंतराव यांना पुत्र नव्हता म्हणून जिवबांस त्यांनीं दत्तक घेतलें होतें; यास्तव हे जिवाजी बल्लाळ झाले. हें सर्व कुटुंब एकत्रच होतें. त्यांच्या घरांतील एकंदर चाल चालणूक जुन्या पद्धतीची होती. व तेंच वळण मुलांनाही मिळालें. सूर्योदयापूर्वी उठणें. शौचमुखमार्जनादि विधि उरकल्यावर सूर्यास नमस्कार करणें, वडील माणसांच्या नजरेआड फार वेळ न राहणें, शिवाय वडील माणसें सांगतील ते लागलीच ऐकणें, सत्य व नम्र बोलणें, आणि सर्व वडील माणसांची भीड राखून त्यांची अदब ठेवणें ह्या गोष्टी त्यांना अगदीं आवश्यक करून ठेविल्या होत्या. पुढें तीं सर्व मुलें शाळेंत जाण्याच्या लायकीचीं झाल्याबरोबर त्यांना पंतोजीच्या हवालीं केलें. त्यावेळच्या पद्धतीचें शिक्षण म्हणजे, लिहितां वाचतां येणें, साधारण प्रतीचे हिशोब करितां येणें, अनेक मायन्याचीं मोडी लिखितें वाचणें वगैरे हेंच होतें. त्यांत हीं सर्व मुलें तयार झाल्यावर गणपतरावजींनीं योग्यकाळीं त्यांचें मौजीबंधन केलें आणि तेव्हांपासून संध्यापूजादि आन्हिक ब्रम्हकर्म उपाध्यायाकडून त्यांस शिकविण्याची तजवीज ठेविली होती. शाळेंतील अभ्यास व ब्रम्हकर्माचा अभ्यास हे निरनिराळ्या वेळीं सुरू ठेविले होते. तीं सर्व मुलें प्रकृतीनें सुदृढ होतीं म्हणून मोठ्या उमेदीनें घरगुती कामांतही वडिलांस पुष्कळ उपयोगीं पडत असत. मुलांची

मदत याल्यामुळें वडिलांस शेतवाडी, बागाईत वगैरे मोठ्या प्रमाणावर करण्यास उमेद येऊन दिवसेंदिवस त्या घराण्याची स्थिति सुधारत चालली.

जिवबाचें शरीर फार मजबूत व भव्य होतें. त्यांचा वर्ण निमगोरा असून चेहरा सतेज दिसे. कोणत्याही घरगुती कामाला आरंभ केल्यावर त्यांत कितीही श्रम पडले तरी ते डगमगत नसत. कदाचित बाकीचे बंधु थकल्यास त्यांस उत्तेजन देऊन काम शेवटास नेल्याशिवाय विश्रांति घ्यावयाची नाहीं, अशी त्यांच्यामध्यें ते ईर्ष्या उत्पन्न करीत. जिवबाची शक्तिमत्ता, कसदारपणा आणि दृढनिश्चय ह्या गुणांचा पगडा त्यांच्या बंधूंवर बसल्यामुळें ते त्यांच्या अनुमतानें व धोरणानें वागूं लागले. जिवबाची धर्मश्रद्धा उत्तम असल्यामुळें नित्यनैमित्तिक कर्मे करणें, व्रतेंवैकल्यें पाळणें, आणि प्राकृत ग्रंथ वाचणें, इकडेही त्यांचा कांहीवेळ खर्च होत असे. कथाप्रसंगांतील युद्धादिकांचीं वर्णनें ते विशेष आवडीनें वाचीत असत. ह्या सर्व गोष्टी लक्षांत आल्यामुळें गणपतरावास जिवबाची योग्यता निराळी आहे असें वाटूं लागलें. हा मुलगा पुढें चांगली कीर्ति मिळवील अशी त्यांनीं अटकळ केली.

आपली शरीरसंपत्ति वाढवून अधिकाधिक श्रमसाहसाचीं कामें करण्याचा जिवबांनीं पुढें सराव ठेविला. पाण्यांत पोहणें, होड्या लांबवर वल्हवून नेणें, झाडांवर चढणें, दूरवर धांवत सुटणें, कुस्ति खेळणें, जोर काढणें इत्यादि शक्तिवर्धक कामें रोजच्या रोज करण्याचा त्यांचा परिपाठ असे. हीं कामें करीत असतां ते आपल्या बंधूंसही सोबतीस घेत असत. ह्या शक्तिवर्धक खेळांपासून त्यांना फा फायदा झाला. जिवबा पोहण्यामध्यें फारच कुशल होते. एकेक तासपर्यंत पाण्यांतून मस्तक वर न काढतां पोहत जावयाचें इतकी त्यांची बाहुबल व दम छाटण्याची शक्ति होती. बंदुकीचे नेम धरण्याचें काम त्यांना चांगलें साधलें होतें. त्याचप्रमाणें घोड्यावर बसण्याचाही त्यांना फार नाद असे. कोणाचाही घोडा बसण्यास मिळण्यासारखा असला तर त्यांनीं ती संधि फुकट जाऊं देऊं नये. त्याच्या उघड्या तर उघड्याच पाठीवर बसून त्यास पुष्कळ लांबवर नेऊन दमवून आणावें. घोडा कितीही मोठा असला तरी तो आपल्याला पाडील व तेणेंकरून आपल्यास अपाय होईल, अशी भीति त्यांस कधींच शिवली नाहीं, आणि त्याप्रमाणें ते घोड्यावरून कधीं पडलेही नाहींत. त्यांचें धैर्य विलक्षण असल्यामुळें, त्यांच्या सोबत्यांपैकीं कोणी केवढ्याही शक्तीचा असला तरी त्याला जिवबाबरोबर कुस्ती धरण्यास खातरी वाटत नसे. दोनचार सोबती जमून जरी त्यांचेवर चालून गेले तरी त्याशीं सामना करून त्यांज-

असून पराभव न पावतां जिवबांसच विजय प्राप्त व्हावयाचा, अशाप्रकारची त्यांची शक्ति व युक्ति होती. एकदां त्यांच्या अचाट शक्तीचा असा विलक्षण प्रभाव दिसून आला कीं, गोवाप्रांत फिरंगीलोकांनीं काबीज करून तेथें त्यांनीं आपली अप्रतिहत सत्ता चालू केल्यामुळें तज्जातीय लोकांनीं कांहीं केलें तरी त्यांच्या विरुद्ध कोणी चकारशब्द काढीत नसे. सर्व प्रजा त्यांस थरथर कांपत होती. मदिरापानानें धुंद झालेले आडदांड फिरंगीलोक रयतेकडून आपल्यास कांहीं प्रतिबंध व्हावयाचा नाहीं म्हणून त्यांच्या बागबागाइतांची वगैरे मनमानेल तशी नुकसानी करीत. एकदां तीन असामी फिरंगी सोल्जर एका नावेंत बसून समुद्रकांठानें केरी गांवाजवळ आले आणि तेरेखोलच्या खाडीत ती नांव घालून किनाऱ्यास आणून ठेविली व आपण नजीकच्या बागेंत शिरून माडझाडांवरील नारळांचा फडशा पाडूं लागले. त्यावेळीं जिवबा त्या बागेजवळच होते. त्यांनीं लांबून हें सोल्जरांचें कृत्य पाहिलें; तेव्हां त्यांना त्यांचा फारच राग आला. सोल्जर नारळ पाडीत पाडीत त्या होडीपासून दूर गेले आहेत असे पाहून जिवबांनीं ती नांव ढकलीत ढकलीत दहावीस हात रेतींत आलीकडे आणून ठेवून आपण तेथून दूर जाऊन उभे राहिले. इतक्यांत ते सोल्जर बागाची यथेष्ट नासधूस करून नांव ठेविलेल्या ठिकाणाजवळ आले, पण ती तिकडे नसून कोणी दहावीस हातांवर लांब नेऊन रेतींत ठेविली आहे असे त्यांच्या दृष्टीस पडलें. मग ते रागानें लाल होऊन आपसांत फिरंगीभाषेंत कांहीं कुजबुजूं लागले. ती मौज पहात जिवबा त्या होडीजवळ स्वस्थ उभे राहिले होते. त्यांस पाहतांच ते समजले कीं, हें कृत्य यांचेंच आहे, त्याबरोबर ते तिघेही चवताळून जिवबांच्या अंगावर गेले. त्यांपैकीं दोघांनीं जिवबास घट्ट आंवळून धरिलें आणि तिसऱ्यानें बुटांची लाथ मारण्यास उचलली येवढ्यांत जिवबांनीं एक हिसका मारून त्यांना आपल्यापासून दूर केलें, आणि त्यांचे हात इतक्या जोरानें मुरगाळले कीं, त्यांची गाळणच उडाली! अशारीतीनें त्या तिघांही सोल्जरांस आपल्या कृतकर्माचें यथास्थित प्रायश्चित्त मिळतांच ते मुकाट्यानें तिकडून चालते झाले.

जिवबास लिहितां वाचतां येऊं लागल्यापासून त्या काळच्या पद्धतीप्रमाणें जुन्या हस्तलिखित मोडी बखरी वाचण्यांत त्यांचा बराच काळ जाऊं लागला. बखरींतील सिंहगडची मोहीम, अफझुलखानाचा वध, छत्रपती राजाराममहाराजांच्या वेळचे प्रल्हादनिराजी, रामचंद्रपंत, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, खंडोबल्लाळ वगैरे सरदारांचा विलक्षण स्वार्थत्याग, त्यांची अवर्णनीय स्वामिभक्ति, अचाटसाहस, अलौ-

किक शौर्य इत्यादि प्रसंगांच्या रसभरित वीररस परिपूर्ण वर्णनें जिवबा अत्यंत आवडीनें वाचीत असत. आपला देश, त्याचें प्राचीनवैभव, पूर्वीच्याकाळीं होऊन गेलेले अनेक भाग्यशाली पुरुष, त्यांनीं आपल्या लोकोत्तर गुणांनीं व अचाट बुद्धीनें या देशावर केलेले महदुपकार इत्यादि गोष्टींचें ते नित्य चिंतन करीत असत. त्यांची अशी समजूत होती कीं, मनुष्याचें मुख्य कर्तव्य म्हटलें म्हणजे धर्मरक्षण व देशसेवा हें होय. त्यांत जो आपला देह झिजवील तोच खरा भाग्यशाली व तोच सगळ्या दुनियेंत पूज्य.

जिवबांची एक बहीण सावंतवाडीपैकीं मळगांव येथें दिली होती; तिकडे कांहीं दिवस राहण्याकरितां जिवबा गेले असतां कोणीएक बैरागी येऊन त्यानें जिवबाला पाहून प्रसन्नचित्तानें घरच्या मालकास म्हटलें, ' ए लडका मुशाफरीकूं निकल जावे तो उसकूं रोकना नही! ये बडा भागसाली निकलेगा. वो जहां जावे वहां उसकी फत्ते हो जायगी. ये मेरा सवाल ध्यानमें रखना. ' तेव्हां ही बैराग्याची भविष्यसूचक वाणी ऐकून त्यांना अत्यानंद वाटून जिवबाकडे त्यांचें विशेष लक्ष लागलें. मग कांहीं दिवसांनीं जिवबा आपल्या घरीं आले व पूर्व क्रमाप्रमाणें प्रापंचिक काम पाहूं लागले. पुढें एके दिवशीं दोनप्रहरीं ते आपल्या ओटीवर निजले असतां कोणीएक पुरुष स्वप्नांत येऊन म्हणाला " काय निजला आहेस? ऊठ. हिंदुस्थानांत जा. तुला मोठें वैभव प्राप्त होईल. " जिवबानें हें स्वप्न वडिलांस सांगितलें. परंतु अशा स्वप्नांत कांहींहि अर्थ नसतो असें पित्यानें त्यांना म्हटलें. या गोष्टीस कांहीं दिवस गेल्यावर पुनः एकेदिवशीं जिवबास तेंच स्वप्न पडलें. तेव्हां त्यांनीं ज्योतिषांकडे त्याविषयीं चौकशी केली त्याप्रमाणें ज्योतिषीबुवांनीं विचारपूर्वक प्रश्न पाहून सांगितलें कीं, ' स्वप्न फार चांगलें आहे. त्याप्रमाणें हिंदुस्थानांत निघून गेल्यास तुला मोठें वैभव प्राप्त होईल. असें ह्या लग्नावरून दिसतें. ' तेव्हां जिवबाच्याही मनांत हिंदुस्थानांत जाण्याविषयीं अनिवार इच्छा उत्पन्न झाली. एकच स्वप्न दोनदां पडलें. शिवाय मळगांवीं बहिणीच्या घरीं असतांना बैराग्यांनीं सांगितलेली भविष्यसूचक वाणी, या दोहोंमध्यें कांहीं अर्थ नसेल असें त्यांना वाटेना. म्हणून त्यांनीं भीत भीत हिंदुस्थानांत जाण्याविषयीं वडिलांची आज्ञा मागितली. जिवबाच्या एकंदर लक्षणावरून ते पुढें एक लोकोत्तर पुरुष निपजतील असें त्यांच्या वडिलांस व इतर मंडळींसही वाटत होतें; परंतु पुत्रमोह विलक्षण आहे. हो ना करतां करतां शेवटीं वडिलांनीं त्यांना जावयास आज्ञा दिली. त्याप्रमाणें सर्वांची परवानगी घेऊन जावयास निघाले

इतक्यांत तेथें साधुमहाराज बापूमामा किणी येऊन दाखल झाले. त्यांच्याही चरणा॰वर मस्तक ठेऊन त्यांचा शुभाशीर्वाद घेऊन जिवबा घराबाहेर पडले. तोंच त्यांस शिंक झाली तेव्हां परत येऊन जिवबानें बापुमामांस शिंकेचें फल विचारलें. तेव्हां ते म्हणाले, " शिंक होतांच मार्गे पाऊल न घेतां चालूं लागतास तर खास राजाच झाला असतास. पण अझून असाच चालता हो म्हणजे तुला प्रधानपदाचा अधिकार मिळेल. " अशाप्रकारें प्रोत्साहन देणारें हें साधुवचन कानीं पडतांच अगोदरच पडल्या फळाची आज्ञा मानणाऱ्या जिवबाची स्वारी पुन: बापूमामांस साष्टांग प्रणिपात करून त्या फलश्रवणानें झालेल्या आनंदभरांत इ० स० १७५६ मध्यें तडक चालती झाली. यावेळीं त्यांचे वय अवघें सोळा वर्षांचें होतें.

कांहीं दिवसांनीं जिवबा कोल्हापुरास पोहोंचले. मार्गांत त्यांचे बरेच हाल झाले तरी ते न जुमानतां केवळ ईश्वरावर भार ठेऊन ते आपला मार्ग क्रमीत होते. कोल्हापुरास पोंचल्यावर तेथील प्रसिद्ध अंबाबाईचे देवालयांत जाऊन त्यांनीं देवीचें दर्शन घेतलें व तेथेंच एका उदार गृहस्थांची त्यांना गांठ पडली. जिवबाची दीनावस्था आणि त्यांची स्वाभाविक हुशारी हीं पाहून त्यांनीं बरेच दिवसपर्यंत जिवबास आपल्या घरीं आश्रय दिला. इतकेंच नाहीं तर जिवबाला कोल्हापुर रियासतींत कोठेंतरी कारकुनीची नोकरी मिळवून देण्याची देखील ते सद्गृहस्थ खटपट करूं लागले होते ! पण जिवबाच्या नापसंतीमुळें त्यांचा हेतु सिद्धीस गेला नाहीं. ही गोष्ट वेगळी. असो.

कोल्हापुरास आठ दहा महिनें राहिल्यावर आपल्या मालकाचा प्रेमपुर:सर निरोप घेऊन जिवबा महाराष्ट्राचें केंद्रस्थान, मराठेशाहीच्या अपूर्व वैभवाचें द्योतक व पेशव्यांची राजधानी जें पुणे शहर, तिकडे जावयास निघाले. पुण्यास पोहोंचताच सरदार बर्वे यांच्या पथकांत ते राहिले; व आपल्या अंगच्या गुणांनीं आणि कर्तबगारीनें थोड्याच दिवसांत त्यांनीं आपल्या धन्याची मर्जी संपादन केली. यामुळें बर्व्यांबरोबर कधीं कधीं जिवबासही श्रीमंतांच्या भेटीस जाण्याचा प्रसंग येई. त्यायोगानें त्यांची व श्रीमंतांची चांगली ओळख झाली. पुढे श्रीमंतांनीं जिवबास बर्व्यांकडून मागून घेऊन बांकनिशीच्या कामावर नेमिलें. त्या कामांतील अप्रतिम हुशारीमुळें ते लवकरच श्रीमंतांच्या कृपेस पात्र झाले. एकदां महादजी शिंदे पुण्यास आले असतां त्यांस श्रीमंतांनीं मेजवानी दिली. मेजवानीचा थाट अपूर्व होता; परंतु त्यामध्यें महादजीस आवडणाऱ्या एका पदार्थाची उणीव होती. तेव्हां महादजींनीं जिवबाकडे सहज दृष्टी केली.

महादजी शिंद्यांस तिळांची चटणी फार आवडत असे हें जिवबांस ठाऊक होतें. तेव्हां तत्काळ ते म्हणाले. "आज सोमवार होता म्हणून करविली नाहीं" हें ऐकून त्यांच्या समयसूचकतेचें महादजींस भारी कौतुक वाटलें. पुढें लवकरच सरदार बर्वे वारले. त्यांचे मुलगे अल्पवयी असल्या कारणानें त्यांच्या पथकाची सर्व व्यवस्था पाहण्याचें काम श्रीमंतांनीं जिवबांस सांगितलें नंतर कांहीं दिवसांनीं कर्नाटक प्रांतीं बर्व्यांतर्फे जिवबादादा यांस सुभेदार म्हणून पाठविण्यांत आलें होते. इकडून पुढें जिवबादादांचा उर्जितकाल वाढण्यास आरंभ झाला.

इ० स० १७६१ सालीं दुराणींशीं लढण्यासाठीं मराठ्यांची एक मोठी फौज तयार झाली. तिचें आधिपत्य सदाशिवराव उर्फ भाऊसाहेब पेशवे यांजकडे होतें. त्यावेळीं त्यांजबरोबर बर्व्यांचें पथक घेऊन जिवबादादाही गेले होते. मराठ्यांच्या दुर्दैवानें दुराणीबरोबर झालेल्या पानिपतच्या युद्धांत त्यांचा पराभव झाला व मराठेशाहीस एक जबरदस्त धक्का बसला. या युद्धांतून जे कांहीं पुरुष जीव बचावून स्वदेशीं पोंचले, त्यांत सुभेदार मल्हारराव होळकर, नारोशंकर, राजे बहाद्दर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, दमाजी गायकवाड, महादजी शिंदे, जिवबादादा व नाना फडणवीस हे प्रमुख होत. मराठ्यांच्या नांवास हा अपजयाचा काळीमा लागलेला पाहून व पानिपतच्या रणकंदनांत बंधु, पुत्र इत्यादि लक्षावधी मनुष्यांची प्राणहानी झालेली पाहून श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या कोमल हृदयास धक्का बसला व त्याच झुरणीनें ते सहा महिन्याच्या आंत स्वर्गस्थ झाले. नानासाहेबांनीं महादजीस शिंद्यांच्या गादीवर बसवून त्यांच्या मदतीस जिवबादादास दिलें होतें. अलिजा बहादूर महादजी शिंदे यांनीं पुढें जी कीर्ति मिळविली तिचें बहुतेक श्रेय जिवबादादांस आहे म्हटलें असतां अतिशयोक्ती होणार नाहीं!

इ० स० १७६५ मध्यें मल्हारराव होळकर वारल्यानंतर त्यांची विधवा सून सुप्रसिद्ध साध्वी अहिल्याबाई राज्याची व्यवस्था पाहूं लागली होती. श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब यांच्या मनांत होळकरांची गादी खालसा करावी असें होतें; ह्मणून त्यांनीं शिंद्यांस तसें करण्यास फर्माविलें. दादासाहेबांचें हें गैरशिस्त वर्तन महादजीस न आवडल्यामुळें त्यांनीं तें करण्याचें साफ नाकारिलें व उलट साध्वी अहिल्याबाईस साह्य करण्यास त्यांनीं आपले सेनापती जिवबादादा यांस इंदुरास पाठविलें. भोंसले, गायकवाड वगैरे सरदारही अहिल्याबाईच्या पक्षास मिळाले; तेव्हां हा सर्व प्रकार पाहून दादासाहेबांनीं आपलें म्हणणें निमूटपणें मागें घेतलें. पुढें

शिंद्यांनीं मेवाडचा राणा हरसी याच्यावर स्वारी केली. त्याप्रसंगीं शिंद्याच्या लष्क-राचें सेनानायकत्व जिवबादादांकडे होतें. यावेळीं जिवबांनीं अनुपम शौर्य दाखवून व असाधारण पराक्रम करून रजपूतांचा पूर्ण मोड केला. पुढे गोहदचा जाट राणा दिवसेंदिवस अत्यंत प्रबळ होत चाललेला पाहून महादजी शिंद्यानें त्याचे पारिपत्य करण्यासाठीं जिवबादादास पाठविले. तेव्हांही त्यांनी निकराचें युद्ध करून त्या जाट राण्यास ठार मारिलें. या मोठ्या विजयामुळें जिवबांचा दरारा सर्वत्र पसरला. या त्यांच्या पराक्रमामुळें खुष होऊन शिंद्यांनी त्यांना बक्षीगिरी दिली. प्रसिद्ध साधु सोहिरोबानाथ आंबिये याना जिवबांनी महादजीच्या भेटीस आणिलें होते. त्यावेळच्या प्रसंगाचें वर्णन मागें दुसऱ्या प्रकरणांत सोहिरोबांच्या चरित्रांत आलेच आहे. असो.

अशारीतीनें जिवबादादांचा दिवसेंदिवस उत्कर्ष होत चाललेला पाहून पुष्कळ-जण त्याचा द्वेष करूं लागले. इतकेंच नाहीं तर त्यांनीं कुटिल नीतीचें अवलंबन करून महादजीचें मन कलुषितही केलें. विनाकारण धन्याची आपल्यावर इतराजी झालेली पाहून या स्वामिभक्त सरदारास अत्यंत खेद वाटला. पुढे महादजीस आपली चूक कळून येऊन त्यांनीं पुनः जिवबादादाचा पूर्ववत् गौरव केला. यानंतर टिपु-सुलतान ज्याला म्हसूरचा वाघ असे म्हणत त्याच्याशी मराठ्याचे युद्ध झाले. त्या-वेळी मराठ्याचे सरदार परशुरामभाऊ पटवर्धन व जिवबादादा हे होते. त्यानीं अलौकिक शौर्य प्रगट करून बदामीचा आजिक्य किल्ला सर केला व त्या म्हसूरच्या वाघास अत्यंत जेरीस आणिलें. जिवबानीं लखबादादा, जगोबाबापू वगैरे रणधुरंधर सरदारांच्या मदतीनें रजपूत, जाट, गिलचे, शीख, मोंगल वगैरे लोकास 'दे माय धरणी ठाय' या म्हणीची चागली आठवण करून दिली. इ० स० १७९५ सालीं खर्ड्याच्या भयंकर महायुद्धांत निजामाचा पूर्ण मोड करून मराठ्यांस जो अपूर्व जय मिळाला त्याचे सर्व श्रेय जिवबादादाकडेसच आहे. या एकंदर लढाईतील प्रसं-गाची साद्यंत हकीगत जिवबादादांच्या विस्तृत चरित्रांत आलेली आहे. ती वाचून पाहिली म्हणजे अंगावर शहारे उभारून त्याच्या अवर्णनीय शौर्याची उत्तम कल्पना होते!

याप्रमाणें जिवबादादा सतत उद्योगानें व आंगच्या शौर्यत्वादि बहुमोल गुणानें एवढ्या योग्यतेस चढले होते. त्यांच्या ठायीं स्वाभिमान, भूतदया, स्पष्टपणा, समयसूचकता, मुत्सद्दीपणा, स्वामिभक्ति इत्यादि अनेक सद्गुण वसत होते. त्यांचें वर्तन पवित्र, साधी राहणी, निर्मळ अंतःकरण, अपूर्व धर्मश्रद्धा, निस्पृहता हीं उज्वल होतीं. त्यांच्या धर्मश्रद्धेसंबंधानें अशी एक आख्यायिका आहे कीं, " जिवबादादा एकदा

नित्य क्रमाप्रमाणें माध्यान्हसंध्येस बसले होते. गायत्रीमंत्राचा जप चालला होता. इतक्यांत एक कसायाच्या तावडींतून सुटलेली गाय जीवाच्या आशेनें भरधांव पळत जिवबादादांच्या पुढें येऊन उभी ठाकली, व डोळ्यांतून दुःखाश्रू ढाळूं लागली. दादांनीं तिची पूजा केली व तिच्या पाठीवरून हात फिरवून त्यांनीं तिला अश्वासन दिलें. पुढें तो कसाई गाईचा शोध करीत तिकडे आला. व ती गाय मागूं लागला. जिवबादादा गाय न देतां तिची लागेल तितकी किंमत देण्यास तयार झाले, पण कसाई ऐकेना. तो ह्मणाला ' महाराज ! आजपर्यंत मी हजारों गोहत्या केल्या तेव्हां आतां जर या गाईचा वध मी न केला तर मागच्या सर्व गोहत्या व्यर्थ होतील. आणि यायोगानें माझ्या कसाईपणाच्या वृत्तीस बट्टा लागल्याप्रमाणें होईल. तर मी ही गाय घेतल्याशिवाय इकडून जाणार नाहीं. ' जिवबादादास कसायाच्या भाषणाचा अतिशय राग आला आणि लागलीच त्यांनीं म्यानांतून आपली तरवार काढून ते त्या कसायावर धांवून गेले व म्हणाले; ' दुष्टा ! ज्या हातानें तूं हजारो गोहत्या केल्यास ते तुझे हातच तोडून टाकतो. बरा सांपडला आहेस तावडीत ! ' हें जिवबांचें आवेश परिपूर्ण भाषण ऐकतांच तो कसाई मनांत दचकला आणि पळ काढीत आपल्या मुसलमानी राज्यांत जाऊन त्याने ही गोष्ट आपल्या यवनी बादशहास कळविली त्याबरोबर बादशहाने जिवबादादास कसायाची गाय सोडून द्यावी नाहीपेक्षां युद्धास तयार व्हावे असा निरोप पाठविला. त्याप्रमाणे जिवबा लढाईस तयार झाले. इकडे बादशहानेंही लढाईची कडेकोट तयारी केली आणि सर्व सैन्यासह लढाईचे जागी तो हजर झाला. जिवबादादांनींही आपल्या तोफा उत्तमरीतीनें लावून ठेविल्या व त्या गाईस साष्टांग नमस्कार करून तिच्या पाठीवरून हात फिरवून ते युद्धास जाण्यास निघाले. तेव्हां गाईनेंही सहर्ष हबरडा फोडून त्यास जाण्यास निरोप दिला. जिवबादादा रणांगणांत समशेर घेऊन उभे राहतांच युद्धास सुरवात झाली. त्यांत शत्रुकडील सेनाधिपतीस ठार करून जय मिळविला त्याबरोबर सर्वांची गाळण उडून मुसलमान लोकांपैकीं एकटाही तिकडे राहिला नाहीं. " अशारीतीने जिवबांनीं स्वधर्म रक्षण करून आपल्या कीर्तिसंग्रहांत विशेष भर घातली. जिवबादादांनी आपले कारकीर्दींत एकंदर दोनतीनशे तरी लहानमोठ्या लढाया मारल्या असें त्यांच्या पत्रव्यवहारावरून स्पष्ट होतें. त्या सर्वांत जय मिळवून त्यांनीं मराठ्यांचें राज्य राखिलें. या संधीस जिवबादादा नसते तर पूर्वींच म्हणजे सन १७६१ च्या सुमारास त्याचा लय झाला असता, कारण, सन १७६१ पासून

१७९६ पर्यंत मराठी राज्यांत जिवबादादांचीच विजयी तरवार वावरत होती! पेशव्यांचें प्रत्येक काम जिवबादादा आल्याशिवाय झालें नाहीं!! परंतु त्यांच्या पश्चात राज्यसंरक्षण करण्याचे कामीं शत्रूशीं टक्कर देण्यास कोणी बहादरगडी राहिला नाहीं!! कांहींजण असलेल्या जाहगिरी राखण्यासाठीं व कांहीं नवीन मिळविण्यासाठीं, अशाप्रकारें जो तो शत्रूस मिळाला!! सन १८७७ साली दिल्ली येथे भरलेल्या दरबारांत महाराज अलिजाबहादर जयाजीराव शिंदेसरकार यांना जो महादजी शिंद्यांचा जुन्या दिल्लीबादशहाच्या प्रधानकीचा मोठा मान मिळाला त्याप्रसंगीं हा मान महादजीस जिवबादादांच्याच पराक्रमामुळें प्राप्त झाला, असें जयाजीराव महाराजांनीं बोलून दाखविलें! मराठ्यांचे राज्यात आपल्या धन्यावर प्रीति करून, स्वामिकार्यास तत्पर राहून, स्वहित न पाहतां नीतीनें वागून शत्रूस हार न जातां सदा विजयी होऊन, ज्यांनीं मराठी साम्राज्याचा उत्कर्ष केला, असे हे प्रौढप्रतापी प्रसिद्ध वीर बक्षीबहादर जिवबादादा हे एकच होऊन गेले.

अनंत श्रमामुळें व सतत उद्योगामुळे जिवबादादांची प्रकृति दिवसेंदिवस क्षीण होत जाऊन त्यांस एकाएकी मोठा ज्वर येऊं लागला आणि त्यांतच वायूचाही प्रकोप झाला. मोठमोठे वैद्य आणून पुष्कळ उपचार करविले, परंतु गुण दिसेना. जिवबादादांस फार बरें नाहीं, असें कळतांच हजारों लोक त्यांच्या समाचारास येऊं लागले. महादजीनंतर गादीवर विराजमान झालेले त्यांचे चिरंजीव दौलतरावमहाराज यानाही जिवबादादाविषयी फार काळजी लागून राहिली. जिवबा आतां जगत नाहींत असें पाहून, त्यांना फार दुःख झाले. मग जिवबादादांचे चिरंजीव नारायणराव यांस तें होईल त्यांत कांहीं विशेष नाहीं. शेवटीं आतां आपण ह्या दुखण्यांतून पार पडत नाहीं असें जाणून त्यांनीं दौलतरावमहाराजांस आपलेजवळ पलंगावर बसवून घेऊन म्हटलें "दत्तक देऊन पेशवाई चालवावी म्हणून नांवास उगाच जें संमतिपत्र नानांनीं करून घेतलें, तेंच खरें धरून आम्हीं दत्तकास अनुकूल आहों असें समजून ते दत्तकाच्या खटपटींत आहेत; परंतु मनापासून या गोष्टीस बहुमत अनुकूल नाहीं व माझा शब्द सवाईमाधवरावांकडे गुंतला आहे हें लक्षांत ठेवून तुम्हीं बाजीरावास गादीवर बसविण्याची तजवीज ठेवा." दौलतरावांनीं ती गोष्ट मान्य केली; परंतु जिवबादादांची ती आसन्नमरण स्थिति पाहून त्यांच्या डोळ्यांतून पाणी आलें. त्यांनीं

---

१ ग्रांटडफची ब० पृ० ३४२।४३.

आपणाविषयीं जी काळजी घेतली होती, त्याचप्रमाणें शिंदेशाहीच्या उत्कर्षासाठीं त्यांनीं निस्सीमभक्तीनें जे आमरण कष्ट सोशिले होते, ते सर्व आठवून यांचा आतां लौकरच वियोग होणार असें मनांत येऊन दौलतरावांस फारच वाईट वाटलें. शिवाय पाटीलबावांसारखे राज्य हांकणारे खंबीर पुरुष गेल्यावर जिचा विस्तार मोठा अशी शिंदेशाही ज्याच्या जिवावर निर्धास्त चालली होती, त्या थोरपुरुषाच्या पश्चात् "**नसतां धुरंधर वृषभ बालवृषभभरेंकरूनि आ वांके**" अशा स्थितीला पोंचणार व आपलीही स्थिति तशीच होणार, असें मनांत येऊन ते अगदीं सचिंत झाले. तें जाणून जिवबादादा त्यांस म्हणाले, "बाबासाहेब ! मृत्युलोकची वस्ती अशाश्वत आहे. तेथें कोणाचा इलाज नाहीं. आजवर मीं तुम्हांस जें सांगावयाचें तें सर्व सांगितलें आहे; त्याहून विशेष काय सांगावयाचें ? परंतु तुम्ही पाटीलबावांप्रमाणें वागून जगांत कीर्ति मिळवा. सत्कीर्तिकरितांच आपल्यास वांचावयाचें आहे, ही गोष्ट चांगली मनांत बाळगा. तात्या आहेत; नारायण आहे; हे तुमची सेवा एकनिष्ठेनें बजावितील. तुमचें वय अद्याप लहान असून तुम्हांस या रयाशतींतील बिकट प्रकरणांचा चांगलासा अनुभव नाहीं; तेव्हा, हे व अशाच प्रतीचे गादीचे खरे कल्याण इच्छिणारे, यांच्या सल्ल्यानें वागत जा. आता विशेष काय सांगूं ?" याप्रमाणे बोलणें झाल्यावर दौलतराव कष्टी होऊन आपल्या गोटांत गेले. नंतर दादांनी बाळोबातात्या व नारायणराव यास जवळ बोलावून सांगितलें. "आजवर शिंदेसरकारची चाकरी एकनिष्ठपणें व जिवाची परवा न करिता बजाविली. सरकारचे दौलतीचे कल्याणाखेरीज दुसरा विचार चित्तांत वागविला नाहीं, आणि शेवटीं सरकारचाकरींतच देह ठेवीत आहे. राज्यकारभारांतील गोष्टी फार बिकट व मसलतीच्या असतात; त्या तात्यास माहितच आहेत. दिवसेंदिवस हा कार्यभाग आणखी बिकट होत जाणार, अशीं चिन्हे दिसत आहेत. अशाप्रसंगीं धैर्य खचूं देऊं नका. यजमानसाहेब, येथील सरदारलोक व इतर राजेरजवाडे, या सर्वांशीं मोठ्या शहाणपणानें वागलें पाहिजे. कोणास उगाच दुखवावयाचे तर नाहीं आणि कोणाच्या कपटजाळ्यांत सांपडायाचें नाहीं. हे काम मोठ्या अकलेचें आहे; तेव्हां तुम्ही जेणेंकरून आजपर्यंतचा लौकिक पुढें चालेल, अशाप्रकारें धन्याठायीं एकनिष्ठा ठेवून व हरएक बाबतींत नेहमीं सावधगिरी बाळगून वागा. जें धन्यास हितकारक, भल्यांस पसंत व देवास रुजू, तेंच केले पाहिजे. अशारीतीनें वागून कीर्ति मिळवाल अशी माझी खात्री आहे. आणखी काय सांगावें ? सर्वांनीं एकविचारें व भलेपणानें

वागावें, म्हणजे देव भलें करील. आता माझ्याने विशेष बोलवत नाहीं. " असें म्हणून त्यांनी श्रीमत्सोहिरोबानाथाच्या उपदेशाप्रमाणे सर्व लक्ष इहलोकच्या पसाऱ्यावरून काढून केवळ एकाग्रतेने परमेशचिंतनात घातले. शक्तिपात झाला होता तरी शुद्धि चांगली होती आणि सोशिकपणाही विलक्षण होता; त्यामुळे कण्हत न पडतां त्यातल्या त्यात निश्चल राहून शांतचित्तानें त्यांनी नामस्मरण चालविले. दुखणें इतकें होते तरी ते स्नान करून शुचिर्भूत झाले होते. विधियुक्त भस्म चर्चून रम्य गळ्यात रुद्राक्षमाला व हातात स्मरणी, ही त्यांनी धारण केली होती व नेत्र मिटून ते ध्याननिमग्न झालेले दिसत. दादाचे चिरंजीव नारायणराव यांनीही आपली शोकविव्हलता दूर लोटून त्यावेळची तयारी उत्तम ठेविली होती. चोहोंकडे सुवासिक पुष्पांच्या माळा टांगिल्या होत्या. उदबत्त्या, अगरबत्त्या, अबीर, बुक्का, कापूर, चंदन वगैरेचा घमघमाट चाललेला होता. सभोवार ब्राम्हण बसवून गीता, विष्णुसहस्रनाम, शिवकवच यांचे पाठ चालविले होते. काही मंडळींचे मंजुळ स्वानें भजन चाललें होतें. दादा मधून मधून रा-म रा-म असें निद्रेतून जागे झाल्याप्रमाणें होऊन म्हणत होते. अशारीतीने चोहोंकडे शांतचित्तानें धार्मिककृत्यें चाललेली असल्याने तो देखावा तितका दुःखद वाटत नव्हता. अशा स्थितीत एक प्रहर गेला. तो दिवस शके १७१८ मार्गशीर्ष वद्य द्वादशी बुधवारचा होता. वेळ दोनप्रहरची होती. त्यावेळी दादासहिबाना अत्यंत ग्लानि येऊन हालचाल बंद पडली. महाराज दौलतराव शिंदे व इतर मानकरी दरकदार सरदार वगैरे मंडळी बरीच जवळ होती. इतक्यात रा-म असा अस्पष्ट उच्चार होऊन जिवबादादाचे प्राणोत्क्रमण झाले. ही गोष्ट तारीख ६ जानेवारी सन १७९६ रोजी जावगांवी घडली. मग बाळोबातात्यांनी व दौलतरावमहाराजांनी सर्व तयारी करवून त्यांच्या उत्तरक्रियेचे काम मोठ्या सन्मानानें पार पाडिलें. त्यांच्या स्मशानयात्रेस बरेंच लष्कर व सर्व लहानमोठे सरदार व मानकरी गेले होते. असो.

जिवबादादा वारल्याची हकीकत हिंदुस्थानात निरनिराळ्या ठिकाणी जानोबाबापू, यशवंतरावभाऊ वगैरे होते, त्यास तावडतोब कळविली. तसेच जिवबादादाचे वडील बंधू नरोबादादा, कोंकणात होते त्यासही दौलतरावमहाराजांनी पुढीलप्रमाणें पत्र पाठवून दुःखवार्त्याची बातमी कळविली:—

१ काव्ये० स० तील पंतप्रधान शकावली पृ० ३८ व भारतवर्ष.

श्री

ता० २२ जानेवारी सन १७९६

राजश्री नरहर गणेश गोसांवी यांस.

छ० अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित दौलतराव शिंदे राम राम सु॥ सित तिसेन मया आलफ. जिवाजी बल्लाळ यांचे शरीरीं ज्वरांश जाहला. त्यांत वायूचा प्रकोप होऊन बहुतच बा अदाम एकाएकी जाहल्यामुळें दैविक मानवी उपाय व्हावयाचे ते बहुत झाले. परंतु एकही गुणावह न होतां मार्गशीर्ष वद्य द्वादशी बुधवारीं दोनप्रहरां काळ जाहला. ईश्वरें गोष्ट मोठी अनुचित केली. होणारास उपाय काय आहे? ईश्वरइच्छाप्रमाण. तुम्हीं कोणेविशीं खेद न करितां चित्तास विवेक करून शांतवन करावें. येथें राजश्री नारायणराव जिवाजी आहेत. कामकाज पूर्ववत्प्रमाणें चालेल. चिंता नाहीं जाणिजे. छ. ११ माहे रजब. बहुत काय लिहिणें हे विनंति.

ज्योतिस्वरूप
चरणी तत्पर महा-
दजीसुत दौलतराव
शिंदे निरंतर

मोर्तब.

जिवबादादा जिवंत होते तोपर्यंत केवळ शिंद्यांच्या रयासतीचेंच कल्याण झालें होतें असें नाहीं. तर पेशवेसरकार, दिल्लीपति व रजपूत राजे इत्यादिकांचेंही त्यांजपासून पुष्कळ हित झालें होतें. महादजींसारख्या कुशल राज्यकर्त्यास व मोठमोठ्या दिल्लीपतीसारख्या राजेरजवाड्यांस दादांची सल्ला व कोटिक्रमही फार पसंत पडत. गोड, सरळ, मित व भारदस्त अशा भाषणानें त्यांची सर्वांवर छाप पडत असे. थोर लोकांविषयीं सन्मानबुद्धि, अनाथांविषयीं दया, धार्मिककामांत मोठी हौस, व परमेश्वरीं प्रेमळभाव या गुणांनींही जिवबा अत्यंत मंडित होते. अशाप्रकारचे पुरुष खरोखर देशाला भूषणभूत होत. असो. आतां जिवबादादांच्या आयुःक्रमांतील कांहीं ठळक ठळक महत्वाच्या गोष्टींचा येथें निर्देश करून हें त्यांचें लघु चरित्र समाप्त करितों.

## जिवबादादा शिंद्यांचे सेनापति असतां त्यांच्या हाताखालीं जे सैन्य होतें त्याचा तपसील.

१००००० स्वार ( घोडेस्वार–घोडा, स्वार, मोतद्दार. )
५०००० पायदळ. कपू ५ ( प्रत्येक कपूंत दहा हजारप्रमाणें लोक )
५०० तोफा ( प्रत्येक तोफेस गोलंदाज ३ प्रमाणें )
२०० जिनशी ( मोठ्या ) तोफा.
१०००० जिवबादादाचें खासगी सैन्य. ( फक्त स्वार )
६०००० पेंढारी ( हे लष्कर गरजेप्रमाणें कमीजास्त होत असे. )
१५००० शिंदेसरकारची खासगी हुजुरात.
३००० जनानखान्याकडील खासगी सैन्य.
८०० हत्ती ( कधीं कधीं ही संख्या पांचशेंपर्यंत असे. )
८०० रथ ( बैल जुंपावयाचे )
३०० सांडणीस्वार.
११००० ओझीं उचलणार उंट.
१३००० तोफा ओढणारे बैल.

याशिवाय प्रांतोप्रांतीं किल्ले वगैरे ठाण्यांत तोफा व सैन्य निराळें होतें. शिवाय बादशहाकडील फौज निराळीच होती.

## जिवबादादांचें वेळचें मुत्सद्दीमंडळ.

१ बाळाजी अनंत पिंगे ऊर्फ बाळोबा तात्या पागनीस.
२ राघोराम राजाध्यक्ष रागणेकर ऊर्फ राघोराम पंगे.
३ सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण.
४ लक्ष्मण अनंत ऊर्फ लखबा दादा.
५ शिवाजी दुल्लभराव केरकर ऊर्फ शिवबानाना.
६ जगन्नाथराम केरकर ऊर्फ जगोबा बापू.
७ यशवंतराव शिवाजी बागले.
८ धोंडबादादा पागनीस. ९ भिवराव मोर्दी.
१० गोपाळराव भाऊ चिटणीस ऊर्फ गोपाळराव रघुनाथ प्रभू.
११ साबाजीराव मोदी. १२ बाळाजीराम केरकर ऊर्फ बाळाभाऊ बक्षी.
१३ नारायणराव जिवाजी केरकर ऊर्फ नारायणराव बक्षी.

१४ भाऊ फडणीस ( देशस्थब्राम्हण. )

१५ बाजीबा महाजन मोदी. १६ रामजीपाटील जाधव.

याशिवाय २५९ सरदार होते. या सरदारांत सारस्वत ब्राम्हणांची संख्या जास्त होती.

## जिवबादादांच्या जहागिरी*

१ निमच महाल. २ जावद महाल. ३ जिरण महाल. ४ सिहोर पंचमहाल. ५ सिंगोली महाल. ६ गंगापूर महाल. ७ अष्टा. ८ चिताखेडा. ९ सुजालपूर. १० आमझरा. ११ कुंबलमेर. १२ राजनगर. १३ केलवाडा. १४ खेमणोर. १५ सिंघनपूर. १६ देहरी. १७ दिराई. १८ आरुणशा. १९ डोरा. २० मुरसान महाल. २१ जामगांव. २२ रादतळें. २३ कोंकणप्रांतांत तळगांव, केरी, हरमल. २४ कडेगांव. २५ कोलारी. २६ बांवच्या. २७ खारद्या. २८ धिजळगांव. शिवाय शेतजमिनी.

## जिवबादादांचे वाडे.

उज्जनीतील, ग्वाल्हेरींतील, कंपूकोठीजवळ, लष्करांत बावनपागेजवळ, जनकगंजांत, नरवर, मंडोसर, जावद, जिरण, निमच, प्रयाग, पुष्कर, मथुरा, आग्रा, काशी, गया, जामगांव, तळगांव, वानवडी, हरमल, आरवंदे, सावंतवाडी वगैरे ठिकाणचे मिळून २३ वाडे होते.

## जिवबादादांनीं केलेलीं धर्मकृत्यें.

१ मथुरेस देवालय बांधून खर्चासाठीं गांव इनाम दिले आहेत.

२ श्रीगंगेचे कांठीं रामघाटास मंदीर बांधून खर्चासाठीं गांव इनाम लावून दिले आहेत.

३ पुष्करास सारस्वतब्रम्हवृंदांचे धर्मगुरु श्रीगौडपादाचार्यान्ववाय कैवल्य ( कवळें ) मठाधिपति स्वामी यांचे मठास दोन गाव इनाम दिले आहेत.

४ हरिद्वारास व पुष्करास ब्राम्हणांस जमिनी दान दिल्या आहेत.

५ पुष्करतीर्थावर सन १७९० सालीं दुष्काळाच्या वर्षी भिक्षुक, बैरागी वगैरे लोकांस दोन लक्ष रुपये धर्म करून अन्न पुरविलें.

---

* याबद्दलची पत्रें व सनदा जिवबादादांच्या विस्तृत चरित्र पुस्तकांत दिलीं आहेत.

६ ग्वाल्हेर येथे अग्निहोत्र चालविले होते.

७ पंढरपूरच्या विठोबास द्रव्याची देणगी.

८ हिंदुस्थानांत बऱ्याच ठिकाणी रस्त्यावर पाण्याच्या विहिरी व तीर्थावर धर्मशाळा बांधिल्या आहेत.

९ जावद येथे गंगाकुंड बांधिले आहे.

१० ब्रम्हावर्तास श्रीरामकृष्णाची स्थापना करून नैवेद्यास देणगी दिली

११ अजमीरच्या खाजेपिरास सोन्याचा घुमट घातला होता.

१२ जिरण येथे किल्ल्याचे खाली तलावाचे कांठावर सतीचे मंदीर बांधिलें आहे.

१३ जावद येथे जुना वाडा सराफयांत आहे, त्याचे शेजारी यशवंतरावभाऊंनीं श्रीविष्णूचें देवालय बांधिले आहे त्यास सरकारांतून नेमणूक चालू आहे.

१४ जावद येथे रामपुर दरवाजाचे बाहेर पाव मैलाच्या अंतरावर नदीतीरीं मोठा घांट बांधून तेथे श्रीलक्ष्मीनारायणाचे मंदिर व जवळ एक विहीर बांधिली. या देवस्थानचे खर्चास जमीनजहागीर दिली आहे.

१५ कोंकणांत सावंतवाडीप्रांतीं, श्रीपरशुरामभारतीमठ तळवणें येथें पाण्याच्या तळ्या बांधिल्या आहेत.

१६ केरीगांवी श्रीरवळनाथाचे देवालय बांधिले आहे.

१७ अंकेरीच्या श्रीरामेश्वराचे देवळास काळ्या दगडाचे खांब बांधून त्यावर कोरीव काम केले आहे.

१८ हरमल येथे श्रीरवळनाथाचे देवालय बांधिले आहे.

१९ आरवंद गांवी वासुदेव सिद्धपुरुषाचे मठास नेमणूक सुरू आहे.

२० देशांतून कोंकणांत येतांना रामघांट रस्त्यावर आजूबाजूस बऱ्याच अंतरावर पाणी नसल्यामुळे घाटमाथ्यावर पाण्याच्या तळ्या बांधिल्या आहेत.

२१ ग्वाल्हेर येथे जिवबादादांच्या घरीं दरवर्षी श्रावणीच्या दिवशीं सर्व ब्राम्हणांनीं जमावे असा संप्रदाय असे, त्या आलेल्या प्रत्येक ब्राम्हणास जानव्यांचे पांच जोड व रुपये, पवन आणि खुर्दा हीं एकत्र केलेलें द्रव्य पसाभर देण्याची चाल होती.

याशिवाय दादांनी व जगोबाबापू, यशवंतराव वगैरेनी केलेलीं बरींच धर्मकृत्यें आहेत; तीं सर्व दादांच्या विस्तृत चरित्रांत पहावीं.

जिवबादादासंबंधानें त्यांच्या विस्तृत चरित्रपुस्तकांत ऐतिहासिक गोष्टीही बऱ्याच

प्रसिद्ध झाल्या आहेत. विस्तारभयास्तव त्यांपैकीं विशेष महत्वाच्या अशा दोनच गोष्टी येथें नमूद करितों—

( १ ) पाटीलबावांसंबंधानें नानाफडणविसांचा ग्रह कित्येक कारणांनीं फारसा अनुकूल नव्हता. ते म्हणत, शिंद्यांच्या तरवारीस आम्हांस भ्याले पाहिजे; पण त्यांच्या लेखणीची कडी आह्मांवर कधींही चालावयाची नाही. ह्या गोष्टी पाटीलबावांच्या दरबारांत कळत असत; परंतु योग्य प्रसंगाशिवाय कोणत्याही गोष्टीचा खुलासा होत नसतो. पुढें, पाटीलबावा पुण्यांत असतां एकदां नानाफडणविसांनीं त्यांस दरबारांत म्हटलें, पाटीलबावा तुम्ही श्रीमंताच्या दौलतीचे आधारस्तंभ असतां आणि हिंदुस्थानभर प्रताप गाजवून पुष्कळ मुलूख आणि मुबलक पैसा मिळवीत असतां सरकारखजिन्यास मदत कां करित नाही? सरकारच्या दौलतीची मदार तुह्मां सरदारांच्या मदतीवरच अवलंबून असावयाची सध्या तुम्हीं पन्नास लाख रुपये द्यावे, असें श्रीमंतांच्या मनांत आहे; तेंव्हा याची तजवीज कशी करितां? हें ऐकतांच महादजी शिंद्यांनी उत्तर केलें कीं, आम्ही श्रीमंताच्याच पुण्यप्रतापेंकरून लौकिक मिळविला. स्वाऱ्याशिकाऱ्या बहुत केल्या व काहीं मुलूख मिळविले; पण, ह्या कामीं अतोनात खर्च आला. श्रम साहस केवढे पडले ह्याचा विचार सरकारास आम्ही कळविला पाहिजे असें नाही ह्मशीच्या एका आंचळाचे दूध काढून दुसऱ्या आंचळास लावावें, अशांतलीच आमच्या स्वाऱ्याची गत. तेव्हां, अशा स्थितींत पैशाची तोड कशी निघते? आतां आमच्यापाशीं पैसा नाहीं, तरी पदरास चार रत्नें आहेत; त्यामुळें आम्हांस कांही कमी पडत नाहीं, तें ऐकून नाना म्हणतात, तीं चार रत्नें हल्लीं स्वाऱ्यांत पैदा झालीं असतील? पाटीलबावा म्हणाले, नाहीं, नाहीं. तीं सुदैवानें घरीं बसल्याठिकाणींच प्राप्त झालीं आहेत, आणि श्रीमंतांच्या पाहण्यांत आलेल्या रत्नांपेक्षां त्यांची किंमत फार निराळ्याप्रकारची आहे. नाना ह्मणाले, तीं आम्हांस दाखवाल काय? पाटीलबावा म्हणाले, तीं आपल्या पाहण्यातलींच आहेत. श्रीमंतांस संशयांत कशास ठेवूं? जिवबादादा, लखबादादा, बाळोबातात्या व सदाशिव मल्हार हींच चार रत्नें होत; आणि ह्या चार रत्नांमुळेंच आम्हांस कांही कमी नाहीं. मग नाना हांसून म्हणाले, असें काय? तर मग हीं रत्नें तुम्हांपाशी असल्यावर तुम्हांस पन्नास लाख रुपये देण्यास मुळींच पंचाईत पडणार नाही? नानांच्या या कोटिक्रमापुढें पाटीलबावांस निरुत्तर व्हावें लागले व पुढें कांही भवति न भवति होऊन पाटीलबावांस पन्नास लाख रुपये देणे कबूल करावें लागलें. पुढें पाटीलबावा दरबारांतून गोटांत आल्यावर झालेलें सर्व वर्तमान त्यांनीं जिवबादादांस सांगितलें.

जिवबादादांनीं सांगितलें कीं, आर्धी पन्नास लाख रुपये कबूल करावयाचे नव्हते. बरें, आतां कबूल केले, तर त्यांच्या फडीची कांहीं युक्ति काढिली पाहिजे. त्यांनीं असा कोटिक्रम लढविला आहे, त्यापक्षीं आपणही देण्याची तोड तशीच कांहीं मसलत योजून लाविली पाहिजे. मग बराचवेळ विचार करून ते पाटीलबावांस ह्मणाले, पुढें तुम्ही दरबारास जाल, तेव्हा नानांनी रुपयांची गोष्ट पुनः काढू नये. असें करितों पाटीलबावा म्हणाले, तें काय ? जिवबादादा ह्मणाले, तें कांहीं असलें तरी नानांनीं पुनः गोष्ट काढिली नाहीं म्हणजे झालें ना ? इतक्या गोष्टी होऊन ते आपापल्या व्यवहारास लागले पुढे, चार आठ दिवसांनी दरबार भरला, त्यावेळीं महादजी शिंदे वगैरे जाऊन आपआपल्या स्थानीं बसल्यानंतर कांहींवेळानें हैदराकडील एक जासूद सांडणीस्वार आला व त्यानें श्रीमंतास व पाटीलबावांस मुजरा करून खिशांतील लखोटा काढून शिंद्याच्या हातीं दिला त्यात मलियाळी भाषेंत पत्र असून त्याचें भाषांतर मराठींत केलेलें होतें. तें पत्र त्यांनीं वाचून पाहून श्रीमंत सवाई माधवरावाचे हातीं दिलें त्यांनी ते वाचून नानाचे हातीं दिले. त्या पत्रांत हैदरानें शिंद्यास लिहिलें होतें कीं, " तुमच्या पराक्रमाची कीर्ति फार ऐकतो. इंग्रजांशीं लढाई चालविण्याचे कामीं आम्हांस तुमच्या मदतीची फार जरूर आहे. यासाठीं स्नेहाच्या नात्यानें आम्हांस मदत कराल, तर तुमच्या खर्चाची वगैरे सरबराई तुमच्या मर्जीप्रमाणें करून देऊ. तरी मेहेरबानीनें पत्र पोंचतांच फौजेसहित तावडतोब यावें "

हें पत्र वाचून तिघेही ह्या नवीन प्रकरणाच्या विचारानें चकित झाले. पुढें पाटीलबावांनीं त्या स्वारास आपल्या गोटात पाठविलें. पुढें, ह्या त्रिवर्गाच्या हैदर व इंग्रज ह्या संबंधाच्या गोष्टी चालल्या आहेत, इतक्यात हैदराकडील दुसरा जासूद आला. त्यानेंही तसेच मुजरे करून पाटीलबावापुढे एक लखोटा टाकला, तो त्यांनीं वाचून पाहिला. त्यात लिहिलें होतें कीं, " मसलत मोठ्या निकडीची आहे. तुम्हीं स्वतः येण्याचें कारण नाहीं. तुमचे पराक्रमी सरदार जिवाजी बल्लाळ बक्षी यांस मोठ्या फौजेसहित जलद पाठवा. वाट पाहत आहों. " तेंही पत्र पूर्वीप्रमाणें पाटीलबावांनीं पुढें केलें तें पाहून नाना अधिकच घोटाळ्यात पडले. पुढे, त्याही स्वारास पाटीलबावांनीं गोटात दवडलें. ह्या गोष्टीस चार घटका जातात न जातात, तों कचेरी बरखास्त होण्याचेवेळीं हैदराकडील तिसरा स्वार येऊन थडकला. त्यानेंही तसाच लखोटा महादजी शिंद्याकडे दिला तो जासूद मोठ्या दौडीनें आल्यामुळें थकलासा दिसत होता. त्या पत्रांत लिहिलें होतें कीं, " जरूर जरूर येणें. नाना फडणविसांस कळवूं

नये. येण्यास क्षणाचा विलंब लावूं नये. मसलत तशीच आहे. मुलूख व पैसा मागाल तो देतों. " हें पत्र महत्त्वाचें, सबब नानाच्या हातीं न देतां पाटीलबावांनीं आपणापाशींच ठेविलें. तेव्हां नानांस फार संशय आला–आणि त्यांनीं तें त्यांजवळून आग्रहानें मागून घेतलें आणि वाचून पाहिलें. तेव्हां, ते फारच बुचकळ्यांत पडले. शिंद्यांच्या उत्कर्षाबद्दल त्यांना अगोदर मत्सर होताच, त्यांत हैदरानें ही मदत केवळ महादजींकडेसच मागितली. आणि ही गोष्ट नानांस कळवूं नका, असें मुद्दाम लिहिलें आहे. तेव्हां कारस्थान कांहीं मोठें असावें, असा त्यांचा तर्क होऊन ते विचारांत अगदीं गर्क झाले. शेवटीं त्यांनीं शिंद्यांस म्हटलें, पाटीलबावा, पुढें कसें करणार ? तेव्हां ते म्हणाले, जिवबादादांचा विचार घेऊन काय ते करावयाचें. असें म्हणून त्यांनीं निरोप घेतला, आणि दरबार बरखास्त झाला. पाटीलबावा आपल्या गोटांत पोंचले, तों नानांचे गुप्त हेर त्यांच्या तंबूच्या आसपास तयार ! पाटीलबावा येतांच त्यांनीं अगोदर जिवबादादांस बोलावून आणिलें. आणि त्यांच्या हातीं तीं हैदराकडील पत्रें दिलीं. जिवबादादा म्हणाले, ' ती गोष्ट निघाली होती काय ? ' पाटीलबावा म्हणाले, छे. आज राजकारण निराळेंच आलें आहे हीं पत्रें वाचून बघा. जिवबादादांनीं पत्रें वाचून आश्चर्य व आनंद झाल्याचा बहाणा केला ( कारण तीं त्यांनींच बनविलेलीं होतीं ! ) आणि म्हणाले, तर मग आतांच कूच करून निघूं या. नाहीं तर नानांस दरबारांतच घडलेली ही हकीकत समजली आहे. इंग्रजांकडे त्यांचीं खलबतें चालतात. तेव्हां मसलत बिघडेल–पाटीलबावांनीही तें मान्य केलें व सर्व लष्करास कुचाचा हुकूम दिला. मग लागलेंच त्याप्रमाणें अमलांत येऊन, त्यांनीं तेथून दोन कोसांवर जाऊन तळ दिला.

इकडे नानास सारखी तळमळ लागून राहिली. त्यांनीं शिंद्यांचें कूच होण्याबरोबर लागलेंच इंग्रज वकीलास बोलावून आणिलें. आणि त्यास हें सर्व वर्तमान कळविलें. नाना म्हणाले, तुमचा आमचा स्नेह पूर्ववत कायम आहे. परंतु, हैदरास शिंद्यांची मदत मिळून तुम्हांबरोबर खास मोठी लढाई होणार. शिंद्यांची फौज येथून निघून हैदराकडे जाण्यासाठीं येथून दोन कोसांवर तळ देऊन राहिल्याची आतांच गुप्त डांक आली. शिंद्यांनीं या कामीं आमची सल्लाही घेतली नाहीं. मसलत तर मोठी आहे, तेव्हां यांतले इंगित कायतें समजा ! नानाच्या तोंडून ही महत्वाची बातमी ऐकून इंग्रज वकीलासही मोठी चिंता उत्पन्न झाली. आणि तो तावडतोब घोड्यावर स्वार होऊन शिंद्यांच्या छावणींत गेला.

इकडे शिंद्यांच्या फौजेनें तेथें मुक्काम केल्यावर जिवबादादांनीं पाटीलबावांस या बनावट मसलतीची हकीकत सांगितली. ते म्हणाले हैदराच्या राज्यांतील लोक या बाजूला असलेले शोधून आणून हे खलिते मुद्दाम तयार केले आहेत. नानांस ही गोष्ट कळवूं देऊं नये, म्हणून लिहिलेलें नानाच्या नजरेंत आल्यावर ते स्वस्थ बसणार नाहींतच. तेथें ते इंग्रज वकीलास कळविणार. त्यांचीं गुप्त खलबतें चाल-लेलीं असतात, हें श्रीमंतास माहीतच आहे. हें ऐकून पाटीलबावास आश्चर्य वाटलें व आनंदही झाला ते हासून ह्मणाले, दादा, तुम्हीं आह्मासमुद्धां कीहो चकविलें! आह्मीं तर ही मसलत खरीच समजलो. तेव्हां जिवबादादा म्हणाले, इंग्रज वकी-लास ही बातमी लागण्याबरोबर तो इकडे येतो की नाही पहा. इतकें होऊन ते पुढील व्यवस्थेस लागले.

दुसरे दिवशीं इंग्रजाचा वकील शिंद्याच्या छावणीकडे येत आहे असें पाहून पाटीलबावा ह्मणाले, दादा, तुमची युक्ति सोळा आणे लागू पडली! पुढें वकील आल्यावर अलिजाबहाद्दरास सलाम करून आपल्या जागीं बसला. मग त्यानें पाटील-बावास म्हटलें, इंग्रजाचा शत्रु हैदर, तुमचा आणि इंग्लिशाचा उत्तम स्नेह. असें असता तुम्ही हैदराच्या मदतीस चाललेला, हे तुमच्या आमच्या आजपर्यंतच्या स्नेहाच्या व ठरावाच्या विरुद्ध आहे. शिवाय, तमचा आमचा स्नेह बिघडण्यास कांहीं कारणही झालेलें नाहीं; तेव्हां हा विपरीत अर्थ का मनात आणिला? तेव्हां जिवबादादानी लागलेच सांगितलें, "तुमच्याशीं जसा आमचा स्नेह, तसाच हैदरा-शींही आहे. हैदराने ठराव केला आहे की, जर आम्हास मदत द्याल, तर तुम्हास चार कोट रुपये देतो. सध्या स्वाऱ्याच्या खर्चामुळें खजिन्यास ओढ आहे; तेव्हां हा अर्थ आम्हास टाकता येईना. निरुपाय आहे." हे ऐकताच वकीलानें उत्तर केलें, कांहीं झालें तरी तमची दोस्ती आम्ही हातची गमावणार नाहीं. खर्चाची तोड थोडीबहुत काढिता येईल मग परस्पर बहुत बोलणी होऊन तडजोड निघाली कीं, इंग्रजानी शिंद्यास दोन कोट रुपये द्यावे आणि तेवढें झाल्यावर शिंद्याचा व इंग्रजाचा स्नेह कायम रहावा व शिंद्यानें हैदराच्या मदतीस जाऊं नये. इतकें ठरलें तरी वकील म्हणाला, लाटसाहेबाच्या मंजुरीवाचून ऐवजाची भरपाई कशी व्हावी? दुसरें, इतक्या ऐवजाची आज तोडही लागण्यासारखी नाहीं. मग शिंदे म्हणाले, तुमच्या मंजुरीपर्यंत वाट पाहण्यास आम्हास अवकाशही नाहीं. शिवाय मसलत मोठी, तेव्हां घाईनें आम्हास कुच दरकुच जाऊन पोचलेंच पाहिजे. हें ऐकतांच इंग्रज वकीलाचा निरुपाय झाला. मग त्यानें त्याना राहवून घेतलें आणि एकदोन

दिवसांत सावकारांपासून वगैरे पैशाची जमाजम करून शिंद्यांस एक कोट रुपये पटविले. पन्नास लक्षांच्या कलकत्याच्या सरकारी पेढीवर हुंड्या दिल्या आणि पन्नास लक्ष राहिले त्याबद्दल जिवबादादांनीं तोंड सांगितलीं कीं, आम्हांस आमचे यजमान पेशवे यांस एवढाच ऐवज पाठवावयाचा आहे, तेव्हां श्रीमंत नानाफडणीसांकडून तेवढ्या रकमेचा तुम्हीं हवाला घ्यावा, म्हणजे तोंड निघेल. इंग्रज वकीलास ही गोष्ट मान्य होऊन त्यानें लागलेंच नानांस तेथें बोलावून आणवून पन्नास लक्षांचा हवाला घेवविला. मग शिंद्यांनीं नानांस सांगितलें कीं, तुम्हांस पन्नास लक्ष रुपये आम्हीं द्यावयाचे हल्लीं कबूल केले होते, त्यांची आम्हांकडून फेड झाली. याप्रमाणें दोन कोटींची व्यवस्था लागतांच कांहीं दिवसांनीं कलकत्त्याकडून येणारी रकमही शिंद्यांस मिळाली. मग शिंद्यांनीं बाहेर बातमी पसार केली कीं, हैदरानें मदत मागितली, ही गोष्टच मुळीं खोटी! नानांकडून परभारें शोधही चालले होते. त्यांना तसेंच वर्तमान लागलें; त्यामुळें त्यांना फार आश्चर्य वाटलें. इंग्लिशांसही ही बातमी मुळीं शिंद्यांनीं आपण होऊन दिली नव्हतीच. राजकारणाकरितां त्यांना इंग्रजवकीलाकडे तसा बहाणा करावा लागला. शिवाय, हैदराकडून शिंद्यांकडे मदतीकरितां मागणें गेलेलें नसलें, तरी इंग्रज वकीलानें देऊं केलेला पैसा हैदराच्या मदतीस जाऊं नका एवढ्याकरितां होता; त्या कामीं त्यांजकडून ठरावाप्रमाणें वर्तन झालें. तेव्हां, शिंद्यांनीं आपल्यास फसविलें, असें त्यांना बोलतां येईना आतां, नानांकडून मात्र इंग्लिश वकीलास समजलेली हकीकत–त्यांना 'समजली तशी–शोध केल्याशिवाय होती, म्हणून तशा अपुऱ्या शोधानें कळविलेल्या बातमीमुळें त्यांजकडे गुदरलेल्या पन्नास लक्षांच्या हवाल्याबद्दलची रकम त्यांना इंग्लिशाकडे मागतां येईना! अशाप्रकारें शिंद्यांकडून यावयाच्या पन्नास लक्षांच्या रकमेस वाटाण्याच्या अक्षता लागल्यामुळें नानांस मूग गिळावे लागले! नानांनीं पुढें बित्तम बातमी मिळविली त्यावरून त्यांना समजून आलें कीं, ही युक्ति जिवबादादांनीं पूर्वोक्त चार रत्नांपैकीं एका रत्नाची–स्वतःच्या मुत्सद्दिगिरीची–पारख दाखविण्याकरितां लढविली! मग त्यांना कळून चुकलें कीं, शिंद्यांचें केवळ तरवारीचेंच सामर्थ्य नाहीं. त्यांच्या राशिदींत राजकारणपटु, मुत्सद्दी मंडळी असून, ते म्हणतात त्याप्रमाणें त्यांजकडे चार रत्नें आहेत, यांत संशय नाहीं,

( २ ) नारायणराव पेशव्यांचा वध सुमेरसिंग वगैरे गारद्यांनीं केल्यामुळें आपणास देहान्त शिक्षा होईल या भीतीनें ते पुण्याहून सिंध प्रांतांत पळून गेले होते.

त्यांस तिकडून धरून आणण्याचा हिय्या कोणास होईना; म्हणून तें काम नानांनीं महादजी शिंद्यांस सांगितलें. मग, पाटीलबावांनीं हें महत्वाचें काम जिवबादादांकडे सोंपविलें. जिवबादादांनींही ती गोष्ट मनावर घेतली आणि दिल्लीकडील वगैरे महत्वाचीं कामें मागें ठेवून ते गारद्यांच्या शोधार्थ निघाले. कांहीं दिवसांनीं त्यांस पत्ता लागला कीं, गारदी सिंध प्रांतांत गेले आहेत. ते तेथे खुद्द अमीराच्या आश्रयास छपून आहेत. मग ते तिकडे जाण्यासाठीं निवडक सरंजाम घेऊन निघाले. तिकडे पोंचल्यावर त्यांस खबर लागली की, गारदी खैरपूरच्या अमीराच्या आश्रयास आहेत. म्हणून ते खैरपुरास गेले व नबाबाच्या हद्दीवर मुक्काम करून त्यास सांगून पाठविलें की, गारदीलोकांनीं नारायणरावसाहेब पेशवे-त्याचा धनी-यांचा वध करून ते तुम्हांकडे येऊन राहिले आहेत. आमची नेमणक त्यांस आणण्याच्या कामावर झाली आहे. त्यास जे आमचे अपराधी, तेच तुमचे अपराधी असें समजून, त्यांना आम्हांकडे पाठवून द्यावे. नबाबानें शिंद्याची कीर्ति ऐकिली होतीच. त्यांनीं रागरंग पाहून गारद्यांस जिवबादादांकडे पाठविण्याचें कबूल केले; परंतु, गारदी नबाबाचे बगलेंत शिरलेले, ते लौकर मिळेनात—मग वकीलामार्फत एकमेकाकडे बरेच वेळां निरोप घोळल्यावर जिवबादादाचा विचार ठरला की, ही गोष्ट अशा सोईनें निभावयाची. नाहीं. ही लांबणीवर पडत चालली असून आपल्यास येथे राहण्यास अवकाश नाहीं. तेव्हां लढाईशिवाय गारदी हातीं लागत नाहींत, असें त्यांनी जाणलें

ह्या वेळेपर्यंत जिवबादादांस तेथील जी माहिती मिळाली ती ही कीं, पानिपतच्या लढाईत जो मराठ्यांचा भयंकर मोड झाला, त्यातील पळालेली मनुष्यें तेथें हयात होतीं ही माहिती महत्वाची होय. त्या मनुष्यांत ज्या कित्येक लोकाचा पत्ता लागत नव्हता, असेही कांहीं लोक होते. ही सर्व माहिती त्यांनीं पाटीलबावांस लिहून पाठविली होती. शिवाय ह्या प्रवासांत आपल्या फौजेचे जे हाल झाले, त्यांबद्दल व सिंधूनदीच्या विस्तीर्ण पात्राबद्दलही माहिती त्यांनीं लिहिली होती. त्या नदीच्या पात्रांत जेथे नुसती रेतीच आहे असे समजून त्या जागीं पाय ठेविल्यास चटकन् पाय खालीं जाऊन पाण्यांत बुडायला होतें; पण दुसऱ्या तशाच ठिकाणीं तशी सावधगिरी ठेविली तर तेथें खरोखर रेतीच असते. पाण्याचा लेशही नसतो. तसेंच पात्र एवढें विस्तीर्ण व खोल आहे कीं, त्यांतून हत्ती, घोडे, उंट, वगैरे मोठ्या युक्तीनें पलीकडे न्यावीं लागतात. शिवाय जलप्रवाहाचा निरनिराळ्या वेळीं अनुभवास येणारा चमत्कार इत्यादिकांविषयीं त्या पत्रांत पुष्कळ मनोरंजक माहिती दिली होती. तीं पत्रें पाटीलबावांनीं पेशव्यांकडे पाठवून दिलीं, असें ह्मणतात.

पुढें, जिवबादादांनीं फौज सिद्ध करून मोरचे लावून शहरावर तोफांच्या गोळ्यांचा भडिमार चालविला. तेव्हां, नबाबाचीही तयारी होती, त्यामुळें त्यानेंही उलट कामगिरी चालविली. अशाप्रकारें बराचवेळ लढाई चालून नबाबाच्या वाड्याचा नाश झाला आणि त्याचे बरेच लोक मृत्युमुखीं पडले. शहरच्या लोकांत आकांत वर्तला म्हणून त्यानें तहाचें बोलणें लाविलें. परंतु, गारदी आपल्या ताब्यांत दिल्याशिवाय तहाची कोणचीही गोष्ट आपण कबूल करणार नाहीं. असे जिवबादादांनी निक्षून सांगितलें. नबाब व त्याचे सरदार मोठे अभिमानी होते. ज्यास पाठीशीं घातलें, त्याला सोडून देणें बरोबर नाहीं, असें ठरवून त्यांनी ती गोष्ट अमान्य केली, आणि पुनः लढाईसाठीं तयारी चालविली. हें पाहून जिवबादादांनी पुनः तोफ सुरू केली. शिंद्यांच्या तोफखान्याच्या जबरदस्त मारापुढें नबाबाचें कांहीं चालेना. आणि मनुष्यांचा आणि इमारतींचा अतिशयित नाश होऊं लागला. सबब, त्यानें तहाचें निशाण लावून सांगून पाठविलें कीं, तुमचे अपराधी तुमच्या हवालीं करितो. आतां तोफ बंद करावी. मग जिवबादादांनीं लढाई तहकूब करून अगोदर गारदी मागविले. तेव्हां, सुमेरसिंग, खरकसिंग, तुळाजी पवार व महंमद यूसफ, असे मुख्य व इतर जितके नबाबाच्या आश्रयास होते, तितक्या लोकांना त्यांनीं जिवबादादांकडे पाठवून दिलें. पुढें, नबाबाकडून लढाईचा खर्च घेऊन लागलीच लढाई बंद केली. मग, त्या अपराध्यांस मोठ्या बंदोबस्तानें बरोबर घेऊन पाटीलबावांकडे दाखल केलें. त्यांनीं त्या राजकीय गुन्हेगारांस श्रीमंत पेशव्यांकडे रवाना केलें.

( ३ ) दिल्लीचे बादशहाकडून वाडीसरकार राजे खेमसांवत यांस जिवबादादांनीं मोरचलें व राजे बहादूर ही पदवी देवविली. ही गोष्ट कोल्हापूरकरांस अगदीं आवडली नाहीं, म्हणून वाडकरांवर स्वारी करण्याचा त्यांचा विचार होता. त्यांत आणखी नाना फडणीस व हरिपंत फडके यांचीही वाडकरांचें पारिपत्य करण्याविषयीं फूस मिळाली. त्या प्रोत्साहनानें त्यांनीं वाडकरांवर स्वारी करण्यासाठीं फौज तयार करून तिचें आधिपत्य डुगल नामक सरदाराकडे दिलें. त्या सरदारानें मोठ्या मजला मारून कोणांस कळूं न देतां एकदम वाडीशहरांत प्रवेश केला. आणि सरकार वाड्याभोंवतीं आपल्या फौजेचा गराडा दिला. वाडीकरांस ह्या स्वारीची आगामी सूचना मुळींच नसल्यामुळें ते अगदीं गैरसावध होते; म्हणून तितक्यांत सैन्य तयार करून त्यांना कोल्हापूरकरांचा प्रतिकार करितां आला नाहीं. कांहीं अवकाशानें जमवितां येण्याजोगी वाडकरांची फौज प्रांतभर पसरलेली होती. परंतु, खुद्द शह-

रात त्याची फौज फार थोडी होती. तेथें त्याप्रसंगी हजर असलेल्या फौजेकडून वेढा दिलेल्या लोकाशी सामना देण्याचे काम कसचे होते ? ते सारे हालचाल न करितां आपल्या जिवाच्या रक्षणार्थ दडून राहिले. वेढा दिलेल्या लोकापैकी दक्षिणेच्या आगास इचलकरंजीकराचे लोक होते. आतून गोळीबार मुळीच न झाल्यामुळे बाहेरूनही करण्याचें कारण पडलें नाहीं. बरीच रात्र गुदरल्यावर दक्षिण अंगची जी बाजू इचलकरंजीकराच्या वेढ्यात होती, तेथून आतल्या मंडळीस निसटून जाण्यास सवड मिळाली. इचलकरंजीकरानी ही सवड बुध्या डाया डोळा करून दिली, असा लोकप्रवाद आहे. पुढे, त्यास वाडीसस्थानातील म्हापणगाव इनाम मिळाला, यावरून लोकास असा तर्क करण्यास जागा झाली आहे. असो, पुढे, राजे खेमसावत, लक्ष्मीबाई, तिची आई सखूबाई, ( ही आपले मुलीजवळ रहात असे ), व राजवाड्यातील इतर मंडळीत काही नौकर लोक, इतके त्या बाजूने रात्रीचे न कळत निघून गेले. आणि त्वरेने ही मंडळी पेडणें येथे नागेशराव देसाई देशप्रभु याचे येथें जाऊन राहिली. हे देशप्रभु अशा प्रसगास उपयोगी पडणार असून मोठे वजनदार होते. त्याना आपल्या येथे राजे येऊन राहिल्याचा मोठा सतोष झाला त्यानी राजेसाहेबाची बरदास्त उत्तमप्रकारची ठेविली होती. कोणत्याही गोष्टीची उणीव पडूं दिली नाही. अशारीतीने कोल्हापूरकर जाईपर्यंत एक वर्षपावेतो हे राजेसाहेब पेडणें येथें या देशप्रभूच्या येथे आपल्या लवाजम्यासह राहिले व तितक्या मुदतींत त्याना देशप्रभूनीं व जिवबादादाचे बधु नरोबादादा यानीं काहीएक कमी पडू दिलें नाहीं. राजवाड्यातील थाटाप्रमाणे त्याची सर्वप्रकारें बरदास्त त्यानीं राखिली होती. त्यामुळे राजेसाहेबास तशा स्थितीतही पुष्कळ सुख झाले.

नतर, ही सर्व हकीकत राजेसाहेबाकडून व नरोबादादाकडून शिंद्याच्या दरबारात समजली. आणि पुढें नेहमीं डाका घोळवून आपली राज्यावर पुनः स्थापना करण्यासबधाने राजेसाहेबाकडून व लक्ष्मीबाईसाहेबाकडून पाटीलबावा व जिवबादादा यास निकड लावण्याची पराकाष्ठा झाली. तिकडील महत्त्वाच्या कामामुळें त्यानाही कोल्हापूरकराचा बदोबस्त करण्यास अवकाश मिळेना. पाटीलबावानीं जिवबादादास थट्टेनें म्हटलें कीं, आता तुम्ही पाठविलेलीं मोर्चलें तुम्हाकडेसच रहावयास आलीं ! शेवटी, कोल्हापूरकराचा बदोबस्त करण्याचे ठरून जिवबादादानी त्याना तुमच्या पारिपत्यासाठीं निघालों असा सक्तीचा व खरमरीत निरोप पाठविल्यावर ते समजले की, आता आपलें काही चालावयाचे नाहीं. मग त्यानीं वाडी संस्थानातील आपलीं

ठाणीं उठवून व खेमसावंत राजेसाहेब यांस आदरानें बोलावून त्यांच्या हवालीं त्यांचें राज्य करून, तशी हकीकत जिवबादादांस कळविली.

राजेसाहेबांनीं पेडण्यांतून निघतांना देशप्रभूंचे फार फार आभार मानिले, शेवट गोड झाल्याचें पाहून उभयपक्षांस फार आनंद झाला. मग जातांना लक्ष्मीबाईसाहेबांनीं आपलें कांहीं जडजवाहीर व इतर कांहीं बहुमोल चिजा देशप्रभूंस दिल्या. व मोठ्या सन्मानानें त्यांचा निरोप घेतला.

---

१ हे नागेशप्रभु देसाई, गोवेंप्रांतीं विजापुरकरांच्या वेळेपासूनच नव्हे, तर त्याहीपूर्वी तेथील नारसिंहराजांचे जुने सरदार होते. नंतर त्यांना विजापूरचे बादशहापासूनही देशप्रभु हाच किताब मिळाला. यांचे घराणें वाडकरांच्या अमलांत व हल्लीं गोवेंप्रातांत मोठ्या प्रतिष्ठेचें व खानदानीचे मानले जात आहे. वाडीसरकाराकडून पेडणें, सांखळी, डिचोली वगैरे घेतलेले महाल फिरंगी सरकाराकडेसच चालावे, अशा बाबतींत यांनीं आपलें वजन खर्चून कारस्थानें चालविलीं. त्यामुळें ते तिकडेसच राहून फिरंगी सरकारांत यांचें वजन वाढत गेलें. यांचे चिरंजीव आत्माराम प्रभु. यांनीं फोंडे, उसप, मणेरी, तेरेखोल व रेडी, येथें फिरंगी सरकारच्या वतीनें लढाया मारून गोवें सरकारास मोठी मदत केली व त्यामध्यें जय मिळविला. यांना इ० स० १८२५ सालीं 'आलफेर' व सन १८२७ सालीं गोवें सरकारांकडून 'कप्तान' असे दोन किताब मिळाले होते. पुढें यांचे नातू वासुदेवप्रभु हे मोठे कर्तबगार पुरुष निपजले. यांचें औदार्य अवर्णनीय होतें. यांना 'बॅरोनेट' व 'मोसेफिदालग' असे किताब मिळाले. यांनी हजारों रुपये खर्चून 'गायत्रीपुरश्चरण' व 'संहितास्वाहाकार' असे प्रसिद्ध यज्ञ केले. फिरंगीसरकारांत यांचा मोठा मान असे. हल्लीं यांचे चिरंजीव **आत्मारामप्रभु** उर्फ **बापूसाहेब** हे सांप्रत या घराण्याचे मालक असून फार सुज्ञ, मुत्सद्दी, गुणज्ञ व गोवें सरकारांत मोठे मान्य आहेत. वडिलोपार्जित चालत आलेला औदार्यरूपगुण यांचे ठिकाणीही पूर्णपणें वसत आहे. यांना पोर्तुगाल सरकाराकडून 'बरांव' व वेकौत (व्हायकौंट) युरोपियनलोकांत अत्यंत मान्य अशा ह्या दोन बहुमानाच्या पदव्या मिळाल्या आहेत. मोठ्या उत्पन्नाच्या मानानें गौडसारस्वत ब्राह्मणज्ञातींत हे एक लहानसे संस्थानिकच आहेत अशी प्रसिद्धि आहे.

# गोविंद नारायण माडगांवकर.



**कष्टें काया झिजवावी । उत्कट कीर्ति उरवावी ॥**
**चटक लावून सांडावी । कांहींएक ॥ १ ॥** रामदास.

समर्थांचा हा अनुभवसिद्ध असा उपदेश ह्या क्षणिक मानवी देहाचा नाश झाल्यानतर त्याचे चिरकालिक स्मरण राहण्यासाठी आहे. पंचमहाभूताचे पृथक पृथक् अंश एकत्र मिळून बनलेला हा मनुष्यदेह जर जगामध्यें अखंड रहावा अशी इच्छा असेल तर तो देह सुखानें पोसून लठ्ठ न करिता कष्टानें अगदी कृश केला तरच तो या भूतलावर अखंड टिकणार आहे. मग जरी पंचमहाभूतांनी आपआपले अंश ग्रहण केले तथापि त्याच्या अखंडत्वास यत्किंचितही धक्का पोहोंचणार नाहीं. आता त्या कष्टांत मात्र दोन प्रकार आहेत. एक स्वार्थपर कष्ट व दुसरा परार्थपर कष्ट. यांतून दुसऱ्या कष्टाचीच मातब्बरी विशेष आहे आणि ह्याच कष्टानें मानवीदेहाची अखंडता सिद्ध होते. म्हणणेंच आहे कीं, "**परोपकारार्थमिदं शरीरं**" तेव्हां परार्थ-

कष्टानें देह झिजवून कीर्तिरूपानें अमरत्व पावलेले जे कांहीं मानवीदेह या भूतलावर अवतीर्ण झाले त्यांतच प्रस्तुत चरित्रनायकाचाही समावेश होतो, म्हणून त्यांचें त्रोटक चरित्र येथें देतों.

गौडसारस्वत ब्राम्हणांचा जो एक लहानसा समुदाय दक्षिणहिंदुस्थानात येऊन स्थीर झाला आहे, त्याचे मुख्य वसतिस्थान गोमांतकप्रात होय. ह्याच गोमांतकप्रांतांत मडगांव येथें इ० स० १८१५ त गोविंदरावजींचें जन्म झालें. त्यांची घरची स्थिति फार गरीबीची होती. त्यांचे वडील पोर्तुगाली तपकीर व कांहीं बारीकसारीक औषधें विकून त्यांवर आपला चरितार्थ चालवित असत. कोणत्याही माणसाचा उर्जितकाल येण्याला जी अनेक कारणें लागतात त्यांत स्थलांतर हे एक मुख्य आहे. फार प्राचीनकालापासून आजतागायतपर्यंतचा जर इतिहास पाहिला तर स्वतःच्या कर्तबगारीनें उदयास आलेल्या माणसांनी आपल्या जन्मभूमीचा त्याग केलेलाच दिसतो. दाशरथी रामानी अयोध्या सोडून चवदा वर्षे वनवास पत्करला नसता तर त्याचें नांव आज त्रिभुवनांत अजरामर होणे मुष्कील होते. पाश्चात्य लोकांनीं आपली आवडती भूमी म्हणून तिला कवटाळून धरिले असते, आणि हिंदुस्थानासारख्या सुवर्णभूमीचा सहवास केला नसता तर प्रस्तुतची स्थिति अनुभविण्याचा प्रसंग त्यास क्वचितच येता. तात्पर्य, उत्कर्षदशा येण्याला स्वतःचा देश सोडावा लागतो हें उघड दिसतें. त्याप्रमाणें गोविंदरावजींचे वडील नारायणराव हे आपलें कुटुंब घेऊन १८२४ साली मुंबईस आले. त्यावेळी गोविंदरावजीचे वय अवघे नऊ वर्षांचें होतें. नारायणरावजींनी मुंबईस आल्यावर तपकीर व औषधें विकण्याचा आपला आवडता व्यवसाय चालण्याकरिता काळबादेवीच्या रस्त्यावर एक लहानसें दुकान उघडले. वस्तुतः तत्कालीन स्थितीशी हल्लीची वस्तुस्थिति ताडून पाहिल्यास जमीनअस्मानाचे अंतर दिसून येईल. मुंबईसारख्या बकाली शहरांत तपकीर विकून कुटुंबचरितार्थ चालविणे बरेंच कष्टसाध्य किंबहुना अशक्यच म्हटले तरी चालेल; परंतु त्यावेळीं नारायणरावजींनी आपला व्यवसाय—हलकाच का असेना पण—सचोटीने चालवून त्यांत होणाऱ्या मिळकतीवर कुटुंबचरितार्थ व मुलांचें शिक्षण, या कामास काडीमात्र आळस केला नाही. गोविंदरावजीस शाळेंत घालून, त्यावेळच्या रीतीप्रमाणे त्यास पुस्तके पुरवून, आणि त्याच्या गुरूंस संतुष्ट ठेवून त्यांजकडून दोन अक्षरें करविली तरी लहानपणापासून गोविंदजीची प्रकृती फार अशक्त असल्यामुळे त्याचा विद्याभ्यास व्हावा तसा झाला नाही. तेथे त्यांचा

उपाय नाहीं. आहे त्या स्थितींत आणखी थोडा काल विद्याभ्यासांत घालवावा असा त्यांचा निग्रह होता; पण " मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्र चिंतयेत् " याप्रमाणें गोविंदरावजीच्या ऐन विद्याभ्यासाच्या दिवसांतच त्याचे वडिलांचा अंत झाला. यामुळे अल्पवयात कुटुंबभार माथीं घ्यावा लागल्यामुळे झालेल्याच तेवढ्या विद्येवर त्यांस तृप्त राहणें भाग पडले. पुढे हे प्रौढ झाल्यावर ख्रिस्ति धर्मोपदेशक **डॉक्टर विल्सन** याच्या शाळेमध्ये शिक्षकाचें काम पत्करून चाकरीस राहिले. मरणाच्या पूर्वी सुमारें एक वर्षपर्यंत ते त्याच कामावर होते. ते आपली नोकरी सभाळून काही विद्यार्थ्यास केवळ परोपकारार्थ घरीही शिकवीत असत. त्याच्या घरी शिकणाऱ्या शिष्यांत प्रसिद्ध विद्वान डॉक्टर भाऊदाजी आणि ऑन० नारायण वासुदेव दाभोळकर हेही होते. गोविंदराव प्रकृतीने जरी अशक्त होते तरी आहार आणि व्यायाम ह्याविषयी ते फार नियमितरीतीने वागत असत तेणेकरून त्याची प्रकृती सहसा बिघडत नसे. हे फावल्यावेळात मराठी ग्रंथ लिहीत असत. याच्यानें रात्रीं लिहिण्याचे वगैरे काम फारकरून होत नसे; म्हणून जे काम ते ते दिवसा नियमाने करीत. यामुळे त्याच्या हातून पुष्कळ काम होई. कोणतेही काम रोज नियमानें थोडे थोडे केले असता साधारण आयुष्यमर्यादेंतही मनुष्याच्या हातून एकदरीनें कितीतरी काम होतें, ह्याचें हे एक उत्तम उदाहरण आहे.

मराठी ज्ञानप्रसारक मंडळीचे यानी पुनरुज्जीवन केलें होतें, आणि ती बराचवेळ जागृत ठेविली होती, पण याच्या मागून ती लौकरच लयास गेली. याना गुजराथी भाषाही चागली अवगत होती. त्यानी केलेल्या पुस्तकापैकी काहींची गुजराथी भाषातरेंही त्यानी स्वत: करून छापविली आहेत. शिवाय त्यावेळीं निघत असलेल्या ' मराठी ज्ञानप्रसारक ' मासिक पुस्तकातही त्याचे बरेच उपयुक्त लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्याजकडे पाहिले म्हणजे असें दिसतें की, जनाची मनें नीतिमार्गांकडे वळविण्याविषयींची इच्छा त्याच्या अत:करणात विशेष प्रबल होती; असें त्यांची पुस्तकें वाचून पाहिली असता दिसून येते. या आमच्या म्हणण्याची सत्यता त्यांच्या निरनिराळ्या पुस्तकातील जे थोडे उतारे खाली दिले आहेत त्यावरून तर अगदी सहज लक्षात येईल. गोविंदरावजींनी निरनिराळ्या विषयावर लहानमोठी पधरा पुस्तकें मराठीभाषेत लिहिलेली प्रसिद्ध आहेत त्यापैकी " उद्भिजन्य पदार्थ, मुंबईचे वर्णन, सृष्टीतील चमत्कार, वृक्षवर्णन, " हीं बरीच मोठीं असून वर्णनात्मक आहेत आणि " ऋणनिषेधक बोध, कुटुंबसुधारणा, दारूपासून अनर्थ, नीतिसंवाद, पत्रावळी व

द्रीण भोजनसंधूपानतंबाखू, लोखंडी सडकांचे चमत्कार, व्यवहारोपयोगी नाटक, शुचिर्भूतपणा, सत्यनिरूपण, सुलेखनविद्या, " ही अकरा पुस्तकें लहान लहान नैतिकविषयांचीं आहेत; तथापि अत्यंत महत्त्वाचीं व संग्राह्य आहेत. हें त्या पुस्तकांच्या दोन, तीन, चार, पर्यंत निघालेल्या आवृत्तीवरून सहज लक्षांत येतें. लहानपणीं, कुटुंबाच्या गरीबीमुळें फारसा विद्याभ्यास झाला नसतां, केवळ आपल्या उद्योगानें ज्ञान संपादून व कुटुंबाचा निर्वाह चालवून त्यांनीं इतके ग्रंथ लिहिले हें कांहीं थोडें नाहीं.

त्याच्या ग्रंथामध्ये ह्या गृहस्थांविषयीं एक गोष्ट विशेष दृष्टीस पडते. ती ही कीं, आज पन्नास वर्षांपूर्वी गोविंदरावजींनीं ही पुस्तकें लिहिलीं. अर्थात् त्यांची भाषा चांगली शुद्ध, सरळ आणि गोड, म्हणजे सध्यां चांगली मराठी भाषा म्हणतात तिच्यासारखी आहे. याविषयीं विविधज्ञानविस्तारच्या विद्वान संपादकांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, " अर्थशास्त्रावर ग्रंथ लिहावयाचा तो छंदोबद्ध लिहून कितीसा उपयोग होणार आहे? तर अर्थनिरूपण, सुबोधरीतीनें करितां यावें म्हणून तो व्यावहारीक भाषेनेच लिहिला पाहिजे या न्यायाने पहातां ज्यानी देशभाषेत गद्यग्रंथ रचण्यास आरंभ केला ते आम्हांस वंद्य होत सदाशिव काशिनाथ छत्रे, बाळ गंगाधर शास्त्री हरी केशवजी, गोविंद नारायण हे आमच्या मराठी भाषेचे हुकर, ड्रायडन, टेम्पल्, आडिसनच होत. इंग्लंडामध्ये या नामांकित ग्रंथकारांनी गद्याची प्रवृत्ति पाडून स्वभाषेची सुधारणा केली त्याप्रमाणेच आमच्याही पूर्वोक्त गृहस्थांनी नानाप्रकारच्या विषयांवर लहानमोठे निबंध लिहून तिच्याठिकाणीं सरलत्व, मनोवेधकत्व आणि मार्दव इत्यादि गुण उत्पन्न केले, व्याकरण नियमांचीही चांगली व्यवस्था केली, हा महान् लाभ आम्हांस कळवून दिल्याबद्दल ते शिरसावंद्य होत. " विस्तारकारांचे हे प्रगल्भ विचार अगदीं योग्य आहेत व हेच तंतोतंत आमच्या गोविंदरावजीसंबंधाने वापरण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण पुण्यात राहणाऱ्या एखाद्या मनुष्यानें अशी चांगली भाषा लिहिली असती, तर तिचें फारसें नवल वाटण्याचें कारण नव्हतें; परंतु ते स्वतः गोव्याकडचे राहणारे असून त्यांतही मुंबई म्हणजे त्यावेळीं भ्रष्ट मराठीचें अगदीं आगर, तेथे अशी चांगली भाषा त्यांनीं इतक्या दिवसांमागें लिहिली हे त्यांच्या कीर्तीस मोठे भूषणच होय.

इंग्रजीमध्यें **आडिसन्, स्टील, स्विफ्ट** इत्यादिकांच्या लिहिण्याचा जो रोख असे तोच रोख त्यांच्या लिहिण्यांत होता. उदाहरणद्वारां एखादा विषय मनांत भर-

हिण्याची शैली त्यांस फार चांगली साधली होती. आणखी नीतीच्यासंबंधानें त्यांनीं जीं पुस्तकें लिहिलीं आहेत त्यांप्रमाणें ते स्वतः व्यवहारांत वागत असत. हा त्यांचा गुण अत्यंत अभिनंदनीय होय आतां नैतिक विषयासंबंधीं त्यांच्या ग्रंथांतील कांहीं उतारे येथें दिले असतां थोडा विस्तार होईल खरा. पण सद्यस्थितींत समाजास त्याचा फार उपयोग होणार असल्यामुळे त्यांतील थोडेतरी उतारे येथें देणें इष्ट आहे.

'पत्रावळी व द्रोण' या लहानशा पुस्तकांत उद्योगाचे परिणाम किती सुखकारक आहेत व त्यांपासून प्रपंचसंबंधीं सुखें किती सुगम होतात, ह्याचा विचार करतांना गोविंदराव म्हणतात.—" उद्योगानें प्रथम शरीरास आरोग्य होऊन अंतःकरणाचें समाधान होतें. चांगल्या उद्योगांत मन गुंतलेलें असलें म्हणजे मनांत कुवासना येत नाहींत दुसऱ्याचें अकल्याण इच्छिणें, घातपात करणें, मत्सर करणें इत्यादि अमंगल वासना यांहींकरून मन बद्ध न होतां मोकळें व सरळ असतें मग तें हवा तो विषय ग्रहण करण्यास तयार होतें. जसें लड्डूचें सुरेख चित्र करावयाचें असलें तर तो पहिल्यानें कुटून व गाळून तयार करावा लागतो, तसेंच आपल्या शरीरापासून आणि मनापासून सुंदर व मोठीं कृत्यें करावयाचीं असलीं तर त्यांस उद्योगरूप आणि मेहनतरूप खलबत्त्यांत घालून कुटून तयार केलीं पाहिजेत....उद्योग करणें म्हणजे डोकीवर दगड घेऊन वाहणें व छाती फुटेपर्यंत मेहनत करणें, अथवा मजुरी करून शरीरास त्रास देणें, असें कित्येकांस वाटतें, परंतु ही त्यांची समजूत केवळ चुकीची आहे. ज्यास जो उद्योग तोलेल तो त्यानें सुखानें करावा आणि जरी अशा उद्योगांत कांहीं श्रम झाले तरी त्यापासून त्यास सुखच प्राप्त होतें; परंतु निरुद्योगी मनुष्य कधींही सुखी होणार नाहीं ...यथायोग्य उद्योग करण्याची उमेद आणि ज्ञानाची अभिरुची जेव्हां आम्हांमध्यें सतत वावरूं लागेल, तेव्हांच आपल्या देशांतील अज्ञानरूप दारिद्र्याचा उपमर्द होऊन ज्ञानरूप संपत्तीचा झेंडा लागेल. कोणी ह्मणतो कीं हिंदुस्थान दारिद्र्यरूप गगनचुंबित पर्वताखालीं गर्द होऊन गेलें आहे; कोणी ह्मणतो कीं अज्ञानरूप महानदीस पूर येऊन त्यांत तें वाहून जात आहे; कोणी, त्यास आलस्यरूप कुंभकर्णा गाढ आणि दीर्घ निद्रा लागली आहे असें म्हणतात; कोणी म्हणतो कीं, भित्रेपणारूप जरत्कारूसारिखा अशक्तपणा आला आहे; कोणाचें म्हणणें, ख्यालीखुशाली व नाचतमाशेरूप जलोदर होऊन त्याच्या आयुष्याचा क्षय होत चालला आहे; परंतु अशाप्रकारचीं दूषणें लावून घेण्यास आपला देश कां पात्र झाला, याचा जर आपण क्षणभर विचार करूं तर आपल्या ध्यानांत येईल

कीं, आपलें सर्व दैन्य, आळस, निरुद्योग आणि विद्येची अवज्ञा, यांपासून उत्पन्न होतें. आपले लोक विद्या संपादन करावयास योग्य उद्योग करीत नाहींत. तिच्या प्रीत्यर्थ खर्चावें तितकें द्रव्य न खर्चितां ख्यालीखुशालींत खर्चितात, म्हणून अर्थात्च आम्हीं अज्ञानसागरांत बुडालों असतां आम्हांवर अनेक विघ्नें येऊन पडतात, आणि फुटलेल्या जहाजावरील नावाड्यांची जशी अवस्था होते तसी आमची सध्यांची स्थिति होण्याचें कारण हेंच आहे. कोणत्याच प्रकारचा उद्योग नसला तर मनुष्याच्या आयुष्याचा, बुद्धीचा आणि शरीराचा नाश होऊन त्याची स्थिति पशूंपेक्षांही नीच होऊन जाते."


तसेंच निर्मळपणासून मनुष्यमात्रास किती सुख व समाधान होतें, आणि मळीणपणापासून किती दुःख व हानी होते, हें 'शुचिर्भूतपणा' नांवाच्या पुस्तकांत चांगल्यारीतीनें व्यक्त केलें आहे. याचीं पांच प्रकरणें असून पहिल्या प्रकरणांत "आपण ज्या घरांत राहतों तें स्वच्छ असलें पाहिजे; कारण ते आपणांस सुख प्राप्त होण्याचें मूळस्थान आहे, म्हणून घराच्या सभोंवतील जागा कशी निर्मळ ठेवावी, आणि असा निर्मळपणा ठेवल्यानें कोणकोणते लाभ होतात" हे दाखविलें आहे. "सर्व संपत्तीमध्यें शरीरसंपत्ति श्रेष्ठ मानली आहे अर्थात् तिचें योग्यप्रकारें संरक्षण केले पाहिजे. शरीरप्रकृती निर्मळ ठेवण्याने कोणकोणते लाभ होतात व मळीणपणापासून काय हानी होते" ह्याचा विचार दुसऱ्या प्रकरणांत केला आहे. तसेंच "प्राणिमात्राचें संरक्षण अन्नापासून होतें, यास्तव अन्न हे सर्वांस आवश्यकच आहे. 'अन्नमय प्राण, प्राणमय शक्ति आणि शक्तिमय पराक्रम' अशी एक म्हण आहे; परंतु जें अन्न आपण खातों ते निर्मळ आणि हितकारक असलें पाहिजे, नाहींतर त्यापासून उलट आपली हानी होते म्हणून खाण्यापिण्यामध्ये निर्मळपणा कसा ठेवावा व त्यापासून काय लाभ होतात" याचें सांगोपांग विवेचन तिसऱ्या प्रकरणांत केले आहे. चवथ्या प्रकरणांत "अंथरूण, पांघरूण, पोषाख वगैरे स्वच्छ ठेवण्यामुळें कोणकोणते लाभ होतात व ते ठेवावयास काय उपाय केले पाहिजेत" हें दाखविले आहे; आणि पांचव्या प्रकरणांत "अंतःकरणाच्या व निर्मळपणाच्या आवश्यकतेचा विचार" करून ह्या लहानशा पुस्तकाची समाप्ती केली आहे. हें पांचवें प्रकरण इतकें हृदयंगम व सरस आहे कीं, त्यांतील एकही शब्द टाकवत नसल्यामुळें संक्षिप्त उतारा निवडून काढणें अगदीं अशक्य आहे; तथापि ह्या प्रकरणाच्या शेवटीं गोविंदरावजींनीं जो सारांश काढला आहे तोच येथें देतों. "मनु-

त्याच्या शरीरामध्यें अंतःकरण हें राजा आहे, आणि तेच जर स्वच्छ नसलें तर त्याचा बाह्य स्वच्छपणा कांहींच उपयोगाचा नाहीं म्हणून अंतर्बाह्य शुचिर्भूत ठेवून परम दयाळू जो परमेश्वर त्यास अनन्यभावें शरण जावें, आणि त्यानें ज्या स्थितींत आपणांस ठेविलें असेल तींतच संतुष्ट राहून सन्मार्गानें चालत जावें म्हणजे सर्व गोष्टी सुलभ होऊन सुखांचाही उत्कर्ष होत जाईल."

जगांत ज्या अनेक सुधारणा घडून येत आहेत, त्या सर्वांत अगोदर 'कुटुंब-सुधारणा' झाली पाहिजे. असें गोविंदरावजींचें मत होतें; आणि म्हणूनच ह्या विषयावर त्यांनी हें स्वतंत्र पुस्तक लिहिलें असावें ह्या पुस्तकांत आमच्या कौटुंबिक स्थितीचें हृदयद्रावक असें फारच चांगलें वर्णन केलें आहे, आणि अशी ही अनावश्यक कुटुंबस्थिति सुधारण्याकरितां कसें वागलें पाहिजे त्याचेंही दिग्दर्शन उत्तम तऱ्हेनें केलें आहे. ते म्हणतात---" कुटुंबांतील सर्व मनुष्यांनी एकत्र मिळून भक्ति करीत असावी, व आईबापांची आणि आपल्या वडिलांची यथाशक्ति सेवा करावी; ते जो चांगला उपदेश करतील तो सर्वकाळ मानून त्यांची आज्ञा मोडूं नये; आपले भाऊ, बंदांशी स्नेह ठेवावा, त्यास आपल्याकडून सर्व सुखें मिळावीं म्हणून देवाची प्रार्थना करीत जावी. ते रोगी झाले असतां औषधोपाय करून त्यांना साह्य करावें. जारण मारण इत्यादि मंत्र्यांच्या ढोंगावर कदापि विश्वास ठेवूं नये. पहा! या अज्ञानास काय म्हणावें! जर दुगाणीच्या शेंदुरानें आणि अर्धीच्या निंबानें रोगी बरे होतील तर हजारों रुपयांच्या औषधांचा काय उपयोग? रोग्यास औषध, क्षुधितास अन्न, तृषितास पाणी, हें ईश्वरानें निर्माण केलें आहे, ते उगीच काय? जर मांत्रिक उपायानें रोग जातील तर क्षुधेलाही तोच उपाय कां करीत नाहीत? असल्या खोट्या रीति हिंदुलोकांच्या घरांत बहुतेक आहेत त्या काढून टाकाव्या. सर्व अवस्थेमध्यें सृष्टिकर्ता जो परमेश्वर त्यासच शरण जावें; सर्व दुःखांचा परिहार करणारा त्यावांचून दुसरा कोणी नाहीं आईबाप व कुटुंबांतील दुसरे मनुष्यांस, जीवतपणीं जेवढें आपल्याच्यानें सुख देववेल तेवढें देत असावें." असे हे त्यांचे विचार आज पन्नास वर्षांपूर्वीच्या कुटुंबस्थितीस अनुलक्षून आहेत. अर्थात् त्याचा परिणाम सध्यांच्या कुटुंबस्थितीवर कितपत झाला आहे व होत आहे ह्याचा विचार वाचकांनींच करावा! 'लोकांच्या सुधारणाविषयीं लहान लहानशा पुस्तकांत गोविंदरावजींनीं ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या लक्ष देऊन पक्षपात न धरितां आमच्या लोकांनीं वाचाव्या' अशी आमची सर्वांपाशीं आग्रहाची विनंति आहे. असो.

गोविंदरावजीचे हे ग्रंथ वाचून आमच्या लोकांस नानाप्रकारच्या अनेक नव्या गोष्टी कळल्या असल्या पाहिजेत, आणि नीतीनें वागण्याविषयीं उपरति झाली असली पाहिजे. हे ह्या राष्ट्रावर त्यांचे मोठे उपकार समजले पाहिजेत शिवाय गोविंद नारायण हे आपलें काम मनोभावें करणारे, निर्व्यसनी, सुशील आणि भाविक होते; ह्यामुळें जरी ते हिंदुधर्मानें वागणारे होते तरी त्यांजवर डॉ० विल्सन् ह्यांचा फार लोभ होता. असो. पुढें लौकरच म्हणजे इ. स. १८६५ ह्या वर्षाच्या मार्च महिन्याच्या १५ व्या तारखेस ह्यांस देवाज्ञा झाली. डॉ० भाऊदाजीसारख्या विद्वानांनीं यांचे स्मारकाकरितां बराच फंडही जमविला होता मरणाच्या आधीं कांहीं महिनें डॉ० भाऊदाजी, डॉ० नारायणदाजी, ऑनरेबल नारायणराव दाभोळकर प्रभृति थोर शिष्य मंडळी व कांहीं मित्रमंडळींनी मिळून ह्यांच्या नांवानें स्कालर्शिप ठेवण्याकरितां सुमारें पांच हजार रुपये जमविले. ह्यावरून गोविंद नारायण हे किती चांगले गृहस्थ होते, आणि शिरोभागी दिलेल्या समर्थांच्या उक्तीनुसार ह्यांनी आपला देह परोपकारार्थ कष्टानें झिजवून यां मर्त्यभूतलावर अखंड कीर्ति ठेवून एकंदर लोकांना कशी चट लावून सोडिली, ह्याची चांगली साक्ष पटण्यासारखी आहे. उघडच आहे, सन्मान्य गृहस्थांनीं ज्यांचा मान केला ते सन्मान्यच असले पाहिजेत.

---



डॉ. भाऊ दाजी लाड.

G V. LAD, *Artist*

# डाक्टर रामकृष्ण विठ्ठल ऊर्फ भाऊदाजी लाड,

## जी. जी एम्. सी एम्. आर. ए. एस्.

"असाध्य तें साध्य । करितां सायास ॥
कारण अभ्यास । तुका ह्मणे ॥"

सृष्ट्यवलोकन केलें असतां जगंनियंत्याच्या कर्तृत्व शक्तींचें व त्यानें केलेल्या सृष्टरचनेचें कौतुक ज्यास वाटणार नाहीं असा प्राणी ह्या भूतलावर सांपडणेंच कठीण! त्या ब्रम्हांडनायकानें ही सृष्टि निर्माण करतांनाच अशा कांहीं अतर्क्य योजना करून ठेविल्या आहेत कीं त्या समजून घण्यास आजपयत शेकडों बुद्धिमान-लोक खटपटीकरून अखेरीस थकले तरी त्यांस त्याची अघटित लीला समजली नाहीं. त्या जगदीशानें या भूपृष्ठावर ज्या सजीव व निर्जीव अशा अनंत कोटी उत्पन्न करून त्यांचें आस्तित्व प्रस्थापित केलें आहे त्यांत देखील सूक्ष्म विचार केला असतां वरील म्हणणेंच कबूल करणें भाग पडतें. त्यानें पश्वादिकांस व मनुष्यांस त्यांच्या जीवनोपयोगी अनंत वस्तु सृष्टरचनेबरोबरच उत्पन्न करून देऊन त्यांचा उपयोग कसा करावा याविषयीं त्या त्या कोटीस अनुसरून ज्ञानही दिलें आहे, तथापि पशुपक्षी इत्यादिकांचें ज्ञान व मनुष्यांचें ज्ञान यांत त्या जगचालकानें महदंतर ठेविलें आहे. पशुपक्ष्यादिकांचें जें ज्ञान असतें तें उपजतच नियमित असून त्याचा उपयोग फक्त त्यांच्याकरितांच ह्मणून ईश्वरानें ज्या योजना करून ठेविल्या आहेत त्या करून घेण्यापलीकडे नसतो मनुष्याचें मात्र तसें नाहीं. त्यास ईश्वरानें ज्या ज्या म्हणून सोयी करून ठेविल्या आहेत त्यांत त्यानें आपली बुद्धि खर्च करून श्रम केल्याशिवाय त्यास त्या उपयोगांत आणतां यावयाच्याच नाहींत असा ईश्वरी संकेत आहे म्हणून प्रत्येक मनुष्य उदरभरणोपयोगी सोयी बुध्यनुरूप करून घेण्यांत श्रम करीत असतो तथापि जे अलौकिक बुद्धिमान् असतात ते ईश्वराची अगाध करणी समजून घेण्यांत आपले अविश्रांत श्रम व बुद्धि खर्च करून जगाच्या उपयोगीं पडण्यासारखीं व साधारण माणसास न साध्य होणारीं अशीं शास्त्रें, कला, मूलतत्त्वें, सिद्धांत वगैरे स्वतः साध्य करून तीं जगाच्या निदर्शनास आणून देऊन आपली उज्वल कीर्ति अजरामर करून ठेवितात, अशीं नररत्नें आजपर्यंत या भूतलावर जीं जीं होऊन गेलीं त्यांतीलच उपरिनिर्दिष्ट भाऊदाजी हे एक होत.

डॉ० भाऊदाजी ह्यांचें जन्म गोमांतक प्रांताच्या हद्दीवरील मांजरें नांवाच्या खेड्यांत इ० स० १८२२ सालीं झालें. त्यांच्या वडिलांचें नांव विठ्ठलराव. ते मातीचीं चित्रें फार नामी करीत असत, आणि त्यांच्या व्यापारावर आपला संसार चालवीत असत. याशिवाय थोडें शेतीचेंही उत्पन्न होतें. त्यांना संस्कृतही चांगलें येत असे. एकदां तर त्यांनीं संस्कृतामध्यें उत्तम काव्य करून बक्षीस मिळविलें होतें[१]. त्यांच्या कानांवर मुंबईच्या सधनतेची कीर्ति आली होती. तेव्हांपासून त्यांच्या मनांत मुंबईस जाण्याचे विचार घोळूं लागले व त्याप्रमाणें ते इ० स० १८३२ च्या सुमारास सहकुटुंब मुंबईस गेले आणि मातीचा नवनारीकुंजर करून एका एका पैशावर तो लोकांस दाखवून, त्यावर निर्वाह करूं लागले. तेव्हां त्यांच्याबरोबर भाऊ आणि नारायण हे त्यांचे मुलगे होते. त्यावेळीं भाऊचें वय अवघें आठ वर्षाचें होतें. त्यांचा मराठी अभ्यास मोठ्या कष्टानें कै० गोविंद नारायण माडगांवकर ह्यांच्या हाताखालीं झाल्यावर ते इंग्रजी शिकण्याकरितां त्यावेळच्या 'एल्फिन्स्टन् इन्स्टिटयूशन' मध्यें जाऊं लागले. ते जात्या हुषार व चाणाक्ष असल्यामुळें त्यांनीं तेथील आपल्या गुरुजीची चांगली मर्जी संपादिली.

त्यांच्या हुशारीबद्दल त्यांस स्कालर्शिपाही मिळत असत. व एकदां तर इंग्रजी भाषाविषयांत पुष्कळ गुण मिळाल्यावरून त्यांस सोन्याचें पदक बक्षीस मिळालें होतें. ह्या त्यांच्या हुशारीवरून शिक्षणक्रम पुरा होण्यापूर्वीच ह्यांस दरमहा चाळीस रुपये पगारावर मास्तरची नेमणूक आली होती, पण अर्धवट विद्येवर अवलंबून राहणें त्यांस आवडले नाहीं. म्हणून त्यांना ती जागा नाकारावी लागली. विशेषत: भाऊना गणित व सृष्ट पदार्थविज्ञान, ह्या दोन विषयांचा फारच नाद होता. त्यांनी पुढें जे मोठमोठे शोध लावून गंगेप्रमाणें आपली निर्मल कीर्ति दिगंतरीं करून सोडिली. त्याला कारण पहिलाच विषय होय. ह्या जगाचा असा एक नियम आहे कीं, मनुष्याला चढत्याकाळांत अनेक प्रकारचीं विघ्नें अचानक येऊन गांठतात. त्याप्रमाणें भाऊ चांगले शिकत असतां मध्यंतरींच शिक्षणांत व्यत्यय आल्यामुळें शाळा सोडून देऊन अन्य व्यसाय पाहण्याचें त्यांचे कपाळीं आलें. कारण त्यांचे तीर्थरूप आपल्या धंद्यारोजगारावर पाणी सोडून घारापुरी येथील कोरीव लेण्यांत एखाद्या बैराग्याप्रमाणें कालक्रमणा करूं लागले. तेव्हां अर्थात् भाऊंना ते ज्या शाळेंत शिकत होते तेथेंच शिक्षकाचें काम पत्करावें लागलें. ह्यावरून त्यांनीं गुरूची बरीच मर्जी संपादिली

१ Student's Magazine Gune 1906 P. 2?8.

होती. हें व्यक्त होतें. ते विद्यार्थ्यांना मन लावून शिकवीत असत, म्हणून त्यांच्या वरिष्ठांनीं त्यांस कांहीं दिवसांनीं कै० प्रोफेसर बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर ह्यांच्या जागेवर नेमून मुख्य शिक्षक केलें. ह्यावेळीं भाऊंचें वय सरासरी अठरा एकुणीस वर्षांचें होतें. तेव्हां इतक्या लहान वयांत त्यांस मुख्य अध्यापकाचा मान मिळाला ही सामान्य गोष्ट झाली काय ? माणसास मोठेपणा मिळावयाचा असला म्हणजे परमेश्वरही तशीच योजना करून ठेवितो.

भाऊ हे मुख्य शिक्षकांचे काम दक्षतेनें बजावीत असतां सन १८४५ च्या सुमारास ' ग्रांट मेडिकल् कालेज ' म्हणजे वैद्यक पाठशाला स्थापन झाली. त्यावेळीं लोकांचीं मनें आजच्याप्रमाणें सुसंस्कृत झालीं नव्हतीं. मांसाचें नुसतें दर्शन होतांच ' शिव शिव ' म्हणणारे ब्राह्मण, आज बेलाशक माणसांचीं प्रेतें चराचर कापतांना दृष्टीस पडतात. एकंदरींत त्यावेळचा मनू अगदीं निराळा होता म्हणून ग्रांट मेडिकल कॉलेजची स्थापना झाल्याबरोबर हिंदुसमाजांत गडबड उडून गेली. त्यामुळें पहिल्यानें कॉलेजांत येण्यास कोणीच धजेना. तेव्हां ही संधी पाहून परवशतेचा वीट मानणार भाऊसाहेब लोकापवादाची परवा न बाळगतां स्वतः कॉलेजांत जाण्यास तयार झाले. ह्या गोष्टीवरून भाऊच्या अंगीं कितपत धैर्य होतें याचें प्रमाण बसविता येतें. भाऊंनी कॉलेजांत जाण्याचा प्रथम मुहूर्त केल्याबरोबर जसा म्होरक्यापाठी कळप तसे दुसरेही अनेक हिंदुविद्यार्थी तेथें जाऊं लागले. यावरून जरी सरजेम शेटजी जीजीभाईनी ही पाठशाळा स्थापन करण्याकरितां द्रव्यद्वारा मदत केली होती व त्याबद्दल आपण त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे, तरी खरी स्थापना भाऊकडूनच झाली असें म्हटलें असतां प्रमाद होणार नाहीं. व्यासपीठावर उभें राहून आम्हीं अमुक करूं, आम्हीं तमुक करूं, असें पोकळ भाषण करणें फार सोपें असतें; पण आणिबाणीच्या प्रसंगीं अस्तन्या वर चढवून लोकापवादरूपी शत्रूबरोबर दोन हात करणें हें मोठें बिकट काम होय. सामान्य लेच्यापेच्या माणसाचें तें काम नाहीं. खऱ्या व निधड्या छातीच्याच माणसाला तें साधतें. म्हणून बोलक्या सुधारकांनीं प्रसंग पडला असतां वर निर्दिष्ट केलेल्या भाऊंच्याच वर्तनाचा कित्ता गिरवावा.

मेडिकल् कॉलेजांत भाऊंनीं सतत पांच सहा वर्षेपर्यंत जाऊन अभ्यास केला. तेथेंही त्यांची विद्वत्ता चांगली निदर्शनास आली. म्हणून डॉ० मोरहेड् यांणी त्यांस रसायनशास्त्राचे असिस्टंट प्रोफेसर नेमिलें. ते सन १८५१ साली त्या कॉलेजांतील शेवटच्या परीक्षेंत उत्तीर्ण होऊन ' जी. जी. एम्. सी. ' झाले म्हणजे ' ग्राज्युएट्

ऑफ धी ग्रँट मेडिकल कॉलेज ' अशी बहुमानाची पदवी त्यांस मिळाली तेव्हां लगेच त्यांच्या गुरुच्या शिफारशीवरून त्यांस एका इस्पितळांत सर्जन नेमिलें; पण स्वतंत्र रीतीनें वैद्यकी केली असतां जास्त फायदेशीर होईल असें वाटल्यावरून त्यांनीं जागेचा राजिनामा दिला. चाणाक्ष वाचकांच्या लक्ष्यांत ही गोष्ट येऊन चुकलीच असेल कीं, त्यांना कसून पाहण्याकरितां परमेश्वरानें दोन तीन वेळां रुपेरी बेडी त्यांच्या पायांत घातली; पण स्वभावतःच ते स्वतंत्र मनाचे असल्यामुळें त्यांनीं तीं बंधनें तोडून टाकिलीं. याभुळें पुढें त्यांच्या चलाख बुद्धीला आपला अनुपम प्रभाव दाखविण्याला चांगली सवड सांपडली; व त्याप्रमाणें थोड्याच दिवसांत ते आपल्या स्वतंत्र धंद्यांत निष्णात झाले. त्यांच्या हुशारीबद्दल त्यांची जेथें तेथें प्रशंसा होऊं लागली. त्यामुळें राजेरजवाड्यांतूनही त्यांना आमंत्रण येत असे. त्यांच्या भरज्वानीच्या वेळीं त्यांचें काम फार उत्कृष्ट चाललें आणि त्यावर त्यांनीं लाखों रुपये मिळविले. मनुष्याला थोडाबहुत पैसा मिळूं लागला म्हणजे अधिकाधिक मिळविण्याची हांव सुटते; पण भाऊला लोभाचें वारें एक दिवस देखील शिवलें नाहीं. ज्यांना देण्याचें सामर्थ्य आहे अशाच लोकांकडून ते पैसे घेत; पण निराश्रिताच्या एका कवडीलाही ते शिवले नाहींत. उलट ते रोग्यांना पदरचें खाऊ घालून त्यांच्या औषधपाण्याची सोई करित असत त्यांचे उपकार जाणणारे अजून त्यांचें औदार्य स्मरतात; व त्यांच्या उपकाराची कशी तरी फेड करावी म्हणून त्यांचे गुणानुवाद गातात. सर्व जातीच्या लोकांवर एकसारखा लोभ ठेवणें, फार द्रव्यलोभ न धरणें, आणि गरीबांस साह्य करण्याची हौस असणें, हे गुण त्यांच्या ठायीं पूर्णपणें असल्याच्या योगानें त्यांस सर्व जातींचे लहान मोठे लोक एकाद्या मोठ्या साधुप्रमाणें एकनिष्ठपणें भजत असत. त्यामुळें त्यांना त्या संधीस कांहीं कमी पडलें नाहीं. त्यांचा राहण्यासवरण्याचा थाट एखाद्या मोठ्या उमरावासारखा असे.

एकदां एक गरीब महारोगी त्यांच्या जवळ गेला आणि तो दीनस्वरानें म्हणाला कीं, ' डॉक्टरसाहेब ? माझा रोग बरा करा. माझ्या जवळ आपणास देण्यास कांहीं नाहीं. ' तें ऐकून भाऊ म्हणाले, ' मला आपणाजवळून पैसुद्धां नको, आपण माझे देशबंधु आहा इतकीच गोष्ट पुरे आहे. आपण बेफिकीर राहवें. मी आपला रोग सुधारण्याचा यत्न करितों. ' असें वचन देऊन त्यांनीं त्या रोग्यास सतत तीन वर्षे आपल्या येथें ठेवून घेऊन बरें केलें. पुढें तो गृहस्थ कांहीं वर्षे बडोदें संस्थानांत

नोकरीसही होता म्हणतात. अशा प्रकारच्या विश्वसनीय आख्यायिका पुष्कळ सांगतां येतील पण स्थलाभावामुळें तसें करतां येणें शक्य नाहीं.

औषधीयोजना व शस्त्रक्रिया अशा वैद्यशास्त्राच्या मुख्य दोन शाखा आहेत. त्यांपैकीं पहिलीमध्यें बऱ्याचजणाची गति असते. पण दुसरी म्हणजे शस्त्रक्रिया ही फार अवघड आहे. ती फार थोड्यानांच साधते. परंतु तींत भाऊंचा तर हातखंडा होता. मूतखड्याचा रोग म्हणजे फार भयंकर, तो एकदां माणसास जडला म्हणजे प्राणाशी गांठ हाते. पण भाऊंनीं आपल्या बावीस वर्षांच्या कारकीर्दीत ह्या व्यथेनें मरणोन्मुख झालेल्या दीडशें रोग्यांस खडे काढून जीवदान दिलें यावरून भाऊ-शस्त्र क्रियेंत मोठे प्रवीण असल्याबद्दल लोकांची पक्की खात्री होऊन त्यानीं त्यांची वाहवा केली पुढें त्यांच्या मनांत आणखी एक अजबकल्पना शिरली तीमुळें तर त्यांची कीर्ती कल्पकाळापर्यंत अढळ राहिल. ज्या दुष्ट व भयकर रोगानें साऱ्या जगांतील वैद्यांना हतवीर्य करून सोडिलें आहे त्या महारोगाचें मूळच खणून काढण्याचा विचार त्यांच्या मनानें घेतला आणि त्यांत पूर्ण दश मिळावें म्हणून भाऊ जिवापाड मेहनत करूं लागले. हा रोग स्पर्शजन्य आहे तेव्हां कदाचित तो आपल्यासही जडेल वगैरे मुळींच भीति न बाळगतां ते महारोग्यांची स्वत: शुश्रूषा करूं लागले. त्याप्रमाणें शोधांअंतीं त्यांस औषधही सांपडलें. तेव्हांपासून ते एका स्वतंत्र ठिकाणीं आपल्या औषधाचे प्रयोग महारोग्यांवर करीत असत. आपल्या औषधोपचारानें रोग्यांत कांहीं फेरफार होतो कीं काय हें पाहण्याकरितां ते त्यांच्या तसबिरी काढीत असत. त्यामुळें रोग्यांत फेरफार होतो असें दिसून आल्यावर त्यांना उमेद वाटूं लागली. ही गोष्ट प्रसिद्ध होतांच जसे जर्मनीतील डॉ॰ कॉक हे क्षयरोगी व महारोगी बरे करितात असें समजल्याबरोबर हजारों रोगी व वैद्यलोक त्यांच्या येथें जमत असत त्याप्रमाणें भाऊंच्या येथेंही लोकांची एकच गर्दी उडून जात असे. इतकेंच नाहीं तर त्यांची कीर्ति ऐकून अमेरिका, ऑस्ट्रिया व फ्रॉन्स् अशा लांब-लांबच्या प्रदेशांतूनही त्यांचेकडे रोगी येत होते असें सांगतात! भाऊसाहेब आणखी एक दोन तपें वांचते तर त्यांनीं आपल्या शोधकबुद्धीचा कळस केला असता, आणि हट्टी महारोगाचीं पाळेंमुळें जगांतून नाहींशीं केलीं असतीं. पण परमेश्वराचा हेतु निराळाच होता. त्यापुढें आपणा मानवांचें काय चालणार? ‘ भाऊनी आपण केलेला शोध जगजाहीर केला नाहीं. ही फार वाईट गोष्ट केली. ’ असा कित्येकांचा त्यांवर आक्षेप आहे. परंतु तो निराधार आहे. निदान ज्यांना म्हणून भाऊंचा स्वभाव

चौकशीअंतीं माहीत होईल त्यांना तरी तसें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. ज्यांच्या मनांमध्यें रात्रंदिवस परोपकारबुद्धी वास करीत होती. अशा महात्म्याच्या मनास सदहूसारखी अनुदारपणाची कल्पना कधीं शिवणारही नाहीं पूर्णरीतीनें शोध लागल्यावर तो जगजाहीर करावा असा भाऊंचा मनोदय होताच; परंतु कोणत्याही कार्यांत पूर्ण यश आल्याशिवाय त्याचा विनाकारण गवगवा करावयाचा नाहीं. असें त्यांचें मत होतें. त्यांनीं शोधून काढलेलें औषध अद्याप देखील देण्यांत येतें असें समजतें; व त्यापासून थोडाबहुत गुणही येतो म्हणतात. जर ही गोष्ट खरी असेल तर वैद्यलोकांनीं त्याचा तपास करून त्या अपुऱ्या स्थितींत पडलेल्या एका महत्वाच्या औषधाचा शोध लावून आपली कीर्ती उज्वल करावी.

केवळ वैद्यशास्त्रांतच भाऊंचें सारें लक्ष्य होतें असें नाहीं. ते दुसऱ्याही उत्तम कामांत आपल्या फुरसतीचा वेळ खर्च करीत असत. जुनें ताम्रपट व शिलालेख शोधून काढण्याकडे त्यांच्या मनाचा फार ओढा होता. या शास्त्राचें महत्व आपल्या लोकांना बरोबर कळलें नाहीं. ह्या शास्त्राच्या उत्कर्षानें उपलब्ध नसलेल्या इतिहासांत बरीच भर पडणार आहे. घारापुरी येथील कोरीव लेणी बहुतेकांनीं पाहिलीं असतीलच. तशाप्रकारचीं लेणीं हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं आहेत. तेथें जे आजपर्यंत ताम्रपट व शिलालेख सांपडले आहेत त्यांवरून पुष्कळ उपयुक्त गोष्टींचे शोध लागले आहेत. या कामांतही भाऊंनीं पराकाष्ठा केली. त्यांच्या ह्या अचाट शोधकबुद्धीसंबंधानें ' सर रिचर्ड टेंपल ' नामक एक पाश्चात्य विद्वान म्हणतो:—

"He had the passion for antiquarian research, which though nat unknown among the natives, is yet comparatively rare with them, and is more generally found among studeous European. He not only studied classical languages of his contry, but also visited the antique remains, and strove to read the lessons which they present to the succeeding generations. Further his knowledge extended to some branches of science, and on the whole he was

the most eminent native, well worthy of that time in Western India. "*

लेण्यातील बहुतेक शिलालेख संस्कृत भाषेंत असतात म्हणून भाऊनीं त्या भाषेचा चांगला अभ्यास केला. प्रिन्सेप् नांवाचा एक युरोपियन या शास्त्रांत फारच प्रवीण होता. त्याचीं मतें भाऊनी सबळप्रमाणें दाखवून खोटीं ठरविलीं. यासंबंधानें जर कोणास माहिती पाहिजे असेल तर त्यांनीं ' रॉयल् ए० सो० चीं ' त्यावेळचीं मासिक पुस्तकें चाळून पहावीं. ते कधीं कधीं स्वतः जुने हस्तलेख मिळविण्याचा प्रयत्न करीत असत. पण त्यांच्यामागें हजार व्यवसाय असल्यामुळें त्यांनीं त्याकामी मुद्दाम पगार देऊन कांहीं लोकांची योजना केली होती. यालाच म्हणावें विद्याव्यासंग. प्रसिद्ध पंडित भगवानलाल् इंद्रजित हे त्यांच्या हाताखालीं काम करीत असत. ते भाऊच्याच सहवासानें ह्या शास्त्रांत पारंगत झाले व नांवालौकिकास चढले. ज्याला आमच्या देशाचा प्राचीन इतिहास लिहावावयाचा असेल त्यांनी भाऊच्या लेखांचेंच अध्ययन केलें पाहिजे. शास्त्रीय विषयावरही भाऊंनी पुष्कळ महत्वाचे व उपयुक्त लेख लिहिले आहेत. इंग्रजीभाषेंत त्यांची बरीच गति झाली असल्यानें त्यांची भाषा-सरणी फारच मनोहर आहे. एकदां त्यांनी आपल्या वयाच्या १९ वर्षी " Evils of Infonticide " या विषयावर एक विचारपरिपूर्ण निबंध लिहून सरकारांतून सहाशें रुपये बक्षीस् मिळविले होते. त्यांच्या लेखांतील तारीफ करण्यासारखी दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे त्यांवरून दिसून येणारी त्यांची आपला अभिप्राय अगदीं थोड्या शब्दांत व्यक्त करण्याची हातोटी होय. उगाच पाल्हाळ लिहून शब्दावडंबर माज-विलेलें त्यांच्या लेखांत कोठेंही सहसा दृष्टीस पडणार नाहीं. त्यांनीं जें कांहीं थोडक्यां-तच लिहिलें आहे तें लिहिण्यासाठीं हल्लींच्या कांहीं मंडळीस हजारों पानें खर्चूनही भागणार नाहीं ! याविषयीं प्रसिद्ध इतिहाससंशोधक प्रो० मॉक्समूलर साहेबांनीं काढ-लेले खालील उद्गार वाचले म्हणजे चांगली खात्री पटेल.

" I always look upon Dr. Bhau as a man who has done exeellent work in his life, and though he has willen little, the little he has willen is worth thousands of pages willen by others. "

---

* In the student's Magazine. Grant medical college of Gune 1906. Vol. VIII No. 3. Page 262.

भाऊनीं जुन्या हस्तलेखांचीं पुष्कळ भाषांतरें लिहून ठेविलीं होतीं. त्यांपैकीं अगदीं थोडींच प्रसिद्ध आहेत बाकीचे हस्तलेख कसराच्या भक्ष्यस्थानीं पडले. हें आमचें दुर्दैव समजलें पाहिजे दुसरें काय ! तोच इंग्लंडदेश पाहिजे होता, म्हणजे भाऊंच्या नुसत्या हस्तलेखांवरच एखाद्या साधारण कुटुंबाचा चरितार्थ चालला असता. इंग्लंडांत 'Lancet' नावाचें सुप्रसिद्ध व वजनदार मासिक पुस्तक निघत असतें त्यांत भाऊचे शास्त्रीय लेख प्रसिद्ध होत असत. जसे हे जबरे लेखक होते त्याचप्रमाणें वाचनाचाही त्यांना विलक्षण नाद होता. एखाद्या परिक्षेस बसणाऱ्या उमेदवाराप्रमाणें हे अपरात्रपर्यंत वाचतांना दृष्टीस पडत. त्यांचें पुस्तकालय म्हणजे एक विद्यानिधीच होता. त्यांत सर्व तऱ्हेच्या उपयुक्त पुस्तकांचा संग्रह होता. त्यांच्या पाठीमागें त्यांची काय वाट झाली नकळे कै० श्री. बा. ठाकूर सी एस्, कै० राव. साहेब मंडलीक. कै० डॉ. भा साहेब, ह्या तिघांच्या पुस्तकांचा एकत्र संग्रह करून जर एक पुस्तकालय स्थापण्यांत अलें असतें तर काय बहार उडून गेली असती ! पण '**उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः**' तशी ही आमची कल्पना आहे. कारण ठाकुरांच्या व भाऊंच्या पुस्तकांची तर विल्हेवाट लागलीच; फक्त मंडलिकांचा पुस्तकसंग्रह असणार, पण तोही आश्रमपथिकेवरील 'आश्रमांत' आरबी समुद्राची हवा खात असावा !

याप्रमाणें महत्वाचीं कामें संभाळून भाऊनीं ताम्रपट व शिलालेखांच्या शोधार्थ बऱ्याच ठिकाणीं प्रवास केला त्या प्रवासाची एकंदर माहिती एका पारशी गृहस्थानें छापून प्रसिद्ध केली असल्याचें समजते. मराठी भाषेंतही तिची प्रसिद्धी करण्याचें कोणी मनावर घेतल्यास त्याचे फार उपकार होतील. इंग्लंडपर्यंतही जाऊन यावें असा भाऊंचा फार हेतु होता म्हणतात. वस्तुतः त्यांच्याइतका शोधपूर्वक प्रवास केलेला आमच्या इकडील पांढरपेशांत तरी निदान कोणी सांपडणार नाहीं. कूपमंडूकाप्रमाणें विहीरच जग मानणारांनी भाऊंचा अवश्य कित्ता गिरवावा. त्यांनीं प्रवासांत इतकी माहिती करून घेतली होती कीं, जेव्हां सन १८७२ सालीं कै० सर सालरजंग ह्यांच्या आमंत्रणावरून त्यावेळचे हिंदुस्थानचे हितैषी प्रतिनिधी लार्ड नार्थब्रूक साहेब एलोल्याचीं लेणी पहावयास गेले होते तेव्हां त्यांनीं डॉ० भाऊस मुद्दाम आपल्याबरोबर नेलें होते, आणि ह्या लेण्यांसंबंधानें त्यांनीं आपल्या मधुर व संस्कृतवाणीनें जी माहिती दिली ती ऐकून लाटसाहेब फार खुष झाले. तेव्हांचे वरिष्ठ कचेरीचे मुख्य न्यायाधीश सर आर्स्कीन पेरी हे देखील आपल्याबरोबर भाऊस

फिरावयास नेत असत. साहजिकच आहे, मोठ्यांना मोठ्यांचाच समागम प्रिय होणार! येथपर्यंत भाऊंच्या खासगी वर्तनाविषयीं झालें. आतां सार्वजनिक कामांत त्यांचें कितपत अंग होते हें पाहूं

आपल्या नेहमीच्या व आवडत्या व्यवसायात व्यत्यय न आणता भाऊनी जीं जीं सार्वजनिक कामें केली, ती पाहिली म्हणजे छाती दडपून जाते कारण हे कै० नौरोजी फर्दुनजीप्रमाणें सार्वजनिक कृत्यातच खटपट करणारे असते तर गोष्ट निराळी होती; पण त्यांच्या नुसत्या अनु॰रणीय अशा खासगी वर्तनावरच एक सबंध ग्रंथ लिहितां आला असता तर अशारीतीचा अचाट व्यासंग संभाळूनही त्यांनी मोठमोठी सार्वजनिक कृत्यें उत्तमप्रकारे तडीस नेलीं. हे आश्चर्य नव्हे काय? सांप्रतच्याप्रमाणे भाऊंच्यावेळीं राजकाय विषयासंबंधानें फारशी चळवळ नव्हती. तरी तो विषय भाऊंना फार प्रिय होता त्या विषयाचा खल व्हावा म्हणून त्यांनीं इतर मित्रमंडळीच्या साह्यानें ' बांबे. असोसिएशन ' संस्थेची स्थापना केली. तेच काम हल्लीं ' Bombay Precidency association ' ही सभा करते. पहिल्या दूरि इंडिया ऑफिसात ज अर्ज जात असत ते वाचून पाश्चात्यराष्ट्रांतील विद्वानलोक माना डोलवीत. खरोखर भाऊ अजूनपर्यंत जर जिवंत असते तर राष्ट्रीयसभेचे एक मोठे आधारस्तंभ झाले असते. असें आम्हास खात्रीपूर्वक वाटते पण वरातीमागून घोडी काय उपयोग! बरं राजकीय विषयालाच ते चिकटून राहिले असेही नाहीं. हल्लीं ज्या सामाजिक सुधारणेसंबंधाने कागदी घोडे नाचत आहेत त्यातील मुख्य अंग जे स्त्रीशिक्षण त्याचे ते कट्टे अभिमानी होते ह्मणूनच त्यांच्या श्रमानें ' Student's literary and scintific society ' ही संस्था स्थापन झाली. ह्या त्यांच्या कामगिरीबद्दल लोकांनी १२००० रु॰ जमा करून त्या पैशावर त्याच्या नांवानें एक मुलीची शाळा स्थापन केली. ललित विषयांपैकीं नाटक ह्या विषयाकडे भाऊंचें लक्ष होते. पाश्चात्य लोकांस भारतकवीचे वैभव दाखविण्याकरिता अवतरलेली त्यावेळची ' Kalidas Elphinstone society ' भाऊंनीच उदयास आणिली. कविकुलगुरु कालिदास ह्याच्या अभिज्ञान शाकुंतल नाटकाचें बहुतेक हुबेहुब भाषांतर प्राच्यभाषा प्रवीण मोनियर विल्यम्स साहेबांनी इंग्रजींत केलें आहे त्याचे प्रयोग मुंबईतील इंग्लिशलोकांस दाखवून त्यांना तल्लीन करून सोडिलें त्याबद्दलचें बहुतेक श्रेय भाऊंसच मिळालें होतें. गुणीजनांचा आदर करावा असें त्यांचें ब्रीदच होतें. म्हणूनच त्यांनी ज्या कर्मणुकीच्या शाळेला—नाटकशाळेला—हल्लीं

मंडळींच्या वर्तनानें मिकारस्वरूप प्राप्त झाले आहे, तिला आपला हातभार लावून ती कला लोकप्रीय करून सोडिली.

भाऊंना वनस्पतिशास्त्राचा फार नाद होता. मुंबईतील 'व्हिक्टोरिया गॉर्डन्' व तेथील ऑल्बर्ट पदार्थ संग्रहालयीही त्यांच्या व हिंदुस्थानांतील कलांचें पुनरुज्जीवन व्हावें ह्मणून इंग्लंडांत खटपट करणारे डॉ० बर्डवुड या उभयतांच्या श्रमाची फळे होत. परोपकाराविषयी तर भाऊचे नाव आबालवृद्धांत गाजत आहे; तरी पण पोप कवीने एकेठिकाणी म्हटल्याप्रमाणे 'सत्कृत्य चोरून करावयाचें व तें जगजाहीर झालें म्हणजे खेद मानावयाचा' अशी त्यांची वृत्ति असल्यामुळें त्यांच्या परोपकाराविषयी ज्या गोष्टी प्रसिद्ध आहेत त्यांचाच येथें उल्लेख करितो. 'प्राण, द्रव्य व वाणी, हीं खर्च करून श्रेय संपादिलें म्हणजे जन्माचे सार्थक झाले' असे भगवद्वचन आहे. तद्वत् भाऊंचे आचरण होतें.

रक्तपितीमारख्या महाभयंकर रोगाला जगांतून आजिबात नाहीसें करण्याकरितां भाऊ इतके कांहीं खपले की, त्यांतच त्याच्या प्रिय प्राणास बळी पडावे लागलें! अशारीतीने जो महात्मा केवळ परोपकारास्तव स्वतःचा प्राण वेंचण्यास यत्किंचित् डगमगला नाहीं, तो ह्या क्षणिक लक्ष्मीची कितीशी पर्वा बाळगणार! एका परोपकारासाठीं त्यांनीं इतका पैसा खर्च केला की, त्यामुळे त्यांना अंतकाळीं गरिबी आली. केवळ सत्याला स्मरणाऱ्या अशा आपल्या रसाळवाणीच्यायोगानेंच ते साधूप्रमाणें वंद्य झाले होते. त्यासंबधाने एकदोन गोष्टी प्रसिद्ध आहेत त्या अशा—'एकदां एका युरोपियन मॉजिस्ट्रेटाने आपल्या प्रियपात्राच्या सांगण्यावरून निरपराधी इसमास सजा दिली. त्याने ही गोष्ट भाऊंच्या कानावर घातली. भाऊंनी तें प्रकरण वरिष्ठ कचेरीपर्यंत नेऊन त्याला झालेली शिक्षा रद्द करविली. कित्येकाना साहेब म्हणजे देव वाटतो; पण भाऊ मनाचे सरळ असल्यामुळे त्यांनी 'सत्यमेवजयते नानृतम्' ह्या वचनाकडे दृष्टि देऊन साहेबाचा समाचार घेतला.' प्रसिद्ध भाटे ज्ञातीत महाराज म्हणविणारांनी दिवसाढवळ्या जो अनाचार माडला होता, त्याचे निर्दलन करून महाराजांची कृष्णकारस्थानें बंद करण्याकरिता के० शेठ कर्सनदास मूळजींनीं एक खटला उपस्थित केला होता, ह्या खटल्यांत भाऊनीं शेटजीच्या तर्फे अशी उत्तम साक्ष दिली की, त्याबरोबर महाराजांचा पक्ष नेभळा पडला. शेट कर्सनदास हे भाटे ज्ञातींतील एक सुधारक गृहस्थ असून 'इंग्लंडचा प्रवास' या पुस्तकाचे ते कर्ते होते. तात्पर्य, ह्या महत्वाच्या कामात भाऊनी स्वतः आंगावर बाजू घेतल्यामुळें महाराजप्रकरण थंड पडले. असो,

भाऊंच्या परोपकारासंबंधी अत्यंत महत्वाचें कृत्य म्हणजे 'धर्मार्थ दवाखाना' होय. हा दवाखाना त्यांनीं व त्यांचे विद्वान बंधू डॉ० नारायणदाजी ह्या उभयतांनीं मुंबईमध्यें मुंबादेवीच्या दाट वस्तींत स्थापन केला होता. अशारीतीनें ते प्रजेच्या व सरकारच्या हितासाठीं झटले. त्यांत लोकांनीं आपणाकडून होईल तितकें करून त्यांचे उपकार फेडण्याचा यत्न केला, परंतु सरकारांतून त्यांना नुसती सी. आय्. ई. सारखी एखादि पदवीसुद्धां मिळूं नये हे मोठें आश्चर्य होय! तथापि ज्या मोठ्या हुद्यांच्या जाग्यावर त्यांच्यासारख्या विद्वानांचीच जरूरी होती त्या जाग्यावर त्यांची नेमणूक करण्यांत सरकारानें कांकूं केले नाहीं इतकी गोष्ट खरी आहे. ते डाक्टर झाल्यावर थोड्याच दिवसांनीं त्यांस 'Board of Education,' ह्या सभेचे फेलो नेमिले. ही संस्था त्यावेळीं विश्वविद्यालयाच्या ठिकाणीं होती पुढें त्यांना 'Syndic of arts.' ही नेमण्यांत आले होते. त्यांस दोनवेळां मुंबईचे शेरीफ केले होते. त्यांना पहिल्यानें म्हणजे सन १८६८ सालीं शेरीफ नेमिले तेव्हां 'टॉइम्स ऑफ् इंडिया' पत्रानें असें लिहिलें होतें कीं, "त्यांनीं जे मोठमोठे ऐतिहासिक शोध लाविले त्यामुळें त्यांची युरोपभर ख्याति होऊन ते लंडन व मुंबई येथील 'रॉयल् एशियाटिक सोसायटी' च्या सभासदांत अग्रगण्य झाले. ते सुधारलेल्या राष्ट्रांतील १५-२० नामांकित सभांचे सभासद होते. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें आहेत:—लंडन् रॉयल ए० सो० चे सन्माननीय सभासद; मुंबई रॉ० ए० सो० चे उपाध्यक्ष; पारीस् एशिआटिक सो० चे सभासद; जर्मन ओरिएंटल सो० चे सभासद. अमेरिकन् ओरिएंटल सो० चे सभासद; पेनसिलव्हानिया हिस्टारिकल सो० चे सभासद; फिलालॉजिकल् सो० चे फेलो; बंगाल एज्युकेशन् सो० चे सभासद; लंडन लिनीयन सो० चे फेलो; आस्टियन म्युझियम ऑफ आर्ट्स अँड इंडस्ट्री (व्हायना) चे सभासद; मेकानिक्स सो० चे सभासद; मुंबई जाग्राफिकल् सो० चे सभासद; स्टुडंट्स् सायंटिफिक् अँड लिटररी सो० चे अध्यक्ष; व्हिक्टोरिया व आलबर्ट म्युझियमचे सन्मान्य चिटणीस; नेटिव्हजनरल लायब्ररीचे व्यवस्थापक मंडळीचे अध्यक्ष; बॉम्बे असोसिएशनचे उपाध्यक्ष; फिमेल् नॉर्मलस्कूल कमीटीचे अध्यक्ष; जुवेनाइल इंप्रुव्हमेंट लायब्ररीचे पुरस्कर्ते; इ० इ० या हकीकतीवरून भाऊंच्या जबरदस्त विद्याव्यासंगाची चांगली कल्पना होऊन मन अगदीं थक्क होऊन जातें आणि मनुष्याच्या खऱ्या उद्योग तत्परतेची चांगली साक्ष पटते.

अशा रीतीचीं हीं मोठमोठीं कामें भाऊसाहेब अगदीं अल्पकालांत म्हणजे अवघ्या

वीस वर्षांच्या अवधींत संपन्नत असतां त्यांस १८७४ च्या सुमारास अर्धांगवायूचा पहिला झटका बसला. ही गोष्ट लोकांना समजतांच ते त्यांचा समाचार घेण्याकरितां त्यांच्या घरीं येऊं लागले. एकदां तर खुद्द तेव्हांचे गव्हरनर सर बार्टल फ्रियरसाहेब हे त्यांचा समाचार घेण्यास आले होते. ह्यावरून भाऊंच्या अंगीं कितपत योग्यता होती व ते किती लोकप्रीय होते, हें सहज ध्यानांत येतें. अर्धांगवायु होऊन त्यांस जागेवरून हालवत नव्हतें, अशा वेळेस त्यांस असें कळलें कीं, हिमालयामध्यें गंगोत्री जवळच्या एका उंच शिखरावर कांहीं एक शिलालेख आहे. तेव्हां ते ह्मणाले " तो पहायास जाण्यास जर मला सामर्थ्य असतें तर किती चांगलें झालें असतें म्हणून सांगूं ! " विद्येविषयीं किती तीव्र आस्था हो. ह्यालाच म्हणावें विद्याव्यसन. पुढें दिवसेंदिवस त्यांची प्रकृति क्षीण होत गेली आणि अखेरीस अतिसारावर प्रकरण जाऊन १८७४ सालांतील मे महिन्यांत त्या रोगानें भाऊसाहेबांचा अंत केला. तेव्हां ते सारे ५२ वर्षांचे होते.

भाऊसाहेबांची ही मरणवार्ता वणव्याप्रमाणें सर्वत्र पसरली. ती ऐकून लोकांचीं मनें नानातऱ्हेच्या कल्पनांनीं ग्रस्त झाली. कोणाला वाटलें कीं, आधुनिक शास्त्राचा एक खांबच ढांसळला; कोणाला वाटलें कीं, दातृत्वरूपी समुद्राला ओहोटीच आली; कोणी म्हणूं लागले कीं, निर्लोभरूपी सूर्य अस्तास गेला; वर्तमानपत्रांमधून तर ते मरण पावल्यादिवसापासून पुढें कांहीं दिवसपर्यंत चोहोंकडून त्यांच्या गुणानुवादा-विषयी लेख येत होते. एकादा कोणी थोर माणूस परलोकवासी झाला कीं, त्या-विषयीं दुःखोद्गार प्रदर्शित करण्याकरितां व त्याचे स्मारकाबद्दल विचार करण्या-करितां टाऊनहालांत जाहिरसभा भरण्याचा मुंबईशहरांत परिपाठ आहे. त्याप्रमाणें दोन तीन महिनें गेल्यावर म्हणजे १८७४ च्या आगष्ट महिन्यांतील पहिल्या तारखेस भाऊसाहेबांच्या स्मारकाचा विचार करण्याकरितां टाउनहालांत मुंबई शेरीफनें सभा भरविली. त्याप्रसंगीं नामदार गीब्ससाहेब, व्हॉइसचान्सलर हे अध्यक्षस्थानी विराज-मान झाले होते. त्यादिवशी मुसळधार पाऊस पडत होता तरी ज्याप्रमाणें आकाश मेघसमुदायांनी भरून गेलें होतें त्याप्रमाणेंच सभास्थानही श्रोतृसमुदायानें चिकार भरून गेलें होतें. ह्याचे कारण काय हे निराळें सांगावयास नकोच. तथापि भाऊसाहे-बांच्या गुणांचें अभिनंदन करण्याकरितां मेघराजांनीही आगमन केलें होतें असें म्हटलें पाहिजे. नामदार गीब्स, सर मायचेल् वेस्ट्रॉप्, नामदार सरजमशेटजी जिजीभाई, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, रे. डॉ. विल्सन्, नामदार मि. जस्टिस् वेस्ट, वगैरे ठळक

ठळक गृहस्थ सभास्थानीं हजर होते. त्यासमयीं त्यांनीं जीं भाषणें केलीं त्यांतील थोडासा आशय येथें देऊन हें चरित्र संपवितों.

सभा सुरवातीस अध्यक्षांनीं चटकदार भाषेंत भाऊंचें जीवनवृत्त सांगितल्यावर, सर मायचेल्वेस्ट्राप् साहेब म्हणाले:—" माझ्या सुदैवानें माझा व भाऊंचा सुमारें २० वर्षांपूर्वी परिचय झाला. तो परमेश्वर कृपेनें भाऊंच्या मरणकाळापर्यंत कायम राहिला. मनाची उदारवृत्ति ठेवणें, शक्य तितका परोपकार करणें, व सत्कीर्तीचा अभिलाष धरणें या भाऊंच्या गुणांबद्दल अशेष मुंबई शहरास जो इतका अभिमान वाटतो तो अगदीं यथार्थ आहे यांत शंका नाहीं. सदहू गुणत्रयीच्या ऐन भरांत भाऊंना अकालीं मरण आलें ही त्यांच्या कुटुंबाची व मुंबईशहराची हानि तर खरीच, पण त्यायोगें सरस्वतीमंदिरांतील एक उच्च आसन मात्र निःसंशय रिकामें राहणार आहे, व ही हानि लवकर भरून येणें शक्य नाहीं. भाऊंनीं आपल्या स्वतःच्या धंद्यांत चांगले यश संपादन केलें होतें ही गोष्ट प्रसिद्धच आहे. पण त्यांच्या कार्याचें क्षेत्र त्याहीपेक्षां पुष्कळ विस्तृत होतें; हीच गोष्ट आज मुख्यत्वेंकरून मला सांगणें आहे. आपला वैद्यकीचा धंदा उत्तम प्रकारें करून फावल्यावेळेंत भाऊंनीं जे अनेक जुने शोध लावले आहेत व जी सरस्वतीदेवीची निस्सीम सेवा केली आहे; त्यांची योग्य किंमत केव्हांही करता येणें शक्य नाहीं. शिवाय इतकें करूनही भाऊंचा आपल्या देशबांधवांच्या कल्याणार्थ उद्योग अव्याहत चालूच होता. ही गोष्ट लक्षांत आणली म्हणजे त्यांच्या मरणापासून होणाऱ्या हानीचें पुरे स्वरूप दृष्टीसमोर उभें राहते व मन अत्यंत विषण्ण होतें. भाऊंच्या चरित्रापासून त्यांच्या देशबांधवांनीं शिकण्यासारखा मुख्य धडा म्हणजे हाच कीं, आपल्या धंद्यास अगर एकादी सरकारी हुद्याची जागा मिळविण्यास जरूर लागेल तितकेंच शिक्षण संपादन करून स्वस्थ न राहतां विद्यार्जनाची लालसा सदैव जागृत ठेवून तत्प्रीत्यर्थ उद्योग करीत राहणें. " ARSIONGA VITAEST BREVIS " ही लॅटिन म्हण नेहमीं भाऊंच्या भाषणात ऐकूं येई. आपलें ज्ञान पूर्ण झालें असें त्यांस कधीं वाटलें नाहीं; व ज्ञानार्जनाबद्दलची त्यांची आस्था मरेपर्यंत कमी झाली नाहीं. याच सभामंडपांत कांहीं दिवसांपूर्वी भाऊंचें एक सुश्राव्य भाषण ऐकण्याची सुदैवानें मला संधि मिळाली होती. तें त्यांचे भाषण ऐकून मला एवढा आनंद झाला कीं, तें भाषण मी कधींही विसरणार नाहीं व त्यायोगें माझ्या मनावर झालेला परिणाम केव्हांही यत्किंचित् कमी होणार नाहीं. धर्मसंबंधीं एका मुद्यांचा विचार करीत असतांना त्यांच्यांत जें मतस्वातंत्र्य व जी एकप्रकारची दुराग्रहशून्यता दिसून आली ती

केवळ असामान्य असून ते गुण मनुष्याच्या मनाची चांगली उन्नति झाल्याशिवाय त्यांच्यांत येणें शक्य नाहीं. "

रे. डॉ. विल्सन् म्हणालेः-" भाऊ औषध फुकट देत असत व ते पैसे घेतल्याशिवाय रोग्याची शुश्रूषा करीत असत, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. सारांश. हें एक रत्न चमकून गेलें त्यांचें चरित्र पुढल्या पिढीला कित्यादाखल आहे. धर्मसंबंधीं मुद्याचा त्यांनीं निःपक्षपातरीत्या खल केला व ते धीट धर्मसुधारक होते. जगजाहिर ' महाराज प्रकरणांत ' त्यांनीं जें अवसान दाखविलें तें कोणी विसरणार नाहीं. त्यामुळें त्यांच्या धंद्याला बराच धक्का बसला पण त्यांनीं त्याची मुळींच पर्वा केली नाहीं. "

नामदार जस्टिस् वेष्ट म्हणालेः-" आतां श्रोतृमंडळांपैकीं तरुणांस मी दोन गोष्टी सांगतों. तुम्हीं भाऊंचें अनुकरण करा. त्यांच्याचप्रमाणें ज्ञानसंपादनाकडे लक्ष द्या. व त्यासाठीं एकचित्त राहण्याचा यत्न करा. सतत उद्योग करा; दयाळू व विनयशील राहण्यास झटा...... मला आज अशाच दुसऱ्या एका स्मारकसभेची आठवण होत आहे. त्याही सभेंत मी आजच्याप्रमाणेंच भाषण केलें होतें. ती सभासुमारें नऊ वर्षांपूर्वीं सर डेव्हिड् सॅसून या गृहस्थांच्या स्मारकासाठीं भरलेली होती. त्या सत्पुरुषाचीं सत्कृत्यें आज आपल्या नजरेसमोर आहेत. त्यांनीं आपली पुष्कळ संपत्ति परोपकारांत खर्चिली. त्याचप्रमाणें दुसऱ्या एका उदारचरित व बुद्धिमान् गृहस्थाच्या स्मारकाचा विचार करण्यासाठीं आज आपण येथें जमलेलों आहों. अशीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे " ईश्वर अमुकच जातीच्या अगर धर्माच्या मनुष्यास असामान्य बुद्धि देत असतो असें नाहीं. " हें सत्य मनांत बिंबतें. विशेषतः जे आम्ही सर्व लोकांपेक्षां आपल्यास श्रेष्ठ समजतों त्या आम्ही तर सदहू सत्य नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे; व दुराग्रहाचा समूळ नाश करण्याचा यत्न केला पाहिजे. गुण म्हटला कीं, तो कोणाहीमध्यें दिसून आला तरी तो मनुष्य वंद्यच मानला पाहिजे. " **गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः** " हेंच खरें.

ज्या नव्या शतकाचा प्रभातकाल नुकताच झाला आहे, त्या शतकाला अनुरूप अशीं कृत्यें करणें तरुण मित्रहो आपलें काम आहे. असो. आतां जे तरुण नाहींत, त्यांना मला दोन शब्द सांगावयाचे आहेत. आपणांपैकीं कांहीं लोक सधन आहेत, म्हणजे त्यांच्याजवळ बरेंच द्रव्यबळ आहे. तर त्यांनीं गरीब पण बुद्धिमंत अशा विद्यार्थ्याला मदत करण्याची कांहींतरी तजवीज करावी, अशी विनंति आहे. हिंदु-

स्थानांत शिक्षणप्रसारार्थ अशाप्रकारची आज पुष्कळ मदत पाहिजे आहे. ती आपणाकडून देण्यांत यावी. अशाप्रकारें आपण जर आपलें कर्तव्य बजाविलें; व त्यायोगें कदाचित पुढें कोणी प्रति भाऊदाजी निपजला आणि त्याच्या सन्मानार्थ जर अशी स्मारकसभा भरविण्याचा प्रसंग आला तर तिचें थोडेसें तरी श्रेय आपणांस निःसंशय प्राप्त होईल. ”

आणखी एका सभेच्याप्रसंगीं नामदार जेम्स गीब्स साहेब व्हॅाइस् चान्सलर यांणी पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत:-“ Take example from the late Dr. Bhau daji, look what he has done for his country, how he studied its early history and its early languages gave the result of his inquiries to the scintific world; how he made deep researches in sanskrit lore; let all take example from his career, not medical graduates only but civil engineers and the lawyers. ”

याप्रमाणें निरनिराळ्या पाश्चात्य विद्वानांनीं भाऊंविषयीं जे आपले अभिप्राय प्रकट केले आहेत. त्यांवरून त्यांची योग्यता व्यक्त होते. भाऊंचे अखंड स्मरणार्थ मुंबई युनिव्हार्सिटीमधून बी. ए. च्या परीक्षेंत संस्कृतमध्यें पहिला नंबर मिळविणारांस स्कालर्शिप देण्यांत येते हेंच त्यांचें खरें जिवंत स्मारक होय. असो.

डॉ. भाऊदाजी ह्यांचें अनुकरणीय वर्तन निरंतर लक्षांत बाळगून त्याप्रमाणें वागण्याचा यत्न झाल्यास भाऊंची रिकामी पडलेली जागा खात्रीनें भरून येईल अशी पूर्ण आशा आहे.

# ऑनरेबल नारायण वासुदेव दाभोळकर जे. पी.

" नरदेह हा स्वाधीन। सहसा नव्हे पराधीन ॥
परंतु परोपकारीं झिजवून। कीर्तिरूपें उरवावा ॥ "

समर्थ रामदास.

मनुष्यदेह हा क्षणभंगुर असल्यामुळें त्याचा कधीं नाश होईल याचा नियम नाहीं. म्हणून देहांत जीव असेतोंपर्यंत परोपकार करावा. परोपकारार्थ देह झिजविण्याचा ज्यांनीं संकल्प केला त्यांनींच खरी उद्योगाची कांस धरिली असें म्हटलें पाहिजे. परोपकारी म्हणवून घेण्याला मनुष्य जबरदस्त उद्योगीच असला पाहिजे. उद्योग हा सर्व साधनांमध्यें प्रधान आहे. कारण, त्याच्यायोगानें मनुष्य अगदीं विपन्नावस्थेंत असला तरी तो वैभवाच्या शिखरास जाऊन पोहोंचतो. ज्यांनीं लहानपणापासून काबाडकष्ट करून केवळ सतत उद्योगानें ह्या जगांत सर्व कामांस अवश्यमेव लागणारी संपत्ति व ऐश्वर्य कमाविलें त्याच्याकडूनच त्यांजवर अवलंबून असलेल्या कुटुंबाचा चरितार्थ चालतो व ह्यातून परोपकार घडतो. साधारण जहागीरदाराचा पोर राजा हें पद मिळवील असें कोणास स्वप्नीं तरी वाटलें होतें काय ? पण उद्योगबलानें ते जहागीरदार पुत्र छत्रपति बनले; व औरंगजेबासारख्या बलाढ्य बादशहाला देखील भारी झाले ! हा प्रभाव मुख्यतः उद्योगाचा असें कोण बरें म्हणणार नाहीं ? तशांत उद्योग व बुद्धि, ह्यांचें ऐक्य झाल्यावर जी फलप्राप्ति होते तिचें तर गणितच करतां येत नाहीं. उद्योगापेक्षां बुद्धिचें माहात्म्य विशेष आहे. उद्योग व बुद्धि या रूपानें तत्काळ पावणाऱ्या ह्या देवतांची मनोभावें आराधना केल्यामुळेंच राम्या शागीर्दाचा रामशास्त्री झाला. व खरडेघाशा मोरू, आद्यकवि ह्या उच्चपदास चढला. एकंदरींत ह्या जोडप्याच्या फलदातृत्वाची कमाल आहे. ह्या दोन देवता भक्तांवर प्रसन्न झाल्या म्हणजे ' अनंतहस्तें कमलावरानें, देतां किती घेशिल दोकरानें ' अशी त्यांची स्थिति होते. खरोखर असे प्राणी धन्य होत ! अशांचैपकीं प्रस्तुत चरित्रनायक ऑनरेबल नारायणराव दाभोळकर हे होत.

कोंकणांत हल्लीं सावंतवाडी व तिच्या आसमंतात जो प्रांत आहे, त्यासच पूर्वी कुडाळप्रांत अशी संज्ञा होती. या प्रांताची पूर्वीची हद्द म्हटली म्हणजे पूर्वेस सह्याद्री, पश्चिमेस आरबीसमुद्र, उत्तरेस देवगडची नदी, आणि दक्षिणेस सांखळीची




नामदार मिस्तर ना. वा. दाभोळकर.

नदी. या प्रांतांत मुख्य देशकतीचा हक सारस्वत ब्राम्हणांचाच होता. व ते कुडाळे-देशकर देसाई या नांवानें संबोधिले जात असत. परंतु अजमासे तीनशें वर्षांपूर्वी त्या प्रांतांतील " सावंत " मराठा विजापुर दरबारांत नोकर होता. त्याणें त्या दरबाराकडून त्या प्रांताच्या सरदेशकतीची सनद संपादन करून, मूळ देसाई यांची पायमल्ली करून सोडिली. तेव्हांपासून त्या प्रांतास ' सावंतवाडी ' हें नांव पडलें. कोल्हापूरची गादी स्थापन झाल्यानंतर या प्रांतांतील उत्तरेकडील साळशी महाल, मालंडतर्फ आणि त्रेपन्न खेड्यांपैकीं आठ खेडीं याविषयीं पेशवे, कोल्हापूरकर, आणि वाडीकर यांचे नेहमी तंटे चालत; आणि त्या प्रांतांत इंग्लीश अंमल होईपर्यंत वाडीकरांनीं दुसऱ्या दोघांस कधींच स्वस्थपणें वसूल घेऊं दिला नाहीं. इंग्रजी अंम्मल झाल्यानंतर साळशी म्हाल, मालंड तर्फ व आठ खेडीं; इतका मूलूख सावंताच्या हातांतून अजिबात गेला. पुढें इंग्लिशानीं आठ खेडीं सावंतास देऊन त्याकडून बंदर किनाऱ्यावरील वेंगुर्लें वगैरे कांहीं गांव मोबदला घेतले. तसेच दक्षिणेस पेडणें, डिचोली व सांखळी हे तीन महाल तिकडचे अधिकारी सारस्वतदेसाई पोर्तुगीज लोकांस पूर्णपणें वश होत तावत्कालपर्यंत सावंतांकडेच असल्यासारखे होते. या एकंदर प्रांतांतील कित्येक गांवांत कुळकर्णपणाचें वतन सारस्वत ब्राम्हणावांचून दुसऱ्या कोणासच नाहीं, आणि कित्येक गावांत पाटीलकीचेंही वतन त्यांचेकडेसच चालतें. या भूमिप्रदेशांत राहणाऱ्या एकंदर लोकांच्या अंगीं हुशारी, धीटाई, चपलता आणि स्वामिभक्ति हे गुण मुख्यत्वानें वास करितात. तसे गुण कोंकणपट्टींत दुसऱ्या भागच्या लोकांत क्वचित दृष्टिस पडतात. असो; सारांश दाभोळकर हे ह्याच प्रांतांत राहणारे होते. त्यांचें मूळ घर वेंगुर्ल्यानजीक उभादांडा ह्मणून जी एक लहानशी वाडी आहे तेथें होतें. यांचें मूळ उपनाव गायतोंडे असें आहे; परंतु वेंगुर्ल्याजवळ दाभोली म्हणून जो गांव आहे त्या गावांत कुळकर्णकीचें व पाटीलकीचें वतन यांचेकडे आलें, तेव्हांपासून त्या प्रांतांतील लोक दाभोळकर याच उपनांवानें त्यांना ओळखूं लागले. या दाभोळकर घराण्याचा वंशविस्तार बराच मोठा असून

---

१ कुडाळापासून नजिकच वालावली म्हणून एक गांव आहे, तेथें श्रीनारायणाचें देवालय बांधून सदरहू देसाई यांनीं त्या देवस्थानच्या खर्चाकरितां गांवच्या उत्पन्नापैकीं सुमारें अर्ध्या उत्पन्नाच्या सनदा व खर्चाचें व्यवस्थापत्र करून दिलें आहे.

[ जिवबादादा केरकर चरित्र पृ० १ ]

वडिलोपार्जित वतनांत अनेक लहान लहान भाग झाले आहेत. नारायणरावाचे वडील वासुदेवराव यांस त्या प्रांतीं चिटकोबा दाभोळकर या नांवानें ओळखीत असत. यांचा वतनसंबंधी भाग लहान असल्यामुळें त्यांच्या वाढत्या कुटुंबाच्या निर्वाहास तो पुरण्यासारखा नव्हता. त्यांत लग्नकारणांचा वगैरे खर्च झाला त्यामुळें त्याच भागावर कर्ज झालें. तेव्हां सहजच दुसरीकडे कोठेंतरी दूरदेशांत जाऊन चरितार्थाचा उपाय पहावा अशी त्यांस इच्छा झाली. त्याप्रमाणें वासुदेवराव हे आपलें सर्व कुटुंब घेऊन सन १८३६ सालच्या आरंभास मुंबईस गेले. त्यावेळीं चरित्रनायक नारायणराव हें शेवटचें आपत्य तीन वर्षांचें होतें. नारायणरावजींचा जन्म त्यांच्या राहत्या गांवीं शके १७५५ फाल्गुण कृष्ण १४ दशी रोजीं म्हणजे सन १८३३ सालांत झाला. त्यावेळची मुंबईची स्थिति हल्लींच्या स्थितीहून फार भिन्न होती. आतां मराठी लिहिणारे व वाचणारे मुंबईत सहस्रावधि आढळतील, पण त्यावेळीं शेंकडा एकही मिळण्याची पंचाईत. अशा संधीस वास्तवीक मराठी लिहिणारा वाचणाराची मुंबईत चांगली चीज व्हावी; परंतु वासुदेवरावास त्यापासून विशेषशी फलप्राप्ति झाली असें वाटत नाहीं. अशा बिकट स्थितींत मनुष्य पडला म्हणजे त्याचें स्वतःचें कसेंही झालें तरी आपलीं मुलें अथवा त्यांतून कोणी तरी सुखी होवो अशी इच्छा त्यास सहज उत्पन्न होते.

नारायणराव लहानपणापासून मोठे सौंदर्यवान होते. सडपातळ बांधा, त्यास शोभणारी उंची, गौरवर्ण, नाजुकपणा, अव्यंग अवयव इत्यादि गुणांनीं युक्त असें त्यांचें गोजिर्वाणें रूप पाहिलें म्हणजे कोणासही अशाप्रकारचा मुलगा आपल्यास असावा असें वाटल्यावांचून राहात नसे. आणि त्याप्रमाणें मुंबईतील एका श्रीमान गृहस्थास नारायणरावास दत्तक घेण्याची इच्छा झालीही! ती त्यांची इच्छा पूर्ण करण्यास वासुदेवरावही कबूल झाले! परंतु मुलाविषयीं आईचे विचार बापाच्या विचारांहून सामान्यतः अगदीं भिन्न असतात. तिचा निरुपाय होईपर्यंत, अथवा आपला व मुलांचा कायमचा वियोग होणार नाहीं अशी खात्री पटेपर्यंत लहान मुलास दूर करावें असें सहसा कधीं तिला वाटत नसतें. त्यांतही सर्वांत लहान मुलावर आईची अत्यंत प्रीति असते. अर्थात् नारायणरावजीच्या मातुश्री या दत्तविधानाच्या बेतास कबूल झाल्या नाहींत. नारायणराव हे लहानपणीं फार खेळाडू व मोठे चौकसबुद्धीचे होते. हीच चौकसबुद्धी पुढें त्यांच्या अभ्युदयास कारण झाली. ते जरा जाणते

झाल्यावर रा. रा. गोविंदराव नारायण माडगांवकर ह्यांच्या हाताखालीं मराठीचा अभ्यास करूं लागले.

पुढें सन १८४० सालच्या सुमारास नारायणरावजींचे वडील वासुदेवराव हे स्वर्गस्थ झाले. यामुळें कुटुंबनिर्वाहाचा सर्व भार नारायणरावजीचे वडीलबंधु साजबा यांजवर पडला. त्यावेळीं साजबाचें वय १८।१९ वर्षाचें होतें. त्याणी मुंबईच्या कष्टमहौसमध्यें दलाली करण्याचा स्वतंत्र धंदा सुरू केला; आणि त्यावेळीं आतांसारखे दलाली करणारे प्रत्येक खांबाशीं नसल्यामुळें त्यांस बरीच पैदास होऊं लागली. ही पैदास त्यांच्या ७।८ माणसांच्या कुटुंबास सुखानें निर्वाह करण्याजोगी त्यावेळीं होती, पण साजबाच्या मावशीचींहीं मुलेंबाळें त्यांच्याकडे राहत असत. त्यामुळें आदा व खर्च हे बरोबर होऊन कांहीं शिल्लक राहण्याचा संभव नसला तरी नारायणरावजीच्या अभ्यासास कोणताही व्यत्यय आला नाहीं इतकें खरें. मराठीचा अभ्यास चांगला झाल्यावर आठवेंवर्ष लागतांच त्यांना त्यावेळच्या प्रसिद्ध एलफिन्सटन इन्स्टिटयुशनमध्यें इंग्रजीचा अभ्यास करण्यास पाठविलें. तेथें त्यांस सुदैवानें डॉ० हार्कनेस ह्या विद्वान् गुरूंचा समागम घडला. नारायणराव हे जात्या हुशार असल्यामुळें थोड्याचकाळांत त्यांनी डॉ० हार्कनेस ह्यांची मर्जी संपादिली. त्यांच्या धारणेची अशी गोष्ट सांगतात कीं, संध्याकाळीं शाळेंतून आल्यावर पोरस्वभावास अनुसरून इकडे तिकडे उड्या माराव्या, नंतर जेवावें आणि लागलींच निजावें; बरें लौकर निजलें म्हणून सकाळीं तरी लौकर उठावें! तें कांहीं नाहीं. सकाळीं आठ वाजतां उठून नंतर एक तास दीडतास पूर्वदिवशीं दिलेले धडे त्यांनीं नुसते एक दोनवेळां वाचावे! असें असतांही वर्गामध्यें पहिल्या दुसऱ्या नंबरास नांव आलें नाहीं असें कधींही झालें नाहीं. शाळेंत मात्र कधींच चटोरपणा न करितां मन लावून सांगतील ते धडे शिकावयाचे. नित्य नेमानें शाळेंत जाणें, मनलावून अभ्यासकरणें, आणि नेहमीं पहिल्यानंबरास नांव ठेवणें; हे विद्यार्थ्यांचे बहुमोल गुण चांगल्या गुरूंच्या लक्षांत आल्यावांचून सहसा राहत नाहींत. त्याचप्रमाणें नारायणरावजीचेही गुण त्यांचे अध्यापक डॉ० हार्कनेस यांच्या सहज लक्षांत आले व ते त्यांची हुशारी पाहून त्यांस मदतीदाखल दरमहा चार रुपये देऊं लागले. ही तैनात पुढें नारायणराव शाळेंत असेतोपर्यंत चालू होती अर्थात् त्यांनीं अभ्यासाच्या हयगयीमुळें अथवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या गैरवर्तनामुळें आपल्या विषयीं आपले अध्यापक व सहायक हार्कनेससाहेब यांस वाईट वाटेल असें आपल्या हातून मुळींच कांहीं घडूं दिलें नाहीं. ते सोळावर्षांचे होईतोंपर्यंत शाळेंत राहून इंग्रजी शिकले.

वडिलांच्या मागें कुटुंबपोषणाचा सर्व भार वडील बंधूवरच पडतो ही गोष्ट नारायणरावांना रुचली नाहीं म्हणून त्यांनी सन १८४८ सालच्या सुमारास शाळा सोडून दोन युरोपियन सरकारी कामगारांस मराठी शिकविण्याची नोकरी पत्करिली. या कामाबद्दल नारायणरावांस दरमहा १५ रुपये मिळूं लागले. त्याच संधीस 'बेल आणि कंपनी 'च्या आफिसांत एक जागा खालीं असल्याची खबर ऐकून त्या जागेसाठीं त्यांनी अर्ज पाठविला. बेल साहेबांनीं नारायणरावजींची हुशारी व वर्तन हीं कशीं आहेत हें समजून घेण्यासाठीं तो अर्ज आपल्या पत्रासोबत त्यांचे अध्यापक हार्कनेस साहेब यांजकडे पाठविला. साहेब बहादुरांनींही या संधीचा उपयोग करून नारायणरावांची चांगली शिफारस केली. त्यायोगानें बेल कंपनीत त्यांना १५ रुपये दरमहाची नोकरी मिळाली. याप्रमाणें दोन साधनांनीं नारायणरावांना दरमाहा ३० रुपये मिळूं लागले. असो. नारायणरावांचा विवाह त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी ( सन १८४९ सालांत मुंबईतील एक श्रीमानगृहस्थ विनोबा संजगिरे, ( त्यांस लोक मांडवीकर ह्या नांवानें ओळखीत. ) यांच्या नातीशीं झाला. ह्यावेळीं तरी नारायणरावांजवळ स्वत:च्या हुशारीशिवाय दुसरें साधन कांहींही नव्हतें; पण मांडवीकर यांणी तें सर्व जाणूनच केवळ नारायणरावांच्या गुणांस लुब्ध होऊन तो संबंध जुळविला होता. असो. याच सुमारास नारायणरावांना घोड्याचा विलक्षण नाद लागला. घोड्याचीं सर्वांगलक्षणें पाहून त्याची परीक्षा करण्यास ते शिकूं लागले, आणि त्यासाठीं त्यांची जरी प्राप्ति लहान होती तरी त्यांनी मुद्दाम एक लहानसें तट्टू बाळगलें. याप्रमाणें थोड्याच दिवसांत अश्व परीक्षेची त्यांना चांगली खुबी साध्य झाली.

नारायणराव हे पुढें दहाहजार रुपये दरमहा मिळविणाऱ्या इलाखाधिपतीच्या मंत्रिमंडळांत जागा मिळवितील असें कोणालाही वाटलें नव्हतें. दिवसेंदिवस त्यांची सत्कार्यी महत्वाकांक्षा शुक्लेंदूप्रमाणें वाढूं लागली. त्यांना थोड्या रुपड्यांवर चाकरी करणें आवडेनासें झालें म्हणून त्यांनीं सन १८५२ सालच्या आरंभास 'पी आणि ओ ' कंपनीत मोठ्या पगाराची नोकरी पत्करिली. तेथें कॅपटन् ब्लॅक नांवाचे एक साहेब होते, त्यांची नारायणरावांवर मर्जी बसली. नारायणरावांची हुशारी, मेहनतीस्वभाव, नियमितपणा, प्रामाणिकपणा आणि विश्वासूपणा इत्यादि गुण पाहून साहेब बहादुरांनीं नारायणरावांना बढती देण्याची एकही संधी व्यर्थ दवडली नाहीं. आपलें काम भला कीं आपण भला; दुसऱ्याच्या कसल्याच भानगडींत मन घालावयाचें

नाहीं. हा नारायणरावांचा लहानपणापासूनचा स्वभाव होता. हाच त्यांच्या बढतीस अंशत: कारणीभूत झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

चाकरी करून पुष्कळसा पैसा मिळत नाहीं असें पाहून नारायणरावांनीं चाकरी सोडून व्यापार करण्याचें मनांत आणिलें, आणि त्याप्रमाणें पी आणि ओ कंपनीच्या आफिसांत ज्या मानानें त्यांची प्राप्ति वाढत गेली त्या मानानें घोडे बाळगून चांगले तयार करण्याविषयींचा त्यांचा शोकही वाढला व ऑफीस आणि अभ्यासाचा वेळ खेरीज करून बाकी राहिलेला सारा वेळ ते उत्तमोत्तम घोडे तयार करण्यांत घालवूं लागले. त्यांनीं कितीही रोड घोडा घेतलेला असला तरी वर्ष सहा महिन्यांत त्याला हजार बाराशे रुपये किंमतीपर्यंतचें जनावर करून विकावें ! पुढें पुढें तर यांच्याकडचे घोडे अति उत्तम असतात अशी जिकडे तिकडे ख्याति होऊं लागली; त्यामुळें यांच्याकडे गिऱ्हाईकही बरेंच येऊं लागलें. त्यांचें व्यापारांत असें कांहीं धोरण असे कीं, आपण दिलेली मूळ किंमत, खर्च आणि वर थोडासा नफा, इतकें आलें म्हणजे तो माल मोठ्या नफ्याच्या आशेनें ठेवावयाचाच नाहीं. अशा धोरणानें त्यांनीं सात आठ वर्षांत बरीच संपत्ति मिळविली. सन १८५९ सालांत साठ हजार रुपये खर्चून त्यांनी मुंबईस लोहारचाळींत फार मोठें मजबूत असें घर बांधिलें आणि तेव्हांपासून ते मुंबईचे घरंदाज होऊन राहिले.

पुढे कांहीं दिवसांनीं त्यांच्या गृहस्थितींत थोडासा फेरफार झाला, त्यांची प्रियपत्नी निवर्तली, आणि तसेंच पुढल्या वर्षी त्यांचें दुसरें लग्न झालें. सन १८६१ सालांत त्यांस पी आणि ओ कंपनीकडून दुसरें एक काम मिळालें; तें काम म्हणजे त्या कंपनीस लागेल तें सामान बाजारभावानें पुरवावें हें होय. पण हें नवीन काम मिळाल्यापासून त्यांच्या संपत्तींत बरीच भर पडली. त्यापासून त्यांची मानमान्यता आणि योग्यता वाढण्यास पुष्कळच साह्य झालें. व्यापाराच्या निमित्तानें त्यांचा व मोठमोठ्या युरोपियन व्यापारी लोकांचा संबंध येऊं लागला व त्यांच्याशीं यांचा स्नेह जुळूं लागला. अर्थात् नारायणराव हे नुसते कारकुनच नसून ते मोठे व्यापारीही आहेत अशी सर्व लोकांची समजूत होऊं लागली. त्यांनीं जो प्रथम मोठा व्यवहार केला तो मुंबईच्या शेजारील चिंचपुकळीच्या डोंगरासंबंधाचा होय. तो डोंगर त्यांनीं १० हजारांस खरेदी घेऊन ब्यॅकबेचें खूळ निघतांच तो फिरून विकला व त्याबद्दल एक लक्ष वीस हजार रुपये मिळविले! पुढेंही याच रीतीनें त्यांना व्यापारांत यश येत गेलें. एक दोन प्रसंगीं तोटाही आला; पण एकसारखा नफा होत असला म्हणजे एकाद्या वेळीं झालेल्या तोट्याची मातब्बरी राहत नाहीं.

पी. अँड ओ. कंपनींत प्रथम जे हे लहानशा हुद्यावर नोकर होते तेच पुढें त्या कंपनीचे वाकनीस ( दुभाषी ) झाले. ही कंपनी हल्लींच्याप्रमाणेंच पूर्वींही भरभराटींत होती. अशा व्यापारी कंपनीचा वाकनीस होण्यास धूर्त व शहाणा पुरुष लागतो. तशाप्रकारचे नारायणराव हे होते म्हणूनच त्यांची त्या जागीं नेमणूक झाली. इतक्या मोठ्या योग्यतेस चढल्याबरोबर नारायणरावाचा जेथें तेथें प्रकाश पडूं लागला. चार लोकांत नारायणरावास मान मिळूं लागला. स्वत:च्या पराक्रमानें हा लहानाचा मोठा झाला असें लोकांस समजल्यावर त्यांनीं त्यांस म्युनसीपालटी व टाउनकौन्सीलचे सभासद निवडलें. कांहीं दिवसांनीं व्यापारांत ह्यांची हुशारी दिसल्यावरून त्यांना पोर्टट्रस्टी नेमण्यांत आलें. येणेंप्रमाणें लोकांनीं ह्यांचा गौरव केल्यावर सरकाराला देखील तोच मार्ग स्वीकारावा असें वाटूं लागलें. सन १८६४ मध्यें सर बार्टल फ्रियर या नांवच्या गव्हरनर साहेबांनीं ह्यांस ' जस्टीस ऑफ् धी पीस् ' ही बहुमानाची पदवी दिली व मुंबईतील विश्वविद्यालयांचे फेलो नेमिलें. वास्तवीक नियम असा आहे कीं, जो मनुष्य राजाचा पक्ष धरतो तो लोकप्रीय होत नाहीं व जो लोकांचा पक्ष धरतो त्याला दरबारीं मान नाहीं पण नारायणराव हे वरील नियमाला अपवाद होते. प्रजेसाठीं सरकाराबरोबर ते अशारीतीनें भांडत कीं, सरकाराला वाटावें " हे आमच्याच हितासाठीं भांडत आहेत " व खरोखर तसाच प्रकार होता. रयत व राजा ह्यांच्यामध्यें बेबनाव नसावा असें त्यांना वाटत असे व दोहोंमध्यें सलोखा ठेवण्याकरितां ते नेहमीं झटत असत. अशी शैली थोड्यांनांच साधते तर मग नारायणरावांसारखे राजा व प्रजा ह्यांच्यामध्यें सलोखा ठेवण्यास झटणारे वकील कितीतरी आदरणीय आहेत ! देशांत असे पुरुष निपजतील तेवढे थोडे ! असो.

नारायणरावांची विद्वत्ता व भाषासौष्ठव हे गुण ह्या वेळपर्यंत लोकांस माहित नव्हते. ते आतां म्युनिसीपालटीच्या सभांतून झळकूं लागले. केवळ साहेबबहादुरांनीं हात वर उचलला ह्मणजे आपण वर हात उचलावयाचा इतकेंच जाणणारे सभासद नव्हते. ज्याप्रमाणें हिंदुस्थानचे सत्पुत्र दादाभाई नौरोजी, किंवा कै० नौरोजी फर्दुनजी हे रयतेसाठीं निरपेक्षबुद्धीनें भांडत असत. तसेच हे देखील रयतेसाठीं भांडत असत. म्युनसीपालटींत हे एकदां भाषण करावयास उभे राहिले म्हणजे त्यांचें भाषण ऐकण्यास सभासद चित्रासारखे तटस्थ बसत. इतकी त्यांची इंग्रजी भाषासरणी मनोहर होती.

मुनसीपालटी व मुंबईतील घरवाले लोक ह्यांच्यांत जेव्हां जेव्हां कांहीं तंटा उत्पन्न होई तेव्हां तेव्हां त्यांचा हे तोड करीत असत. ह्याकामीं जर एखादा पगारी मनुष्य नेमला गेला असता तर मुनसीपालटीला बराच खर्च येता. पण तसलें जबाबदारीचें काम नारायणराव कांहीं एक मोबदला न घेतां मोठ्या खुषीनें करीत असत. सामान्यतः द्रव्यलोभ हा मोठा कठीण आहे. पण नारायणराव त्याला वश झाले नाहींत. ही एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. असो. याप्रकारें उत्तरोत्तर नारायणरावांचें वजन वाढत चाललें. नारायणराव हे कोणत्याहि कामांत सल्ला घेण्याच्या लायकीचे आहेत ही गोष्ट सरकारच्या लक्षांत येतांच त्यांनीं त्यांस सन १८७२ च्या सुमारास ( सर फिलिप् वोडहॉउस ह्यांच्या अमदानींत ) लेजिस्लेटीव्ह कौन्सीलचे सभासद नेमिलें. हिंदुस्थानच्या ह्या बाजूस इतक्या थोड्या अवधींत ह्मणजे दहा वर्षांत ज्यास लक्ष्मी व कीर्ति या दोन्ही देवता प्रसन्न झाल्या असे हेच पहिले गृहस्थ होत ! त्या दहा वर्षांच्या अवधींत नारायणराव हे तीस चाळीस लक्षांचे धनी झाले; एवढेंच नव्हे तर कायदे करणाऱ्या मंडळीचे नामदार, सभासद देखील झाले. त्यावेळीं ह्यांचें वय फक्त अडतीस वर्षांचें होतें. याप्रमाणें आपल्यांतील एका पुढारी गृहस्थाचा सरकारानें असा बहुमान केलेला पाहून मुंबईत ज्याला त्याला आनंद वाटला. तो चांगल्यारीतीनें व्यक्त करण्याकरितां नारायणरावांच्या कांहीं मित्रांनीं त्यांस एक इंग्रजींत मानपत्र दिलें. त्याचें भाषांतर खालीं दिलें आहे. ह्यावर त्यावेळच्या मोठमोठ्या इंग्रज, हिंदु, पार्सी, मुसलमान इत्यादि सर्व जातींतील व धर्मांतील वजनदार लोकांच्या सह्या आहेत.

"ऑनरेबल् नारायणराव वासुदेवजी जे. पी. नामदार गव्हरनरसाहेबांच्या कायदेकानू करणाऱ्या मंडळाचे जादे सभासद यांस—

महाराज ! आपली मुंबईच्या कायदे करणाऱ्या मंडळांत एक जादे सभासद म्हणून नेमणूक झाल्यामुळें आम्हांस आपलें मनःपूर्वक अभिनंदन करण्याची संधि मिळाली आहे व तिचें आपलेठायीं असलेलें प्रेम व पूज्यबुद्धि प्रदर्शीत करण्याचे कामीं आज आम्हीं मोठ्या उत्साहानें उपयोग करीत आहों.

कायदेमंडळांत प्रस्तुत ही आपली नेमणूक करून नामदार सर फिलिप वोडहौस ( व त्यांचे सन्माननीय साथीदार ) ह्यांनीं आपल्या ( तुमच्या ) अंगीं वसत असलेल्या बुद्धिमत्ता व जनहिताची कळकळ ह्या बावनकशी गुणांचेंच गौरव केलें आहे यांत शंका नाहीं. प्रामाणिकपणा, दीर्घप्रयत्न व कर्तव्याविषयीं जागृती या बहुमोल

गुणांनीं मनुष्य कसा वर येतो व कालेंकरून तो कसा योग्यतेस चढतो ह्याचें आपलें एक जगापुढें उदाहरण आहे. सबब सार्वजनिक कृत्यांत व अन्यत्र आपल्याविषयीं लोकांस जो आदर वाटतो त्यास आपण निःसंशय पात्र आहां. आपल्या सलोख्याच्या वर्तनामुळें ज्यांचा ज्यांचा आपल्याशीं संबंध जडतो–मग ते कोणत्याही वर्गातले असोत–त्यांचें त्यांचें आपणांवर प्रेम बसतें हें योग्यच आहे.

आपणांस हा जो न मागतां अपूर्व मान मिळाला आहे त्यायोगें आपल्या खऱ्या गुणांची पारख होऊन तो आपण मुंबई शहरांत एकनिष्ठपणें सार्वजनिक काम केल्याबद्दलचा एक अल्पसा मोबदला आहे असें आम्हीं समजतों व हा मान आपणांस अगदीं लहानशा वयांत मिळत आहे याबद्दल आपलें शिष्टाचाराप्रमाणें व जाहिररीतीनें अभिनंदन करण्यास आह्मांस अभिमान वाटतो. ह्याहीपेक्षां उच्चतर पदास आपण चढावें व आपल्या देशबांधवांची याहीपेक्षां उत्तम सेवा करण्याकरितां आपणांस परमेश्वरानें दीर्घायुष्य द्यावें इतकी प्रार्थना आहे." (आपले मित्र व हितेच्छु.)

कायदेकौन्सिलमधील नारायणरावांचें काम सरकारानें व लोकांनीं अटकळ बांधल्याप्रमाणेंच होऊं लागलें. तेथील आपल्या कामाची जबाबदारी ते नेहमीं ओळखून असत व त्याप्रमाणें ते पूर्वतयारीला योग्य तितकी मेहनत व वेळ खर्चीत असत. त्यावेळीं कौन्सिलमधील इतर एतद्देशीय सभासद हल्लींच्या प्रमाणेंच बहुतेक आपलीं भाषणें लिहून आणून वाचीत असत. पण ना० नारायणरावांनींमात्र त्या पद्धतीचा कधीं आश्रय केला नाहीं. त्यांचें इंग्रेजी शिक्षण जरी कालेजांत अगर विश्वविद्यालयांत फारसें झालेलें नव्हतें तरी त्यांनीं इंग्रेजी वाचनाचा व्यासंग कायम ठेविला होता. विलायतेंतील प्रसिद्ध मुत्सद्दी व वक्ते ग्लॅडस्टन व ब्राइट यांचीं भाषणें त्यांस फार आवडत असत व ते तीं लक्ष लावून वाचीत. यामुळें इंग्रेजी भाषेची उत्तम नमुनेदार मोडणी नारायरावांना सहज साधलेली होती व ते तिचा मुनिसिपालिटींत व इतरत्र भाषणें करतांना मनमुराद उपयोग करीत. पुढें त्यांची जेव्हां कायदेकौन्सिलांत नेमणूक झाली. तेव्हां अर्थातच त्यांचें कार्यक्षेत्र पुष्कळ विस्तृत झालें व त्यांच्या भाषाशैलीचें तेज जास्त प्रमाणावर चमकण्यास साहजिकच अवकाश मिळाला. त्यांच्या इंग्रेजी भाषासौष्टवासंबंधानें एकच गोष्ट सांगितल्यास पुरे होईल असें वाटतें. त्यावेळीं मुंबईस "बॉम्बे गॅझेट" या इंग्रेजी दैनिक वर्तमानपत्राचें बरेंच वजन होतें. त्याचें संपादकत्व मि. मॅक्लीन या विद्वान् गृहस्थांकडे होतें. हे गृहस्थ पुढें विलायतेस पार्लमेंटचे सभासद झाले होते. व मग ते कांहीं वर्षांनीं

वाटलें. असो. पण ना० नारायणराव हे कायदे कौन्सिलचे सभासद होते त्या सुमारास सदर्हू मि. मॅक्लीन हे "बांम्बे गॅझेटचे संपादक होते. हे मोठे खंदे लेखक होते असा त्यांचा लौकिक होता व त्यांचें सरकारांत व लोकांत त्यावेळीं पुष्कळ वजन होतें. त्यांना साहजिकच आपल्या मायभाषेचा (इंग्रेजीचा) मोठा अभिमान वाटत असे व एतद्देशीय लोकांनीं ती भाषा वापरतांना चुका केल्यास ते त्यांची थट्टा करीत. विशेषतः पुण्याच्या लोकांच्या इंग्रेजीभाषेची ते नेहमीं चेष्टा करीत असत व यासंबंधानें त्यांना वाटत असलेला तिरस्कार ते आपल्या वर्तमानपत्राच्याद्वारें प्रकट करण्यास देखील कमी करीत नसत. अशा विद्वान् पण दुराग्रही गृहस्थानेंही ना. नारायणराव दाभोळकरांचीं कौन्सिलमधील भाषणें वाचून क्षणभर आपला सगळा अभिमान बाजूस ठेवावा व त्या भाषणांची योग्य शब्दांनीं तारीफ करण्यास प्रवृत्त व्हावें यापेक्षां नारायणरावांच्या भाषासरणीच्या उत्तमत्वासंबंधानें दुसरी कोणती साक्ष देतां येणें शक्य आहे? असे (तारीफ करण्याचे) प्रसंग मि. मॅक्लीन हे गॅझेटचे संपादक असल्या वेळांत अनेक वार आलेले आहेत. असो. पण याप्रमाणें नारायणरावांनीं आपल्या भाषणांनीं युरोपियन लोकांस संतुष्ट केलेलें होतें म्हणून त्या भाषणांत निर्भीडपणा नसे अगर सरकारी अधिकाऱ्यांच्या कलाप्रमाणें वागून रयतेच्या हितासंबंधानें अनास्था व्यक्त होई असें मुळींच कधीं झालें नाहीं. पुढें आलेल्या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करून आपल्यास रास्त दिसेल तेंच बोलावयाचें असा ह्यांचा पक्का निर्धार असे. यामुळें त्यांचें धोरण कधीं सरकारच्या बाजूस तर कधीं रयतेच्या बाजूस, पण नेहमीं (त्यांच्या समजुतीप्रमाणें) सत्यपक्षास अनुकूल असें असे. या धोरणांत त्यांनीं कधीं अंतर पडूं दिलें नाहीं व त्याचा व्हावयाचा तोच पुढें परिणाम झाला. त्यांचें सरकारांत वजन पडूं लागलें व लोकांतही त्यांची मानमान्यता वाढूं लागली. असें भाग्य फार थोड्या लोकनायकांच्या वांट्यास येत असतें. असो. नारायणराव कौन्सिलचे सभासद होते त्या मुदतींत मिठावरील कर वाढविण्यासंबंधाचा विचार सरकारांत घाटत होता. पण नारायणरावांनीं त्या गोष्टीविरुद्ध स्पष्टरीतीनें आपलें मत दिलें. इतकेंच नाहीं तर सरकारचा तो बेत रद्द व्हावा एतदर्थ त्यांनीं आपल्याकडून पराकाष्ठा केली व अखेर त्यांत त्यांना यश आलें. या एकाच गोष्टीवरून त्यांचे विचार कोणत्या प्रकारचे होते हें उघड होतें. तरी अशा वर्तनापासून सरकारांतील त्यांच्या वजनास मुळींच बाध आला नाहीं. उलट नारायणरावांच्या कर्तृत्वशक्तीबद्दल व निर्दोष हेतूंबद्दल

त्यावेळच्या गव्हरनरसाहेब आदिकरून सरकारी अधिकाऱ्यांची खात्री झाली व त्याप्रमाणें त्यांनीं, मुदत संपली होती तरी, नारायणरावांची पुनश्च कौन्सिलमध्यें नेमणूक केली. असो.

याप्रमाणें नारायणरावांचें पाऊल एकसारखें पुढेंच पडत चाललें; पण त्यांना एवढा मोठेपणा कोणत्या कारणांनीं प्राप्त झाला याचा नीट विचार केला म्हणजे मात्र कोणालाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. कोणत्याही मोठ्या मनुष्याच्या लौकिकवर्तनाचें प्रतिबिंब त्याच्या खासगी आचरणांत प्रायः पडत असतें किंवा थोर माणसांच्या थोरपणाचें बीज त्यांच्या खासगी वर्तनांत पाहण्यास मिळतें असें जें म्हणतात तें अगदीं अक्षरशः खरें आहे. एरव्हीं नारायणराव दाभोळकरांच्या चाळीस वर्षांच्या जीवितक्रमाचा नीट उलगडा कसा होणार? पण त्या कारणांची अगर गुणांची मीमांसा पुढें योग्यस्थळीं करूं.

नारायणराव दाभोळकर हे दुसऱ्यांदा नामदार झाले. त्याच्या पूर्वींपासूनच ते मुंबईतील मलबारहिलवर ( वाळुकेश्वरीं ) राहूं लागले होते. त्या भागांत मुंबईतील बहुतेक सर्व बडे सरकारी ऑफिसर व अन्य श्रीमान् सुखवस्तुलोक राहत असतात हें सर्वविश्रुत आहे. त्याच भागांत नारायणरावांनीं एक भव्य व सुंदर बंगला घेतलेला होता व त्यांतच ते आपल्या कुटुंबांतील सुमारें शें दीडशें मंडळीसह राहत असत. पण तोच बंगला पुढें आपल्या अत्यंत थोर अशा मालकाच्या मृत्युस कारणीभूत झाला ही गोष्ट लक्षांत आणली म्हणजे मनास उद्विग्नता येते. सन १८७४ सालीं पावसाळ्याचे दिवस जवळ आल्यामुळें आपल्या बंगल्याच्या पुढील भागांतील भिंतीस कांहीं भेगा पडल्याचें नारायणरावांचे नजरेस येतांच साहजिकच सर्व बंगल्याची चांगली दुरुस्ती करून टाकावी असें त्यांच्या मनांत आलें. त्यांनीं लागलींच आपल्या दत्तुबालजी या नांवाच्या विश्वासू मेस्त्र्यास ( शिल्पशास्त्रज्ञास ) बोलावूं पाठविलें व तो येतांच त्याला त्या भेगा दाखविण्यासाठीं नारायणराव हे त्याच्या बरोबर बंगल्याच्या पुढील भागांत गेले. त्यावेळीं त्यांच्या बरोबर ( मेस्त्र्याशिवाय ) त्यांचे वडील बंधू रा. साजबा दाभोळकर, रा. गोविंदजी बाळकृष्ण नांवाचे त्यांचे एक मित्र, एक वाणी जातीचे दलाल व एक संन्याशी अशी मंडळी होती. नारायणराव भिंतीस भेगा पडलेली जागा मेस्त्र्यास दाखवित होते; पण त्या भागाला कांहीं धका नाहीं असें मेस्त्र्यांनीं सांगितलें व दिवाणखाना खालीं येण्याची भीति राहूं नये म्हणून त्याला फार तर खालून लांकडांचा टेंका देऊं असें ते म्हणाले. मेस्त्री असें बोलत

आहेत तोंच वरून कांहीं चुन्याचीं ढेंपळें खालीं पडूं लागलीं व असें होतांच सर्व मंडळींनीं एकदम तेथून बाहेर पडण्याचा विचार केला. पण त्या विचाराची अंमलबजावणी होण्यापूर्वीच एकदम एक मोठा आवाज झाला आणि त्या विश्वासघातकी बंगल्यानें आपल्या मालकास आपल्या उराखालीं दडपून टाकिलें! हर हर!! कोण तो प्रसंग!!! बिचारा मेस्त्री देखील त्या आपल्या उदार आश्रयदात्याबरोबरच पडला! इतर मंडळी मात्र कशीबशी थोडयोडी इजा होऊन जिवंत बाहेर पडली. असो; याप्रमाणें बंगल्याच्या पुढील भागानें घात केल्यावर कुटुंबांतील इतर माणसें मागील भागांत होतीं त्यांना एकदम धरणीकंपाचा धक्का बसल्यासारखें होऊन त्यांची धांवाधांव सुरू झाली; व तीं सर्व माणसें पुढें येऊन "नारायणशेट सुखरूप आहेत ना" असें घाबऱ्या घाबऱ्या विचारूं लागलीं! पण तशी विचारपूस करण्यापलीकडे त्यावेळीं त्यांच्याकडून दुसरें काय होणें शक्य होतें? कारण वरील सर्व घातकी गोष्टी एकमेकांमागून इतक्या जलदीनें घडल्या कीं, त्या येथें लिहून दाखविण्यास जितका वेळ लागला असेल त्याच्या एक दशांशापेक्षांहि कमीवेळ त्या सर्व घडण्यास लागला असेल! अशा स्थितींत प्रत्यक्ष आकाशच कोसळल्यासारखें होऊन त्या अभागी कुटुंबांतील बिचारीं सर्व माणसें केवळ भयभीत होऊन जावींत आणि त्या कुटुंबवृक्षाच्या बुंध्याच्या—अर्थात् आधारभूत पुरुषाच्या—सुरक्षितपणाविषयीं त्यांनीं चिंताग्रस्त मुद्रेनें प्रथम चौकशी करावी यांत आश्चर्य कसलें? असो.

नंतर या भयंकर अपघाताची बातमी लागलीच मलबारहिलवर व सर्व मुंबईशहरभर हां हां म्हणतां पसरली व नारायणरावांचे शेंकडों मित्र व परिचित गृहस्थ भयचकित होऊन खरा प्रकार काय आहे हें पाहण्याकरितां वालकेश्वरीं एका अर्ध्या तासाच्या आंत येऊन दाखल झाले! हजर असलेल्या मंडळींत मि. जस्टिस मॅरियट, सरफ्रँक सूटर, डॉ. मॅकेन्झी यांजसारखे बडे युरोपियन गृहस्थ व इंदूरचे दिवाण रावबहादुर खंडेराव चिमणराव बेदरकरांसारखे एतद्देशीय वजनदार गृहस्थ होते इतकें सांगितलें म्हणजे नारायणरावांचें वजन मुंबईत व इतरत्र किती होतें याची सहज अटकळ करतां येते. तसेंच ते सर्व जमलेले सद्गृहस्थ आपला मोठेपणा क्षणभर बाजूस ठेऊन, नारायणरावांचा शोध करण्याच्या कामीं जातीनें तासाचे तास खपून शक्य ती मदत करीत होते ही गोष्ट लक्षांत आणली म्हणजे नारायणरावांबद्दल त्यांच्या ठायीं वसत असलेल्या प्रेमाबद्दल आज——इतकीं वर्षे त्या गोष्टीस झालीं तरीसुद्धां——कोणास आदर व कौतुक वाटणार नाहीं? परंतु ज्या

ठिकाणीं मुळीं आकाशच फाटलें होतें त्या ठिकाणीं मानवी यत्नाचा टिकाव कितीवेळ लागणार? आणि टिकाव लागला तरी, त्या यत्नांला यश कितीसें येणार? मंडळींनीं पुष्कळ श्रम केल्यानंतर नारायणरावांच्या अचेतन पांचभौतिक देहाचा एकदांचा पत्ता लागला. मग काय विचारतां? नारायण रावांच्या घरांत एकच आकांत झाला! त्याचें वर्णन करणें केवळ अशक्य आहे. नारायणरावांच्या प्रेतदर्शनार्थ नंतर कांहीं वेळपर्यंत लोकांच्या झुंडीच्याझुंडी येऊं लागल्या होत्या. ज्युरी वगैरे सर्व विधि उरकले. व संध्याकाळच्या सुमारास नारायणरावांचें प्रेत वाळुकेश्वरच्या स्मशानभूमींत नेण्यांत आलें. स्मशानयात्रेबरोबर हिंदु, मुसलमान, पार्शी, युरोपीयन वगैरे सर्व जातीचे व धर्मांचे हजारों लोक गेले होते. असो.

याप्रमाणें सन १८७४ आगष्टच्या पांच तारखेस त्या थोर पुरुषाचें देहावसान झालें. लागलींच दुसऱ्या दिवशीं मुंबईंतील शेअरबझार, मांडवी येथील दाण्यांचीं कोठारें, म्युनिसिपल कचेरी वगैरे बंद ठेवण्यांत आलीं. तसेंच सर्व प्रमुख वर्तमानपत्रांतून–इंग्लिश व देशी–नारायणराव दाभोळकरांच्या गुणांचें यथायोग्य वर्णन दिलें जाऊन अग्रलेख प्रसिद्ध झाले. त्याचप्रमाणें ज्या ज्या सार्वजनिक संस्थांशीं नारायणरावांचा संबंध असे त्या त्या संस्थांच्या मुद्दाम सभा भरविल्या जाऊन रीतीप्रमाणें दुखवट्याचे ठराव पास करण्यांत आले व त्या ठरावांच्या प्रति दाभोळकरांच्या कुटुंबांतील माणसांकडे रवाना करण्यांत आल्या. ते सर्व (वर्तमानपत्रांतील) अग्रलेख अगर (सार्वजनिक संस्थांचे) ठराव इकडे भाषांतररूपानें देऊन जागा अडविण्यांत अर्थ नाहीं; पण फक्त मि. मॅक्लीनसाहेबांच्या (जे इतर नेटिव्हांची चेष्टा करीत पण ज्यांनीं नारायणरावांच्या गुणासंबंधानें माल अनेकदां निरभिमानतया आपला आदर व्यक्त केलेला होता त्या साहेबांच्या) "बाँबे गॅझेट" मधील अग्रलेखाचें व मुंबईसरकारनें मुद्दाम काढलेल्या ठरावाचें व मुंबई म्युनिसिपालिटीनें पास केलेल्या ठरावाचें सार दिलें म्हणजे इतर सर्व लेखांचें व ठरावांचें स्वरूप वाचकांच्या सहज लक्षांत येईल असें वाटतें. "बॉम्बे गॅझेट" ता० ६ आगष्ट सन १८७४:—

"सन १८७४ साल हें मुंबईंतील बऱ्याच नामांकित लोकांस प्राण घातक असें जात आहे; पण कालरोजीं मुंबईंत सर्वानुमतें प्रमुख ठरलेले नामदार नारायण वासुदेव दाभोळकर यांची प्राणाहुति घेऊन त्या सालानें स्वतःवर देखील ताण केली असें म्हणावें लागत आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील सर्व प्रमुख शहरांपैकीं या मुंबई-

शहरांतच युरोपियन व नेटिव्ह लोक यांजमध्यें सार्वजनिक कामासंबंधीं सलोखा दृष्टीस पडतो; पण तशाप्रकारचा सलोखा आजवर कायम राखण्यास ज्या पुढारी मनुष्यांच्या अंगचे गुण कारणीभूत झाले पण ज्यांस-ते वैभवशिखरावर असतां-अकालीं निर्घृण काळानें ओढून नेलें त्यांत ना. नारायण वासुदेव हे अग्रगण्य होत.

* * * *

जुन्या चालीचे हिंदुलोक जे ह्यापूर्वी ना० जगन्नाथ शंकरशेट ह्यांच्या घराण्यास प्रमुख मानीत ते आतां ना० नारायण वासुदेव यांस तो पुढारीपणाचा मान देऊं लागले होते. त्याचप्रमाणें ज्या गृहस्थांची-तो नेटिव्ह असूनही-इंग्रजी भाषाशैली पाहून कित्येक युरोपियन लोकांसही मान खालीं घालावी लागत असे व ज्यांला त्यांचा निष्कपट स्वभाव, मनाचा थोरपणा या गुणांमुळें, बडे युरोपियन अधिकारी आपलासा मानीत असत असा वजनदार व पुढारी गृहस्थ हल्लीं हा एकच होता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

* * * *

" नारायणरावांच्या भाषासरणींत ग्लॅडस्टनच्यापेक्षां डिझरायलीच्या भाषापद्धतीची जास्त झांक मारीत असे. आपल्या कामांची पूर्ण माहिती करून घेऊन तें पार पाडण्यास जरूर लागणारी उत्सुकता, वाक्चातुर्य व दीर्घोद्योग हे गुण त्यांच्यांत मूर्तिमंत वसत होते व त्या गुणसमुच्चयाच्या योगानें त्यांनीं लेजिस्लेटिव्ह कॉन्सिल व मुंबईची मुनिसिपल कॉर्पोरेशन या संस्थांमधून बरेंच वर्चस्व संपादन केलें होतें. त्या वर्चस्वाच्या जोरावर त्यांच्या हातून स्वतःस सत्कीर्तीची जोड व आपल्या देशास कांहीं तरी कायमची कल्याणकारक गोष्ट यांचा खरोखर लाभ होईल अशी आशा वाटूं लागली होती; पण दुष्ट काळानें ती निष्फळ केली. " इ. इ.

पुण्याहून त्याच दिवशीं ना. गव्हर्नरसाहेबांची तार आली तिचा सारांश:—

" ना. नारायण वासुदेव, मुंबई कायदेकौन्सिलचे जादे सभासद, यांच्या अकालीं मृत्यूचें शोचनीय वर्तमान ऐकून ना. गव्हरनरसाहेबांस फार फार दुःख वाटत आहे. या पुरुषाच्या मरणानें संबंध मुंबई इलाख्यांतील लोकांची हानि झाली आहे असें सरकारास वाटत असून तत्संबंधानें दुखवट्याचा ठराव सरकारी दप्तरांत नमूद न झाल्यास सरकारावर कर्तव्यपराङ्मुखतेचा आरोप येईल. "

" ना० दाभोळकर यांचा ह्या इलाख्यांतील राज्यकारभाराशीं संबंध जरी फार थोडेच दिवस होता तरी त्या अल्प अवधींत देखील त्यांनीं आपल्या मधील सार्व-

जनिक कामांची चर्चा करण्याविषयीं तत्परता व निस्पृहता, या गुणासंबंधानें कौन्सिलमधील आपल्या साथीदारांची पूर्ण खात्री करून सोडली होती. याहीपेक्षां कायदे कौन्सिलांतील कामास जास्तवेळ खर्चून मदत करण्याचें त्यांनीं आपल्या मरणाच्या थोडे दिवसांपूर्वी आश्वासन दिलें होतें. तर अशा होतकरू व उमेदी सभासदाचा एकाएकीं अंत झाला या गोष्टीबद्दल फिरून एकवार दुःख प्रदर्शित केल्याशिवाय सरकाराच्यानें राहवत नाहीं " ना० नारायणराव दाभोळकरांच्या अकालीं मृत्यूचें वर्तमान ऐकून आपल्यास अत्यंत दुःख वाटत आहे असा त्यांच्या पत्नीस सहानुभूतीचा निरोप जरूर कळवावा " म्हणून कलकत्याहून गव्हर्नर जनरल साहेब यांनीं मुंबईच्या गव्हर्नर साहेबांस पत्र लिहिलें होतें. तो मजकूर त्यांनीं मग मि० लीवॉर्नर यांच्याकरवीं नारायणरावांच्या पत्नीस कळविला.

मुनिसिपल कॉर्पोरेशनमध्यें ( मुंबई ) ना० नारायणरावांविषयीं शेट दोसाभाई फ्रामजी, माजी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट हे आपलें भाषण करतांना म्हणाले:—

आनेरेबल नारायण वासुदेव या " कार्पोरेशन मधील प्रमुख सभासदाच्या अकालीं मरणानें मुनिसिपालिटीला अत्यंत दुःख झालें आहे. या पुरुषानें कॉर्पोरेशनमध्यें सतत दहा वर्षे झटून काम केलेलें असून त्या अवधींत त्यांनीं जनहिताविषयीं दाखविलेली कळकळ केवळ अश्रुतपूर्व होती. त्यांच्या मरणानें आपल्या मुंबई शहरांतून एक थोरमनाचा, स्वतंत्र विचारांचा व निरपेक्ष बुद्धीचा पुरुष नाहींसा झाला असेंच म्हटलें पाहिजे. या शहरांतील पुष्कळ सार्वजनिक संस्थांशीं त्यांचा संबंध असे. तितक्याही संस्थांमधून त्यांच्यासंबंधानें हळहळ वाटेलच; परंतु नारायणरावांच्या मृत्यूपासून होणाऱ्या दुःखाची जाणीव या मुनिसिपल हॉलमध्यें जितकी भासेल तितकी इतरत्र भासणें शक्य नाहीं.

" सन १८६४ त ते " जस्टिस् आफ थि पीस " झाले. पुढें मुनिसिपालिटीचे सभासद झाले. तसेच कांहीं दिवसांनीं ते टॉऊन कौन्सिलचे ( हल्लींची स्टॅंडिंग-कमिटी ) सभासद झाले; पण कोठेंही झाले तरी त्यांनीं झटून व निरालसपणानें आणि निस्पृहतेनेंच काम केलें आहे; पण " फायनॅन्स " कमिटीचे सभासद या नात्यानें त्यांनीं केलेली कामगिरी व पोलीस खर्चाच्या वांटणीसंबंधानें दाखविलेली चिकाटी या गोष्टी केवळ अविस्मरणीय आहेत. इत्यादि, इत्यादि "

थोड्याच दिवसांनीं नंतर ना. नारायणरावांचें स्मारक करण्याकरितां मुंबईतील प्रमुख रहिवाशांची टाउनहॉलमध्यें सभा होऊन मोठमोठ्या युरोपियन व एतद्देशीय

अशा बऱ्या गृहस्थांचीं भाषणें झालीं. स्मारकाची रकम सुमारें चार पांच हजारांची जमून ती युनिव्हर्सिटीकडे नारायणरावांच्या नांवानें एक स्कालरशिप ( विद्यार्थी-वेतन ) अगर बक्षिस ठेवण्याकरितां म्हणून पाठवून देण्यांत आली त्याप्रमाणें नारायण वासुदेव यांच्या नांवचें एक बक्षिस ठेविलें गेलें असून तें बी. ए. परीक्षेंत शास्त्रीयविषयांत पहिला नंबर येईल अशा विद्यार्थ्यास मिळत असतें. असो;

नारायणराव दाभोळकरांचा जीवितक्रम एकंदरींत अनुकरणाई होता यांत शंका नाहीं. मरणसमयीं त्यांचें वय फक्त ४१ वर्षांचें होतें. परंतु मूळची गरीबी असून ४० वर्षांच्या उमरींत मनुष्यानें केवळ स्वपराक्रमानें ४० लक्ष रुपये मिळवावेत ही गोष्ट कांहीं सामान्य नाहीं. असें भाग्य, कोठेंही झालें तरी, थोड्यांच्याच वांट्यास येणार हें उघड आहे. इतकी संपत्ति इतक्या अल्पकाळांत, मूळ भांडवल फक्त बावनकशी सद्गुणांव्यतिरिक्त कांहींही नसतां, मिळविण्याचें सामर्थ्य सामान्य मनुष्याच्या अंगीं असणें ही गोष्ट परमेश्वरी कृपेशिवाय घडून येणें शक्य नाहीं असें निदान आमची मनोदेवता सांगत आहे. तशाप्रकारें नारायणरावांच्या मस्तकावर त्यांच्या कुलस्वामिनीचा वरदहस्त होता याबद्दल आम्हांस तरी शंका वाटत नाहीं. तथापि नारायणरावांच्या वैभवास कारणीभूत होणारे गुण त्यांच्या अंगीं कांहीं कमी होते असें मात्र कोणी समजूं नये. त्यांच्यांत कांहीं कांहीं गुण बावनकशी सोन्याच्या योग्यतेचे होते हें वर सांगितलेंच आहे. पण मूळ गरिबीच्या संबंधानें येणाऱ्या संकटपरंपरेच्या भट्टींतून ते गुण तावून सुलाखून निघाल्यामुळें त्यांची तेजस्विता विशेष खुललेली होती हाच नाराणरावांत विशेष होता. वस्तुतः आजकाल वाटेल तो मनुष्य, वाटेलत्या मार्गानें वाटेल तितका पैसा, कदाचित् मिळवूं शकेल. किंवा अति लोभास बळीपडून कांहीं धनिक लोक ( १८६०—७० ) साठी–सत्तरीच्या शेअररूपी खुळाच्या सारख्या ( Share mania ) दुसऱ्या एकाद्या खुळाच्या पायीं आपली सर्व संपत्ति घालवून निर्धनही होतील! पण तशाप्रकारच्या मोह उत्पन्न करणाऱ्या मुंबईच्या वातावरणांत राहूनही—व स्वतः ऐन भर तारुण्याच्या उमेदींत असूनही—नारायणराव तसल्या अतिलोभास बळी पडले नाहींत हा आमच्यामतें त्यांच्यामधील दुसरा विशेष होय.

नारायणराव हे शंकराचे एकनिष्ठ भक्त होते. श्रीशंकराच्या पूजनाचा व तदंगभूत सोमवार व्रताचा त्यांचा थाट अपूर्व होता. त्यांनीं आपल्या हातून कोणत्याही प्रकारचा अत्याचार घडूं दिला नाहीं कीं कोणतेंही व्यसन आपल्यास जडूं दिलें नाहीं. ते मोठे

उदारमनस्क होते. त्यांचा प्रामाणिकपणा चोख होता. बडेबडे युरोपियन लोक अनेकवेळां विलायतेस जातेवेळीं आपला ऐवज अगर मूल्यवान् वस्तु खुशाल नारायणरावांजवळ ठेऊन जात व परत येऊन आपल्या जिनसा ते डोळे मिटून घेऊन जात. नारायण रावांचें युनिव्हर्सिटींत फारसें शिक्षण झालें नव्हतें, तरी त्यांनीं आपला विद्याव्यासंग कायम ठेविला होता. ते मनाचे दिलदार असत; पण ते स्वतः घरीं मितव्ययी असत. ते उदार अंतःकरणाचे असल्यामुळें पुष्कळ गरीब विद्यार्थ्यांस व इतरांस त्यांचा आश्रय असे. सार्वजनिक कामांत ते किती लोकप्रिय होते याचा उल्लेख वर आलेलाच आहे. एवंगुणोपेत मनुष्याचा जीवितक्रम अत्यंत प्रशंसनीय व अनुकरणार्ह कसा झाल्याशिवाय राहील बरें ?

अशी उदात्तवृत्ति एकाद्या कुटुंबांतील मुख्य पुरुषाची असली म्हणजे तिचा परिणाम त्या कुटुंबांतील इतर लहान-थोर माणसांवरही कमी-अधिक प्रमाणानें झाल्याशिवाय राहत नाहीं असा साधारण नियम आहे. तोच नियम दाभोळकरांच्या घराण्यास लागू आहे. नारायणरावांच्या पत्नी श्रीमती लक्ष्मीबाई दाभोळकर यांनीं उदार अंतःकरणानें स्वज्ञातीच्या उन्नत्यर्थ मदतीदाखल धर्मार्थ म्हणून २०००० रु० काढून ठेविले आहेत. तसेंच नारायणरावांचे बंधु व त्यांची मंडळीही आजकाल सच्छील व सुखी आहेत. खुद्द नारायणरावांस दोन पुत्र व दोन कन्या अशीं अपत्यें होतीं पैकीं त्यांचे वडील चिरंजीव श्रीयुत आनंदराव दाभोळकर हे थोड्या दिवसांपूर्वी निवर्तले. हेही आपल्या वडिलांप्रमाणेंच कॉर्पोरेशनचे सभासद व जे. पी. होते. त्यांच्या पाठीमागें त्यांचे चिरंजीव रा. वसंतराव ( म्हणजे नारायणरावांचे नातू ) हेही हल्लीं कॉर्पोरेशनचे सभासद व जे. पी आहेत. नारायणरावांचे द्वितीय चिरंजीव तेच हल्लींचे प्रसिद्ध श्रीमंत रा. रा. शांताराम नारायण दाभोळकर हे होत. शांतारामजी यांचा सद्वर्तनक्रम वडिलांप्रमाणें सारखा चालू असल्यामुळें व त्यासंबंधाची माहिती बहुतेक सर्व सारस्वत ब्राह्मणास अवगत असल्यामुळें त्याविषयीं आज कांहीं जास्त लिहिणें उचित दिसत नाहीं. ही सारी मंडळी आज मुंबईत सुखानें वास करीत आहेत. नारायणरावांच्या ह्या पुत्रपौत्रादि परंपरेला दीर्घायुष्य यावें अशी परमेश्वराकडे प्रार्थना आहे.

---

# रावबहादूर शंकर पाडुरंग पंडीत. एम्. ए.

" अखंड एकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ॥
काळ सार्थकाचि करावा । जनासहित ॥ " रामदास.

मनुष्यमात्राची उन्नति होण्याला त्यास विद्येसारखें दुसरें उत्कृष्ट साधन क्वचितच सांपडेल ! त्या साधनांच्या योगानें तो प्राणी आपली पाहिजेतशी उन्नति करून घेईल. एक प्रसिद्ध म्हण आहे कीं, " **नर करणी करे तो नरका नारायण बन जाय.** " परंतु त्या म्हणीप्रमाणें माणसाच्या हातून करणी मात्र योग्य तऱ्हेनें झाली पाहिजे. आता ती करणी सर्वोत्तमरीतीनें पूर्णदशेस येण्यास मुख्य साधन तरी विद्या हेंच आहे. विद्येच्या योगानें ज्यांनीं आपला काल योग्यरीतीनें घालून आपली उन्नति करून घेतली इतकेंच नव्हे तर त्या विद्येचा आजपर्यंत अखंड व्यासंग केला तींच माणसें या जगत्कोंदणावर हिऱ्याप्रमाणें चकाकत आहेत. मग तीं कोणत्याही जातीचीं, कोणत्याही धर्माचीं अगर कोणत्याही देशांतील असोत, तीं ' **विद्वान् सर्वत्र पूज्यते** ' या सुभाषित वचनाप्रमाणें सर्वठिकाणीं वंदनीय, प्रशंसनीय व पूजार्ह होतात ह्यांत मुळींच संशय नाहीं. कोणतेंही साधन नसतां केवळ आपल्या बळानेंच स्वतःच्या हिमतीवर बालपणापासून सतत विद्याव्यासंगांत निमग्न राहून, ज्ञानसंपन्न झाल्यावर त्या ज्ञानाचा सृष्टिजन्य वस्तूंच्या साहचर्यानें प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्याचा दुसऱ्या माणसास उपयोग करून देऊन आपल्या आयुष्याचा सद्व्यय करून शिरोलिखित समर्थ रामदासांच्या उक्तीप्रमाणें ज्यांनीं कालक्षेप केला व अज्ञात गोष्टी ज्ञात करून जगाच्या निदर्शनास आणिल्या. अशीं जीं नररत्नें ह्या पृथ्वीच्या पाठीवर स्वैर विहार करीत असतां त्यांच्या सत्कीर्तीपरिमलानें हें दिग्मंडल भरून गेलें त्यांपैकीं शंकर पांडुरंग पंडित हे एक मुख्य होत. त्यांचें अनुकरणीय व गोड चरित्र थोडक्यांत येथें सादर करितों.

संस्थान सावंतवाडी. तर्फ हवेली, पेठा कुडाळ पैकीं मौजे बांबुळी येथें इ. स. १८४० मध्यें शंकररावजींचें जन्म झालें. त्यांच्या वडिलांचें नांव नारायणराव असें असून ते त्या गांवचे कुळकर्णी होते. येवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या गृहस्थितीचें बरेंच अनुमान होण्यासारखें आहे; तें हेंच कीं, जेमतेम त्यांच्या कुटुंबाचा निर्वाह चालण्यापुरती खाण्यापिण्यास कांहीं कमतरता नव्हती. तरी कुटुंब फार मोठें असल्या-

मुळें कार्यप्रस्थ वगैरेचा कांहीं प्रसंग आला म्हणजे कर्जबाजाचा प्रसंग येई. शंकररावजींना सात बंधु व पांच भगिनी इतकीं भावंडें होतीं. तेव्हां येवढा प्रपंच चालविण्याला शंकररावजींच्या वडिलांस किती अडचण भोगावी लागली असेल हें सांगणें नकोच. शंकररावजींना लहानपणीं घरींच त्यांच्या वडिलांनीं लिहिणें वाचणें आणि थोडेंबहुत हिशेब करणें हें शिकविलें. कांकीं, त्यावेळीं त्या संस्थानामध्यें सरकारी शाळा मुळींच नव्हत्या. नारायणराव स्वभावानें फार हुषार परंतु भाविक होते, त्यांस पांडुरंगपंत ह्या नांवाचे एक चुलत बंधु होते, ते देशांतरास गेले असतां तिकडेच वारले. त्यांना पाठीमागें कांहींएक संतती नव्हती. त्यामुळें घरांत कोणी मुलें वगैरे आजारी पडलीं, अथवा कोणास कांहीं बरें वाटेनासें झालें म्हणजे नारायणरावजींस वाटे कीं, आपला पांडुरंगच समंधरूपानें येऊन आपल्या मुलांबाळांस उपद्रव देतो; घरांत दुखणींबाणी वरचेवर होऊन जेव्हां अधिकच जाच होऊं लागला तेव्हां तर हा त्यांचा संशय अगदींच दृढ झाला. एके दिवशीं आपल्या मुलांपैकीं एक मुलगा पांडुरंगाच्या नांवानें करून द्यावा, म्हणजे त्यास पाणी देण्याला अथवा श्राद्धपक्ष वाढण्याला तरी उपयोगी पडेल. असा विचार मनांत आणून त्यांनीं शंकररावजींचा हात धरून आपल्या मृत बंधूस गाऱ्हाणें दिलें; व म्हणाले " बाबारे ! हा माझा शंकर मी तुला आजपासून अर्पण केला आहे. हा तुझें नांव चालवील. आतां तरी यापुढें तूं घरांतील मुलांबाळांस उपद्रव देऊं नको. " तेथपासून शंकररावजींचें नांव शंकर पांडुरंग असें पडलें.

नारायणरावजींचा प्रपंच गरीबीचा होता तरी, त्यावेळच्या कालमानाप्रमाणें व गृहस्थितीच्या अनुकूलतेप्रमाणें, मुलांच्या अभ्यासाविषयीं त्यांनीं बरीच काळजी घेतली होती. त्यांचे वडील चिरंजीव म्हणजे शंकररावजींचे ज्येष्ठबंधु भास्करराव हे मोठे चांगले प्रबुद्ध होते. घरांमध्यें प्रपंचाविषयीं होत असलेली तारांबळ व त्याजबद्दल आपल्या पूज्य पित्याला होत असलेला त्रास, हें सर्व त्यांच्या लक्षांत येत होतें. यामुळें कोठेंतरी अन्यठिकाणीं जाऊन थोडी जास्त विद्या संपादन करावी आणि कोणच्या तरी खात्यामध्यें चाकरी पत्करून वडिलांवरचा प्रपंचभार हलका करावा या उद्देशानें घरांत कोणासही न कळवितां, ते बेळगांवास निघून गेले. तेथें एक बांबुळीचा सुतार रहात असे, त्याच्याच पडवींत ते राहिले आणि एकदोन शिकवण्या पत्करून त्याजवर आपल्या निर्वाहाची सोय करून तेथील सरदार्सस्कूलमध्यें जाऊन स्वतः इंग्रजी शिकूं लागले.

त्यावेळीं शंकररावजींचें वय सोळा वर्षांचें होतें. बहुधा लहानपणीं घरांतील कोणी वडील माणूस बाहेरगांवीं जाऊं लागला ह्मणजे त्याजबरोबर जाण्याची प्रत्येक मुलास हौस असते आणि त्या जाण्यामध्यें अप्रबुद्ध मुलांना मौजेवांचून दुसरी कशाचीही इच्छा नसते; परंतु तींच मुलें थोडींशीं जाणतीं होऊन समजूं लागल्यावर अन्य-ठिकाणीं गेल्यास कांहींतरी आपण फायदा करून घेतला पाहिजे असें त्यांस वाटणें साहजिक आहे. त्याचप्रमाणें शंकररावजी थोडे जाणते असल्यामुळें आपले वडील-बंधू कोणत्या उद्देशानें घर सोडून गेले हें त्यांना पूर्णपणें समजत होतें व तशाच-प्रकारें आपणही विद्या संपादन करण्यास कोठेंतरी जावें असें त्यांना वाटे. इतकेंच नाहीं तर याहूनही त्यांची महत्वाकांक्षा विलक्षण मोठी होती. वडील चिरंजीव भास्करराव निघून गेल्यानंतर कांहीं सरकारी कामकाज पडल्यास नारायणराव शंकररावजींना सरकारदरबारांत पाठवीत असत. एकदां वाडीच्या पोलिटिकल सुपरिटेंडेंटाची स्वारी आफिसासह कुडाळ पेठ्यांत आली होती. त्यावेळीं कांहीं कामानिमित्त शंकररावजी आफिसांत गेले असतां तेथें कामदार मंडळी खुर्चीवर बसून काम करीत तें पाहून, शंकररावांच्या मनांत असें आलें कीं, जमिनीवर मांडी मोडून लिहित बसण्यापेक्षां आपणांस त्या कारकुनाप्रमाणें खुर्चीवर बसून काम करतां आलें तर आपण कृतकार्य होऊं. अशी ही त्यांच्या मनांत उत्पन्न झालेली जबरदस्त महत्वाकांक्षा द्विगुणीत वाढवून तिला पुष्टी देण्याला एक प्रसिद्ध गृहस्थही त्यावेळीं कारण झाले ते वाडी संस्थानचे त्यावेळचे प्रसिद्ध कारभारी कै० वामनराव चिटणीस हे होत. विशेषतः माणसाच्या हातून कोणतीही महत्वाची गोष्ट तडीस जाण्याला त्याची ईर्षा वाढविली पाहिजे आणि त्या कामीं मोठ्या माणसांच्याच साह्याची अवश्यकता असते. शंकररावजींचा ईर्षानल वामनरावजी सारख्या थोर मनुष्यानीं प्रज्वलित केला नसता तर ते एवढ्या योग्यतेस पोंचले असते किंवा नाहीं याची शंका आहे. असो.

'प्रसादचिन्हानि पुरःफलानि' ह्या न्यायास अनुसरून शंकररावांच्या भावी उत्कर्षाचीं कारणें दिवसेंदिवस जास्तच वाढूं लागलीं. त्यांनीं मुनसिफ कचेरींत एक कारकुनीची जागा खालीं झाल्याचें समजून ती आपणांस मिळण्याविषयीं वरिष्ठांकडे अर्ज केला. परंतु तो वशिल्याशिवाय मंजूर होणार कसा? "तुमचें मोडी अक्षर चांगलें नाहीं, ह्यास्तव ती जागा तुम्हांस देतां येत नाहीं." असा त्यावर उडवाउडवीचा शेरा मिळाला. वास्तवीक शंकररावजींचें मोडी अक्षर चांगलें असून अर्जा-

वर असा प्रतिकूल शेरा बसल्यामुळें त्यांस पराकाष्ठेचें वाईट वाटलें, आणि त्यांची महत्वाकांक्षा पूर्वींपेक्षां दसपटीनें वाढली. येवढेंच नव्हे, तर त्याप्रमाणें ते विद्या संपादन करण्याचा दृढनिश्चय करून घरांतून एकदम निघून बेळगांवास आले, आणि तेथल्या इंग्रजी शाळेंत इ. स. १८५८ च्या आगष्ट महिन्याच्या पंधराव्या तारखे पासून जाऊं लागले. हा दिवस हिंदुस्थानच्या इतिहासांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. कां कीं, त्याच दिवशीं नरगुंदचे संस्थानिक भास्करराव बाबासाहेब देसाई ह्यांस बंड केल्याच्या आरोपावरून, इंग्लीश सरकारानें फांशीं दिलें. त्यामुळें लोकांस पराकाष्ठेचें दुःख झालें. असो.

बेळगांवच्या इंग्रजीशाळेंत पंडित गेले तेव्हां तेथें त्यांचे मुख्य गुरु रावबहादुर नारायण विष्णु बापट हे होते. तेथें शिकण्याची सोय चांगली होती. परंतु बिऱ्हाडाची सोय बरोबर नव्हती. शंकररावांनींही आपल्या बंधूचाच मार्ग पत्करला. त्यांना शिकवण्या धरून पैसे मिळवावे लागत, आणि प्रथम प्रथम कांहि दिवस स्वहस्तें स्वैंपाकही करावा लागे. परंतु ही गोष्ट जेव्हां बेळगांवांतील सुप्रसिध वकील कै० वासुदेवराव पुणेकर यांना समजली तेव्हां त्यांनी आपल्या घरीं शंकररावजींस आश्रय दिला असें समजतें. महाशय पुणेकर हे फारच मोठ्या योग्यतेचे पुरुष होऊन गेले. त्यांची धर्मनिष्ठा व तदनुरूप आचरण आणि भूतदया हीं अवर्णनीय होतीं. गरीब विद्यार्थ्यांवर त्यांचें निःसीम प्रेम असे आणि त्याप्रमाणें ते त्यांना कोणत्याहीप्रकारें मदत करण्यास चुकत नसत, तेव्हां अशा उदारधी माणसाकडून शंकररावांसारख्या हुषार व होतकरू विद्यार्थ्यास आश्रय मिळाला म्हणून त्यांत मोठेंसें नवल नाहीं. पहिल्या प्रथम शंकररावजींस जरी अनेक तऱ्हेचे कष्ट सोसावे लागले तरी त्यांनी आपला अभ्यासांतील उत्साह कमी केला नाहीं. यावरून त्यांचा स्वभाव लहानपणापासूनच केवढा दृढनिश्चयी होता हें सहज कळून येतें. दृढाभ्यासानें सतत तीन वर्षांमध्यें तेथील अभ्यासक्रम पुरा करून स०१८६१ सालीं ते पगारी विद्यार्थी होऊन मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांत गेले. त्यांची प्रवेश परीक्षा त्याच्या पुढच्यावर्षी उतरली. कॉलेजांत गेल्यावर तेथेंही त्यांनीं आपल्या बुद्धिवैभवानें गुरूपगुरूंस संतुष्ट केलें. इ० स० १८६५ मध्यें त्यांच्या बी० ए० व एम्० ए० ह्या दोन्हीही परीक्षा उतरल्या. ह्या परीक्षांमध्यें त्यांनी दुसरी भाषा ल्याटिन घेतली होती. त्यांच्या बद्दल सर्वांत तारीफ करण्यासारखी गोष्ट ही कीं, इतक्या परीक्षा देऊन एवढी मोठी विद्या संपादन केली; परंतु तिजबद्दल एका पैशाचा देखील खर्च शंकररावजींनीं घरच्या

माणसांवर किंवा मित्रमंडळीवर पडूं दिला नाहीं! ही गोष्ट खरोखरच मोठी ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

एम्. ए. ची परिक्षा उतरल्यानंतर पंडित हे एल्फिस्टन कॉलेजांत प्रथम कांहीं दिवस 'फेलो' होते. आणि पुढें लौकरच पुण्याच्या कॉलेजांतील श्रेष्ठ प्रतीचे 'फेलो' नेमले गेले. त्या समयीं प्रसिद्ध गृहस्थ कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर हे दक्षिणाप्राईझ कमीटीचे सेक्रेटरी होते. त्यांच्यापश्चात् ती जागा सरकारानें शंकररावांस दिली. हाच त्यांच्या सरकारी नोकरीचा आरंभ होय. त्यांस मोरोपंताची कविता वाचण्याचा नाद मुळापासूनच असे. त्यामुळें ह्या जाग्यावर नेमणूक झाल्यानंतर, संस्कृत समासांची, शब्दांची व त्या भाषेची यथाशास्त्र माहिती व्हावी, या उद्देशानें त्यांनीं संस्कृत भाषेचा अभ्यास जारीनें सुरू केला, व लौकरच त्यांतही त्यांची प्रवीणता दिसून येऊं लागली. संस्कृत शिकूं लागल्यापासून चार महिन्यांनींच ते भगवानदासाच्या संस्कृत स्कालरशिपच्या परिक्षेस बसले व त्यांत त्यांचा नंबरही बराच वर आला. तसेंच त्यांनीं एका सोल्जर स्नेहापाशीं जर्मनभाषेचा उत्तम अभ्यास केला. नंतर त्यांस पुणा डेक्कन कॉलेजांत असिष्टंट प्रोफेसरची जागा मिळाली. तेथें ते इंग्लिश, ल्याटिन, व संस्कृत इतक्या भाषा शिकवीत असत. ह्या जागेवर असतां त्यांनीं **रघुवंश व मालविकाग्निमित्र** हे ग्रंथ शुद्ध करून टीपा देऊन तयार केले, नंतर त्यांस कलादगीची डेप्युटीकलेक्टरची जागा मिळाली. त्यावेळीं त्यांस घोड्यावर बसतां येत नसे, ह्यास्तव त्याचाही अभ्यास करून थोड्याच दिवसांत त्या कामांतही ते प्रवीण झाले. कानडी भाषा तर त्यांस मूळापासूनच येत असे. ह्यामुळें त्यांस तेथें कोणत्याही प्रकारची नड पडली नाहीं. शंकरराव ह्या अधिकारावर असतां भयंकर दुष्काळ पडला. ह्या दुष्काळांत त्यांनीं स्वतः उपासतापास न म्हणतां, रात्र किंवा दिवस हें कांहींच मनांत न आणतां, गांवगन्ना फिरून, व हाताखालील लोकांस फिरावयास लावून, क्षुत्पीडितांस मनोभावें साहाय्य करून अन्नपाण्याची सोय करून दिली. त्यांच्या हाताखाच्या एका मामलेदारास फिरण्याचा फार कंटाळा असे. परंतु त्याची ती संवय पंडितांनीं मोडून फिरण्याचे कामीं त्याचे अंतःकरणांस हुरूप आणून दिला. यामुळें सरकारांतून त्यांची वाहवा झाली, आणि गोरगरीबांकडून त्यांस दुवा मिळाला.

हें काम दीडवर्ष केल्यानंतर त्यांस पुन्हा डेकन कालेजामध्यें आशिआ खंडांतील भाषांचे प्रोफेसर नेमलें. पुढें त्यांनीं खानदेश व सुरत ह्याठिकाणीं डेप्युटी कलेक्टरचें

काम केलें. ते इ० स० १८७१ मध्यें खानदेशांत डेप्युटी कलेक्टरच्या कामावर असतां तेथील नदीस महापूर येऊन मोठी नासाडी झाली. अगदीं अनर्थ कोसळला! नदीच्या कांठचा सर्व प्रदेश जलमय झाल्याकारणानें लोकांस प्राणरक्षण करण्याचेंही मोठें कठीण पडलें. अशा भयंकर प्रसंगीं शंकररावांनीं एक लहानशी होडी घेऊन ती स्वत: चालवून बऱ्याच लोकांचे प्राण वांचविले. त्यांना पोहण्याचाही उत्तम अभ्यास होता. त्यायोगानें त्यांनीं तसल्या महापुरांत उडी घालून कितीएक बुडत्या मनुष्यांचा उद्धार करून त्यांनीं आपलें धैर्य व परोपकारित्व प्रगट केलें. धुळ्यांनजिक 'कुसुंबें' म्हणून एक गांव होता, तो त्या महापुरानें अजिबात वाहून गेला. तो परत वसविण्याच्याकामीं शंकररावजींनी पुष्कळच साह्य केलें ह्यास्तव तेथील लोकांनीं कृतज्ञताबुद्धीनें त्या गावांस '**शंकरपेठ**' असेंच नांव दिलें. व तेंच नांव अद्याप त्या गांवास चालत आहे. तेथील पाटलानें व लोकांनीं रावबहादूर पंडित यांचें हें एक चिरंतनचें स्मारकच करून ठेवलें असें समजलें पाहिजे. व त्याबद्दल ते मोठ्या प्रशंसेस पात्र आहेत. पंडितांच्या परोपकारित्वाबद्दल तेथील लोकांनीं त्यावेळीं अनेक कविता करून छापल्या व त्या, तीकडील लोक अद्यापही गात असतात. येवढी पुण्याई जोडणें हें कांहीं सामान्य कृत्य नव्हे!

इ. स. १८७४ मध्यें लंडन येथें 'ओरिएंटल इंटरन्याशनल कांग्रेस' भरली होती. त्याकरितां शंकररावांस मुद्दाम सरकारानें आपल्या वतीनें पाठवून दिलें होतें. ह्या सभेंत 'कालिदासाची मिति' ह्या विषयावर त्यांनीं एक सर्वोत्कृष्ट निबंध वाचला. त्यामुळें त्यांची तिकडे फारच कीर्ति झाली. अगोदरच उच्चवर्णीयांस परदेशगमनाचा निषेध त्यांत कदाचित कोणी जाऊन आल्यास त्यांच्या मागें लोकांकडून प्रायश्चित्ताचें मोठें शुक्लकाष्ट लावण्यांत येतें. तें मान हल्लीं उत्तरोत्तर बरेंच सौम्य होत चाललें आहे, तरी शंकररावजींच्या वेळीं. त्याचें माहात्म्य बरेंच होतें; परंतु ते विलायतेहून आल्यावर प्रायश्चिताच्या भानगडींत मुळींच पडले नाहींत. एवढेंच नव्हे तर त्यांनीं आपल्या एका बंधूला बॉरिष्टरच्या परीक्षेसाठीं विलायतेस पाठविलें होतें. ते परत आल्यावर त्यांसही प्रायश्चित्ताच्या वगैरे भानगडींत पडूं दिलें नाहीं. ह्यावरून त्यांच्या अंगीं त्यावेळीं किती मनोधैर्य होतें हें चांगलें कळून येतें.

ह्याच सुमारास पंडितांचें पहिलें कुटुंब निवर्तलें. तेव्हां आतां लहान मुलींशीं आपण लग्न करूं नये; एखाद्या प्रौढवयाच्या गतभर्तृकेशीं विवाह करावा; किंवा निदान सुशिक्षित अशा प्रौढ मुलीबरोबर तरी लग्न करावें, असें त्यांच्या मनांत फार

होतें. कारण, अलीकडील सुधारणापंथाचीं मतें त्यांस विशेष ग्राह्य होतीं. त्याप्रमाणें त्यांनीं एका प्रौढ मुलीशीं द्वितियसंबंध केला. ते प्रार्थनासमाजिष्ट होते, यामुळें द्वितिय विवाहाचा विधी करावयाचा तो तत्पंथीयविधिप्रमाणें करावयाचा असा त्यांनीं निश्चय केला होता; परंतु त्यावेळीं त्या पंथाची विवाहपद्धति तयार नव्हती. ती त्यांनीं मुद्दाम तयार केली व त्याप्रमाणें सर्व विधि उरकला. ह्यासमयीं विलायतेहून जाऊन आल्याबद्दल, किंवा ह्या नव्या लग्नपद्धतीबद्दल समाजाकडून त्यांस कोणत्याही प्रकारची अडचण आली नाहीं, हें त्यांच्या निश्चयाचें फळ होय.

आपल्या समाजरचनेचा व ज्या नियमांनीं तो समाज आज कित्येक शतकें बद्ध झालेला आहे त्या नियमांचा प्रांजलपणें विचार करणारास जसे त्यांत कांहीं गुण दिसतील तसेच कांहीं दोषही दिसतील, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे; पण ते गुण कायम राखून दोष असतील तेवढे काढून टाकण्याची शक्य तर खटपट करावी ही कल्पना मात्र आमच्या पुराणप्रिय समाजास अद्यापि फारशी शिवलेली नाहीं याचीं कारणें उघडच आहेत; सामान्य जनसमूहाचें जगांत काय चाललें आहे याविषयींचें–जगाची गोष्ट कशाला ? स्वतः हिंदुस्थानच्या संबंधाचें–अज्ञान व त्यायोगें त्यांस जडलेली **अंधेनैव नीयमाना यथांधाः**" ही घातुक संवय या दोन गोष्टींचें आमच्या समाजांत कैक शतकें वास्तव्य झालेलें असल्यामुळें आमच्या समाजरचनेंत अगर तत्संबंधीं नियमांत कांहीं दोष आहेत ही गोष्टच मुळीं आमच्या सामान्य लोकांस माहीत नाहीं ! रोगाचें अस्तित्व उमजल्यावर मग त्याची चिकित्सा आणि तन्निवारणार्थ उपाय योजना ? अशी वस्तुस्थिती असल्यामुळें समाजविषयक दोष उघडकीस आणण्याचें व ते दोष दूर करण्यासाठीं झटण्याचें अशीं दुहेरी जबाबदारीचीं कामें आपल्यामधील आंग्लभाषाविभूषित विद्वान् लोकांवरच पडलेलीं आहेत. हीं कामें समाधानकारकरीतीनें पार पाडण्यास अंगीं सहनशीलता व मनोधैर्य हे गुण अवश्य हवे असतात हें खरें; पण ते सर्वच सुधारणेच्छु सुशिक्षितांत असतात असें नाहीं. सुशिक्षित लोक झाले तरी सामान्यजनांपैकींच असतात. फक्त पुष्कळ नवीन गोष्टींचें त्यांचे हातून परिशीलन झालेलें असल्यामुळें त्यांना नवीन प्रकाश ग्रहण करण्याचा मार्ग खुला असतो इतकेंच काय तें. यामुळें कोणत्याही गोष्टींतील गुणदोषांचें परीक्षण व ( त्यांतून ) दोषांचें दूरीकरण असलीं महत्वाचीं कामें करण्याची पात्रता अर्थात् सामान्य लोकांपेक्षां सुशिक्षितांचे अंगींच अधिक असते हें उघड आहे. असो. अशी सुधारणेच्छु मंडळी आपल्या महाराष्ट्रांत

गेल्या पन्नास वर्षांत जी होऊन गेली त्यांत रा. ब. पंडितांचें स्थान बरेंच उच्च होतें हें कोणीही सांगेल. त्यांतून आपल्या सारस्वतज्ञातींत तर त्यांच्या तोडीचा सुधारणेच्छु गृहस्थ केवळ एखादा दुसराच दाखवितां येईल. असो.

विलायतेहून आल्यानंतर सरकारांनीं मुंबईस त्यांची लायसेन्स ट्याक्स कलेक्टरच्या जागीं नेमणूक केली. आणि पुढें लौकरच ते सरकारचे ओरिएंटल ट्रान्स्लेटर झाले. ह्या श्रेष्ठप्रतीच्या हुद्यावर असतां, पुण्यामध्यें फीमेल हायस्कूलचा प्रतिवार्षिक बक्षीस समारंभ झाला तेथील व्यवस्थेच्या देखरेखीचें काम शंकररावांकडे सोंपविलें होतें. कारण, स्त्रीशिक्षणाकडे प्रथमपासूनच त्यांचा ओढा होता. आणि फीमेल हायस्कूलची संस्था स्थापन करण्याच्या कामांत त्यांनीं पुष्कळ श्रम घेतले होते. एवढेंच नव्हे, तर त्यांनीं स्वतः त्या संस्थेस ३००० रुपयांची देणगीही दिली होती. तेव्हां सर्वांस आमंत्रण करण्याच्या कामांत व कार्यक्रम ठरविण्याच्या कामांत शंकररावजींची सल्ला होती. ह्या समारंभास मोठमोठाले साहेब लोक व स्त्रिया आणि गांवांतीलही कांहीं निवडक स्त्रीपुरुष बोलावले होते. त्यावेळचे शाळाखात्याचे डायरेक्टर या नात्यानें मेहेरबान लीवार्नर साहेबही त्या समयीं हजर होते. तेथें काय काय गोष्टी व्हावयाच्या त्याबद्दल अगाऊ प्रोग्रामही प्रसिद्ध झाला होता. त्यांत सरतेशेवटीं सर्व मुलींनीं मिळून 'राज्ञीस्तोत्र' म्हणावें असें प्रथम घातलें होतें. तें स्तोत्र म्हणतांना सर्वांनीं उठून उभें राहण्याची चाल आहे; परंतु ही गोष्ट हिंदु स्त्रीपुरुषांपैकीं, कितीएकांस माहीत नसल्यामुळें कोणी उठतील न उठतील, आणि समारंभाचा थोडासा बिघाड होईल असें वाटून शंकररावांनीं प्रोग्रामपत्रिकेंतून तें स्तोत्र गाळलें. त्याबरोबर ही गोष्ट मोठी गैर झाली; नव्हे, राजनिष्ठेच्या विरुद्ध झाली, असें साहेब लोकांस वाटलें. मेहरबान लीवार्नर साहेबांनीं तर शंकररावजींनीं ती गोष्ट मुद्दाम गाळली, असें बोलून दाखविलें आणि राईचा पर्वत करून तीन चार दिवसांच्या आंतच पंडितांनां सस्पेंड करविलें. हें लीवॉर्नरांच्या स्वभावाला अनुरूपच झालें; पण पंडितांना व त्यांचे अत्यंत जिवलग स्नेही कै० न्या० मू० माधवराव रानडे यांना फार वाईट वाटलें. पंडितांचा स्वभाव जात्याच मानी व तल्लख असल्यामुळें या विनाकारण झालेल्या मानहानीबद्दल त्यांनीं जिवाला फार लावून घेतलें होतें. सतत याच विचारानें त्यांचें डोकें दुखत असे. जेवणखाणाकडे देखील लक्ष नसे व ते उदास दिसत.

ही त्यांची स्थिति न्या० माधवरावजींच्या लक्षांत येतांच पंडितांचें मन ज्या

रीतीनें रमेल असे उपाय योजण्याकरितां, त्यांनीं त्यांस आपल्याबरोबर सन १८८६ मध्यें सिमल्यास नेलें होतें. तेथें माधवरावजींनीं हरएक उपायांनीं पंडितांचें मन स्थीर करण्याचा यत्न केला, आणि सुदैवानें त्यांत त्यांना चांगलें यश मिळालें. इतकेंच नाहीं तर त्या सन्मिलसमागमापासून पंडितांना दुसऱ्या एका महत्वाच्या गोष्टीचा लाभ झाला तो फ्रेंच भाषेचा होय. माधवरावजींनीं एका फ्रेंच बाईच्या घरीं पंडितांना फ्रेंचभाषा शिकण्याचा उपक्रम लावून दिला होता. या नवीन व्यासंगामुळें पंडितांच्या मनाचा उदासपणा पुष्कळ कमी दिसूं लागला. शिवाय तेथें त्यावेळचे व्हाइसराय लॉर्ड डफरिन यांच्या भेटीचा दोनचार वेळ योग जमून आल्यामुळें पंडितांच्या मनाचा कांहीं खुलासा होऊन त्यांना अधिक बरें वाटलें. पुढें सिमल्याहून आल्यावर पंडितांची नेमणूक हायकोर्टांत डे० रजिस्ट्रारच्या जागीं झाली; परंतु त्या जागेवर ते गेल्यानंतर त्यांस एकदम बदलून पोरबंदरचे दिवाण नेमिलें. ह्याच कामावर ते शेवटपर्यंत होते. त्या संस्थानच्या कारभारांत सुधारणा करण्याच्या कामीं त्यांनीं पुष्कळ श्रम केले. असो.

येथपर्यंत शंकररावजींच्या दृढनिश्चयाचें, अभ्यासाचें व सरकारी कामें उत्तमरीतीनें बजावल्याचें वर्णन झालें व त्यांतही त्यांचें बुद्धिवैभव पूर्णपणें दिसून आलें; पण ह्याहूनही त्यांनीं आपल्या देशबांधवांकरितां व इतर जनांकरितां कामें केलीं आहेत, तीं केवळ बिनमोल आहेत. त्यांच्या अंगीं अनेक सद्गुण होते खरे; परंतु उद्योगशीलता हा गुण तर केवळ लोकोत्तर होता. उघडच आहे:—

**“आपण यथेच्छ जेवणें । उरलें अन्न तें वाढणें ॥**
**परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ॥**
**तैसें ज्ञानीं तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जगास सांगावें ॥**
**तरत्यानें बुडों न द्यावें । बुडतयासी ॥ ”**

—दासबोध.—

पंचपक्वान्नाचें भोजन मिळालें, म्हणजे त्यावर यथेच्छ ताव मारणें, हें केवळ स्वार्थाचें लक्षण होय; तें कोणीही करील; परंतु त्याच अन्नाचा लाभ जो मनोभावानें दुसऱ्यांस करून देतो, तो मोठा उदार महात्मा समजला पाहिजे. विद्या किंवा ज्ञान, हें पंचपक्वान्नाच्या जेवणासारखें आहे. तें सर्वांसच सर्वकाळ मिळतें असें नाहीं. त्याचा लाभ प्रसंगोपात होत असतो, किंवा तसा योग येण्यास पूर्व पुण्याई लागते म्हटलें तरी चालेल. म्हणजे त्यास जीं साधनें लागतात तीं, फारच थोड्या लोकांस

अनुकूल असतात; म्हणून ज्ञानामृत भोजनानें जो तृप्त होतो तो भाग्यवान्; आणि त्यांतील अंश जो दुसऱ्यास विभागून देतो, तो फारच योग्य–नव्हे उदार अंतःकरणाचा पुरुष असें समजलें पाहिजे. या दृष्टीनें पाहिल्यास आपलें काम यथायोग्यरीतीनें सांभाळून उरल्यावेळांत शंकररावांनीं जे व्यवसाय केले आहेत, त्यांचा विचार केला म्हणजे मन आश्चर्यचकित होतें. आणि तो पुरुष मोठा धन्य असावा असें वाटतें. त्यांना स्वतः रिकामें बसणें कधींच आवडत नसे, आणि दुसरा कोणी रिकामा बसलेला त्यांस खपत नसे. मनुष्यांनीं उद्योग करून उदयास यावें, अशी त्यांची फार इच्छा असे. एकदां त्यांचा कोणी आप्त एका परीक्षेंत पास झाला, पण त्यांचा नंबर फार खालीं आला. त्यावेळेस त्यानें आपल्या कुलास कलंक लावला असें त्यांस वाटलें! त्यांचा उद्योगी स्वभाव असल्यामुळें ते आपलें सरकारी काम सांभाळून शिवाय ग्रंथप्रकाशनाचेंही काम करीत. ते एकदां लिहीत बसले म्हणजे सारखे चार चार तास लिहीत बसत. बुद्धिमत्ता आणि उद्योगशीलता हे गुण बहुधा कधीं एकत्र आढळत नाहींत परंतु शंकररावजींच्या ठिकाणीं ते एकत्र वास करीत. कोणी घरीं आलें तर त्यांचा आदरसत्कार करणें, स्त्रियांचा सन्मान राखणें, आपल्या मनांतील आदरबुद्धि व्यक्त करणें, हे गुण शंकररावजींच्या आंगीं उत्तमप्रतीचे होते. असो.

इंदुप्रकाश छापखान्यांत नामदार फ्रेअरसाहेबांनीं ज्या तुकारामाच्या अभंगाच्या गाथा छापविल्या आहेत, त्यांच्या देखरेखीचें काम शंकररावजींनीं केलें आहे. त्याला इंग्रजी प्रस्तावना जोडली आहे, ती फार चांगली आहे, आणि त्यांतील कितीएक अभंगांचें इंग्रजी भाषांतर केलें आहे, तें उत्कृष्ट उतरलें आहे; पण ह्या सर्व उद्योगापेक्षां ज्याच्या योगानें त्यांनीं आपली कीर्ति अजरामर करून ठेविली आहे, तो उद्योग म्हणजे वेदार्थयत्न या नांवाचें मासिक पुस्तक त्यांनीं कांहीं वर्षें चालविलें होतें हा होय. सदहु पुस्तकास हे नांव देण्यांतच शंकररावजींचें चातुर्य दिसून येतें. वेद हा अनादि; केवळ ईश्वरप्रणीत ग्रंथ. त्याचा अर्थ ह्मणजे परम गहन व दुर्बोध. त्यांतून पार जातांना ज्ञानसंपन्न महर्षींनासुद्धां हात टेंकावे लागले. हें सर्व मनांत आणून शंकररावांनीं **वेदार्थ–यत्न** ह्या नांवाची योजना केली आहे. त्यांत वेदाचें महत्व व आपलें दौर्बल्य व्यक्त होऊन मोठी शालीनता दिसून येते. वेदार्थयत्नांत मूळ संहिता देऊन त्यापुढें तिचीं इंग्रजी व मराठी भाषांतरें दिलीं आहेत; आणि ठिकठिकाणीं विपुल माहितीच्या टिपा दिल्या आहेत. हें सर्व पाहिलें म्हणजे त्यांच्या शोधकबुद्धीची, त्यांच्या विस्तृत परिशीलनाची, व त्यांच्या अगाध ज्ञानाची धन्यता

वाटते ? हें मासिक पुस्तक सहा वर्षे चाललें. म्हणजे त्याचे बह्यात्तर अंक निघाले आहेत, आणि त्यांत ऋग्वेदसंहितेचे सुमारें चार अष्टक, म्हणजे अर्धी संहिता समाप्त झाली आहे. आतां ती पुरी करण्याला कोण महात्मा या भरतभूमींत कधीं अवतरेल तो भाग्याचा दिवस होय ! एकंदरींत वेदार्थयत्नानें जगावर अनुपम उपकार करून रावबहादुर पंडित यांची कीर्ति ' **यावच्चंद्रदिवाकरौ** ' अजरामर करून ठेविली; आणि पंडितांनीं आपलें पंडित नांव सार्थ केलें, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

वस्तुतः वेदार्थ यत्नाचें काम, आपली नोकरीसांभाळून एका मनुष्यास झेंपणें कठीण होतें. पण तें काम करूनही शंकररावजींचीं आणखीं कितीएक कामें चाललींच होतीं. अथर्व वेदाचें भाष्य मिळविण्यासाठीं युरोपांतील व अमेरिकेंतील पंडित हजारों रुपये खर्च करून आज कितीएक वर्षे प्रयत्न करीत होते. परंतु त्यांस यश आलें नाहीं. तें भाष्य शंकररावांनीं महाप्रयासानें श्रृंगेरी मठांतून संपादन करून त्या महद्यशाचा वांटा घेतला. हें भाष्य मूळग्रंथासह छापण्याचें काम सरकारानें ह्यांच्याकडेसच सोंपविलें होतें. ह्या खेरीज ' कुमारपाल चरित्र ' नांवाचें एक काव्य छापण्याचें त्यांचें काम सुरू होतें तें वेगळेंच. हें काव्य हेमचंद नांवाच्या एका जैन कवीचें आहे हा कवि ख्रिस्ती शकाच्या अकराव्या शतकांत होऊन गेला. ह्या काव्यांत गुजराथेंतील अन्हिलवाडा, ज्यास हल्लीं सिद्धपूर पाटण म्हणतात तेथील कुमारपाल नांवाच्या राजाची स्तुती आहे. ह्या चरित्राच्या योगानें प्राकृत भाषेच्या व्याकरणास पुष्कळ सहाय्य होईल. अशारीतीचे हे शंकररावजींचे अनेक उद्योग पाहिले म्हणजे मन अगदीं थक्क होऊन जातें! याचें कारण इतकेंच कीं, त्यांचा एक क्षणही फुकट जात नसे. कोणतेंही काम हातीं घेतलें म्हणजे तें शेवटास जाईपर्यंत त्यांस दुसरें कांहीं सुचत नसे.

रावबहादुर शंकरराव पंडित ह्यांच्या अंगीं एकनिष्ठता, निस्पृहता, सत्यप्रियता वगैरे अनेक सद्गुण होते. आतां ते आपल्या हाताखालच्या लोकांस जरा कडक रीतीनें वागवीत असें म्हणतात; परंतु तें त्यांच्या उद्योगशील स्वभावाचें फळ होय. पण तशीच त्यांनीं अनेक लोकांवर दयार्द्र दृष्टि केल्याचेंही लोक सांगतात, हें विसरतां कामानये. सर्वांत त्यांची उद्योगशीलता दांडगी व बेताबाहेर असल्यामुळें तीच त्यांच्या मृत्यूस कारण झाली ! ते पोरबंदरच्या कारभारावर असतां, तें संस्थान सुधारण्यासाठीं त्यांनीं जिवापेक्षां अधिक कष्ट सोसले. त्यांचे मनांत लौकरच पेन्शन घ्यावयाचें होतें; म्हणून आपण आरंभिलेलीं कामें तशींच अर्धवट राहिल्यास आप-

ल्या पाठीमागून येण्याऱ्या कामदारास त्याची नड पडूं नये या हेतूनें त्यांनीं तीं कामें पुरी करण्यांत अतोनात मेहनत घेतली; आणि तेंच त्यांच्या व्याधीच्या उद्भवास कारण झालें. त्यांस धातुक्षयाची भावना झाली, ह्मणून रजा घेऊन ते मुंबईस आले व त्यांचे परममित्र कै० नामदार न्यायमूर्ति रानडे यांच्या "शांति भवन" नामक मंदिरांत राहिले. औषधोपचारही बराच झाला; पण त्याचा कांहींच उपयोग न झाल्यामुळें तारीख १८ मार्च सन १८९४ रोजीं त्यांस देवाज्ञा झाली! त्यायोगानें महाराष्ट्रदेशाची हानि झाली; आप्तइष्ट स्नेही मंडळीस अनिवार दुःख झालें; त्यांच्या कुटुंबाचातर घात झालाच, पण त्याबरोबर वेदार्थयत्नाचा झेंडा होरपळून गेला!! त्यास कांहीं उपाय नाहीं. ती उणीव यापुढें भरून निघणें कठीण आहे हें तर खरेंच; पण त्यांतल्यात्यांत पुढील मंडळींनीं त्यांच्या सद्गुणांचा कित्ता गिरविला, तरी आपल्या लोकांचें, आपल्या देशाचें, किंबहुना आपलें स्वतःचेंही पुष्कळ हित होण्यासारखें आहे. शंकररावांनीं आपल्या हयातींत जी कामगिरी केली व जी विद्या संपादन केली तिचा विचार केला असतां कोणासही अचंबा वाटल्यावांचून रहाणार नाहीं. त्यांच्या इतकीं विद्यार्चननिरत, सतत उद्योगीं अशीं माणसें आपल्या देशांत फारच थोडीं आढळतील. मनुष्यानें सतत उद्योग व निरंतर विद्याव्यासंग केला असतां त्याचे हातून त्याचे हयातींत किती कामें होतात हें वरील उदाहरणावरून स्पष्ट दिसून येतें.

वस्तुतः पंडित यांचें घराणें मोठें भाग्यशाली होतें असें म्हटलें पाहिजे. ह्मणूनच त्या घराण्यांत शंकररावांसारखें रत्न जन्मलें. मूळची गरीबी असून केवळ स्वपराक्रमानें व बुद्धिसामर्थ्यानें आपल्या कुलास सत्कीर्तीची जोड संपादून देणारा व पर्यायानें आपल्या देशाची सुधारलेल्या राष्ट्रांत तेजस्विता प्रकट करणारा पुरुष जन्मला आहे अशीं कुटुंबें पृथ्वीच्या पाठीवर अगदींच थोडीं असतील! त्याच थोड्या कुटुंबापैकीं पंडितांचें एक होतें असें म्हणण्यास आम्हांस कोणत्याच प्रकारचा प्रत्यवाय दिसत नाहीं. शंकररावांत बाणेदारपणा हा गुण जर किंचित् कमी प्रमाणानें असता आणि परमेश्वरानें जर त्यांला थोडें अधिक आयुष्य दिलें असतें तर त्यांचा आजला किंवा याहीपूर्वी निःसंशय सरकारी मंत्रिमंडळांत प्रवेश झाला असता! कोणाचा कसलाही अपराध न करतां केवळ मानीपणानें वागल्यामुळें सरकारी अधिकारी मंडळीची त्यांच्यावर दोन तीन प्रसंगीं इतराजी होऊन प्रत्येक वेळीं त्यांची थोडी मानहानि झाली खरी; परंतु तिन्ही प्रसंगीं शंकररावांचा हेतु निर्दोष होता याबद्दल कोणाही विकारहीन मनुष्याला कधीं संशय वाटला नाहीं. "पंडितांसारखा मानी, तेजस्वी,


बाणेदार व निरलस असा पुरुष मिळणें अगदीं दुरापास्त आहे " असें कै. न्या. रानड्यांच्या मुखांतून वारंवार उद्गार निघत असत असें जें श्री. रमाबाई रानडे यांनीं आपल्या पूज्य पतीच्या चरित्रांत म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे; व एक नंबरच्या विद्वत्तेशिवाय शंकररावांमध्यें दुसरा कोणता विशेषगुण जर वसत होता असेल तर तो "I would sooner break than bend" ( मान मोडली तरी पतकरलें, पण ती कधीं वांकविणार नाहीं ! ) हाच होय, हें त्यांचें चरित्र प्रथमपासून अवलोकन करणाऱ्याच्या सहज लक्षांत येईल! असा गुणी पुरुष अकालीं–त्यांचें वय मरणसमयीं सारें ५४ वर्षांचें होतें!–इहलोक सोडून जावा हें आपल्या देशाचें तर दुर्दैव खरेंच; पण त्यांतही विशेषतः आपल्या सारस्वत ब्राम्हण जातीचें फारच मोठें दुर्दैव म्हटलें पाहिजे ! असो; परंतु त्या निरुपायाच्या गोष्टी आहेत. शंकररावांच्या चरित्राचें परिशीलन करुन जरी आपल्यांमधील एकालाच त्यांचें ब्रीद चालविण्याची प्रेरणा झाली तरी पंडितांच्या जीवितक्रमाची सार्थकता होईल. असो;

शंकरराव पंडितांच्या मागें त्यांचे बंधु, मुलगे, मुली, पुतणे वगैरे बरीच मंडळी आपापल्या उद्योगावर आहे त्या सर्वांस पुढें आणण्याचें काम अर्थात् शंकररावांनींच केलें होतें. त्यांच्या स्वतःच्या मुलांचें शिक्षण चालू आहेच. त्यांचें एक पुतणे ( बाबुराव ) ओरियंटल ट्रॅन्स्लेटरच्या आफिसांत चांगल्या हुद्यावर आहेत. दुसरे पुतणे ( नारायणराव उर्फ भाई ) हे हायकोर्टांत एक दुभाषी आहेत. असो. इतरांची गोष्ट राहो. पण शंकररावांचे बंधु राजकोटचे प्रसिद्ध बॅरिस्टर रा. रा. **सीतारामपंत पंडित** यांच्या नांवाचा मात्र येथें जरूर उल्लेख केला पाहिजे. त्यांना शंकररावांनींच विलायतेस " सिव्हिलसर्व्हिस " च्या परीक्षेकरितां पाठविलें होतें पण त्यांचें वय त्याकामीं आड आल्यामुळें तो त्यांचा हेतु सफल झाला नाहीं. तरी सीतारामपंत थोड्याच दिवसांनीं ब्यॅरिस्टर होऊन आले व त्यांनीं राजकोटला धंद्यास सुरवात केली. सीतारामपंतांनीं आपल्या धंद्यांत पुष्कळ पैसे मिळविले व तो त्यांचा धंदा अद्यापि उत्तमप्रकारें चालला आहे या गोष्टी सर्व विश्रुत आहेत. पण स्वतःच्या श्रमानें मिळविलेल्या पैशाचा सत्कार्यीं व विशेषतः परोपकारार्थ व्यय करणारे जे आपल्या देशांत फार थोडे उदारधी लोक आजला परमेश्वर कृपेनें हयात आहेत त्यांत सीतारामपंतांची गणना केली पाहिजे ! एकादी चांगली–मग ती देशाच्या कोणत्याहि भागांत असो !—शिक्षणसंस्था निघाल्याचें समजलें म्हणजे यांच्याकडून थोडीना थोडीतरी मदत तिला झाल्याशिवाय राहत नाहीं. अशी यांची कीर्ति आहे !

वस्तुतः त्यांच्या हातून झालेल्या सर्व धर्मादायाची आम्हांस बारीक माहिती नाहीं हें आम्हीं कबूल करतों; पण आम्हांस वाचून अगर अन्यरीतीनें समजलेल्या एक दोन गोष्टी सांगितल्या म्हणजे सद्गृह पंडितांच्या औदार्याची वाचकांस सहज कल्पना होऊं शकेल! काशीस मिसेस ॲनाबेसंट यांनीं काढलेल्या "सेंट्रल हिंदु कॉलेज" या संस्थेस सीतारामपंतांनीं कांहीं वर्षांपूर्वी पंधरा हजार रुपयांची देणगी दिल्याचें प्रसिद्ध झालेलें वाचल्याचें आम्हांस स्मरतें. तसेंच पुणें येथील प्रो० कर्वे यांच्या "अनाथबालिकाश्रमा" स सीतारामपंत पंडितांची केवढी मदत झालेली आहे व होत आहे हें त्या आश्रमाच्या वार्षिक रिपोर्टावरून कोणासही सहज कळून येणारें आहे. त्याचप्रमाणें मुंबईच्या "सारस्वत विद्यार्थी सहायक मंडळी" सही पंडितांचा चांगला आश्रय आहे. याशिवाय खासगीरीतीनें विद्यादानाच्या कामीं त्यांच्या हातून किती मदत होत असते त्याची नोंदनिशी करतां येणें देखील केवळ मुष्किलीचें आहे! विद्यार्थी—मग तो कोणत्याहि जातीचा असो—मदतीसाठीं त्यांचेकडे गेला आणि तो असंतुष्ट अगर निराश होऊन रिक्तहस्त परत गेला असें सहसा कधीं घडलें नाहीं असा त्यांचा लौकिक आहे. इतकेंच नाहीं तर नेहमींच्या जरूर अटींवर (वर्गात नंबर वर ठेवला पाहिजे वगैरे) विद्यार्थ्यांस मदतीचें आश्वासन देऊन सीतारामपंत त्यांस एक गीतेचें पुस्तक फुकट देत असतात व "रोज तूं यांतील एक अध्याय अगर निदान पांच श्लोकतरी वाचीत जा" असा अत्यंत हितकर उपदेश करून त्या विद्यार्थ्याची रवानगी करीत असतात असें आम्हांस खात्रीलायक आधारावरून समजलें आहे! असे धर्मात्मे महाराष्ट्रांत किती निघतील बरें? धन्य त्या पुरुषांची!

शंकररावांच्या मुली देखील चांगल्या शिकलेल्या आहेत. त्यांची कन्या सौ. क्षमाबाई यांचा बि. ए. पर्यंत अभ्यास झालेला आहे. व मुंबईचे प्रसिद्ध डॉक्टरराव यांनीं त्यांच्याशीं विवाह केलेला आहे दुसरीही एक मुलगी तशीच शिकलेली असून ती मुंबईच्या प्रसिद्ध माडगांवकर घराण्यांतील रा. रा. गोविंद दीनानाथ माडगांवकर आय्. सी. एस् सेशन्स जज्ज यांस दिलेली आहे.

शंकरराव पंडितांचे वडील चिरंजीव हे विलायतेस जाऊन ब्यारिस्टर होऊन आले आहेत व ते राजकोटला आपला धंदा करीत असतात. दुसराही एक मुलगा हल्लीं विलायतेस अभ्यास करीत आहे असें समजतें. ही सारी मंडळी दीर्घायुषी होवो अशी आमची परमेश्वराकडे सदैव प्रार्थना आहे.



श्रीयुत रामचंद्र भिकाजी गुंजीकर.

# रामचंद्र भिकाजी गुंजीकर.

सृष्टिक्रमाचें नीट निरीक्षण करणारास असें दिसून येईल कीं, मनुष्यानें उद्योग करून आपली जीवितयात्रा सफळ करावी असाच परमेश्वराचा हेतु आहे. मूक जनावरें, पशुपक्षी अगर कृमिकीटक यांचें अल्पशा आयासानें–किंबहुना अनायासानें परिपोषण व्हावें अशी ज्याप्रमाणें ईश्वरानें व्यवस्था करून ठेविली आहे तशी त्यानें मनुष्यप्राण्यासंबंधानें केलेली नाहीं. यावरून मनुष्यानें उद्योग करून कोणतीही वस्तु प्राप्त करून घ्यावी असाच ईश्वरी संकेत दिसतो. त्या ईश्वरी संकेतानुरूप वागणें म्हणजे नेहमीं उद्योगशील राहणें हेंच मनुष्याचें कर्तव्य होय. असा जर तो न राहील तर त्याच्यांत आणि पशुपक्ष्यादिकांत अंतर काय ?

पण उद्योग करून जो फक्त आपलें उदरपोषण करतो अगर फार तर आपला परिवार संभाळतो त्याच्या जीवितक्रमाचें जगाच्या दृष्टीनें महत्व कसलें ? तशा प्रकारचा उद्योग प्रत्येक मनुष्य कमी अधिक प्रमाणानें करीतच असतो. पण ज्याची आपल्या या जगांतील कर्तव्याची कल्पना वरीलपेक्षां उच्चतर झाली आहे; म्हणजे केवळ कुटुंबपोषण हेंच मनुष्याचें जीवितसर्वस्व नसून त्याच्याही पलीकडचें म्हणून त्याला कांहीं कर्तव्य आहे ही गोष्ट ज्याच्या मनांत बिंबली आहे व तदनुसार जो आपला उद्योग चालवीत असतो तोच खरा थोर पुरुष होय. असो. अशाप्रकारचें कर्तव्य उत्तमरीतीनें बजावण्यास ज्या साधनांची सामान्यतः जरूर लागत असते. त्यांत " ज्ञानदान " याचें महत्व फार मोठें आहे. ज्ञानाचें दान अगर लाभ इतरांस करून देण्याची अंगीं पात्रता येण्यापूर्वी तें दान करूं इच्छिणाऱ्यानें स्वतः ज्ञानसंपन्न असलें पाहिजे हें उघडच आहे. " **नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते** " ( ज्ञानापेक्षां पवित्र दुसरी वस्तु नाहीं ) हें खुद्द भगवंताचें वचन आहे. तेव्हां अशा अमृतोपम ( ज्ञानाचें ) वस्तूचें सत्पात्रीं दान करण्यापासून किती पुण्य लागेल तें कोण सांगूं शकेल बरें ! असो. याप्रमाणें लोकशिक्षणाचें यथाशक्ति काम करून ज्यांनीं आपल्या जीविताचें थोडेंतरी साफल्य केलें आहे त्यांत रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांचा समावेश करण्यास हरकत नाहीं. विशेषतः दाक्षिणात्य सारस्वत ब्राम्हणांमध्यें ज्या थोड्याबहुत गृहस्थांनीं सदर्हू प्रकारची कामगिरी बजावली आहे त्यांत रामभाऊंचा नंबर पुष्कळच वर लागतो. त्यांचें अल्पसें चरित्र येथें देत आहों.

दक्षिणमहाराष्ट्रांत बेळगांव जिल्ह्यांत खानापूरनजीक जांबोटी म्हणून एक लहानसा गांव आहे. त्या गांवीं रामभाऊंचा इ० स० १८४३ च्या एप्रिल ता. १८ रोजीं जन्म झाला. त्यांचा विद्याभ्यास थोडाबहुत त्या गांवींच झाला पुढें सन १८५८ सालीं इंग्रजी शिकण्याच्या निमित्तानें ते बेळगांवांस गेले तेथें त्यांचें इंग्रजी शिक्षण चांगलें होऊन सन १८६० या वर्षी त्यांची पब्लिक सर्व्हिसची परीक्षा उसरली. तदनंतर ते मुंबईस गेले व तेथील एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें त्यांचा अभ्यास पुरा झाल्यावर सन १८६४ मध्यें ते मॅट्रिक्युलेशन परीक्षेंतून उत्तीर्ण झाले. मग पुढें ते एल्फिन्स्टन कॉलेजांत जाऊं लागले; परंतु कांहीं घरगुती अडचणींमुळें तो क्रम सोडून देऊन त्यांना सन १८६६ सालीं एल्फिन्स्टन हायस्कूलमध्येंच असिस्टंट मास्तरची जागा पत्करावी लागली. त्या जागेवर त्यांनीं बावीस वर्षें नोकरी केली! त्या अवधींत त्यांचें काम वरिष्ठांस पसंत पडत गेलें व तदनुरूप त्यांना बढती मिळत गेली या गोष्टी खऱ्या आहेत; पण आमच्या शाळाखात्यांतील मास्तरांच्या पगाराच्या बढतीचें मान महशूर असल्यामुळें व "लक्ष्मी व सरस्वती" यांचें सख्य सामान्यतः व्यस्त प्रमाणावर असल्यामुळें, रामभाऊंची बढती बावीस वर्षांत त्यांच्या विद्वत्तेस साजेल अशी मुळींच झाली नाहीं, इतकेंच काय तें! तथापि अखेर त्यांची दाद लागून सन १८९० मध्यें त्यांस हुबळी येथील अँग्लोव्हर्नाक्युलर शाळेचे हेड्मास्तर नेमिलें. ही तरी त्यांतल्यात्यांत समाधानाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. नंतर सन १८९५ या वर्षी ते बेळगांव जिल्ह्याचे असिस्टंट डेप्युटी इन्स्पेक्टर झाले. त्या जागेवर सुमारें तीन वर्षें त्यांनीं चांगल्यारीतीनें आपलें काम करून मग सन १८९८ मध्यें पेनशन घेतलें. तेव्हांपासून ते मुंबईसच जाऊन राहूं लागले होते.

मध्यंतरीं रामभाऊंवर दोन तीन अत्यंत दुर्धर असे प्रसंग येऊन त्यांच्या मनास कांहींकाळ बराच धक्का बसल्यासारखा झाला होता. पण ते फार विचारी असल्यामुळें तितक्याही प्रसंगांतून मोठ्या समाधानवृत्तीनें त्यांनीं टिकाव काढला होता. ते बेळगांवांस नोकरीवर असतांना त्यांचा वडील मुलगा—मॅट्रिक होऊन बी. ए. चा अभ्यास करीत असलेला, असा—एकाएकीं मरण पावल्यामुळें. रामभाऊंचें सर्व कुटुंब दुःखसागरांत लोटलें गेलें होतें! त्याच्याही पूर्वी थोडे दिवस रामभाऊंचे एक जांवई—अमदाबादेस असिष्टंट इंजिनीयरसारख्या बड्या हुद्याच्या जागेवर असलेले—कै. रा. रा. विठ्ठल सीताराम भांडारकर बी. ए. एल्. सी. ई; हेही त्याचप्रमाणें एकाएकीं मरण पावल्यामुळें रामभाऊंचें मन अगदीं होरपळून गेलेलें होतें.

याप्रमाणें पुत्रशोकादिकाचे प्रसंग येऊन पुढें रामभाऊंवर लवकरच बंधुशोकाचा-ही प्रसंग आला. त्यांचे कनिष्ठबंधु कै० गणपतराव गुंजीकर बी. ए. हे रामभाऊं-प्रमाणेंच चांगले विद्वान् असून कसलेले असे लेखक होते. ते सरकारी नोकरींत वाढतां वाढतां अखेर असिस्टंट ओरियंटल ट्रॅन्सलेटर झालेले होते. त्यांना सन १८९७ च्या सुमारास जलोदरासारखा कांहीं चमत्कारिक रोग होऊन ते थोड्याच दिवसांनीं मग वारले. असो. याप्रमाणें रामभाऊंवर एकामागून एक असे प्रसंग आल्याकारणानें त्यांची प्रकृति अखेर अखेर बरीच ढांसळल्यासारखी झाली होती; पण त्यांचा मृत्युकाल इतका जवळ येऊन ठेपला होता असें कोणासही वाटलें नव्हतें. कारण मरणकाळाच्या पूर्वदिवशींच त्यांनीं ठाण्यास जाऊन तेथील मराठी ग्रंथसंग्रहा-लयाच्या वार्षिक उत्सवाच्या अध्यक्षपणाचें काम बजाविलेलें होतें; पण ठाण्याहून परत मुंबईस आपल्या घरीं आल्यावर लागलींच त्या दिवशीं त्यांना पक्षघात झाला. त्याच्या निवारणार्थ पुष्कळ उपाय केले; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेर सन १९०१ यावर्षी जून १८ तारखेस त्यांना देवाज्ञा झाली.

रामभाऊ गुंजीकर हे उत्तम संस्कृतज्ञ होते. त्यांचा मुख्य विषय "व्याकरण" हा होता. त्यांनीं सिद्धांतकौमुदीचा चांगला अभ्यास केलेला असून त्यांतील बहुतेक सर्व खुब्या समजून घेतलेल्या होत्या. या विषयावर त्यांनीं लिहिलेला "कौमुदी महोत्साह" प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें रामभाऊ हे उत्तम मराठी ग्रंथकार होते. मोचनगड, सौभाग्यरत्नमाला, महाराष्ट्र भाषेचा लेखनशुद्धि, सुबोध व्याकरण, लाघवी लिपी, कन्नडपरिज्ञान. वगैरे अनेक लहान मोठे ग्रंथ त्यांनीं लिहिलेले आहेत. मुंबईच्या प्रसिद्ध "**विविधज्ञानविस्तार**" नामक मासिकपुस्तकाचे रामभाऊ गुंजीकर हेच उत्पादक होत. त्या सर्वमान्य मासिकासंबंधानें आज इतकेंच लिहिणें प्रशस्त वाटतें कीं, त्या मासिकपुस्तकानें आज चाळीस वर्षांवर महाराष्ट्रवाङ्मयाची एकनिष्ठपणानें उत्तमप्रकारची सेवा केलेली असून अद्यापि आपला पूर्वीचा जोम बहुतेक जशाचा तसा कायम ठेविलेला आहे. अशा मासिकाचें कोणा महाराष्ट्राभिमानीं मनुष्यास कौतुक वाटणार नाहीं? या महत्वाचे गोष्टीचा विचार केला म्हणजे तशा प्रकारच्या सर्वमान्य मा० पुस्तकाचे उत्पादकांविषयीं—अर्थात् रामभाऊ गुंजीकरां-विषयीं—कोणाही महाराष्ट्रीय मनुष्यास आदर वाटल्याशिवाय राहणार नाहीं! असो. मराठी भाषेंत बखरी लिहिण्याचा काळ निघून गेल्यावर, बाळशास्त्री जांभेकर, सदा-शिव काशीनाथ छत्रे इत्यादिकांनीं इंग्रजी पद्धतीवर मराठींत गद्यग्रंथ लिहिण्यास

सुरवात केली हें सर्व श्रुत आहे. त्यांच्यामागून बऱ्याच पुढच्या-म्हणजे कै० विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या अंमळ मागच्या-पिढींत जे चांगले मराठी ग्रंथकार होऊन गेले, त्यांतील रामभाऊ गुंजीकर हे एक होत त्यांचच बहुतेक समकालीन असे प्रसिद्ध ग्रंथकार रा. सा. विनायक कोंडदेव ओक हे आज परमेश्वर कृपेनें हयात आहेत. त्यांनीं मुंबईच्या "बालबोधां" त रामभाऊंच्या मराठी भाषेविषयीं दिलेला अभिप्राय वाचण्यासारखा आहे. तो असा: — "ह्यांची ( रामभाऊंची मराठीभाषा सरळ, गोड, शुद्ध आणि भारदस्त अशी आहे. ह्यांच्या लेखांत संदिग्धपणा कसा तो मुळींच नाहीं." यापेक्षां जास्त अधिकाराचा अभिप्राय आम्हांस देतां येणें शक्य नाहीं. *

रामभाऊंनीं सर्व प्रचलित विषयांवर विचार करण्याची संवय ठेवलेली होती. तशा विषयांसंबंधी त्यांचे विचार फार पोक्तपणाचे असत व ते आपले विचार देशबंधूंसमोर मांडण्याची संधि मिळाल्यास ती चुकवीत नसत. इ. स १८७५ या वर्षी मुंबईस "ज्ञानप्रसारक" सभेंत त्यांनीं एक "भरतखंडाच्या निकृष्टावस्थेचीं कारणें व उत्कर्षाचे उपाय" या अर्थपूर्ण विषयावर निबंध वाचला होता. त्यांत त्यांनीं आपल्या लोकांतल्या अज्ञानाचें केलेलें वर्णन फार मार्मिकपणाचें असून बोधप्रद आहे ते म्हणतात:— "एक म्हणतो, शनिवारचे दिवशीं चणे खाल्ल्यानें दरिद्र येतें, पण शुक्रवारीं खाल्ल्यानें संपदा प्राप्त होते. एक म्हणतो, एकमुखी रुद्राक्ष जवळ बाळगल्यानें संपत्ति येते, तर एक म्हणतो कीं, शाळग्राम पूजेला शंखोदक नसेल तर कृष्णपरमात्म्याची प्राप्ति कधींही होणार नाहीं. एक ह्मणतो सोमवारीं श्मश्रु करविल्यानें पुत्ररत्न दृष्टीस पडतें, तर एक म्हणतो कीं काळें पागोटें बांधिल्यानें शनीची पीडा होत नाहीं—अशा हजारों येडगळ क्षुद्र कल्पनांनीं आमच्या लोकांचीं मनें व्यापून टाकिलीं आहेत. व मोठमोठीं कृत्यें आम्हीं मुळींच विसरून गेलों आहों. + + + सूर्य चंद्राच्या ग्रहणांचा प्रकार नीट पाहण्याकरितां म्हणजे वेध घेण्याकरितां आधींपासून तयार राहण्यांत व मग ईश्वराच्या अगाध शक्तिची स्तुती करण्यांत जो काळ घालवावयाचा त्याचा भलताच अर्थ केला जाऊन, राहु केतु हे सूर्यचंद्रास ग्रासतात, त्यांस त्या दैत्यांच्या मुखांतून सोडविण्याकरितां अनुष्ठानें वगैरे करण्याचा तो काळ, अशी समजूत झाली! याप्रमाणें खोटा गर्व हेंच आमच्या नाशास कारण झालें हें किती अक्षरशः खरें आहे? वस्तुतः गेल्या ३०–४० वर्षांत आपल्या देशामध्यें शिक्षणाचा बराच प्रसार झाल्यामुळें सामान्य लोकांच्या विचारसरणींत क्रांति होऊन

सदरील प्रकारच्या कल्पनांचें क्षुद्रत्व त्यांच्या लक्षांत येऊं लागलें आहे ही गोष्ट खरी. तथापि तशा कल्पनांनीं आपल्या अशेष हिंदुसमाजाचें मानसिक क्षितिज कित्येक शतकें व्यापून टाकलेलें असल्यामुळें, त्या कल्पनांचें समाजांतून अजीबात निर्मूलन होणें म्हणजे अर्थात् थोडें दिनावधीचें काम आहे पण तशा वेडगळ समजूतींचा जोर आतां हळू हळू कमी होत चालला आहे यांत मात्र शंका नाहीं. तें कसेंही असलें तरी असल्या वेड्या समजूतींनें आपल्या हिंदुसमाजांत ४० वर्षांपूर्वी बऱ्याच अंशीं निष्कंटक साम्राज्य होतें, ही गोष्ट लक्षांत आणली म्हणजे तशाही दिवसांत सामाजिक अगर धार्मिक बार्बींचा निरभिमानतया विचार करण्याची रामभाऊ गुंजीकरांनीं लावून घेतलेली संवय व तसे विचार आपल्या समाजापुढें सार्वजनिकरीतीनें मांडण्यांत त्यांनीं दाखविलेलें धैर्य हीं सहज नजरेंत भरतात व त्यांच्या कृतीचें कौतुक वाटतें. असो. पण रामभाऊंच्या विचारसरणींत केवळ विघातकपणाचेंच-टीका करण्याच्याच कलाचें-बीज नसून त्यांत विधायकपणाचीही-उपाय योजना सुच-विण्याची-झांक मारीत असे. सदर्हू निबंधांत आपल्या देशाच्या उन्नत्यर्थ उपाय कोणते योजावेत यांचेही थोडेंसें दिग्दर्शन त्यांनीं केलें होतें तो भाग अद्यापि विचार करण्याजोगाच आहे. रामभाऊ म्हणतात:—" आमच्या शाळांमध्यें पहिल्यानें नीति, सदाचार, सभ्यता, सत्य, मनाचें औदार्य, मितव्यय, निरालस्य, वैभवाची इच्छा, ह्या गोष्टी प्रत्येक मुलाच्या मनांत बिंबविल्या पाहिजेत. लिहिण्या वाचण्याचा सर्वत्र प्रसार केला पाहिजे. कलाकौशल्य, रसायनशास्त्र, औषधीशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, गणित इत्यादि उपयुक्त शास्त्रांकडे लक्ष दिलें पाहिजे. मोठमोठे कारखानें, शेती, व्यापार यांची वृद्धि झाली पाहिजे. पोकळ गर्व सोडून सर्व लोकाशीं गोडीगुलाबीनें राहण्याचें शहाणपण आपण शिकलें पाहिजे. या सर्व गोष्टी करण्यास ईश्वरकृपेनें आपल्यास इंग्रेजी ग्रंथांचें, इंग्रजी विद्वानाचें व यंत्रादिकांचें आजकाल असें सहाय्य मिळेल, तसें पूर्वी कोणत्याही देशांत कोणत्याही लोकांस मिळालें नसेल. + + + + सारांश, ईश्वरकृपेनें सर्व कांहीं अनुकूल आहे एक उद्योग मात्र केला पाहिजे. + + + + (तेवढा केला) म्हणजे परमेश्वरकृपेनें आपला देश डोक वर करील, व पुन: प्राचीन कीर्तीला योग्य असा होईल. " अगदीं खरें आहे.

रामभाऊ गुंजीकरांवर अनेक दु:खाचे प्रसंग आल्याचा मागें उल्लेख आलेलाच आहे. त्यांपैकीं एका प्रसंगाचा जोर चालू असतांना मनाचें समाधान करण्याच्या उद्देशानें रामभाऊंनीं श्रीमद्भगवद्गीतेचें पारायण चालविलें होतें. आमच्या मतें कोण-

त्याही विचारी व धर्मशील हिंदु गृहस्थास तशा प्रसंगीं गीतेसारखा मनास समाधान देणारा दुसरा विषय मिळणें शक्य नाहीं. त्या अमृतोपम ग्रंथाच्या परिशीलनानें रामभाऊंस त्यावेळीं आपलें दुःख बरेंच हलकें करतां आलें इतकेंच नव्हे तर परमेश्वर कृपेनें त्यांनां जी ग्रंथलेखनाची शक्ति प्राप्त झाली होती तिचा उपयोग करून त्या ग्रंथांतील रसास्वाद मराठी टीकेच्या रूपानें आपल्या देशबांधवांसही प्राप्त करून देतां आला ! रामभाऊंच्या मराठी भाषेविषयीं अभिप्राय मागें आलेलाच आहे; परंतु त्यांची गीतेवरील मराठी टीका अत्यंत सुबोध व गोड अशी उतरलेली आहे हें आम्हीं स्वतःच्या अनुभवानें सांगतों. रामभाऊ तिच्या प्रस्तावनेंत ह्मणतातः— "थोर भाग्य पृथ्वीचें, म्हणून श्रीमद्भगवद्गीतेसारखा अद्वितीय पुण्यग्रंथ उपलब्ध झाला. याच्या योग्यतेचें वर्णन करण्याचें वाणीला सामर्थ्य नाहीं. केवळ अर्जुनाला बोध करण्याकारितां नव्हे, तर सर्व सृष्टीच्या उद्धारास्तव परमात्म्यानें ही अमूल्य देणगी देऊन ठेविली आहे. तेव्हां अशा अमृतोपम ग्रंथाच्या पठनानें वाणी परिप्लुत करावी; जी कांहीं ग्रंथलेखनाची अल्पस्वल्प शक्ति त्याच्या प्रसादानें प्राप्त झाली आहे, ती त्याच्याच सेवेमध्यें योजून तिचें सार्थक्य करावें; आणि त्या ग्रंथांतील अद्भुत अर्थाच्या चिंतनानें आत्म्याचा उद्धार करावा; या हेतूनें हे त्याचें यथामति भाषांतर केलें" हे किती हृदयंगम उतरलें आहे ? आम्हांस वाटतें कीं, असे अंतःकरणापासून निघालेले, अतएव अत्यंत प्रेमळ उद्गार कोणत्याहि विषयासंबंधानें, आधुनिक महाराष्ट्रवाङ्मयांत फारच थोड्या ठिकाणीं नमूद झालेले दृष्टीस पडतील !! रामभाऊ गुंजीकर चांगली कविताही करीत असत; पण त्यांचा बहुतेक ओढा गद्यग्रंथ लिहिण्याकडेच असे.

असो. येथवर रामभाऊंनीं मराठीवाङ्मयाची कोणत्याप्रकारें सेवा केली ह्याचा विचार झाला. आतां त्यांनीं आपल्या जातीची—गौड सारस्वत ब्राम्हण जातीची—जी एक अत्युत्तमप्रकारची सेवा केली आहे तिचा उल्लेख करून हें त्यांचें त्रोटक चरित्र संपवूं. रामभाऊंनीं सुमारें २५ वर्षांपूर्वी महाराष्ट्रांतील सर्व मुख्य मुख्य ब्राम्हण जातींचा एक लहानसा इतिहास लिहून तो "सरस्वतीमंडल" या पुस्तकाचे रूपानें प्रसिद्ध केला ही गोष्ट सर्वांस ठाऊकच आहे. त्या पुस्तकावर कै० राजारामशास्त्री भागवत यांनी "जशासतसें" या पुस्तकाचे रूपानें व इतर लोकांनीं वर्तमानपत्रांतून सडकून टीका केली. त्या सर्व टीकेस प्रत्युत्तर म्हणून रामभाऊ गुंजीकरांनीं "भ्रमनिरास" लिहिला. त्या दोन पुस्तकांत रामभाऊंनीं

आपल्या गौ० सा० ब्रा० जातीसंबंधीं जी माहिती संकलित केलेली आहे ती केवळ बिनमोल आहे असें आमचें मत आहे त्याचेपूर्वी त्या विषयासंबंधीं जी माहिती थोडीबहुत उपलब्ध होती ती अनेक ठिकाणीं पसरलेली होती व यामुळें ती ऐनवेळीं मिळण्यास अडचण पडे. ती सर्व माहिती व आणखी जी कांहीं नवीन माहिती मिळणें शक्य होतें ती सर्व एके ठिकाणीं जुळवून जिच्या आधारानें गौ० सा० ब्रा० जातीचा, लहानसाच असेना पण संगतवार इतिहास लिहिलेला असा रामभाऊंच्या दोन पुस्तकांतच ( सरस्वतीमंडळ आणि भ्रमनिरास ) मिळतो. यामुळें जातिप्रकरणीं सदहू दोन पुस्तकें, गौ० सा० ब्रा० जातीच्या दृष्टीनें, केवळ आधारभूत होऊन राहिलेलीं आहेत. अर्थात् गौ० सा० ब्रा० जातीच्या संबंधानें आपल्या देशांत येन केन प्रकारेण जोंपर्यंत प्रकरणें उपस्थित होत राहतील तोंपर्यंत रामभाऊ गुर्जीकरांच्या पुस्तकांचा उपयोग व त्याबरोबर खुद्द त्यांची लोकांस आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं.

रामभाऊंचीं सदरहू पुस्तकें प्रसिद्ध झालीं तेव्हां चित्पावनादि द्रविड ब्राम्हणाकडून त्यांजवर सडकून टीका झाली व त्या टीकेला रामभाऊंनीं यथाशक्ति प्रत्युत्तर देण्याचाही यत्न केला होता हें वर सांगितलेंच. त्यावेळीं त्या विषयास महत्व होतें. आतां तितकें नाहीं. तेव्हां त्यासंबंधीं विशेष विस्तार न करतां सर्व प्रकाराविषयीं फक्त चार शब्द लिहितों. हेतु इतकाच कीं, गौ. सा ब्रा जातींतील तरुण मंडळींनीं आपल्या व इतर ब्राम्हण जातीसंबंधानें माहिती करून घेण्याकरितां रामभाऊंचीं दोन पुस्तकें जरूर एकवार तरी वाचावीं.

पेशवाईच्या अखेरी अखेरीस पुण्यास व इतरत्र मुख्यतः राजकीय कारणांनीं सारस्वत ब्राम्हणांसंबंधानें द्वेष उत्पन्न होऊन ते " हीन " जातीचे असा जो चित्पावनादि द्राविड ब्राम्हणांचा एकदां समज झाला तो कमी अधिक प्रमाणानें अद्यापि तसाच कायम आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. " पेशवाईच्या अखेरीस " असें आम्हीं मुद्दाम म्हटलें आहे. पेशवाईच्या पहिल्या अमदानींत म्हणजे थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत–सारस्वत ब्राम्हणांस पेशव्यांनीं इतर ब्राम्हणांप्रमाणें वागविल्याबद्दलचे दाखले मिळतात. इतकेंच केवळ नव्हे, तर पहिल्या बाजीरावांनीं व थोरल्या माधवरावांनीं सारस्वत स्वामीच्या मठास " भिक्षेनिमित्त " म्हणून सोडलेलीं गांवें त्या त्या मठांकडे अद्यापि चालू आहेत. या गोष्टीवरून सारस्वत ब्राम्हण–शेणवी–हे " कर्मी " जातीचे ही कल्पित पेशवाईच्या अवलीस निघाली

नव्हती, निदान त्या जातीच्या द्वेषास तेव्हां जोर तरी आला नव्हता असें स्पष्ट सिद्ध होतें. तशांतून " शेणवी कमी जातीचे " या कोटीस देण्यांत आलेली कारणें—तीं कारणें अद्यापि चित्पावनादिकांकडून पुढें करण्यांत येत असतात !—इतकीं पोंचट आहेत कीं, तशीं कांहीं तरी कारणें लावून प्रत्येक ब्राम्हण जातीला " हीन " पणा, वाटेल तेव्हां आणतां येण्यासारखा आहे. एवढेंच नव्हे, तर तसा हीनपणा चित्पावनादि जातींना देखील माधव कन्हाड्यानें ( शतप्रश्नलतिकाकर्ता ) चिकटविलेला आहे ! अशा स्थितींत चित्पावनादि जातींचे दोष मागें सारले जावेत आणि सारस्वतांचे तेवढे पुढें करण्यांत यावेत, याला राजकीय असूयेशिवाय दुसरीं कोणतीं कारणें असूं शकणार आहेत ? पण म्हणतात ना, कीं " सुंब जळालें तरी पीळ सुटत नाहीं. " म्हणून ? त्याच न्यायानें पेशवाई निघून गेली, तेव्हां तिच्याबरोबर तीं राजकीय कारणेंही विलयास गेलीं. परंतु सारस्वत ब्राम्हण " कमी, " ही चित्पावनादि लोकांची समजूत राहिली ती कायमची कायम !! तितक्यानेंही सारस्वतांचें कांहीं फारसें अडलें नसतें पण मग त्या कल्पनेस फांटे फुटूं लागले. पुन्हां त्या फांट्यांस दुसरे फांटे फुटूं लागले ! व इकडे पेशवाई बुडाल्यामुळें चित्पावनादि कांहीं लोकांस उद्योग नाहींसा झाला. अर्थात् मग ग्रामण्यें निघूं लागलीं व कांहीं गरीब सारस्वत ब्राम्हणांस त्रास होऊं लागला. असा प्रकार कांहीं दिवस चालला. पण चित्पावनादि ब्राम्हण पट घेईनात ! जणूं पेशवाई गेल्यामुळें आपलें सर्व बुद्धिसर्वस्व असल्या ग्रामण्यादिकांमध्येंच खर्चण्याचा त्यांनीं निश्चय केला होता !! पण हें चालावयाचें किती दिवस ? अशास्थितींत उच्च—नीचत्वासंबंधाचा खरा प्रकार काय हें सर्वांस कळावें म्हणून रामभाऊ गुंजीकरांनीं इ० स० १८८४ मध्यें आपलें " सरस्वतीमंडळ " लिहिलें त्यावर मागें सांगितल्याप्रमाणें शास्त्रीबोवा वगैरेकडून टीका झाली. नंतर रामभाऊंनीं आपला " भ्रमनिरास " प्रसिद्ध केला. याप्रमाणें त्या वेळचा सर्व प्रकार आहे. रामभाऊंच्या पुस्तकांत दोष मुळींच नव्हते अगर त्यांच्या हातून अल्पस्वल्प चुका झाल्या नसतील असें कोणी समंजस मनुष्य म्हणणार नाहीं. तथापि त्यांचा हेतु अगदीं निर्दोष होता यांत शंका नाहीं. चित्पावनादि ब्राम्हणांचा त्यांनीं कधीं द्वेष केला नाहीं कीं, त्यांच्या वाईटाची इच्छा केली नाहीं. आपल्या पुस्तकांवर टीका होईल हें त्यांना ठाऊक होतें. पण त्या टीकेंत कांहींकांकडून सभ्यतेचें अतिक्रमण होऊन " सरस्वती मंडला " ची तुसती टरच उडविली जाईल हें मात्र त्यांच्या ध्यानीं आलें नव्हतें ! असो. एकंदरींत झाला तो प्रकार

कळविलाच आहे. पण रामभाऊंच्या पुस्तकांवर जी टीका झाली, त्यांत संतापाच्या झणत्काराशिवाय अगर त्या, त्याच जुन्या कोटी पुढें करण्याशिवाय वाद विषयांवर खरा कांहीं नवीन प्रकाश पाडण्यासारखा एक शब्द असेल तर शपथ!

असो; एकंदरींत रामभाऊंनीं आपलें आयुष्य बहुतेक कांहींना कांहीं सदुद्योग करण्यांत घालविलें यांत शंका नाहीं. अशा प्रकारचे महाराष्ट्रवाङ्मयाचे निःसीम भक्त बेळगांवच्या बाजूस सारस्वत ब्राम्हणांमधून प्रसिद्धीस आलेले आमचे माहिती-प्रमाणें रामभाऊ गुंजीकर हेच होत.

रामभाऊ गुंजीकरांच्या मागे त्यांचे चिरंजीव, मुली वगैरे मंडळी चांगल्या सुस्थि-तींत आहेत त्यांचा एक मुलगा म्हणजे रा. रा. जयवंत रामचंद्र गुंजीकर हे चांगले सुशिक्षित तरुण गृहस्थ असून हल्लीं मुंबईस अकौंटंट जनरलच्या कचेरींत चांगल्या हुद्यावर आहेत. त्यांचा गणित हा विषय चांगला असल्याकारणानें कॉलेजांतील त्यांचा अभ्यासक्रम वाखाणण्यासारखा झाला होता. ते बी. एस् सी. परीक्षेत पहिले आल्यामुळें त्यांस एक फेलोशिप मिळालेली होती. तसेंच त्यांनीं आय्. सी. एस्. परीक्षेचा इकडेच अभ्यास करून फक्त परीक्षा देण्याकरितां ते इंग्लंडला गेले होते; पण त्यांत दुर्दैवानें त्यांस यश आलें नाहीं. तथापि हल्लीं ते चांगल्या हुद्यावर सरकारी नोकर असून योग्य कालीं ते चांगले उदयास येतील अशी आशा वाटते.

# नामदार न्यायमूर्ति काशिनाथ त्रिंबक तेलंग. के. सी. एस्. आय्.

"To every man upon this earth,
Death cometh soon or late;
How can man die better
Than facing fearful odds
For the ashes of his father
And the temples of his gods."

Horatius.

' जन्मास आलेल्याला मरण हे केव्हांना केव्हां तरी येणारच आहे; पण आपल्या देशासाठीं किंवा धर्मासाठीं येणाऱ्या मरणाहून दुसरें चांगलें मरण तें कोणतें असणार ! ' वस्तुतः जन्ममरणाचा त्रास मनुष्यप्राण्यासच आहे असें नाहीं; पशु-पक्षीही जन्मतात, वाढतात आणि मृत्यु पावत असतात. हें तर काय ! पण वृक्ष-वल्ली देखील जन्म वृद्धि, आणि मरण यांच्या क्रमांतून सुटल्या नाहींत. तेव्हां केवळ जन्म, वृद्धि आणि मरण यांमध्यें कांहीं विशेष नाहीं हें उघड आहे. त्यांत जन्माची गोष्ट तर स्वप्रयत्नाच्या बाहेरची आहे. तथापि चांगल्या कुळांत, चांगल्या माता-पितरांच्या पोटीं, चांगल्या सुस्थितींत, जन्म प्राप्त होणें यापासून मनुष्याला मोठे-पणा प्राप्त होत असतो; आणि त्या गोष्टीपासून त्याला भाग्यवंत हें नांव जन्मतःच प्राप्त होतें. त्या भाग्यवंत स्थितीचा खरा उपयोग करून घेण्यास मनुष्यानें सुखानें वाढणें आणि ती भाग्यवंत स्थिति उत्तरोत्तर वृद्धिंगत करण्याचा त्यानें उद्योग करणें, आणि त्यांत यश मिळविणें हें खरें भाग्य होय. आणि त्यांत पुनः निरंतर सदाचर-णानें व सौजन्यानें वागणें आणि आपल्या भाग्यवंत स्थितीचा जगताच्या हितार्थ व्यय करून सर्व लोकांकडून वाहवा मिळविणें हें अत्यंत मोठें भाग्य होय. आतां मनुष्याला अल्प वयामध्यें मरण येणें ही मोठी दुःखाची गोष्ट खरीच; आणि अशा प्रकारें योग्यता मिळविणारा खरा भाग्यवान् मनुष्य अल्पकाळांत मृत्युमुखीं पडणें,




नामदार न्या. मू. काशिनाथ त्रिंबक तेलंग, सी. आय्. ई.

यांसारखी दुसरी खेदकर गोष्ट नाहीं. तथापि मृत्यूपुढें कधींच कोणाचा यत्न चालत नाहीं, ही गोष्ट लक्षांत आणिली म्हणजे त्या अनिष्ट घटनेंमुळेंच त्याच्या त्या भाग्याची योग्यता तितकी अधिक लक्षांत येते, आणि तितका तो मनुष्य अधिक प्रशंसनीय वाटतो. नामदार न्यायमूर्ति काशीनाथ त्रिंबक तेलंग यांचा सर्व प्रकार तंतोतंत असाच झाला.

न्यायमूर्ति तेलंग हे मोठे विद्वान् व थोर पुरुष होते. त्यांच्यासारख्या विभूतींच्या गुणांचें यथार्थ वर्णन करून सर्व दृष्टींनीं वाचनीय व मनोरंजक असें त्यांचें चरित्र लिहिण्याचा अधिकारही तसाच थोर आहे. तशा अधिकाराला पात्र असा कोण महाराष्ट्रीय गृहस्थ कधीं पुढें येईल तो येवो. पण प्रसंगविशेषीं न्यायमूर्तींचे गुणानुवाद वर्णन करण्यांत आपल्यास धन्य मानून घेणारे हिंदवासी व युरोपीय असे अनेक थोर गृहस्थ होते व आहेत ही गोष्ट मात्र खरी! न्या० तेलंगांच्या केवळ विद्वत्तेस लुब्ध होऊन सर मायकल वेस्ट्रॉप मुंबई हायकोर्टांतील मुख्य न्यायपीठावर असेतोंपर्यंत कोणत्याही महत्वाच्या मुकदम्यांचा निकाल करण्यापूर्वी काशीनाथपंतांची सल्ला घेतल्याशिवाय अगर निकाल देतांना त्यांच्या जाड्या विद्वत्तेचा साभार व सादर उल्लेख केल्याशिवाय राहिले नाहींत. लार्ड रेसारख्या खंद्या व विद्वान् गुणग्राही गव्हर्नरानें मुंबई इलाख्यांत असेपर्यंत ज्यांत न्या० तेलंगांच्या विद्वत्तेचा अगर गुणांचा उल्लेख नाहीं असें एकही महत्वाचें भाषण केलें नाहीं! मुंबई हायकोर्टांत जज्जाच्या अधिकारावर असलेले व पुढें गव्हर्नरचे कौन्सिलर झालेले सर रेमंड वेस्ट यांजसारख्या विद्वान् आंग्लगृहस्थास तेलंगसाहेबांच्या निधनाची दुर्वार्ता कळतांच आपल्या देशबांधवांपुढें तेलंगांचे गुणानुवाद गाऊन न्यायमूर्तींचें अल्पसें चरित्र लिहिण्याची स्फूर्ति झाल्याशिवाय राहिली नाहीं. मुंबईचे प्रसिद्ध पुढारी सर फेरोजशहा मेहता तर आपल्या मृत मित्रांच्या अनुकरणीय गुणांचा सप्रेम उल्लेख करण्याची अद्यापि एकही संधि वायां जाऊं देत नाहींत हें सर्वविश्रुत आहे। प० वा० बद्रुदिन तय्यबजी यांच्या निधनाबद्दल मुंबईस जी मोठी सभा भरली होती त्या सभेंत अध्यक्ष या नात्यानें फेरोजशहांनीं केलेलें भाषण शक्य तर वाचकांनीं जरूर एकवेळ वाचून पहावें म्हणजे आमच्या म्हणण्याची सत्यता पटेल. त्यावेळचें भाषण मेहता साहेबांच्या अनेक भारदस्त, कळकळीच्या व उदात्त विचारपरिप्लुत अशा भाषणांपैकीं एक होतें, "सार्वजनिक कामांत प्रथमपासून न्या० तेलंग व न्या० बद्रुद्दीन यांच्यासारख्या थोर व विद्वान् मित्रांच्या स्नेहाचा मला सुदैवानें लाभ झाला हे खरोखर

परमेश्वराचे मजवर उपकार आहेत. " हे फेरोजशहांच्या तोंडचे उद्गार होते !! त्याचप्रमाणें न्या० रानड्यांचेंही काशीनाथपंतांवरील प्रेम अवर्णनीय होतें. मुंबईस एकदां तेलंगांच्या निधनतिथीच्या दिवशीं खानबहादुर ज० आ० दलाल, या विद्वान् गृहस्थांनीं जो एक सर्वोत्कृष्ट निबंध वाचला त्यांत त्यांनीं जे उद्गार काढले होते ते त्यांच्याच शब्दांनीं येथें सांगितले म्हणजे झालें ! दलालशेट म्हणाले:—

" Mr. Telang's scholarship has been eulogized by scholars of renown; his struggles for political and social reform, the difficulties to be faced and conquered in them, and the principles laid down for gradual advancement leading to final success, have been pictured before as by one who so long and so concordantly ran in couples with the deceased ( Mr. Telang ), that it is hard to decide who was superior of the two, specially because each was willing to concede all credit to the other and acknowledge him as a superior.. " सारांश, न्यायमूर्ती रानडे ' तेलंग आपले पुढारी व आपण त्यांचा अनुयायी ' असें म्हणत. व न्या. तेलंग हे रानड्यांस आपल्या गुरुस्थानीं मानीत असत ! अखेर थोर ते थोर इतकें खरें !! असो.

याप्रमाणें खरी वस्तुस्थिति असतांनां न्या. तेलंगांच्या जीवितक्रमाचें शब्दचित्र प्रस्तुत लेखकासारख्या अनधिकारी मनुष्यानें रेखाटण्याचा यत्न करणें म्हणजे बऱ्याच धाडसाचें काम होय ! आणि तें त्याच्या शक्तिबाहेरचें आहे. यास्तव त्या भरीस न पडतां फक्त तेलंगसाहेबांच्या आयुष्यक्रमांतील ठळक ठळक गोष्टींचाच येथें अनुवाद करण्याचा यत्न केला आहे.

**कुलवृत्तांत व जन्म**

पोर्तुगीज लोकांनीं जेव्हां मुंबई घेतली, तेव्हां त्यावेळच्या राजकीयसंबंधामुळे गोमंतकाकडून जे कित्येक गौडसारस्वत ब्राह्मण कारकुनी काम पत्करून मुंबईस आले, त्यांत काशीनाथपंतांचे पूर्वज होते. मुंबईतील पुरातन संभावित व बऱ्याच श्रीमंतीनें चालत आलेल्या घराण्यांपैकीं यांचें घराणें आहे. यांचें उपनांव तेलंग; ' तेलंग ' हें गांवाचें नांव आहे. सांप्रत गोव्यांमध्यें ' वेलंग ' किंवा ' वेलिंग ' म्हणून जो गांव आहे, तोच तेलंग असें म्हणतात; कोणी म्हणतात कीं, तेलंगाच्या

जवळच 'तेलंग' हा गांव होता; परंतु याविषयीं निश्चयात्मक रीतीनें सांगण्यास योग्य साधन नाहीं, तथापि या उपनांवाचा तेलंगणदेशाशीं कांहीं संबंध नाहीं, हें उघड आहे. तेलंग उपनांवाचे यांचे सगोत्र गृहस्थ गोमांतक, कानडा, दक्षिणमहाराष्ट्रांत वगैरे पुष्कळ आहेत. काशीनाथपंतांचे आजे रामचंद्रराव तेलंग यांस त्रिंबकराव, बापूराव वगैरे चार पुत्र होते. त्यांत त्रिंबकरावांचे पोटीं संतती नव्हती; म्हणून बापूरावाच्या कृष्णराव आणि काशीनाथपंत या दोन मुलांपैकीं धाकटे काशीनाथपंत यांस त्रिंबकरावजींनीं दत्तक घेतल्यामुळें, हे काशीनाथ त्रिंबक झाले. यांचें जन्म मुंबईशहरामध्येंच सन १८५० इसवीच्या आगष्ट महिन्यांत म्हणजे जन्माष्टमीच्या शुभदिवशीं झालें. यांना बालपणापासून घरचें शिक्षण उत्तमप्रकारचें मिळालें. यांची जन्मदात्री माता मुंबईतील प्रसिद्ध दळवी घराण्यांतील होती; आणि पोषणकर्ती माता प्रसिद्ध वागळे यांच्या घराण्यांतील कन्या; यामुळें यांच्या गृहशिक्षणाला तितकी विशेष मदत झाली.

**बालपण व विद्याभ्यास.**

वयाचे पांचवे वर्षीं ते महादेव पंतोजीच्या शाळेंत जाऊं लागले. या पंतोजी-संबंधानें येथें येवढा उल्लेख करणें जरूर आहे कीं, लहान मुलांस शिकविण्याचे कामीं यांचा हातखंडा असे. त्यांची विद्वत्ता जरी फार नव्हती तथापि कोंवळ्या मुलांचे मनावर योग्यप्रकारचा संस्कार करून देण्याविषयींची जबाबदारी त्यांस उत्कृष्ठ कळत असे. उपमा जरी पुष्कळच भारी होणार आहे, तथापि महादेव पंतोजी हे आपल्या कामांत ग्रांटसाहेबांसारखे होते अशी लोकांची समजूत आहे. तेलंग यांची तैलबुद्धि पाहून त्यांच्या पंतोजींस पराकाष्ठेचें कौतुक आणि अभिमान वाटत असे. त्यांच्या शाळेंत असतांनां तेलंगांनीं, मंडलीक, दांडेकर वगैरे त्या-वेळच्या डेप्युटींकडून उत्तम बक्षिसें मिळविलीं होतीं व या उभयतांसही तेलंग यांच्या बुद्धिमत्तेचें मोठें आश्चर्य वाटलें होतें. चार वर्षांमध्येंच मराठी व्यासंग पुरा करून वयाच्या नवव्या वर्षीं म्हणजे १८५९ च्या नोव्हेंबर महिन्यांत ते 'एलफि-न्स्टन इन्स्टिटयुशन' मध्यें गेले आणि आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर त्या शाळेंतील अभ्यासही थोड्याच अवकाशांत त्यांनीं पूर्ण केला. त्या शाळेचे सुपरिंटेंडेंट मि० आरदेसर फ्रामजी मूस हे होते. त्यांनीं यांची विलक्षण बुद्धिमत्ता व उत्कृष्ट वर्तणूक पाहून यांच्या भावी उन्नतीसंबंधानें भाकीत केलें होतें, तें त्यांच्या कल्पनेच्याही पलीकडे प्रत्ययास आलेलें पाहून त्या वृद्ध गृहस्थास मोठें समाधान

वाढउ असें ह्मणतात. तेलंगांचे लक्ष भाषाविषयाकडे जितकें असे, तितकें गणिता-कडे नसे. त्यामुळें त्यांच्या परीक्षाक्रमामध्यें हा ( गणित ) विषय कांहीं अडचण आणील कीं काय अशी पुष्कळांस भीति वाटली; पण रा० जनार्दन विनायक बापट व रा० नारायण महादेव परमानंद या उभयतांचे मदतीने आणि आपल्या उद्योगानें त्यांनीं ती आपली उणिव लवकरच भरून काढली. इंग्लिशभाषेच्या प्रावीण्याबद्दल त्यांस यी शाळेंतच दोन बक्षिस मिळालीं होतीं व पुढें शाळेचे प्रिन्सिपाल मिस्टर जेफरसन् आणि मिस्टर एडमंड बर्क यांचे हाताखाली असतानां क्यांडिडेट् वर्गा-मध्येंही यांची फार चागली निपुणता दिसून आली. याप्रमाणे चवदावें वर्ष संपतें आहे तोंच म्हणजे १८६४ सालीं त्यांची म्याट्रिक्युलेशनची परीक्षा उतरली. त्या-वर्षी काशीनाथपंत आणि श्रीपाद बाबाजी ठाकूर, असे दोघेच विद्यार्थी संस्कृतभाषेंत परीक्षेस बसले होते. यापूर्वी विश्वविद्यालयातील म्याट्रिक्युलेशन ( म्हणजे प्रवेश ) परीक्षेला संस्कृतभाषा कोणीही घेतली नव्हती. त्यांना कवितेची फार आवड होती, आणि कवितेमध्ये उत्कृष्ट गति होण्यास सस्कृत भाषेची फार जरूरी आहे असें जाणून त्यांनी त्या भाषेचा अभ्यास मुद्दाम आरंभिला. त्यावेळेस शाळेचे प्रिन्सिपाल मिस्टर जेफरसन् यानः तेलंगाच्या हुशारीचें मोठें कौतुक वाटून त्यांनी यांस "History of sanscrit literature" नामक प्रो० माक्समूलर साहेबांनीं केलेलें एक पुस्तक बक्षीस दिलें याच सुमारास त्यांनाः बुद्धिबळें खेळ-ण्याचा नाद लागून ते तीं या कोवळ्या वयातही मोठ्या खुषीनें खेळूं लागले.

प्रवेशपरीक्षा उतरल्याबरोबर ते कालेजमध्यें जाऊं लागले. तेथे आक्टिग प्रिन्सि-पाल मिस्टर ह्युलिग्ज व कायमचे प्रिन्सिपाल मि० चाट्फिल्डसाहेब, तसेच मेसर्स आक्झनहाम, क्याडी, व बुल्हर या प्रोफेसराच्या शिक्षणपद्धतीचा त्यांचेवर उत्कृष्ट संस्कार झाला. कालेजमध्यें प्रवश केल्यानतर दुसऱ्याच वर्षी त्यास ज्यूनियर स्कालर-शिप मिळाली. आणि त्याच वेळेस त्यानी भाऊचे राजे व गणपतराव विठ्ठल यांचीं मूल्यवान् बक्षिसें मिळविलीं. यातील गणपतराव विठ्ठल याचे बक्षीस उत्तम इंग्रजी निबंधाबद्दलचें होते. त्यावेळच्या त्याच्या सहाध्यायी मंडळीमध्ये श्रीपाद बाबाजी ठाकूर, गजानन कृष्ण भाटवडेकर, रावजी वासुदेव टुळू, घनश्याम निलकंठ नाड-कर्णी, अंबालाल साकरलाल देसाई, जमशेटजी अर्देसर दलाल, गोकुळदास कानदास पारख, सीताराम विश्वनाथ पटवर्धन वगैरे गृहस्थ होते. पण चमत्कार हा कीं, ही सर्व मंडळी कमीअधिक प्रमाणानें पुढें मोठी लौकिकवान व संपन्न अशी झाली. नंतर

सन १८६७ मध्यें तेलंगांची बी. ए. ची परीक्षा उतरली. त्यावेळीं त्यांचें वय अवघें १७ वर्षांचें होतें. बी. ए. झाल्यानंतर पुढच्याच वर्षी म्हणजे १८६८ सालीं त्यांची एलफिन्स्टन हायस्कूलमधील संस्कृत अध्यापकाचे जागेवर नेमणूक झाली, परंतु पुढें त्यांस एलफिन्स्टन कालेजामध्यें ज्यूनियर दक्षिणाफेलो नेमिलें. हीं बऱ्याच दगदगीचीं कामें संभाळून ह्याच वर्षी ते एम. ए. च्या परीक्षेस बसले, आणि त्यांतूनही ते उत्तमरीतीनें पसार झाले. १८६९ मध्यें त्यांस भगवानदास पुरुषोत्तमदास यांची संस्कृत स्कालरशिप मिळाली आणि त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी ते एल्. एल. बी. ची परीक्षा पास झाले. कालेजचे प्रिन्सिपाल मि० चॅट्फिल्डसाहेब हे, दलालशेटच्या म्हणण्याप्रमाणे, गुणांचे फार चाहते होते. अर्थात् काशिनाथपंत तेलंग ही एक चॅटफिल्डसाहेबांची प्यारी व्यक्ति होती म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांनी पुनः तेलंगसाहेबास १८७० मध्यें सीनियर दक्षिणाफेलो नेमिलें. सन १८६७ पासून सन १८७२ पर्यंत ते फेलोशिप संभाळून आपली आडव्होकेटचे परीक्षेस बसण्याची मुदत भरीत असत. त्या अवधींत त्यांनीं जें ज्ञान संपादन केलें, त्यामुळेंच पुढें त्यांचे इतके तेज पडलें. त्या पांच वर्षांत त्यांनीं कालेजांतील सबंध लायब्ररी वाचून काढली! त्यास तत्वशास्त्राची फार आवड होती. गीता, ब्रह्मसूत्रें, उपनिषदें, शारीरक वगैरे विषय पूर्वीच त्यांच्या स्वाधीनचे झाले होते. पुढें मिल्, हर्बर्ट, स्पेन्सर इत्यादि युरोपीय पंडितांचे ग्रंथ त्यांनीं वाचले. याप्रमाणें त्यांचें वाचन इतकें विस्तृत व विविध विषयक झालें कीं, ते पहिल्या नंबरचे बहुश्रुत विद्वान झाले. व सामान्यतः असा एकही विषय नव्हता कीं, ज्याविषयीं तेलंगानीं कांहीं वाचलेलें नाहीं! ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हे. असो.

शेवटीं वयाच्या २२ साव्या वर्षी १८७२ सालीं त्यांची आडव्होकेटची परीक्षा उतरली. ह्या परीक्षेस हे एकटेच उमेदवार असून मि. जस्टिस बेली, आडव्होकेट जनरल् मि. जे एस्. व्हाइट, आणि अपीलशाखेचे रजिस्ट्रार मि. रेमंड वेस्ट, हे परीक्षक होते. अशा रीतीनें त्याचा अभ्यासक्रम फार चांगल्या रीतीनें पार पडला. आता तेलंगांचा कालेजांतील अभ्यासक्रम वाखाणण्यासारखा नव्हता, असा आजवर कित्येकांचा सामान्य समज होता; पण तो त्यांवेळचे त्यांचे सहाध्यायी दलाल शेट, यांनीं अजिबात निराधार होता असें सिद्ध केलें आहे. तेलंगांच्या वेळीं इतिहास व अर्थशास्त्र हे विषय फार कठीण मानले जात असत. पण काशीनाथपंत तेच विषय व तर्कशास्त्र घेऊन बी ए. झाले! तेव्हां त्यांचा शाळेंतील व कालेजांतील अभ्यासक्रम

उत्तमांपैकीं होता हेंच खरें म्हटलें पाहिजे. येथपर्यंत जरी त्यांचा अभ्यास केवळ परीक्षाक्रमापुरताच झाला; तरी त्यांचा खरा अभ्यास बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतरच झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण त्यांनीं, बी. ए. च्या परीक्षेस जे वर सांगितलेले ऐच्छिक विषय घेतले होते त्यांचें केवळ तात्पुरतें ज्ञान आपल्यास झालें असून त्यांचें स्वामित्व प्राप्त झालेलें नाहीं; तेव्हां तें प्रथम मिळविलें पाहिजे असें तेलंगाच्या मनानें घेतलें! या कारणासाठीं त्यांनी आत्मशिक्षणार्थ प्लेटोचे तत्वशास्त्रसंबंधी संवाद "Professor Gowett's English Translation" वगैरे विषयांचा फिरून मननपूर्वक अभ्यास करून ते विषय जसेच्या तसे उतरून काढण्याचा उपक्रम केला! त्याचप्रमाणें चिलिंगवर्थ यांनी केलेला प्रॉटेस्टंट लोकांचा धर्मसंबंधी ग्रंथ वाचला आणि त्यांतील विचार आपलेसे करण्याचा यत्न करून त्यांनीं आपल्या लेखनशक्तीस व विचारास वळण दिलें. अभ्यासाचे वेळी मनाची एकाग्रता प्राप्त व्हावी ह्मणून त्यांनीं बीजगणित व भूमितीचे सिद्धांत सोडविण्याचें आरंभिलें! हल्लीं लोक बी. ए. झाल्यानंतर आपल्या सर्व पुस्तकास व अभ्यासास रजा देतात असें म्हटल्यास तें केवळ वस्तुस्थितीविरुद्ध होईल असें म्हणतां येणार नाहीं. तशांत भूमितीच्या सिद्धांताची गोष्ट काढली म्हणजे तर कित्येकांचे डोके फिरतें; पण नामदार तेलंगांनीं असल्या विषयांचा खरा अभ्यास बी. ए. झाल्यावर केला आणि एक वेळ एकाग्र मन करण्याची व मनन करण्याची शक्ति आपल्या अंगीं आल्यानंतर पुनः बी. ए. चे विषय वाचले. तों आपल्या मनांत नवीनच प्रकाश पडला असें त्यांना वाटलें. एम. ए. च्या परीक्षेसाठीं त्यांनी इंग्रजी छंदःशास्त्र घेतलें होतें व त्याचें अध्ययन करतांना इंग्रजी कविता करण्याची संवय व्हावी म्हणून त्यांनीं भगवद्गीतेचें इंग्रजी यमकरहित कवितारूपानें "Blank verse" भाषांतर केलें! ती त्यांची इंग्रजी गीता प्रसिद्ध झाली आहे व तिच्या उत्तमत्वाबद्दल मोठमोठ्या युरोपियन पंडितांनीं आपले अनुकूल अभिप्राय दिलेले आहेत. या गोष्टीवरून इंग्रजी भाषा ही तेलंगांच्या किती अंकित होती हें सहज व्यक्त होतें! यावेळेपासून काशीनाथपंतांचें वाचन अनेक दिशांनीं विस्तृत प्रमाणावर सुरू झालें. सामान्यतः मनुष्यस्वभाव असा आहे कीं, एखाद्याचें वाचन चालू असलें म्हणजे त्याच्या डोक्यास अर्थात् विचारशक्तीस चलन मिळाल्याशिवाय रहात नाहीं; व तें चलन मिळालें म्हणजे त्याचे विचार लेखणीवाटे अगर मुखावाटे बाहेर पडलेच पाहिजेत! परमेश्वरकृपेनें या दोन्ही देणग्या काशीनाथपंतांना प्राप्त झाल्या होत्या व त्यांचा त्यांनीं उपयोगही चांगल्या

रीतीनें केला. त्यांचें वाचन इतकें कांहीं जबर होतें कीं, त्यांनीं मुंबईतील ' रायल एशियाटिक सोसायटीची लायब्ररी ' ' नेटीव्ह जनरल लायब्ररी ' वगैरे प्रसिद्ध पुस्तकालयांतील बहुतेक नामांकित, उपयुक्त व वाचनीय पुस्तकें मननंपूर्वक वाचलीं होतीं. त्यांची धारणाशक्तिही विलक्षण होती. पुष्कळ लोकांना पुस्तकें वाचण्याचा नाद असतो. पण एक पुस्तक टाकून दुसरें हातीं घेतलें कीं, पहिल्या पुस्तकापैकीं या वाचणाराजवळ कांहीं शिल्लक राहायाचें नाहीं. प्रतिदिवशीं मी अमुक इतकीं पानें वाचलीं इतक्यावरच त्याला संतोष वाटत असतो. पण काशीनाथपंतांचा प्रकार तसा नव्हता. ते चांगले कुशाग्रबुद्धीचे असल्यामुळें व त्यांची ग्रहणशक्ति व स्मरणशक्ति, हीं चांगलीं असल्यामुळें ते जें पुस्तक वाचण्यास घेत तें बहुधा त्यांचेंच होऊन जाई। यामुळें कोणताही विषय त्यांचेपुढें चर्चेला आला असतां दोहों बाजूंच्या साधकबाधक प्रमाणांचा विचार करून त्याचा निकाल करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं आलें होतें. पण इतक्या दांडग्या विद्याव्यासंगाचा व ग्रंथ परिशीलनाचा लाभ इतरांस करून देण्यासाठीं अंगीं एका प्रकारची हौस असावी लागते तिचीही काशीनाथपंतांच्या ठिकाणीं कमतरता नव्हती. तसेंच ती हौस पुरी करण्याचे दोन मार्ग—म्हणजे लेखनशक्ति व वक्तृत्वशक्ति—तेही तेलंगांस परमेश्वरकृपेनें साध्य झालेले होते.

त्याच्यावेळीं नानाशंकरशेटच्या घराजवळील शाळेंत विद्यार्थ्यांची सभा भरत असे. तेथील व स्टुडंट्सलिटररी आणि सायंटिफिक सोसायटीची एकही सभा काशीनाथपंतांनी सहसा चुकविली नाहीं. दोन्ही संस्थांच्या दरएक सभेशी निबंधकार किंवा व्याख्यानकार, अगर अध्यक्ष या नात्यानें काशीनाथपंतांचा संबंध असे. व हाच त्यांच्या पुढील वक्तृत्वाबद्दलच्या कीर्तीचा पाया होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. असो.

**धंद्याचा आरंभ व उत्कर्ष.**

सन १८७२ सालीं परीक्षा पास झाल्यानंतर त्या सालच्या जून महिन्यांतच तेलंगांनीं आडव्होकेटचे धंद्यास सुरवात केली. तेव्हां पासून कायद्यांच्या पूर्ण ज्ञानानें त्यांची दिवसेंदिवस अत्यंत भरभराट होत गेली. न्यायासनापुढें पक्षकाराच्या तर्फेनें भाषण करीत असतां, त्यांतील कायदेशीर मुद्देसुदपणा व युक्तिवाद पाहून त्यांचेवर न्यायाधीशांची मर्जी नेहमीं प्रसन्न असे. अशारीतीनें क्रम चालला असतां सन १८७५ सालीं प्रसिद्ध ' माणकुवरबाई ' चें अत्यंत बिकट झालें हायकोर्टामध्यें आलें. त्यांत यांनीं जे बिनतोड मुद्दे काढिले ते पाहून त्यावेळचे

चीफ जस्टिस सर मायकेल वेस्ट्राप हे फार खुष झाले. व तदनंतर प्रसंग येईल तेथे ते सद्गृहस्थ या तरुण आडव्होकेटच्या बुद्धिमत्तेची व न्यायनिपुणतेची प्रशंसा केल्याशिवाय रहात नसत. इतकेंच केवळ नव्हे तर सदर साहेबांनीं तेलंगांची भरकोर्टांतही अनेकदां तारिफ केली असून त्यांनीं आपल्या ठरावांतून देखील कित्येकवेळां त्यांच्या विद्वत्तेसंबंधानें प्रशंसापर उद्गार काढले आहेत. नामदार तेलंगांसबंधानें वेस्ट्राप साहेबांचा इतका उत्कृष्ट ग्रह झाला होता कीं, हिंदुधर्मशास्त्राचे वादग्रस्त प्रकरणांत ते यांचा नेहमीं सल्ला विचारीत असत; आणि यांचे अंगचे गुणावरून ते नेहमीं म्हणत कीं. तेलंग हे पुढें मागें केव्हांतरी खास हायकोर्टाचे जज होतील. पुढें त्या थोर गृहस्थानें केलेलें हें भविष्य खरेंही झालें असो. तेलंग यांच्या गुणानें अव्वल व अपील या दोन्ही शाखांकडची कामें त्यांस पुष्कळ मिळूं लागून त्यांचा चोहांकडे लौकिक झाला; व तदनुरूप त्यांचेवर पक्षकार, व्यवसायबंधू व खुद्द न्यायाधीश यांचा साहाजिकच भरंवसा बसूं लागला. सन १८७७ मध्यें त्यांना मुंबई विश्वविद्यालयाचे फेलो नेमण्यांत आलें, व १८८१ मध्ये ते सिंडिक झाले. ते त्याच्यापूर्वींच 'जस्टिस आफ् दी पीस, झाले होते. पुढें एज्युकेशन मिशन या नांवाचीं जी मंडळी सन १८८१ मध्यें लार्ड रिपन साहेबांनीं नेमली होती. तींत आमच्या बाजूच्या फक्त ना० तेलंगांनाच एतद्देशियांपैकीं एक सभासद नेमिले होतें. त्यावेळीं त्या कमिशननें केलेल्या चौकशीच्यावेळीं तेलंगसाहेबांनीं जे आपले विचार प्रकट केले आहेत. त्यांची मार्मिकता खरोखरी मोठी वाखाणण्यासारखी आहे. सदरहू कमिशनच्या रिपोर्टांत काशिनाथपंतांनीं आपलें मत निराळें लिहिलें होतें. त्या संबंधानें हिंदुस्थान सरकारानें असा शेरा मारला कीं, "रिपोर्टाच्या ६७२ पृष्ठावर नमूद झालेले मि० तेलंग यांचे मुद्दे निरुत्तर आहेत!!!" हें काम त्यांनीं स्वतःच्या धंद्याची नुकसान करून केलेलें होतें. त्याबद्दल त्यांना सरकारानें सन १८८३ मध्यें सी. आय ई. ही बहुमानाची पदवी दिली.

१८८० मध्यें तेलंगांना ठाण्याच्या जाइंट जजाची जागा वेस्ट्राप साहेबांच्या शिफारशीनें आली होती, परंतु ती त्यांनीं स्वीकारिली नाहीं. लार्ड रे यांचे कारकीर्दींत तेलंग यांस दोनवेळां कायदेकौन्सिलचे सभासद नेमण्यांत आलें होतें, तसेंच त्यांस नामदार व्हाइसराय यांचे सुप्रीम कायदेकौन्सिलमधील सभासद नेमण्याबद्दलही शिफारस करण्यांत आलेली होती. परंतु त्यांनीं तो बहुमान कार्यबाहुल्यामुळे पत्करिला नाहीं. त्यांनीं कांहीं दिवस आक्टिंग लॉ प्रोफेसरचें काम केलें होतें; आणि १८८८

मध्यें त्यांची त्याचजागीं कायमची नेमणूक झाली. पुढें १८८९ मध्यें त्यांस जस्टिस नानाभाई हरीदास यांचे मागून हायकोर्टाचे जज्जाची जागा मिळाली; त्यापूर्वी एक वर्षभर अगोदर सरकारानें त्यांस युनिव्हर्सिटीचे व्हाइसचान्सेलरचा सन्मान दिला होता. तेलंगसाहेब हे याप्रमाणें युनिव्हर्सिटींत व हायकोर्टात नेटिव्हांस मिळणाऱ्या अत्युच्च पदवीला बहुतेक एकाचवेळीं पोंचले असें म्हणण्यास हरकत नाहीं. हीं दोन्हीं कामें त्यांनीं मोठ्या कर्तबगारीनें बजाविली. व याप्रमाणें तेलंग यांचा पुष्कळांच्या कल्पनेच्या बाहेर उत्कर्ष झाला असो.

तेलंगांबद्दल वेस्ट्राप साहेबांच्या मनांत अभिमान व सहानुभूति वसत असल्यामुळें त्यांस हायकोर्ट जज्जाची जागा मिळावी एतदर्थ इंग्लंडमध्ये त्यांनीं खटपट केली होती असें म्हणतात कदाचित् ती गोष्ट खरीही असेल. पण त्याशिवायही न्या. तेलंगांस जज्जाची जागा मिळण्यास दुसऱ्या अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या होत्या हेंही विसरतां कामानये. त्यांचें आचरण अत्यंत शुद्ध होतें; त्यांची नीतिमत्ता दांडगी होती; त्यांच्या आंगीं चतुरस्रपणा होता व त्यांनीं लोककल्याणार्थ पुष्कळ कामें केलीं होतीं. इतक्या गुणसमुच्चयाचें वास्तव्य तेलंगांप्रमाणें त्यावेळीं दुसऱ्या कोणाही व्यक्तीमध्यें नव्हतें. दुसरे अनेक पंडित होते. विद्वान होते, वक्ते होते, सदाचरणी होते; परंतु हे सर्व गुण तेलंगांमध्यें एकवटलेले होते; व हेंच त्यांच्या नेमणुकीचें मुख्य कारण होतें. सारांश, वरील कारणामुळें लॉर्ड रे व चिफजस्टिस सरचार्लस सार्जेंट यांनीं तेलंगांची शिफारस केली आणि त्याप्रमाणें त्यांची हायकोर्ट जज्जाच्या जागीं नेमणूक होऊन ते न्यायमूर्ति तेलंग झाले! एतद्देशीय सुशिक्षित गृहस्थांस आजकाल अत्यंत उच्चदर्जाची जागा मिळण्यासारखी ती हीच! ती न्या. तेलंगांना त्यांच्या वयाच्या ३९ वे वर्षी मिळाली. त्याच्यापूर्वी सरकारी नोकरी आपण होऊन तेलंगांकडे दोन वेळां चालून आली होती पण त्यांनी ती प्रत्येकवेळीं नाकारिली होती. सन १८७० च्या सुमारास मि० पील हे विद्याखात्याचे डायरेक्टर होते. व त्यांनी दोन नवीन हायस्कुलें स्थापन केलीं होतीं. त्यांपैकीं एका शाळेंतील हेडमास्तरची जागा त्यांनी ना तेलंगांस देऊं केली होती, पण ती त्यांनीं नको म्हटली. त्यावेळीं मि० पील साहेबांनीं बराच आग्रह धरला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ॲडव्होकेटची परीक्षा देऊन हायकोर्टात जस्टिस रानडे व बॅरिष्टर बाळमंगेश वागळे यांना जाऊन मिळण्याचा पूर्वीच त्यांचा निश्चय झालेला होता! पुढें सन १८८० च्या सुमारास रा. ब. गोपाळराव देशमुखांनीं पेनशन घेतांच त्यांच्या ठाण्याच्या

जॉइंट जजाच्या जागीं सरकारांतून तेलंगांची नेमणूक होऊन आली. पण तेव्हांही त्यांनी तो मान नाकारला. वस्तुतः हायकोर्टांतील नेमणुकीच्या दृष्टीनें सदर्हू जागा त्यांनी नाकारिल्या तें ठीक झालें असेंच म्हटलें पाहिजे. हायकोर्टांत जज या नात्यानें त्यांनी केलेली कामगिरी जगापुढें आहेच. त्यासंबंधानें येथें विशेष लिहिण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

**सार्वजनिक उद्योग**

येथपर्यंत ना. तेलंगांची त्यांच्या धंद्यांत कसकशी सरसी होत गेली त्याचें सामान्य विवेचन झालें. पण आमच्या लोकांनीं न्यायमूर्तिंची स्मृति ताजी राखण्याचीं कारणें त्याहून निराळीं आहेत. धंदा चांगल्यारीतीनें चालवून नांवलौकीक मिळविलेले पुष्कळ लोक मिळतील. पण तो संभाळूनही काशिनाथपंतांकडून जी आपल्या वाङ्मयाची व देशाची उत्तमप्रकारची सेवा घडली तीच त्यांचें नांव आपल्यामधील आधुनिक काळच्या थोर पुरुषांत चिरस्थायी होऊन राहण्याचें खरें कारण होय ! देशाच्या उन्नतिसाठीं आणि लोककल्याणाच्या ज्या कांहीं खटपटी चालत त्यांत यांचें अंग प्रमुखत्वानें असे. किंबहुना या सर्व चळवळीचें जनकत्वही केव्हां केव्हां यांचेकडे असे. असें म्हणण्यासही हरकत नाहीं. उथळपाण्याप्रमाणें सार्वजनिक कार्यामध्यें मोठा खळखळाट न करितां आपला इष्ट हेतु शांततेनें साधण्याची त्यांची शैली अपूर्व असे.

वस्तुतः साऱ्या दिवसभर धंदा केल्यावर माणसास थोडा करमणूक म्हणून पाहिजे लागते. तदनुरूप कोणाला एखादें व्यसन अथवा बरी वाईट संगति हवी असते ! पण जेथें व्यसनच मुळीं विद्येचें, आणि संगत केवळ समानशील लोकांची त्यांची गोष्ट काय सांगावी ? " **विद्यायां व्यसनं स्वयोषिति रतिः** " या सद्गुणांच्या जोडीचें तेलंगांच्या अंगीं आमरण वास्तव्य होतें ! त्यांचें नेहमीं असें म्हणणें असे कीं, " A man who confines himself to his profession or service alone, is but a fragment of a man, and every one should endeavour to have some special occuptaion outside his calling, which he should cultivate in his leisure hours. " सारांश, मनुष्यानें आपल्या निर्वाहाचा व्यवसाय संभाळून दुसरा कांहीं तरी सार्वजनिकरीतीचा अथवा परोपकाराचा व्यवसाय करण्याचा यत्न केला नाहीं, तर त्याचें जीवित केवळ व्यर्थ

होय. उदरंभरणार्थ कराव्या लागणाऱ्या व्यवसायांपेक्षां आपल्या हातून कांहींतरी महत्वाचें कार्य व्हावें असा नेहमीं मनुष्यमात्रानें हेतु धरला पाहिजे. आणि तो साधण्याकडे त्यानें आपला इतर वेळ खर्चला पाहिजे. याच तत्वाबरहुकूम तेलंगांचें वर्तन होतें. त्यांच्या आवडीचे विषय म्हटले म्हणजे इंग्रजी व संस्कृत वाङ्मय; राजकीय विषय, अर्थशास्त्र, इतिहास व मराठी वाङ्मय हे होत. त्यांना त्यांच्या धंद्याचें पुष्कळ काम मिळत असूनही व सार्वजनिक कामाकडे त्यांचा ओढा असतांनाही त्यांना आपल्या आवडीच्या विषयांकडे लक्ष पुरविण्यास फुरसत मिळत असे. सदर्हू विषयांचें त्यांचेकडून सदोदित परिशीलन चाले व तें इतकें उत्तमपैकीं असे कीं, एकादेवेळीं लहान लहान पुस्तकें, टीकाविषयक लेख, निबंध, व्याख्यानें वगैरे फळांच्यारूपानें ( त्यांचा ) जणूं प्रवाह चालला आहे कीं काय असा भास होई! व लोकांस वाटे कीं, तेलंगांना इतका वेळ मिळतो कसा!! पण निरलसत्व आणि वेळच्यावेळीं काम करण्याची संवय हीं एकदां ज्याचे अंगीं बाणलीं त्याला फुरसतीची काय कमतरता? असो.

तेलंगांपूर्वी मुंबईत सार्वजनिक कामें करणारे म्हणजे डॉ० भाऊदाजी, शेट दादाभाई नवरोजी, नवरोजी फर्दुनजी, सर मंगळदास नथुभाई, रावसाहेब मंडलीक वगैरे गृहस्थ असत. या कसलेल्या मंडळींच्या कक्षेत न्या० तेलंग हे आपल्या सार्वजनिक जीवनक्रमाच्या आरंभास येतांच त्या मंडळींच्या स्फूरणाचा यांच्यांत संचार झाला. त्यावेळीं त्यांच्या अंतःकरणांत जें बीजारोपण झालें, त्याचाच पुढें मोठा वृक्ष झाला. नामदार तेलंग हे जात्याच मनमिळाऊ, निरभिमानी व आस्थेवाईक रीतीनें कोणतेंही सार्वजनिक काम करणारे असल्यामुळें त्यांची प्रत्येक ठिकाणीं जरूरी वाटूं लागली ते पहिल्यानें "बॉम्बे असोशिएशन" चे बरींच वर्षे चिटणीस होते. व पुढें त्या संस्थेचीच जेव्हां हल्लींची "प्रेसिडेन्सी असोशिएशन" झाली तेव्हां त्या व्यवस्थेमध्यें त्यांचें मुख्य अंग असून त्या नवीन संस्थेचे देखील सन १८८९ पर्यंत ते एक सेक्रेटरी होते. सार्वजनिक कामांत मन घालूं लागल्यापासून, तेलंगांच्या आंगचा दुसरा एक गुण प्रकट होऊं लागला. तो वक्तृत्व हा होय अगोदरच तेलंगांच्या वक्तृत्वाची व मुद्देसूद कोटिक्रमाच्या शैलीची हायकोर्टांत वाहवा झालेली होती आतां तर सार्वजनिक वक्ते या नात्यानें त्यांच्या वक्तृत्वाची जिकडे तिकडे प्रशंसा होतांच, प्रत्येक सार्वजनिक प्रसंगीं तेलंगांचें एक तरी भाषण झालेंच पाहिजे असा प्रकार झाला. त्यांच्या वाणीमध्यें असें कांहीं विलक्षण सामर्थ्य असे कीं,

' हिंदुयूनियन ' क्लब वगैरे ठिकाणीं अनेक प्रसंगीं निरनिराळ्या विषयांवर इतर वक्त्यांचीं सभाषणें झाल्यानंतर अध्यक्ष या नात्यानें त्या सर्वांची एकवाक्यता करण्याचें काम नामदार तेलंग यांजकडे जेव्हां जेव्हां येई, तेव्हां तेव्हां हे आतां काय निकाल सांगतात, इकडे सर्व मंडळींचें लक्ष लागून राही. कित्येकदां असें होई कीं वादी प्रतिवादी यांच्या भाषणांमध्यें चुकतें कोठें व ते टाळावें कसें हें यांनीं अचूक दाखवून द्यावें, व दोहों पक्षांच्या मंडळींची समजूत पाडावी!

त्यांच्या भाषणशैलीसंबंधानें असें नमूद झालेलें आहे कीं:—

"As a public speaker, he is unrivalled for chaste and polished style, close reasoning, and fluent, melodious and impressive delivery His eloquence has no artificial aid of posture and gesticulations, no rises and falls, no set phrases and impassioned periods. He indulges in no elaborate preparation. He settles his line of thought, and leaves the words for the occasion."

सारांश, सार्वजनिक वक्त्याचे नात्यानें पाहिल्यास त्यांच्याइतकी शुद्ध व भारदस्त इंग्रजी भाषा वापरण्याची हातोटी त्यावेळीं कोणासच साधली नव्हती. त्यांची बोलण्याची पद्धत अस्खलित, कानाला गोड आणि चित्तवेधक अशी असे. उभें राहण्याची पद्धत, हावभाव, आवाजांत चढउतार, किंवा ठरीव शब्दलालित्य इत्यादि कृत्रिम साधनांनीं आपलें वक्तृत्व खुलविण्याची गरज त्यांना कधीं भासली नाहीं. भाषणाची तयारी अगाऊ करण्याचे भानगडींत ते कधीं पडलेच नाहींत. त्यांनीं आपली विचारसरणी एकवेळ पूर्वी ठरवावी, म्हणजे तिला अनुरूप अशी भाषा त्यांना आयत्यावेळीं आपोआप सुचे. न्या० तेलंग यांसही इंग्रजी भाषा जणूं अत्यंत वश झालेली असून तींत आपले विचार अगदीं सुबोधरीतीनें ग्रथित करण्याची हातोटी चांगली साधलेली होती त्यांच्या इंग्रजी भाषाशैलीसंबंधानें खुद्द युरोपीय गृहस्थांनीं कित्येकदां तारीफ केलेली आहे. परलोकवासी मॅक्लीनसाहेब म्हणजे बॉम्बे गॅझेटचे माजी संपादक—यांच्या आपल्या मायभाषे ( इंग्रजी भाषे ) विषयींच्या अभिमानाचा मार्ग ( ना. नारायणराव दाभोळकरांचें चरित्र पहा ) उल्लेख आलेलाच आहे. त्यांनीं एकदां तेलंगांचें एक अत्युत्तम भाषण ऐकून आपल्या पत्रांत

असे उद्गार काढल्याचें स्मरतें:—"इंग्रजी भाषेंत काय करामत आहे हें पहाणें असल्यास कालचें ना० तेलंगांचे भाषण वाचावें."

हा अभिप्राय विशेष महत्वाचा म्हणून अत्यंत संस्मरणीय आहे. हा अभिप्राय देणारे गृहस्थ मोठे विद्वान व खंदे लेखक होते, आणि इंग्रजी भाषा तर त्यांची मातृभाषाच होती तेव्हां अशाप्रकारचा अनुकूल अभिप्राय मि० म्याक्लीन सारख्या गृहस्थाकडून मिळाला तेव्हां नामदार तेलंग यांचे इंग्लिश भाषेचें ज्ञान व त्यांची वक्तृत्वशक्ति किती वर्णनीय होती हें सहज कळण्यासारखे आहे त्यांतूनही ह्या अभिप्रायाची किंमत जास्त मानण्याचीं तशी कारणें आहेत मि० म्याक्लीन साहेबांचें अंतःकरण हिंदुस्थानासंबंधीं फारसें सहानुभूतियुक्त असें नव्हतें. त्यांना अस्मद्देशीयांचें बरें असें कोणतेंच पसंत नव्हतें; अस्मद्देशीयांना उच्चप्रतीचें शिक्षण नको म्हणून कांगावा यांनींच सुरू केला होता; ना० प्रो० दादाभाई नवरोजी वगैरे सारख्या खऱ्या भारतजननी सत्पुत्रांच्या अस्मद्धितार्थ चाललेल्या प्रत्यक्ष खटपटीवर विरजण घालण्यास हे नेहमीं तयार असत· इतकेंच नव्हे तर आमच्या सुदैवानें एखादा इंग्रज गृहस्थ आमच्या हिताकरितां झटूं लागला तर तें देखील त्यांना सहन होत नसे 'हिंदुस्थानांत दारिद्र्य फार असून तें दिवसेंदिवस वाढत्याप्रमाणावर आहे. तेव्हां त्याकडे सरकारानें कांहींच लक्ष न दिल्यास पुढें मागे त्यापासून कांहीं अनर्थ उद्भवण्याची भीती आहे' इत्यादि स्पष्टपणें प्रतिपादन करणाऱ्या मि० ह्यूम साहेबांस गोळी घालून दूर करावें असे अविचाराचे पण खऱ्या अन्तर्वृत्तीचे दर्शक उद्गार यांच्याच तोंडांतून भरपार्लमेंटांत निघाले होते. तेव्हां अशा गृहस्थांकडून ना० तेलंगांना वरीलसारखा अभिप्राय मिळावा म्हणजे तेलंगांची योग्यता लोकोत्तर असल्याशिवाय तसा प्रकार घडताना. इंग्लिश लोकांच्या देशांत न जातां. लौकिक आणि घरगुती अशाप्रकारची इंग्लिश भाषा बोलण्याची हातोटी साधली होती आणि त्यांच्या सभ्यपणाच्या रीतीनें वागण्याच्या पद्धतीची ज्यांस माहिती होती, असे नेटिव्ह गृहस्थ म्हणजे बहुतेक मि० तेलंग हेच होत. अशी युरोपियन लोकांची समजूत झाली होती. तेलंगांच्या गुणामुळें मुंबईहायकोर्टांतील चीफ जस्टीस साहेब, व इतर अधिकारी, वकील, बॅरिष्टर वगैरे मंडळींची त्यांजसंबंधानें मोठी पूज्यबुद्धि असे. मुंबईस एकेप्रसंगीं कलकत्त्याचे प्रख्यात लाल मोहनघोस यांचें वक्तृत्वपूर्ण भाषण ऐकून न्या० तेलंग फार खुष झाले व म्हणाले कीं "मि० घोसच्या तोडीचा वक्ता सबंध हिंदुस्थानांत मिळणार नाहीं." पण दुसऱ्यादिवशींच मुंबई टाइम्सकारानें आपल्या

पत्रांत लिहिलें कीं, " मि० तेलंगांचा वरील शेरा बरोबर आहे; परंतु आमच्यामतें त्याला एकच अपवाद आहे तो खुद्द मि० तेलंग हेच होत!" याप्रमाणें वक्तृत्वा-संबंधानें त्यांच्याविषयीं जितकें लिहावें तितकें थोडेंच आहे. असो.

म्या तेलंगांनीं अनेक मोठमोठ्या प्रसंगीं केलेलीं भाषणें प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं कांहीं मुख्य मुख्य भाषणांचा येथें उल्लेख करितो. त्यांचें पहिलें भाषण त्यांचे वयाच्या २२ साव्या वर्षी म्हणजे १८७२ मध्यें मुंबईमध्यें फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूटमध्यें झालें. त्याप्रसंगीं मि क्राफर्ड म्यूनसिपल कमिशनर होते. तेलंगांचें भाषण म्यूनसि-पालव्यवस्थेसंबंधानें होतें व तें जरी त्यांचें पहिलें भाषण होतें तथापि तें फार उत्कृष्ट झालें व त्यांत त्यांनीं हल्लींच्या स्थानिक स्वराज्याच्या स्वरूपाचें दिग्दर्शन केलेलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचें दुसरें महत्वाचें भाषण १८७३ मध्यें मिठा-वरील करासंबंधानें झालें. तें भाषण जरी थोडें आवेशाचें झालें, तरी त्यांत त्यांज-कडून सहसा मर्यादाभंग झाला नाहीं. या भाषणाबद्दल खुद्द तात्कालीन बॉम्बे गॅझे-टचे एडिटर मि० जे. एम. म्याक्लीन यांनी आपल्या पत्रांत स्तुति केली आहे. त्यानंतर त्यांचें तिसरें महत्वाचें भाषण मुंबईतील घरें बांधण्यासंबंधाच्या (म्यूनसिपाल) नियमांविरुद्ध झालें व त्याचा परिणामही चांगला झाला. त्याचवेळेस त्यांनीं सिव्हिल-सर्व्हिसमध्यें देशीलोक अधिक घ्यावे अशाविषयीं एक भाषण केलें. पुढें सन १८७६ मध्यें रेव्हिन्यू ज्युरिसडिक्शन बिलाविरुद्ध त्यांचें भाषण झालें. याप्रसंगीं मि० डोनाल्डग्राहाम हे अध्यक्ष होते. तेलंगांच्या या भाषणाबद्दल इंग्लिश लोकांत त्यांची फार वाहवा झाली. यापुढें १८७८ मध्यें लार्ड लिटनच्या कारकीर्दीमध्यें लायसेन्स ट्याक्सच्या विरुद्ध एक त्यांचें भाषण झालें. याप्रसंगीं त्यावेळचे गव्हर्नर सर रिचर्ड-टेंपल यांजकडे सभेच्या कामाकरितां टॉउनहॉल देण्याबद्दल मागणी केली होती, परंतु तिचा उपयोग न झाल्यामुळें ही सभा प्रसिद्ध वुइल्सन सर्कसच्या भव्य तंबूंत भरली होती. त्याप्रसंगीं तेलंगांचें भाषण अत्युत्तम झालें. तेव्हां कित्येक नामांकित विद्वान लोकांनी त्यांस ब्राइटची उपमा दिली. यानंतर १८७९ सालीं म्यानूचे-स्टरच्या मालावरील जकात कमी करण्याबद्दलचा जो विचार घाटत होता त्याविरुद्ध पार्लमेंटास अर्ज करण्याविषयीं लोकांस प्रोत्साहन देण्याविषयीं त्यांचें भाषण झालें. त्याव-रून अर्थशास्त्रामध्येंही यांची उत्कृष्ट गति आहे असें लोकांस उघड दिसून आलें. त्यावेळीं कलकत्त्यास लॉर्ड लिटनसाहेबांकडे एक मोठें बंगालीलोकांचें डेप्युटेशन गेलें होतें. पण लाटसाहेबांनीं सर्व शिष्टाचारास धाब्यावर बसवून केवळ अपमानास्पद शब्दांनीं

त्यां डेप्युटेशनमधील सद्गृहस्थांची बोळवण केली! त्यामुळें हिंदुस्थानांतील प्रत्येक खऱ्या आर्यभूपुत्रास संताप आला तसा तेलंगांनाही आला! व त्यानीं तो मुंबईस त्यावेळीं भरलेल्या सभेंत पुढील बाणेदार शब्दांनीं व्यक्त केला:—

"Gentlemen, I can not sit down without adding to what has fallen from my friend Mr. Naoroji, a word of my sympathy with our brethren in Bengal, under the rebuke, which was administered to them by the Viceroy in consequence of their action with reference to the subject which we are met to discuss this evening. I hate rebuke gentlamen, I venture to say–though I am but a humble individual speaking about the most exalted personage in the Indian Empire that rebuke was most unmerited, ungenerons, uncharitable, unjust. Gentlemen, we are all pretty familiar with the mastery of English style, that Curiosa Felicetes, which characterizes Lord Lytton's speeches & writings. I am bold to say, Gentlemen that, that mastery of style, that curiosa Felicetes was never turned to worse use, was never more mischievously employed then when it was made the vehicle of rebuke to the members of the Deputaion, consisting of eminent subject af her majesty in Calcutta. Lord Lytton's reply to the Deputation is exceptional, not merely for its spirit and tone, but also because of its being quite unprecedented among the replies of her Majesty's representatives to her Indian Subjects throughout almost the whole course of British rule."

तात्पर्य, लिटन साहेबांनीं डेप्युटेशनमधील लोकांची तशाप्रकारची बोळवण करणें म्हणजे ब्रिटिशसरेला लांछन होय! वरील उतारा बराच लांब आहे, पण त्यावरून

आपल्या वंगदेशीय बंधूबद्दलची तेलंगांची खरी सहानुभूति व लार्ड लिटनसारख्या बड्या अधिकाऱ्याच्या रागरोषाबद्दल बपर्वा हीं सहज व्यक्त होतात.

ना० तेलंगांचें सर्वांत उत्तम असें भाषण सन १८८३ सालीं प्रसिद्ध इल्बर्ट बिलाचे-वेळीं टौनहालमध्यें झालें. त्यावेळचा प्रसंग मोठा कठीण होता. विजयी आणि जित या दोन्हीं लोकांमध्यें मोठी गडबड उडाली होती. त्यावेळेस त्यांचे भाषणाचा रोंख सदर बिलाचे द्वेष्टे सरजेम्स स्टीफन यांजवर होता. तथापि त्या भाषणांत अपूर्व वक्तृत्व, मुद्यांची योग्य मालिका, प्रतिपादिव गोष्टींची सुस्पष्टता, भाषेचा सरळपणा व निर्दोषत्व वगैरे जे गुण दृष्टीस पडले, तेणेंकरून यांच्या योग्यतेचा वक्ता हिंदुस्थानांतही नसेल अशी मोठमोठ्या इंग्लीश लोकांची खात्री झाली. हल्लीं जशी बंगालमध्यें चळवळ चालली आहे तशीच प्रसिद्ध इलबर्ट बिलाचेवेळीं झाली होती. व आंग्ल लोकांचा बंगाली गृहस्थांवर त्यावेळीं हल्लींच्या सारखाच कटाक्ष होता. आणि अशी चळवळ झाली म्हणजे ' हिंदूलोक हे आंग्लराष्ट्राचे हितशत्रु आहेत. ' असें एक आमच्या सरकारचें पालेपद नेहमीं पुढें येत असतें! तसेंच तें १८८३ मध्यें सरकारी अधिकाऱ्यांकडून गाइलें गेलें होतें. पण त्याचें निराधारत्व तेलंगांनीं पुढील तऱ्हेनें सिद्ध केलें:-"

" it has been asserted that the Bengalis entertain feelings of hatred and hostility to the British nation. Well, gentlemen, having had the honour, as you are aware of being appointed to serve on the education commission, I had recently to spend a few months in Calcutta. And during the period of my stay there, I came into close, intimate & frequent conact with the leaders of thought and the leaders in public affairs of the Bengali nation. And having frequently had frank conversations with many of them, having thus seen them in a sort of mental undress, so to speak, I venture to affirm and to affirm very confidently, that this hatred and hostility is a more figment of some alarmist brains and has no existence in reality,

I think that believing that, as I do believe it, to be the truth upon the subject, I am bound if not by any other obligation, atleast by gratitude for the kindness which I received from my Bengali brethren, when I was among them to make this statement to correct misapprihension."

न्या. तेलंगानीं हे उद्गार काढल्यास आज सुमारें पंचवीस वर्षांवर झालीं. इतक्या मोठ्या अवधींत राजकीय दृष्टीनें आपल्या देशाचें कितीतरी स्थित्यंतर झालें आहे! ही एक गोष्ट लक्षांत आणली म्हणजे सदहू बाणेदारपणाच्या उद्गारांवरून न्या. तेलंगांचेठिकाणीं देशाभिमान किती उच्चदर्जाचा होता हें सहज कळून येतें.

सर जेम्स फर्ग्युसन साहेबांनीं तेलंगांस कायदेकौन्सिलचे सभासद नेमलें; व लार्ड रेसाहेबांनींही त्यांची पुनश्च तेथें नेमणूक केली. त्यांनीं कौन्सीलमध्यें देखील आपलें काम निर्भीडपणानें व लोकहितैकदृष्टीनें केलें. सन १८८५ मध्यें पार्लमेंटच्या निवडणुकीच्या प्रसंगीं इकडून विलायतेस एक डेप्युटेशन पाठवावें म्हणून मुंबईस बरीच खटपट झाली; पण त्या सर्व चळवळीचा अंतरात्मा म्हणजे तेलंग होते.

राष्ट्रीयसभेच्या संबंधानें काशीनाथपंतांनीं मोठे परिश्रम करून तिला जगत्या पंथास लाविलें. त्या सभेमध्यें त्यांचीं (सन १८८५ मध्यें पहिल्या राष्ट्रीयसभेच्या बैठकींत) व तेथून १८८८ मध्यें अलाहाबादच्या कॉंग्रेसमध्यें-जीं अत्युत्तम भाषणें झालीं आहेत, तीं पाहिलीं असतां, वितंडवाद न करितां सौम्य रीतीनें आणि रमणीय कोटिक्रमानें सरकारी अधिकाऱ्यांची व इतर प्रतिस्पर्ध्यांची उत्तम समजूत पाडण्याची त्यांच्या अंगीं जी विलक्षण शक्ति होती, तिचा ते फार चांगला उपयोग करीत असत, असें सहज लक्षांत येतें. याशिवाय "प्रेसिडेन्सी असोशिएशन" वगैरे देशहितकारी कित्येक सभांचे ते पुढारी असून त्यांमध्यें हिंदु, मुसलमान, पारसी इत्यादि अनेकधर्मी लोकांशीं मोठ्या स्नेहानें वागून त्यांनीं मोठा लौकिक संपादिला होता.

एल्फिन्स्टन कॉलेजाचे हे एक ट्रस्टी होते; आणि त्या कॉलेजाचें व तेथील विद्यार्थ्यांचें हे फारच अगत्य बाळगीत असत. परळ येथील कॉलेजची इमारत सरकारानें दुसऱ्या कामाला घेऊन कोटामध्यें जेव्हां ती विद्याशाळा नेली, त्यावेळेस तेथील स्थानिक विद्यार्थ्यांना राहण्याला सोईवार खोल्या बांधवून देण्यास्तव त्यांनीं मुद्दाम गव्हर्नरसाहेबांकडे रदबदली करून तें काम तडीस नेलें. विद्यावृद्धीच्या संबं-

धानें विश्वविद्यालयामध्यें त्यांनीं फार परिश्रम केले. त्याप्रमाणेंच स्त्रियांच्या संमतिवयांच्या कायद्यासंबंधानेंही त्यांनीं सरकाराला मोठी मदत केली. बारा वर्षांच्या वयापूर्वीं स्त्रीला पुरुष समागम होण्याचा प्रतिबंध असावा अशाविषयीं सरकारी कायदा असणें जरूर आहे किंवा नाहीं, यासंबंधानें पुष्कळ चर्चा चालली होती. जी गोष्ट अत्यंत गुप्त रहावयाची, तिच्यासंबंधानें सरकारानें चर्चा चालवून आमच्या अगदीं घरगुती गोष्टींपर्यंत मन घालावें हें आपल्या अधिकाराच्या बाहेरचें वर्तन करणें होय; गृहकृत्यांचा बंदोबस्त ज्यांचा त्यांनींच केला पाहिजे; सरकाराला यांत मन घालूं देऊं नये; हा एक धर्मसंस्कार असल्यामुळें यांत सरकारानें मन घालणें म्हणजे प्रजेच्या धर्मामध्यें ढवळाढवळ करणें होय; असें बहुतेक जुन्या चालींच्या लोकांचें म्हणणें होतें. नामदार तेलंग प्रभृति लोकांनीं या कायद्याची आवश्यकता दाखवून धर्मशास्त्राकडूनहीं या कायद्याला प्रतिबंध नाहीं असें सिद्ध करून देण्याकरितां पुढाकार घेतला होता. अखेरीस सरकारानें तो कायदा अमलांत आणून ना० तेलंगांची फार तारीफ केली. परंतु त्यावेळेस लोक बरेच खवळले होते, यामुळें त्यांनीं तेलंग यांच्या विरुद्ध तोंडसुख घेतलें.

आजकाल हिंदुस्थानदेशांतील सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांमध्यें जीं भलीं उंच भिताडें वाढून राहिलीं आहेत तीं सर्व शक्यतर जमीनदोस्त करून सर्व लोकांत सलोखा राहील अशी खटपट झाली पाहिजे हें आतां स्पष्ट झालें आहे तशाप्रकारची निदान हिंदुलोकांच्यापुरती तरी कांहीं व्यवस्था व्हावी म्हणून मुंबईस " हिंदु युनीयन क्लब " स्थापन करण्यांत आलेला आहे हें सर्व विश्रुत आहे. ती संस्था स्थापन झाल्यास आज तीस वर्षांवर होऊन गेलीं. पण तिच्या प्रवर्तकांत ना. तेलंग हे होते, इतकेंच नव्हें तर त्या क्लबाची हल्लीं जी सुस्थिती आहे तिचें बरेंच श्रेय न्यायमूर्तीस दिलें पाहिजे. हें कोणीही सांगेल. काशिनाथपंत हयात असेपर्यंत क्लबची खेप नेहमींची त्यांची सहसा चुकली नाहीं. सभासदांमध्यें सलोखा वाढावा म्हणून सर्व प्रकारच्या करमणुकीच्या साधनांचा नेहमीं उपयोग करण्यांत येत असे. पैकीं तेलंगांच्या सहायानें सुरू झालेली हेमंतोत्सव व्याख्यानमाला अद्याप चालली आहे. एकंदरींत क्लबाच्या संबंधानें तेलंगांकडून घडलेल्या कामगिरीच्या उत्तमत्वाविषयीं रा० विष्णुपंत भाटवडेकर, ना० म. भा. चौबळ वगैरे मंडळी अद्यापि प्रशंसापर उद्गार काढीत असतात.

आतां सदरहू कामीं न्या. तेलंग यांस नानासाहेब बापट, वामनराव मोडक, गणपतराव किर्लोस्कर प्रभृतिमंडळींचें सहाय्य होतें ही गोष्ट खरी; पण या सर्व कृतीला तेलंगांच्या अंगीं सर्वांबरोबर मोकळेपणानें वागून सर्वांचें अकृत्रिम प्रेम संपादन करण्याची जी जादू होती तीच विशेष कारणीभूत झाली यांत संशय नाहीं. तरी देखील हा सर्व प्रकार कांहीं सोंवळ्या मंडळीला खपला नाही! व त्यांनीं आपला सोंवळा क्लब म्हणून " ब्राम्हण सभा " काढली; पण काय, कोठें गेलें तरी पळसाला पानें तीनच! कोणत्याही क्लबाचा हेतु विशिष्टजनसमूहांत सलोखा घडवून आणण्याचा असतो त्याप्रमाणें ब्राम्हणसभेनें आपल्या सोंवळ्या जातीपुरतें तरी तें काम केलें आहे काय? पण मुळाशींच जर खोडसाळपणाची उर्फ विघ्नसंतोषीपणाची प्रवृत्ति तर वरील सारखा उदात्त हेतु सिद्ध होणार कसा? अखेरीस अशा प्रवृत्तीचा निसर्गसिद्ध तोच परिणाम झाला; आणि हळूहळू क्लबांतून उर्फ सभेंतून ठळक ठळक मंडळी निसटून जाऊं लागली!!

सारांश, ना. तेलंगांनीं आपल्या योग्यतेला शोभेल अशारीतीनें सार्वजनिक कामांत अंग मोडून खपण्यांत सहसा कधींच कसूर केली नाहीं. सामाजिक व धार्मिक बाबतींत न्या० तेलंग यांचें धोरण नेहमीं पुरोगामी असे. आपण कर्तृत्वशूर सुधारक नाहीं असें खुद्द तेलंगांनींच अनेकप्रसंगीं सांगितलें आहे; तरी पण सुधारणाप्रिय मंडळींचा पक्ष त्यांनीं कोणत्याही क्षुद्र हेतुस्तव सोडला नाहीं कीं कधीं त्या पक्षाची आपल्याकडून होईल ती कामगिरी करण्यांत त्यांनीं कसूर केली नाहीं. मुंबईच्या विधवा पुनर्विवाहसहायक मंडळीचे कित्येक वर्षेपर्यंत ते अध्यक्ष होते. त्यांचा अनेक मंडळ्यांशीं कांहींना कांहींतरी संबंध असे. मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे व नेटिव्ह जनरल लायब्ररीचे कमीटीचे ते अध्यक्ष होते. फ्रामजी कावसजी इन्स्टिटयूटचे ते ट्रस्टी होते. गोकुळदास तेजपाळ धर्मादाय व्यवस्थापक मंडळींचे अध्यक्ष होते. याप्रमाणें राष्ट्रीय उन्नति घडवून आणण्यासाठीं एका राजकीय अंगालाच चिकटून न राहतां सामाजिक, धार्मिक व औद्योगिक वगैरे सर्व बाजूंनीं खटपट झाली पाहिजे असें त्यांचें ठाम मत होतें व तदनुसार ते आपला सार्वजनिक उद्योग चालवीत. ज्या राष्ट्रीय कामास दीर्घोद्योग, आस्थेनें काम करण्याची हौस, व असामान्य बुद्धिमत्ता या गुणांची जरूर लागे असें कोणतेंही काम निघालें म्हणजे तेलंगांचा त्या कामाशीं प्रमुखत्वेंकरून संबंध आलाच म्हणून समजावें! सन १८७२ पासून तों सन १८९३ म्हणजे मरणकालापर्यंत मुंबईत अशी

एकही संस्था अगर कामगिरी झाली नाहीं कीं जिला तेलंगांचा हातभार लागला नाहीं ! सन १८८९ मध्यें ते जज्ज झाल्यामुळें त्यांच्या तोंडास अंमळ कुलूप बसल्यासारखें झालें खरें; पण प्रेसिडेन्सि असोसिएशनमध्यें वगैरे त्यांच्या सूत्रधारीपणांस मात्र त्यायोगें बाध आला नाहीं ! मि. वाच्छा वगैरे मंडळी त्यांची सल्ला घेतल्याशिवाय राहत नसे. अशारीतीनें काशीनाथपंतांच्या सार्वजनिक कामासंबंधानें कितीतरी लिहितां येण्यासारखें आहे; पण तूर्त येथें त्याच्या नुसत्या दिग्दर्शनावरच भागविलें आहे.

**साहित्यसंबंधीं प्रयत्न.**

नामदार तेलंगसाहेबांस इंग्लिश, संस्कृत, मराठी, गुजराथी या भाषा तर उत्तमप्रकारें येत असत; परंतु ल्याटिन, फ्रेंच आणि जर्मन यांचाही त्यांनीं चांगला अभ्यास केला होता. बंगाली व हिंदुस्थानी या भाषांचेंही त्यांस ज्ञान होतें. प्राचीन ताम्रपटादिकांचा अर्थ विशद करणें आणि त्यांची ऐतिहासिकदृष्टीनें उपयुक्तता ठरविणें या कामांत त्यांची योग्यता फार मोठी होती. त्यांनीं शंकराचार्यादिकांचा काल निर्णय करण्यासंबंधानें चांगले चांगले निबंध लिहिलेले आहेत. असो. याप्रमाणें त्यांची योग्यता असल्यामुळें त्यांना मुंबई विश्वविद्यालयाचे (उपाध्यक्ष) व्हाइसचान्सलर आणि 'बांबे ब्रॅंच ऑव्ह दि रॉयल् एशियाटिक सोसायटि' या विद्वज्जनसभेचे अध्यक्ष नेमिलें होतें. हे दोन्ही अधिकार यापूर्वीं कोणाही नेटिव्ह गृहस्थाला मिळाले नव्हते.

रॉयल एशिआटिक सोसायटीपुढें व स्टुडंटस् लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटीपुढें "'Our Roads' life of Great Shankaracharya'" यांचेवर किंवा अशाच विचारणीय विषयांवर तेलंगांकडून वरचेवर निबंध वाचले जात असत. इंडियन ॲन्टिकरी, थिऑसफीस्ट व इंदुप्रकाश या वर्तमानपत्रांतून त्यांचे मार्मिक लेख प्रसिद्ध होत असत. डॉ० बुल्हरच्या पाठीमागून संस्कृतचे प्रोफेसर नेटिव्हांस न नेमतां कोणा युरोपियनांस नेमावें असें घाटत होतें; पण त्यावेळीं डॉ० भांडारकर हे असिष्टंट प्रोफेसर असतां व ते सर्वथैव मुख्य प्रोफेसर होण्यास लायख असतां वरील प्रकारचा घाट घालणें म्हणजे केवळ अन्यायाचें होतें. अशावेळीं तेलंगांनीं मुंबईच्या टाइम्समध्यें या प्रकरणीं सणसणीत लेख लिहिलेले आहेत व त्यायोगानें संस्कृतमध्यें, एतद्देशीयांचें वर्चस्व नसलें तरी ते युरोपियनांबरोबरीचे खचित असूं शकतात, असें त्यांनीं सिद्ध केलें आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं

कीलहार्नसाहेबांच्या संस्कृत व्याकरणाचें 'नेटिव्ह ओपिनियन' मधून सन १८७० मध्यें मार्मिक परीक्षण केलें आहे. त्यांनीं १८७१ मध्यें मांडुक्योपनिषदावर एक निबंध वाचला. त्याच्या पुढच्याच वर्षी "इंडियन अंटिक्केरी" पुस्तकांत 'न्याय-कुसुमांजलीचा काल' या विषयावर यांनीं लिहिलेला निबंध प्रसिद्ध झाला. प्रोफेसर वेबर नामक एका युरोपियन पंडितानें रामायण हें होमरच्या "ईलियड" काव्याच्या आधारानें रचिलें गेलें असावें अशी कल्पना काढली होती! तिचें न्या० तेलंगांनीं सन १८७३ मध्यें मुद्देसूदरीतीनें खंडन केलें; व असें सिद्ध करून दाखविलें कीं, दोन्ही ग्रंथांच्या अंतःप्रमाणावरून पाहिल्यास रामायण हा ग्रंथ ईलियडवरून लिहिला गेला नाहीं, इतकेंच नाहीं तर संभवनीयतेच्या दृष्टीनें कदाचित् रामायणाच्या आधारानेंच होमर कवीनें आपला कविताग्रंथ लिहिला असेल! त्याचप्रमाणें कांहीं वर्षांपूर्वी हिंदु म्हणविणाऱ्या प्रत्येक मनुष्याला सर्वथा पूज्य व त्याच्या धर्माचा आधारस्तंभ अशी जी "श्रीमद्भगवद्गीता" तिच्यावर डॉ. लॉरिंजर प्रभृति कित्येक परधर्मीय लोकांनीं एक निराधार आरोप केलेला होता, आणि तो जर खरा ठरता, तर हिंदुधर्माची निंदा करण्याला तें एक ख्रिस्ती लोकांना साधन झालें असतें. त्या लोकांनीं त्यावेळीं असें दाखविण्याचा प्रयत्न चालविला होता कीं, 'भगवद्गीता हा ग्रंथ केवळ चोरीचा! ख्रिस्तिलोकांचे 'बायबल' म्हणून जें धर्मपुस्तक तें मूळचें; आणि त्यांतील सर्व कल्पना कोणी ब्राम्हणांनीं घेऊन, व त्यांत कांहीं पदरचें घालून 'भगवद्गीता ग्रंथ रचिला असावा!' त्या लोकांनीं आपली कोटी सिद्ध करण्याकरितां गीतेंतील आणि बायबलांतील एकमेकांस जुळतील अशीं शेंकडों वाक्यें घेऊन तीं समोरासमोर छापविलीं व प्रसिद्ध केलीं! आणि एवढ्या आधारावर ते लोक इतक्या खात्रीनें बोलूं लागले कीं, जणूं गीता प्रतिपादित हिंदुधर्म हा केवळ बायबलाची नकल आहे आणि ख्रिस्तीधर्मच खरा आहे. कांहीं दिवसपर्यंत यासंबंधानें आपल्या देशांत मोठी चळवळ झाली, पण काय करावें हें कोणाच्याच लक्षांत येईनां! मोठमोठे विद्वान् आणि धर्माभिमानी म्हणविणारे लोक त्यांची तर मोठी गाळणच उडाली! 'हवें तें म्हणेनात, आम्हांस काय करावयाचें आहे?' इतकेंच म्हणून ते राहिले. पण सर्वांच्या सुदैवानें काशीनाथपंत पुढें आले आणि त्यांनीं सर्व हिंदुमात्रांची बाजू राखिली. त्यांनीं असें सिद्ध केलें कीं, गीता ही दोन हजार वर्षांपूर्वी म्हणजे बायबलाच्यापूर्वी शेंकडो वर्षें या देशांत प्रसिद्ध होती व त्यांतील वचनांवर इकडील लोकांची श्रद्धा होती. त्याविषयीं ना. तेलंगांनीं सर्वमान्य प्रमाणें

देऊन एक सर्वोत्कृष्ठ निबंध लिहिला आणि तो स्टुडंट्स लि. सा. सोसायटीपुढें वाचून अज्ञलोकांच्या म्हणण्याचें पूर्णपणें खंडन केलें! अशारीतीनें काशीनाथपंतांनीं ख्रिस्ती लोकांची अज्ञानमूलक बडबड बंद करून त्यांनीं अशेष हिंदुसमाजावर उपकार केलें यांत शंका नाहीं. त्यानंतर आपल्या इकडील प्राचीन ग्रंथांसंबंधानें वरील प्रकारचें युरोपियन तर्कशास्त्र फारसें ऐकूं आलें नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे!

त्याच वर्षी काशीनाथपंतांनीं 'श्रीहर्षाचा काल' 'पार्वती परिणय नाटक' या विषयांवर निबंध लिहिले त्यांपैकीं दुसरा निबंध "इंडियन आंटिक्वेरी" मध्यें प्रसिद्ध झाला. मुंबईतील रायल एशियाटिक सोसायटीपुढें यांनीं जे अनेक निबंध वाचले त्यांत कांहीं चालुक्य, कदंब, सिल्हर यांचे कारकीर्दीचे संबंधाचे ताम्रपटांच्या आधारानें लिहिले आहेत. त्याचप्रमाणें मधुसूदनसरस्वतींच्या काल निर्णयासंबंधाचा निबंधही त्यांनी सदर सभेपुढें वाचला. असो. हे सर्व निबंध सोसैटीच्या मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेले आहेत. तेलंगांनीं भर्तृहरीच्या "नीति व वैराग्य" या दोन शतकांवर इंग्रजी टीपा देऊन तें पुस्तक भिन्न पाठांसहित प्रसिद्ध केलें आहे. त्यांच्या एकंदर पुस्तकांमध्यें चिरकाल स्मरणीय असें श्रीमद्भगवद्गीतेचें" त्यांणीं जें इंग्रजी कविताबद्ध भाषांतर केलें आहे तें होय हें भाषांतर त्यांनीं आपल्या विद्यार्थीदशेंत असतां केलें होतें. हें लक्षांत घेतलें म्हणजे मनाला मोठें कौतुक व चमत्कार वाटतो. गीतेसारखा अध्यात्मविषयक संस्कृत ग्रंथ; त्याचें इंग्रजी भाषांतर, आणि तें पुनः कवितेच्या रूपानें; आणि तें केलें केव्हां? तर कालेजांत अभ्यास चालला असतां! '**सर्वंहि महतां महत्**' असें जें म्हणतात तें हेंच!

या गीतेच्या भाषांतरासंबंधानें एका इंग्रजी पंडितानें एकेठिकाणीं म्हटलें आहे कीं, 'कित्येक इंग्रजी ग्रंथांतून जी अत्यंत उदात्त विचारसरणी आणि ज्ञानाचा परिपाक झालेला दृष्टीस पडतो तसा प्रकार या सुंदर भाषांतरासंबंधानें झालेला असून तो इतरत्र अनुभवास येणें कठीण आहे. या भाषांतरांत बरेंच मार्दव भरलेलें असून तें ओजस्वी झालें आहे. भाषा अत्यंत सरळ, गोड व सुबोध असून उत्साहपूर्ण अशी आहे.' "आकेडमी" नामक विलायतच्या पत्रानें त्यावेळीं या भाषांतराबद्दल फारच स्तुति केली होती. इ० स० १८७६ मध्यें त्यांनीं 'इतिहासाचा अभ्यास' या विषयावर एक निबंध लिहिला. त्याच सुमारास त्यांनीं आनंदगिरीच्या शंकरविजयावर टीका लिहून ती "आंटिक्वेरीमध्यें" प्रसिद्ध केली. इ. स. १८८० मध्यें त्यांनीं "काव्येतिहाससंग्रहाचें" परीक्षण करून १८८१ मध्यें त्यांनीं के०

मंडलीक यांच्या हिंदुधर्मशास्त्रविषयक ग्रंथावर ॲांटिक्वेरीमध्यें टीका केली. पुढील वर्षी म्हणजे सन १८८२ मध्यें त्यांनीं गीतेचें एक गद्यरूपी भाषांतर केलें व तें प्रोफेसर म्याक्समुल्लर यांनीं आपल्या 'प्राच्यधर्मग्रंथमालिकेंत' समाविष्ट केलें आहे. त्याचप्रमाणें तेलंगांनीं सदहू मालिकेकरितां महाभारतांतील दोन कथाभाग लिहिले आहेत. याशिवाय त्यांनीं विशाखदत्त विरचित 'मुद्राराक्षस' नाटकावर टीपा देऊन तें नाटक प्रसिद्ध केलें आहे. त्यांनीं "शहाणा नेथन" व "स्थानिक स्वराज्य" अशीं दोन इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें मराठी पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांचीं 'सामाजिक तडजोड' 'शास्त्र व रूढि' वगैरे विषयांवरील व्याख्यानें बहुतेक लोकांस माहित आहेतच. त्याचप्रमाणें त्यांचा "हिंदुस्थानांत राजकीय सुधारणेच्या आधीं सामाजिक सुधारणा झाली पाहिजे काय?" व "अप्रतिबद्ध व्यापार व व्यापाररक्षण यासंबंधीं हिंदुस्थानाचे तर्फेचे विचार" या विषयांवरील इंग्रजी व्याख्यानेंही सुप्रसिद्ध आहेत. सारांश, तेलंगांच्या या जबरदस्त उद्योगावरून त्यांचें संस्कृत आणि इंग्लिश या दोन भाषांचें मार्मिक ज्ञान व त्यांची विद्वत्ता हे गुण सहज व्यक्त होतात. एकंदरीनें साहित्याचे बाजूनें पाहिलें असतां न्या० तेलंगांनीं आपल्या आयुर्मर्यादेंत केलेली कामगिरी केवळ-बिनमोल आहे यांत संशय नाहीं.

**स्वभाव व धर्मसंबंधीं मतें.**

काशीनाथपंतांचीं धर्मसंबंधीं मतें बहुतेक निश्चित झालीं होतीं. ते प्रायः प्रति रविवारीं प्रार्थनासमाजामध्यें जात आणि तेथें चालणाऱ्या प्रार्थना आणि उपदेश यांचें श्रद्धापूर्वक श्रवण करीत व ते आर्यसमाजांतही केव्हां केव्हां जात. तात्पर्य त्यांची हिंदुधर्मावर चांगली श्रद्धा होती. ते नेहमीं मातापितरांच्या आज्ञेंत वागत व त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांनीं आपलें वर्तन आमरण घडूं दिलें नाहीं. आपल्यामध्यें कांहीं धार्मिक व सामाजिक दृष्टीनें दूषणीय भाग आहे व त्यांत योग्य ती सुधारणा हळू हळू करण्याविषयीं झटावें, असें जरी यांचें मत असे तरी हिंदुधर्माचे सर्व मुख्य सिद्धांत तात्विकदृष्टया त्यांना मान्य होते. ह्या प्रवृत्तीचीं उदाहरणें त्यांच्या स्वतःच्या वर्तनावरूनही निवडून दाखवितां येतील. ते स्वतः विद्वान् होऊन पैसे मिळविल्यानंतर त्यांनीं मुंबईत हजारों रुपये किंमतीचा एक मोठा नवा वाडा विकत घेतला; त्या घराच्या वास्तुप्रवेशाच्या दिवशीं ते मोठ्या समारंभानें आप्तमंडळी आणि मित्रमंडळी बरोबर घेऊन आपल्या जुन्या राहत्या घरांतून निघाले! रस्ता सुमारें अर्धा मैल लांब होता. तरी आपल्या जुन्या घरांतून ते सोंवळ्यानें (म्हणजे

पीतांबर नेसून शाल पांघरून, आणि डोक्याला शालनामा बांधून ) हातांत घरचे देव घेऊन नव्या घरापर्यंत अनवाणी चालत गेले ही गोष्ट सर्वांस विदित आहे. सारांश आपल्या विद्वत्तेचा किंवा आपल्या अधिकाराचा त्यांस यत्किंचितही गर्व नव्हता. आधुनिक कांहीं सुशिक्षित लोकांप्रमाणें त्यांना आपल्या धर्माचरणाची लाज वाटली नाहीं किंवा त्याबद्दल युरोपियन लोक आपल्यास हंसतील अशा भीतीनें यांस पछाडलें नाहीं. त्यांचा स्वभाव अत्यंत शांत सरळ, मनमिळाऊ आणि साधा असे. ते स्वस्त्रीशीं मोठ्या प्रेमानें वागत आणि सहसा तिचें मन दुखवीत नसत. इतकेंच नव्हे तर ते घरच्या सर्व मंडळींशीं आणि आप्तइष्टांशीं मोठ्या प्रेमानें वागून सर्व लहानथोर लोकांशीं देखील मोकळ्या मनाचें वर्तन ठेवीत. त्यांनीं आपलें जुन्या तऱ्हेचें ( मुंबई चालीचें परभी पागोटें ) शेवटपर्यंत सोडिलें नव्हतें. ते अगदीं निर्व्यसनी असत आणि त्यांचें मन मोठें उदार असे. तें दरमहा दोन अडीचशे विद्यार्थ्यांस पुस्तकें, फी वगैरेसाठीं द्रव्यद्वारा मदत करीत असत; आणि बहुतेक सार्वजनिक संस्थांस त्यांची पुष्कळ मदत असे. या तेलंगांच्या औदार्याचें आम्हीं कौतुक केल्यास नवल नाहीं; परंतु त्याबद्दलचा डॉक्टर मॅकिकन, प्रो. वेलिणकर, रा बळवंतभाऊ नगरकर इत्यादि गृहस्थांनीं अनेकवार सार्वजनिक रीतीनें उल्लेख करून तेलंगांची योग्य प्रशंसा केली आहे. त्यांची अशी कांहीं मनोवृत्ति असे कीं, कोणालाही केवळ विन्मुख असा त्यांनीं सहसा जाऊं दिला नाहीं. त्यांच्या विद्वत्तेमुळें लार्ड रिपन, लार्ड रे, सर विल्यम वेडरवर्न यांजसारखे इंग्रज लोक त्यांचे मोठे स्नेही झाले होते आणि त्यांनीं आपल्या अलौकिक गुणांनीं इतरांस मोठा कित्ता घालून दिला होता. सारांश त्यांच्या सर्व गुणांचें वर्णन केल्यास एक मोठा ग्रंथच होईल.

नामदार तेलंग साहेबांनीं जेव्हां आपल्या दोन मुलींचीं लग्नें केली, तेव्हां त्यांच्या धाकट्या मुलीचें वय सगळें नऊ वर्षांचें होतें. तेलंगसाहेब हे बालविवाहनिषेधक मंडळीचे अध्यक्ष असल्यामुळें त्यांच्या हातून हा प्रकार घडलेला पाहतांच कित्येक लोकांस साहजिकपणें वाईट वाटलें व त्यांचेकडून टीका सुरु झाली. परंतु नंतर थोड्याच दिवसांनीं तेलंगसाहेब परलोकवासी झाल्यामुळें सदर्हू प्रकाराचें खरें कारण आपोआपच बाहेर पडलें. न्यायमूर्तिसाहेबांनीं मुलींचीं लग्नें केलीं तेव्हां ते आजारी होते आणि त्या आजारांतून आपण उठेन अशी त्यांस खात्री नव्हती. त्यांच्या रोगाचें पाऊल सारखें पुढें पडत चाललें होतें व त्यांच्या मूळव्याधिजन्य रक्तस्रावानें त्यांची अशक्तता वाढूं लागली होती. अशा स्थितींत त्यांना आपल्या थोरल्या मुलीच्या लग्नाबरोबरच

धाकटीचेंही लग्न उरकून टाकावें असें वाटल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. तीं लग्नें झालीं तेव्हां सर्वत्र आनंदीआनंद होता असें मुळींच नाहीं. कारण घरच्या कर्त्या पुरुषाच्या–आणि त्याहि अशा सद्गुणी पुरुषाच्या–आजारीपणामुळें कुटुंबांतील माणसांची मनें स्वस्थ असणें मुळीं शक्यच नव्हतें. तेव्हां आनंद तो कसचा? सदर्हू प्रकारांत दोन्ही कार्यें एकदांच उरकून टाकावींत अशा कुटुंबांतील माणसांच्या इच्छेला, स्वतःच्या प्रकृतिमानाकडे पाहून, मान देण्या पलीकडे न्या. तेलंगांचें अंग नव्हतें व तेवढ्याशा प्रकाराबद्दल त्यांजवर टीका करणें अनुदारपणाचें होतें. तथापि तो अनुदारपणा अल्पकालिक होता हें तरी त्यांतल्यात्यांत समाधान होतें. कारण खरी कारणें यथाकाली बाहेर पडतांच लग्नांच्या प्रकारांत तेलंगांचा फारसा दोष नव्हता याबद्दल समंजस माणसांची मग खात्री झाली; पण त्यापासून एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवण्यासारखी आहेः–कोणी थोर माणसानें कोणतें एखादें कृत्य केलें, तथापि त्यांतील खरा प्रकार बाहेर पडेपर्यंत, उतावीळपणानें त्याविषयीं गोंधळ घालीत बसणें हें वेडेपणाचें होय असो;

**अंतकाल**

वर सांगितल्याप्रमाणें तेलंगसाहेबांना मूळव्याधीच्या आजारानें गांठल्यामुळें रक्तस्राव सुरु झाला व ते दिवसेंदिवस फार अशक्त होत चालले; त्यांतच पुढें अतिसाराची भर पडल्यामुळें त्यांच्या प्रकृतीचें मान खालावत चाललें. अनेक औषधी उपचार झाले; तथापि त्यांचा कांहींएक उपयोग न होतां १८९३ इसवीच्या आगष्ट महिन्यांत न्या० तेलंगसाहेब परलोकवासी झाले! त्यांचे स्मरणार्थ मुंबईतील हायकोर्ट, स्मालकाज कोर्ट, एस्प्लनेड पोलीस कोर्ट, माजगांव पोलीस कोर्ट, शाळा, कॉलेजें, कापडाचे बाजार वगैरे सर्व बंद ठेवण्यांत आलीं होतीं. त्यावेळचे हायकोर्टाचे चिफजस्टिस सर चार्लस सार्जंट, हे तेलंगांच्या कुटुंबाचें समाचारास गेले होते. असो. असा विद्वान, सद्गुणी सालस, आणि देशहितैकतत्पर पुरुष आपल्या वयाच्या चव्वेचाळीसाव्या वर्षी जगतांतून नाहींसा झाला हें ऐकून तेलंगांना, नांवानें ओळखणाऱ्या देखील प्रत्येक मनुष्यास दुःख वाटेल यांत शंका नाहीं! कांहींही झालें तरी तेलंगसाहेबांचा आणि त्यांच्या अप्रतिम योग्यतेचा लोकांस लौकर विसर पडणार नाहीं ही गोष्ट सत्य आहे.

काशीनाथपंत तेलंगासारख्या थोर पुरुषांचें चांगलेंसें–सर्वांस ग्राह्य होईल असें–चरित्र लिहिण्याचा अधिकार आमचा नव्हे हें आम्हीं आणखी एकवार प्रांजलपणें कबूल करितों. ही चरित्रमाला प्रसिद्ध करण्याचा मुख्य हेतु प्रस्तावनेंत दाखल

केलेलाच आहे. तेव्हां न्या० तेलंगासारख्या पुरुषाचें चरित्र न आल्यास ती माला अपुरी राहील ती तशी राहूं नये एवढ्याचसाठीं प्रस्तुतचें शब्दचित्र यथामति रेखाटलें आहे. तरी या त्रोटकचरित्रानेंही न्यायमूर्तींची खरी योग्यता काय होती हें सामान्य लोकांस कळेल अशी आशा आहे.

खरोखर आमचा हिंदुस्थानदेश फुटक्या कपाळाचा म्हणूनच न्या० तेलंगांच्यासारखी रत्नें त्याला फार दिवस लाभत नाहींत! नाहींतर, न्यायमूर्तींना असें काय झालें होतें कीं, त्यांनां चाळिशी संपते न संपतें तोंच मरण यावें? सामान्यतः त्यांची प्रकृति निकोप असे. त्यांना व्यसन असें कोणतेंच नव्हतें. त्यांचे आहारविहार नेहमीं मितप्रमाणावर चालत. ह्यांची वृत्ति बहुधा प्रसन्न असे. त्यांना शत्रु असा बहुतेक कोणीच नव्हता. बरें, त्यांना जो रोग अखेर झाला होता, त्यांतून कोणी आजवर बरा झालेला नाहीं काय? पुष्कळ तसे बरे झाले आहेत. इतक्या जर गोष्टी खऱ्या आहेत, तर न्या० तेलंगांच्या—म्हणजे ज्यांच्या गुणांमुळें तशा माणसांची आज आपल्यास गरज आहे अशांच्या—बाबतींत मात्र त्या सर्व गोष्टींचा फोलपणा दिसून यावा यास आमच्या देशाचें फुटकें नशीब म्हणूं नये तर म्हणावें काय? असो. "**मरणं प्रकृतिः शरीरिणाम्**" हें कालिदासाचें वचन नेहमीं मनांत बाळगावें आणि पुढील मार्गास लागावें इतकेंच खरें; तथापि न्या० तेलंगांसारख्यांचें चरित्र पुढें ठेऊन प्रस्तुत पिढींतील लोक वागण्याचा जरी यथाशक्ति यत्न करतील तरी त्या थोरपुरुषाच्या ऋणांतून अंशतः आम्हीं मुक्त झाल्यासारखें होईल.

काशीनाथपंतांच्या मागें त्यांचे मुलगे, मुली वगैरे सगळे सुस्थितींत आहेत. त्यांचें कुटुंब (पत्नी) कांहीं दिवसांपूर्वी निवर्तलें. त्याचप्रमाणें त्यांचे ज्येष्ठबंधु कृष्णराव बापूजी तेलंग हेही थोड्या दिवसांपूर्वी वारले; पण काशीनाथपंतांच्या द्वितीय चिरंजीवांसंबंधानें—रा. रा. पंढरीनाथ काशीनाथ तेलंग एम्. ए. एल्. एल्. बी. संबंधानें—मात्र इकडे चार शब्द लिहावे हें रास्त दिसतें. हे तरुण गृहस्थ चांगले विद्वान् असून ते लोकांस सहसा आपल्या वडिलांचा विसर पडूं देणार नाहींत असें चिन्ह दिसत आहे. रा. पंढरीनाथ यांचा कालेजांतील अभ्यासक्रम चांगल्यापैकीं असून त्यांना एम्. ए. परीक्षेच्यावेळीं इतिहास विषयांतील युनिव्हर्सिटींत "न्या. तेलंगांच्या" नांवानें ठेविलेलेंच सुवर्णपदक मिळालें आहे! ते मुंबई हायकोर्टांत वकीलीचा धंदा करीत होते आणि पुढें मागें ते चांगल्या योग्यतेस चढलेही असते; पण कांहीं दिवसांमागें

त्यांनीं थोर मन करून, स्वार्थावर पाणी सोडून काशीच्या "सेंट्रल हिंदुकालेजां" त आनररी ( विनपगारी ) प्रोफेसरचें काम पत्करल्याचें प्रसिद्ध झालें आहे. विद्यादान करणें आणि तेंही मोबदल्याची अपेक्षा न करतां करणें हें ब्राम्हणांचें आद्यकर्तव्यच आहे. शिवाय पंढरीनाथ तेलंगांच्यासारखी विद्वत्ता अंगीं असल्यावर तें कर्तव्य करीत असतां प्राचीन व अर्वाचीन वाङ्मयाची सेवा करण्यास कितीतरी अवकाश मिळतो! अशा सोन्यासारख्या संधीचा न्या॰ तेलंगांचे सत्पुत्र सदुपयोग केल्याशिवाय कधीं राहणार नाहींत अशी आमची खात्री आहे.

## महाशय ए. सुबराव उपेंद्र पै
## बी. ए. बी. एल्. हायकोर्ट वकील.

" उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत ।
आत्मैवह्यात्मनोबंधुरात्मैवरिपुरात्मनः ॥ "

वेद आणि उपनिषदें, यांचें मंथन करून निघालेल्या भगवद्गीतेला जो सिद्धांत प्रमाणभूत आहे त्याबरहुकूम प्रत्येकानीं आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. विषण्ण व भ्रांतचित्त झालेल्या अर्जुनाला ज्या गीतातत्वानें जागृत केलें त्याच तत्वाचा आम्हीं अवलंब केला पाहिजे. कर्तव्यपराङ्मुख झालेल्या अर्जुनाला ज्या सिद्धांतानें कर्तव्य परायण केलें तोच सिद्धांत सदैव आपल्या दृष्टीपुढें ठेविला पाहिजे. क्लैब्यवश झालेल्या अर्जुनाच्या अंगांत ज्या संजीवनीनें चैतन्य उत्पन्न केलें ती संजीवनी आम्हाला अर्धपोटीं मरूं देईल काय? नाहीं. कदापि नाहीं. असें असतां आम्हीं बुद्धिविशिष्ट माणसांनीं ' कसें करूं काय करूं ' ह्या अष्टाक्षरी मंत्राचा जप करीत ' नशिबीं असे नच तें टळे ' म्हणून कर्तव्यशून्यतेचें रडगाणें गात बसावें यासारखी दुसरी लज्जास्पद गोष्ट ती कोणती?

कर्मवादाचें समर्थन करतांना श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं ' कर्म ' हेंच परमेश्वर, येथपर्यंत आपल्या उपदेशाची मजल नेली आहे. " **दैवं प्रधानमिति कापुरुषा वदन्ति** " अर्थात् हें खऱ्या पौरुषाचें लक्षण नव्हे. दैववाद सुलभ आहे तरी अंगचोर माणसांना आपली कर्तव्यशून्यता झांकून टाकण्यास यासारखें दुसरें साधन नाहीं. दैववादासंबंधानें बोलण्याचा जर कोणाचा अधिकार असेल तर तो प्रयत्नवाद्याचाच आहे. प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे. सत्कार्यासंबंधानें केलेले प्रयत्न कधींही अन्यथा न होतां यशस्वीच झाले पाहिजेत. अतएव उगीच दुसऱ्यावर विश्वासून राहून वायफळ बडबड न करितां स्वतः उदंडकष्ट भोगून आपलें इष्ट साध्य करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

कर्तव्यकर्म म्हणजे काय, हेंच आधीं पुष्कळांना माहीत नसतें. त्यांच्या मतें कसातरी चरितार्थ चालविला म्हणजे हेंच कर्तव्यकर्म! परंतु ' **काकोऽपिजीवति चिरंच बलिंच भुंक्ते** ' याप्रमाणें कावळ्यासारखें बली खाऊन पुष्कळ दिवस

जगणे, अथवा श्वानाप्रमाणें धन्याला लांगूल चालन दाखवून पोट भरणें म्हणजे कर्तव्य खास नव्हे ! तर जेणेंकरून व्यक्तीपेक्षां कुलाचें. कुलांपेक्षां समाजाचें. व समाजापेक्षां राष्ट्राचें हित होईल त्यालाच कर्तव्यकर्म म्हटलें पाहिजे. मात्र तें कर्तव्यकर्म निष्काम असलें पाहिजे. तात्पर्य, शिरोभागी निर्दिष्ट केलेल्या भगवद्वचनाप्रमाणें आपणच आपला उत्कर्ष करून घेतला पाहिजे आपणच आपले बंधु आहोंत. तेव्हां असें न केल्यास आपणच आपले शत्रु होऊन स्वतःस त्याचप्रमाणें आपल्या समाजास व परंपरया आपल्या राष्ट्रास अधोगतीस नेऊं ! कारण. कष्टांवांचून फळ नाहीं, आणि प्रयत्नावांचून कार्य होत नाहीं. म्हणून आलस्य व औदासिन्य सोडून कर्तव्यकर्म केलें पाहिजे. लोकहित हा आपल्या बुद्धीचा विषय धरून आपल्या सर्व कर्तव्य शक्तीचें पर्यवसान स्वदेशबांधवांचें कल्याणांत केलें पाहिजे.

अशाप्रकारें कर्तव्याची मीमांसा करून त्याची योग्य दिशा—शाब्दीक नव्हे तर क्रियारूप —दाखविणारे जे कांहीं महात्मे आपल्यामध्ये अवतीर्ण झाले त्यांत प्रस्तुत चरित्रनायक हे अग्रगण्य होत. खऱ्या लोकहिताची ओळख करून देणारे ते गुरू होत. समजहिताकरितां त्यांनीं केलेला आत्मयज्ञ व सदासर्वकाळ स्वीकृत कार्यासाठीं तनुमनधन अर्पण करण्याची त्यांची सिद्धता ही केवळ अपूर्व होत. समजहितावांचून ह्या महापुरुषाच्या जीविताचें अंतिमसाध्य दुसरें कोणतेंही नव्हतें. असो.

महाशय सुब्राव पै ह्यांचें जन्म इ. स. १८५२ सालीं दक्षिण कर्नाटकांत मंगळूर येथें गौडसारस्वत ब्राम्हणसमाजापैकीं पै उपनांवाच्या एका संभावीत, कुलीन व प्रतिष्ठित घराण्यामध्यें झालें. त्यांच्या वडिलांचें नांव उपेंद्र पै होतें त्यांना जे चार पुत्र झाले त्यांत सुब्राव हे अगदीं लहान होत. सर्वांत वडील चिरंजीव ए. नारायण पै, हे कासरकोड येथें वकील होते. दुसेर ए वासुदेव पै, हे हुजुर शिरस्तेदार–चिटणीस–होते व सध्यां ते पेनशन् घेऊन मंगळूर मुनसीपालिटीच्या व्हाईसचेअरमन आणि डिस्ट्रिक्ट अग्रिकल्चरल सोसायटीचें सेक्रेटरीचें काम पहात आहेत. तिसरे चिरंजीव ए. वेंकटरमण पै हे मुनसफच्या हुद्यावर होते. तेथून पुढें वाढत वाढत ते डिस्ट्रिक्ट जजाच्या अधिकारापर्यंत पोहोंचले. त्या जागेवर असतांना त्यांना सरकारानें रावबहादूर व दिवाणबहादूर अशा बहुमानसूचक पदव्या दिल्या. हल्लीं त्यांनीं पेन्शन घेतलें आहे; आणि चवथे पुत्र ए. सुब्राव हे आपल्या तीघां वडील बंधूपेक्षां हुषार व बुद्धिमान् होते. तिकडील देशरीतीप्रमाणें नांवाच्या अगोदर गांवचें नांव घ्यावयाचें त्याप्रमाणें हें पैचें कुटुंब पूर्वी अंमेबळनामक एका खेडेगावांत होते. तेथून ह्यांचे कोणी

पूर्वज कांहीं उद्योगधंद्याच्या निमित्तानें मंगळूरास आले. तेव्हां ए हें उपपद ह्यांच्या मूळगांवचें सूचक होय. असो.

**सुब्राव** पैंच्या बालपणाची विशेषशी माहिती आम्हांस मिळाली नाहीं, तथापि त्यांचें प्राथमिक शिक्षण मंगळूर येथेंच कानडी शाळेंत झालें. तेव्हांपर्यंत तेथें इंग्लिश शिक्षणाची चांगलीशी सोय नव्हती; आणि यामुळें इंग्रजी विद्येकडे तेथील लोकांचेंही फारसें लक्ष्य नव्हतें झटलें तरी चालेल; परंतु तेथील समाजसुधारणेचे मूळ अग्रणी, वयोवृद्ध, तपोवृद्ध, ज्ञानवृद्ध, असे जे पूज्य गृहस्थ वै. वा. **रामचंद्रअय्या,** यांनीं त्यावेळीं इंग्रजी शिक्षणाचें महत्त्व व त्याची उपयुक्तता ही तेथील तरूण पिढीस नीट समजावून त्यांच्या गळीं उतरून दिली व ते स्वत: तेथील डिस्ट्रिक्ट कोर्टांत रायटरच्या हुद्यावर होते तरी आपलें काम संभाळून मोठ्या उमेदीनें शिक्षकाचेंही काम करीत असत. अर्थात् यांच्या उपदेशाचा व शिक्षणाचा परिणाम तेथील समाजावर व विशेषत: पैंच्या घराण्यावर फार चांगल्यातऱ्हेनें झाला असें झटलें पाहिजे. तात्पर्य, **सुब्राव** पैंनीं गुरूपदिष्ट वाक्यांवर पूर्ण विश्वास ठेवून काळजीपूर्वक दृढाभ्यासानें इंग्रजीविद्येंत चांगलें प्राविण्य संपादिलें. त्यांची इ० स० १८६८ सालीं प्रवेशपरीक्षा व त्याच्याच पुढच्या सालीं एफ्. ए. ची परीक्षा उतरली. नंतर ते पुढील अभ्यास करण्याकरितां मद्रासला गेले. ग्रॅज्युएटची पदवी मिळविण्याकरितां जी कांहीं गौड-सारस्वत ब्राम्हण मंडळी प्रथमच मद्रासेस गेली. त्यांपैकीं सुब्राव हे एक प्रमुख होते. तेथें १८७२ सालीं त्यांची बी ए. ची परीक्षा उत्तमरीतीनें पास झाली व तसेच पुढें चार वर्षांनीं म्हणजे १८७६ सालीं ते बी. एल्.[1] परीक्षेंत उत्तीर्ण झाले. विद्यार्थी-दशेंतील त्यांचें सद्वर्तन, त्यांची हुषारी व अनुपम बुद्धिमत्ता या गुणामुळें ते आपल्या शिक्षकांना आणि बरोबरीच्या विद्यार्थ्यांना फारच प्रिय झाले होते. बी. एल्. परीक्षा पास झाल्यानंतर त्यांनीं मद्रास हायकोर्टांत वकिलीचा धंदा पत्करिला आणि थोड्याच दिवसात त्या धंद्यांत त्यांनीं जो अपूर्व लौकिक मिळविला त्यावरून ते तेथें चांगले प्रसिद्धीस येणार, अशी बहुतेकांची खात्री होऊन चुकली होती; पण मद्रासची हवा त्यांच्या प्रकृतीस मानवेनाशी झाली यामुळें त्यांना परत मंगळूरास यावें लागलें. जर त्यांची शरीरप्रकृति चांगली असती तर ते हायकोर्ट जज्जाच्या पदवीपर्यंत नि:संशय

---

१ कायद्याच्या ह्या परीक्षेस मद्रास इलाख्यांत बी. एल्. व मुंबई इलाख्यांत एल्. एल्. बी. असें ह्मणतात.

पोहोंचले असते; परंतु ते ईश्वरीकृपेनें सरकारी नोकरीच्या शृंखलेंत बद्ध झाले नाहींत हें आमच्या समाजाचें व विद्यार्थ्यांचें सुदैवच समजलें पाहिजे.

मद्रासहून मंगळूरास परत आल्यावर तेथील कोर्टांत त्यांनीं आपला पूर्वींचाच वकिलीचा धंदा चालविला होता. यामुळें त्यांचें अत्यंत आवडतें ध्येय जें—आपल्या समाजाची उन्नति करणें—हें त्यांना चांगल्यारीतीनें साध्य करितां येऊं लागलें. पंचवीस वर्षांपूर्वीं दक्षिणकानडा जिल्ह्यांतील समाजाची शिक्षणविषयक स्थिति समाधानकारक नव्हती. त्यांतही आपल्या गौडसारस्वत ब्रम्हवृंदांची तर बरीच अनिष्ट होती. ही गोष्ट जेव्हां **सुबरावपै**च्या लक्षांत आली तेव्हां त्यांनीं आपले पूज्य गुरू रामचंद्रअय्या यांच्या आज्ञेनें व लोकांच्या पूर्ण सहानुभूतीनें **'कॅनरा हाय्स्कुल'** नांवाची एक शिक्षणसंस्था स्थापन केली आणि या संस्थेला काशीमठ संस्थानांतील धर्माध्यक्ष ब्रम्हीभूत **श्रीभुवनेंद्र** स्वामीसारख्या पूज्य विभूतिची सहानुभूति मिळविली. इतकेंच नव्हे तर त्या संस्थानांतून ह्या शाळेकरितां प्रतिवर्षी ३६० रुपयांची नगद नेमणूकही करून घेतली आणि शाळेच्या इमारतीनजीक एक सभागृह बांधण्याकरितां त्यांचेकडन दहा हजार रुपयांची देणगी घेतली. प्रस्तुत ह्या सभागृहास **'भुवनेंद्र सभासदन'** असेंच अभिधान ठेवण्यांत आलें आहे. तेव्हां इंग्रजीसारख्या पाश्चात्य विद्येच्या अभिवृध्यर्थ प्राचीन विद्याभिमानी धर्मप्रवर्तकाचार्यांकडून देखील शाब्दिक व अर्थिक सहानुभूति मिळविणें किती कठीण काम आहे! पण तें काम सुबरावांनीं आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हां हां म्हणतां साध्य केलें. त्यांनीं याकामीं आपली संपत्ति व शक्ति बरीच खर्च केलेली आहे. ह्या 'कॅनरा हायस्कुल' ची स्थिति सुधारण्याकरितां त्यांनीं अतोनात प्रयत्न केले आहेत व याकामीं त्यांना बरेंच यश मिळालेलें आहे. ह्या शाळेंत तरुण मुलांच्या मनामध्यें नैतिक व धार्मिक तत्वें चांगल्यारीतीनें भरतील अशी शिक्षणाची व्यवस्था आहे. वार्षिक परीक्षांच्या निकालावरून सर्व मद्रासइलाख्यांत ह्या शाळेचा पहिला नंबर लागला आहे **बेनेगल नरसिंगराव** नामक या शाळेंतील एक विद्यार्थी विलायतेंत गेल्या सीनीयर रँगलरच्या परीक्षेंत पास झालेले आहेत. जाति, पंथ, भेद इत्यादि गोष्टी लक्ष्यांत न आणितां सर्व विद्यार्थ्यांना या शाळेंत सारखें शिक्षण दिलें जातें. जरी आपल्या समाजाची उन्नति करण्याविषयीं ते झटत होते तरी पक्षाभिमान त्यांच्या मनाला केव्हांही शिवला नाहीं. सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना ते सारखी मदत करीत असत. केवळ इंग्रजी विद्यकडेच त्यांचा विशेष कल होता असें नाहीं. आपल्या

प्राचीन वेदशास्त्रविद्येचीही त्यांना अत्यंत आवड होती व तिच्या अभिवृद्धीसाठीं त्यांनीं एक वेदशास्त्राची पाठशाळाही ठेविली आहे. विशेषत: ज्या बाबतींत समाजाचें पूर्ण कल्याण होण्याचा संभव आहे; त्या बाबतीविषयीं ते जीवापाड श्रम करीत असत.

मद्रासेस आर्बथनाट कंपनीनें दिवाळें काढल्यानंतर मंगळूर येथें **"दी कॅनरा हिंदुपरमनंट फंड"** नांवाची बँक इ. स. १९०६ सालापासून उघडण्यांत आली. या संस्थेचे मुख्य चालक व अध्यक्ष सुबरावपैच होते. हल्लीं या संस्थेचें काम फार समाधानकारक रीतीनें चाललेलें आहे. गेल्या तीन वर्षांत या संस्थेपासून भागीदारांना दरवर्षी शेंकडा सहांपेक्षां अधिक व्याज मिळत गेलें आहे. मंगळूर येथील मद्रास बँकच्या शाखेकडून व्यापारी लोकांना जबर व्याजानें रकमा कर्जाऊ घ्याव्या लागत असत; पण ह्या संस्थेच्या योगानें त्यांना थोड्या व्याजानें रकमा मिळूं लागल्यामुळें फार फायदा होऊं लागला आहे

मंगळूर येथील 'स्टुडंटस् ब्रदरहुड्' नांवाची संस्था सुबरावानेच काढिली आहे. कॅनरा हायस्कूलाच्या 'भुवनेंद्र' दिवाणखान्यांत दर पंधरवड्यास जिल्ह्यांतील विद्वान् मंडळीकडून निरनिराळ्या विषयावर या संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठीं व्याख्यानें देण्याची व्यवस्था केलेली आहे.

हे चांगले विद्वान् व उत्तम वक्ते होते. त्यांचें कायद्याचें ज्ञानही वाखाणण्यासारखें होतें. यामुळें त्यांचा वकीलीचा धंदा चांगला चालत असे व सर्व वकीलांत हे श्रेष्ठ प्रतीचे समजले जात; पण यांची वृत्ति धार्मिक पडल्यामुळें केवळ पैसा मिळविण्याकडेसच यांचें लक्ष्य नसे. अनाथ विधवा किंवा मुलें यांच्या विरुद्ध ते केव्हांही केस ( वकीलपत्र ) हातीं धरीत नसत. फौजदारी खटले ते फारसे घेत नव्हते. मुनसफ व जजकोर्टांत बहुतेक दिवाणी काम तेवढें घेत असत. विशेषत: दिवाणी कज्जे आपसांत मिटवून टाकण्याचा त्यांचा फार प्रयत्न असे. त्यांच्या ह्या प्रयत्नास पुष्कळदां यशही आलेलें आहे. मोठमोठ्या कुटुंबांतील भाऊबंदी कज्जांचा व भागिदारांच्या कज्जांचा सर्वांना समाधानकारक असा आपसांत निकाल लावून उभय पक्षांची समेट करण्यांत ह्यांचा हातखंडा असे. कोर्टांतील भांडणापासून लोकांचा बराच पैसा व वेळ निरर्थक खर्च होतो तो टाळण्याकरितां व त्यांचें अन्य रीतीनें हित साधण्याकरितां सुबरावांनीं ठिकठिकाणीं **ग्रामपंचायती व जिल्हापंचायती** सभा स्थापन केल्या आहेत आणि त्या जिल्हापंचायतीच्या अध्यक्षांच्या जागीं लोकांनीं सुबरावानाच निवडलें होतें.

हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं असलेल्या गौडसारस्वत ब्रम्हवृंदाची परिषद् भरवावी अशी कल्पना प्रथम यांच्याच मनांत उद्भवली आणि त्याप्रमाणें १९०७।८ सालीं परिषदेच्या दोन बैठकी त्यांनीं चांगल्या रीतीनें पार पाडिल्या. सुबरावाचा स्वभाव फार प्रेमळ आणि विनयसंपन्न होता. परिषदेस आलेल्या सर्व ठिकाणच्या प्रतिनिधींचें जें त्यांनीं प्रेमानें आगत-स्वागत केलें व जो त्यांचा मान राखिला त्याची आठवण प्रतिनिधी केव्हांही विसरणार नाहींत. परिषदेच्या बैठका तीन चार दिवस सारख्या चालल्या होत्या व अनेक विद्वान् गृहस्थ निरनिराळ्या विषयांचा खल करीत होते पण या सर्व विद्वानामध्यें चकाकणारा असा हिरा एकच होता व तो सुबरावच होय. विनय, नम्रता आणि सौजन्य इ. गुणांच्या कोंदणामुळें हा हिरा अत्यंत शोभायमान दिसत होता.

स्त्रीशिक्षणाची महती व आवश्यकता जाणून सुबरावांनीं मंगळूर येथें एक मुलीची शाळा १९०७ सालीं काढिली व १९०८ सालीं या शाळेकरितां कॅनरा हायस्कुला- जवळच एक नवीन टुमदार अशी इमारतही उभारली. मुलांच्या शिक्षणाप्रमाणेंच मुलींच्या शिक्षणाकडे त्यांचें लक्ष्य होतें, किंबहुना अधिक होतें असें म्हटलें तरी चालेल. त्यांनीं अत्यंत परिश्रम करून मुलींना मोफत शिक्षण मिळावें अशी व्यवस्था केलेली आहे.

सुबरावांची मातृभाषा कोंकणी पण इंग्लिश, कानडी-द्रविडी आणि मल्याळी या भाषांचेंही त्यांना उत्तम ज्ञान होतें व या सर्व भाषेंत ते उत्तमरीतीनें बोलत असत. त्यांचा आवाज इतका कांहीं मृदु आणि गोड होता कीं, ते जें कांहीं बोलत, तें खऱ्या कळकळीनें आपल्या अंतःकरणापासून बोलत असल्यामुळें श्रोतृवृंदावर त्याचा चांगला परिणाम होई. त्यांचें अंतःकरणापासून निघालेले विचारपरिप्लुत भाषण ऐकिलें ह्मणजे विरुद्धमताचे लोक देखील आपला हेका किंवा मत सोडून देऊन त्यांच्या म्हणण्याप्रमाणें मत देण्यास तयार होत असत. असा गेल्या परिषदेंत पुष्क- ळांना अनुभव आला आहे.

यांचा मुख्य व स्पृहणीय गुण म्हटला म्हणजे दानशूरपणा हा होय. सारासार विचारानें ते नेहमीं सत्पात्रींच दान करीत असत. सर्वांपेक्षां विद्यादानाच्याकामीं त्यांनीं अधिक धर्म केलेला आहे. गीतेंत सांगितल्याप्रमाणें त्यांचें दान सात्विक असे. वस्तुतः कायद्याचें उत्तम ज्ञान, अप्रतिम वक्तृत्व, धंद्याची वर्णनीय सचोटी इ. गुणामुळें, त्यांना पुष्कळ संपत्ति मिळवून संग्रही पाडितां आली असती; पण त्यांनीं

तसें न करितां आपली बहुतेक कमाई सत्कार्यांकडे खर्च करून टाकिली आहे. त्यांचें दान नेहमीं गुप्त असे. आपल्या देणगीचा ( वर्गणीचा ) आंकडा प्रसिद्ध होणार असें जर त्यांना कळलें तर ते ' एक मित्र ' ' हितचिंतक ' किंवा ' पै ब्रदर्स ' असें मोघम नांव लिहून आपली वर्गणी देत असत. केवळ आपल्याच समाजाच्या शिक्षणाकडे त्यांनीं सर्व दानधर्म केलेला आहे असें नाहीं त्यांचें अंतःकरण सर्व मानवजातीविषयीं प्रेमयुक्त व उदार होतें. इतर जातीच्या विद्यार्थ्यांना देखील मदत करण्यास नेहमी ते तत्पर असत. इतकेंच नाहीं तर मंगळूर येथील मागसलेल्या जातीच्या संस्थेलाही त्यांनीं फार मदत केलेली आहे. १९०२ सालीं मंगळूरास प्लेगाचा प्रादुर्भाव झाला असतां त्यांनीं सर्व जातीच्या लोकांना त्यावेळीं फार मदत केली. त्यांच्या घरीं जाऊन आपलीं गाऱ्हाणीं सांगण्याची सर्वत्रांना सारखी मुभा असे. ते खरे थिआसोफीस्ट ( ब्रम्हज्ञानी ) होते व त्यांची ब्रम्हसमाजाशीं सहानुभूति होती.

सुब्रावाची शरीरप्रकृति फारशी चांगली नव्हती. बरेच दिवसांपासून त्यांना वाताचा ( Rhematsm ) विकार होता. या विकारामुळें त्यांचीं प्रकृति बरीच क्षीण होत चालली होती. तरी देखील आपल्या समाजाचें व इतर लोकांचे कल्याणार्थ त्यांनीं आपली संपत्ति व शक्ती खर्च करून जी पुण्याची जोड मिळविली तिचेयोगानें त्यांची समाजहिताची व सार्वजनिक कारकीर्द चांगली यशस्वी झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या गौडसारस्वत ब्राम्हण समाजांत त्यांच्या तोडीचा मनुष्य दुसरा कोणीही नव्हता म्हटलें तरी चालेल व त्यांच्यामध्यें जें नैसर्गिक तेज, जो खरेपणा, जी दृढोद्योगिता आणि जो उत्साह होता, यायेगानें त्यांची समाजावर चांगली छाप होती. १९०८ सालच्या परिषदेंत कित्येक वादग्रस्त मुद्यांवर त्यांनीं जीं भाषणें केलीं व त्यांचा त्यांनीं जो समाधानकारक निकाल लाविला त्यावरून समाजांतील जुन्या व नव्या पिढीवर त्यांचें सारखें वजन होतें ही गोष्ट चांगली प्रत्ययास आली. आपल्या आंगच्या अनेक सद्गुणामुळें आपल्या सर्व समाजासच नव्हे तर सुशिक्षित, अशिक्षित, श्रीमंत, गरीब इ० सर्व लोकांस ते सारखेच प्रिय झाले होते व सर्वांचा त्यांचेवर विश्वास होता. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पौर्वात्य आणि पाश्चात्य संस्कृतींत जें कांहीं चांगलें आहे तें सर्व सुब्रावांच्या अंगीं होतें. असे सत्पुरुष जगांत फारच दुर्मिळ असतात.

' शूर पहावा रणीं आणि योगी पहावा मरणीं ' म्हणजे खऱ्या शूराची परीक्षा रणांगणांत होत असते आणि खऱ्या योग्याची परीक्षा मरणसमयीं होत असते. तेव्हां

या शेवटल्या परीक्षेंत सुब्राव कसे उतरले ते पहा. जुलै महिन्याच्या १५ व्या तारखे-पर्यंत सुब्राव कोर्टांत जाऊन काम करून आले होते. त्यापुढें ते कोर्टास गेले नाहींत कारण त्यांचा स्वभावसिद्ध वाताचा आजार जास्त वाढूं लागला, त्यामुळें ता० २४ जुलै रोजीं त्यांनीं आपले वडील बंधु रा० वासुदेव पै आणि दिवाणबहादुर वेंकटरमण पै यांना आपल्याजवळ बोलावून आणून त्यांना आपण आरंभ केलेल्या सत्कार्यासंबंधीं शेवटचे चार शब्द सांगितले आणि आपला चिरंजीव बाळकृष्ण पै यास मद्रासहून तार करून आणा असें ते म्हणाले. दुसऱ्या दिवशीं म्हणजे रविवारीं तारीख २५ रोजीं सकाळीं आपणाला आतां बोलण्याची अगर दुसरी कसलीच इच्छा नाहीं, फक्त भगवद्गीता आणि विष्णुसहस्रनाम ऐकण्याची मात्र आहे असें त्यांनीं सांगितलें. त्या-बरोबर गीतापठणाची व्यवस्था केली व ते स्नान करून पथ्य वगैरे कांहीं न घेतां श्रवणास बसले. सबंध गीता आणि विष्णुसहस्रनाम ऐकून झाल्यानंतर दुपारीं सुमारें चार वाजतां, त्यांचा आवाज जरी बराच कमी झाला होता तरी सर्वांस ऐकूं जाईल अशा तऱ्हेनें शांतपणें '**नारायण ' नारायण**' म्हणत त्यांनीं ह्या क्षणिक मर्त्य लोकाचा त्याग केला. शेवटपर्यंत ते चांगले शुद्धीवर होते. परमेश्वरावर सर्व भार टाकून अगदीं स्वस्थ व इच्छारहित झाले होते. एकंदर आप्तइष्ट मंडळीच्या नेत्रां-तून अश्रुधारा चालल्या होत्या पण त्यांच्या नेत्रांत अश्रूचा एक बिंदु देखील आला नाहीं!

नंतर ही त्यांची मरणाची वार्ता हां हां म्हणतां सर्व शहरभर पसरली आणि सर्व जातींतील लोकांनीं आपआपले व्यवहार बंद करून सुबरावाचें अखेरचें दर्शन घेण्याकरितां ते त्यांच्या घराकडे दाखल झाले. ६॥ वाजण्याच्या सुमारास डि० जज्ज, कलेक्टर इ० मोठमोठ्या युरोपियन वगैरे कामदारांनीं येऊन त्यांच्या कुटुंबांतील मंडळीचें शांतवन केलें. इतक्यांत सात वाजतां मद्रासेहून त्यांचे चिरंजिव आले. त्यांचेबरोबर मंजेश्वर, कासरकोड, कुमळा, होसदुर्ग. इ० ठिकाणाहून सुमारें १५० लोक आले होते. एकंदर लोकसमुदाय सात आठ हजार जमला होता. थोडावेळ चिरंजिवांचें दुःख होऊन त्यांचें शांतवन केल्यानंतर स्मशानयात्रेची तयारी झाली. यावेळीं असा चमत्कार झाला कीं, सर्व दिवसभर जोरानें जो पाऊस पडत होता त्यानें एकदम उघाडी दिली व लोकांना बिलकूल त्रास दिला नाहीं. पुढें शेंदिडशें मशाली पेटवून आणि टाळ, मृदंग, विणा वगैरे लावून भजन करीत कॅनराहायस्कु-लासमोरून वेंकटरमण देवस्थानच्या रस्त्यानें मोठ्या थाटांत त्यांचें शव रात्रीं अकरा वाजण्याच्या सुमारास स्मशानांत आणिलें. तेथेंही हजारों मंडळी आपल्या पूज्य

गृहस्थासंबंधींचें शेवटचें कर्तव्य बजावण्यास जमली होती. नंतर चंदनकाष्ठें, कापूर, धूप, चंदनतेल इत्यादि सुवासिक पदार्थांनीं त्या भयंकर सरणाची रचना होऊन त्यावर या नररत्नाचें तें शव ठेवून अग्न्यर्पण केलें. पुढें त्या दु:खदायक देखाव्यानें अत्यंत शोकाकूल झालेली ती सर्व मंडळी रात्रीं दीड दोन वाजतां आपापल्या घरीं परत आली.

त्यानंतर दुसरे दिवशीं कोर्ट, कचेऱ्या, शाळा, दुकानें वगैरे सर्व बंद ठेवण्यांत आलीं होतीं. मंगळूर जिल्ह्यांतील गोरगरीबांना त्यांच्या दु:खप्रदर्शनार्थ शेर शेर प्रमाणें ४,००० रुपयांचे तांदूळ वाटण्यांत आले. याशिवाय सुबरावांचें योग्य स्मारक करण्याचा मंगळूरकरांचा विचार चाललाच आहे. सुबरावांच्या मरणाची वार्ता तारेनें बाहेरगांवीं समजतांच दुसऱ्या दिवशीं दु:खवट्याच्या तारांचा त्यांचे घरीं ढिगांचाढीग येऊन पडला. यावरून मंगळूरकरांसच नव्हे तर बाहेरगांवच्या सर्व लोकांना सुद्धां सुबराव कसे प्रिय होते हें व्यक्त होतें.

प्रसिद्ध मोक्षमुल्लर साहेबांनीं जर्मनींतील एका नामांकित गृहस्थाचें चरित्र लिहून त्याचे शेवटीं असें म्हटलें आहे कीं, " मरण पावलेल्या थोर मित्राच्या गुणांचें वर्णन करावें, त्याच्या नांवास बहुमान द्यावा, आणि त्यांकरितां शोक करावा हें आपलें मुख्य कर्तव्यकर्म आहे, असें कोणी समजूं नये; तर त्या मृतमित्राच्या इच्छा काय होत्या आणि कोणत्या चांगल्या गोष्टी करण्याविषयीं त्याचा आग्रह होता, तें पूर्णपणें समजून घेऊन त्या इच्छांप्रमाणें चालणें आणि त्या गोष्टी करण्याविषयीं झटणें हें आपलें पवित्र आणि उत्तम कर्तव्यकर्म होय. " हें सुबराव पैंच्या आप्तमंडळींनीं व त्यांच्या एकंदर स्नेह्यांनीं मनांत ठेवून त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय करावा.

" वास्तवीक विचार केला तर सुबराव हे मरण पावले असें म्हणण्यापेक्षां त्यांनीं आरंभिलल्या अनेक सत्कार्यांच्या रूपानें ते हल्लीं पूर्वीपेक्षां अधिक स्पष्टपणें जिवंत आहेत, असें समजलें पाहिजे. कारण अनेक सत्कार्ये व परोपकार करून लोकांच्या अंत:करणांत कीर्तिरूपानें आणि स्मृतिरूपानें जिवंत राहणें याला मरण कोण म्हणेल ?

त्यांच्या एकंदर आयुष्यक्रमावरून व मरणाच्या शेवटच्या कसोटीवरून पांहतां भगवंतांनीं म्हटल्याप्रमाणें:—

" यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छत्वं मम तेजोंऽश सम्भवम् ॥ " १०-४१

सुबराव हे खरोखर याच कोटींतील भगवदंश होते असें सिद्ध होतें.

---



श्रीयुत मंगेश जिवाजी तेलंग,
बी. ए., एल्. एल्. बी.

# मंगेश जिवाजी ऊर्फ आप्पासाहेब तेलंग
## बी. ए. एल्. एल्. बी.

" वदनं प्रसाद सदनं सदयं हृदयं सुधामुचोवाचः।
करणं परोपकरणं येषां केषां न ते वन्द्याः ?॥ "

लोकशिक्षणाचे बाबतींत लेखनाचें महत्व विशेष आहे. त्याच्या खालोखाल वक्तृत्वाचा क्रम लागतो. पण कांहीं कांहीं प्रसंगीं लेखनापेक्षां वक्तृत्वानेंच कार्य-भाग अधिक चांगला होतो. वक्तृत्वाला अथवा लेखनाला मानसशास्त्रदृष्ट्या कांहीं गोष्टी अवश्य लागतात. प्रथमतः विषयासंबंधानें वक्ता किंवा लेखक उत्कंठीत असावा लागतो, मनुष्याच्या उत्कंठेच्या प्रमाणानें त्याचें त्या विषयासंबंधानें चिंतन वाढत जातें व ज्या मानानें एखाद्या विषयासंबंधानें चिंतन वाढत जातें त्या मानानें त्याची एकाग्रताही होऊं लागते; व या एकाग्रतेच्या योगानें माणसाला एकाद्या विषयावर बोलण्याचा अधिकार प्राप्त होतो. वरील साधनांनीं संपन्न असलेल्या लेखकाची अगर वक्त्याची लोकसमुदायावर छाप पडल्याशिवाय कदापि राहणार नाहीं. अधिकार हा वक्तृत्वाचा मुख्य भाग आहे व एवढ्याचसाठीं अनुबंधचतुष्टयांत पूर्वका-लीन पद्धतींत ग्रंथकार व वक्ते आपल्या अधिकाराचा उल्लेख करीत असत. सांप्रतकाळीं वक्ते किंवा लेखक या नात्यानें पुढें आलेल्या लोकांमध्यें अधिकाराचा भाग फारच थोडा असतो, विषयासंबंधानें एकाग्रताही बेताचीच असते, तसेंच विषयाचें ज्ञान आणि तें व्यवस्थितरीतीनें समाजापुढें मांडण्याची हातोटी, ही फारच थोड्या ठिकाणीं दृष्टीस पडते. याशिवाय त्या शास्त्राला अनुसरून असणारी पद्धति ही देखील फार दुर्मिळ असते. आपल्या वक्तृत्वाचा अथवा लेखनाचा ठसा वाचकवृंदावर किंवा श्रोतृसमुदायांवर चांगला ठसावा व तो चिरकाल टिकावा अशी ज्याची महत्वाकांक्षा असेल त्यानें स्वीकृत विषयासंबंधानें आपला अधिकार वाढविला पाहिजे. भाषालं-कारादि बाह्योपांगांकडे विशेष लक्ष न देतां अधिकारपरत्वें आपले विचार निश्चयानें समाजापुढें मांडून सर्व समाजाची अंतःकरणें आपल्याकडे ओढून घेण्याचा जो प्रयत्न करतो तोच खरा लेखक अगर वक्ता होय. या दृष्टीनें पाहिल्यास उत्तम लेखक व उत्तम वक्ते यामध्यें प्रस्तुत चरित्रनायक मंगेशराव यांची प्रमुखत्वानें गणना केली पाहिजे. हें पुढें दिलेल्या त्यांच्या जीवनचरित्रावरून उघड सिद्ध होतें.

सुमारें साठ वर्षांपूर्वी मंगेशरावजींचे आजे मंगेश रामचंद्र ऊर्फ मांगबादादा तेलंग हे उदरनिर्वाहार्थ आपला गोमांतक प्रांतांतील मूळ गांव सोडून सहकुटुंब खानापूर येथें येऊन राहिले. त्यांना त्यावेळीं खानापुरांतील प्रसिद्ध गृहस्थ पांडुरंगराव यादीं यांनीं आपल्या घरीं आश्रय दिला होता. तेव्हां यादीं घराण्याचा बराच भरभराट असे; तरी त्यावेळीं मांगबाबादादांचे कुटुंबांत त्यांची बायको, लहान मुलगा (हेच प्रस्तूत चरित्रनायकांचे वडील जिवणराव होत.) आणि कृष्णाप्पा नांवाचा एक लहान बंधू, अशीं चार माणसें होतीं. मांगबादादांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ व मनमिळाऊ असल्यामुळें यादींच्या घराण्यांत व सबंध खानापूर गांवांत दोन चार वर्षांत त्यांनीं आपलें बरेंच बस्तान बसविलें. इतकेंच नाहीं तर त्या गांवातील सबनी उपनामक एका गृहस्थाच्या कन्येबरोबर आपल्या बंधूचें लग्न करून शरीरसंबंध देखील जोडला. खानापुरांतील सर्व लहानथोर मंडळी त्यांना मांगबादादा याच नांवानें ओळखीत. स्वतःचा कुटुंबचरितार्थ केवळ दुसऱ्याच्या आश्रयावर किती दिवस चालणार! नाइलाज म्हणून इतके दिवस लोकाश्रयावर काढले. यापुढें असें करणें इष्ट नाहीं. कांहींतरी स्वतंत्र उद्योगधंदा पाहिला पाहिजे. असें कृष्णाप्पाच्या मनांत आलें. आणि त्याप्रमाणें ते आपल्या वडील बंधूचा निरोप घेऊन इ० स० १८४५ च्या सुमारास उत्तर हिंदुस्थानांत ग्वाल्हेरीस निघून गेले. तेथें चार सहा वर्षे राहून बरीच धनदौलत पैदा केली आणि पुनः तिकडून निघून ते परत खानापुरास आले. व एक लहानसें घर घेऊन त्यांत बंधूसहवर्तमान राहूं लागले. म्हातारपणामुळें मांगबादादांनींही प्रपंचभार कृष्णप्पावरच सोंपविला, आणि आपण स्नान संध्या, देवपूजादि नेमनिष्ठेंत काल घालवूं लागले. त्यांचे चिरंजीव म्हणजे चरित्रनायकांचे वडील जिवणराव हे यावेळीं चवदा वर्षांचे असून मराठी शिकत होते. कोणताही माणूस कां असेना. ता जगामध्यें लोकप्रिय होण्याला दोन साधनें लागतात, एक त्याचेजवळ पैसा तरी विपुल असला पाहिजे, किंवा तो विद्वान् असला पाहिजे. तेव्हांच तो माणूस सर्वांचा आवडता होतो. लोक त्याशीं विशेष स्नेहसंबंध जोडण्याविषयीं यत्न करितात असा हा व्यवहारांतला अनुभव आहे. त्याप्रमाणें खानापुरांत नवीन आलेल्या या तेलंग घराण्याशीं विश्वनाथराव यादींनीं आपली मुलगी जिवणरावजींस पाणिग्रहण करून देऊन आपला कायम शरीरसंबंध जोडला. जिवणराव हे लहानपणापासून चपळ व तरतरीत बुद्धीचे हुशार होते. त्यांनीं त्यावेळच्या रीतीप्रमाणें आपला मराठी शिक्षणक्रम पुरा करून कष्टम खात्यामध्यें आट

कुलवृत्तांत व जन्म.

रुपये दरमहावर एक लहानशी नोकरी पत्करली. तेथून पुढें ते वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिफारशीवरून पंधरा रुपयांवर रेव्हिन्यूखात्यांत आले. त्या खात्यांतही मुरगोड, बिडी, वगैरे भागांत कांहीं वर्षे काम करून इ० स० १८७२ च्या सुमारास हुकेरीस त्यांची महालकऱ्याचे जागीं नेमणूक झाली. शेवटपर्यंत ते त्याच कामावर होते. त्यांचा स्वभाव साधा व मनमिळाऊ होता. यामुळेंच त्यांची उत्तरोत्तर बढती होत गेली त्यांना पहिल्यानें एकामागून एक अशा चार पांच मुलीच झाल्या यामुळें त्यांच्या वाढत्या प्रापंचिक सौख्यांत पुत्र संततीचीच तेवढी न्यूनता राहिली होती. आणि ह्यास्तव जिवणरावजींनीं आपली पत्नी अन्नपूर्णाबाई हिच्या सल्यानें देवादिकांस नवसही केले होते म्हटलें तरी चालेल त्याप्रमाणें परमेश्वरानें कृपा करून त्यांना दोन पुत्र दिले. त्यांपैकीं प्रथम पुत्राचें जन्म शके १७९४ म्हणजे इ० स० १८७२ मध्यें झालें. ज्या कुल ( मंगेश ) देवाच्या कृपेनें हें पुत्रसंतान मिळालें अर्थात् त्याच्याच नांवानें पुढें हें उदयास यावें म्हणून जिवणरावजींनीं त्याचे ' मंगेश ' असें नांव ठेविलें. हेच प्रस्तुत चरित्राचे नायक मंगेशराव तेलंग होत. मंगेश हे त्यांच्या आजोबाचें नांव होते हें वर सांगितलेंच आहे. ह्मणून त्यांचे वडील त्यांना आप्पा या नांवानें संबोधीत असत व पुढें हेंच त्यांचें नांव विशेष प्रचारांत आलें. अतएव आम्हींही यापुढें त्यांच्या चरित्रांत ह्याच नांवाचा उल्लेख करूं.

**बालपण व प्राथमिक शिक्षण.**

जिवणरावजींस नवसानें पुत्ररत्न मिळालें खरें; पण तें जर सशक्त व निरोगी असतें तर त्यांच्या मागची काळजी चुकली असती; परंतु तसा प्रकार कांहीं नव्हता. जन्मकालापासून तों सहा सात वर्षे वयापर्यंत आप्पासाहेब चांगल्या सुस्थितींत येऊन आपणास लाभतील असें कोणास व विशेषतः त्यांच्या मातापितरांसही वाटलें नव्हते. कारण, त्यावेळचें त्यांचें बरेंचसें मोठें डोकें, लहानशा काडीप्रमाणें हात पाय, पुढें आलेलें पोट, वगैरे तत्कालीन त्यांची बालपणची स्थिति व अलीकडची त्यांची स्थिति पाहणारास विधिघटनेंबद्दल आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. वयाला सहावर्षे होईपर्यंत त्यांना पायांनीं चालून जाण्याचें सामर्थ्य नव्हतें. पण " **अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितं सुरक्षितं दैवहतं विनश्यति** " या कव्युक्तीनुसार परमेश्वरकृपेनें लौकरच ते ह्या दुःस्थितींतून मोकळे झाले. प्रापंचिक सुखांत कोणत्याही एखाद्या गोष्टीची कमतरता पडली ह्मणजे मग देव, धर्म, मंत्र, तंत्र, वगैरे आठवावयाचे जरा कोठें कोणाचें डोकें दुखूं लागलें कीं, पहा जोशीबुवांकडे प्रश्न, घ्या कुलदेवाकडे कौल, व करा मागणें; असा प्रकार बहुधा

जुन्याविचारांच्या व अशिक्षीत हिंदुलोकांत फार आढळतो. त्यांत बाया बापड्यांमध्यें तर याचा प्रचार विशेषच दिसून येतो. त्याचप्रमाणें 'आप्पासाहेब चांगल्या रीतीनें चालूं लागले म्हणजे त्यांची मुंज तुझ्या पायाकडे येऊन करीन.' असें त्यांच्या मातुश्रीनें कुलदेवाकडे नवसही करण्यास मागें केलें नव्हते; व 'भोळाभाव सिद्धीस पाव' ह्मणतात तसें तिचें नवस पूर्ण करण्याकरितां वयाच्या सातव्या वर्षीं त्यांना देवानें पाय दिले म्हटलें तरी चालेल; आणि तेव्हांपासून मग त हळू हळू चालूं लागले. इकडूनच पुढें त्यांच्या शिक्षणास आरंभ झाला.

वडिलांचा व्यवसाय नोकरीचा पडल्यामुळें त्यांचे एके ठिकाणीं वास्तव्य नव्हतें. आज एकीकडे तर उद्या दुसरीकडे असा प्रकार होता. यामुळें आप्पासाहेबांचें प्राथमिक शिक्षण अमक्याच एका विशिष्ट स्थलांत झालें असें नाहीं. तथापि त्यांचे वडील चंदगड महालांत महालकरी असतां तेथील सरकारी मराठी शाळेंत रा० गोविंद चिणमाजी करकरे ह्यांच्या हाताखालीं मराठी शिक्षण झालें.

**उपनयनसंस्कार व पितृवियोग.**

त्यांच्या मराठी तीन इयत्ता पूर्ण झाल्यावर मातुश्रीनीं केलेले नवस फेडण्याकरितां ते आपल्या आईबापांबरोबर गोमांतकांत श्रीक्षेत्र मंगेशी येथें इ० स० १८८० सालीं गेले. त्यावेळीं त्यांचेबरोबर इतर आप्त इष्टमंडळी व त्यांचे शिक्षक रा. गोविंदरावजी करकरे, हेही गेले होते. तेथें मंगेशीस श्री कुलदेवाच्या सांनिध्यांत १८८० च्या एप्रील महिन्यांत मोठ्या समारंभानें त्यांचा उपनयनसंस्कार झाला. उपनयनाचें कार्य यथा सांग उरकल्यावर त्या प्रांतांतील इतर देवतांचें दर्शन पूजन वगैरे करण्यांत एकदोन महिनें घालवून परत ते सहकुटुंब चंदगडास येऊन दाखल झाले. तेथें त्यांनीं मराठी पांचव्या इयत्तेपर्यंतचें शिक्षण पूर्ण केलें, आणि इकडून पुढें मग त्यांच्या जीवितक्रमाचें सगळेंच पारडें उलटण्यास आरंभ झाला. इ० स० १८८० च्या आगष्ट महिन्यांत त्यांचे वडील जिवणराव हे चंदगड येथें उदराच्या व्याधीनें स्वर्गस्थ झाले. नुकतीच कोठें आप्पासाहेबांची शैशवावस्था संपून त्यांच्या कुमारावस्थेस प्रारंभ झाला होता म्हणजे नऊ संपून दहावें वर्ष लागण्याचा सुमार होता. पण त्या अवस्थेंतील अनुपम सौख्याचा उपभोग घेण्यास ईश्वरानें त्यांचे वडिलांस जिवंत ठेविलें नाहीं. ही मोठी खेदाची गोष्ट होय. इतक्या लहान वयांत पितृवियोगासारिखें असह्य दुःख अनुभविण्याचा प्रसंग आप्पासाहेबांवर आल्यामुळें वर्ष सहा महिनें कांहीं अभ्यास वगैरे नसतां त्यांचे दिवस अगदीं फुकट गेले.

नंतर ते आपली मातुश्री व सात वर्षांचा लहान बंधू वामनराव, यांना घेऊन चंदगडाहून निघून खानापूर येथें आपल्या वडिलोपार्जित घरांत येऊन राहिले आणि त्यांचे मातूळ कै. वासुदेव विश्वनाथ यार्दी यांनाच आपले वडिलांप्रमाणें मानून त्यांच्या आज्ञेंत वागूं लागले पुढें कांहीं दिवस गेल्यावर अवशिष्ट राहिलेलें मराठी सहाव्या इयत्तेचे शिक्षण त्यांनीं खानापुरच्या मराठी शाळेंत जाऊन पूर्ण केलें. त्यांना यावेळीं विद्येचें महत्त्व चांगलें कळूं लागलें होतें. आपण जर चांगली उच्च विद्या शिकलों तर आपली कीर्ति वाढेल, आणि चरितार्थ चालण्यासही उत्तम साधन होईल. अशारीतीचे पोक्त विचार रात्रंदिवस त्यांच्या मनांत सारखे घोळत होते. इतक्या अल्पवयांत आणि वडिलांचा ताबा नसतां असे प्रगल्भ विचार मनांत येणें हेंच त्यांच्या भावी उदयाचें पूर्वचिन्ह समजलें पाहिजे! त्यावेळीं आप्पासाहेबांनीं आपल्या मातुळाच्या परवानगीनें गांवातील कांहीं समवयस्क स्नेहीमंडळींस मिळवून तेथीलच एका मराठे ज्ञातींतील प्रमुख गृहस्थाकडे इ० स० १८८३ सालीं इंग्लिश शिकण्यास प्रारंभ केला. एकावर्षांत तीन इयत्तेपर्यंत त्यांजकडे अभ्यास करून पुढें ते बेळगांवास १८८४-सालीं सरदार हायस्कुलांत जाऊं लागले. तेथें हे आपल्या कुशाग्रबुद्धीच्या जोरावर दृढाभ्यासानें चार वर्षांत म्हणजे १८८८ इसवीमध्यें म्याट्रिक परीक्षेंत उतीर्ण झाले.

**इंग्लिश शिक्षणास आरंभ.**

इकडून पुढें आप्पासाहेबांना वरच्या दरजाचें शिक्षण द्यावें किंवा इतक्यावरच पुरें करावें! असा त्यांचे मातूळ व मातुश्री, यांमध्यें विचार उत्पन्न झाला व शेवटीं झालेल्या तितक्या विद्येवर एकादी आठ दहा रुपये दरमहाची नोकरी मिळाल्यास तो पाश त्यांचे गळ्यांत अडकवून सोडावा असें देखील उभयतांनीं ठरविलें होतें. वास्तविक हे त्यांनीं ठरविलेले विचार आप्पासाहेबांच्या त्यावेळच्या कौटुंबिक स्थितीस अनुसरून असल्यामुळें अगदीं गैरवाजवी नव्हते; पण "विद्यामृताचें पान भरपूर झालें, तरच तें आपला गुण दाखवितें; परंतु त्याच्या तुटपुंज्या ज्ञानानें मात्र गुण न होतां उलट अपाय होतो. हें अमृत पचण्यास फार कठीण आहे आणि तें पचविण्याची अंगांत मुळची किंवा संपादित शक्ति नसेल तर त्याचा अंमल विषाप्रमाणें होतो आणि मग तो अल्पविद्य अगर अपक्वविद्य मनुष्य त्या विषाचे संचारामुळें अगदीं तुफान होऊन जातो. त्याची स्वभावतः तीव्रबुद्धि

**उच्च शिक्षण व विवाह.**

चंचल होते, त्याची तीक्ष्णदृष्टि मंदावते, त्याचा सारासारविचार फिका पडतो, त्याचा सभ्यपणा अस्तावतो, " वगैरे जे उद्गार त्यांनीं आपल्या एका लेखांत काढले आहेत; अर्थात् अल्पविद्य माणसाचे कष्टतर परिणाम यापूर्वींच त्यांना अवगत होते असें म्हटलें पाहिजे, आणि म्हणूनच त्यांच्या स्वभावसिद्ध पूर्ण विद्यामृतपानाच्या तीव्र जिज्ञासेपुढें मातुळमातोश्रीचे विचार टिकले नाहींत; मग लागलींच पुढील सर्व व्यवस्था करून ते मुंबई येथें विल्सन कालेजांत गेले. तेथें इ० स० १८८९ ह्यावर्षी त्यांची प्रिव्हियसची परीक्षा उतरून ते संस्कृतांत पहिले आल्यामुळें त्यांस वर जीवनदास माधवदासचें बक्षीस मिळालें याच वर्षी खानापुर येथील श्रीयुत कै. बाळकृष्णराव सांब्राणीकर यांच्या द्वितीय कन्येशीं त्यांचा विवाह झाला. पुढें १८९० इसवीमध्यें आजारीपणामुळें ते फर्स्ट बी ए च्या परीक्षेस बसले नाहींत. त्याच्या पुढच्या वर्षी म्ह. १८९१ मध्यें ते डेकनकॉलेजमधून फर्स्ट बी. ए. झाले. त्यावेळीं आप्पासाहेब कालेजांत केवळ विद्यार्थीदशेंत जरी होते, तरी लोकहिताच्या बाबतींत त्यांचें फार लक्ष्य होतें. असें, त्यांनीं कालेजांत असतांना आपल्या कैवल्यमठाधीश सारस्वत धर्मगुरूंना विधवाविवाहाचे बाबतींत डॉ० भांडारकरांविषयीं जें संस्कृतभाषेंत विनंतिपत्र लिहिलें, त्यावरून सिद्ध होतें.

हें पत्र आप्पासाहेबांनीं इ. स. १८९१ च्या आक्टोबरच्या २ तारखेस त्यावेळीं शहापुर येथें निघत असलेल्या 'विजय' पत्रांत छापून प्रसिद्ध केलें होतें. वस्तुतः नैतिकदृष्टीनें पाहिल्यांस अगदी योग्य ठरणाऱ्या, पण गतानुगतिकत्वावर चालत आलेल्या राक्षसी रूढीच्या दृष्टीनें पाहणारांस मात्र अयोग्य वाटणाऱ्या अशा पुनर्विवाहासारख्या महत्वाच्या धार्मिक विषयाची चाल समाजांत सुरू व्हावी आणि तशी ती सुरू करण्याचें पवित्र व श्रेष्ठ कार्य हिंदुस्थानांतील प्रमुख अशा एका विद्वद्वर्यानें हातीं घेऊन '**कृत्वा दर्शयते प्राज्ञः**' या न्यायानें अमलांत आणून दिलें; अर्थात् अशा योग्य माणसांनीं उभारलेल्या योग्य कृत्याविषयीं समाजाकडून पूर्ण सहानुभूती मिळावी व विशेषतः धर्मगुरूंनींही त्याविषयीं आपली पसती दर्शवावी किंवा निदान उदासीन तरी राहावें, इत्यादि हेतूनें वीस बावीस वर्षांच्या वयांत केवळ विद्यार्थीदशेंत असतांना आपल्या धर्मगुरूंस प्रसिद्धपणें संस्कृत भाषेमध्यें विनंतिपत्र लिहिण्याचें जे धाष्टर्य आप्पासाहेबांनीं केलें तसें दुसऱ्याच्यानें सहसा करवणार नाहीं! असो. नंतर ते १८९२ मध्यें बी. ए. ची परीक्षा देऊन खानापुरास आले.

पुण्यासारख्या सुशिक्षित लोकवस्तीच्या शहरांत सतत दोन तीन वर्षे राहून मिळविलेला अनुभव त्याचा थोडासा फायदा आपल्या ग्रामबंधूसही व्हावा म्हणून त्यांनीं आपल्या बंधूस पुढेकरून एक खानापुरांत ' भारतीभवन ' नामक वाचनालय स्थापन केलें. या भवनाची कल्पना प्रथमतः त्यांनीं वामनराव तेलंग व तेथील कांहीं तरूण सद्‍गृहस्थांस करून दिली. त्याप्रमाणें पुढें ती कल्पना गांवांतील लोकांत प्रकट करितांच सरकारी अधिकारी व कांहीं अनुभविक वृद्ध सद्‍गृहस्थांचें त्यांस प्रोत्साहन मिळालें आणि कांहीं वृत्तपत्रें व मासिक पुस्तकें आणण्याचें ठरलें: पण भवनास स्वतंत्र जागा नसल्यानें फार गैरसोय होऊं लागली तेव्हां एक स्वतंत्र इमारत बांधावी असा मंडळीनें संकल्प केला. तदनुरूप त्यावेळचे लोकप्रिय मामलेदार रा. सा विष्णु पांडुरंग जोशी यांच्या सल्यानें तेथील खासगी गांवसुधारणा कमीटीनें भवनाच्या इमारतीकरितां आपल्या शिलकेंतून ५०० रुपयांची देणगी दिली. गांवच्या मध्यभागीं एक विस्तृत जागा खरेदी घेऊन तेथें इमारत बांधण्याचें काम सुरू झालें व भवनाचे मुख्य चालक रा. वामनराव तेलंग यांस इष्टसिद्धि लवकरच होणार म्हणून आनंदही झाला; पण " **मनसा चिंतितं कार्यं दैवं चिंतयतेऽन्यथा** " ते तारीख २९ माहे एप्रील १८९३ इसवी रोजीं आपल्या वयाच्या १९ साव्या वर्षी कैलासवासी झाले यामुळें त्यांनीं आरंभिलेला उद्योग योग्य धुरीणाच्या अभावीं जागच्याजागीं राहिला. असा हा बंधुवियोगरूप असह्य दुःखाचा घाला अकस्मात् येऊन पडला तरी आप्पासाहेबांनीं सत्क्रिमाकडे लक्ष्य देऊन धीर न सोडतां प्रियबंधूचें अंगीकृत कार्य नेटानें पुढें चालविण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें त्यांत त्यांना यशही आलें.

**सार्वजनिक उद्योग व बंधु वियोग.**

मध्यंतरीं तारीख १८ माहे आगष्ट स० १८९३ इसवी रोजीं त्यावेळीं तेथील मराठी शाळेंत असलेले विद्वान् व मेहनती हेड्मास्तर रा० रा० रामचंद्र गोविंद बावडेकर यांच्या अश्रांतश्रमानें तेथें एक ' नीतिप्रसारक ' नांवाची सभा स्थापन झाली. नैतिक, धार्मिक व सामाजिक विषयांवर सोप्या व सरळ भाषेंत व्याख्यानें देऊन व निबंध लिहून लोकांच्या मनांत जागृति उत्पन्न करणें; आट्यापाट्या चेंडूफळी इत्यादि देशी व विदेशी खेळास उत्तेजन देऊन शारीरिक उन्नतीकडे लोकमत वळविणें, लहान मुलांचेठायीं आज्ञाधारकता, नियमितपणा, स्वच्छता इत्यादि कल्याणप्रद गुणांचा विकास व्हावा म्हणून वेळोवेळीं शाळांतून परीक्षा घेऊन वरील गुणांच्या मानानें त्यांस बक्षिसें देणें; हे या सभेचे हेतु होते. या सभेलाही प्रथमतः लोकाश्रय

बरा मिळाला. पण पुढें लवकरच मशारनिल्हे रा० बावडेकर हे तेथून बदलीवर दुसरीकडे गेले. अर्थात् आपल्या अलौकिक लोकवश्यतेनें त्यांनीं लोकांत उत्पन्न केलेला हुरूपही त्यांच्यामागे फार दिवस टिकला नाहीं. नंतर सन १८९४ सालच्या प्रारंभी सभेचें काम आप्पासाहेबांनीं आपल्या अंगावर घेतलें, आणि ही सभा व आपल्या कै० प्रियबंधूनें आरंभिलेलें पण योग्य वाली न मिळाल्यामुळें लुप्तप्राय झालेलें '**भारतीभवन**' नामक वाचनालय; या दोनही संस्था एकत्र कराव्या असें त्यांनीं सभेस सुचविलें. सभेस ही सूचना पसत पडली. त्याप्रमाणें ता. १ मे स० १८९५ रोजीं '**सहकारिणी सभा**' या नांवानें दोनही संस्थांचें सम्मीलन झालें.

वर सांगितलेंच आहे कीं, गांवसुधारणाकमीटीकडून ५०० रुपयांची देणगी मिळाली होती. पण ही रकम केव्हांच खपून इमारतीचें काम अपुरें राहिलें होतें. तें पुरें करण्यास आणखी पांचसहाशे रुपयांची गरज होती. रीतीप्रमाणें सभेच्या वतीनें आप्पासाहेबांनीं गांवकमिटीकडे प्रथम मागणी केली. व कमीटीनेंही उदार मनानें आणखी २७५ रुपये देण्याचें ठरविलें बाकीची रकम गांवकरांकडून वर्गणीच्या रूपानें जमा करून इमारतीचें काम एकदाचें पुरें केलें. सभेनें भवनाचें काम पत्करिलें त्यावेळीं काय ती आठ वृत्तपत्रें व दोन मासिक पुस्तकें येत होतीं. ग्रंथसंग्रह तर मुळींच नव्हता. पण आप्पासाहेबांच्या दृढ निश्चयानें व लोकांच्या उत्साहानें, ही वाण भरून येण्यास उशीर लागला नाहीं कारण, त्यावेळीं खानापूर येथें दोन सुप्रसिद्ध मासिक पुस्तकें निघत असत. त्यांपैकीं प्रस्तुत '**लोकमित्र**' एक चालू आहे. व त्यांच्या संपादकांस परत भेटीदाखल महाराष्ट्र भाषेंतील बहुतेक वृत्तपत्रें व मासिक पुस्तकें येतात. तेव्हां त्यांस विनंति केली असतां वाया जाणार नाहीं, असें आप्पासाहेबास वाटल्यावरून त्यांनीं लोकमित्रकर्ते रा. दत्तात्रय गोविंद सडेकर व देशमित्रकर्ते रा. हरी सखाराम खानोलकर, यांजकडे उद्दिष्ट गोष्ट काढिली व आनंदाची गोष्ट कीं, या सद्गृहस्थांनीं मोठ्या उमेदीनें त्याच्या म्हणण्यास मान दिला. वरील संपादक इतकेंच करून राहिले नाहींत; तर भवनाच्या ग्रंथसंग्रहासही त्यांनीं यथाशक्ति मदत केली व पुढेंही सवडीप्रमाणें करण्याचें अभिवचन दिलें.

दुसरी गोष्ट ग्रंथसंग्रहाची, भवनाचा ग्रंथसंग्रह मुळींच नव्हता. पण त्याविषयीं आप्पासाहेबांनीं एक तोड काढिली व ती सर्वांशी फलद्रूप झाली. सभेच्या सभासदांपैकीं कांहीं सद्गृहस्थांपाशीं मराठी ग्रंथसंग्रह बराच होता. हा ग्रंथसंग्रह खासगीरीतीनें तसाच पडून राहिल्यापासून मालकास कांहीं फायदा तर नाहींच; पण त्याची तादृश काळजी न घेतल्यानें कसरीच्या भक्ष्यस्थानीं मात्र पडून जाणार; तेव्हां जर

तो भवनाच्या स्वाधीन केला तर त्याची नीट व्यवस्था लागून उपयुक्तताही वाढेल; अशी सदरी सभासदांस समज देतांच त्यांनीं आपापलें ग्रंथभांडार भवनाकडे दिलें.

याप्रमाणें ह्या सार्वजनिक संस्थेची नीट व्यवस्था लावून नवीन उभारलेल्या इमारतींत तिचा प्रवेशसमारंभही मोठ्या थाटानें त्यांच्या हातून पार पडला यावेळीं त्यांनीं जें एक लहानसें भाषण केलें, तें फार मार्मिक होतें. ' सहकारिणीसभा ' व ' भारतीभवन ' या दोन्ही संस्था एकत्र करून त्यांचा पूर्ववृत्तांत सांगितल्यावर आप्पासाहेब म्हणाले:-" अशाप्रकारच्या संस्थांची आम्हांस आज अत्यंत अवश्यकता आहे. खरे लोकशिक्षण प्रसृत होऊन देशोन्नति होण्याचे जे अनेक राजमार्ग आहेत. त्यांपैकीं अशा संस्था म्हणजे प्रधान होत. त्यांचें स्वरूप व घटना कितीही स्थानिक असूं द्या; त्यांचे परिणाम व महत्व राष्ट्रीय होत. करितां सर्व बाणेदार देशबंधूंस आमची सप्रेम प्रार्थना आहे कीं, त्यांनीं आपापल्या गांवीं अशा संस्था स्थापून व इतरत्र असलेल्या संस्थांस द्रव्यादिद्वारां सहाय्य करून आपल्या पतित देशाच्या उद्धारकृत्यास अंशत: तरी हातभार लावावा. भवनासारख्या लोकशिक्षणाच्या संस्थांची उपयुक्तता जुन्या व साधारण शिक्षण पावलेल्या तरुण मंडळींच्याही मनांत भरविण्याचें काम किती अगत्याचें, पण किती श्रमाचें आहे हें अनुभवांतीं कळण्याजोगें आहे. नुसती उपयुक्तता सिद्ध केल्यानें कार्य होतें असें नाहीं. कोणतीही संस्था चिरस्थाई होण्यास जनमनांत तिच्याविषयीं जिवंत आस्था उत्पन्न केली पाहिजे व ही आस्था एकदां उत्पन्न झाल्यावर तिचें परोपरी संगोपन व संवर्धन केलें पाहिजे. अर्थात् हें काम फार प्रयासाचें व धीराचें आहे. या दृष्टीनें विचार केला असतां प्रस्तुत भवनास गेल्या २।४ वर्षांत जें रमणीय स्वरूप प्राप्त झालें आहे, त्याजबद्दल त्याच्या पुरस्कर्त्यांचें आत्मस्तुतीचें माप पदरीं येत असतांही सप्रेम अभिनंदन केल्याविना कार्यकारी मंडळीस राहवत नाहीं अत्यंत निरुपायाची व म्हणून दु:खाची गोष्ट एवढीच कीं, भवनाचे मुख्य जनक व माझे प्रियबंधू रा. वामनरावजी तेलंग हे आपण रुजत घातलेल्या वृक्षाच्या अभिनव फलांची माधुरी सेवन करण्यास आज हयात नाहींत हें दुर्भाग्य समजावयाचें !! असो. आमचा गांव चिमुकला व विद्येविषयींही विशेष सरसावलेला नसतां केवळ सतत उद्योगानें एका तरी संस्थेस हातीं धरून तीस नांवारूपास आणितो, यावरून दाक्षिणात्यांच्या माथीं नेहमीं मारला जाणारा आरंभशूरत्वाचा दोष आम्हांतून हळूं हळूं नष्ट होत आहे असें कोण बरें म्हणणार नाहीं ? " अशारीतीची ही एक सार्वजनिक लोकशिक्षणाची संस्था

असाखेन ते १८९५ सालीं पुण्यास राष्ट्रीय सभेकरितां गेले. तेथें आणखी थोडे दिवस राहून ते इ० स० १८९७ सालीं एल्. एल्. बी. झाले.

**स्वतंत्र व्यवसाय व धुरीण पत्र.**

त्यानंतर वास्तविक म्हटलें तर, आप्पासाहेबांनी आपलें सगळें लक्ष वकीलीच्या धंद्यांत गुंतवावयाचें. परंतु द्रव्यसंपादनापलीकडे कांहींतरी कर्तव्य करावयाचें आहे. असें त्यांना समजून चुकलें होतें. शिवाय पुण्यासारख्या उद्यमशील नगरांत ते बरेच दिवस राहिल्यामुळें तेथें त्यांना बऱ्याच नव्या गोष्टींचा अनुभव मिळाला. " राष्ट्रीयसभेच्यावेळीं तेथें धर्माच्या किंवा धर्माभिमानाच्या नांवाखालीं कसा सावळागोंधळ माजला, व्यक्ती व्यक्तींमध्यें रणें माजून अनुभव वृद्ध व वयोवृद्ध विद्वानांची कशी मानहानि करण्यांत आली, खोट्यानाट्या गप्पा उठवून कांहीं विघ्न-संतोषी लोकांनीं राष्ट्रकार्याचा विघाड करण्याचें कसें योजिलें होतें, वगैरे गोष्टी आप्पासाहेबांनीं प्रत्यक्षपणें पाहिल्या होत्या. ते डेकनकालेजमध्यें असतांना पुण्याच्या वातावरणाची त्यांस चांगली माहिती झाली होती. समतिवयाच्या बिलाच्या नांवानें पुण्यावर स्वधर्माभिमानाचा जो प्रचंड पूर येऊन गेला, तेव्हांपासून तेथील कांहीं लोकांच्या बेगडी अभिमानाची व देशकार्यतत्परतेची त्यांस चांगली ओळख पटलेली होती गोपाळराव आगरकरांचे ते विचारजागृती करून स्वाभिमानास उत्तेजन देणारे लेख वाचून त्यांच्याठिकाणीं आपल्या स्वतःच्या कर्तव्यासंबंधीं विचार निश्चित होत होते. डॉ० भांडारकर, प्रो० सेल्बीसाहेब, यांसारख्या विद्वान, योजक, करारी, व बाणेदार अध्यापकांच्या सहवासाचा त्याच्या मनावर इष्ट असा परिणाम झालेला होता " यामुळें आप्पासाहेब आपलाजन्म स्वतःच्याच कुटुंबपोषणाकरितां नसून विश्वकुटुंबाच्या कल्याणार्थ आहे असे मानीत होते म्हणून त्यांनीं आपल्या एक दोघां विद्वान् मित्रांच्या साह्यानें बेळगांव नजीक शहापूरयेथें १८९७ च्या जुलै महिन्या-पासून ' धुरीण ' नांवाचें साप्ताहिक पत्र काढण्यास सुरूं केलें. याकामीं त्यांचे परम मित्र कै० दत्तात्रय रामचंद्र तिळवे, ( धुंडिराज छापखान्याचे मालक ) हे स्वतःच्या मुद्रणालयांतून छापून देण्याची मदत करीत असत. त्यावेळीं त्या पत्रानें बजाविलेल्या सेवेची लोकांस चांगली आठवण आहे. त्यानीं आपला करारीपणा आपल्या लेखांत तेव्हांपासून दाखविण्यास प्रारंभ केला. त्यांचें आपल्या पत्राचें बाणेदार धोरण, राज-कीय विषयाचें सांगोपांग विवेचन, लोकाराधनेसंबंधाचा त्यांचा तिटकारा, लेखाचा

प्रगमनशील असा प्रवाह, लेखांच्याद्वारें विद्वानाविषयीं दिसून येणारा आदरभाव, इत्यादियोगें अल्पावधींत 'धुरीण' पत्र सऱ्या महाराष्ट्रांत लोकादरास पात्र झालें. वऱ्हाड, नागपुराकडेसुद्धां अण्णासाहेब महाजनीसारख्या देशकार्यकर्त्या विद्वानांस धुरीण आवडूं लागलें. 'बेळगांवास दोघे तरुणगृहस्थ विशेष प्रक्षुब्ध वातावरणाच्या काळीं एक साप्ताहिक वृत्तपत्र उत्तमरीतीनें चालवीत आहेत हें पाहून फारच आनंद झाला, व धुरीणाच्याद्वारें पुढें अधीक व उत्तम लोकसेवा होवो.' असे न्या० रानड्यांनीं आपल्या अभिप्रायामध्यें म्हटलें आहे. ह्या पत्राच्याद्वारें आप्पासाहेब व त्यांचे त्यावेळचे समविचारी मित्र देशपांडे, ह्यांनीं जी लोकसेवा बजाविली तिची साक्ष त्या पत्राच्या जुन्या फाईली देऊं शकतील. पुढें त्यांचे मुख्य मदतनीस रा० तिळवे हे प्लेगास बळी पडल्यामुळें त्यांच्या अभावीं छापण्याचे काम वक्तशीर होईनासें झालें व बेळगांव–शहापुराकडे प्लेगराजानें आपलें कायम अधिष्ठान ठेविलें, आणि तेव्हां ती प्लेगची प्रथम सुरवात; सेग्रीगेशन्, क्वारंटाईन, डिसइन्फेक्शन् वगैरे सरकारी त्रास, अशा अनेक अडचणी आल्यामुळें त्यांना तें पत्र दीड दोन वर्षांतच निरुपायास्तव बंद करावें लागलें. एव्हांपर्यंत आप्पासाहेबांचें वास्तव्य खानापूर येथेंच होतें. मधून मधून केव्हांतरी वकीली चालविण्याकरितां ते बेळगांवांस जाऊन येत असत. यामुळें त्याना दुबार श्रम पडूं लागले, म्हणून त्यांनीं आपलें कायम वास्तव्य बेळगांवासच करण्याचें योजिलें; आणि त्याप्रमाणें तेथें शहराच्या मध्यवस्तीत भव्य व टुमदार असें एक घर खरेदी घेतलें व तिकडे १८९८ मध्ये ते सहकुटुंब राहूं लागले.

**पत्नीवियोग व विविधज्ञानविस्तार.**

धुरीणपत्र बंद झाल्यावर मध्यंतरीं दोन तीन वर्षे आप्पासाहेबाचा लेखनव्यवसाय थोडा मंदावला होता म्हटलें तरी चालेल. कारण १९०१ इसवी मध्यें त्यांच्या प्रथम प्रियपत्नीवर निर्घृण काळानें झडप घालून त्यांच्या प्रापंचिकसुखांतलें मुख्य एक अंग लगेंच पाडल्यामुळें त्यांचें मन उद्विग्न झालें; व असें होणें प्रापंचिक स्थितीस अनुसरून साहजिक होतें. इकडून पुढें १९०२ सालापर्यंत त्यांचे कांहीं निराळेच विचार चालत होते. एखाद्या गतभर्तृकेचें पाणिग्रहण करून बिचारीची वैधव्यपंकांतून सुटका करावी, अथवा एखाद्या शीलवान अनुकूल स्वभावाच्या अशा सुशिक्षित प्रौढ स्त्रियेशीं विवाह करावा; किंवा आजन्मपर्यंत विधुर राहून बनेल तेवढा वेळ लोकसेवेंत देहाचें सार्थक

करावें! पण मातापितरांचे पश्चात् बालपणापासून चांगल्यारीतीनें संगोपन करून ज्यांनी त्यांना अशा उत्तम स्थितीस आणिलें व अगदीं श्रेष्ठप्रतीची विद्या शिकविली आणि आईबापांची आठवण देखील पडूं दिली नाहीं; असे जे त्यांचे मातुळ कै० वासुदेवराव यार्दी व मातृभगिनी काशीबाई यांच्या अनुज्ञेपुढें आप्पासाहेबांना आपले विचार बाजूस ठेवावे लागले. तथापि, त्याच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या दुसऱ्या विचारास त्यांनीं आपली अनुमती दिली, आणि त्याप्रमाणें मुंबई येथील प्रसिद्ध 'विविधज्ञानविस्तार' मासिक पुस्तकाचे विद्वान् संपादक व मालक कै० पुरुषोत्तमपंत नाडकर्णी यांच्या द्वितीय कन्येचे त्यांनीं दयार्द्र अंतःकरणानें १९०३ मध्यें पाणिग्रहण केलें. तेव्हांपासून पुनः आपल्या आगच्या विद्वत्तेमुळें आणि लेखनव्यवसायाशीं असलेल्या पूर्वपरिचयामुळें विविधज्ञानविस्तारांत प्रमुखत्वानें लिहिण्याचा हक्क आप्पासाहेबास ओघानेंच प्राप्त झाला. आतापर्यंत त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या लेखांचा विचार करितां हा हक्क त्यांनीं जास्त प्रमाणावर बजाविला नाहीं. याबद्दल प्रत्येक महाराष्ट्र वाङ्मयाच्या भक्तास हळहळ वाटल्यावांचून राहणार नाहीं. ते प्रत्येक महिन्यांतील प्रचलित विषयाचें समालोचन विस्तारांत करीत होते. हे काम त्यांनीं अखेरपर्यंत मोठ्या उमेदीनें व उत्साहानें केलें. १९०८ च्या जानेवारीच्या विस्तारांत त्यांनीं जे स्फूट लेख लिहिले आहेत ते त्याचे शेवटले होत. त्याचे ते लेख पाहिले असतां हें कार्य करण्यास ते किती लायख होते, सर्व बाजूंचा विचार करून आपल्या देशास आज हितकर असें प्रमेय वाचकापुढें ठेवण्यांत त्याचा कसा हातखंडा असे, हे त्या लेखांच्या वाचकांस सांगावयास नको. सामाजिक, राजकीय, औद्योगिक, धर्मसंबंधीं वगैरे पाहिजे त्या विषयाची चर्चा करिताना आपलें धोरण प्रगमनशील ठेवून लोकांमध्यें विवेक-जागृती करण्याकडे त्याचा कल असे, आणि त्यांचे सर्व विषयावरील विचार जसे असावे तसेच असत. त्यामध्ये कुढपणा किंवा कुत्सितपणा अगर असभ्यता यांचा केव्हांही मागमूस नसे.

**'चिकित्सक' पत्राचा जीर्णोद्धार.**

विस्ताराच्या द्वारे लेखनव्यवसाय चालविला होता तरी आप्पासाहेबांनीं याहीपेक्षां विशेष रीतीनें आपल्या कार्याचा परीघ वाढविण्याचें ठरविलें; आणि बेळगांवापलीकडे ज्याची विशेषसी कोणास माहिती नव्हती अशा तेथें निघणाऱ्या 'चिकित्सक' पत्राचें संपादकत्व आपले पूर्वपरिचित स्नेही रा. देशपांडे यांस सामील करून घेऊन १९०४ इसवीपासून स्वतः दोघांनीं पत्करिलें

व त्या पत्राचा महाराष्ट्रांत सर्व ठिकाणीं प्रसार केला पण पुढें पुढें रा. देशपांडे यांच्या विचारास अगदीं निराळें वळण लागत चाललें. ज्यांनीं बारा वर्षांपूर्वी प्रगमनशील व उदार विचारांचा प्रसार करण्यासाठीं अत्यंत श्रम केले, नंतर पुनः 'चिकित्सका' सारखें पत्र हातीं घेऊन ज्यांनीं आपल्या पूर्व कार्यास पुनः मोठ्या निष्ठेनें प्रारंभ केला, ते रा. देशपांडे अल्प काळानंतर अगदींच फिरले! त्यांच्या विचारांत जमीनअस्मानाचें अंतर पडलें! यामुळें आप्पासाहेबांना स्वतःच्या एकट्याच्या जोखमीवर पत्र चालवावें लागलें धुरीणपत्र काढण्याच्या पूर्वी महाराष्ट्राची जी स्थिति होती तिच्यापेक्षां १९०४ सालीं ती कित्येक बाबतींत अत्यंत खेदजनक होती. विचारस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, लेखन व उच्चारस्वातंत्र्य. ह्याच्या वृथा वल्गना चालल्या होत्या; व अशा वल्गना करणारे स्वतः अधिकाधीक परतंत्री होत होते. अशा वेळीं आप्पासाहेब आपल्या देशासंबंधाचें कर्तव्य करण्याच्या हेतूने पुढें सरसावले. हें कार्य त्यांनीं किती उत्तम प्रकारें पार पाडलें, आपला करारीपणा त्यांनीं कसा कायम राखिला, लोकशिक्षणाचें कार्य त्यांनीं कसें पार पाडिलें, प्रतिस्पर्ध्यांशीं सामना करण्याचे प्रसंग आले असतां त्यांनीं कसें असाधारण नीतिधैर्य दाखविलें व लोकांचें आदिदैवत बनलेल्या संबंधानें सुद्धां आपला स्पष्ट अभिप्राय व्यक्त करावयास ते कसे किंचिन्मात्र कचरले नाहींत; इतकेंच नव्हे तर त्याचें हें धारिष्ट त्यांचा बाणेदारपणा, त्यांची स्पष्टोक्ति, ह्यामुळे चिकित्सकावर बहिष्कार घालण्यापर्यंत कांहीं पक्षपाती लोक कसे पुढे आले तो प्रसंग अद्याप पुष्कळांच्या स्मरणांत असेलच! त्या बहिष्कारांमुळें सांपत्तिकदृष्ट्या चिकित्सकाचा लाभच झाला, कारण ही बहिष्काराची बातमी वणव्याप्रमाणें देशभर पसरतांच कित्येक लोकांनीं मुद्दाम चिकित्सक घेण्यास सुरवात केली. प्रतिपक्षी लोकसुद्धां इतरांकडून पत्र मागवून वाचूं लागलें व कांहीं मंडळी तर राजरोसपणें चिकित्सकास आश्रय देऊं लागली!

**स्वतंत्र देशी उद्योग.**

आप्पासाहेबांचें सारें लक्ष केवळ आपल्या वाङ्मयाच्या सुधारणेकडेच होतें असें नाहीं. ते आपल्या देशांतल्या व्यापारधंद्याकडेही लक्ष पुरवीत असत. देशांतील व्यापारधंदे अगदीं बसत चालले आहेत, त्यांत सुशिक्षित लोकांनीं लक्ष घातल्याशिवाय ते वर यावयाचे नाहींत, हें तत्व त्यांच्या मनांत भरल्यावरून बेळगांव जिल्ह्यांत किणूर येथें "देशपांडे आणि मंडळी" ह्या नांवाची एक लहानशी संस्था स्थापून इ० स० १९०६ सालापासून, तेथें हातमागावर, पक्क्या रंगाचीं सुती लुगडीं

धोतरजोडे, चेक इत्यादि सस्तें कापड काढण्याचें काम त्यांनी चालू केलें होतें. आणि त्यांतल्या मालाच्या चांगुलपणाबद्दल त्यांस सुरत, पंढरपुर कलकत्ता इत्यादि ठिकाणच्या औद्योगिक प्रदर्शनांतून सुवर्ण पदकें बक्षीस मिळालीं आहेत.

**मंगळूर येथें परिषदेस गमन.**

सध्यांच्याकाळीं आपल्या देशाच्या उन्नतीचा मुख्य उपाय ह्मटला म्हणजे जातिजातिंतील पोटभेद मोडून ऐक्य करणें होय. व ह्या पवित्र कार्याचा पुढाकार विद्वान् लोकांनीं अथवा सार्वजनिक किंवा सामाजिक सभांनीं हातीं घेतल्यावांचून निभाव लागावयाचा नाहीं अशी आप्पासाहेबांची ठाम समजूत झालेली होती; आणि ह्मणूनच आपल्या स्वतःच्या 'सारस्वतब्राम्हण' ज्ञातीमध्यें असलेले पोटभेद मोडून त्यांचे परस्पर ऐक्य व्हावें अशा उदात्त हेतूनें ते १९०८ च्या डिसेंबर महिन्यांत मंगळूर येथील 'गौडसारस्वत ब्राम्हण परिषदे' स बेळगांवांतील स्वकीय समाजाच्या वतीनें प्रतिनिधी होऊन मुद्दाम गेले होते परंतु त्या संबंधाच्या समजुतीच्या, परिपाठांच्या, आणि दुराग्रहाच्या मुळ्या आपल्यांतील अशिक्षित बहुजन समुदायांत कितीएक युगांपासून खोल खोल गेलेल्या आहेत. तें कार्य साक्षात् धर्माध्यक्ष आचार्यांना देखील हात टेकायास लावते, तेथें इतरांचा काय पाड! तेव्हां अर्थात् तेथें आप्पासाहेबांनी केलेल्या खटपटीस यश आलें नाहीं. ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. तरी त्यापासून एवढें ध्यावयाचें कीं, ह्या एवढ्या महत्कार्यांत देखील त्यांनीं प्रयत्न केल्याशिवाय सोडिलें नाहींत यश आलें नाहीं त्यास त्यांचा उपाय नाहीं. तरी ते आशावादी असल्यामुळें, पुढील कालावर नजर ठेवून दुसरी परिषद् त्यांनीं मुद्दाम बेळगांवास बोलावली होती.

**आजारीपणा व अंतकाल.**

अशारीतीनें आप्पासाहेबांनीं सबंध महाराष्ट्रीय बांधवास आपला परिचय करून दिलाच होता, पण मलबार, कर्नाटक वगैरे भागांत त्यांची फारशी कोणास माहिती नव्हती. ती त्यांनीं तेथील परिषदेंत आपल्या विद्वत्वपूर्ण वक्तृत्वाच्या योगानें सर्व बांधवांस करून दिली तीच त्यांची तेथील लोकांस दुर्दैवानें शेवटची भेट झाली. परिषदेचें काम आटपल्यावर ते १९०९ जानेवारीच्या पहिल्या तारखेसच मंगळूराहून बेळगांवास येण्यास निघाले. तेथें आणखी ४।८ दिवस राहण्याविषयीं लोकांचा त्यांस विशेष आग्रह होता. पण बेळगांव कोर्टांत त्यांच्या एका पक्षकाराची खटल्याची मुदत असल्यामुळें नूतन परि-

चित अशा मेंगळूरकर बांधवांच्या इच्छेचा अगदीं निरुपायास्तव त्यांना हिरमोड करावा लागला. नंतर लागलींच ते तेथून निघाल्यावर बेळगांवास येऊन थोडे दिवस राहिले; व तेथें प्लेग फार झाला म्हणून ते कोल्हापुरास जाऊन राहिले तेथें त्यांस अकस्मात् दुष्ट ज्वरानें गांठलें. आणि सत्तेचाळीस दिवस एकसारखा विषमज्वर येऊन त्यांतच १९०९ फेब्रुवारी महिन्याच्या २६ व्या तारखेस त्यांस देवाज्ञा झाली. मरणसमयीं त्यांचे वय अवघें ३९ वर्षाचें होते !!! येथपर्यंत आप्पासाहेबांच्या आयुष्यांतील चरितक्रम पूर्ण झाला. आतां यापुढें निरनिराळ्या विषयांसंबंधानें त्यांचे खास विचार कसे होते, हें त्यांच्या वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या लेखांतील उताऱ्यांसह येथें दाखवून वाढलेले हें चरित्र आटोपतें घेऊं.

आप्पासाहेबांच्या विद्वत्वपूर्ण श्रेष्ठ विचारांचें दिग्दर्शन त्यांच्या ह्या लहानशा चरित्रांत करणें अगदीं अशक्य आहे. त्यांच्या विचाराची दिशा समजण्यास ते लेखच मननपूर्वक संपूर्ण वाचून पाहिले पाहिजेत. त्याशिवाय त्यांची मार्मिकता, सरलता, व उपयुक्तपणा ही लक्षांत यावयाचीं नाहीत. तथापि 'शितावरून भाताचि परीक्षा' या न्यायास अनुसरून त्यांच्या कांहीं महत्वाच्या विचारांचें थोडे तरी दिग्दर्शन येथें करणें जरूर आहे.

**शिक्षणविषयक विचार.**

एकदेशीय शिक्षणाचा परिणाम कोणत्याही माणसाला हितकर न होता तो अहितकारकच होतो. याविषयी त्यांनीं आपल्या एका लेखात असें म्हटलें आहे:—" शरीर, बुद्धि आणि मन यांचा विकास सम प्रमाणानें व समकालीं झाल्याविना व्यक्तीच्या प्रगतीची आशा नको, या त्रयीपैकीं एकाच अंगाचा उत्कर्ष करणारें शिक्षण तात्पुरतें कितीही उपयुक्त असलें किंवा वाटलें तरी त्याचा अखेर परिणाम व्यक्तीस हितकारक व्हावयाचा नाहीं '**शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्**' या कव्युक्तीप्रमाणें शारीरिक सुस्थितीचें महत्व विशेष आहे. पण ते कशासाठीं ! नुसतें पुंड बनून लोकांस उपद्रव देण्यासाठी नव्हे; तर धर्मसाधनासाठीं, बुद्धीचा व मनाचा पराकाष्ठेचा विकास करून सात्विक वृत्तीच्या विजयासाठीं, नुसत्या शरीराची वाढ होऊं दिल्यास आडदांड पाहिलवान निपजेल, नुसत्या बुद्धीचीच काळजी घेतल्यास तीव्र पंडित बनेल, नुसत्या मनाचाच ध्यास धरिल्यास निरुपद्रवी लहरी होईल. पण धर्माचा—तत्वाचा—अधिकारी होण्यास हें त्रिविध शिक्षण एकाचवेळीं मिळालें पाहिजे. मनाचा स्वाभाविक ओढा एकीकडे असतो, तर बुद्धी त्यास

दुसरीकडे बोट दाखविते; मन प्रवृत्तिपर, तर बुद्धिनिवृत्तिपर; मन घोडा, बुद्धि लगाम; मन ओढाळ गुरूं बुद्धि त्याचें गळ्यांतील लोढणें. हा झगडा नित्य आहे. आणि या झगड्यांतील वादी–प्रतिवादींच्या योग्य हक्कांचें संरक्षण करून, त्यांच्या विरोधापासूनच आपलें हित साधून घेण्याची कला सुलभ करून देणारें शिक्षण खरें शिक्षण होय." तसेंच हल्लींच्या चालू शिक्षणपद्धतीसंबंधानें जी कांहींजणांकडून प्रतिकूल टीका होते, ती त्यांना बिलकूल मान्य नसे. म्हणून असल्या बेगडी व हानिकारक टीकेस उत्तर देतांना एकदां ते म्हणाले:–" ...अर्वाचीन पाश्चात्य विद्या आम्हांस अगदीं उपयोगाच्या नाहींत, त्यांचेपायीं आमचें अतोनात राष्ट्रीयनुकसान झालें आहे. असें सरसकट विधान करणें चुकीचें होईल. पाश्चात्यविद्येचे ठिकाणीं धर्म व नीति ह्यांच्या तत्वांचा पूर्ण अभाव आहे हें विधानही कांहीं सामान्य धाडसाचें नव्हे... आम्हांस प्राप्त झालेली आत्मजागृती या शिक्षणाचेंच उत्कृष्ट फल होय. राष्ट्रीय युनिव्हर्सिटि स्थापून देशाच्या अवनतीच्या ओघास आळा घालण्याचा सत्संकल्प करणारी मंडळी याच शिक्षणानें सुसंस्कृत झालेली आहे. राजकीयस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य इत्यादि स्वातंत्र्य परंपरांची पहिली ओळख पाश्चात्य शिक्षणानेंच करून दिली आहे. आपला देश म्हणून कांहीं वस्तु आहे, जातीपलीकडे स्ववृत्तीची मर्यादा असूं शकते, धर्म, भाषा, पेहराव, चालीरीति ह्या गोष्टी आगंतुक होत, राष्ट्रत्व जें आहे तें ह्या सर्वांच्याही पलीकडे आहे, अशी दृष्टि फांकण्यास हेंच शिक्षण मुख्यतः कारण झालें आहे. या गोष्टी जर खऱ्या, तर मग प्रस्तुत शिक्षणास नांवें ठेवणें म्हणजे कृतघ्नपणाची कमाल झाली असेंच म्हटलें पाहिजे."

**राजकीय विचार.**

राजकीय विषयांची हेळसांड करून कोणत्यातरी एका सुधारणेस प्राधान्य द्यावें व इतर सुधारणा बाजूस ठेवाव्या, असें आप्पासाहेबांचें मत नव्हतें. परंतु रायकीय बाबतींतमात्र जहालांहून जहाल आणि सामाजिक बाबतींत मवाळांहून मवाळ असा प्रकार जेव्हां जेव्हां त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येई, तेव्हां तेव्हां ह्या एकतर्फी जहाल लोकांची निर्भर्त्सना करावयास ते कचरत नसत. अशा प्रकारचे एकतर्फी जहाल देशाचे हितशत्रू होत असेंच ते समजत असत. ते म्हणतात:—" सरकारानें बहाल होऊन आज सारे राजकीय हक्क आम्हांस दिले तर त्यांचा यथासांग उपयोग करण्याची व उपभोग घेण्याची पात्रता आम्हांत नाहीं. ही गोष्ट लपविण्याचे दिवस आतां गेले. ही पात्रता अंगीं येण्यास आम्हीं मुळीं लायकच नाहीं, असें म्हणण्याचे

दिवसही केव्हांच निघून गेलें आहेत......ही पात्रता येण्यास आपणास स्वावलंबनाचें व्रत घेतलें पाहिजे. सरकार जसें आज आम्हीं मागूं ते हक्क देण्यास तयार नाहीं, त्याचप्रमाणें आम्हीं सांगूं ती सामाजिक सुधारणा करण्यास समाज तयार नाहीं. मग सरकारावर रुसून जर आम्हीं स्वावलंबन आचरावयाचें ( तें कसें हा प्रश्न अलाहिदा आहे ! ) तर समाजास एकेबाजूस ठेवून त्याच स्वावलंबनाचा आदर आपण करावयास नको काय ? सरकार परकी, समाज आमचा. आमचा समाज जर आमचें ऐकत नाहीं, आमचा शहाणपणा कबूल करीत नाहीं, आम्हांशीं सहानुभूति दाखवीत नाहीं तर सरकारानें त्याच गोष्टी केल्या, म्हणून विषाद व आश्चर्य मानण्याचें कारण काय राहिलें ? सत्य न्यायादि तत्त्वांस निर्लज्जपणें व निर्धास्तपणें पायाखालीं तुडविणाऱ्या सामाजिक चालीरीतीचा निषेध जर आह्मांकडून होत नाहीं तर मग त्या तत्त्वांच्या लंब्या लंब्या बाता राजकीय बाबतींत ऐकण्यास सरकार तयार नाहीं, म्हणून त्याजवर रागावण्याचा आह्मांस कसा व कोठून अधिकार पोंचतो ? " अशाप्रकारची प्रखर जागृती त्यांच्यामध्यें रात्रंदिवस वागत असे.

**धर्मविषयक विचार.**

येथपर्यंतच्या विवेचनावरून राजकीय व सामाजिक बाबतींत आप्पासाहेबांच्या विचारांचें स्वरूप कोणत्यारीतीचें होतें त्याची स्पष्ट कल्पना वाचकांस होईल. आता धर्मासंबंधानें त्यांचें काय मत होतें तें पाहूं. अनेकविध धर्मांचा जो आज जगावर फैलाव झाला आहे व दिवसेंदिवस अधिकाधिक होत चालला आहे, त्यांतील भेद हा फक्त नाममात्र होय. तत्वत: साऱ्या धर्मांचें रहस्य एक आहे. वास्तव एकमेकांनीं एकमेकाचा धर्म बरावाईट म्हणणें, अथवा परस्पर निंदा करणें, हें त्या धर्मविषयक अज्ञानाचें द्योतक समजलें पाहिजे. वस्तुत: असा हा प्रकार आपल्या हिंदुस्थानदेशांत फार आढळतो. याविषयीं आप्पासाहेबांनीं एकेठिकाणीं असें म्हटलें आहे:—"... सत्य हें अनादि, सर्वव्यापी, अनंत आहे. पूर्वेकडील लोकांनीं आपण सूर्य पश्चिमेकडच्या लोकांस पाठवितों असा अभिमान वाहणें जसें हास्यास्पद, तसेंच एका धर्मानें दुसऱ्या धर्मांतील सिद्धांताची चोरी केली असा आरोप करणें व अभिमान वाहणें हास्यास्पद होय. सत्याचा सागर अपार आहे. श्रीकृष्ण, जीजसक्रिस्त, महंमद पैगंबर, भगवान् बुद्ध, इत्यादि महात्म्यांनीं त्यांतील हवातेवढा भाग आपापल्या कार्याकरितां घेतला. तेव्हां त्यांनीं प्रणित केलेले धर्मसिद्धांत वस्तुत: एकरूप असलेच पाहिजेत. तें तसें नसतें तर मात्र विस्मयास व संशयास जागा राहाती.

सूर्याचें प्रतिबिंब भिन्न रंगाच्या पाण्यांतून भिन्न भिन्न रंगांचें दिसलें, तरी त्यावरून सूर्याच्या स्वरूपांत व कार्यांत कांहीं फरक झालेला नसतो. पृथ्वीवर तळपणारा भगवान् सूर्यनारायण एकच; पण पृथ्वीच्या पाठीवर शीतकटिबंध, उष्णकटिबंध व समशीतोष्ण कटिबंध असे प्रकार दिसतात. महानदीचा उगम एकच असतो पण तिचा प्रवाह ज्या ज्या भूप्रदेशांतून जाईल, त्या त्या भूप्रदेशांत असणाऱ्या क्षारादि खनिजद्रव्यांच्या अनुरोधानें व अनुषंगानें तिच्या पाण्याचा रंग व रुचि हीं बदलत असतात. भूपृष्ठाच्या उंचसखलपणा व रुंद अरुंदपणाप्रमाणें तिचा प्रवाह, शांत, गंभीर, उथळ, स्खलस्खलित, चिचोळा, विस्तृत असा बनतो. त्याचप्रमाणें सत्य हें वस्तुतः एकरूप असलें तरी देशकाल स्थितीच्या मानानें त्याचें स्वरूप कमीजास्त उदात्त अगर गूढ बनतें; पण बाह्य आकारास न भुलतां अगर न भितां धिमेपणानें सत्यशोधनाचीच एक इच्छा धरून, थोडेंसें आंत पाहण्याची तस्दी घेतली म्हणजे त्याचें अस्सल स्वरूप दिसल्याविना राहत नाहीं."

**स्वभाव व गुण.**

आप्पासाहेबांचा स्वभाव फार शांत, गंभीर व उदात्त असा होता. प्रतिपक्षाशीं वाद करतांना आपल्या विचाराचें समर्थन ते मोठ्या शांत रीतीनें करीत असत. कोर्टदरबारांत अथवा अन्य सार्वजनिक ठिकाणांत कोणत्याही विषयावर त्यांच्याशी बोलण्याचा कोणासही प्रसंग आला तरी साधक बाधक प्रमाणांनीं त्या विषयाचें योग्य विवेचन करून त्याची समजूत करून देण्याची त्यांस चांगली हातोटी साधली होती. त्यांच्या आंगचा मुख्य गुण म्हणजे निर्भीडपणा होय. त्यांना एकदां कोणतीही गोष्ट खरीशी वाटली, किंवा ती त्यांच्या मनांत भरली, म्हणजे ती तशी लोकांच्या मनांत भरविण्याच्या कामीं ते कोणाची तिळप्राय परवा करीत नसत. आपलें म्हणणें सिद्ध करण्यास आवश्यक वाटे तें ते बेलाशक लिहीत असत. १९०६ सालीं रा. टिळकांनीं बेळगांवास मुद्दाम येऊन दिलेल्या व्याख्यानांतील कांहीं मुद्यांवर त्यावेळीं चिकित्सक पत्रांत आप्पासाहेबांनीं जी मुद्देसुद चर्चा केली. त्यावरून कोणाच्याही सहज लक्षांत येईल त्यांच्या मनाची उदात्त वृत्ति त्यांच्या लेखांतल्या शब्दांत मूर्तिमत दिसत असे. तरी त्यांच्या भाषेमध्यें सभ्यता, भारदस्तपणा, सरलता, विशुद्धता इत्यादि जे गुण वसत असत, त्यांत कधीं तिळभर कमतरता आली नाहीं. हा गुण कांहीं सामान्य नव्हे. ते जसे उत्तम मार्मिक लेखक होते तसे चांगले स्पष्टवक्तेही होते. कोणत्याही सार्वजनिक सभांमधून वगैरे एखाद्या स्वतंत्र विषयावर त्यांच्या विद्वत्तापूर्ण मधुर-

वाणीचा अस्खलित प्रवाह सुरू झाला म्हणजे श्रोतृवृंदांची मनें तद्रूप होत असत. हें प्रस्तुत लेखकास अनेकवेळां अनुभवास आलेलें आहे. इतिहास, तत्वशास्त्र, वेदांतशास्त्र आणि धर्म हे विषय त्यांच्या फार आवडीचे असून त्यांजवर त्यांचा बराच व्यासंग असे. नेहमीं याच विषयांवरील ग्रंथवाचनाकडे त्यांचा फार ओढा असे. वकीलीच्या धंद्यांतही त्यांचा चांगला नांवलौकिक असे; परंतु वकीलीचे व्यवसायाशिवाय समाजसुधारणा वगैरे सार्वजनिक कार्याकडे त्यांचें लक्ष्य विशेष गुंतून त्याकामीं आपल्या लेखांनीं व वक्तृत्वानें सेवा करण्यांत त्यांनीं आपला सारा काल घालविला. केवळ द्रव्यार्जन करून श्रीमंत होऊन स्वस्थ राहण्यापेक्षां आणि पदरचें खाऊन लष्करची चाकरी करीत फिरण्याऐवजी होईल तेवढी राष्ट्रसेवा करून त्यांत आपली बुद्धिमत्ता खर्च करावी हीच त्यांची मूळापासूनची इच्छा होती, आणि या धोरणानेंच ते वागत गेले. बहुतेक त्यांचे सारे आयुष्य अध्ययन आणि लेखांच्या व भाषणांच्याद्वारें लोकाध्यापन यांतच गेलें ह्मटलें तरी चालेल. अशारीतीचीं बहुगुणी माणसें फार थोडींच आढळतील.

आतां ते म्हणजे केवळ गुणाची खनीच होते, त्यांच्यामध्यें कोणत्याचप्रकारच्या दोषास जागा नव्हती, असें कोणीही समंजस मनुष्य प्रतिपादन करणार नाहीं. निर्दोषत्व हें फक्त एका ईश्वराच्या ठायीं कल्पिणें रास्त होईल. त्याचा कोणा एका मर्त्य मनुष्याच्याठायीं—मग तो कितीही मोठा असो—आरोप करण्याचा प्रयत्नकरणें एखाद्या अज्ञभाविकास कितीही इष्ट वाटले तरी, तें असमंजसपणाचें पहिलें लक्षण होय. तशा आरोपापासून कोणाचा फायदा तर नाहींच उलट त्या मर्त्यमनुष्याचें यथाशक्ति अनुकरण करूं पाहणाऱ्या इसमाचा मात्र उत्साहभंग होऊं शकेल! तेव्हां एखादा दुसरा दोष आप्पासाहेबांमध्यें होता असें कबूल केलें तरी त्यांच्या बहुगुणप्रकाशापुढें दोषाचा मुळींच भास देखील होत नव्हता. तात्पर्य, सत्यनिष्ठा, सर्वांभूतीं दया, जनहिताविषयीं खरी कळकळ आणि तदनुरूप वर्तन, हेंच प्रस्तुत चरित्रांतील घेण्यासारखें सार होय.

---

समाप्त.

# समस्त गौडसारस्वत ब्रह्मवृन्दांस अगत्याची विनंति.

१ सारस्वत रत्नमालेचा द्वितीय गुच्छ लवकरच प्रसिद्ध करावयाचा आहे; तेव्हां त्यांत समाविष्ट करण्याजोगीं वेदशास्त्रज्ञ, साधु, संत, कवी, ग्रंथकार, शूर मुत्सद्दी वगैरे विविधप्रकारचीं प्रसिद्ध नररत्नें ज्यांच्या संग्रहीं असतील, अथवा त्यांविषयीं ज्या कोणास विशेष माहिती असेल त्यांनीं त्याबद्दलची-शक्यतर सचित्र-माहिती आमचेकडे पाठविण्याची कृपा करावी.

२ प्रसिद्ध पुरुषांचीं फक्त नांवेंच तेवढीं कोणीही सुचवूं नयेत; तशीं नांवें आम्हांसही बरींचशीं माहीत आहेत पण त्यांपासून चरित्रलेखनाचे कामीं कांहीं उपयोग होत नसतो; तेव्हां सारस्वत ज्ञातींतील कोणत्याही प्रसिद्ध पुरुषाचें-अथवा रत्नाचें-नांव ज्यांस माहित असेल त्यांनीं शक्य तेवढी खटपट करून त्या पुरुषाचें चरित्र लिहिण्यास उपयोगी पडेल अशी साद्यंत माहिती इंग्लीश अगर बाळबोधलिपींत सुवाच्य अक्षरानें लिहून आमचेकडे पाठविण्याची तस्दी घ्यावी. याबद्दल विशेष खुलासा पत्रद्वारें करून घ्यावा.

३ या द्वितीय गुच्छांत सारस्वत ब्राह्मणज्ञातींत उपलब्ध असलेल्या सर्व धर्मसंस्थानांतील योग्य अशा ब्रह्मीभूत धर्मगुरु ( स्वामी ) चींही चरित्रें समाविष्ट करावयाचीं आहेत, तेव्हां त्या त्या संस्थानच्या शिष्यवर्गापैकीं ज्या कोणास माहिती असेल त्यांनीं आपल्या पूज्यपाद धर्मगुरुंबद्दलची ( पूर्वाश्रमांतील व संन्यासाश्रमांतील ) योग्य ती माहिती पाठवावी.

४ चालू परिस्थितीचा नीट विचार केला असतां, सांप्रत आम्हांला व आमच्या भावी पिढीला ' आपण कोण आहों, आपली पूर्व परंपरा कशी होती, आपण प्रस्तुत स्थितीमध्यें कसे आलों, ही स्थिती चांगली आहे कीं वाईट आहे, वगैरे गोष्टी कळण्यास ऐतिहासिक ज्ञान असणें फार जरूर आहे. कांहीं बाबतींत आपल्या सारस्वत ज्ञातींत जी वेळोवेळीं उणीव भासते तिचें बलवत्तर कारण म्हणजे ऐतिहासिक अज्ञान होय.

५ कै० गुंजीकर, कानविंदे, केणीशास्त्री वगैरे मंडळींनीं सारस्वत ज्ञातीची ऐतिहासिक माहिती प्रसंगानुसार पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली होती. हल्लीं तीही पुस्तकें दुर्मीळ झालीं आहेत, आणि सांप्रतच्या स्थितींत तर आम्हांस ऐतिहासिक माहितीची फारच आवश्यकता आहे. - असें निदान आम्हांस तरी आलेल्या अनुभवावरून वाटत आहे.

६ म्हणून, आम्ही हिंदुस्थानात निरनिराळ्या ठिकाणीं ५।६ वर्षे प्रवास करून, सारस्वत ज्ञातीस उपयुक्त अशी माहिती मिळवून कांहीं सुशिक्षित विद्वान् मंडळींच्या देखरेखीखालीं " सारस्वत-भूषण " नामक पुस्तकरूपानें " गौड सारस्वत ब्राह्मण " ज्ञातीचा प्राचीन अर्वाचीन इतिहास लिहून प्रसिद्ध करण्याचा यत्न करीत आहोंत.

७ या पुस्तकांत माहिती कोणती येईल, व पुस्तकाची व्यवस्था कशी राहील, याबद्दलचें एक निराळें विस्तृत माहितीपत्रक छापविलें आहे. तें अवश्य असणारांनीं पत्र पाठवून मागवून घ्यावें. आणि त्यांतील प्रश्नाप्रमाणें माहिती पाठविण्याचा यत्न करावा.

८ आतां ही आमची सारी खटपट केवळ सारस्वत ज्ञातीच्या आश्रयावर अवलंबून आहे हें येथें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. तेव्हां सारस्वत ज्ञातींतील प्रत्येक सद्गृहस्थांनीं सामर्थ्यानुरूप द्रव्य, माहिती, जुनेलेख, पुस्तकें वगैरे देऊन आम्हांस मदत केली पाहिजे. आणि अशाप्रकारची मदत करणें हें स्वज्ञातीयांचें मुख्य कर्तव्यच आहे.

## विशेष सूचना.

९ प्रस्तुत ( पुस्तकांत ) सारस्वत रत्नम[illegible] केलेल्या ( पुरुषांशीं ) रत्नाशीं ज्यांचा विशेष आप[illegible] अशा सद्गृहस्थांनीं ज्ञातीच्या अभ्युदयार्थ करीत असलेल्या आमच्या ह्या प्रयत्नास पारितोषकरूपानें विशेष द्रव्यसहाय्य करावें. अ[illegible] त्यांचेपाशीं विनंति आहे.

१० सर्वतोपरी आपल्या सारस्वत ब्राह्मण ज्ञातीची [illegible] व्हावी, ज्ञातीचा सर्वांगपरिपूर्ण असा इतिहास प्रसिद्ध व्हावा [illegible] ह्या ज्ञातींतील थोर व प्रसिद्ध पुरुषांची आपणास मा[illegible] असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं ह्या " सारस्वत रत्नम[illegible]च्या " प्रथमगुच्छास आश्रय देऊन आणि आपल्या स्नेही मंडळीकडूनही देववून पुढील कार्य करण्यास आम्हास प्रोत्साहन द्यावें अशी सर्व ज्ञातिबांधवांकडे आमची नम्र विनंति आहे.

११ कोणत्याही बाबतींत पत्र पाठविणें झाल्यास खालील पत्त्यावर पाठवावें. नाडपेड पत्र पाठवूं नये.

मठस्थ-गणेश रामचंद्र शर्मा
पोष्ट खानापूर जिल्हा बेळगांव.